# दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

## ग्रंथालीचे इ-दिवाळी अंक

www.granthali.com

इ-ग्रंथाली - कॅनडा
संपादन
स्मिता भागवत

इ-ग्रंथाली - आखाती
संपादन
डॉ. उज्ज्वला दळवी

इ-ग्रंथाली - अमेरिका
संपादन
विद्या हर्डीकर-सप्रे

इ-ग्रंथाली - युरोप-आस्ट्रेलिया
संपादन
शुभदा परांजपे / योगिनी लेले



सप्रेम नमस्कार,
सोबत ‘रुची’ दिवाळी अंक
पाठवला आहे.
आपली प्रतिक्रिया जाणण्यास
उत्सुक आहोत.
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छांसह!
आपले स्नेहांकित,
अरुण जोशी, संपादक
सुदेश हिंगलासपूरकर, विश्वस्त
आणि
ग्रंथाली परिवार

granthali01@gmail.com
granthali02@gmail.com

दिवाळी अंक । नोव्हेंबर-डिसेंबर २०१२ । ₹१००/-

ग्रंथाली
वाचक
चळवळीचे

# रुची



शुभदीपावली...



आमचे सर्व सभासद, ग्राहक व सर्व हितचिंतकांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !

सारस्वत बँक

दि सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि. (शेड्युल्ड बँक)

कॉर्पोरेट सेंटर : सारस्वत बँक भवन, १५३, अप्पासाहेब मराठे मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.

email : customerservicecentre@saraswatbank.com

website - www.saraswatbank.com




जैन सौरबंब ▪ कंदील ▪ होम लायटींग ▪ पॉवर पॅक (इन्व्हर्टर) ▪ स्ट्रीट लायटींग
ट्रॅकरसह सौरपंपः शेती, घरे व हातपंपासाठी ▪ जैन नॅनो सौरपंप ▪ ग्रीड कनेक्टेड पॉवर प्लांट

जैन सौरबंब® | जैन इरिगेशन सिस्टीम्स् लि. कल्पना कणापरी. ब्रह्मांडाचा भेद करी.® | जैन ज्योत®

जैन ग्रीन एनर्जी पार्क; पो. बॉ. २०, जळगांव-४२५००२; फोनः ०२५७ ६६३०६१४, मनोज सुतावणे- ०२५७ ६६३०६०९
फॅक्सः ०२५७ २२६११५५; ई-मेलः solar@jains.com; वेबसाईटः www.jains.com

*सूर्यनारायणासमवेत संयुक्त प्रकल्प!*

**ज्ञानेश्वर भिसे** ९४२२७७५९३० (अहमदनगर, औरंगाबाद, जालना, बीड) **लक्ष्मण धांडे** ९४२२७७५९२८ (अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा) **अनुप आगीवाल** ९४२२७७५९२७ (जळगांव, धुळे, नाशिक) **विजय उरमुडे** ९४२२७७५९३९ (सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, बेळगाव, गोवा) **देवीदास पाटील** ९४२२७७५९३१ (पुणे, सातारा) **प्रवीण कुलकर्णी** ९४२२७७५९३३ (सोलापुर, उस्मानाबाद, लातूर) **दीपक पाटील** ९८७०९९०७५० (मुंबई, ठाणे, रायगड) **राजेश कपाले** ९४०४९५५३४० (नागपूर, वर्धा, चंद्रपुर, भंडारा, गोंदीया, गडचिरोली) **भागवत कुंभार** ९४२२७७५९४० (नांदेड, परभणी, हिंगोली)


शुभ दिपावली
प्रत्येक प्रज्वलित दिव्याचे तेज म्हणजेच
आपल्या प्रत्येकाच्या हृदयात अविरत
वसणारा विश्वासाचा झरा.
ह्या प्रत्येक प्रज्वलित दिव्याचे तेज
आपल्या आयुष्यात सतत प्रेम, शांती,
समृद्धी व सौख्याचा वर्षाव करु दे.
दि शामराव विठ्ठल को-ऑप. बँक लि.
व्यक्तिगत सेवेसाठी
Call: 022-66999777 | www.svcbank.com
• १०५ वर्षांहून अधिक काळ बँकिंगचा समृध्द अनुभव • देशातील पहिल्या ३ सहकारी बँकांपैकी एक
एकूण ७ राज्यामध्ये • रु. १४००० कोटीहून अधिक उलाढाल


चौगुले समुहा कडून दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !
चौगुले समूह
www.chowgule.co.in




ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक

# रुची

दिवाळी विशेषांक

**नोव्हेंबर-डिसेंबर २०१२, वर्ष ३१ वे,**
**अंक अकरा-बारा, मूल्य १०० रु.**

संपादक : **दिनकर गांगल**
कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**
जाहिरात व्यवस्था : **सुदेश हिंगलासपूरकर**
अक्षरजुळणी व मांडणी : **योगिता मोरे**
मुखपृष्ठ व चित्रे : **सतीश भावसार**
**रुची - वार्षिक वर्गणी : १०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**



पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, तळमजला,
यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे. के. सावंत मार्ग,
माटुंगा (प), मुंबई ४०००१६
दूरध्वनी : २४३०६६२४/२४२१६०५०
granthali01@gmail.com
granthali02@gmail.com
www.granthali.com



**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**




## अनुक्रम


'मस्कती' जयकर
डॉ. उज्ज्वला दळवी / ९
गझलचा बेताज बादशहा.!
आसिफ़अली पठाण / १५
कुंडलिका एक कहाणी
वसंत वसंत लिमये / २५
प्रश्नांची वखार
हेमंत देसाई / ३१
कमर्शिअल ब्रेक!
रविराज गंधे / ४१
दोन दिग्गजांची टक्कर!
डॉ. माधवी मेहेंदळे / ४९
दुर्भागी देशप्रेमी
उमेश कदम / ५९
चिनी प्रवासी फा-हियान
भावानुवाद सुहासिनी देशपांडे / ७३
मौनाचे झरोके भले
डॉ. यशवंत पाठक / ८९
कृष्णसखा कदंब
प्रा. नीला कोर्डे / ९५
पन्नाशीतला भावुक जेम्स बाँड
अपर्णा पाटील / १०५
ब्रेकथ्रू
दिलीप पांढरपट्टे / ११३

विधानसभेतील भाषण (काल्पनिक)
सु.गो. तपस्वी / ११७
कलंदर कलाकार
स्मिता भागवत / १२३
फ्रान्स, मी आणि 'आलम'गिरी
प्रभाकर वाईरकर / १३७
राजकारणाच्या पलीकडचे
प्रवीण बर्दापूरकर / १४८
जीना इसी का नाम है
अरुण पुराणिक / १५२
शिवाजी पार्कच्या कट्ट्यावरून
जयंत विठ्ठल कुळकर्णी / १५८
असाही एक छंद
प्रभा पुरोहित / १६८
सृष्टी-संगोपन आणि घरगुती कचरा व्यवस्थापन
वसुमती धुरू/ १७०
प्राचीन स्त्री-शिक्षण
डॉ. माया पाटील (शहापूरकर) / १७४
त्या चंद्राचे, या चंद्राशी
सरोज जोशी / १८८
सिनेमाची भाषा
स्वप्ना पाटसकर / १९५

**कवितेचं व्यासपीठ / १८१**
सदानंद डबीर, अशोक कोतवाल, उषा मेहता, श्रीपाद भालचंद्र जोशी, शशिकांत शिंदे, संध्या जोशी, सुरेश पाचकवडे, बबन लोंढे, गोविंद मोतलग, रमेश पवार, बबन सराडकर, प्रशांत केंदळे, किरण शिवहर डोंगरदिवे, बाळ राणे, रमेश सावंत, गणेश एस. भाकरे, आश्लेषा महाजन

## संपादकीय

दिवसागणिक एक प्रश्न उभा राहतो. कुठलंही क्षेत्र नाही, ज्याबद्दल प्रश्न नाही. काय अहेत हे प्रश्न? कोण देणार त्यांची उत्तरं? आपल्याकडे याबाबत बोलण्यासाठी आले आहेत, हे टोपीवाले, हे चष्मेवाले, हे टकले आणि हे कोरडे. यांच्याबरोबरच दिल्लीहून काळाराम कोळसे, बंगालहून प्रीती आडमुठे, चेन्नईहून राजा टूजीवाले आणि सोलापूरहून ऊर्जा अंधारे, हे या चर्चेत सहभागी होत आहेत....

मग चर्चा सुरू होते. 'हर सवाल का सवालही जबाब हो' या गाण्याप्रमाणे दरडावलेल्या प्रश्नांना निबर प्रश्नांनीच उत्तरं दिली जातात. 'त्यावेळी कुठे गेला होता तुझा धर्म?' अशा प्रकारच्या एकमेकांच्या कर्तृत्वावरील प्रश्नांनी चर्चा संपते... तरी यात 'लोक'मत कुठे आहे, हा प्रश्न उरतोच. अशा चर्चांनी कुणाचं काय साधलं जातं कुणास ठाऊक!

'रुची'च्या या दिवाळी विशेषांकात असे कुठलेच प्रश्न नाहीत. मात्र रविराज गंधे यांच्या 'कमर्शिअल ब्रेक' या लेखात दूरचित्रवाणीचं स्वरूप आणि हेमंत देसाई यांच्या 'प्रश्नांची वखार' या लेखातून आजच्या राजकीय-सामाजिक स्थितीचं वस्तुनिष्ठ विश्लेषण आहे.

अंकातला पहिला लेख आहे डॉ. उज्ज्वला दळवी यांचा. डॉ. आत्माराम सदाशिव जयकर या दीडशे वर्षांपूर्वी ओमान, मस्कतमध्ये आपल्या कर्तृत्वाची लक्षणीय मोहोर उमटवणाऱ्या एका मराठी माणसाचा परिचय घडवणारा. मेहदी हसन यांच्या गझलांचं गारुड आणि मूळ भारतीय असलेल्या या गझलसम्राटाचा जीवनपट असिफअली पठाण यांनी रेखाटलाय. मायकेलअँजेलो आणि लिओनार्दो दा विंची हे एकाच काळातले दोन महान कलाकार. त्यांची चित्रं आणि शिल्पं पाहणाऱ्याला अवाक् करतात. त्यांचे स्वभाव, त्यांचं व्यक्तिमत्त्व, त्यांचे विचार आणि त्यांचे कलाविषयी आग्रह म्हणजे एक जुगलबंदीच. या 'दोन दिग्गजांची टक्कर' कशी विलोभनीय आहे हे डॉ. माधवी मेहेंदळे यांनी सुरेख मांडलं आहे. स्मिता भागवत यांनी एका अद्भुत चित्रकार-कवीची मुलाखत घेतली आहे. 'विलोमचित्रे' हा चित्रप्रकार निर्माण केलेला हा कलाकार आहे अरविंद नारळे. चित्र उलट-सुलट पाहिलं असता कधी एकसारखं तर कधी एकाच चित्रात दोन विरुद्ध भावांचा दिसतो अद्भुत मिलाफ!

भगिनी निवेदिता यांनी फा-हियान या चिनी प्रवाशाबद्दल त्यांच्या 'फूटफॉल्स ऑफ इंडियन हिस्ट्री'मध्ये लिहिलं आहे. राजा विक्रमादित्याच्या काळात भारतासह थेट सिलोनपर्यंत बौद्ध धर्माची तत्त्वं व उपदेश यांचा अभ्यास करणारा हा प्रवासी वाटेतल्या मुक्कामातली निरीक्षणं नोंदवतो.

सुहासिनी देशपांडे यांनी केलेला निवेदितांच्या लेखाचा भावानुवाद या प्रवाशाची ओळख करून देतो.

टाटांची दूरदृष्टी, त्यांच्यात असलेली नवनिर्माणाची ऊर्जा, १९२७ साली उभारलेलं वीजनिर्मिती केंद्र, ताम्हीणी घाटाचा परिसर आणि कुंडलिका नदीचा प्रवाह याचा विस्मयकारी संगम वसंत वसंत लिमये यांच्या लेखात घडतो. शिवाजी पार्क म्हणजे मुंबईचा आत्मा. त्याचं ऐतिहासिक महत्त्व तिथे घडलेल्या अनेकविध सभा-संमेलनं, क्रीडा सामने, उत्सव-महोत्सव यासाठी जसं आहे, तसंच या मैदानाला सांस्कृतिक-सामाजिक क्षेत्रांतील दिग्गजांच्या रहिवासाचं कोंदण आहे. या मैदानाच्या परिसरातील एकेका गल्लीतील एकेका घराची दखल घेत जयंत कुळकर्णी यांनी हे कोंदण म्हणजे केवढं वैभव होतं हे 'शिवाजी पार्कच्या कट्ट्यावरून' या आठवणींत सिद्ध केलं आहे. जगात नावाजलेलं हे शहर 'डोई मुकुट तियेच्या, परि पायी ना पैजार' असं विरुद्धधर्मी असलं तरी जीवनआशा फुलवणारं, ऊर्जा देणारं म्हणून मोहमयी आहे. या शहराची काही वर्षांपूर्वीची, अज्ञात छायाचित्रकाराची छायाचित्रं अरुण पुराणिक यांना चोरबाजारात मिळाली. मुंबईचं ते चित्रदर्शन या अंकात समाविष्ट आहे.

प्रवीण बर्दापूरकर यांनी राजकारणाच्या पलीकडे पाहणाऱ्या राजकारण्यांचं दुर्लक्षित राहणारं रूप दाखवलं आहे. सु.गो. तपस्वी यांचं विधानसभेतील काल्पनिक भाषण विचारप्रवर्तक आहे. डॉ. माया पाटील स्त्री-शिक्षणातील प्राचीन जाणिवा सांगतात. घरगुती कचराव्यवस्थापन आणि सृष्टी-संवर्धन लिहिताना वसुमती धुरू वेगळी मुंबई उभी करतात. सरोज जोशी यांनी डॉ. बाळ फोंडके यांच्याशी संवाद साधला आहे. प्रा नीला कोर्डे यांचा 'कृष्णसखा कदंब' अभिजात साहित्यातील कदंबाची रूपं दाखवतो.

प्रभाकर वाईरकर हे प्रसिद्ध चित्र-व्यंगचित्रकार. त्यांनी एकट्यानं केलेला रोमचा प्रवास, एका अनोळखी बांगलादेशी मुसलमानानं त्यांना त्यांच्या घरी राहण्याची घातलेली गळ, वाईरकरांच्या मनात उठलेले प्रश्न आणि त्या अनोळखीचा- आलमचा - घेतलेला सहवास, हा अनुभव त्यांनी उत्तम मांडला आहे. डॉ. यशवंत पाठक यांनी सामाजिक बदल आपल्या खास शैलीत लिहिलाय. स्वप्ना पाटसकर यांनी सांगितली आहे 'सिनेमाची भाषा.'

उमेश कदम, दिलीप पांढरपट्टे, प्रभा पुरोहित यांचं ललित लेखन आणि अपर्णा पाटील यांनी साकारलेला जेम्स बॉन्डच्या व्यक्तित्वातला काळानुरूप भावुक बदल, हे सारेच लेख वाचनीय आहेत. कविता हा अंकाचा अविभाज्य भाग अर्थातच आहे.

प्रभाकर वाईरकरांनी त्यांच्या लेखासाठी चित्रंही काढून दिली. मुखपृष्ठ आणि अन्य लेखांची चित्रं सतीश भावसार यांची. विशेष म्हणजे कवितांची निवड व संपादन केलं आहे सुदेश हिंगलासपूरकर यांनी. लेख ऑपरेट करायचे आणि त्याची नेत्रसुखद मांडणी करायची हे काम योगितानं मन:पूर्वक चोख बजावलं आहे. प्रूफं तपासायचं काम लोटलीकर यांनी केलं. अंक सिद्ध झाला आणि नेहमीच्या आत्मीयतेनं त्याची उत्तम छपाई केली आनंद लिमये यांनी. या सर्वांच्या आस्थेतून निर्माण झालेला हा अंक आपल्याला आवडेल असं वाटतं.

'ग्रंथाली'नं खेडोपाडी ग्रंथ पोचवून वाचनप्रसार केला. ओघानं लिहिणारे नवलेखक संपर्कात आले. ही वाचक चळवळ बहरत, देशाच्या सीमा ओलांडून पुढे गेली. 'ग्रंथाली' ग्लोबल खेड्यातील वाचकांपर्यंत पोचली आहे. तसं गेली पाच वर्षं 'रुची' मासिक पंधरा हजारांहून अधिक इ-मेलधारकांना पोचत असतं. या वर्षी सुदेशच्या संकल्पनेतून, विविध देशांचं प्रतिनिधित्व करणारे इ-ग्रंथाली दिवाळी अंक प्रसिद्ध होत आहेत. त्यास धनंजय गांगल आणि परेश लिमये यांचं सहकार्य आहे. यातील आखाती देशांच्या अंकाचं संपादन सौदी अरेबियातून डॉ. उज्ज्वला दळवी, अमेरिकेहून प्रसिद्ध होणाऱ्या अंकाचं संपादन विद्या हर्डीकर-सप्रे, कॅनडा अंकाचं संपादन स्मिता भागवत आणि युरोप-ऑस्ट्रेलिया एकत्रित इ-ग्रंथाली दिवाळी अंकाचं संपादन शुभदा परांजपे व योगिनी लेले यांनी केलं आहे. या अंकांच्या संपादक आणि लेखकांनी या उपक्रमाला दिलेला मन:पूर्वक प्रतिसाद आनंद द्विगुणित करणारा आहे. त्या त्या ठिकाणचं सामाजिक-सांस्कृतिक जीवन हे या अंकांचं वैशिष्ट्य आहे. या सर्व देशांतील मराठीजन लिहिते झाले आहेत. या इ-ग्रंथाली दिवाळी अंक संमेलनाला जगभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे.

मराठीचं काय होणार, या सध्या चघळल्या जाणाऱ्या प्रश्नाला ग्लोबल खेड्यातील मराठीजनांनी त्यांचं उत्तर दिलं आहे.

भारत प्रश्नपंजरी पडलाय का? देशातील एकशेवीस कोटी जनता सांगेल, नाही! आम्हाला प्रश्नांची उत्तरं शोधता येतात. त्यासह जगणं आम्हाला कळतं!

हीच सकारात्मक भावना 'ग्रंथाली' टिपत आली आहे.

पुढील अंक जानेवारी २०१३चा!

दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!

**- अरुण जोशी**
कार्यकारी संपादक


विशेष नात्यांसाठी विशेष भेट
Season's Greetings
BOI Gold Coins
बँकऑफ इंडिया सादर करीत आहेत गुंतवणूकीसाठी व
भेट देण्यासाठी आदर्श अशी शुद्ध व पूर्ण वजनाची सोन्याची नाणी
• एस्से सर्टिफिकेशन सोबत स्विजरलैंड मध्ये बनलेली 999.9 शुद्धतेचे सोन्याची नाणी
• सर्व शाखा 4 ग्रा., 5 ग्रा., 8 ग्रा., 10 ग्रा., 20 ग्रा. आणि 50 ग्रा. ची सोन्याची नाणी विकण्यास अधिकृत
BOI Gift Cards
भेट देण्याची एक आगळीवेगळी रीत जी सर्वांना
आश्चर्य चकीत करेल !
Bank of India
Gift Card
Relationship beyond banking
VISA
VALID ONLY IN INDIA
*अटी लागू
• गिफ्ट कार्ड निःशुल्क दिले जाते.
• ₹ 50,000 पर्यंत रक्कम प्रीलोड करता येते.
• प्री-लोडेड रक्कमे पर्यंत कितीही वेळा वापरता येईल.
• संपुर्ण भारतामध्ये पाच लाख पेक्षा जास्त रिटेल आउटलेटस् वर वापरता येईल.
• बँक ऑफ इंडियाच्या देशातील सर्व शाखांमध्ये उपलब्ध .
BOI IS THE MOST TRUSTED SERVICE BRAND NO. 1 AMONG ALL NATIONALISED BANKS AS PER ET/NIELSEN SURVEY 2011
www.bankofindia.co.in • Toll Free No. : 1800 220 229
बँक ऑफ इंडिया
नातं बँकिंग पलिकडचं



दुकानदारांसाठी विमा योजना
सुरक्षित भारत निर्माणासाठी
ठळक वैशिष्ट्ये:
दुकानदाराच्या विविध गरजा नजरेसमोर ठेवून खास तयार केलेली विमा योजना.
विविध कव्हरवरील हप्त्यांमध्ये सवलत.
दुकानदाराच्या विविध विमा गरजेसाठी एकत्रितपणे पूर्ण करणारी विमा योजना.
एका ठराविक परिसरातील दुकानदाराच्या प्रत्येक दुकानासाठी एकच पॉलिसी, मात्र त्यासाठी सर्व दुकानांचा लेखाजोखा एकच खाते पुस्तिकेत असणे बंधनकारक.
मालमत्ता संरक्षण: इमारतीतील सामग्री, नफ्याचे नुकसान, धन विमा, इत्यादी.
याअंतर्गत संरक्षण: • आग, दंगल, संप, तत्सम आपत्ती • दरोडा आणि दुकानफोडी • धन विमा • पेडल सायकल • प्लेट ग्लास • दुकानाचे जाहिरात फलक (निऑन / ग्लो साईन) • सामान • व्यक्तिगत अपघात • विश्वासार्हतेची हमी • सार्वजनिक जबाबदारी • नफ्याचे नुकसान.
नियम व अटी लागू.
भारतातील एकमेव जनरल इन्शुरन्स कंपनी म्हणून A.M Best कडून A - (सर्वोत्कृष्ट) असा दर्जा
एकूण मालमत्ता : ₹ 42163 कोटी
निव्वळ मूल्य : ₹ 7058 कोटी
एकूण विमाहप्ता : ₹ 10074 कोटी
जागतिक कार्यालये : 1202
24x7 - Toll free number 1800-209-1415
www.newindia.co.in
CAMNIA-2012-13
दि न्यू इन्डिया एश्योरन्स कंपनी लिमिटेड
The New India Assurance Co. Ltd
भारतातील अग्रगण्य जनरल इन्शुरन्स कंपनी
न्यू इंडिया बिल्डिंग, 87, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई - 400 001 भारत
दूरध्वनी : 91-022-2270 8403 फॅक्स : 91-022-2267 4231 Email : sanjeevani.behere@newindia.co.in
"Insurance is subject matter of the Solicitation"

# 'मस्कती' जयकर

डॉ. उज्ज्वला दळवी

ओमान देशाचं राजेपद औट घटका नाही तर दर वर्षी पूर्ण उन्हाळाभर, असं औट तपाइतका प्रदीर्घ काळ ज्याला लाभलं अशा मुंबईकराची खुद्द मुंबईनं मात्र कधीच दखल घेतली नाही! ते नाव म्हणजे लेफ्टनंट कर्नल डॉ. आत्माराम सदाशिव 'ग्रॅण्डिन' जयकर! मस्कतच्या ब्रिटिश दूतावासाच्या जिन्यावर तिथल्या जुन्या अधिकाऱ्यांची छायाचित्रं आणि माहिती लावलेली आहे. त्या संकलनाला गमतीनं 'The Rogues' Gallery'(भामट्यांचा सौध!) असं नाव दिलेलं आहे. त्या 'भामट्यांच्या पंगती'त सर्वात वरचं, मानाचं स्थान डॉ. जयकरांचं आहे.

''**हे** पोलिटिकल एजंट इराणी आखाताचे अनभिषिक्त राजेच असतात!''

लॉर्ड कर्झननं एकदा न राहवून म्हटलं होतं.

असं ओमान देशाचं राजेपद औट घटका नाही तर दर वर्षी पूर्ण उन्हाळाभर, असं औट तपाइतका प्रदीर्घ काळ ज्याला लाभलं अशा मुंबईकराची खुद्द मुंबईनं मात्र कधीच दखल घेतली नाही!

आत्माराम सदाशिव जयकर यांचा जन्म १८४४ सालचा. म्हणजे न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्याहून ते दोन वर्षांनी लहान. मुंबईच्या ग्रॅण्ट मेडिकल कॉलेजमधून MBBS झाल्यावर डॉ. जयकर IAS सारखी, Indian Medical Serviceची परीक्षा द्यायला इंग्लंडला गेले. जयकरांची आई त्यांच्या बालपणीच वारली होती. इंग्लंडमधल्या त्यांच्या लॅण्डलेडीनं, मिसेस ग्रॅण्डिननं त्यांच्यावर आईसारखी माया केली. या इंग्लिश आईचा त्यांना असा लळा लागला की त्यांनी तिचं नाव आपल्या नावातच गुंफलं आणि ते डॉ. आत्माराम सदाशिव 'ग्रॅण्डिन' जयकर किंवा डॉ. ए. एस. 'जी.' जयकर झाले.

इतकी माया लागली तरी ते इंग्लंडमध्ये रुजले नाहीत. परीक्षा पास झाल्यावर १८६८ साली ते भारतात परतले आणि Indian Medical Service मध्ये सर्जन मेजर म्हणून कामाला लागले. नऊ वर्षांनी त्यांची नेमणूक ओमानला, मस्कतच्या ब्रिटिश दूतावासात, रेसिडेन्ट सर्जन म्हणून केली गेली. त्यावेळी ओमान ब्रिटिशांच्या संरक्षणाखाली होतं. तिथला ब्रिटिश पोलिटिकल एजंट, हा लॉर्ड कर्झननं म्हटल्याप्रमाणे तिथला अनभिषिक्त राजाच असे. दर उन्हाळ्यात हा 'राजा'सुट्टीसाठी आपल्या गावाला निघून जाई. त्या काळात त्याची 'गादी' सांभाळायचं कामही डॉ. जयकरांनाच करावं लागे. लवकरच त्यांना बढती मिळून लेफ्टनंट कर्नल हा हुद्दा मिळाला. सत्तावन्नच्या उठावानंतरच्या त्या काळात भारतीयांना असा वरचा हुद्दा सहजासहजी मिळत नसे. पण जयकरांची योग्यता सरकारनं जाणली होती.

वैद्यकी आणि अधिशासन या दोन्ही खात्यांतलं सरकारी काम इतक्या चोख रीतीनं बजावत असताना तो अष्टपैलू मुंबईकर आपला मोलाचा फावला वेळही सत्कारणी लावत होता. त्यांनी ओमान भागातल्या आजारांची तिथल्या भूगोलाशी सांगड घालून Medical Topography of Muscat नावाचा चौदा पानी निबंध लिहिला. त्यातल्या नोंदींनुसार त्या वेळी ओमानमध्ये हृदयरोग, रक्तदाब, आमांश, संधिवात हे आजार जवळजवळ नसल्यातच जमा होते. पण मलेरिया आणि क्षयरोग मात्र मोठ्या प्रमाणात होते. दमा, अपचन, मूळव्याध, डोळ्यांचे आणि त्वचेचे विकार हे देखील फार होते. अशा प्रकारचा त्या भागातला हा पहिलाच सखोल शोधनिबंध होता आणि तो अजूनही उद्‌धृत केला जातो.

रुग्णांवर इलाज करता करता त्यांनी अरबी शिकून घेतली. मग ओमानची बोलीभाषाही आत्मसात केली आणि सामान्य अरबीहून वेगळी अशी खास ओमानी बोलीची वैशिष्ट्यं सांगणारा ग्रंथ लिहिला. त्या लेखनातून त्यांची भाषाशास्त्राविषयीची जाण दिसून येते.

त्यानंतर ओमानी म्हणी आणि वाक्प्रचार यांचं संकलन केलं. त्यांचं इंग्रजी भाषांतर आणि अर्थासहित स्पष्टीकरणही दिलं. त्यांतल्या 'उंची मारे खजुराची, अक्कल मात्र कोकराची', 'अवजड गोणी वाहणाऱ्या सांडणीची पाठ एका चाळणीनं मोडत नाही', 'काल ईदेची सांज आणि कोकरू आणतोय आज', 'उंदीर सोल, बनव ढोल,' अशा म्हणी समजायला केव्हाही सोप्या आहेत. 'ज्यानं मस्कतच्या बुरुजांची शान पाहिली त्याला दारसैतच्या खुजांचा मान काय?', 'मेंढी मेली मकरानला आणि तूप महागलं ओमानला, असं कधी होतं का?' अशा काही म्हणी भूगोलाची, गावांच्या परिस्थितीची माहिती देतात. काही म्हणी मात्र त्या काळच्या ओमानी समाजाची, त्यातल्या चालीरीतींची कल्पना देतात. 'जनैबी फिर्यादी आणि माहरूकी कादी (न्यायाधीश),' या म्हणीत जनैबी आणि माहरूकी जमातींतला उभा दावा गृहीत धरलेला आहे. एखादी जमात शक्तिशाली शत्रूच्या जबरदस्त हल्ल्यानं एकदा का चीतपट झाली की ती सहसा पुन्हा डोकं वर काढत नाही. तिची भरभराट होऊ शकत नाही. हेच म्हणीत सांगितलंय, 'लांडग्यानं एकदाच मानगूट धरली, मग शेळी कधीच नाही अंगानं भरली.' जमातीतल्या जमातीत लग्नं केली जात. आते-मामे भावंडांची लग्नं सर्रास होत. म्हणून तर, 'मामेबहिणीला लाजेल त्याचा वंश कसा रुजेल?' अशी म्हण प्रचलित होती. डॉ. जयकरांचं पुस्तक हे ओमानी म्हणींचं असं पहिलंवहिलं संकलन होतं. अजूनही ओमानी म्हणींवरचा तो सर्वोत्तम ग्रंथ मानला जातो. त्या ग्रंथांच्या प्रती जगातल्या तालेवार संग्रहालयांत अजूनही जपून ठेवलेल्या आहेत. खास विद्वानांच्या आग्रहाखातर त्यांच्या नव्या प्रतीही अधूनमधून छापल्या जातात.



डॉ. आत्माराम सदाशिव 'ग्रॅण्डिन' जयकर

त्यांच्या कारकिर्दीतल्या प्रत्येक सुट्टीत डॉ. जयकर ओमानमध्ये दौरा काढत. तसे ते ओमानच्या सगळ्या इलाख्यांतून भटकले. पण ही भटकंती नुसती पाय मोकळे करण्यासाठी नव्हती. जीवशास्त्र हा या अष्टपैलू माणसाचा सर्वांत आवडता छंद होता. रखरखीत वाळवंट, पचक् पचक् चिप्प ओली खारी पुळण, उंच डोंगरांचे धारदार कडे, असं सारं पायांखाली तुडवत त्यांनी तिथल्या प्राण्यांचे, वनस्पतींचे नमुने गोळा केले. हिंस्र पशूंचेही नमुने मिळवले. ते विशेषतः तिथल्या जबल अल अखदर(हरितगिरी) आणि दोफर भागांत भटकंतीला जात. ते त्या भागांतले प्राणी, पक्षी, कीटक धुंडत. या प्राण्या-पक्ष्यांचा त्यांनी शास्त्रशुद्ध अभ्यास केला. व्यावसायिक सफाईनं साफ करून, पेंढा भरून तयार केलेले प्राणी-पक्षी-मासे-साप, कागदावर व्यवस्थित टाचलेले किडे आणि दहा-दहा इंच रुंदीच्या पंखांची

फुलपाखरं, नीट जतन केलेल्या वनस्पती, अशी सामग्री आणि त्या त्या प्राण्यांची, पक्ष्यांची इत्थंभूत नोंदलेली माहिती त्यांनी काळजीपूर्वक लंडन इथल्या ब्रिटिश म्युझियम ऑफ नॅचरल हिस्टरीला पाठवली. झुऑलॉजिकल सोसायटी ऑफ लंडनच्या रिपोर्टात त्यांच्या नावानं जवळजवळ ३०० ते ४०० प्राण्यांची नोंद आहे. त्यांनी धाडलेले नुसत्या वनस्पतींचेच १८८ नमुने लंडनमध्ये आहेत. त्यांनी गोळा केलेल्या या नमुन्यांत थाऽर नावाचा एक डोंगरी बकरा आहे. तो फक्त ओमानच्या, पाच हजार फूट उंच कड्यांवरच आढळतो. त्याचं वर्णन तोवर कुणीही नोंदलं नव्हतं. म्हणून त्याला शोध-घेत्या पित्याचं नाव दिलं गेलं. त्याचं Hemitragus jayakari असं बारसं केलं गेलं. हा बकरा जगातल्या अत्यंत दुर्मिळ प्राण्यांपैकी एक आहे. त्याचा निर्वंश होऊ शकला असता. पण आता त्या अजापुत्राला बळी जाण्यापूर्वी संरक्षण मिळालं आहे. पंच्याऐंशी सालापासून त्याचा वंश दुपटीनं वाढला आहे. पण असं 'जयकरी' हे 'आड'नाव मिरवणारा हा बोकड एकटाच नव्हे. Roa jayakari, Hippocampus jayakari वगैरे बावीस प्रकारचे जलचर, Hottentotta jayakari  हा विंचू, Eryx jayakari सारखे साप, Omanosaura आणि Trapelus jayakari सारख्या काही पाली असं सारं या 'जयकरी' परिवारात आहे.



हेमीट्रॅगस जयकरी (Hemitragus jayakari)

या व्यासंगी माणसाचा 'अमानुष' परिवार फार मोठा होता. पण कौटुंबिक सुखापासून मात्र ते सदैव वंचितच राहिले. जन्मदात्या आईचं सुख त्यांना लाभलं नाही. ओमानला नेमणूक झाली तेव्हा त्यांचं लग्न झालेलं होतं. पण त्यांच्या सासऱ्यांनी आपल्या मुलीला मुसलमानांच्या देशात पाठवायला ठाम नकार दिला. काही वर्षं वाट पाहून शेवटी डॉ. जयकरांनी ओमान-मधल्याच एका हब्शी स्त्रीशी विवाह केला. त्यांना मन्सूर नावाचा मुलगाही झाला. डॉ. जयकर १९०० साली भारतात परतण्यापूर्वीच ती हब्शी स्त्री निवर्तली.

निवृत्तीनंतर मुलाला घेऊन डॉ. जयकर मुंबईत परतले. पण तो काळच 'स्मृतिचित्रां'चा, कर्मठ सनातन्यांचा होता. ज्ञातीनं जयकरांना 'बाटगा' म्हणून वाळीत टाकलं. आपल्या माणसांनी आपल्याला स्वीकारावं या इच्छेनं डॉक्टरांनी ज्ञातीला २५००० रुपयांची रोख देणगी देऊ केली. 'बाटग्याचं धन नको,' म्हणून ज्ञातीनं ती देणगी नाकारली! अपमान, निराशा वगैरेंनी खचून जाणं हा डॉक्टरांचा स्वभावच नव्हता. त्यांनी परिस्थितीतून वाट शोधली. डोळ्यांचे डॉक्टर प्रभाकर आणि आपले मेडिकल कॉलेजापासूनचे मित्र, डॉ. कीर्तिकर ह्यांना त्यांनी आपल्या संपत्तीचे विश्वस्त नेमलं. त्या पैशांचा विनिमय करून  मन्सूरला इंग्लंडमध्ये वैद्यकीय शिक्षण देणं आणि त्याचं तिथेच बस्तान बसवून देणं या दोन्ही जबाबदाऱ्या त्यांनी या विश्वस्तांवर सोपवल्या.

'सेवानिवृत्ती' घेणं ही डॉक्टरांची वृत्तीच नव्हती. जवळच्या लक्ष्मीला शुभकार्याचा मार्ग दाखवल्यावर त्यांनी पुन्हा सरस्वतीची उपासना सुरू केली.

चौदाव्या शतकात इजिप्तमध्ये अल दमीरी नावाचा एक धर्मशास्त्रज्ञ होऊन गेला. त्यानं 'हायात अल हायावान' नावाचा ज्ञानकोश संकलित केला. या कोशात कुराणातल्या ९३१ प्राण्यांची सांगोपांग माहिती दिलेली आहे. अगदी



होटेनटोटा जयकरी (Hottentotta jayakari)



**Chaetodon Jayakari**



**Hippocampus Jayakari**



**Omanosaura Jayakari**

प्रत्येक प्राण्याचं नाव अरबी लिपीत शुद्ध कसं लिहावं, त्याचा मूळ अर्थ काय इथपासून शिकवलं आहे. त्या प्राण्याशी निगडित असलेल्या त्यावेळच्या अरबीतल्या म्हणी आणि रीतिरिवाज दिले आहेत. त्या प्राण्यांवर रचलेल्या लोककथा आहेत, लोकगीतं आहेत. शिवाय दोनशे अरब कवींच्या त्या प्राण्यांबद्दलच्या कविता आणि पाचशे लेखकांचे निबंधही आहेत. त्या प्राण्याचा औषधशास्त्रातला उपयोग समजावला आहे. तो प्राणी भक्षण करणं धर्माला धरून आहे का ह्याचंही विवेचन केलं आहे.

सतराव्या शतकात या कोशाचं लॅटिनमध्ये भाषांतर झालं होतं. सेवानिवृत्तीनंतर डॉ. जयकरांनी त्या पूर्ण अगडबंब, ज्ञानसज्जड कोशाचं इंग्रजीत भाषांतर केलं. या भाषांतराच्या दरम्यान डॉक्टरांची प्रकृती ढासळत गेली. ते त्यांच्या वांद्र्याच्या घरात एकटेच राहत असत. ते शेवटचं जगड्व्याळ काम पार पाडल्यावर त्यांनी निरवानिरव सुरू केली. तो भाषांतरित कोश ब्रिटिश नॅचरल हिस्टरी म्युझियमला द्यायचं कामही डॉ. कीर्तिकरांवरच सोपवलं गेलं. डॉक्टर जयकरांनी मस्कतहून जपून आणलेली संशोधनपत्रं, प्राण्यांचे नमुने हे सारं त्यांनी फर्ग्युसन कॉलेजला दिलं.

मुलाची तरतूद करून, ग्रंथाचं काम उत्तम रीतीनं पूर्ण झाल्यावर, कृतकृत्य भावनेनं, १९११ साली लेफ्टनंट कर्नल डॉ. आ. स. ग्रँ. जयकरांनी आपला इहलोकीचा प्रवास संपवला.

एकोणीसशे सदुसष्ट साली डॉ. सलीम अलींनी डॉ. जयकरांबद्दलच्या माहितीसाठी टाइम्समधून छापील आवाहन केलं होतं. त्याला प्रतिसाद अजिबात आला नाही. सत्त्याऐंशी सालापासून ओमानची मुना नूर इन्कॉर्पोरेटेड ही कंपनी डॉ. जयकरांचा शोध घायला लागली. कंपनीच्या डिरेक्टरनं ब्रिटिश नॅचरल हिस्टरी म्युझियमला पत्रं पाठवली, मुंबईतल्या समस्त जयकरांशी संपर्क साधला, अक्षरशः रान उठवलं. शेवटी हा शोध डॉ. जयकरांच्या पुतणीच्या नातवापर्यंत, आर्किटेक्ट प्रताप वेलकरांपर्यंत जाऊन पोचला. अभ्यासू वृत्तीच्या वेलकरांनी मात्र आपल्या चुलत पणजोबांबद्दलच्या माहितीचा कसून शोध घेतला. बॉम्बे नॅचरल हिस्टरी सोसायटीची मदत मागितली. ते लंडनलाही जाऊन आले. जी माहिती मिळाली तिच्यावरून त्यांनी एक शोधनिबंध तयार केला. त्याची एक प्रत ओमानलाही पाठवली.

सध्या काळजीपूर्वक टॅक्सीडर्मी केलेला एक

‘हेमिट्रॅगस जयकरी’ ओमानच्या म्युझियममध्ये , आपल्या शोध-पित्याचं नाव मिरवत, दिमाखात उभा आहे. मस्कतच्या ब्रिटिश दूतावासाच्या जिन्यावर तिथल्या जुन्या अधिकाऱ्यांची छायाचित्रं आणि माहिती लावलेली आहे. त्या संकलनाला गमतीनं ‘The Rogues' Gallery’ (भामटच्यांचा सौध!) असं नाव दिलेलं आहे. त्या ‘भामट्यांच्या पंगती’त सर्वात वरचं, मानाचं स्थान डॉ. जयकरांचं आहे. दोन हजार सात सालापासून ओमानच्या सायन्स इंडिया फोरमनं लेफ्टनंट कर्नल डॉ. आ. स. ग्रँ. जयकरांच्या नावानं एक मानाचा पुरस्कार ठेवला आहे. प्राणिविश्वासाठी किंवा विज्ञानासाठी आयुष्यभर मोलाची कामगिरी केल्याबद्दल हा पुरस्कार दिला जातो. या बक्षिसाचे पहिले मानकरी होते इस्रोचे माजी चेअरमन, जी. माधवन नायर. त्याच्या पुढल्या वर्षी श्रीमती मनेका गांधींना तो पुरस्कार मिळाला. डॉ. अनिल काकोडकर, के. कस्तुरीरंगन, विजय भटकर, यांसारख्या प्रख्यात शास्त्रज्ञांनाही हा बहुमान मिळाला आहे. त्यानिमित्ताने डॉ. जयकरांचं नाव आता जगापुढे येतं आहे.

लेफ्टनंट कर्नल डॉ. आत्माराम सदाशिव ग्रॅण्डिन जयकर आयुष्यभर कार्यरत राहिले. अनेकविध आघाड्यांवर त्यांनी कामाचे डोंगर उभे केले. त्यांचं व्यक्तिमत्त्व अभ्यासताना दर वेळी त्यांच्या कामाची नवी उत्तुंग शिखरं नजरेत भरतात. अशा अनेक कार्यांच्या तेजोमय शिखरांनी भूषवलेला हा नगाधिराज हिमालयच आहे. काळाच्या, उपेक्षेच्या धुक्यात तो बरीच वर्षं दडलेला होता. ओमान सरकारच्या कृपेनं ते धुकं विरायला लागलं आहे. त्या झळाळत्या शिखरांकडून कुठल्याही परिस्थितीत, न डगमगता, चौफेर, सखोल अभ्यास करायची स्फूर्ती पुढल्या कित्येक पिढ्यांना मिळत राहील.

**डॉ. उज्ज्वला दळवी**

ujjwalahd9@gmail.com



# राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महानगरपालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी : (०२२) २२६३ १३ २५ / फॅक्स : २२६५ ३९ ६६

* **प्रशासनिक मराठी भाषेचा विकास** - (पु. मु.)- गीता भागवत- २७५ रु.
* **कोश व सूची वाङ्मय : स्वरूप आणि साध्य** - (पु. मु.) - संपा. सरोजिनी वैद्य, सुषमा पौडवाल, अनिता जोशी, कविता महाजन - २७५ रु.
* **मराठी लेखन मार्गदर्शिका** - यास्मिन शेख - ८० रु.
* **मराठी लघुलेखन शब्दकोश** - व. वा. इनामदार - १४० रु.
* **शालेय मराठी शब्दकोश** - (दु.आ.) - संपा. वसंत आबाजी डहाके, गिरीश पतके - १०० रु.
* **विज्ञान संकल्पना कोश** - संपा. - प्रा. रा. वि. सोवनी - २५० रु.
* **शिक्षकांसाठी अध्ययन पुस्तिका** -संपा. राज्य मराठी विकास संस्था -२०रु.
* **शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम** - वा. व. पटवर्धन- संपा- रमेश पानसे -१६० रु.
* **मराठी भाषा : वाद आणि विवाद**- (पु.मु.) श्री. के. क्षीरसागर-२२५ रु.
* **वृद्धिः भाषेचे व भाषाभ्यासाचे विकसन**- दिनेश द. माहुलकर - १६० रु.
* **वेलभाषा** - सुमन वेलवलकर - १०० रु.
* **भाषा-आपली सर्वांचीच** - अविनाश बिनीवाले - १५० रु.
* **महाराष्ट्र साहित्य परिषद्** - (दु. आ.) - म. श्री. दीक्षित - १२० रु.
* **व्याकरणकार मोरो केशव दामले : व्यक्ती आणि कार्य** - (दु. आ.) कृष्णा श्री. अर्जुनवाडकर - १०० रु.
* **काकासाहेब कालेलकर : व्यक्ती आणि कार्य**-मृणालिनी जोगळेकर-१५०रु
* **गंगाधर बाळकृष्ण सरदार : व्यक्ती आणि कार्य**- हेमंत वि. इनामदार - ६० रु.
* **बालगंधर्व : व्यक्ती आणि कार्य** - मोहिनी वर्दे - ६० रु.
* **मातृसेवा संघ** - विनया खडपेकर - ६० रु.
* **'सकाळ' वृत्तपत्र आणि वृत्तसमूह** -(दु.आ.) - स्वाती सुहास कर्वे -१२५ रु.
* **शंतनुराव किर्लोस्कर : व्यक्ती आणि कार्य**- डॉ. भा. र. साबडे- १६० रु.
* **डॉ. अ. का. प्रियोळकर : व्यक्ती आणि कार्य** - डॉ. वि. बा. प्रभुदेसाई (पु. मु.) - १५० रु.
* **त्र्यंबक शंकर शेजवलकर यांच्या साहित्याची वर्णनात्मक सूची** - संपा. - सुषमा पौडवाल - १५० रु.
* **त्रिवेंद्रमची मराठी हस्तलिखिते**-(पु. मु.)- संपा.- डॉ. वसंत जोशी -५० रु.
* **मद्रासची मराठी हस्तलिखिते** - संपा. - डॉ. वसंत जोशी - १५० रु.
* **हैदराबादची मराठी हस्तलिखिते** - संपादन - डॉ. श्री. रं. कुलकर्णी, (कै.) डॉ. व. दा. कुलकर्णी, प्रा. द. पं. जोशी. - १०० रु.
* **कर्नाटकातील मराठी हस्तलिखिते** - डॉ.भीमाशंकर देशपांडे -१५० रु.
* **तंजावर सूची (खंड सहावा)** - संपा. - भीमराव केसकर - २०० रु.
* **दक्षिण भारतातील मराठी वाङ्मयाचा इतिहास - तंजावर खंड** - संपा. - डॉ. वसंत जोशी - ५०० रु.
* **दक्षिण भारतातील वाङ्मयाचा इतिहास - आंध्र-कर्नाटक खंड** - संपा. - डॉ. वसंत जोशी व डॉ. द. दि. पुंडे - ५०० रु.
* **दाक्षिणात्य साहित्य संस्कृतीचा मराठीशी अनुबंध** - डॉ. माणिक धनपलवार - २०० रु.
* **साहित्यसेतू** - श्री. रं. कुलकर्णी - ४५ रु.
* **दखनी भाषा : मऱ्हाटी संस्कृतीचा एक आविष्कार** - श्री. रं. कुलकर्णी - ४५ रु.
* **करुणाष्टक**- व्यंकटेश माडगूळकर- अनु.-विनायक नारायण सप्रे- ७५ रु.
* **राजमाची का बुधा**- गो. नी. दांडेकर-अनु.-मीरा नांदगावकर- ७५ रु.
* **बिंदिया जितनी झील**- निर्मला देशपांडे- अनु. -सुनीता परांजपे -१००रु.
* **कल्याणी** - ज्योत्स्ना देवधर - अनु. - ज्योत्स्ना देवधर - ७५ रु.
* **मुक्काम पोस्ट देवाचे गोठणे** - माधव कोंडविलकर - अनु. - अविनाश बिनीवाले - १५० रु.
* **दिन ब दिन** - शं. ना. नवरे - अनु. सुभाष रणदिवे - १०० रु.
* **साँस भर का फासला** -अंबिका सरकार- अनु.-शरयू पेडणेकर -१०० रु.
* **श्रीमती रमाबाई रानडे** - मा. श्री. विद्वांस - अनु. - वासंतिका पुणतांबेकर - ११० रु.
* **मैं कृतार्थ हुई** - मेहरुन्निसा दलवाई - अनु. - डॉ. विजया - ११० रु.
* **रोहिणी** - केशव केळकर - अनु. - विलास गिते - १०० रु.
* **बौद्धिक संपत्ती अधिकार** - प्रा. विशाल कटारिया - अनुवाद व संपा. - अनिता जोशी - २५ रु.
* **ग्रंथालयाचा ज्ञानकोश** - संपा. - शंकर गोपाळ भिडे - १६०० रु.
* **मराठी ग्रंथसूची भाग १ व २** -संपा.- कै. शंकर गणेश दाते - २६०० रु.
* **मराठी ग्रंथसूची भाग ३ (१९५१-६२)** - संपा.- शरद साठे - १००० रु.
* **मराठी ग्रंथसूची भाग ४ (१९६३-७०)** - संपा.- शरद साठे - ११०० रु.
* **मराठी ग्रंथसूची भाग ५ (१९७१-७८)** - संपा. - शरद साठे - १६०० रु.
* **मराठी विज्ञान ग्रंथसूची**-संपा.-रा.वि.सोवनी, संजीवनी शिंत्रे - १५० रु.
* **मराठी वैद्यक ग्रंथसूची**- संपा.- डॉ. सुरेश नाडकर्णी, कविता महाजन - १२५ रु.
* **मराठी कोश व संदर्भ साधने यांची समग्र सूची** - संपा. डॉ. वसंत विष्णु कुलकर्णी - २०० रु.
* **वस्त्रनिर्मिती माहिती कोश खंड १** - संपा. डॉ. चंद्रकांत काणे, प्रा. सुरेश महाजन - ४०० रु.
* **वस्त्रनिर्मिती माहिती कोश खंड २** - संपा. श्री. अशोक गर्दे, श्री. यशवंत देशपांडे - ४०० रु.
* **वस्त्रनिर्मिती माहिती कोश खंड ३** - संपा. प्रा. दिनकर आजगावकर, प्रा. सुरेश महाजन, प्रा. हसमुख शाह - ५०० रु.
* **शिक्षणाचे अंतरंग** – लीला पाटील - १७५ रु.
* **फार्सी-मराठी व्युत्पत्तिकोश** - संपा. डॉ. यू. म. पठाण - ६०० रु.
* **पालघर तालुका-बोली समाज व संस्कृती** - संपा. डॉ. प्रतिभा कणेकर - ६५० रु.
* **दलित-ग्रामीण साहित्य शब्दकोश**- संपा.डॉ.गंगाधर पानतावणे- ३५० रु.

*** सर्व पुस्तकांवर २०% सवलत ***

संस्थेचे संकेतस्थळ : http://rmvs.maharashtra.gov.in/rmvs/ * ईमेल : rmvs_mumbai@yahoo.com

# गझलचा बेताज बादशहा.!

**आसिफ़अली पठाण**

माधुर्यानं ओथंबलेला, काव्याचा आशय थेट अंत:करणापर्यंत पोहोचवणारा खर्जातला दमदार आवाज, गायकीचा खानदानी बाज व अलौकिक स्वरांची भावस्पर्शी पेशकारी यांचा मनोहारी संगम म्हणजेच मेहदी हसन! मेहदीजींनी प्रामुख्यानं भावनाप्रधान प्रेमगीतं आणि असंख्य बहारदार गझलांमधून अनेक आशयघन शब्दशिल्पांना मौलिकतेचं परिमाण बहाल केलं आहे... गझलगायकीच्या बेमिसाल सादरीकरणातून हिंदुस्थानी रागरागिण्यांचा संपूर्ण आकृतिबंध सादर करणारा हा मैफलीचा मुकुटमणी पाकिस्तानात 'ताजदारे–मौसिकी' व आंतरराष्ट्रीय स्तरात 'शहेनशहा–ए–गझल' म्हणून परिचित होता. श्रद्धांजलीच्या निमित्ताने त्यांच्या सांगीतिक कारकिर्दीचा घेतलेला आढावा..

साल १९७८.. भारताचे तत्कालीन परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयींच्या निवासस्थानी आयोजित गझलांची रंगात आलेली मैफल.. उच्चपदस्थ अधिकारी व लब्ध-प्रतिष्ठित निमंत्रितांची लक्षणीय उपस्थिती.. दिवाणखान्यात पाऊल ठेवायलादेखील जागा नाही अशी खचाखच गर्दी.. अर्थात त्याला कारणही तसंच जबरदस्त होतं. खास वाजपेयीजींच्या आग्रहास्तव 'शहेनशहा-ए-ग़झल' मेहदी हसन यांच्या अलौकिक स्वरांची अनुभूती घेता यावी म्हणून या मैफलीचं आयोजन करण्यात आलं होतं... माहोल, गझलच्या जादुई व भावस्पर्शी पेशकारीनं भारलेला.. उस्ताद सुल्तानखांच्या सारंगीच्या तारा आर्त सुरांना साद घालत होत्या, तारीखांसाहेबांची बोटं तबल्यावर थिरकताना तालांची आवर्तनं वातावरणात रंग भरत होती. मेहदीजींची बोटं हार्मोनियमवरून सरसरताना, माधुर्यानं ओथंबलेल्या खर्ज्यातल्या धीरगंभीर आवाजात, गंधभारल्या मोगऱ्यांच्या लडीप्रमाणे शहज़ाद अहमद 'शहज़ाद'च्या गझलांचे शेर एकामागून एक उलगडत होते. अवघं वातावरण यमन कल्याणच्या सुरांनी भारून आणि भरून गेलं होतं...

*जल भी चुके परवाने हो भी चुकी रूसवाई*
*अब ख़ाक उडाने को बैठें है तमाशाई*
*तारोंकी ज़िया दिलमें इक आग लगाती है*
*आरामसे रातों कों सोते हैं सौदाई*

या गझलनंतर मेहदीजींनी 'तुफ़ैल' होशियारपुरीची काफी रागावर बेतलेली नितांतसुंदर गझल छेडली आणि वाजपेयींसह अवघा श्रोतृवर्ग मंत्रमुग्ध होऊन गझलच्या रंगात बुडून गेला..

*अंजुमन अंजुमन शनासाई ।*
*फिर भी दिलका नसीब तन्हाई ।*
*जब भी किसीने मजाज़े-ग़म पूछा,*
*दिल तडप उठा, आंख भर आई.. ।।*

मैफल उत्तरोत्तर रंगताना त्यांनी राग किरवाणीत अहमद 'फ़राज़' यांची अप्रतिम गझल खास अंदाजात सादर केली..

*शोला था जल बुझा हूं हवायें मुझे न दो*
*मै कबका जा चुका हूं सदायें मुझे न दो*
*जो ज़हर पी चुका हूं, तुम्हीने मुझे दिया*
*अब तुम तो ज़िंदगीकी दुवाएं मुझे न दो*

भावनेनं ओतप्रोत भरलेल्या स्वरांतून काव्याचा आशय थेट श्रोत्यांच्या अंत:करणाला भिडेल अशा प्रकारच्या असरदार गायकीमुळे १९७० ते २००० पर्यंतचा काळ, (मधल्या पाच-सहा वर्षांचा आजारपणाचा अपवाद वगळता) मेहदीजींनी मैफलीच्या माध्यमातून अक्षरश: गाजवला. सत्तरपासून नव्वदच्या दशकापर्यंत मेहदी हसन हे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर सातत्यानं तळपत राहिलं. ऐंशीच्या दशकात अनेकांनी त्यांच्या गझलगायकीचं अनुकरण करायला सुरुवात केली. मेहदीजींना आदर्श मानून भारतात जगजीतसिंग, तलत अज़ीज़, राजेंद्र मेहता, हरिहरन, अनुप जलोटा, पंकज उधास तर पाकिस्तानात आसिफ़ जावेद, फारुख़ मेहदी, परवेज़ मेहदी, अशी उदयोन्मुख गझलगायकांची फळीच निर्माण झाली होती... वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवून आसिफ़ मेहदी व कामरान मेहदी हे त्यांचे सुपुत्र या क्षेत्रात पुढे आले. त्यामुळे ऐंशीच्या दशकात मैफलीतली गझल लोकप्रियतेच्या चरमसीमेवर पोहोचली होती. 'रंजिशही सही, दिल ही दुखाने के लिए आऽ', 'गुलोंमें रंग भरे बादे-नौबहार चले', 'बात करनी मुझे मुश्किल कभी ऐसी तो न थी' यांसारख्या गझला रसिकांच्या ओठांवर घोळत होत्या.

मेहदीजी पाकिस्तानी गझलगायक म्हणून ओळखले जात असले तरी त्यांचा जन्म भारतातील राजस्थानचा. जयपूरनजीकच्या, झुनझुनू जिल्ह्यातील लुणा या गावी, १८ जून १९२७ रोजी एका कलावंत घराण्यात त्यांचा जन्म झाला. त्यांचं पाळण्यातलं नाव इस्माईलखां. लहानपणी मोहरमच्या महिन्यात ते आजारी पडले असता या गंभीर आजारातून बरे व्हावेत म्हणून हजरत कासिम बिन हसन यांना मेहंदी चढवून मन्नत (नवस) मागण्यात आली होती. या नवसामुळेच ते आजारपणातून बरे झाले या श्रद्धेनं त्यांचं 'मेहंदी हसन' असं नामकरण करण्यात आलं. पुढे अपभ्रंश होऊन ते 'मेहदी हसन' असं झालं. मेहदीजींचे पूर्वज राजा मानसिंगच्याही आधीपासून दरबारी गवय्ये होते. गायनवादन करणाऱ्यांना राजस्थानात कलावंत म्हणून ओळखलं जातं. या घराण्याच्या पंधरा पिढ्या भारतात नांदल्या. मेहदीजी व त्यांचे ज्येष्ठ बंधू गुलाम क़ादिर हे सोळाव्या पिढीचे प्रतिनिधी. मेहदीजींचे वडील अज़ीमखां व काका इस्माईलखां जयपूरच्या राजदरबारात संगीतगुरू म्हणून नियुक्त होते. ध्रुपद गायकीसह त्यांच्या घराण्यात ठुमरी, दादरा, ख्याल, चैती, कजरी यांसह राजस्थानी लोकसंगीतातील गायनप्रकारही तितक्याच निष्ठेनं गायले आणि शिकवले जात. महाराजा ऑफ मनकापूर, बडोदा, बदलामपूर, बासी, सरसो, पन्ना, छत्तरपूर, नेपाळ व आताच्या बुदेलखंडमधील बिजावर स्टेट येथे जाऊन अज़ीमखां तेथील राजेरजवाड्यांना शास्त्रीय संगीताची तालीम देत असत.

मेहदीजींनी शास्त्रीय संगीताचे धडे वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षापासून आपले वडील उस्ताद अज़ीमखां व काका इस्माईलखां यांच्याकडून गिरवायला सुरुवात केली. इस्माईलखां मल्लविद्येचेही उपासक होते. गायकीत श्वासाचं महत्त्व जाणून दमसास वाढवण्यासाठी ते मेहदीजींकडून कसून व्यायाम करवून घेत. मेहदीजींना संगीताच्या रियाजामुळे शालेय शिक्षण मात्र घेता आलं नाही. त्याऐवजी घरी हिंदी व संस्कृत शिकवण्यासाठी खास शिक्षकाची नियुक्ती करण्यात आली होती. पाकिस्तानात, रेडिओवरून गझल गाताना तिचा आशय कळावा म्हणून प्रयत्नपूर्वक ते उर्दू भाषा लिहायला व वाचायला शिकले. यासाठी त्यांना उर्दू शायर सईद सलीम गिलानी व आकाशवाणीचे ज़ुल्फिकार अली बुखारी यांच्याकडून मार्गदर्शन मिळालं. गुलाम क़ादिरदेखील दरबारी गवय्ये होते. त्यांनी 'भातखंडे संगीत संस्थाना'तून 'पंडित' ही संगीतातील बहुमानाची पदवी प्राप्त केली होती. मेहदीजींच्या कुटुंबीयांना या पदवीचं विलक्षण अप्रूप आणि सार्थ अभिमान होता. पाकिस्तानसारख्या कर्मठ राष्ट्रात मेहदीजी, गुलाम क़ादिरना जाहीरपणे आणि खाजगीतही 'पंडितजी' म्हणूनच संबोधित असत.

मेहदीजींनी आपली पहिली मैफल बडोद्याच्या महाराजांसमोर वयाच्या आठव्या वर्षी सादर केली. 'बसंतपंचम' रागातला ख्याल चाळीस मिनिटं आत्मविश्वासानं आळवून त्यांनी बडोदा दरबारात छाप पाडली. एवढ्या लहान वयात मेहदी हसन यांची शास्त्रीय संगीतावरची हुकूमत व समज पाहून महाराजांनी त्यांचा शाही सत्कार केला होता.

१९४६ साली उस्ताद अज़ीमखां, मेहदी हसन व गुलाम कादिरसह पंजाब प्रांतात पाकपत्तनजवळ, महंत गिरधारीदास लालदास धम्मनशाह या जमीनदाराला संगीत शिकवण्यासाठी गेले होते. मेहदीजींची आत्या जवळच्या 'चिचावतनी' गावात दिलेली होती. मेहदीजींना त्यांनी बहिणीकडे ठेवलं व स्वत: महंत गिरधारीदास यांना शिकवण्यासाठी पाकपत्तन इथे गेले. भारतात परतताना मेहदी हसन यांना घेऊन जाण्याचा त्यांचा मानस होता... पण नियतीला जणू ते मंजूर नव्हतं.

१९४७ साली झालेल्या पाकिस्तानच्या निर्मितीनंतर जेव्हा अज़ीमखांसाहेब भारतात परत येण्यास निघाले तेव्हा परिस्थिती विदारक होती. जातीय दंगलींचा उद्रेक, आणि हिंसाचाराच्या तडाख्यात सापडून त्यांचं भारतातलं घरदार उद्ध्वस्त झालं होतं. घरातल्या चीजवस्तू लुटून नेण्यात आल्या होत्या. त्यामुळे हताश व निराश झालेल्या उस्ताद अज़ीमखां व इस्माईलखां यांनी जड अंत:करणानं पाकिस्तानात स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. राजदरबारी असलेला मानमरातब व आपली मायभूमी सोडून पाकिस्तानातल्या परक्या भूमीत स्थलांतरित होताना त्यांना खूपच यातना झाल्या.

पाकिस्तानात, फाळणीनंतरची परिस्थिती संगीताला अनुकूल नव्हती. त्यामुळे एकीकडे नवीन घराच्या उभारणीची चिंता तर दुसरीकडे जवळची शिल्लक संपलेली. जेव्हा खाण्यापिण्याचीही भ्रांत पडू लागली; तेव्हा उस्ताद अज़ीमखां यांनी चरितार्थ चालवण्यासाठी लाकडाची वखार टाकण्याचा निर्णय घेतला. मेहदीजींनी या प्रस्तावाला कडाडून विरोध केला. दरबारी उस्तादांचा किताब व मानसन्मान लाभलेल्या आपल्या वडिलांना, लोकांनी 'अज़ीमखां वखारवाले' म्हणून हाक मारावी ही कल्पनाच त्यांना सहन होत नव्हती. त्यांनी वडिलांना हा व्यवसाय सुरू करण्यापासून परावृत्त केलं व फक्त दहा रुपयांच्या भांडवलावर जुन्या चिचावतनीत मोटारसायकल व सायकल रिपेअरिंगचं दुकान थाटलं. या व्यवसायात मेहदी हसन यांना बऱ्यापैकी बरकत आली; आणि घरातील खाण्यापिण्याची ददात मिटली.

गॅरेज गुलाम क़ादिरवर सोपवून मेहदीजी, डिझेल इंजिन व क्रूड ऑईल इंजिनमध्ये नैपुण्य मिळवण्यासाठी 'सख्खर' येथील फर्ग्युसन ट्रॅक्टरच्या 'गुलाम हुसेन' कंपनीत प्रशिक्षणासाठी दाखल झाले. अवघ्या सहा महिन्यांतच त्यांनी ट्रॅक्टरसह डिझेल व क्रूड ऑईल इंजिनचा डिप्लोमा मिळवला. त्यानंतर भवलपूर संस्थान व सरगोधा जिल्ह्यातील मियांवाली परिसरातील छोट्यामोठ्या गावांतून ऑईल इंजिन बसवून देण्याचं काम सुरू केलं. त्याचबरोबर ट्रॅक्टर, मोटारी व इंजिन रिपेअरिंगची कामं करून त्यांनी घरखर्चाला हातभार लावला. यामुळे त्यांच्या परिवाराला बऱ्यापैकी आर्थिक स्थैर्य प्राप्त झालं.

यांत्रिकी व्यवसायात जम बसूनही संगीताची ओढ मेहदीजींना स्वस्थ बसू देत नव्हती. लाहोर इथे जाऊन संगीतात बस्तान बसवण्यासाठी ते यथाशक्ती प्रयास करत होते. रेडिओ व फिल्म स्टुडिओत चकरा मारून म्हणावं तसं यश मिळत नव्हतं. चुनामंडी इथे उदयोन्मुख गायकांच्या मैफलीत सहभागी होऊन व लाहोरच्या पंचोली फिल्म स्टुडिओत जलतरंग वाजवण्याचं काम करूनही भरीव असं काही हाती लागत नव्हतं. विलक्षण संघर्षाचा हा काळ होता.

१९५३ साली लाहोर इथे चित्रपट दिग्दर्शक रफ़िक़ अन्वर यांनी आपल्या भाच्याच्या लग्नात मेहदी हसन यांना तलत मेहमूदची गझल गाताना ऐकलं. मेहदीजींच्या आवाजावर ते बेहद्द खूश झाले. नृत्य व संगीताची उत्तम जाण असलेले रफ़िक़ अन्वर त्यावेळी 'शिकार' या चित्रपटाच्या जुळवणीत व्यस्त होते. त्यांनी तात्काळ हजार रुपये ॲडव्हान्स देऊन मेहदीजींना 'शिकार' चित्रपटासाठी पार्श्वगायक म्हणून सुनिश्चित केलं व लवकरच कराचीला बोलावून घेण्याचं आश्वासन दिलं.

'शिकार' या चित्रपटात १९५४ साली रफिक अन्वर यांनी मेहदी हसन यांना सर्वप्रथम पार्श्वगायनाची संधी दिली. चित्रपट रखडल्यामुळे काहीसा उशीरा प्रदर्शित झाला असला तरी गाण्यांच्या रेकॉर्ड्स आधीच बाजारात येऊन लोकप्रिय झाल्या होत्या. या गाण्यांच्या लोकप्रियतेच्या आधारावरच त्यांना रेडिओ पाकिस्तानच्या कराची केंद्रावर ऑडिशनसाठी बोलावण्यात आलं. त्यावेळी रेडिओ पाकिस्तानच्या कराची केंद्रात, फाळणीपूर्वी नवी दिल्लीच्या ऑल इंडिया रेडिओचे केंद्राधिकारी असणारे झेड. ए. बुखारी डायरेक्टर जनरल पदावर नियुक्त होते.

रेडिओ पाकिस्तानच्या कराची केंद्रात झालेल्या ऑडिशनमध्ये मेहदीजींची शास्त्रीय संगीतातली तयारी व गायकीची जबरदस्त रेंज पाहून तेथील अधिकारी दिपून गेले. मेहदीजींना नेमक्या कुठल्या श्रेणीत बसवावं असा त्यांना प्रश्न पडला. शेवटी, बुखारीसाहेबांच्या सल्ल्यानुसार 'ए' डिग्री देऊन त्यांना शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमासाठी करारबद्ध करण्यात आलं.

त्यावेळी मेहदीजींवर उस्ताद बरक़तअलीखांसाहेब, बेगम अख़्तर, मुख़्तार बेगम, मल्लिका पुखराज, तलत मेहमूद यांच्या गझलगायकीचा प्रभाव होता. शास्त्रीय संगीत सादर करताना त्यांनी रेडिओवरून गझल व ठुमरी गायनास प्रारंभ केला. 'रागेश्री'च्या स्वरात गुंफलेल्या 'मीर' तकी 'मीर'च्या 'देख तो दिलके, जांसे उठता है ..ये धुआंसा कहांसे, उठता है..' या गझलने त्यांना अपार प्रसिद्धी मिळवून दिली;आणि मेहदीजींना आपल्या करिअरची दिशा मिळाली.

१९५७-५८ च्या सुमारास फैज़ अहमद 'फैज़' यांच्या 'गुलोंमें रंग भरे बादे-नौबहार चले..' ही रेडिओवरून सादर केलेली गझल लोकांना आवडली; पण हीच गझल १९६४ साली झळकलेल्या 'फिरंगी' या चित्रपटात समाविष्ट



होताच जणू जादूची कांडी फिरली. 'गुलोंमें रंग भरें..' नं त्यांना लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचवलं.

रेडिओ कराची, लाहोर व पेशावर केंद्रावरून मेहदीजींनी गझलगायकी सादर करून जनमानसात आपली प्रतिमा निर्माण केली असली तरी चित्रपटातून गझला गाऊनच त्यांना आपलं बस्तान या क्षेत्रात जमवता आलं हेही तितकंच खरं.

सुरुवातीच्या काळातला त्यांचा काहीसा मुलायम व पातळ वाटणारा आवाज खर्जात अधिकाधिक बहरू लागला होता. एकापेक्षा एक सरस व प्रतिभाशाली संगीतदिग्दर्शकाच्या सुरावटी त्यांनी आपल्या भावोत्कट व मधाळ आवाजाच्या परीसस्पर्शानं अजरामर केल्या. १९६७ हे साल त्यांच्यासाठी भाग्यशाली ठरलं. याकाळात त्यांनी पाकिस्तानी चित्रपटात काही अप्रतिम गझला व गीतं गाऊन 'लॉलीवूड'मध्ये आपलं स्थान भक्कम केलं. 'मुझे तुम नज़रसे गिरा तो रहे हो.' ( चित्रपट : दोराहा, संगीत : सुहैल राणा), 'यूं जिंदगीकी राहमें टकरा गया कोई..' (चित्रपट : आग, संगीत : निसार बज्मी), 'नवाज़िश करम शुक्रिया मेहरबानी..' (चित्रपट : वो मै नही, संगीत : ए. हमीद), 'हमें कोई ग़म नही था ग़मे-आशिकीसे पहले..'(चित्रपट: शब्बाखैर, संगीत : आशिक हुसैन) यांसारख्या गीत व गझलांना रसिकांनी भरभरून दाद दिली.

१९६८ साली 'शरीके-हयात' हा चित्रपट प्रदर्शित झाला. चित्रपट सर्वसामान्य असला तरीही मेहदीजींच्या करिष्म्यामुळे त्याच्यावर लोकांच्या उड्या पडल्या. चित्रपटात मेहदीजी बहादुरशाह 'ज़फ़र'ची 'बात करनी मुझे मुश्क़िल कभी ऐसी तो न थी..' ही गझल स्वरमंडल घेऊन गाताना पडद्यावर दिसले होते. या चित्रपटामुळेच पुढे त्यांना मैफलीतून गझल सादर करण्याची प्रेरणा मिळाली. सुरुवातीच्या काळात ते स्वरमंडल घेऊनच गझल सादर करत असत.

१९७२ साली 'रंजिशही सही, दिल ही दुखानेके लिए आ..' ही अहमद 'फ़राज' यांची निसार बज़्मींनी स्वरबद्ध केलेली गझल 'मोहब्बत' या चित्रपटात झळकली आणि या गझलनं लोकप्रियतेचे सर्व उच्चांक पार केले. या गझलचं भाग्य एवढं थोर की, मेहदीजींची कुठलीही मैफल या गझलविना पुरी होत होत नसे..! मेहदी हसन म्हटलं की 'रंजिशही सही' हे समीकरण आजही अबाधित आहे. याच वर्षात ए. हमीद यांनी 'अंगारे' चित्रपटासाठी आपल्या सुरावटीत बांधलेली 'अबके हम बिछडे, तो शायद कभी ख्वाबोंमें मिले'

ही अहमद 'फ़राज़' यांची गझल कमालीची लोकप्रिय झाली. १९५७ साली पेशावर रेडिओसाठी मेहदीजींनी ती गायली होती तेव्हा तिला मर्यादित यश लाभलं होतं. लता मंगेशकरांनी गायलेलं आणि हृदयनाथ मंगेशकरांनी स्वरबद्ध केलेलं 'मालवून टाक दीप' हे भावगीत याच गझलच्या चालीवर बेतलेलं आहे.

चित्रपटातून एकापेक्षा एक सरस गझला व गीतं लोकप्रिय होऊ लागताच मेहदीजींच्या खाजगी मैफलीतून या गझलांची मागणी होऊ लागली. मैफलीतून गझल गाताना चित्रपटातल्या गझलच्या मूळ चालीला धक्का न लावता त्यात आपल्या प्रतिभेने ते रंग भरू लागले. त्या काळातील बहुतेक गझला या शास्त्रीय संगीतावर आधारित होत्या. मेहदीजी स्वत: उत्तम संगीतकार व रागरागिण्यांचा अभ्यास असलेले व्यासंगी कलावंत असल्यानं गझलांचं मैफलीतून सादरीकरण करताना त्यांना त्या त्या रागाचा आपल्या प्रतिभेनं व कल्पकतेनं विस्तार करणं सहज शक्य झालं. मेहदीजींनी साडेतीन मिनिटांच्या फिल्मी गझलला 'क्लासिकल टच्' देऊन गझलच्या सादरीकरणाला वेगळाच आयाम प्राप्त करून दिला. प्रेक्षकांनाही गझलचं हे लोभस रूप आकर्षक वाटू लागलं. म्हटलं तर गझल आणि म्हटलं तर शास्त्रीय संगीताची मैफल असं एक विलोभनीय स्वरूप मेहदीजींनी सत्तरच्या दशकात सादर करून देशविदेशातून स्वतंत्र मैफलीचा धडाका सुरू केला.

मेहदीजींच्या गझलला मिळणारा प्रतिसाद पाहून गुलाम अली मैदानात उतरले. पाठोपाठ ऐंशीच्या दशकात जगजीतसिंगसह अनेकांनी गझलला मैफलीतून सादर करायला सुरुवात केली होती. यातून गझलगायनाच्या मैफलींचं जे देदीप्यमान पर्व सुरू झालं, त्याचं सर्व श्रेय अर्थातच मेहदी हसन यांना जातं.

सूर छेडताच हजारोंच्या संख्येनं जमलेल्या श्रोत्यांना डोलायला लावण्याचं सामर्थ्य असणारा हा श्रेष्ठतम गझलगायक मैफलीत, समोर बुजुर्ग कलावंत असेल तर त्यांना मान दिल्याशिवाय राहत नसे. एकदा, कराची येथील मैफलीत पाकिस्तानचे पन्नासच्या दशकातील अव्वल दर्जाचे पार्श्वगायक इनायत हुसेन भट्टी पहिल्या रांगेत बसले होते. मेहदीजींनी त्यांच्याकडे नम्रपणे, मैफल सुरू करण्याची 'इजाज़त' मागितली आणि मगच मैफलीला आरंभ केला. पुण्यातल्या मैफलीतला किस्साही असाच रंजक आणि उद्‌बोधक आहे... मेहदीजींच्या मैफलीत स्वरभास्कर पं. भीमसेन जोशी समोर प्रेक्षकांत बसून गझलांचा आस्वाद घेत होते. मैफल रंगात आलेली असताना मेहदीजींनी रागाची सुरावट बदलली.... तत्क्षणी, हलकासा पॉझ घेऊन उपस्थितांना उद्देशून ते म्हणाले..''ग़ज़ल गाते वक्त रागसे भटक जाऊं तो फिर भी ठिक है लेकिन अगर सूरसे भटक जाऊं (बेसूर झालो तर) तो पंडितजी सामने बैठे हैं, वो गर्दन पकड लेंगे मेरी..!'' यावरून त्यांची विनयशीलता व आपल्यापेक्षा श्रेष्ठ व बुजुर्ग कलावंतांना यथोचित मान देण्याची वृत्ती दिसून येते. पण गुलामअलींसारखा त्यांना ज्युनिअर असलेला गझलगायक जर प्रेक्षकांत असेल तर ते मिस्कीलपणे त्यांची फिरकी घेतल्याशिवाय रहात नसत.

मित्रांना दिलेल्या वचनाबाबत ते किती काटेकोर व जागरूक होते याबाबत पाकिस्तानातील प्रसिद्ध शायर अहमद 'फ़राज़' यांनी सांगितलेली एक रोचक आठवण इथे उद्धृत करावीशी वाटते. अहमद 'फ़राज़' यांच्याकडे कराचीला काही प्रतिष्ठित पाहुणे येणार होते. त्यांनी फ़राज़साहेबांना विनंती केली, की '' तुमचे आणि मेहदीसाहेबांचे एवढे घनिष्ठ संबंध आहेत तर आम्ही जेव्हा कराचीला येऊ तेव्हा मेहदी साहेबांच्या गझल गायनाची खास मैफल ठेवता आली तर पाहा. त्यांना जवळून पाहण्याची व ऐकण्याची खूप इच्छा आहे.''

ही घटना आहे १९७९ची. त्यावेळी मेहदीजी पाकिस्तानातील सर्वाधिक व्यस्त पार्श्वगायक व गझलगायक होते.

''अमुक या दिवशी रात्री माझ्याकडे काही खास पाहुण्यांना आमंत्रित केलं आहे त्यावेळी रात्रीच्या भोजनानंतर तुमची मैफल व्हावी अशी माझी इच्छा आहे.'' फ़राज़साहेबांनी मेहदीजींना शब्द टाकला..

मेहदीजी दिलगिरीच्या स्वरात म्हणाले, ''माफ करा फ़राज़साहेब !, नेमकं आदल्या दिवशी माझ्या एका गाण्याचं रेकॉर्डिंग लाहोरच्या स्टुडिओत आहे. त्यामुळे दुसऱ्या दिवशी कराचीला येणं कितपत जमेल सांगता येणार नाही; तथापि तुमच्यासाठी म्हणून येण्याचा मी प्रयत्न अवश्य करीन.''

कदाचित थेट नकार देणं प्रशस्त वाटत नसेल म्हणून मेहदीजी रेकॉर्डिंगचा बहाणा करून गोडीगुलाबीनं टाळू पाहताहेत; असा फ़राज़साहेबांचा ग्रह झाला. त्यांनी मेजवानीनंतर पाहुण्यांच्या सन्मानार्थ दुसऱ्या एका गझल-गायकाला पाचारण करून पर्यायी व्यवस्था करून ठेवली होती. मैफल सुरू झाली. रात्री दहा-साडेदहाचा सुमार. दोन तीन गझला होऊन गेल्या; पण मैफलीत हवा तसा रंग भरत नव्हता. पाहुण्यांचा विरस त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. आणि अकस्मात हॉर्न वाजवत वेगात आलेली मेहदीजींची कार फ़राज़साहेबांच्या पोर्चमध्ये येऊन थांबली. मेहदीजींच्या


दीपावलीच्या साहित्यिक
शुभेच्छा !!!
नवा गंध, नवा श्वास,
नव्या साहित्याची नवी आरास
साहित्यातले रंग नवे
रसिकांमधलेच असंख्य दिवे...
रसिक साहित्य प्रा.लि.
ललित साहित्याचा प्रचंड साठा असलेली
एक लोकप्रिय संस्था
अप्पा बळवंत चौक, पुणे ४११००२, संपर्क: ०२०-२४४५११२९
Visit us: www.erasik.com
Rasik Advertising

आगमनाची वार्ता समजताच वातावरणात आनंदाची व चैतन्याची लहर उठली. गाडीतून उतरून मेहदीजी तडक दिवाणखान्यात आले. उपस्थितांकडे दिलगिरी व्यक्त करत साजिंद्यांना वाद्यं सुरात लावायच्या सूचना देऊन गायलादेखील बसले. फ़राज़साहेबांसाठी लाहोर ते कराची असा पंधरा-सोळा तासांचा अथक प्रवास करून ते थेट त्यांच्या निवासस्थानीच येऊन धडकले होते. (मेहदीजींना श्रद्धांजली वाहताना अहमद 'फ़राज़' ही हृद्य आठवण सांगताना कमालीचे भावनावश झाले होते.)



भारताविषयी मेहदीजींच्या मनातला हळवा कोपरा नेहमीच आत्मीयतेच्या भावनेनं ओलावलेला असायचा. आपल्या जन्मभूमीच्या दर्शनाची तर त्यांना विलक्षण ओढ वाटायची. १९७८-७९च्या भारतदौऱ्याच्या वेळी, फाळणीनंतर प्रथमच, त्यांना आपल्या जन्मभूमीला भेट देण्याची संधी मिळाली. आपल्या जन्मगावात (लुणा) वीज व रस्ता नसल्याचं पाहून ते कमालीचे व्यथित झाले. आपली व्यथा त्यांनी राजस्थानचे तत्कालीन राज्यपाल रघुकूल तिलक यांना बोलून दाखवली. राज्यपालांनी गावात चार दिवसांत वीज आणण्याचं आश्वासन दिलं, रस्त्यांसाठी मात्र मोठ्या निधीची आवश्यकता असल्यानं त्याला बराच कालावधी लागेल असं सांगितलं. यावर मेहदीजींनी रस्तेबांधणीसाठी लागणाऱ्या निधीचा काही भाग आपण मैफलीच्या माध्यमातून देऊ इच्छित असून त्यासाठी झुनझुनू जिल्ह्यात गझलगायनाच्या खास मैफलीची परवानगी राज्यपालांकडे मागितली.

विकासनिधीसाठी कार्यक्रम असल्यानं तिकिटाचा दर हेतुत: जास्त ठेवण्यात आला होता. राजस्थानचा सुपुत्र पाकिस्तानातून येऊन गावाच्या विकासासाठी ही मैफल करत आहे हे समजताच तिथल्या रसिकांनी चढाओढीनं तिकिटं विकत घेऊन या कार्यक्रमाला अभूतपूर्व असा प्रतिसाद दिला. या मैफलीच्या तिकीट विक्रीतून मिळालेली संपूर्ण रक्कम त्यांनी 'लुणा'च्या रस्तेबांधणीसाठी राज्यपालांकडे सुपूर्द केली. या मैफलीत त्यांनी आपली 'रंजिश ही सही, दिलही दुखानेके लिए आऽ' ही सदाबहार गझल गाऊन होताच, खास मारवाडच्या मातीचा गंध असलेलं मांड रागावर आधारीत लोकगीत छेडलं आणि शामियान्यातले तमाम उपस्थित रसिक अंतर्बाह्य मोहरून गेले...

*केसरिया बालम.. आवोजी, पधारो म्हारे देस रे..*
*मंदिर मां सुंदर खडी, खडी सुखावे केस*
*जिनके आंगन केवडा, वो क्यों मैला भेस*
*आग लगो इस केवडेको अरे जलो बुझो ये केस*
*जिस मालीका केवडा वो माली परदेस..*
*परदेस रेऽऽ पधारो म्हारे..*

त्यानंतर एहसान 'दानिश'ची राग बिलावलमध्ये कंपोझ केलेली गझल छेडताच प्रेक्षकात आनंदाची लहर उठली.

*यूं न मिल मुझसे खफा हो जैसे*
*साथ चल मौजे-सबा हो जैसे*
*मौत भी आयी तो इस नाजके साथ*
*हमपे एहसान किया हो जैसे ।।*

वातावरण आता पूर्णतया 'मेहदीमय' झालं होतं.. त्यातच, राग गौडमध्ये निबद्ध 'राज़ी' तिरमिज़ींच्या गझलचे शेर उलगडताना मैफल उपस्थितांच्या अभूतपूर्व प्रतिसादानं बहरत गेली.

*भूली बिसरी चंद उम्मीदे चंद फसाने याद आये*
*तुम याद आये और तुम्हारे साथ जमाने याद आये*
*दिलका चमन शादाब था फिर भी, खाक़सी उडती रहती है*
*कैसे ज़माने ऐ ग़मे-जाना, तेरे बहाने याद आये...*

एकापेक्षा एक सरस व बहारदार गझलांचा दौर पूर्ण होताच शेवटी, मीर तकी 'मीर'च्या गझलच्या रूपात भैरवीचे सूर शामियान्यात निनादले.

चलते हो तो चमन को चलिए कहते हैं की बहारां है
पात हरें हैं फूल खिले हैं, कम कम बादों-बारां है।।

मेहदीजींची शास्त्रीय संगीतावर कमालीची हुकूमत होती. कधी सरगम छेडत तर कधी रागांचे वादी संवादी सूर रसिकांपुढे सादर करत ते त्या त्या रागाचा आकृतिबंध सादर करून नंतर मूळ गझलकडे वळत असत. त्यामुळे त्यांची गझल म्हणजे आशयघन शब्दांना लपेटणारा भावोत्कट सुरांचा कर्णमधुर नजराणा व हिंदुस्थानी रागरागिण्यांचा सदाबहार आविष्कार वाटायचा. त्यांचा मधाळ व दर्दभरा स्वर आणि थेट काळजाला भिडणारा खर्ज तर निव्वळ लाजवाब !! आलापी, ताना, मुरक्या, मींड, सरगम, पलटे, गमक व आंदोलन यांच्या विलोभनीय छटांतून साकारलेली मेहदी हसन यांची गायनशैली म्हणजे रसिकांसाठी पर्वणीच असायची. स्वत: उत्तम संगीतकार असल्याने कुठल्याही काव्याला चुटकीसरशी चाल लावायची विलक्षण हातोटी त्यांच्यापाशी होती. चित्रपटात पार्श्वगायन करताना मेहदीजींनी संगीतकाराला शिकवण्याचा प्रयत्न कधीच केला नाही; किंवा कधीही ताना व आलापीचा अनावश्यक उपयोग करून चालींच्या मूळ स्वरुपाला धक्का लावायचा प्रयत्न कधीच केला नाही. संगीतकारांच्या चालीशी सुसंगत असं त्यांचं गाणं असे. पण मैफलीत गाताना मात्र ते अंतर्बाह्य उमलून येत.

मेहदी हसन यांनी गायलेल्या शास्त्रीय संगीतावर आधारित गझलांची सूची पुढीलप्रमाणे- क्या टूटा है अंदर अंदर, मुग्घम बात पहेली जैसे, रंजिशही सही, यूं ज़िंदगीकी राहमे टकरा गया कोई (यमन कल्याण), वो क़हरे- अहदे-मुहब्बतसे मुकरता जाये (बिलावल), ग़ज़ब किया तेरे वादेपे एतबार किया (जोगिया ), कैसे कैसे लोग हमारे जी को जलाने, दिलकी बात लबों पे लाकर, इक नये मोडपर ले आयें हैं हालात मुझे (बागेश्री), फूल ही फूल खिल उठे मेरे पैमानेमें (बहार), अबके हम बिछडे तो शायद कभी (भूपेश्वरी), वो दिलनवाज़ है लेकिन नज़र शनास नही (बिहाग), चराग़े-तूर जलाओ बहुत अंधेरा है (जनसंमोहिनी), कू-ब-कू फैल गयी बात शनासाई की (दरबारी), आये कुछ अब्र कुछ बहार (मिश्र गौड), ख़ुदा करें की मुहब्बतमें ये मक़ाम आये (जंगला भैरवी), ज़िंदगीमें तो सभी प्यार किया करते हैं (भीमपलास), मुहब्बत करनेवाले कम न होंगे (ख़माज), इक बस तू ही नही मुझसे ख़फ़ा हो बैठा (मियांकी मल्हार), सता सताके हमे अश्क़बार करती है, गुलोंमे रंग भरे, बादे-नौ-बहार चले, तन्हा तन्हा मत सोचा कर (झिंझोटी), ये मौजिज़ा भी मुहब्बत कभी दिखाये मुझे (मधुकंस), क्या भला मुझको परख़नेका नतीजा निकला (मालकंस व सोहनी), प्यारभरे दो शर्मिले नैन, रफ़्ता रफ़्ता वो मेरी (काफी), नक़्शे-ख़याल दिलसे मिटाया नही, बात करनी मुझे, जो थके थके से थे हौसले (पहाडी), रौशन जमाले-यारसे है अंजुमन तमाम (पटदीप), कैसे छुपाऊं राज़े-ग़म, गुंचा-ए- शौक़ लगा है खिलने (पिलू), ग़रमी-ए-हसरत-ए-नाक़ामसे (पूरिया-सोहनी), देख तो दिलके जांसे उठता है(रागेश्री), पत्ता पत्ता बूटा बूटा (किरवानी), नक़्शे-ख़याल दिलसे (मांड), दुनिया किसी के प्यारमें (भूप), खुली जो आंख (भंकार), मै ख़याल हूं किसी और का (भैरवी).

भारत सरकारतर्फे १९७९ साली जालंधरमध्ये के.एल. सैगल पुरस्कारानं मेहदीजींना गौरवण्यात आले. पाकिस्तान सरकारतर्फे 'तमग़ा-ए-इम्तियाज़', 'प्राईड ऑफ परफॉर्मन्स' व 'हिलाल-ए- इम्तियाज़ ' हे मानाचे नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आले; तर नेपाळ सरकारनं १९८३ साली 'गोरखा दक्षिणा बहू' पुरस्कारानं त्यांना सन्मानित केलं.

मेहदीजींचा १९५४पासून १९६२ पर्यंतचा प्रवास खडतर व संघर्षमय होता. १९६२ ते १९७८ हा त्यांच्या सिनेगीतांच्या कारकिर्दीतील सुवर्णकाळ होता. १९७८ नंतर काव्य-संगीताचा दर्जा खालावला. त्यातच आंतरराष्ट्रीय दौरे आणि नंतर आलेलं आजारपण यामुळे चित्रपटातील पार्श्वगायन कमी झालं. १९८९ मध्ये आजारपणामुळे सलग पाच वर्षे त्यांना चित्रपटासाठी गाता आलं नाही. 'सरहदें' या बहुचर्चित अल्बममध्ये लता मंगेशकरांबरोबर ऐकू आलेला 'तेरा मिलना बहोत अच्छा लगे है' या गीतातील त्यांचा मृदू मुलायम मखमली स्वर नंतर कोमेजत गेला; तो फिरून कधी उमललाच नाही.

मेहदीजींचे, कहना उसे,दिल जो रोता है, खुली जो आंख, नज़राना, अंदाज़े-मस्ताना, लाईव अॅट रॉयल अल्बर्ट हॉल, खज़ाना, क्लासिकल ग़ज़ल्स्, शहद, गुलोंमें रंग भरें, तेरी खुशी, मैफ़िले शब, मेरी पसंद, सदा-ए-इश्क़, तर्ज़, नक़्शे-फरयादी, द् लिजेंडस्, गोल्डन ग्रेटस्, सूरकी कोई सीमा नही, यादगार ग़ज़ल इत्यादी सत्तरहून अधिक अल्बम्स प्रचंड लोकप्रिय झाले.

मेहदीजी स्वत: विषयी बोलताना एकदा म्हणाले होते.. ''तन्हापसंद आदमी हूं.. काममे उलझा रहना पसंद करता हूं. ग़ज़ल को गानेसे कंपोझ करनेमे ज्यादा मज़ा आता है. ग़लतीसे



कुटुंब आणि प्रदीर्घ आजारपण यामुळे उतारवयात त्यांना आर्थिक संकटाशी दोन हात करावे लागले. आजारपणामुळे रोडावलेला आर्थिक स्रोत, रॉयल्टीची रक्कम मिळण्यातल्या अडचणी यामुळे ते व त्यांचे कुटुंबीय हवालदिल झाले होते. भारत सरकार व राजस्थान सरकार त्यांना भारतात आणून उपचार करण्यासाठी प्रयत्नशील होते; परंतु दुर्दैवानं त्यास यश येऊ शकलं नाही. भारतातील कलावंतांनी पुढाकार घेऊन त्यांच्या आजारपणात यथाशक्ती आर्थिक मदत करण्याचा प्रयत्न केला होता.

भारतीय चित्रपटक्षेत्रातील अनेक दिग्गज कलावंतांशी त्यांचे सूर जुळलेले होते. दिलीपकुमार, महेश भट, सोनू निगम, लता मंगेशकर व हृदयनाथ मंगेशकर, आशा भोसले,जगजीत सिंग यांच्याबरोबर ते अकृतिम स्नेहरज्जूनं जोडलेले होते. तलत अज़ीज़ यांनी तर त्यांचे शिष्यत्व पत्करलं होतं. दिवंगत कलाकारांपैकी तलत मेहमूद व किशोरकुमार यांच्याशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

भी किसीका दिल न दुखे इसका ख़याल रखता हूं. सिगारकी बुरी आदतसे मजबूर था; अब ग़ालिबन छोड दी है !''

गझलला रागात स्वरबद्ध करण्यामागची पार्श्वभूमी विशद करताना ते म्हणाले होते, ''शायरने लिखी हुई ग़ज़ल या गीत के मूड के हिसाबसे राग को चुनता हूं; या यूं कहिए, ग़ज़ल खुद बता देती है कि उसे किस राग की तलब है. रागोंमें बांधी गज़लें सालोंतक ज़िंदा रहती है; वक्तकी आंधी उन्हें धुंधला नही सकती. अक्सर रागों का वादी सूर बादशहा की तो संवादी सूर वज़ीर की हैसियत रखता है. सुननेवालोंपर गानेवालेका असर हो न हो लेकिन राग अपना रंग अपनी तासीर (प्रभाव) बेशक दिखाता है. ग़ज़ल को क्लासिकल अंदाज़में कंपोज़ करने का मज़ाही कुछ और है!''

मेहदीजींच्या स्वभावाविषयी बोलताना त्यांचे सुपुत्र आसिफ़ मेहदी म्हणाले होते, ''मेहदीसाहब बा-हैसियते वालिद (पिता म्हणून) बहोत ही नर्मदिल (प्रेमळ) और बा-हैसियते उस्ताद (गुरू म्हणून) बहोत ही गर्ममिजाज़ (शीघ्रकोपी) इन्सान थे.''

मेहदीजींचा विवाह १९५१ साली शकिलाबानोबरोबर झाला असला तरी 'सुरैय्या बेगम' नामक आपल्याच शिष्येच्या प्रेमात पडून त्यांनी दुसरा विवाह केला होता. १९९९ साली शकिलाबानोचं तर ऑक्टोबर २००० मध्ये सुरैय्याजींचं निधन झालं. या दोघींपासून झालेल्या चौदा अपत्यांचं भलंथोरलं

सहा दशके रसिकमनावर राज्य करणाऱ्या या गझलच्या अनभिषिक्त बादशहाने १३ जून २०१२ रोजी इहलोकीची यात्रा संपवून जगाचा निरोप घेतला. दर्जेदार व आशयसंपन्न काव्याची अभिव्यक्ती, सादरीकरणातली खानदानी गायकीची परंपरा लयास जाताना एक विलक्षण पोकळी कोट्यवधी रसिकांच्या अंतर्मनाला व्यापून मागे उरली. त्यांनी गायलेली असंख्य अजरामर गीतं आणि गझलांच्या स्वरूपात त्यांचा अलौकिक स्वर आजही जिवंत आहे. जणू तो आपल्या चाहत्यांना आश्वासक स्वरात म्हणतोय...

*'' ज़िंदगीमें तो सभी प्यार किया करते हैं*
*मै तो मरकर भी मेरी जान तुझे चाहूंगा..''*

**आसिफ़अली पठाण**
ई-१/२४, सिटाडेल, बी. टी. कवडे रोड,
घोरपडी, पुणे-४११००१
दूरध्वनी : ०२०-२६८७९२९२
मोबाईल : ९८२३३८९५०५
aasifalipathan@gmail.com



मंगलमय प्रकाशाचा,
मार्ग हा समृद्धीचा
आयुष्य जावो उजळून
ध्यास हा टीजेएस्‌बीचा
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !
टीजेएस्‌बी बँक
विश्वासाचं...चिरंतन नातं
टीजेएस्‌बी हाऊस, प्लॉट क्र. बी ५, रोड क्र.२, वागळे इंडस्ट्रिअल इस्टेट,
ठाणे (पश्चिम) - ४०० ६०४. दूरध्वनी क्र : ०२२ - २५८७ ८५०० | लॉग ऑन: www.tjsb.co.in अथवा जवळच्या शाखेत संपर्क साधा.

# कुंडलिका एक कहाणी

वसंत वसंत लिमये

मुळशी जलाशय सुमारे २४०० फूट उंचीवर आहे. भिरा सुमारे ५०० फुटांवर कोकणात आहे. मुळा नदीचं पूर्वेकडे जाणारं पाणी वीजनिर्मितीनंतर कुंडलिका नदीत सोडण्यात येतं. १९२७ साली पूर्ण झालेला हा प्रकल्प म्हणजे एक अभियांत्रिकी आश्चर्यच आहे. ...अपुरी दळणवळणाची साधनं, बांधकाम व खोदाईसाठी लागणारी जुनाट सामुग्री अशा परिस्थितीत ५२२ चउच क्षमतेचा तलाव आणि १५० चथ क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प १९२७ साली कार्यान्वित करणं हा भारतीय इतिहासातील एक देदिप्यमान मैलाचा दगड आहे.

अस्ताव्यस्त पसरलेल्या गर्द झाडीच्या समुद्रावर तरंगत हेलिकॉप्टर हलकेच हवेतच स्थिरावतं. अलगदपणे ते लंबरेषेत हळुहळू खाली उतरू लागतं. गच्च हिरव्या रंगाचे पदर दोन्ही बाजूच्या बेलाग कातळकड्यांना आलिंगन देत तुमच्याबरोबरच खाली उतरत जातात. चित्रविचित्र आवाज ऐकू येतात आणि पक्षी उडताना दिसतात. मधेच एक शुभ्र, खळाळत उतरणारा धबधबा समोरच्या कपारीतून डोकावतो. अंगावर कोसळत येणाऱ्या दोन भितींच्या पायथ्याशी हेलिकॉप्टर एका बेफाट वाहणाऱ्या मातकट प्रवाहाच्या काठी सपाट जागेवर उतरतं. आपल्याला समोरच, 'ज्युरासिक पार्क'चं प्रवेशद्वार दिसतं. 'ज्युरासिक पार्क' सिनेमातील हा सुरुवातीचा अंगावर येणारा शॉट...

ताम्हीणी घाटातील कुंडलिका नदीच्या उगमापाशी उतरताना मला 'त्या' शॉटची आठवण झाली. हजार फूट उतरत जाणाऱ्या कातळभिंतीत दडलेली 'प्लस व्हॅली' ही जागा, पुण्याच्या पश्चिमेला सुमारे ७५ कि.मी. अंतरावर आहे. तीन दिशांनी गर्द झाडीतून, अरुंद घळीतून तीन प्रवाह हजार फूट उतरून एकत्र भेटतात आणि चौथ्या दिशेला दरीतील कुंडाकडे झेपावतात. एकापुढे एक अशा तीन कुंडांतून ओसंडून खाली उतरत एक धबधबा दरीत कोसळतो. स्थानिक लोक या भागाला 'गोल' म्हणून संबोधतात आणि इथे त्यांचा देव आहे अशी त्यांची समजूत. 'प्लस व्हॅली' हे गेल्या काही वर्षापूर्वी पडलेलं नाव. इथून उगम पावणाऱ्या नदीला कदाचित म्हणूनच 'कुंडलिका' नाव पडलं असावं. ही नदी भिरा, कोलाड, रोहामार्गे रेवदंड्यानजीक अरबी समुद्रास मिळते.

माझा मुळशी परिसराशी संबंध तसा बऱ्याच उशिरा आला. १९८८ साली 'रानफूल' संस्थेची नुकतीच स्थापना झाली होती. ८ ते १४ वयोगटातील शालेय मुलांसाठी साहस–निसर्ग शिक्षण शिबिरं आयोजित करणं हा या संस्थेचा मूळ उद्देश. पहिल्या शिबिरासाठी जागा शोधताना मुळशी परिसरात भटकंती झाली. मुळशी तलावाकाठी पिंपरी गावाजवळ ८९ साली पहिलं शिबिर आयोजण्यात आलं. या निमित्तानं टाटा

पॉवरशी पहिली ओळख झाली. टाटा पॉवरमधील अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रेमानं आम्हाला मदत केली. एखाद्या जुन्या, मातब्बर, दूरदर्शी संस्थेचा स्वभाव, संस्थेच्या अधिकाऱ्यांतही उतरतो याची प्रचीती तेव्हा आली. टाटांसारख्या जगड्व्याळ उद्योग समूहाच्या सहृदयतेची ओळख तेव्हा प्रकर्षानं झाली. मुळशी परिसर ओळखीचा झाला, हळूहळू सवयीचा झाला.

सह्याद्री ही पर्वतराजी साधारणत: ५०० कि.मी. दक्षिणोत्तर पसरलेली आहे. गुजरातच्या दक्षिणेस सुरुवात करून ही रांग गोव्याच्या उत्तरेपर्यंत पोचते. महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर पूर्व-पश्चिम छेद घेतला तर पश्चिमेस अरबी समुद्र आहे, त्यानंतर सुमारे ५०/६० कि.मी. रुंद अशी कोकणाची किनारपट्टी आहे. कोकणाच्या पूर्वेस सह्याद्रीची रांग ४००० फूट उंच भिंतीसारखी दक्षिणोत्तर पसरलेली आहे. हीच भिंत पूर्वेकडे सुमारे २००० फुटांच्या दख्खनच्या पठारावर उतरते. सह्याद्रीच्या मुख्य रांगेपासून अनेक उपशाखा पूर्वेकडे दख्खनच्या पठारावर म्हणजेच देशावर उतरतात. या उपशाखांच्या ओंजळीत नद्यांची खोरी तयार झाली आहेत. इंद्रायणी, पवना, मुळा, मुठा अशा नद्या सह्याद्रीत उगम पावून पूर्वेकडे वाहतात. गोदावरीच्या दक्षिणेकडील बहुतेक उपनद्या कृष्णेस जाऊन मिळतात. पुणं हे मुळा-मुठेच्या संगमावर वसलं आहे. पुण्याहून मुळा नदीच्या उगमाकडे पश्चिमेस आपण निघालो की वाटेत पिरंगुट, पौड अशी गावं लागतात. पौडपासून ७ कि.मी. अंतरावर टाटांनी १९२५ साली बांधलेलं मुळशी धरण लागतं. या धरणामुळे तयार झालेला जलाशय एखाद्या खेकड्याच्या नांग्यांप्रमाणे आहे. यातील उत्तरेकडील नांगी पश्चिमेकडे सरकत आंबवणे गाव, कोरीगड (कुमारीगड), तेलबैला या परिसरात पोचते. याच भागाला आजकाल 'सहारा' अथवा 'अँबी व्हॅली' असं म्हणतात. दक्षिणेकडील नांगीच्या काठावर ताम्हीणी गाव लागतं. या गावाजवळ पूर्वी मुळा आणि निळा अशा दोन नद्यांचा संगम होता. आता या दोन्ही नद्या मुळशी जलाशयात लुप्त झाल्या आहेत. ताम्हीणीच्या पुढे निवे गाव लागतं, इथून पुढे २ किमी गेल्यावर आपण एका भल्याथोरल्या खिंडीतून सह्याद्रीच्या पश्चिम अंगावरील एका माचीवर पोचतो. इथूनच खाली कोकण दिसू लागतं.

ही माची सह्याद्रीच्या पश्चिम अंगावर, दक्षिणोत्तर सुमारे १५ कि.मी. पसरली आहे. या माचीवरून दक्षिणेकडे जाताना सुरुवातीस पश्चिमेकडील दरीत प्लस व्हॅली किंवा कुंडलिकेचा उगम आहे. त्यानंतर डोंगरवाडी ही ताम्हीणी गावाची वाडी लागते. या वाडीलगतच टाटा कॅंप आहे. ताम्हीणी घाटमाथ्यावरील याच माचीवर ९९ साली आम्ही प्रशिक्षण केंद्र उभारण्याचा संकल्प सोडला. 'गरूडमाची' हे प्रशिक्षण केंद्र २००४ साली सुरू झालं. इथूनच पुढे आदरवाडी लागते आणि मग तिथून ५ कि.मी. दक्षिणेकडे कोंडेधर गाव लागतं. इथून ताम्हीणी घाट खाली कोकणात विळे या गावी उतरतो. हा घाट रस्ता २००० साली पूर्ण झाला आणि त्यामुळे पुणे-रोहा असा राज्य महामार्ग ६० - SH60 खुला झाला. ताम्हीणीची आदरवाडी पुणे जिल्ह्यात आहे तर कोंडेधर रायगड जिल्ह्यात येतं. घाटाखालील विळे गावातून एक रस्ता थोडा तिरका नैऋत्येला माणगावला मुंबई गोवा महामार्गास मिळतो. तर पश्चिमेला जाणारा रस्ता कुंडलिकेच्या काठानं २० कि.मी. अंतरावर मुंबई गोवा मार्गावर कोलाडला पोचतो. कोलाडच्या पुढे ११ किमीवर कुंडलिकेच्याच काठी 'रोहा' आहे. इथून पुढे सुमारे २५ कि.मी. अंतरावर साळाव इथे कुंडलिकेची खाडी अरबी समुद्रास मिळते. इथे खाडीच्या दक्षिण कोपऱ्यावर कोर्लाईचा पोर्तुगीजांनी बांधलेला समुद्रदुर्ग आहे. तर उत्तर टोकावर रेवदंड्याचा किल्ला आहे. रेवदंड्याच्याच थोडं आत



३००० वर्षांपूर्वीचं भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील अतिशय महत्त्वाचं सुप्रसिद्ध 'चौल' बंदर आहे. रेवदंडा हे दक्षिणोत्तर पसरलेलं चिंचोळं बेट होतं. उत्तरेकडील नागावपासून एक खोल खाडी आत शिरून, दक्षिणेकडे कुंडलिका खाडीस मिळत असे. त्यामुळे रेवदंडा बेटाच्या आसऱ्यानं अतिशय सुरक्षित असे चौल बंदर या छोट्या खाडीवर होतं. चौल इथे रशियन दर्यावर्दी अफनासी निकितीन १४७० साली भारताच्या किनाऱ्यावर उतरला. चौलचा उल्लेख घारापुरीच्या लेण्यातील शिलालेखातही आहे, तसेच २००० वर्षांपूर्वी चौल येथील मालावर रोमच्या दरबारात बंदी घातल्याचे उल्लेखदेखील आहेत. काळाच्या ओघात गेल्या दोन-तीनशे वर्षात रेवदंडा आणि चौल दरम्यानची खाडी बुजली आहे. कोणे एके काळी चौलमधील शितळादेवीच्या मंदिराच्या पायऱ्यांशी व्यापारी गलबतं लागत असत, तिथेच आज चौल गावाला कुठेही पाण्याचा स्पर्शदेखील होत नाही. काही भौगोलिक चमत्कारांनी इतिहासही बदलतो याचं हे एक लक्षणीय उदाहरण आहे.

ताम्हीणी घाट माथ्यावर उभं राहिलं असता पश्चिमेला २००० फूट दरीत पसरलेलं कोकण दिसतं. उत्तरेकडे तेलबैला आणि घनगड असे शिलेदार दिसतात, तर दूरवर सुधागड आणि शिवलिंगाच्या आकाराचा सरसगड नजरेस पडतो. सूर्यास्ताच्या वेळचं दृश्य आणि सतत बदलत जाणारे लाल सोनरी रंग मोहक असतात. कोकणातून देशावर येणारा कुठलाही ऐतिहासिक व्यापारी मार्ग या भागात नसल्यानं, या घाटात तसा कुठलाच मान्यवर किल्ला नाही. सह्याद्रीच्या दक्षिणोत्तर पसरलेल्या रांगेतले बहुतेक सर्व किल्ले हे ऐतिहासिक व्यापारी मार्गांचे रखवालदार होते. आणि कदाचित यामुळेच या भागाला शिवाजीच्या ऐतिहासिक कर्तृत्वाचा फारसा स्पर्श झालेला नाही. या परिसरातील महत्त्वाची ऐतिहासिक घटना म्हणजे टाटा पॉवर कंपनीचा १९२७ साली सुरू झालेला भिरा जलविद्युत प्रकल्प. या प्रकल्पाचा सारा इतिहासच आचंबित करणारा आहे.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीस मुंबई बेटाचा / शहराचा झपाट्यानं विकास होऊ लागला होता. लोकसंख्या वाढत होती, बरोबरीनं उद्योगधंद्यांचाही विकास होत होता. १९०७ साली घोड्यांनी खेचल्या जाणाऱ्या ट्रॅम, विजेवर पळू लागल्या. एकंदरीतच मुंबईची विजेची गरज वेगानं वाढत जाणार ही गोष्ट टाटांच्या दूरदृष्टीनं १८९० सालाच्या सुमारासच जाणली होती. भिवपुरी, खोपोली आणि भिरा अशा जलविद्युत प्रकल्पांचा संकल्प १९०० सालाच्या सुमारास सोडण्यात आला. या प्रकल्पांची कल्पनाच अफलातून होती. घाटावरील पूर्ववाहिनी नदीवर धरण बांधून जलाशय तयार करायचा, त्या जलाशयातील पाणी पश्चिमकड्यावरून खाली कोकणात उतरवायचं आणि उंचीतील फरकाचा उपयोग करून जनित्राच्या आधारे वीजनिर्मिती करायची. कोकण, घाटमाथा येथील दळणवळणाच्या सोई मर्यादित होत्या. मुंबई-गोवा रस्ता अस्तित्वातच नव्हता. प्रवासाचं त्यावेळचं महत्त्वाचं साधन म्हणजे घोडा किंवा दोन पायांची गाडी. अशा काळात अशा विद्युतप्रकल्पांची कल्पना सुचणं, तिचा आभ्यास करणं आणि अफाट प्रयत्नांनंतर हे प्रकल्प अस्तित्वात आणणे, हा साराच प्रकार क्रांतिकारक होता.

मुळशी परिसराचं सर्वेक्षण १९०० साली झालं. पुढील ४-५ वर्षांत धरणाखाली जाणारी सर्व जमीन टाटा कंपनीनं विकत घेतली. आज अद्भुत वाटेल अशा, एक रुपायाला एक एकर या भावानं हजारो एकर जमीन विकत घेण्यात आली. त्यातही एक कल्पकता वापरण्यात आली. मुळशी धरणाची उंची सुमारे ४०० फूट असणार होती. धरणाची उंची ४३० फूट झाल्यास जेवढी जमीन पाण्याखाली जाईल ती सर्व १९०५ साली खरेदी करण्यात आली होती. आज कोणी गुंठामंत्री तुम्हाला मुळशी तलावाकाठी पाण्याला लागून असलेली जमीन विकत असेल, तर खात्री बाळगा की तो तुम्हाला सपशेल गंडवतो आहे! मुळशी परिसरातील २५-३० गावं, वाड्या विस्थापित होणार होत्या. या लोकांच्या पर्यायी व्यवस्थेसाठी टाटांनी अनेक प्रयत्न केले. ते पुरेसे न वाटल्याकारणानं मुळशी सत्याग्रह झाला. पांडुरंग महादेव बापटांचे सेनापती बापट झाले. भारतातील पर्यावरणासंदर्भातील हा पहिलाच आयोजित लढा होता. टाटांची दूरदृष्टी अस्सल भारतीय असली तरी त्यांची ब्रिटिशांशी असलेली जवळीक हेही एक कारण या लढ्यामागे होतं. आणि म्हणूनच काही काळ या लढ्यास स्वातंत्र्यलढ्याचा रंग लाभला. १९११ साली पूर्ण होऊ शकणारा प्रकल्प लांबणीवर पडला. मुळशी सत्याग्रह संपुष्टात आल्यावर पुढील काम पूर्ण होऊन शेवटी १९२७ साली 'भिरा विद्युत जनित्र' सुरू झालं.

मुळशी जलाशय सुमारे २४०० फूट उंचीवर आहे. भिरा सुमारे ५०० फुटांवर कोकणात आहे. मुळा नदीचं पूर्वेकडे जाणारं पाणी वीजनिर्मितीनंतर कुंडलिका नदीत सोडण्यात येतं. १९२७ साली पूर्ण झालेला हा प्रकल्प म्हणजे एक अभियांत्रिकी आश्चर्यच आहे. १.२ कि.मी. लांब, ४०० फूट उंच अशी मुळशी गावानजीक बांधलेली, पसरट घोड्याच्या नालेच्या आकाराची धरणाची भिंत, मुळशी तलावाकाठच्या दावडी गावापासून डोंगरवाडीपर्यंत डोंगरातून खोदून काढलेले

४ कि.मी. लांबीचे बोगदे, पश्चिमकड्यावरून सुमारे १० फूट व्यासाचे सहा पाईप्स ३५०० फूट खाली उतरून भिरा येथील जनित्रापर्यंत पोचवणं आणि २५ मेगावॉट क्षमतेची ६ जनित्रं डोंगराच्या पायथ्याला प्रस्थापित करणं, या साऱ्याच घटना अशक्यप्राय कोटीतील आहेत. अपुरी दळणवळणाची साधनं, बांधकाम व खोदाईसाठी लागणारी जुनाट सामुग्री अशा परिस्थितीत ५२२ MCM क्षमतेचा तलाव आणि १५० MW क्षमतेचा जलविद्युत प्रकल्प १९२७ साली कार्यान्वित करणं हा भारतीय इतिहासातील एक देदिप्यमान मैलाचा दगड आहे.

धरणाच्या बांधकामासाठी प्रचंड साधनसामुग्री मुळशीपर्यंत आणणं गरजेचं होतं. यासाठी लोणावळा ते मुळशी रेल्वेमार्ग टाकण्याचं काम १९०७ सालाच्या सुमारास सुरू झालं. मुळशी सत्याग्रहात अनेकदा हा रेल्वेमार्ग उखडण्यात आला. पुढे सत्याग्रह मिटल्यावर पिंपरी ते मुळशी असा रेल्वेमार्ग टाकण्यात आला. साधनसामुग्री संदर्भात हीच अडचण कोकणात आली. इंग्लिश इलेक्ट्रिक कंपनीची जनित्रं आणि इतर साहित्य मुंबई बंदरात आलं. तिथून ते बार्जेसवर कुंडलिका खाडीतून रोह्यापर्यंत आणण्यात आलं. रोहा ते भिरा रेल्वेमार्ग टाकण्याचा टाटांचा संकल्प होता. तेव्हा रोहा-अष्टमी अशी नगरपालिका अस्तित्वात होती. टाटांनी रेल्वेमार्गाच्या परवानगीच्या बदल्यात रोह्याला फुकट वीजपुरवठा करण्याचा प्रस्ताव दिला, परंतु रोहा नगरपालिकेनं तो नाकारला आणि रेल्वेवर टोल टॅक्स लावला. त्याकाळी १ लाख ३२ हजार रुपये टोल टॅक्स नगरपालिकेनं कमावला. टोल टॅक्स ही बरीच जुनी प्रथा आहे! १९२२ साली रोहा-भिरा असा ५४ कि.मी. रेल्वेमार्ग सुरू झाला आणि हाच १९६० पर्यंत वापरात होता. १९२२ सालीच भिरा ते डोंगरवाडी या ३५०० फूट पाईपलाईनच्या कडेनं ट्रॉली लाईन बांधण्यात आली, जी १९८० पर्यंत वापरात होती. रेल्वेमार्ग, अजस्त्र पाईपलाईन्स, बोगदे, महाकाय धरणं अशी आश्चर्यं अतिशय दुर्गम भागात, गच्च जंगलात १९०७ ते १९२७ या २० वर्षांत अस्तित्वात आली. या भागात सुमारे २०० इंच पाऊस पडतो. अशा प्रतिकूल परिस्थितीत उभारलेलं हे स्वातंत्र्यपूर्व काळातील अभियांत्रिकी तीर्थ आहे. धरण आणि सर्वेक्षणासाठी ब्रिटिश सल्लागारांनी मदत केली. जनित्रं आणि वीजनिर्मिती या संदर्भात अमेरिकन सल्लागार होते. त्याकाळी सीमेन्स या जर्मन कंपनीची स्विचगिअर यंत्रणा वापरण्यात आली. मुळशी संदर्भातील काही जुनी कागदपत्रं पाहण्याचा योग आला होता. त्यात पाईपलाईन व इतर यंत्रणेच्या इन्स्पेक्टरच्या विविध भत्त्यांचा उल्लेख होता. त्यातील दोन उल्लेख विशेष लक्षवेधी होते - १) घोड्यांच्या चंदीसाठी भत्ता आणि २) घोड्यांच्या खराऱ्यासाठी भत्ता!



डोंगरवाडीला टाटा गेस्टहाऊसशेजारी पाईपलाईनवरील १६ नंबरपाशी उभं राहिलं की अत्यंत देखणं दृश्य खाली पश्चिमेला दरीत पसरलेलं दिसतं. १६ नंबर म्हणजे अजस्त्र पाईपलाईनचा 'अँकर ब्लॉक'. सुमारे ३५०० फुटांची पाईपलाईन ही दिवसातील तापमानाच्या चढउतारांमुळे आकुंचन-प्रसरण पावते. तिला 'अँकर ब्लॉक'नं बांधून न ठेवल्यास ती सहजपणे उन्मळून तुटून जाईल. म्हणूनच सुमारे ४०० फूटांवर एक असे अँकर ब्लॉक्स बांधण्यात आले आहेत. १६ नंबरपासून खाली अवाढव्य सरळसोट अजगराप्रमाणे ६ पाईप्स तळाशी असलेल्या आडव्या पांढऱ्या इमारतीत पोचतात. इथे सुरुवातीची २५ MW क्षमतेची सहा जनित्रं आहेत. आज भिऱ्याला एकंदर ३०० MW क्षमतेची जनित्रं आहेत आणि यातील १५० MW क्षमता 'पम्प स्टोअरेज' धर्तीची आहे. विजेचे व्यापारी दर दिवसात वेगवेगळ्या वेळेला वेगवेगळे असतात. म्हणजेच 'पिक टाईम'ला जास्त दर, तर 'ऑफ पिक' वेळेस स्वस्त! 'पम्प स्टोअरेज' पद्धतीत दर जास्त असताना वीजनिर्मिती केली जाते, तर 'ऑफ पिक' वेळेत 'उन्नई' तलावातील पाणी कमी दरातील विजेवर जनित्रं उलटी फिरवून मुळशी तलावात पंप केलं जातं. आहे तेच पाणी दोनदा वापरून, केवळ दरातील फरकावर फायदा कमावण्याचं, पाणी वाचवणारं हे डोकेबाज तंत्र! आशियातील हा सर्वात मोठा अशा धर्तीचा प्रकल्प आहे.

१९व्या शतकाच्या सुरुवातीस विकासाचे फायदे-तोटे आणि त्याचे समाजकारणातील पडसाद असे मूलभूत प्रश्न कुंडलिका नदीच्या खोऱ्यातील जलविद्युत प्रकल्पानं उपस्थित केले. टाटांची दूरदृष्टी, अचाट कल्पकता आणि अफाट जिद्द यामुळेच मुळशी धरण आणि कुंडलिकेच्या काठावरील जलविद्युत प्रकल्प अस्तित्वात आले. माझ्या 'हाय प्लेसेस' या कंपनीचं 'गरुडमाची' हे व्यवस्थापन प्रशिक्षण केंद्र टाटाच्या डोंगरवाडी कॅम्पशेजारी, ताम्हीणी घाटमाथ्यावर वसलं आहे. परवाचीच गोष्ट, गरुडमाची येथील पश्चिमकड्यावर संध्याकाळच्या वेळेस उभा होतो. मागील जंगलातून असंख्य वेगवेगळ्या पक्ष्यांचा चिवचिवाट उमटत होता. उजवीकडे डोंगरवाडीतील छोट्या मानवनिर्मित जलाशयाच्या कडेनं पाईपलाईन्स लेंडा नावाच्या एका सुळक्याच्या पोटातून भिरा येथील जलविद्युत प्रकल्पात उतरत होत्या. पलिकडेच उत्तरेला गर्द हिरव्या पाचूसारखा 'उन्नई' जलाशयाचा विस्तीर्ण तुकडा गर्द काळसर हिरव्या जंगलाच्या कोंदणात बसवल्यासारखा दिसत होता. त्यामागेच खजिन्याच्या डोंगराचा काळाकभिन्न कडा पसरला होता. उत्तरेकडिल क्षितिजावर सोनारी किरणांत न्हाऊन निघालेला तेलबैला दिमाखात उभा होता. तलम धुक्याच्या झिरझिरित पडद्यातून डोकं वर काढणाऱ्या जांभळट रंगाच्या अनेक डोंगररांगा एकमेकांमागे उलगडत पश्चिम क्षितिजात मिसळून गेल्या होत्या. लालभडक सोनेरी सूर्यबिंबाला अरबी समुद्रात बुडी मारण्याची घाई झाली होती. खालच्या दरीतील गर्द हिरव्या जंगलात चांदीप्रमाणे चमचमणारं कुंडलिका नदीचं पात्र तुकड्यातुकड्यांनी दिसत होतं.

२००५ साली कुंडलिका नदीवर राफ्ट आणि कयाकच्या साहाय्यानं आम्ही प्रथमच कोलाडपर्यंत जलप्रवास केला. आज कुंडलिका नदीवर पर्यटकांसाठी राफ्टिंगची सोय उपलब्ध आहे. रोह्याच्या खाली १० कि.मी. अंतरावर गोफण नावाचं रेतीबंदर आहे. इथून कुंडलिकेच्या खाडीवर मच्छिमारांच्या होडीतून, दोहो बाजूंच्या खारफुटीच्या जंगलातून पक्षीनिरीक्षण करत साळावपर्यंत एक अद्भूत प्रवास करता येतो. साळावपाशी दक्षिण काठावर गणेशाचं बिर्ला मंदिर आहे. इथूनच २ कि.मी. अंतरावर कोर्लईचा समुद्रदुर्ग आहे, तर साळावच्या पुलावरून पलीकडे गेल्यावर उत्तरेकडे रेवदंड्याचा किल्ला आणि टुमदार चौल गाव आहे. या किनाऱ्यावर आजकाल अनेक रिझॉर्टस झाली आहेत. सह्याद्रीच्या पश्चिमकड्यावर उगम पावणारी कुंडलिका सुमारे ७० कि.मी.चा प्रेक्षणीय प्रवास करून पश्चिमसागरास मिळते. सुरक्षिततेच्या कारणांची योग्य काळजी घेऊन टाटा कंपनीनं भिरा जलविद्युत प्रकल्पाचा काही भाग आणि पाईप लाईनच्या कडेनं ताम्हीणी घाटमाथ्यावर पोचणारी ट्रॉली लाईन पर्यटकांसाठी खुली केल्यास एक वेगळीच बहार येईल. मुंबई-गोवा मार्ग लवकरच चारपदरी होणार आहे. ताम्हीणी घाटाखाली भलीथोरली विळे-भागाड अशी MIDC उदयास आली आहे. कुंडलिकेच्या परिसरात झपाट्यानं प्रगती होत आहे. थोड्या सुजाणपणे नियोजन केल्यास प्रगतीसोबतच या भागाचं नैसर्गिक सौंदर्य आणि पर्यावरणाचं संतुलन अबाधित ठेवता येईल, अशी सुबुद्धी आपणा सर्वांसच होवो अशी चौलच्या रामेश्वराचरणी प्रार्थना! अधिक काय लिहिणे - लेखन सीमा!


**वसंत वसंत लिमये**

ईप्सित, सर्व्हे नं. ११०/१/ए,

बळवंतपुरम, पौड रोड,

कोथरूड, पुणे ४११०३८.

दूरध्वनी : (०२०) २५३९४५४०/२५३९९४८६

भ्रमणध्वनी : ९८२२१९०६४४

vasantlimaye@gmail.com

*दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!*



**प्रोपा. शिंदे ब्रदर्स**

9923678910 / 9767621268 / 9823443728



## हॉटेल साईकृपा

**शुद्ध शाकाहारी फॅमिली गार्डन रेस्टॉरंट**

कसारा बायपास-मोखावणे, ता. शहापूर, जि. ठाणे - ४२१ ६०२




**ठाणे भारत सहकारी बँक लि.** शेड्यूल्ड बँक

केंद्रीय कार्यालय : सहयोग मंदिर, सहयोग मंदिर पथ, घंटाळी, नौपाडा, ठाणे

कोअर बँकिंग • ए.टी.एम. • एन.ई.एफ.टी. • आर.टी.जी.एस. • फ्रँकिंग • फॉरिन एक्स्चेंज रेमिटंस • एन.एफ.एस.

# प्रश्नांची वखार

**हेमंत देसाई**

टुजीच्या प्रकरणात जेपीसीच्या मागणीसाठी रालोआने संसदेत कित्येक दिवस हैदोस घालून कामकाज होऊ दिले नाही. टुजीबाबत जेपीसी हवी असेल, तर कोळशासाठी ती का नको? संपुआ आठ वर्षे सत्तेत आहे, तेव्हा धोरणे वेळीच बदलण्यात का आली नाहीत? आज कृषिउत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांची वजनमापात व भावात फसवणूक होते त्यामुळे या बाजार समितीचा कायदा मोडीत काढला पाहिजे. काही मॉल्सना थेट शेतकऱ्यांचा माल उचलला येतो, मग इतरांना ही परवानगी का नाही?

पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी 'एक था टायगर'मधील सलमान खानप्रमाणे दोन-चार किकमध्ये प्रतिस्पर्ध्यांना लोळवले आणि भाजपच्या तुपट-गोऱ्या-तांबूस चेहऱ्याचा पार कोळसा झाला. रिटेल, हवाईक्षेत्र, प्रसारण यामध्ये जादा विदेशी गुंतवणुकीस मुभा आणि डिझेलच्या दरात वाढ करून अनुदानांना कात्री यामुळे भाजप, डावे, तृणमूल, समाजवादी पक्ष सर्वच अंगावर आले. यामुळे आर्थिक प्रश्नांवरील देशांतर्गत दुही अधोरेखित झाली, मात्र धर्म व जातीवरून भांडण्यापेक्षा अर्थकारणावरून संघर्ष होत आहे, ही त्यातल्या त्यात दिलासादायी बाबच म्हणावी लागेल.

भ्रष्टाचार व महागाईचा संबंध लावला जात आहे. सत्ताधारी पैसे खात असल्यामुळे भाववाढ होत आहे हा आरोप असून, त्यामुळे जनतेचे माथे ठणकायला लागले आहे. अण्णांची चळवळ, भाजपची वळवळ, भाववाढीचा प्रस्फोट आणि मुदतपूर्व निवडणुकांसाठीची सत्तापिपासूंची धडपड या सर्व बाबी परस्परसंलग्न आहेत. कसे ते पाहू.

कोळसाखाणींच्या वाटपात १ लक्ष ८६ हजार कोटी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा निष्कर्ष भारत सरकारच्या महालेखापालांनी (कॅग) काढला. त्यामुळे पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी तात्काळ राजीनामा द्यावा अशी मागणी भाजपप्रणीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने केली. संसदेत धिंगाणा घातला. केवळ संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) स्थापन करून चालणार नाही, तर पंतप्रधानांनी आपला दोष स्वीकारून खुर्ची सोडावी अशी रालोआची इच्छा. वास्तविक टुजीच्या प्रकरणात जेपीसीच्या मागणीसाठी रालोआने संसदेत कित्येक दिवस हैदोस घालून कामकाज होऊ दिले नाही. टुजीबाबत जेपीसी हवी असेल, तर कोळशासाठी ती का नको?

जुलै २००४ ते मे २००९ दरम्यान कोळसाखात्याची सूत्रे डॉ. सिंग यांच्याकडे होती. या कालावधीत त्यांनी १४६ कोळसाखाणींचे वाटप केले, त्यात लाभार्थी कंपन्यांचा फायदा

झाला असे महालेखापाल विनोद राय यांनी म्हटले. कॅगच्या अहवालावर सार्वजनिक लेखासमितीत चर्चा होऊन तिचे निष्कर्ष संसदेत मांडले जातात. अशी कोणतीही प्रक्रिया होण्यापूर्वीच डॉ. सिंग यांनी राजीनामा द्यावा ही मागणी भंपकपणाचीच होती. अहवालावर संसदेत चर्चा होऊ द्यायची नाही, त्याऐवजी गडबड-गोंधळ करायचा ही भाजपची रीत. अर्थात तहलका प्रकरणात काँग्रेसने हेच केले होते. भ्रष्टाचारविरोधी लढाईचे नेतृत्व अण्णा हजारे-रामदेवबाबांकडे गेल्यामुळे भाजपची अस्वस्थता वाढली. खाणींवरून भाजपचा संसदेत जो खणखणाट चालू आहे तो त्यामुळे. मात्र तहलका प्रकरणावेळी तत्कालीन पंतप्रधान वाजपेयींनी पदत्याग केला नव्हता. संरक्षण गैरव्यवहाराच्या आरोपावरून संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांना राजीनामा द्यावा लागला; परंतु चौकशी पूर्ण होण्याआधीच त्यांची या पदावर नियुक्ती केली गेली. पंजाबमधील मागच्या टर्ममधील अकाली दल नेतृत्वाखालील सरकारमध्ये भाजपचे दोन मंत्री भ्रष्ट होते. परंतु त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही वा त्यांनी खुर्चीही सोडली नाही. कर्नाटकमधील सदानंद गौडा सरकार बरे चालले होते. रेड्डीबंधूंना त्यांनी चापही लावला होता. परंतु येडियुरप्पा यांनी दादागिरी केली. परिणामी, गौडांना घरी धाडण्यात आले व शेट्टीयार नावाच्या प्यादाला त्या जागी बसवले. मध्यप्रदेशातील शिवराजसिंह चौहान सरकारचे काही घोटाळे बाहेर आले आहेत. त्यामुळे भाजपने उगाच तोरा मिरवू नये.

शिवाय 'भ्रष्टाचार, भ्रष्टाचार' असा नुसताच बोभाटा करून उपयोगाचे नाही. तो होऊ नये यासाठी उपाय शोधले पाहिजेत. पण अण्णा-रामदेवबाबा शैलीचा भाजपवर प्रभाव पडत चालला आहे. अण्णांनी १५ केंद्रीय मंत्र्यांना गचांडी द्यावी, अशी मागणी केली होती. का, तर म्हणे ते भ्रष्ट आहेत! यांनी उठावे व कोणालाही 'चोर' म्हणावे. मग लगेच चोराला फाशी व्हावी, अशी त्यांची इच्छा आहे! ती पूर्ण न झाल्यामुळे नारळपाणी पिऊन राळेगणची वाट धरावी लागली.

तिकडे रामदेवबाबांनी काळ्या पैशाचे वाट्टेल ते फुगवलेले आकडे फेकायला सुरुवात केली. त्यासाठी रामलीला व्यासपीठावरून त्यांनी कागदपत्रांचे गठ्ठेच्या गठ्ठे दाखवले आणि 'मी त्याचा अभ्यास केला आहे', असा दावा केला. लोकांना वाटले, हा माणूस आता केंब्रिजला वा हार्वर्डला जाऊन अर्थशास्त्राचे अध्ययन करणार, पण बाबांनी दिलेले आकडे अतिरंजित वा बोगस निघाले.

गेल्या तीन वर्षांत जवळपास पन्नास हजार कोटी रुपयांच्या उघड न केल्या गेलेल्या उत्पन्नाचा शोध केंद्र सरकारने घेतला आहे. तसेच, विदेशातून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे सहाशे कोटी रुपयांची करचुकवेगिरी उघड झाली आहे. देशविदेशांतून मिळालेल्या माहितीच्या आधारे बारा-पंधरा हजार प्रकरणांचा तपास सुरू आहे. हे पुरेसे नाही, पण काहीच होत नाही, हे म्हणणेसुद्धा खरे नाही. देश-विदेशात नेमका किती काळा पैसा आहे याचा तपास करण्याचे काम नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक फिनान्स अँड पॉलिसी, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फिनान्शियल मॅनेजमेंट आणि नॅशनल काउन्सिल फॉर अॅप्लाइड इकॉनॉमिक रिसर्चकडे सोपवण्यात आलेले आहे. अण्णा व बाबांकडे त्यांच्यापेक्षा अधिक ज्ञान असल्यास कळायला मार्ग नाही.

संयुक्त पुरोगामी आघाडी सरकार व रालोआ यांच्यात निरंतर युद्ध सुरू असते, पण आरोप-प्रत्यारोपांच्या धूळभरल्या रस्त्यातून बाजूला जाऊन वास्तवाचा अदमास घेतलाच पाहिजे. २००४ साली खाणकामाची कंत्राटे देण्याची पद्धत योग्य नसल्याचा साक्षात्कार संयुक्त पुरोगामी आघाडीला झाला. त्यानंतर २८ जून २००४ पासून वाटपप्रक्रियेत सुधारणा करण्याचे ठरले, मात्र व्यवस्थेत बदल झालाच नाही. गुणवत्तेच्या आधारे वाटप करण्याचे सोंग वठवत, छाननी समितीमार्फत राजकीय निर्णय घेतले गेले. स्पर्धात्मक निविदा काढून कंत्राटे देण्याचा निर्णय या ना त्या सबबीखाली लांबणीवर टाकला गेला. त्यामुळे खाजगी कंपन्यांचा फायदा मोजताना उत्पादनखर्चातून कोल इंडियाची किंमत वेगळी काढली आहे. स्पर्धात्मक निविदा मागवल्या असत्या तर तुफान फायदा झाला असता, असे कॅगला वाटते, पण सरकारने आपली ही हानी कशी भरून काढावी, हे कॅग सांगत नाही. भविष्यात खुली निविदा पद्धत स्वीकारावी, ही सूचना सामान्य बुद्धीची कोणतीही व्यक्ती करू शकते. पण झालेल्या चुका निस्तरण्याचा उपाय कॅगने सांगायला हवा होता. एक उपाय असा होऊ शकतो, की सध्या ज्यांना खाणपरवाने दिले आहेत, त्यांच्याशी फेर वाटाघाटी करता येतील. खाणकाम वेगाने व्हावे व नफा सरकारबरोबर खाजगी कंपन्यांनी वाटून घ्यावा.

२००४ साली, वाटपप्रक्रियेवर दबाव येत असल्याची तक्रार कोळसा सचिवांनी केली होती. पण कोळसामंत्र्यांनी त्याकडे लक्ष न देता, अस्तित्वातली वाटपपद्धतच उत्तम असल्याचा निर्वाळा दिला होता. आपल्याकडे कोळसाखाणी मिळवताना कंपन्या 'कार्टेल' करतात. हे थांबवण्यासाठी कोळसा नियामक प्राधिकरण स्थापणे गरजेचे आहे. तसेच खाजगी खाणवाल्यांनी उत्पादिलेला कोळसा खुलेपणाने विकता आला पाहिजे.



आता पुन्हा, कॅगने सुरुवातीला दहा लक्ष कोटी रुपयांचे सरकारचे महसुली नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला होता, तो एकदम १ लक्ष ८६ हजार कोटी रुपयांवर आणला गेला. दोन-चार महिन्यांत आकड्यांत इतका बदल व्हावा? खाजगी कंपन्यांचा भ्रष्टाचारातला वाटाही दोनतृतीयांशने कमी झाला. शिवाय २००६ मध्ये जी कंत्राटे दिली गेली, त्यातल्या हानीचा अंदाज मात्र २०१०-११च्या कोळशाच्या किमतीच्या आधारे करण्यात आला आहे. असे कधी होते काय? ज्या वर्षी खाणींची कंत्राटे दिली गेली, तेव्हाच्या किमतींचा विचार केल्यास भ्रष्टाचार ४० टक्क्यांनी कमी दिसेल. तसेच, कोळसाखाणींचे लाभ पुढील पंचवीस वर्षे मिळतील हे मान्य करताना, त्याचा विचार लाभहानीच्या हिशेबात केलेला नाही. मात्र ऊर्जा व दिल्ली आंतरराष्ट्रीय विमानतळातील घोटाळ्यांचे गणित करताना तो केलेला आहे. हे तर्कसंगत नाही. पुन्हा या उत्पन्नावरील ३० टक्के कंपनी कराचा विचार केल्यास 'कोलगेट'मधील सरकारी हानीची रक्कम आणखी कमी होते. काही जणांच्या मते सरकारी व खाजगी मिळून भ्रष्टाचाराची फट चौसष्ट हजार कोटी रुपयांइतकी आहे.

थोडक्यात 'कॅग'ची विश्वासार्हता व कार्यक्षमतेवरच प्रश्नचिन्ह पडले आहे. मात्र याचा अर्थ भ्रष्टाचार झालाच नाही, असे मुळीच नव्हे. जून २००४ पासून कोळसाखात्याने १९४ कोळसाखाणी विविध कंपन्यांना 'कॅप्टिव्ह यूज'साठी दिल्या. हे वाटप करताना वस्तुनिष्ठ निकषांवर पारदर्शी पद्धतीने विचार केला गेला नाही, अशी कॅगची टिप्पणी आहे. त्यावर या अहवालावर आपण शंभर टक्के सहमत आहोत असे म्हणणार नाही, असे कोळसामंत्री श्रीप्रकाश जयस्वाल म्हणतात. याचा अर्थ हे निष्कर्ष त्यांना अंशत: मान्य आहेत. शिवाय, खाणी व खनिजनियंत्रण व विकास कायद्यात दुरुस्ती करून स्पर्धात्मक निविदा पद्धतीचा मार्ग मोकळा करण्यास केंद्र सरकारला पंचवीस महिने लागले. दुरुस्ती मंजूर झाल्यावर त्याबद्दलची अधिसूचना काढण्यास आणखी दीड वर्ष घेण्यात आले. श्रीप्रकाश जयस्वाल यांच्यावर गंभीर आरोपही आहेत.

टुजी गैरव्यवहार झाला तेव्हा 'रालोआ सरकारचेच धोरण आम्ही पुढे चालवले' असा युक्तिवाद संपुआ सरकारने केला. आताही सर्व खापर रालोआवर आणि भाजपशासित राजवटीवर फोडले जात आहे. संपुआ आठ वर्षे सत्तेत आहे, तेव्हा धोरणे वेळीच बदलण्यात का आली नाहीत?

पायाभूत सुविधांअभावी विकास खोळंबला आहे. औद्योगिक उत्पादनविकासाचा वेग नकारात्मक आहे आणि

विजेच्या मागणी व पुरवठ्यात प्रचंड तफावत निर्माण झाली आहे. सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात खेचताना सीबीआय, लोकायुक्त, कॅगसारख्या यंत्रणांचा वापर केला जातो. संपुआ सरकारची विश्वासार्हता लयास गेली असल्याने बेछूट आरोपही शंभर टक्के खरे वाटू लागतात. देशात आर्थिक अराजक आहेच. सरकारची प्रतिमा नक्कीच काळवंडलेली आहे. परंतु फुगवलेले आकडे आणि ठोस पुराव्यांशिवाय आरोप करण्याची एक स्पर्धा सुरू आहे.

माजी लष्करप्रमुख व्ही.के. सिंग, विनोद राय यांच्यासारख्या व्यक्तीही त्यात उतरल्या आहेत. यातून लोकशाहीतील घटनादत्त यंत्रणांबद्दलही संशयाचे वातावरण निर्माण होते. सरकारचा निर्ढावलेपणा, विरोधकांचा बेजबाबदारपणा आणि सिव्हिल सोसायटीवाल्यांचा कर्कशपणा यामुळे देश चक्रव्यूहात फसत चालला आहे. सामान्यजनांचा मात्र अभिमन्यू झाला आहे.

तिकडे युपीए सरकार पोलादासारख्या मजबूत पायावर उभे आहे, असा आभास उत्पन्न केला जात असतो. उत्तर प्रदेशातील एकेकाळचे मुलायमसिंग यादव यांचे सहकारी व नंतर काँग्रेसवासी झालेले केंद्रीय पोलादमंत्री बेनीप्रसाद वर्मा हे 'पोलादपुरुषच' असावेत! सणासुदीच्या दिवसांत जनता महागाईच्या चक्रात अक्षरश: पिसून जात असताना बेनीप्रसादजी मात्र मोगॅम्बोसारखे विकट हास्य करत म्हणाले, 'फळभाज्या नि जीवनावश्यक वस्तूंचे भाव भडकले म्हणून मी जाम खूष आहे. कारण त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदाच होत आहे.' जणू काही त्यांच्या अंगात शरद जोशीच संचारला होता. शिवाय, जीवनावश्यक वस्तू व भाज्या यांच्याखेरीज इतर वस्तूंचे भाव कडाडले आहेत, याकडे प्रसारमाध्यमे दुर्लक्ष करत असल्याचा त्यांचा आरोप.

राहुल गांधींनी बेनीजींना उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीत तिकीटवाटपाचे भरपूर अधिकार दिले होते. बेनीजींनी त्याचा इतका लाभ उठवला, की काँग्रेसचे मातेरे झाले! पोलाद उत्पादनासाठी कोळसा लागतो. 'कोलगेट'मुळे कोळसाक्षेत्राचा निकाल लागला आहे आणि पोलाद निर्मितीत जगाच्या तुलनेत भारत खूपच मागे आहे. बेनीजींनी ही परिस्थिती सुधारण्याऐवजी नको त्या विषयात नाक खुपसले.

वास्तविक पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग, केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम, नियोजन मंडळाचे अध्यक्ष डॉ. माँटेकसिंग अहलुवालिया, पंतप्रधानांचे माजी आर्थिक सल्लागार कौशिक बसू आणि रिझर्व्ह बँक गव्हर्नर सुब्बाराव या सर्वांनी महागाईबद्दल काळजी प्रकट केली होती. या सर्वांना सरकारी वेतन/भत्ते मिळतात, तरीही त्यांना वास्तवाचे भान आहे. परंतु बेनीजींचे (सर्व काही फुकटात मिळत असल्यामुळे) मात्र सामाजिक भान सुटले. त्यामुळे बटाटा शंभर व कांदा हजार रुपये किलो झाला तरी काय फरक पडतोय, अशी त्यांची भावना!

महागाई जितकी वाढते, तितका शेतकऱ्यांचा फायदा वाढतो, असे बेनीजींना वाटते. तर 'महागाई वाढली असेल, तर सर्वसामान्यांचे उत्पन्नही वाढले आहे' असे उद्गार केंद्रीय कायदेमंत्री सलमान खुर्शीद यांनी काढले आहेत. खुर्शीद यांना केव्हाही वकिलाचा झगा घालून हवे तितके पैसे खेचता येऊ शकतात. तसेच ते गर्भश्रीमंत आहेत. बेनीजी मूळचे समाजवादी व खुर्शीद काँग्रेसवाले म्हणजे आम आदमीवाले. तरीसुद्धा सामान्यांच्या जिवाला ज्या कळा लागल्या आहेत, त्या त्यांच्यापर्यंत पोचत नाहीत.

जेव्हा विकासदर वाढत असतो, तेव्हा काही प्रमाणात चलनफुगवटाही होत असतो. पण आज विकासदर ९ टक्क्यांवरून ६ टक्क्यांच्या आसपास येऊनही भाववाढ कमालीची आहे. २१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, किरकोळ ग्राहक निर्देशांक जूनच्या ९.९३ टक्क्यांवरून जुलैमध्ये ९.८६ टक्क्यांवर आला आहे. मेमध्ये तो १०.३६ टक्के होता. परंतु आकाशाला भिडलेल्या किमती थोड्या निवळल्या की लगेच रामराज्य आले, असे समजण्याचे कारण नाही. शिवाय किरकोळ बाजारात भाज्यांचे भाव २७ टक्क्यांनी, तेलबियांचे १७ टक्क्यांनी, डाळींचे १२ टक्क्यांनी, साखरेचे ९ टक्क्यांनी तर अंडी-मांस-मटणाचे दर ११ टक्क्यांनी वधारले आहेत. 'अरे, चल जरा एकेक कप चहा मारून येऊ' असे म्हणण्याची सोय नाही. कारण बऱ्याच हॉटेलांत चहाचा कप पंधरा ते वीस रुपयास आहे.

दुर्दैवाची बाब अशी, की भावफुगवट्याबद्दल केंद्र व राज्य सरकार ढिम्म काही करत नाही. मुंबई-ठाण्यासह उपनगरांना मुंबई कृषिउत्पन्न बाजारपेठ समितीच्या घाऊक बाजारपेठेतून पुरवठा होतो. तीन आठवड्यांपूर्वी तेथे भाज्यांचे भाव स्थिर होते. पण 'दुष्काळ-दुष्काळ' अशा बोंबा मारून किरकोळ व्यापाऱ्यांनी भाज्यांचे दर तिप्पट-चौपट वाढवले. जुलै-ऑगस्टमध्ये नवी आवक झाल्यावर भाज्यांचे भाव खाली येतात. घाऊक बाजारात तसे ते घसरले, पण किरकोळ व्यापाऱ्यांनी लुटण्यास सुरुवात केली. त्यामुळे वाटाणा १०० रुपये, फ्लॉवर ५५ रुपये, दुधी भोपळा २४ रुपये, तोंडली ५० रुपये, वांगी ६० रुपये आणि ३६ रुपये किलोने विकली जात होती. घाऊकमध्ये हे भाव ६०-७५ टक्क्यांनी कमी होते.

घाऊकमध्ये डाळींचे दर तुलनेने कमी असताना अडते, दलालांनी ते ४० टक्क्यांनी फुगवत, किरकोळीत ८०-१०० रुपयांपर्यंत नेले. श्रावणातल्या उपायांमुळे शेंगदाणे, बटाटेही भडकले. साखर महिन्याभरात किलोमागे १२ रुपयांनी वाढून ४५ रुपयांवर जाऊन पोचली. डाळी, कडधान्ये, शेंगदाणा, साखर, सूर्यफूल तेल यांची भरपूर आवक असतानाही ग्राहकांची नागवणूक केली जात आहे. उदाहरणार्थ, तूरडाळ घाऊकमध्ये किलोला ६० रुपये तर किरकोळीत ९० रुपये!

काँग्रेसच्या 'पोलादपुरुषा'च्या मते, यामुळे शेतकऱ्यांचे भले होत आहे पण तसे ते मुळीच होत नाही. उलट, तुपट चेहऱ्याचे गलेलठ्ठ व्यापारीच आणखी लठ्ठ होत आहेत. शेतकरी उपाशी आहे, त्यांच्या हातात काही पडत नाही.

आजवर घाऊक व किरकोळ बाजारभावात इतका प्रचंड फरक नसायचा. पण एवढी लुबाडणूक होत असूनही शासनाचे किमतीवर नियंत्रण नाही. उत्पादन व पुरवठा व्यवस्थित असतानाही हे घडत आहे.

**भाववाढीचा आलेख**

ऑगस्ट २०१२

| | घाऊक भाव (किलोत) | किरकोळ भाव (किलोत) |
|---|---|---|
| साखर | ३७ रुपये | ४५ रुपये |
| बटाटा | १६ रुपये | २३-२५ रुपये |
| उडीद | ५७ रुपये | ८०-९० रुपये |
| मूगडाळ | ६० रुपये | ८०-९० रुपये |
| मसूर | ४१ रुपये | ७०-८० रुपये |
| शेंगदाणा तेल | १२२ रुपये | १३५-१४० रुपये |
| सूर्यफूल तेल | ७२ रुपये | ९०-१०० रुपये |

खरे तर सरकारला जर काही चाड असेल, तर त्याने जीवनावश्यक वस्तू कायद्यातील तरतुदींचा वापर करत किरकोळ किमती नियंत्रित केल्या पाहिजेत. सरकारला तो अधिकार आहे, तो वापरला जात नाही. मृणाल गोरे यांच्या महागाई प्रतिकार समितीच्या आठवणी काढून अश्रू ढाळणारे लोकप्रतिनिधीही गप्प आहेत. कारण त्यांना भाववाढीचे काही पडलेले नाही. अनेकजण दिवसभर एसीत बसतात व रात्री आणखी कुठे! त्यांचा भाज्यांपेक्षा चखण्याशी अधिक संबंध!

आज कृषिउत्पन्न बाजार समितीत शेतकऱ्यांची वजनमापात व भावात फसवणूक होते त्यामुळे या बाजार समितीचा कायदा मोडीत काढला पाहिजे. काही मॉल्सना थेट शेतकऱ्यांचा माल उचलला येतो, मग इतरांना ही परवानगी का नाही?

महाराष्ट्र राज्य सरकारने कृषिउत्पन्न बाजार कायद्यात बदल करण्याची हालचाल सुरू केली होती. त्यामुळे मध्यस्थांची हकालपट्टी झाली असती. शेतकरी व ग्राहक दोघांचाही फायदा झाला असता. पण हे घडून आलेच नाही. छत्तीसगडसारख्या राज्याने रेशनव्यवस्थेची पुनर्रचना केली आहे. महाराष्ट्रात ही यंत्रणा मोडकळीस आली आहे. सणासुदीत तरी रास्त भावात भाज्या उपलब्ध करून देणारी केंद्रे सुरू करण्याची इच्छाही शासनात झालेली नाही. विरोधी पक्षही भ्रष्टाचाराचा गोपाळकाला खेळण्यात मग्न आहेत. आयटीसीच्या इ-चौपालचा प्रभाव देशात मर्यादित भागात दिसून आला आहे.

शीतगृहे नसल्यामुळे फळे, भाज्या यांसारखा नाशवंत माल शेतकरी मिळेल त्या भावाने व्यापाऱ्यास विकतात. पुरेशी गोदामे नसल्याने लाखो टन धान्य वाया जात आहे. अन्न महामंडळ व वखार महामंडळास कीड लागलेली आहे. त्यात बाजारात ५-१० टक्के मार्जिनची रक्कम भरून व्यापारी प्रचंड रुपयांचे सौदे करतात. साठेबाजीही केली जाते. त्यामुळे भाववाढ होते. कमॉडिटी मार्केटचा फायदा मोजकी मंडळी उठवतात. रिटेल क्षेत्रातील परदेशी गुंतवणुकीस मतलबी विरोध केला जातो. शेतकरी केवळ विक्रेता नसतो, तर त्याला धान्य, फळे, भाज्या विकतही घ्याव्या लागतात. परंतु फक्त बागायतदार शेतकरी आणि व्यापाऱ्यांचे हितसंबंध जपणारी क्रूर व्यवस्था कोरडवाहू शेतकरी, बिगरशेतकरी, शेतमजूर, खेडेगाव व शहरातील असंघटित वर्गाच्या दैनंदिन दु:खाकडे पाठ करत आहे.

अन्नसुरक्षा विधेयकाअंतर्गत देशातील ८० कोटी लोकांना दरमहा दोन रुपये किलो भावाने गहू, तीन रुपयाने तांदूळ व एक रुपये किलोने इतर धान्य दिले जाणार आहे. त्यासाठी १ लक्ष २० हजार कोटी रुपये खर्च येणार आहे. परंतु त्यास संपुआ सरकारमध्येच विरोध असल्याने, ते संमत होऊ शकलेले नाही. शिवाय देशाच्या करापासूनच्या पावणेसात लाख कोटी रुपये उत्पन्नापैकी २ लाख कोटी रुपये अनुदानांवर खर्च होतात. व्याजाचे हप्ते फेडण्यासाठी तीन लाख कोटी रुपयांवर रक्कम खर्च होते. त्यामुळे विकासासाठी अत्यल्प पैसा शिल्लक राहतो. तरीसुद्धा गोरगरिबांना अन्नसुरक्षा देण्याची गरज आहे. त्याकरता अनुदानांना कात्री व श्रीमंत शेतकरी व उद्योगपतींवर अधिक बोजा हे धोरण राबवावे लागेल. परंतु केंद्र व राज्य सरकार ते करत नाहीत. त्यामुळे एकीकडे सोने तोळ्याला ३१ हजार रुपयांवर जाते व तरीही ते

## मौज प्रकाशनाची नवीन प्रकाशने



धीरूबेनच्या कवितेतील भावात्मक सहजसुंदरता
आणि 'युनिव्हर्सल अपील' यामुळे हा संग्रह
काव्यजगतासाठी अनमोल भेट आहे हे निःसंशय.

-सुरेश दलाल

# किचन पोएम्स

## धीरूबेन पटेल अनुवाद : उषा मेहता

किंमत १०० रुपये



महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यापासून
१९७२ पर्यंतच्या राज्य उभारणीच्या कालखंडाचा,
आर्थिक, राजकीय परिवर्तनाच्या संदर्भातील
अनेकविध प्रश्नांचा एक विश्लेषक नि रोचक अभ्यास

# महाराष्ट्राचा राजकीय इतिहास १९६०-१९७२

## नीता बोकील

किंमत २७५ रुपये



निसर्ग, कला, साहित्य नि संगीत यांच्या आविष्कारातून
घडणाऱ्या पाश्चात्त्य संस्कृतीचा, वाचकांच्या सौंदर्यदृष्टीला
विस्तारत नेणारा नि प्रवासवर्णनाच्या कक्षा ओलांडून पुढे
जाणारा एका नव्या प्रतिभेचा उत्कट आविष्कार.

# बंद खिडकीबाहेर

## सुलभा ब्रह्मनाळकर

किंमत २२५ रुपये

**मौज प्रकाशन** गृह, गोरेगांवकर लेन, मुंबई ४ दूरध्वनी २३८७ १०५० इमेल: moujprakashan@gmail.com

खरेदी करण्यासाठी लागणारे धनिक-उच्च मध्यमवर्गीय दिसतात आणि रेशन दुकानांसमोरच्या रांगाही कमी होत नाहीत. अर्थव्यवस्थेतील ही विकृती आहे.

केंद्रीय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी मुच्युअल फंड व शेअर्समधील गुंतवणूक वाढीसाठी उपाय योजले आहेत. गृहकर्जावरील व्याजदर कमी करण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत. परंतु अतिरिक्त उत्पन्न नसलेल्या व हातावर पोट असलेल्यांचे काय, हा खरा प्रश्न आहे. पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार मंडळाचे अध्यक्ष सी. रंगराजन यांच्या मते, २०१२-१३ मध्ये आर्थिक विकासदर ६-७ टक्के असेल. पण जागतिक आर्थिक स्थिती बिघडल्यास हे आडाखे चुकतील असा इशारा त्यांनी दिला आहे. म्हणजेच आम आदमीचे दरडोई उत्पन्न जेमतेमच असेल, ते वाढण्याची जवळजवळ शक्यता नाही. भाववाढ होतच राहिल्यास उत्पन्न घटणारच आहे. महाराष्ट्रात तर दुष्काळच जाहीर झाला आहे. कमी पावसामुळे डाळींचे भाव वाढतील. हा प्रोटीन शॉक असेल अशी भीती रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर सुबीर गोकर्ण यांनी व्यक्त केली आहे. याचा लोकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होईल.

१९६६ साली लालबहादूर शास्त्रींच्या निधनानंतर इंदिरा गांधी पंतप्रधान झाल्या तेव्हा त्यांनी रुपयाचे अवमूल्यन केले. त्यामुळे आर्थिक अरिष्ट वाढले व महागाईचा भडका उडाला. देश पीएल ४८०च्या चक्रव्यूहात फसू लागला.

तेव्हा धान्योत्पादनात देश स्वयंपूर्ण नव्हता, आज आहे. तरीसुद्धा सामान्यांच्या दृष्टीने परिस्थिती बिकटच आहे. रुपया घसरत आहे व विकासवेगही. पो.पो.पु. म्हणजेच पोकळ पोलादी पुरुष बेनीप्रसाद वर्मा खुशीत आहेत, पण गरिबांच्या झोपडीत मात्र काळोखच आहे.

या पार्श्वभूमीवर चौदा महिन्यांपूर्वी सलवार कमीज परिधान करून दिल्लीतील रामलीला मैदानावरून पोबारा केल्यानंतर रामदेवबाबांनी त्याच ठिकाणावरून केंद्र सरकारला अंतिम इशारा दिला. लोकपाल, भ्रष्टाचार, परदेशातील काळा पैसा, कॅग, केंद्रीय दक्षता आयोग, सीबीआयची स्वायत्तता, निवडणूक आयोगात सुधारणा या संदर्भातील मागणीपत्रच त्यांनी सादर केले. तीन दिवसांत मागण्या मान्य न केल्यास क्रांती होईल, असा इशाराही त्यांनी दिला.

ही रामलीला पाहण्यासाठी लाखो लोक नव्हे, तर २० हजारच हजर होते. अहिंसेची भाषा कळत नसल्यास क्रांतीची भाषाच त्यांना समजावून द्यावी लागेल, असा गर्भित इशाराही त्यांनी दिला. आधी बाबा व अण्णा हजारे यांनी संयुक्तपणे आंदोलन करण्याची घोषणा केली होती, पण रामलीलेवर अण्णा वा त्यांचे सहकारी हजर नव्हते. व्यासपीठावर गांधी, नेहरू, सुभाषचंद्र बोस यांच्या बरोबरीने बाबांचे वादग्रस्त सहकारी बालकृष्ण यांचे छायाचित्र असलेले बॅनर लावले होते.

अण्णांनी जंतरमंतरवरून पोलिटिकल एंट्री मारल्यानंतर बाबांनी रामलीलेवरून चढ्या स्वरात आपणच खरे सुपरस्टार असल्याचा देखावा निर्माण केला. पण अण्णांप्रमाणेच बाबांकडेही दुर्लक्ष करण्याचे सरकारने ठरवले.

मुळात भ्रष्टाचारावर बोलण्याचा बाबांना नैतिक अधिकार नाही. त्यांचे एवढे साम्राज्य कुठून निर्माण झाले? बाबा परदेशातील काळ्या पैशाबद्दल बोलतात, देशातल्या नव्हे. त्यांच्या शिबिरास उपस्थित असणाऱ्या गलेलठ्ठ शेटजींकडचे काळे धन बाबांना दिसत नाही. तसेच भ्रष्टाचार व काळा पैसा हे व्यवस्थेतील दोष आहेत. त्याकरता व्यवस्थेत बदल करावे लागतील. तसेच जनतेलाही बदलावे लागेल. सामान्य लोकही कर चुकवतात व नियम तोडतात; फक्त राजकारणी नव्हे. तेव्हा कररचना व नियम असे हवेत, की भ्रष्टाचार आणि काळा पैसा निर्माण होणारच नाही. हे काम सरकारचे आहे. परंतु खाजगी कंपन्यांतील काळ्या पैशाबद्दल अण्णा व बाबा गप्प असतात. भ्रष्टाचाराचा कहर झाला आहे हे खरेच, पण त्यास सर्वच राजकीय पक्ष जबाबदार आहेत. दुर्दैवाने कोणताच पक्ष निवडणूक सुधारणा व पक्ष कामकाजातील पारदर्शकतेबद्दल आग्रही नाही. सामाजिक आंदोलनांनी त्यासाठी राजकीय पक्षांवर दबाव टाकला पाहिजे. युपीएचे नेतृत्व करणारे सोनिया गांधी व डॉ. मनमोहन सिंग स्वत:हून राजकीय सुधारणा करत नाहीत वा त्यासाठी आग्रही नाहीत. ते जनतेत जाऊन आपले म्हणणेही मांडत नाहीत. त्यामुळे बाबांसारख्या भंपक व्यक्ती जमावाचे नेतृत्व करू लागतात.

दुसरीकडे टीम अण्णाला यशानंतर अपयशाचा सामना करावा लागतो आणि मग कुणाशीही सल्लामसलत न करता अण्णा अकस्मात टीमच बरखास्त करतात. टीमचे नेतृत्व करणे हा अण्णांचा स्वभावच नव्हे. त्यांना संघटना नकोच असते. याचे कारण त्यांचे राजकारण स्वकेंद्री आहे. त्यामुळे चर्चा वगैरे करण्याच्या फंदात न पडता ते निर्णयच घेऊन टाकतात. आताही राजकीय पक्ष बांधताना स्वत: नामानिराळे राहण्याची त्यांची भूमिका आहे. त्यामुळे 'मी संन्यासी आहे, मला सत्तेत राहण्याची भूक नाही', असे सांगता येते. पुन्हा अपयश आल्यास जबाबदारी नाही व यश मिळाल्यास ते माझेच! तेव्हा ट्रकवरून एखाद्या संताच्या थाटात हारतुरे स्वीकारत ते हात वर करून जनतेला शुभाशीर्वाद देतीलच!

देशासाठी बलिदान देण्याकरता आसुसलेल्या अण्णा हजारे व त्याच्या साथीदारांनी कोणतीही मागणी पूर्ण व्हायच्या अगोदरच आपले उपोषण मागे घेऊन, काँग्रेसवाल्यांच्या तुलनेत राजकारणात आपण यत्किंचितही मागे नाही, हे दाखवून दिले. आधी लोकपाल आणा म्हणून उपोषणे झाली. वर्षभरानंतर हाती काही लागले नाही तर 'जोवर केंद्रात १५ भ्रष्ट मंत्री आहेत, तोवर लोकपाल येणारच नाही', असे टीम अण्णाचे चाणक्य अरविंद केजरीवाल सांगू लागले. मग या भ्रष्ट मंत्र्यांच्या भ्रष्ट युपीए सरकारशी यांनी वाटाघाटी का केल्या व इतके दिवस कथित, कलंकित मंत्र्यांना हाकलण्याची मागणी का केली नाही, असा सवाल उत्पन्न झाला.

या पृथ्वीतलावर कोठेही होलसेलमध्ये '१५ मंत्र्यांना बाहेर काढा, त्यांची चौकशी करा' अशी मागणी करण्यात आलेली नाही. त्यापेक्षा सरकारच बरखास्त करा, अशी मागणी करायची. आंदोलन फ्लॉप झाल्यानंतर टीमचे भीष्म पितामह शांतिभूषण यांनी प्रसारमाध्यमांवर त्याचे खापर फोडले. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यातील यशाचे श्रेय माध्यमांना देण्याबाबत शांतिभूषण यांचा उत्साह दिसला नव्हता. परंतु राळेगणबाबांना माध्यमांचे महत्त्व पक्के माहीत आहे. गेल्या वर्षी चॅनेलच्या एकेका पत्रकारास बोलावून वटवृक्षाच्या सावलीत प्रसन्न मुद्रेने मुलाखत देणारे, रिॲलिटी शोज्‌ना, चित्रपटांच्या मुहूर्तांना, आपल्या मेणाच्या पुतळ्याच्या अनावरणाला आवर्जून हजेरी लावणारे अण्णा आपण पाहिले आहेत.

जंतरमंतर रिकामे असताना चॅनेलवाला वा चॅनेलवाली आली, की कॅमेऱ्यात तोंड खुपसणारे लोकही पाहायला मिळाले आहेत. त्यामुळे अण्णा व केजरीवाल यांनी माध्यमांची त्वरेने माफी मागितली. उत्तर भारतातील वीजपुरवठा तुटला तेव्हा आंदोलन उधळून लावण्याचा हा सरकारचा कट असल्याचा आरोप आंदोलनाचे कवी कालिदास कुमार (की सुमार?) विश्वास यांनी केला. 'लोकपाल असता, तर पी. चिदंबरम तुरुंगात असते!' हे अण्णांचे, तर 'लोकपालमुळे प्रणव मुखर्जी राष्ट्रपती होऊ शकले नसते' हे किरण बेदींचे उद्‌गार. लोकपाल असता तर टीम अण्णांचे काही सदस्यही जेलची हवा खात बसले असते, असे कोणी म्हणू शकेल. एखाद्या रेडिमेड अहवालाच्या आधारे बेताल वक्तव्ये करण्याची शर्यत टीममध्ये लागली होती. अण्णांनीच ती बरखास्त करून टाकली!

'लोकपाल आला, तर ६५ टक्के भ्रष्टाचार कमी होईल' या अण्णांच्या विधानास कसलाही आधार नव्हता. एवढ्या साऱ्या यंत्रणा व कायदे असताना देशातील भ्रष्टाचार कैक



पटींनी वाढत आहे. लोकपालचा चेंडू संसदेच्या कोर्टात गेल्यानंतर अण्णा म्हणतात, की आता देशभर जाऊन ग्रामस्वराज्यासाठी झटणार, तरुणांचे मेळावे घेणार, त्यांना प्रशिक्षण देणार. यापैकी काहीच झाले नाही. उलट मी अविवाहित आहे, मी मंदिरात कसा राहतो, मी कसा त्याग केला आहे, सहा-सहा मंत्र्यांना जेलमध्ये धाडले आहे, याची टेप कंटाळा येईपर्यंत ते वाजवत असतात.

अण्णांना महात्मा वा संतपद हवे असेल तर त्यागभावनेच्या उन्मादाचाच त्याग करावा लागेल. संत-महात्म्यांकडे लीनता असते व ते मोजकेच पण मोलाचे बोलतात. शिवाय खोटे बोलत नाहीत. केंद्रीय कायदेमंत्री सलमान खुर्शीद यांच्याशी गुप्त भेट घेऊन अण्णांनी त्यावेळी मान्य केलेल्या गोष्टी नंतर अव्हेरल्या आणि खुर्शीद यांच्यावरच ते टीममध्ये भांडणे लावत असल्याचा आरोप त्यांनी केला. पण टीव्ही अँकरकरता थापर यांना दिलेल्या मुलाखतीत खुर्शीद यांनी अण्णांचे बिंग फोडलेच!

अण्णांनी सुरुवातीला गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी सरकारची तारीफ केली होती. मग त्यांनी मोदींवर दुगाण्याही झाडल्या. रामदेवबाबांनी मोदींची प्रशंसा करताच, इंडिया अगेन्स्ट करप्शनचे संजय सिंग यांनी याबद्दल तीव्र नाराजी प्रकट

केली आहे. रामदेवबाबांच्या व्यासपीठावर जाऊन केजरीवाल यांनी पंतप्रधानांवर केलेली टीका बाबांना रुचली नाही. टीममध्ये व अण्णा-रामदेवबाबा यांच्यातील मतभेदांचा उल्लेख करताच त्यांना 'काँग्रेसचा एजंट' ठरवले जाते.

विविध पक्ष व गट एकत्र येऊन जनता पक्षाची स्थापना झाली, तेव्हा रोजच्या रोज हाणामाऱ्या चालू असत. इकडे मुळात टीम अण्णामध्येच वाद असल्याने त्याचा जनता पक्ष वा जनता दल होऊ नये, अशी अनेकजण प्रार्थना करत होते. राजकीय पक्ष स्थापण्याची घोषणा टीम अण्णाने केली. पण लोकपाल, मतदारांचा नकाराधिकार वगैरे मागण्या मान्य झाल्या असत्या, तर पक्ष स्थापनेचे कारणच उरले नसते असा युक्तिवाद केजरीवाल यांनी केला आहे.

वास्तविक, 'खऱ्या लोकशाहीच्या पोषण-संवर्धनासाठी आम्ही पक्ष उभारत आहोत', असा सकारात्मक विचार का केला जात नाही? चीनमध्ये भ्रष्ट अधिकाऱ्यांना गोळ्या घातल्या जातात व तालिबानी राजवटीत खाबू व अनैतिक अधिकाऱ्यांना फटके मारले जात असत. तरीसुद्धा भ्रष्टाचार कमी झाला नाही. त्यामुळे व्यवस्था परिवर्तनाचा तपशीलवार आराखडा ठरला पाहिजे.

अण्णांनी रामलीला व जंतरमंतरवर उपोषण केले. या सत्संगाच्या वेळी त्यांनी फक्त सरकारवर आरोप केले. भ्रष्टाचार समाजाच्या नसानसांत भिनला आहे, तेव्हा फक्त सरकारला सुधारून पुरेसे नाही, तर प्रत्येकाने स्वत:त बदल घडवले पाहिजेत, हा संस्कार केला गेलाच नाही. आता अधिकृतरीत्या राजकारण करण्यास आरंभ झाल्यावर ही प्रक्रिया सुरू होण्याची शक्यताच नाही. पक्षाचे नाव, जाहीरनामा, विचारसरणी, संघटनाबांधणी व निधीउभारणीच्या सर्व गोष्टी कराव्या लागतील. जात-वर्ग-धर्म-भाषा यांच्या अनुषंगाने येणारे प्रश्न टाळून पुढे जाता येणार नाही.

विसर्जित झालेल्या टीम अण्णाचे अपील मुख्यत: शहरात होते. भ्रष्टाचार व त्यादृष्टीने कराव्या लागणाऱ्या सुधारणा हा फोकस ठेवूनच त्यास काम करावे लागेल. अण्णांना बाळासाहेब ठाकरेंप्रमाणे हातात रिमोट कंट्रोल ठेवल्याचे सुख अनुभवायचे आहे. परंतु ही लढाई अण्णांच्या आत्मिक सुखासाठी चाललेली नसून, आंदोलनासमोर काही तेजस्वी तरुण नेते ठेवावे लागतील. लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीविरुद्ध संघर्ष झाला. काँग्रेसला बाजूला करून जनता पक्षाची सत्ता आल्यानंतर लोकनायकांची उपेक्षा सुरू झाली. हा इतिहास विसरता येणार नाही.

टीम अण्णा हे एकप्रकारे एनजीओचे कडबोळे आहे. एनजीओवाल्यांना क्रांती नको असते. कारण क्रांतीत त्यांचाच बळी जाईल, अशी त्यांना भीती वाटत असते! परंतु टीममध्ये मेधा पाटकरांसारखी काही सत्प्रवृत्त मंडळी आहेत. जनता पक्षात समाजवादी पक्षाचे विलीनीकरण झाले, त्यास अनेकांचा विरोध होता कारण त्यामुळे समाजवादी चळवळ संपली यांचे क्लेश त्यांना होत होते. आता राजकारण सुरू झाल्यावर समाजकारण बाजूला पडेल, म्हणून पक्ष स्थापण्यापूर्वी शंभरदा विचार करावा, असे मेधाताईंनी म्हटले आहे.

उलट, टीम अण्णा म्हणजे काँग्रेसशी लढणारा आपला 'फ्रंट' आहे असे मानून भाजप चालला होता. लढायचे त्यांनी व ओरपायचे आपण अशी भाजपची स्ट्रॅटेजी होती. टीम अण्णाने राजकारणप्रवेशाचा निर्णय जाहीर केल्यापासून भाजपवाल्यांचे चेहरे पडले तर काँग्रेसवाल्यांचे मात्र उजळले! अण्णांचा पक्ष भाजपची मते खाईल व त्याचा आपल्याला लाभ होईल असे काँग्रेसला वाटते आहे.

वास्तविक भ्रष्टाचाराविरोधाची लढाई फक्त केंद्रात नव्हे, तर राज्याराज्यांत, गावागावांत दिली गेली पाहिजे. सगळ्याच राज्यांत 'तटकरे' आणि 'भुजबळ' आहेत. अगदी भाजपशासित गुजरात, मध्यप्रदेश, छत्तीसगडमध्येही या प्रवृत्तींची पाठराखण करणारे 'स्ट्राँगमेन'ही सगळीकडे आहेत. आरटीआय होऊनही परिस्थिती किती वाईट आहे, ते निवृत्त मुख्य निवडणूक आयुक्त शैलेश गांधींना विचारा.

या स्थितीत एक जबाबदार दबाव गट म्हणून टीम अण्णा प्रभावशाली ठरू शकली असती. पक्ष म्हणून तो परिणामकारक ठरणार नाही. किमान राजकीय पक्षांचा अजेंडा बदलवण्यात तो यशस्वी झाला, तरी पुष्कळ होईल.

भ्रष्टाचार घटवण्यासाठी राजकीय, आर्थिक व प्रशासकीय सुधारणा आणाव्या लागतील. भाववाढ कमी होण्यासाठी वस्तूंचा पुरवठा वाढवावा लागेल. देशातील अस्थिर, अराजकी वातावरण निवळण्यासाठी जनतेचा राजकारणातील सहभाग वाढला पाहिजे. केवळ आरोप-प्रत्यारोपाने प्रश्न सुटणार नाहीत, तर ते वाढीसच लागतील.

**हेमंत देसाई**
क-३, गुलमोहर, महापालिका वसाहत,
दा.ग. महाजनी पथ, फातिमा चर्चजवळ,
शिवडी (प.), मुंबई-४०००१५
दूरध्वनी : २४१३५८६४
hemant.desai001@gmail.com

With Best Compliments From

THE MAHARASHTRA ELECTRICAL INDUSTRIES

*Specialist in Maintaince of :*

H. T. & L. T. Switchgears (M.O.C.B., B.O.C.B., SF-6, ACB & V.C.B.)

of any make upto 66 K.V. & Supply of Spares

702, C/4, Apurva Lok Rachana, C.H.S. Ltd., Amar Nagar,
Mulund (W), Mumbai-400 082
Off. : 2596 7840 / 2561 3862 ● Cell : 09820624488
mahaele@yahoo.co.in



With Best Compliments From

# REAL SECURITY SERVICES

Management, Security, Detection & Industrial Labour Services

Regd. Off. : Vandana Cottage, P.O. : J.K. Gram, Carvallo Nagar, Thane-606

Tel. : 022-65101341

# कमर्शिअल ब्रेक!

**रविराज गंधे**

पंचवीसेक वर्षांपूर्वी वृत्तपत्र-रेडिओ-दूरचित्रवाणीमधील जाहिरातींचं प्रमाण १५ ते २० टक्के होतं ते आता ५० ते ६० टक्के इतकं वाढलं आहे. दर पाच-सात मिनिटांनंतर मालिकांमधील 'कमर्शिअल ब्रेक' सुरू होतो अन् प्रेक्षक ट्रॅफिक सिग्नलला थांबल्याप्रमाणे मालिका कधी सुरू होते याची वाट पाहतात. त्या वेळेत पटकन कुकर लावणं-भाजी टाकणं आता गृहिणींच्या अंगवळणी पडलंय. या 'कमर्शिअल ब्रेक'च्या काळात फोन करण्याची, घरात आलेल्यांची दखल घेण्याची लोकांना सवय झालीय.

दूरदर्शनचं प्रक्षेपण महाराष्ट्रात २ ऑक्टोबर १९७२ रोजी सुरू झालं. त्यानंतरचा जवळपास पंधरा ते वीस वर्षांचा काळ दूरदर्शनच्या प्रेक्षकांसाठी बहारीचा अन् मंतरलेला होता. दिल्लीहून प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय प्रक्षेपणातील हिंदी कार्यक्रमांची तर मुंबईहून प्रक्षेपित होणाऱ्या मराठी कार्यक्रमांची अक्षरश: लयलूट असायची. त्याकाळी मध्यमवर्गीयांच्या घरात फ्रीज असणं प्रतिष्ठेचं मानलं जायचं. त्यात टीव्हीची गणना होऊ लागली होती. महाराष्ट्रातल्या घराघरांतून तार शहनाईची दूरदर्शनची आर्त सुरावटींची सिग्नेचर ट्युन घुमायला लागली की संध्याकाळचे सहा वाजले हे आपसूक कळायचं. त्याकाळी संध्याकाळी सहा ते रात्री दहा ह्या काळात मुंबई दूरदर्शनचे संगीत, साहित्य, नाटक, शेती, आरोग्य-कामगार अन् प्रौढ साक्षरताविषयक कृष्णधवल रंगातील विविध मराठी कार्यक्रम प्रसारित व्हायचे. प्रतिभा आणि प्रतिमा, गजरा, ज्ञानदीप, सुंदर माझं घर, युवदर्शन, शब्दांच्या पलीकडले अशा अनेकविध सुंदर कार्यक्रमांनी प्रेक्षकांच्या मनात स्थान मिळवलं होतं. 'अमृतकुंभ' नावाचा संस्कृत भाषेतील साहित्याचं रसग्रहण करणारा एक आगळावेगळा कार्यक्रम प्रसारित व्हायचा. दूरदर्शनवर सादर केल्या जाणाऱ्या मराठी नाटकांचा मोठा चाहतावर्ग होता. ह्या सर्व कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्रातल्या सर्वच क्षेत्रांतल्या नामवंत-प्रतिभावंत कलाकारांचं, लेखकांचं, संगीतकार-गायक अन् कवींचं मोलाचं योगदान होतं.

आजच्या आघाडीच्या अनेक गुणी-लोकप्रिय कलाकारांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात ही दूरदर्शनवरील कार्यक्रमांतून केली. 'किलबिल' ह्या लहान मुलांच्या कार्यक्रमांतून भाग घेणाऱ्या माधुरी दीक्षित, उर्मिला मातोंडकरसारख्या अभिनेत्री, महाभारत मालिकेतील श्रीकृष्णाच्या भूमिकेद्वारे प्रेक्षकांचा चाहता झालेला निवेदक नितीश भारद्वाज, वृत्त-निवेदिका म्हणून काम करणाऱ्या स्मिता पाटील- भक्ती बर्वे यांसारख्या गुणी अभिनेत्री आदी अनेक कलाकारांनी जनमानसावर आपल्या कलागुणांचा ठसा उमटवला.

मला आठवतं, त्यावेळी दूरदर्शनच्या टॉवरजवळ असणाऱ्या मोकळ्या जागेतल्या शेडवजा कॅन्टीनच्या हिरवळीवर अमोल पालेकर, रोहिणी हट्टंगडी, मोहन गोखले, सुरेश वाडकर, शंकर वैद्य, रामदास भटकळ, शाहीर साबळे, दत्ता डावजेकर आदी साहित्य-संगीत आणि नाटक क्षेत्रातील मंडळी चहाचे घुटके घेत निवांतपणे निर्मात्यांशी कार्यक्रमाविषयी चर्चा करताना दिसायची. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या पंडित रविशंकर, बिस्मिल्ला खान, किशोरी अमोणकर, कुमारगंधर्व, वसंतराव देशपांडे अशा दिग्गज मंडळींच्या कार्यक्रमांच्या चित्रीकरणाची धूम असायची. दूरदर्शनच्या बातम्यांना जनमानसात अनन्यसाधारण महत्त्व होतं, अजूनही आहे. अतिरंजित बातम्या न देता वस्तुनिष्ठ वार्तांकन करणं हे दूरदर्शनचं वैशिष्ट्य आजही कायम आहे. त्यामुळे आमीर खानसह लाखो प्रेक्षक दूरदर्शनवरील बातम्या विश्वसनीय मानतात. दिल्लीच्या राष्ट्रीय कार्यक्रमाचं सहक्षेपण सुरू होण्याआधी मुंबई केंद्राहून सुरुवातीच्या काळात मराठीबरोबरच हिंदी आणि इंग्रजी बातम्यांचं प्रक्षेपण व्हायचं. तसंच काही हिंदी-इंग्रजी कार्यक्रमही प्रसारित व्हायचे. मराठी बातम्या वाचणाऱ्या प्रदीप भिडे, भक्ती बर्वे, चारुशीला पटवर्धन, ज्योत्स्ना किरपेकर, वंदना पंडित यांचा मोठा चाहतावर्ग होता. हिंदी-इंग्रजी भाषांतील हरीश भिमाणी, डॉली ठाकूर, सरिता सेठी, सिद्धार्थ काक, लुकू सन्याल आदी वृत्तनिवेदकांना तर स्टार सेलिब्रिटींचा दर्जा होता. त्यांच्या अदांवर फिदा असणाऱ्या प्रेक्षकांची शेकडो पत्रं यायची. मराठीतून प्रसारित होणाऱ्या स्मृतिचित्रे, चिमणराव-गुंड्याभाऊ, श्वेतांबरा ह्या मालिकांची लोक अजूनही आठवण काढतात. त्याकाळी उपलब्ध असलेली यंत्रसामग्री, स्टुडिओजची कमतरता अन् आर्थिक चणचण, अपुरं मनुष्यबळ आदी अडचणींवर मात करत दूरदर्शनच्या हरहुन्नरी निर्मात्यांनी उपलब्ध तंत्रज्ञानाच्या साहाय्यानं दर्जेदार कार्यक्रमनिर्मिती केली होती. आजच्यासारख्या अत्याधुनिक सुविधा, संगणकीय संकलन, डिजिटल इफेक्टस इत्यादी प्रगत तंत्रज्ञान उपलब्ध नव्हतं, पण अशाही परिस्थितीमध्ये काम करण्याची मजा आणि नशा काही औरच होती.


स्मिता पाटील

तेव्हाच्या कार्यक्रमनिर्मितीच्या वेळच्या काही गमतीदार गोष्टी आठवल्या की आजही हसू फुटतं. मराठी चित्रपटसृष्टीला पन्नास वर्षं पूर्ण झाल्यानिमित्तानं एका मोठ्या समारंभाचं आयोजन कोल्हापुरात करण्यात आलं होतं. मुख्यमंत्र्यांसह तमाम मराठी फिल्म इंडस्ट्रीतील दिग्गज मंडळी हजर होती. त्या समारंभाचा एक टीव्ही रिपोर्ट मी तयार केला होता. त्याकाळी १६ एमएमच्या फिल्म कॅमेऱ्याच्या साहाय्यानं बाह्य चित्रीकरण होत असे. समारंभाच्या दुसऱ्याच दिवशी रात्री कार्यक्रमाचं प्रक्षेपण होतं. त्यामुळे घाईनं मुंबईत येऊन आम्ही आठ-दहा तासांत त्याचं संकलन करून रिपोर्ट प्रसारित केला. त्यात एका दृश्यात सुप्रसिद्ध गायक सुधीर फडके हे स्टेजवर भाषण करतायत आणि आपल्याच वाक्यांना खाली पाहुण्यांबरोबर प्रेक्षकांत बसून टाळ्या वाजवतायत असं दृश्य प्रेक्षकांना पाहायला मिळालं! झालं होतं असं, की मुख्य कार्यक्रमाचं संकलन झाल्यावर एडिटरनं नेहमीप्रमाणे ऑडियन्स आणि क्लॅपिंगचे भरपूर शॉट कट करून माझ्या हातात दिले होते. प्रत्येक भाषणांनंतर आम्हाला ते लावायचे होते. प्रक्षेपणाची वेळी अगदी जवळ आल्याने घाईघाईने ते आम्ही लावले. नेमका सुधीर फडक्यांच्या भाषणाला त्यांचाच शॉट चुकून लागला अन् अहो रूपमं। अहो ध्वनि पाहण्याचा योग फडक्यांना आला अन् प्रेक्षकांची हसून मुरकुंडी वळाली! चार्ली चॅप्लीनच्या चित्रपटांमधील एन.जी. शॉट्सची एक फिल्म मी पाहिली होती. ती चित्रपटांसारखीच सरस होती. दूरदर्शनच्या निवेदक, निर्माते-कलाकार-तंत्रज्ञांच्या कार्यक्रमनिर्मितीच्या वेळी अनावधानानं घडलेल्या गमतीजमती अन् फटफजितीचे किस्से अन् प्रसंगांवर एक मनोरंजक कार्यक्रम सहज होऊ शकेल. दूरदर्शनच्या कार्यक्रमांवर लोक इतकं प्रेम करत की असल्या छोट्यामोठ्या चुका त्यांच्या मनात कधीच घर करत नसत.

दूरदर्शनच्या राष्ट्रीय कार्यक्रमातील हिंदी कार्यक्रमांचा



चिमणराव-गुंड्याभाऊ

दिलीप प्रभावळकर आणि बाळ कर्वे

अन् मालिकांचा दबदबा आणि लोकप्रियता प्रचंड होती. रामायण-महाभारत ह्या मालिकांनी घडवलेला इतिहास सर्वांना परिचित आहे. रविवारी सकाळी दहा वाजता संपूर्ण देशभरात कर्फ्यू लागल्यासारखी शांतता त्या मालिकांच्या प्रक्षेपणा-दरम्यान असायची इतकी लोकप्रियता त्या मालिकांनी मिळवली होती. टीव्हीच्या भाषेत सांगायचं तर त्यांचं टीआरपी रेटिंग ६० टक्क्यांच्या वर होतं, जे नंतरच्या काळात कुठल्याच टीव्ही कार्यक्रमाला मिळालं नाही. अगदी अमिताभच्या केबीसीचं रेटिंग १८ टक्क्यांच्या आसपास होतं. श्याम बेनेगल, गोविंद निहलानी आदी दिग्दर्शकांच्या यात्रा, तमस, भारत एक खोज ह्या मालिका तसंच गुलजार यांची 'तेरा पन्ने' (कहानियाँ), कुमार वासुदेवांची, अशोककुमारचं निवेदन असलेली कौटुंबिक मालिका 'हमलोग', प्रिया तेंडुलकरची 'रजनी', 'खानदान' आदी मालिका खूप लोकप्रिय झाल्या होत्या. सिद्धार्थ काक अन् रेणुका शहाणे सादर करत असलेल्या 'सुरभी'ला देशभरातून उदंड लोकप्रियता मिळाली होती. कमलेश्वरांच्या 'परिक्रमा' ह्या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाला मोठा प्रेक्षकवर्ग होता. दूरदर्शनच्या सुरुवातीच्या काळात पु.ल. देशपांडे, सई परांजपे आदी मंडळी निर्माता म्हणून काम करत होती. सत्यजित रे यांच्यासारख्या महान दिग्दर्शकानं मोहन आगाशे आणि साधू मेहेर यांच्या अप्रतिम भूमिका असलेली 'सद्गती' नावाची फिल्म दूरदर्शनसाठी केली होती. चित्रपटविषयक कार्यक्रमांचं तर प्रेक्षकांना इतकं वेड होतं की 'फूल खिले गुलशन गुलशन' ह्या तबस्सुमच्या कार्यक्रमात सहभागी कलाकारांपेक्षा तबस्सुमचा चाहतावर्ग देशभर मोठा होता. ह्या सर्व मंडळींनी दूरदर्शनच्या कार्यक्रमनिर्मितीमध्ये अतिशय मोलाचं-ऐतिहासिक योगदान दिलं होतं. याबद्दल भारतातले तमाम प्रेक्षक त्यांचे आजन्म ऋणी आहेत. कारण असे कार्यक्रम त्यांना नंतर पुन्हा कुठल्याच चॅनेलवर पाहायला मिळाले नाहीत.

१९९० सालानंतर भारतातल्या सर्वच क्षेत्रांत जागतिकीकरणाची-उदारीकरणाची लाट आली. दूरसंचार अन् संगणक क्षेत्रांप्रमाणे ती दूरचित्रवाणी क्षेत्रातही आली. यातून खाजगी दूरचित्रवाणी वाहिन्या उदयाला आल्या. व्यापारी तत्त्वावर चालणाऱ्या ह्या वाहिन्यांच्या प्रभावामुळे चित्रवाणी जगतातील कार्यक्रमांच्या संकल्पना अन् सादरीकरण; तसंच आशय-विषयांच्या तंत्रमंत्रात आमूलाग्र बदल झाला. विविध वाहिन्यांच्या मनोरंजक कार्यक्रम, मालिका आणि न्यूज चॅनेल्समुळे चित्रवाणीचं रूपच बदललं. 'दूरदर्शन'च्या रूपानं अस्तित्वात असलेल्या अभिजात-सकस-कलात्मक-दर्जेदार कार्यक्रमांच्या पर्वाचा अंत झाला. दूरदर्शन आपली परंपरा सांभाळत खाजगी वाहिन्यांशी स्पर्धा करत आजही आपलं अस्तित्व अन् दर्जा राखण्याचा प्रयत्न करत आहे. यातच त्याचं वेगळेपण आहे.

दूरचित्रवाणीच्या आजच्या बदललेल्या स्वरूपाकडे पाहता एक गोष्ट लक्षात येते, की सर्व चॅनेल्स व्यापारातून मनोरंजन करायचं की मनोरंजनाच्या नावानं व्यापार करायचा ह्या द्विधा मनस्थितीत सापडलेले दिसतात. पूर्वीच्या काळी दूरदर्शनवर कार्यक्रम चालू असताना क्वचित प्रसंगी तांत्रिक कारणांमुळे खंड पडला तर 'व्यत्यय' ही कॅप्शन दाखवली

जायची. हा 'व्यत्यय' भविष्यकाळात 'कमर्शियल ब्रेक'च्या रूपात कायमस्वरूपी सिंदबादच्या म्हाताऱ्यासारखा प्रेक्षकांच्या मानगुटीवर बसेल याची अजिबात कल्पना नव्हती. सर्व चॅनेल्स त्याला इतक्या प्रेमानं आपलासा करून वारंवार दाखवतील असं वाटलं नव्हतं. सर्व चॅनेल्सवरील कार्यक्रमांचं बाजारी स्वरूप पाहून प्रेक्षकांना जाहिरातींचे कार्यक्रम आहेत की कार्यक्रमासाठी जाहिराती आहेत हे कळेनासं होण्याइतकी दोघांमधली सीमारेषा धूसर झालीय. नव्वदच्या दशकानंतर अनेक क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर परदेशी गुंतवणूक होऊ लागली त्याप्रमाणे ती मनोरंजन क्षेत्रातही झाली. जेव्हा एखाद्या बाजारपेठेत भांडवल येतं ते त्सुनामीसारखं येतं आणि प्रचलित मूल्यसंस्कृतींना हादरे बसायला लागतात. कारण भांडवलाला कुठला धर्म किंवा संस्कृती नसते. ते आपल्याला हवी तशी संस्कृती निर्माण करतं, करवून घेतं आणि सर्वच गोष्टींचं बाजारीकरण व्हायला लागतं. मनोरंजनक्षेत्रात हेच घडलं. लहानमोठ्या असंख्य दूरचित्रवाणीवाहिन्या आणि रेडिओ स्टेशन्स उदयाला आली. आजमितीला लहानमोठ्या जवळपास ८०० चित्रवाणीवाहिन्या आणि ३५० रेडिओ स्टेशन्स भारत आणि आशियात आपले कार्यक्रम प्रसारित करत आहेत. ह्या क्षेत्रातील वार्षिक आर्थिक उलाढाल जवळपास ३५ हजार कोटींच्या घरातील आहे. ह्यात प्रतिवर्षी १० टक्के वाढ अपेक्षित आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात रेडिओचा वापर नेहरू, सुभाषचंद्र, महात्मा गांधी आदी नेत्यांनी स्वातंत्र्य चळवळीच्या जनजागरणासाठी केला. त्यांच्या देशभक्तीनं भारलेल्या ओजस्वी भाषणांनी भारतीय जनतेच्या हृदयात चैतन्याची लाट निर्माण व्हायची. त्या काळातील वृत्तपत्रंदेखील ध्येयवादानं, स्वातंत्र्यसंग्रामाच्या मंत्रानं झपाटलेली होती. समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा अन् अंधश्रद्धांवर कठोर प्रहार करणारी होती. समाजसुधारणा आणि जनजागरण हे प्रसारमाध्यमाचं ध्येय होतं. स्वातंत्र्यानंतरच्या काळात, आजमितीला आकाशवाणी आणि दूरदर्शनचं योगदान हे मनोरंजनातून लोकशिक्षण ह्या हेतूनं अन् ध्येयधोरणांनुसार होत असे.

आज याच प्रसारमाध्यमांचं स्वरूप आणि संदर्भ बदलून त्यांचं झपाट्यानं सांस्कृतिक व्यापारीकरण झाल्याचं दिसतं. मूळ उद्देशापासून ती भरकटून दिशाहीन झाली. सवंग, उथळ, बिनडोक, बाजारी, गल्लाभरू मनोरंजनाच्या गदारोळात ती आपलं सौंदर्य घालवून बसली. त्याची कारणमीमांसा होणं गरजेचं आहे. गेल्या अडीच-तीन दशकांमध्ये एक महत्त्वाचा सामाजिक बदल झालेला दिसतो. हा बदल सर्वसामान्य



**एका रविवारची कहाणी – 'पु.ल. देशपांडे आणि नीलम प्रभू**



**फूल खिले गुलशन गुलशन**
**तबस्सुम आणि फारुख शेख**

माणसाच्या जीवनशैलीत आणि मानसिकतेत झाला आहे. उदारीकरणाच्या लाटेमुळे नोकरी-व्यवसायाच्या अनेक वैविध्यपूर्ण संधी उपलब्ध झाल्यानं मध्यमवर्गाच्या हातात पैसा खुळखुळायला लागला. त्याची क्रयशक्ती वाढली. काटकसर करून जीवन जगणाऱ्या, गरजेपुरत्या गोष्टी विकत घेणाऱ्या मध्यमवर्गातील माणसांचा कल नवनवीन गोष्टी घेण्याकडे, मौज-चंगळ करण्याकडे वाढू लागला. आपण क्वालिटी लाइफ जगावं अन् क्वालिटी टाइम घालवावा असं वाटू लागलं. चकचकीत काचेआडची मंद सुगंधाची अन् थंड गारव्याची आकर्षक मंत्रमुग्ध करणारी मॉल्सची मायानगरी त्याला खुणावू लागली. एकीकडे मध्यमवर्गीयांच्या मानसिकतेत बदल होतानाच दुसरीकडे ऑटोमोबाईल, गारमेंट, कॉस्मेटिक, इलेक्ट्रॉनिक उपकरणं, फूड-ग्रेन, बँकिंग, इन्शुरन्ससारख्या आर्थिक सेवा, रियल इस्टेट आदी असंख्य उद्योगांमध्ये विदेशी भांडवलाचा महापूर लोटायला सुरुवात झाली. ह्या उद्योगांसाठी आवश्यक अशा मेहनती-कुशल कामगारांची, बुद्धिमान तंत्रज्ञांची-तज्ज्ञांची, मॅनेजर्सची मोठी फळी देशात तयार झाली. भरपूर मेहनताना अन् पे पॅकेजस देऊन बाजारपेठेची गरज म्हणून ती तयार केली गेली. त्यातून मध्यमवर्गाची वाटचाल ही नवश्रीमंत मध्यमवर्गाकडे सुरू झाली. बाजारपेठेनं त्यांच्याकडील पैसा पुन्हा आपल्याकडे खेचणं गरजेचं होतं आणि म्हणून त्याच्या साध्याभोळ्या, पापभीरू वृत्तीला चंगळवादी बनवण्यात आलं आणि तो स्टेटस सिम्बॉल म्हणून, मजा म्हणून किंवा बदल म्हणून त्याच्या राहणीमानावर तो पैसा खर्च करू लागला. चैनीच्या अन् अनावश्यक गोष्टींवर उधळपट्टी होऊ लागली. बाजारपेठेनं त्याला जगभर तयार झालेल्या वस्तू विकत घेण्याची सवय लावली अन् सामान्य माणूस उत्पादकांच्या जाळ्यात अलगद अडकला.

त्याला ह्या चक्रात अडकवायला दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमांचा मोठाच हातभार लागला. कारण बाजारपेठेची गरज म्हणून टीव्हीवरील कार्यक्रम, कार्यक्रम न राहता तो एक प्रॉडक्ट झाला. बाजारपेठेचं बेलगाम, तर्कहीन प्रमोशन ह्या चित्रवाणीच्या चौकटीतून होऊ लागलं. टीव्हीच्या जाहिरातीत दिसणारं जग आपल्या घरात आलं पाहिजे, जगता आलं पाहिजे असं प्रत्येकाला मनापासून वाटू लागलं. म्हणूनच की काय, कार्यक्रमापेक्षा लोक जाहिराती लक्षपूर्वक पाहू लागले. त्या लोकप्रिय होऊ लागल्या अन् आपला हेतू साधण्यात सफल झाल्या. 'कमर्शिअल ब्रेक' प्रेक्षकांच्या अंगवळणी पडला. ह्या जागतिक बदलामध्ये काही चांगल्या गोष्टी घडल्या. आपला समाज हळुहळू अर्थसाक्षर व्हायला सुरुवात झाली. ठेविले अनंते तैसेचि राहावे... अशा संतशिकवणीचा प्रभाव ओसरू लागला. जगाच्या स्पर्धेच्या बाजारपेठेत उभं राहायचं असेल तर आपल्यातलं उत्तमातलं उत्तम देणं गरजेचं आहे हे त्याला जाणवलं. आपल्याला सर्वांगीण प्रगती करायची असेल तर काळाशी सुसंगत ज्ञान आणि तंत्र अवगत करण्याची गरज त्याला भासू लागली. त्याच्यात एक स्पर्धात्मक जिद्द अन् महत्त्वाकांक्षा निर्माण झाली. त्यातून त्याच्या जगण्याचा स्तर उंचावला आणि दूरचित्रवाणीसारख्या प्रसारमाध्यमांनी विविध अंगांनी हेतुपूर्वक त्याला नव्या जगाची ओळख करून दिली हे नाकारता येणार नाही.

आज शास्त्रीय संगीत, साहित्य, नृत्यनाट्य, चित्रकला-शिल्पकला इत्यादी कुठल्याच अभिजात विषयावरचे कार्यक्रम टीव्हीवर होत नाहीत. गेल्या काही दशकांमध्ये दूरचित्रवाणी माध्यमाला प्रेक्षक आणि कार्यक्रमनिर्मिती या अनुषंगाने टीव्हीसाक्षरता लाभणं गरजेचं होतं. त्या अंगानं ह्या माध्यमाची प्रगती न झाल्यानं ती आशय-विषयापासून भरकटली. कारण बाजारपेठेला फक्त वस्तू विकायच्या आहेत आणि सुंदर, मोहमयी, कल्पक परिणामकारक जाहिराती बनवायच्या आहेत. ज्या कार्यक्रमांच्या संकल्पनेत-सादरीकरणात कंपन्यांच्या वस्तूविक्रीला वाव नाही आणि प्रेक्षकांचा टीआरपी नाही. त्यांना प्रायोजक मिळत नाहीत हे मोठंच दुर्दैव आहे. त्यामुळे आज दूरचित्रवाणी वाहिन्यांवर भंपक, निर्बुद्ध मनोरंजनाची संकल्पना असलेल्या उथळ कार्यक्रमांचा महापूर लोटला आहे. नाच-गाण्यांच्या रिॲलिटी शोजूचं इतकं बेसुमार पीक वाढलं, की जणू काही भारतातील सगळी जनता कामधंदे सोडून नाचायला अन् गायला लागली की काय असं वाटायला लागलं. ज्या देशातल्या कोट्यवधी लोकांना एका वेळचं जेवणही धड मिळत नाही त्या देशातले लोक एकदम देशी-विदेशी पाककृती शिकायला अन् खायला लागले. या अन् अशा असंख्य सवंग कार्यक्रमांतून पुन्हा पुन्हा प्रेक्षकांना जाहिरातीद्वारे दिवसरात्र कपडे, सौंदर्यप्रसाधने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, कार्स, घड्याळं, बाईक खरेदी करण्याचं आवाहन करण्यात येऊ लागलं.

हे कमी पडतंय असं वाटल्यानं मालिकेच्या-कार्यक्रमांच्या सेलिब्रिटी कलाकारांच्या तोंडून संवादरूपानं खास दृश्याद्वारे विशिष्ट प्रॉडक्टची सरळ-उघड जाहिरात करायची प्रथा पडली. मालिकेतील पात्रं अमुक-अमुक कंपनीच्या आइस्क्रीमच्या फ्लेवर्सची भलावण करू लागली तर जावा-नणंदा एक विशिष्ट शाम्पू वापरल्यानं केस कसे तजेलदार राहतात हे एकमेकींना सांगू लागल्या. कुठलाच सांस्कृतिक संदर्भ नसलेला भाकडपणा सर्वत्र पसरताना दिसू लागला. उत्पादक, विक्रेते अन् ग्राहक यांनी आपल्या सर्वशक्तीनिशी बाजारपेठेच्या ह्या महाचक्राला कायम गतिमान ठेवण्याचा कसोशीनं प्रयत्न केल्यानं साहजिकच त्याचा परिणाम दूरचित्रवाणीच्या कार्यक्रमांच्या दर्जावर झाला. प्रसारमाध्यमात दिवसेंदिवस वाढत जाणारा प्रायोजकांचा अन् जाहिरातदारांचा हस्तक्षेप-अधिग्रहण ही मोठी चिंतेची बाब झाली. पंचवीसेक वर्षांपूर्वी वृत्तपत्र-रेडिओ-दूरचित्रवाणीमधील जाहिरातींचं प्रमाण १५ ते २० टक्के होतं ते आता ५० ते ६० टक्के इतकं वाढलं आहे. जाहिराती दाखवून किंवा वाजवून झाल्यानंतर उरलेल्या जागेत अन् वेळेत भलेबुरे कार्यक्रम करण्याची प्रवृत्ती बळावू लागली. दर पाच-सात मिनिटांनंतर मालिकांमधील 'कमर्शिअल ब्रेक' सुरू होतो अन् प्रेक्षक ट्रॅफिक सिग्नलला थांबल्याप्रमाणे मालिका कधी सुरू होते याची वाट पाहतात. त्या वेळेत पटकन कुकर लावणं-भाजी टाकणं आता गृहिणींच्या अंगवळणी पडलंय. ब्रेकच्या काळात फोन करण्याची, घरात आलेल्यांची दखल घेण्याची लोकांना सवय झालीय. चित्रविचित्र मालिका मंत्रमुग्ध होऊन पाहणाऱ्या कुटुंबाच्या घरात अनाहूतपणे जाणं अपराधीपणाचं वाटू लागलंय. छोट्या-मोठ्या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या वेळा लोकप्रिय मालिकांच्या वेळेनुसार ॲडजस्ट व्हायला लागल्या अन् प्रेक्षकांच्या ह्या व्यसनाधीन मानसिकतेचा जाहिरातदार जास्तीत जास्त फायदा करून घेऊ लागले अन् कार्यक्रमांचा टीआरपी वाढायला लागला. त्रुटित जीवनी सुटी कल्पना ही संकल्पना 'कमर्शिअल ब्रेक'मुळे जनमानसात रुजली अन् ती आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक झाली.

एक काळ असा होता की खरंच काही बातम्या घडल्या तर त्या टीव्हीवर-रेडिओवर सांगितल्या जायच्या. रेडिओवरच्या दिल्लीहून प्रसारित होणाऱ्या ५ मिनिटांच्या राष्ट्रीय बातम्यांना मोठी प्रतिष्ठा होती. त्याकाळी न घडलेल्या, घडू शकणाऱ्या किंवा घडावं असं वाटणाऱ्या बातम्यांचं दळण दळण्याची पद्धत नव्हती. दूरचित्रवाणीवरील न्यूज चॅनेल्सविषयी बोलाल तेवढं थोडं आहे. घडलेली बातमी त्वरेनं 'आँखो देखा हाल'च्या रूपात प्रेक्षकापर्यंत पोचवण्याची सर्वांत मोठी किमया न्यूज चॅनेल्सनी साधलीय. आणीबाणीसदृश परिस्थितीमध्ये न्यूज चॅनेल्सनी मोलाची कामगिरी बजावली आहे. या संदर्भातील न्यूज चॅनेल्सची उपयुक्तता अन् प्रभाव वादातीत आहे. परंतु एरवी २४ तास काय दाखवायचं हा मोठाच प्रश्न चॅनेलपुढे असतो. मग अशा वेळी खड्ड्यामध्ये पडलेल्या प्रिन्सचं दोन दिवस थेट प्रक्षेपण होऊ लागतं. दहीहंडी, छटपूजा, चेटी चाँद, विठ्ठलपूजा, गणपती-साईबाबांच्या मंदिरातल्या आरत्यांचं थेट प्रक्षेपण होऊ लागतं. प्रत्येक छोट्या-मोठ्या सण-उत्सवांचा इव्हेंट केला जातो. सेलिब्रिटीज बोलावले जातात. जिथं गर्दी तिथं प्रायोजक या नात्यानं तेही हजर होतात. सण-उत्सवातलं मांगल्य-शुचिर्भूतता जाऊन भाविकांच्या भावनांचं पुन्हा पुन्हा व्यापारीकरण केलं जातं. सामाजिक दृष्ट्या गंभीर अशा प्रसंगी अनेक वेळा प्रसारमाध्यमं बेजबाबदारपणे वागताना दिसतात. कसाब अन् त्यांच्या साथीदारांनी ताजमहाल हॉटेल आणि अन्य ठिकाणी केलेल्या दहशतवादी हल्ल्याचं केलेलं थेट प्रक्षेपण हा त्याचा नमुना. कसाबला फाशीची शिक्षा सुनावताना, दूरचित्रवाणी

वाहिन्यांनी घटनेचं गांभीर्य न ओळखता प्रक्षेपण करून पोलिस आणि सुरक्षायंत्रणांना अडचणीत आणल्याचा आरोप नुकताच सर्वोच्च न्यायालयानं केला आहे. अण्णा हजारेंच्या वेळी मीडियानं ताळतंत्र सोडून उठवलेलं वादळ किती लाजिरवाणं आणि निरर्थक होतं हे जनतेसमोर आलं. अनेक वेळा न्यूज चॅनेल्सवर एखाद्या राजकीय नेत्याच्या सवंग लोकप्रियतेच्या मिषानं केलेल्या स्टेटमेंटवर किंवा महिलांनी तोकडे कपडे घालावे की घालू नये याविषयी तज्ज्ञ-निरीक्षक म्हणून आमंत्रित केलेल्या लोकांच्या चर्चा-मुलाखतीचं रटाळ गुऱ्हाळ आपण पाहतो. काही वेळा वृत्तवाहिन्यांच्या संपादक-प्रतिनिधींना एखादी घटना घडण्यापूर्वीच अंतर्ज्ञानाने ती घडणार असल्याचे समजते आणि कॅमेरा युनिट घटना घडण्यापूर्वीच तेथे पोचते. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना, कलाक्षेत्रातील ज्या व्यक्ती मीडियामध्ये सेटींग/फिल्डिंग लावण्यात माहीर असतात ती 'माध्यमतज्ज्ञ' म्हणून ओळखली जाऊ लागतात. प्रेक्षकही अशा नौटंकीत करमणूक म्हणून एन्जॉय करतात. वृत्तवाहिन्याचं बातमीमूल्य संपून रंजनमूल्य वाढलं की जाहिराती मिळायला लागतात. २४ तास चॅनेल चालवायचं म्हटलं की हे अपरिहार्य ठरतं. अर्थात सर्वच न्यूज चॅनेल्सवर सदा सर्वकाळ असं चित्र दिसतं असं नव्हे. बऱ्याच वेळा टीव्ही चॅनेल्स जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांविषयी, दैनंदिन समस्यांविषयी, अन्याय-अत्याचारा-विषयी सर्व अंगानं जनतेचं जनजागरण आणि दिशादर्शन करताना दिसतात. अनेक सामाजिक-स्थानिक प्रश्न धसास लावून लोकप्रतिनिधी आणि प्रशासनावर दबाव यशस्वीपणे आणण्याचा प्रयत्न करतात हे खरं. परंतु असं अपवादानं आढळतं. बऱ्याच वेळा टीआरपी मिळवण्यासाठी सबसे तेज होण्याच्या शर्यतीत उत्साहाचं अतिरेकी वारं चॅनेल्सच्या अंगात शिरतं आणि ते स्वत:च लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून असणारं गांभीर्य अन् प्रतिष्ठा गमावून बसतात आणि म्हणूनच दूरचित्रवाणी माध्यमाची सामाजिक उद्रेक अन् अशांतता, दहशतवाद निर्माण करण्याची सुप्त ताकद लक्षात घेऊन प्रेस काउन्सिल ऑफ इंडियाचे अध्यक्ष काटजू यांनी प्रेस, सोशल नेटवर्किंगसह इलेक्ट्रॉनिक मीडियादेखील प्रेस काउन्सिलच्या अधिकारात यावा अशी मागणी केली आहे. न्यूज चॅनेल्स आजमितीला भांडवलदारांच्या पर्यायानं बाजारपेठेच्या हातात आहेत. त्यामुळे ते नफा-तोट्याच्या चक्रात गुंतल्यामुळे ध्येयवादी समाजाभिमुख पत्रकारितेपासून दूर गेलेत. बातम्यांव्यतिरिक्त प्रेक्षकांनी आपल्याशी कायम 'कनेक्ट' राहावं म्हणून न्यूज चॅनेल्स प्रेक्षकांचं मनोरंजनही करू लागले. ज्योतिष-भविष्य, रेसिपीज्, हेल्थ टिप्स, फिल्मी गॉसिप, फॅशन शो, पर्यटन आदि लोकांना आवडणाऱ्या अनेकविध विषयांवर कार्यक्रम सादर करू लागले. जाहिराती मिळवण्यासाठी अशा पद्धतीचे कार्यक्रम करणं गरजेचं वाटू लागलं.

आजच्या अपरिहार्य अशा एका वेगवान अन् अटळ अर्थकारणात आजची सारी प्रसारमाध्यमं अकडली आहेत. आपला चेहरा शब्द-सूर-ताल-लय आणि सय हरवून बसली आहेत. माणसाची जीवनशैली कितीही बदलली तरी अभिजात, सुंदर आणि उत्कट जीवनस्पर्शी आनंदाची-अनुभवाची त्याची तहान कायम असते/असावी. ह्या सर्व गोष्टींचा निखळ आनंद दूरचित्रवाणीवरील प्रायोजक आणि चॅनेल आपली टोकाची व्यापारीवृत्ती बाजूला ठेवून किंवा किंचित कमी करून प्रेक्षकांना देतील काय? अर्थात हे होणे नाही. प्रायोजकांच्या 'कमर्शिअल ब्रेक'च्या मगरमिठीतून प्रेक्षक आणि चॅनेल दोघांचीही सुटका नाही. अगदी प्रेक्षक ब्रेकडाऊन होईपर्यंत!

माध्यमतज्ज्ञांनी एक असं भाकीत केलं आहे, की २०५०च्या आसपास संगणकीय तंत्रज्ञानाचा विकास आणि त्याचा माणसांच्या दैनंदिन जीवनातील वापर इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेला असेल की एकत्र बसून टीव्ही पाहणं ही संकल्पना आणि सवय मागे पडलेली दिसेल. सर्व प्रकारचे आयफोन, संगणकीय सेवासुविधा पुरवणारे स्मार्ट फोन, टॅब पीसी, मोबाईल इत्यादींचा आज होणारा व्यक्तिगत वापर ही भविष्यकाळाची नांदी म्हणता येईल. अर्थात माणसानं कुठलीही उपकरणं अन् माध्यमं वापरली तरी 'कमर्शिअल ब्रेक' काही त्याचा पिच्छा सोडणार नाही. तसं पाहिलं तर माणूस अन् टीव्हीवरचा 'कमर्शिअल ब्रेक' हे एकमेकांना पूरक आणि प्रेरक आहेत असंच म्हणावं लागेल. कारण आजच्या स्पर्धेच्या बाजारपेठेत टिकून राहण्यासाठी माणूस एकसारखा स्वत:ला प्रुव्ह करत असतो. आपलं स्टेटस दाखवण्याच्या आणि राखण्याच्या नादात आज माणसानं स्वत:लाच आपली एक चालती-बोलती जाहिरात करून टाकलंय. ह्या जाहिरातीपासून तो आपली सुटका कशी करून घेणार?

**रविराज गंधे**
५८/८ वसंतस्मृती,
पांडुरंगवाडी, दुसरी गल्ली,
गोरेगाव (पूर्व), मुंबई-४०००६३
भ्रमणध्वनी : ९८२०३७८४४८
ravirajgandhe@gmail.com

The Right Chemistry for a Brighter Tomorrow

*With Best Compliments From*

**AARTI INDUSTRIES LIMITED**

Manufactures and Exporters of
Benzene based intermediates, Bulk Pharmaceuticals; Agrochemicals;
Speciality Chemicals and Sulphuric Acid & Allied Products

**Head Office :** 'Udyog Kshetra', 2nd floor, Mulund-Goregaon Link Road,
Off. L.B.S.Marg, Mulund (W), Mumbai-400 080
Phone : 6797 6666 / 2591 8195 ● Fax : 2590 4806

**Factory & Regd. Office :** Plot No. 801, 801/23, GIDC Estate, Phase-III,
Vapi-396 195, Dist. Valsad
Phone : 0260 2400059 / 2431306 ● Fax : 0260 2401322

**ग्रंथाली आणि मुद्रण सुविधा केंद्राचे तीन कवितासंग्रह**




**अरूपाचे रूप**

**माणिक गुट्टे**

मूल्य १२५ रुपये
सवलतीत ७५ रुपये



**कवडसे**

**महेश केळुस्कर**

मूल्य ७० रु.
सवलतीत ४० रु.



**ओळखीची वाट**

**नीला सत्यनारायण**

मूल्य १५० रुपये
सवलतीत ९० रुपये

# दोन दिग्गजांची टक्कर!

**डॉ. माधवी मेहेंदळे**

मायकेलअॅन्जेलोने जीवनाच्या विविध टप्प्यांवर अनेकविध कविता केल्या. प्रेमकविता, शारीरिक सौंदर्यावरच्या कविता तर आहेतच, त्याचबरोबर त्याचे आध्यात्मिक व तत्त्वचिंतनात्मक लिखाण भरपूर आहे. कलाकाराने अभिव्यक्तीसाठी सर्व माध्यमे वापरली तर तो परिपूर्ण होतो असे त्याला वाटे. तो कट्टर धर्मनिष्ठ, देवावर श्रद्धा असणारा व देशप्रेमी होता. लिओनार्दोची प्रतिभाही बहुढंगी होती. पण मायकेलअॅन्जेलोप्रमाणे साहित्य, धर्म व इतिहास यात त्याला विशेष रुची नव्हती. तो वैज्ञानिक होता. मोनालिसा, द लास्ट सपर, व्हर्जिन अँड चाइल्ड विथ सेंट अॅन, मॅडोना ऑफ द रॉक ही त्याची मोजकी जगप्रसिद्ध चित्रे.

मायकेलअॅन्जेलो ब्युनारोती व लिओनार्दो दा विंची ही कलाक्षेत्रातील दोन भलीमोठी व्यक्तिमत्त्वं! उच्च प्रबोधनकाळ म्हणजेच रेनेसान्स कालखंडाचे आधारस्तंभ! दोघांना जाऊनही आज अनेक शतकं लोटली तरी आजही पृथ्वीच्या पाठीवर रोज त्यांचे नाव अनेक ठिकाणी कुठे ना कुठे घेतले जाते. ते जिथे कुठे आज असतील तिथे त्यांना स्वत:लादेखील एवढ्या शतकांनंतरही काळाबरोबर विस्मृतीत न जाता लोक आपली एवढ्या तीव्रतेने आठवण ठेवतात हे बघून गंमत वाटत असेल.

ती दोघे एकाच कालखंडातील होती का? त्यांनी एकत्र काम केले का? त्यांचे आपापसातील नाते कसे होते? एकमेकांविषयी आकस होता की मैत्री होती? असे अनेक प्रश्न कुतूहलापोटी आपल्याला पडत असतील.

लिओनार्दोचा कालखंड १४५२ ते १५१९ तर मायकेलअॅन्जेलोचा १४७५ ते १५६४. म्हणजे लिओनार्दो मायकेलअॅन्जेलोपेक्षा २३ वर्षांनी मोठा. दोघेही इटलीतील फ्लॉरेन्स शहरातले. लिओनार्दो सदुसष्टाव्या वर्षी मरण पावला तर मायकेलअॅन्जेलो जवळजवळ ९० वर्षं जगला. असामान्य प्रतिभा असलेल्या या दोघा कलावंतांची व्यक्तिमत्त्वे मात्र वेगवेगळी होती.

मायकेलअॅन्जेलोचा जन्म एका प्रतिष्ठित घराण्यातला. घराणे प्रतिष्ठित असले तरी सांपत्तिक स्थिती खालावलेली होती. वडिलांना कलेमध्ये कुठलीही रुची नव्हती. उलट हाताने करण्याचे कुठलेही काम त्यांना हलक्या दर्जाचे वाटे. त्यामुळे मायकेलअॅन्जेलोला कलेचे शिक्षण देण्यासाठी व कलाकार होण्यासाठी त्यांचा सक्त विरोध होता. मायकेलअॅन्जेलोच्या वडिलांना फक्त पैशांची भाषा कळत होती. कितीतरी वर्षे मायकेलअॅन्जेलो एकीकडे कमावत होता आणि दुसरीकडे सर्व पैसे वडिलांना पाठवत होता. वडिलांची पैशांची मागणी न संपणारी होती. कधी त्यांची खालावलेली सांपत्तिक स्थिती सुधारण्यासाठी तर कधी नवीन धंदा सुरू करण्यासाठी मायकेलअॅन्जेलो स्वत: अतिशय हलाखीच्या परिस्थितीत



**लिओनार्दो दा विंची व मायकेलअॅन्जेलो ब्युनारोती**

राहून वडिलांना पैसे पुरवत राहिला.

लिओनार्दो आपल्या वडिलांचा अनौरस पुत्र होता. वडील मोठ्या पोस्टवर तर आई अतिसामान्य कामगार घरातील. त्याकाळी अनौरस पुत्र असणं समाजमान्य होते. पहिली पाच वर्षे लिओनार्दो आईच्या घरी राहिला. आईचं लग्न झाल्यानंतर तो वडिलांकडे आला. त्यामुळे त्याला मातृवियोग झाला. मायकेलअॅन्जेलोची आई तो सहा वर्षांचा असताना वारली त्यामुळे त्यालाही त्याच्या लहानपणीच मातृवियोग झाला. कदाचित त्यामुळे दोघांच्या कलानिर्मितीत त्यांना 'आईचा शोध' असल्याचे जाणवते.

मायकेलअॅन्जेलोने चित्रकला शिकायला त्याच्या वडिलांचा विरोध होता याउलट लिओनार्दोचे चित्रकलेतील सुप्त गुण ओळखून त्याच्या वडिलांनी त्याला आपणहून त्याकाळच्या सुप्रसिद्ध कलाकाराकडे - व्हेरोशिओकडे शिकायला पाठवले. फ्लॉरेन्स शहरात त्या काळात कलेला अनुकूल काळ होता. कलाकार होऊन लिओनार्दो चांगले पैसे कमावू शकेल असा हिशोब लिओनार्दोच्या वडिलांनीही केला असावा.

मायकेलअॅन्जेलोचा मोठ्या घराण्यातील औरस जन्म यापुढे स्वत:चे अनौरस असणे लिओनार्दोला कुठेतरी खटकत असावे असे वाटते. वेळोवेळी मायकेलअॅन्जेलोने त्याच्या वडिलांना पाठवलेली पत्रे बघून मायकेलअॅन्जेलोला आपल्या कुटुंबीयांविषयी जबाबदारी, आपुलकी, प्रेम शेवटपर्यंत निश्चित वाटत होते असे दिसते. वडिलांनी त्याला लहानपणापासून त्रास दिला तरी स्वत: उपाशी राहून तो वडिलांना पैसे पाठवत राहिला.

लिओनार्दोच्या बाबतीत मात्र तसे म्हणता येणार नाही. त्याच्या कुटुंबीयांविषयी त्याला ओलावा होता असे निदर्शनास आणणारे त्याचे कुठलेही लिखाण उपलब्ध नाही. त्याची आई तिच्या वृद्धापकाळी लिओनार्दोकडे राहायला आली असावी असे काही ठिकाणी म्हटले आहे.

हे दोघेही कलावंत असामान्य व चौफेर प्रतिभा असलेले होते. मायकेलअॅन्जेलो नावारूपाला यायला लागला तोपर्यंत लिओनार्दो कीर्तीच्या शिखरावर होता. लिओनार्दो अतिशय देखणा व प्रसन्न व्यक्तिमत्त्वाचा होता. त्याचे संभाषणचातुर्य विलक्षण होते. तो उंची पेहरावामुळे अधिक आकर्षक दिसायचा. त्याच्या अवतीभवती कायम मित्रमंडळी, शिष्य, चाहते यांची वर्दळ असायची. त्याचा शिष्य वासारी म्हणतो– 'He was marvellously endowed by heaven with beauty, grace and talent in such abundance that he

left other men far behind.'

मायकेलअ‍ॅन्जेलो याच्या अगदी उलट होता. स्वत:विषयी त्यात न्यूनगंड होता. १४-१५व्या वर्षी मित्राशी झालेल्या भांडणात, मित्राने त्याच्या नाकावर ठोसा लगावला होता. त्यामुळे त्याचे नाक बसके व वाकडे झाले होते. यामुळे मायकेलअ‍ॅन्जेलोच्या न्यूनगंडात भर पडली. त्याच्या दृष्टीने काम करणे म्हणजेच कलानिर्मिती करणे हे सर्वांत महत्त्वाचे होते. तो कामात एवढा मग्न व आनंदी असायचा की त्याला जेवणासाठी व झोपण्यासाठी काम थांबवावे लागते याचे वाईट वाटायचे. त्यामुळे अर्थातच त्याचे इतर कशाकडेही लक्ष नसायचे. स्वत:चे कपडे, दिसणे, खाणेपिणे; कशातच त्याला रस नव्हता. कित्येक दिवसांत आंघोळ केलेली नाही, कपडे कसेतरी. त्यावर संगमरवराची धूळ माखलेली. सिस्टिन चॅपेलचे काम करताना तो एवढे भान हरपून करत होता, की एके ठिकाणी म्हटले आहे, 'त्याने सात दिवस बूटही पायातून काढले नव्हते. त्याच्या नोकराने बूट काढले तर ते पायाच्या त्वचेसकट निघाले.'

तो एकलकोंडा होता. बहुतांश वेळी एकटाच काम करायचा. त्याला त्याचे मित्र म्हणायचे, 'तू तरुण असूनही जरा मौजमजा का करत नाही - सारखा काम काय करत बसतोस?' त्यावर तो म्हणाला, 'मला मौजमजा करणं आणि काम करणं यातील फरकच कळत नाही. माझ्या दृष्टीनं काम करणं म्हणजेच मौजमजा करणं.'

मायकेलअ‍ॅन्जेलो व लिओनार्दो दोघांनीही लग्न केले नव्हते. त्यांना काही मूलबाळही नव्हते. दोघेही समलिंगी संबंध ठेवणारे असावे, असे इतिहासावरून वाटते. समलिंगी संबंध ठेवणे फ्लॉरेन्समध्ये प्रचलित असावे. कारण त्याकाळी 'फिरन्झर' हा शब्द समलिंगी संबंध ठेवणाऱ्या व्यक्तींसाठी सर्रास वापरला जात होता. (फ्लॉरेन्सला तिथे फिरंझी म्हटले जाते.) लिओनार्दोची कुठलीही वैयक्तिक कागदपत्रे म्हणजे पत्रे, डायरी, नोंदी उपलब्ध नाहीत. जी काही आहेत ती सर्व त्याकाळची ऑफिशियल कागदपत्रं आहेत. त्याची कामाची असंख्य टिपणे आहेत. त्याच्या सुरुवातीच्या काळात त्याच्यावर सोडोमी (अनैसर्गिक लैंगिक संबंध) केल्याबद्दल कोर्टात केस दाखल केल्याची नोंद आहे. सालई व मेत्झी नावाचे त्याचे दोन विद्यार्थी त्याच्याजवळ बरीच वर्षे राहिले. मेत्झी लिओनार्दोबरोबर अखेरपर्यंत होता. त्यांच्यातील नाते नक्की कोणत्या प्रकारचे होते याचे तर्क लढवले गेले आहेत.

मायकेलअ‍ॅन्जेलोच्या आयुष्यात पुरुष व स्त्रिया दोघेही येऊन गेले असावेत. फ्लॉरेन्सचा राजकीय नेता लॉरेन्झो



'The Last Judgement'

मेडिचि त्याचा आश्रयदाता होता. त्याची मुलगी कॉन्टेसिना मायकेलअ‍ॅन्जेलोच्या आयुष्यात तरुणपणात काही काळ असावी. 'टोमासो' नावाचा एक सुंदर तरुण मुलगा मायकेल-अ‍ॅन्जेलोबरोबर शेवटपर्यंत होता. त्याच्यावरील प्रेमावर व त्याच्या शारीरिक सौंदर्यावर जवळजवळ साडेतीनशे कविता (सॉनेटस्) मायकेलअ‍ॅन्जेलोने लिहिल्या. एका पुरुषाने दुसऱ्या पुरुषाच्या प्रेमावर एवढ्या कविता लिहिल्याचे इतिहासातील हे एकमेव उदाहरण असावे. त्या कवितांतील लिंग बदलून नंतरच्या काळात त्या प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला गेला. कालांतराने त्या त्यांच्या मूळ स्वरूपात प्रसिद्ध झाल्या.

त्याच्या आयुष्याच्या उत्तरार्धात जेव्हा तो 'The Last Judgement' चित्र पुरे करत होता, तेव्हा त्याची मैत्री व्हिटोरिया कोलोना या स्त्रीशी झाली. व्हिटोरिया उत्तम कवयित्री होती. बुद्धिमान व कट्टर धर्मनिष्ठ होती. धार्मिक व तत्त्वज्ञान विषयात ती अनेक चर्चा घडवून आणायची. मायकेलअ‍ॅन्जेलो त्यात सहभागी असायचा. व्हिटोरियाला अनेक पत्रे मायकेल-अ‍ॅन्जेलोने लिहिली. तीही त्याला उत्तरे लिहायची. तिच्यासाठी त्याने अनेक रेखाटने, चित्रे केली. 'The Last Judgement' चित्रातल्या मेरीचा चेहरा व्हिटोरियाचा आहे.

मायकेलअ‍ॅन्जेलो व लिओनार्दो दोघांच्याही प्रतिभेला

अनेक पैलू होते. जरी मायकेलॲन्जेलो प्रामुख्याने शिल्पकार व लिआनार्दो प्रामुख्याने चित्रकार असला तरीही.

चित्रकला, शिल्पकला आणि वास्तुकला या तिन्ही कलांमध्ये प्रावीण्य असणे कदाचित तेव्हा अपेक्षितच होते. धनिकांची प्रासादे निर्माण करायला, सजवायला तसेच चर्चेस, बॅसिलिका सजवायला तिन्हीची जाण असणे गरजेचे होते. शिल्पकाराला रेखाटनासाठी चित्रकला येणे आवश्यक होतं तसेच शिल्प उभे राहावे, कोसळू नये यासाठी स्थापत्यकलेची जाण असणेही आवश्यक होते. स्थापत्यकाराला चित्रकला व शिल्पकलेची जाण नसेल तर तो फक्त निर्जीव भिंती उभ्या करू शकतो असे म्हणायचे. या दोन्ही दिग्गजांना या तिन्ही कलांत तर अत्युच्च गती होतीच, शिवाय त्यांची प्रतिभा विविध क्षेत्रांत चौफेर बहरली होती.

मायकेलॲन्जेलोची बॅकस्, डेव्हिड, मोझेस यांसारखी शिल्पे त्याच्या दैवी प्रतिभेची साक्ष आहेत. सिस्टिन चॅपेलच्या छतावरची त्याची पेंटिंग त्याचे चित्रकलेतील कसब दाखवतात. सेंट पिटर्स बॅसिलिकाचा घुमट त्याच्यातील स्थापत्यकाराचे दर्शन घडवतो.

मायकेलॲन्जेलो उत्तम कवी होता. जीवनाच्या विविध टप्प्यांवर त्याने अनेकविध कविता केल्या आहेत. प्रेमकविता, शारीरिक सौंदर्यावरच्या कविता (sonnets) तर आहेतच, त्याचबरोबर त्याचे आध्यात्मिक व तत्त्वचिंतनात्मक लिखाण भरपूर आहे. कलाकाराने अभिव्यक्तीसाठी सर्व माध्यमे वापरली तर तो परिपूर्ण होतो असे त्याला वाटे. तो कट्टर धर्मनिष्ठ, देवावर श्रद्धा असणारा व देशप्रेमी होता.

लिओनार्दोची प्रतिभाही बहुढंगी होती. पण मायकेल-ॲन्जेलोप्रमाणे साहित्य, धर्म व इतिहास यात त्याला विशेष रुची नव्हती. तो वैज्ञानिक होता. मोनालिसा, द लास्ट सपर, व्हर्जिन अँड चाइल्ड विथ सेंट ॲन, मॅडोना ऑफ द रॉक ही त्याची मोजकी जगप्रसिद्ध चित्रे.

मायकेलॲन्जेलोला संगमरवराची उत्तम पारख होती. उच्च दर्जाचा संगमरवर मिळवण्यासाठी दुर्गम ठिकाणी डोंगरात मायकेलॲन्जेलोने स्वत: रस्ता तयार केला. युद्धकाळात फ्लॉरेन्सची तटबंदी अभेद्य राखण्याची जबाबदारी त्याला दिली गेली होती. फ्लॉरेन्समधल्या महत्त्वाच्या मोठ्या इमारती युद्धात नष्ट होऊ नयेत म्हणून त्यांच्या संरक्षणाची जबाबदारीही मायकेलॲन्जेलोने काही काळ स्वीकारली होती. त्याने इमारतीभोवती मोठाल्या गाद्या/आवरणे गुंडाळून त्यांचे संरक्षण केले. सिस्टिन चॅपेलच्या ६० फूट उंचीच्या छतावर पेंटिंग करण्यासाठी कसे पोचायचे हा प्रश्न होता तेव्हा त्याने स्वत: सांगाड्याचे डिझाईन केले व तसा तयारही केला.

लॉरेन्झो मेडिचीच्या महालात मायकेलॲन्जेलो तरुणपणी काही काळ राहिला. तिथे अनेक साहित्यिक, तत्त्वचिंतक, राजकारणी, आध्यात्मिक नेते यांची मैफल जमायची व चर्चा व्हायच्या. त्या सर्वांचा मायकेलॲन्जेलोवर खूप प्रभाव पडला. 'दान्ते' या प्रसिद्ध कवीच्या 'The divine



सिस्टिन चॅपेल

comedy'ची पारायणं मायकेलअॅन्जेलोने केली होती. त्याच्या अनेक चित्रांवर The divine comedy चा प्रभाव आहे. दान्तेच्या 'Inferno' काव्याचा त्याच्या The Last Judgement वर प्रभाव आहे.

एकदा फ्लॉरेन्समध्ये एका चौकात लिओनार्दोची काही मित्रांशी चर्चा सुरू होती. त्याला मित्रांनी आग्रह केला, की दान्तेच्या एका काव्याचा अर्थ सांग. तेवढ्यात तिकडून मायकेलअॅन्जेलो चालला होता. लिओनार्दोला मायकेल-अॅन्जेलोला दान्ते संपूर्ण माहिती आहे हे माहीत होते. तो म्हणाला, 'तो बघा मायकेलअॅन्जेलो चालला आहे, आपण त्यालाच दान्तेबद्दल विचारूया.' लिओनार्दो उपरोधाने म्हणाला का हे माहिती नाही पण मायकेलअॅन्जेलो एकदम उखडला व म्हणाला, 'लिओनार्दो, तूच सांग अर्थ. तू तोच आहेस ना ज्याला स्फोर्झाचा ब्रॉन्झचा पुतळा करायला जमला नाही आणि त्यामुळे मिलानमधून हाकलून दिले!' लिओनार्दो चपापला आणि गप्प राहिला.

लिओनार्दो जेवढा कलावंत होता, तेवढाच वैज्ञानिकही होता. त्याची प्रतिभाही अनेक क्षेत्रांत बहरली होती. तो पराकोटीच्या दर्जाची अपेक्षा सर्व क्षेत्रांत करत असावा. त्यामुळे आपल्या आश्रयदात्याला तिष्ठत ठेवणे, कबूल केलेले काम पुरे न करणे असे त्याने अनेक वेळा केले. सतत विविध प्रयोग केल्यामुळे त्याने केलेली बरीच कामे खराब झाली, अपुरी राहिली, काही नष्ट झाली.

शरीरशास्त्र, खगोलशास्त्र, वनस्पतिशास्त्र, जिओलॉजी, गणित, भूमिती, ऑप्टिक्स, संगीतशास्त्र अशा अनेकविध क्षेत्रांत लिओनार्दो पारंगत होता. युद्धात वापरल्या जाऊ शकतील अशा शस्त्रांचे व इतर अनेक मशिन्सचे डिझाइन लिओनार्दोने कागदावर चितारले होते. खोलातून पाणी उपसण्याचे मशीन, नदीचा प्रवाह सुनियंत्रित करण्याचे मार्ग त्याने सुचवले होते.

'मोनालिसा' व 'द लास्ट सपर' यांसारखी मोजकी पण अजरामर पेंटिंग्ज लिओनार्दोने केली. त्याने शिल्पकलेत मात्र फारसे काम केलेले नाही. मिलानमधील स्फोर्झा राजवटीसाठी त्याला अश्वारूढ स्फोर्झाचा पुतळा करण्याचे काम मिळाले. लिओनार्दोने तो पुतळा एवढा भव्य करण्याचा ठरवला की त्याला तो पुरा करता आला नाही. त्यासाठीच मायकेल-अॅन्जेलोने त्याला उपरोधाने टोकले होते.

लिओनार्दोची अनेक रेखाटने, ड्राफ्ट्स उपलब्ध आहेत. लिओनार्दोचा परिप्रेक्ष्याचा अभ्यास होता. उभे-आडवे दोरे ठरावीक अंतरावर ताणून-मांडून, त्याची चौकट तयार करायची. पुढे मॉडेल बसवायचे. तशीच चौकट कागदावर आखून चित्र काढायचे असे परिप्रेक्ष्याचे तंत्र त्याने विकसित केले. वनस्पतिशास्त्रावरची त्याची रेखाटने सर्व बारीकसारीक तपशिलासकट अचूक असायची.

'द लास्ट सपर'मधल्या ख्रिस्ताच्या चेहऱ्याचा शोध लिओनार्दोला कितीतरी काळ लागलाच नव्हता. त्याच्या रंगलेपनातील प्रयोगांमुळे चित्र टिकू शकले नाही. त्या चित्राची नंतरही परवड झाली.

'व्हिट्रुव्हियन मॅन' हे त्याने काढलेले रेखाचित्र मायकेल-अॅन्जेलोच्या 'अॅडम अँड गॉड'इतके जगमान्य चिन्ह बनले आहे. चौकोन व गोलात एकावर एक दोन मानवाकृती चितारल्या आहेत. ते व्हिट्रुव्हियस नावाच्या रोमन आर्किटेक्टच्या मूळ कल्पनेवर आधारीत आहे. मनुष्यदेहाचे गणिती प्रमाण सिद्ध करणारी ही संकल्पना आहे.

हेलिकॉप्टर, सौर ऊर्जा, कॅलक्युलेटर, बॉबिन इत्यादी अनेक डिझाइन्स त्याने शोधली व कागदावर उतरवली. त्यापैकी बोटावर मोजण्याएवढी प्रत्यक्षात उतरली. बाकी





**लिओनार्दोची व्हिट्रुव्हियन मॅन आणि उडणारे यंत्र ही रेखाचित्र**



लिओनार्दोने काढलेले व्यक्तिचित्र

कागदावरच राहिली.

लिओनार्दोमध्ये प्रचंड क्षमता होती. ती सर्वच प्रत्यक्षात उतरली नाही. एखाद्या कलाकाराने काय केले यापेक्षा तो काय करू शकला असता या शक्यतेवर एवढी प्रसिद्धी व मान्यता मिळालेला हा एकमेव कलाकार व वैज्ञानिक असावा.

फ्रान्सच्या राजाच्या मनोरंजनासाठी त्याने चालू शकणारा एक असा सिंह बनवला होता, की ज्याची छाती एक कळ दाबली की उघडली जायची व त्यातून फुलांचा गुच्छ बाहेर यायचा. मायकेलॲन्जेलो हा प्रकार बघून उद्विग्न झाला होता. त्याच्या मित्राने त्याला समजावले होते, की 'लिओनार्दोच्या बाह्यरूपावर जाऊ नको. तो एक संशोधक-वैज्ञानिक आहे. त्याची कोणत्याही राज्याप्रती, व्यक्तिप्रती, धर्माप्रती निष्ठा नाही. त्याला फक्त प्रयोग करायचे असतात.'

मायकेलॲन्जेलोचा जेवढा देवावर विश्वास होता तेवढा लिओनार्दोचा नव्हता. त्याचा निसर्गावर व विज्ञानावर जास्त विश्वास होता.

दोघेही उजव्या व डाव्या दोन्ही हातांनी तेवढ्याच सफाईने काम करू शकायचे. लिओनार्दोची कितीतरी वैज्ञानिक टिपणे उलट्या हाताने व उलट्या क्रमाने लिहिली आहेत; जी आरशात बघितल्यावर सरळ होतात. असे म्हणतात विज्ञानावर जास्त निष्ठा दाखवल्याबद्दल पोपचा राग ओढवला जाईल म्हणून त्याला न कळण्यासाठी लिओनार्दोने अशाप्रकारे टिपणे लिहिली होती.

आपल्या कलेत कुठलीही त्रुटी राहू नये व कलेत जिवंतपणा यावा यासाठी दोघांनीही त्या काळाच्या रुढीविरुद्ध जाऊन, प्रसंगी देहांताच्या शिक्षेचा धोका पत्करून शवविच्छेदन केले होते. त्यामुळे त्यांची चित्रे व शिल्पे सचेतन होती. अत्युच्चतेचा ध्यास दोघांचाही सारखाच होता.

मायकेलॲन्जेलोने नुकतेच 'डेव्हिड'चे शिल्प पूर्ण केले होते. त्याच कालावधीत त्याने इतर छोट्या-मोठ्या शिल्पांच्या जबाबदाऱ्या स्वीकारल्या होत्या व पूर्णही केल्या होत्या. 'डेव्हिड'च्या निर्मितीमुळे तो सर्वोत्तम शिल्पकार आहे हे फ्लॉरेन्समध्ये व इतरत्र सिद्ध झाले होते. लिओनार्दो हा एकच कलाकार असा होता ज्याची कीर्ती व प्रतिष्ठा अजूनही मायकेलॲन्जेलोपेक्षा मोठी होती. त्यात डेव्हिड पूर्ण झाल्यावर तो कुठे ठेवावा हे ठरवण्यासाठी एक कमिटी नेमली गेली. त्यात लिओनार्दोला आमंत्रण देण्यात आले, ते त्याने तटस्थपणे स्वीकारले. मायकेलॲन्जेलोला अर्थातच या सगळ्याची सल होती. लवकरच लिओनार्दोशी एक कलाकार म्हणून आमनेसामने टक्कर द्यायची संधी त्याला मिळाली.

मायकेलॲन्जेलोच्या मनात लिओनार्दोविषयी प्रचंड असूया व राग होता, याची अनेक तर्कशुद्ध व अतर्क्य कारणे सांगितली गेली आहेत. मायकेलॲन्जेलोच्या मनात फ्लॉरेन्सविषयी, आपल्या मायभूमीविषयी, फार प्रेम होते व अभिमान होता. फ्लॉरेन्सच्या इतर नागरिकांच्या मनातही तसाच अभिमान असावा अशी त्याची अपेक्षा होती. लिओनार्दो फ्लॉरेन्समध्ये जन्मला असूनही तो अनेक वर्षे मिलानमध्ये राहिला. तेथील स्फोर्झा घराण्याशी इमानदार राहून त्यांची चाकरी केली. स्फोर्झा घराण्यातील तेव्हाचा राज्यकर्ता अनेक राजकारणी डावपेच खेळून, त्यायोगे फ्लॉरेन्सला त्रास देत होता. सीझर बोर्जिया या मिलानच्या जुलमी सेनापतीकडे लिओनार्दोने मुख्य सैन्याधिकारी म्हणून काम केले. सीझर बोर्जिया व त्याच्या सैन्याकडून तर फ्लॉरेन्सवर आक्रमणाचा थेट धोका होता.

मायकेलॲन्जेलोच्या दृष्टीने लिओनार्दोने केलेला हा सरळ सरळ देशद्रोह होता. त्याच काळात स्फोर्झा घराण्यातील शाही विवाहसोहळा आयोजित करण्याची संपूर्ण जबाबदारी लिओनार्दोला दिली गेली. ती त्याने स्वीकारलीही. वधूची वेशभूषा तयार करण्याची जबाबदारीही लिओनार्दोची. राणीच्या जंगी स्वागताची व त्यासाठी रस्ते, घरे, उंची भरजरी वस्त्रांनी सजवण्याची जबाबदारीही लिओनार्दोची. मायकेलॲन्जेलोला हे काही समजण्यासारखेच नव्हते. सच्च्या

कलाकाराने कलानिर्मिती करण्याचे दैवी काम करणे सोडून इतर गोष्टी करण्यात वेळ का घालवावा असे त्याला वाटे. त्यामुळे लिओनार्दोचे फ्लॉरेन्सच्या विरुद्ध वागणे व शत्रूपक्षाने दिलेल्या फालतू गोष्टी स्वीकारणे त्याला रुचले नाही. लिओनार्दो स्वत:ची काही मूल्ये नसलेला संधिसाधू माणूस आहे असे त्याला वाटत होते.

या सर्वांवर कडी म्हणजे लिओनार्दो जाहीरपणे शिल्पकलेपेक्षा चित्रकला-पेंटिंग श्रेष्ठ दर्जाची कला आहे असे ठासून सांगायचा. मायकेलॲन्जेलो शिल्पकलेचा सच्चा चाहता होता. लिओनार्दोच्या अशा वक्तव्याने त्याचा संताप व्हायचा. मायकेलॲन्जेलोच्या कलाशिक्षणाची सुरुवात वयाच्या तेराव्या वर्षी घिरलँडीओ या फ्रेस्को चित्रकाराकडे झाली. पण तेव्हापासूनच आपल्याला शिल्पकला शिकायची आहे, चित्रकला हे आपले क्षेत्र नाही हे त्याला पक्के माहीत होते. जसजसे तो पुढे शिकत गेला तसतसे चांगले रेखाटन करणे महत्त्वाचे आहे हे त्याला पटत गेले. पण चांगले रेखाटन येणे हे ध्येय नसून ध्येयापर्यंत पोचण्याचा तो मार्ग आहे असे त्याच्या लक्षात आले. म्हणजेच चांगली शिल्पकला येण्यासाठी चांगली चित्रकला येणे महत्त्वाचे आहे. चांगले रेखाटन शिल्पासाठी दिशादर्शक आहे. शिल्पकाराला अंधारात चाचपडायला लागू नये म्हणून लावलेल्या पणतीसारखे ते आहे. प्रत्येक शिल्प करताना मायकेलॲन्जेलो त्याची सर्व बाजूंनी, सर्व कोनांतून असंख्य रेखाटने करायचा. नंतर मातीमध्ये व मेणामध्ये त्याचे मॉडेल करून नंतर प्रत्यक्ष संगमरवरात शिल्प.

'डेव्हिड' हे जगप्रसिद्ध शिल्प मायकेलॲन्जेलोने ज्या संगमरवरी शिळेत केले ती १७ फूट उंचीची शिळा फ्लॉरेन्समध्ये जवळजवळ ३० वर्षे तशीच पडून होती. फ्लॉरेन्समधील पदाधिकाऱ्यांनी त्यावर काम करण्याची व शिल्प करण्याची लिओनार्दोला विनंती केली. त्याने जाहीरपणे शिल्पकला ही चित्रकलेपेक्षा हीन दर्जाची कला आहे म्हणून मी हे काम करणार नाही असे प्रतिपादन केले. मायकेलॲन्जेलो या वक्तव्यावर संतापला होता. त्याचे हात त्या शिळेवर काम करण्यासाठी शिवशिवत होते, पण लिओनार्दोची प्रतिष्ठा तेव्हा जास्त असल्याने त्याला पहिल्यांदा विचारणा करण्यात आली. त्याने 'नाही' म्हटल्याने मायकेलॲन्जेलोला ते काम मिळाले.

शिल्पकला विरुद्ध चित्रकला हा वाद तेव्हा भलताच चिघळला. शिल्पकला निसर्गाच्या जास्त जवळची आहे. निसर्गातल्या सर्व वस्तू त्रिमितीत असतात. तशीच शिल्पकला त्रिमितीत असते. शिल्पकला जास्त चिरस्थायी आहे,



मायकेलॲन्जेलोचे जगप्रसिद्ध 'डेव्हिड' हे शिल्प

टिकणारी आहे. आग लागली, भूकंप आला तर पेंटिंग नष्ट होते. याउलट हजारो वर्षांपूर्वीची शिल्पे तशीच टिकून आहेत व राहतात. पेंटिंग करताना चूक झाली तर पुन्हा त्यावर रंगवून चूक कितीही वेळा सुधारता येते. शिल्पकलेत चूक होऊन चालत नाही. त्यामुळे शिल्पकाराला चित्रकारापेक्षा कितीतरी अधिक पटींनी अचूक काम करावे लागते. फसलेले भाग शिल्पात पुन्हा जोडता येत नाहीत. शिल्पकाराचे काम जास्त कठीण आहे. चित्रातल्या माणसाभोवती फिरता येते का? नाही! कारण चित्र निसर्गाचा एक फसवा आभास आहे.

याउलट लिओनार्दो म्हणायचा शिल्पकलेला माध्यमाच्या मर्यादा आहेत. चित्रकलेचे माध्यम जास्त प्रवाही, लवचीक आहे. त्याला विषयाचे बंधन नाही. आकाशातले बदलते रंग, ढगांचे आकार, पाण्याचा खळखळणारा प्रवाह हे शिल्पात दाखवता येत नाही. शिल्प करायला फक्त ताकद लागते. एकदा कोणते शिल्प करायचे ते ठरले की काहीच विचार करावा लागत नाही. म्हणूनच शिल्पकला एक यांत्रिक कला आहे. पेंटिंग करताना मात्र सतत अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. त्रिमितीचा आभास, परिप्रेक्ष्य निर्माण करावे लागते.

शिवाय, शिल्पकाम करताना अंगाला प्रचंड धूळ

लागते, कपडे खराब होतात. घाम गाळावा लागतो. एखाद्या श्रमिक माणसाने करायचे ते काम वाटते. लिओनार्दो म्हणाला, मी माझे उंची कपडे जराही खराब न करता पेंटिंग करू शकतो. शिल्पकाम करताना कपडे फारच खराब होतात.

हे सर्व ऐकून मायकेलॲन्जेलोच्या मनात संताप खदखदत राहिला यात काही नवल नाही. लिओनार्दोचा फ्लॉरेन्सविरुद्ध देशद्रोहीपणा, शिल्पकलेला हीन समजणे ही कारणे तर होतीच, शिवाय त्याचबरोबर लिओनार्दोचे देखणेपण, उंची कपडे, संभाषणचातुर्य, मित्रमंडळींचा गराडा, आश्रयदात्याचे प्रेम याउलट स्वत:च्या चपट्या नाकाचा न्यूनगंड, गलिच्छ, गबाळे कपडे, एकलकोंडेपणा यामुळेही असूया दाटली होती. लिओनार्दोशी टक्कर घेण्याचा एकच मार्ग होता तो म्हणजे तो स्वत:ही लिओनार्दोएवढी चांगली किंवा त्यापेक्षा अधिक दर्जाची चित्रकला व पेंटिंग करू शकतो हे दाखवून देणे.

त्यामुळे तशी संधी आल्याबरोबर मायकेलॲन्जेलोने ती घेतली. फ्लॉरेन्समधल्या मोठ्या काउन्सिल हॉलचे नूतनीकरण करण्याचे फ्लॉरेन्सच्या पदाधिकाऱ्यांनी मनावर घेतले. त्यासाठी हॉलच्या एका भिंतीवर फलकचित्र – फ्रेस्को– पेंटिंग करण्यासाठी लिओनार्दोला पाचारण करण्यात आले. तेव्हा 'मोनालिसा' व 'द लास्ट सपर' या चित्रांमुळे तो एक कुशल कलाकार म्हणून ओळखला जात होता. फ्लॉरेन्सचा गौरवशाली इतिहास दर्शवतील असे चित्राचे विषय निवडायचे होते. लिओनार्दोने विषय निवडला– 'Battle of Anghiari' या युद्धात फ्लॉरेन्सच्या सैन्याने झटापटीत मिलानच्या सैन्याला धूळ चारली होती. १५०४च्या सुरुवातीला लिओनार्दोने पूर्ण आकाराच्या कागदावर बारकाव्यांसकट रेखाटने करण्यास सुरुवात केली. भिंतीवर काढता येईल असा आराखडापण काढायला सुरुवात केली. लिओनार्दोचा घोड्यांच्या ॲनॉटॉमीचा अभ्यास दांडगा होता. त्याचा पुरेपूर वापर त्याने या चित्रात केला. खवळलेले, क्रुद्ध झालेले गतिमान घोडे त्याने कुशलतेने दाखवले.

लिओनार्दोला दिल्या गेलेल्या काउन्सिल हॉलच्या भिंतीसमोरची भिंत मायकेलॲन्जेलोला फ्रेस्को रंगवायला

**Copy of 'Battle of Anghiari' by Leonardo**



दिली गेली. पेंटिंग माझं क्षेत्र नाही असं एरवी ठासून सांगणाऱ्या मायकेलॲन्जेलोने यावेळेस मात्र असे काही न म्हणता मिळालेल्या संधीचे सोने करायचे ठरवले. त्याने विषय निवडला 'Battle of Cascina' फ्लॉरेन्सचे सैनिक आर्नो नदीमध्ये आंघोळ करत असतात. त्यावेळेस अचानक शत्रूचे आक्रमण झाल्याची बातमी येते. मायकेलॲन्जेलोचा चित्र रेखाटनाचा आवडता विषय होता– नग्न पुरुषदेह – तेही वेगवेगळ्या कोनांत–अंशात वळलेले. पुरुषदेहाचं सौंदर्य रेखाटनातून खुलवण्यात तो तरबेज होता. सैनिक आंघोळ करण्यासाठी नदीवर आलेले म्हणजे नग्न असणार. त्यात शत्रूच्या आक्रमणाची बातमी आल्याने त्यांची धांदल उडते. कुणी कपडे घालायला वाकलेले, कुणी शस्त्र उचलत आहेत, कुणी नदीतून बाहेर येत आहेत. म्हणजे पुरुषदेहाचे नाट्य त्यात पुरेपूर रंगलेले होते. लिओनार्दोपेक्षा जवळजवळ आठ महिने उशिरा त्याने काम सुरू केले, पण झपाटल्यासारखे केले. उशिरा सुरू करून तो लिओनार्दोच्या पुढे गेला. दोघांचे काम बघायला लोकांची रीघ लागली. अर्धवट झालेली चित्रे दिङ्मूढ होऊन लोक बघत होते. दोघांची ती चित्रं म्हणजे साऱ्या फ्लॉरेन्सचा अभिमानाचा व कौतुकाचा विषय होता. दोघांची कामाची पद्धत निराळी होती. लिओनार्दोचे काम सावकाश, थांबून थांबून होते तर मायकेलॲन्जेलोचं प्रचंड आवेगाने काम होते.

शिल्पकलेबद्दल लिओनार्दोला जरी अनास्था असली तरी त्याच्या चित्रात भरीवता, गोलाई दिसू लागली होती. त्याची रेखाटने शिल्पकारासाठी सचेतन वाटू लागली होती. असे म्हणतात, की हा मायकेलॲन्जेलोचा लिओनार्दोवर झालेला प्रभाव असावा.

चित्रे बघायला येणाऱ्या गर्दीमध्ये रेनेसान्सचा तिसरा आधारस्तंभ नवशिका राफाएल पण होता. त्याच्याही शैलीवर मायकेलॲन्जेलोचा प्रभाव पडला.

लिओनार्दोने त्याच्या प्रयोगशील स्वभावामुळे तैलरंगात नवीन प्रयोग केले. त्यामुळे चित्राचा बराचसा भाग खराब झाला. तैलरंग खाली ओघळले. एकमेकांत मिसळले, मात्र चित्राचा उरलेला भागही अप्रतिम होता. त्याच्यातल्या अत्युच्च कलाकाराची चुणूक त्यात दिसते. त्या काळाबद्दल कुणीतरी लिहून ठेवलेय की 'ती दोन चित्रे म्हणजे साऱ्या जगाची चित्रकलेची शाळा होती.' कितीतरी कलाकार त्यावरून शिकले–अभ्यास केला. मायकेलॲन्जेलो ते चित्र कधीच रंगवू शकला नाही. त्याला रोमहून पोपचे तातडीचे बोलावणे आहे. पोपची आज्ञा नाकारण्याची कुणालाच प्राज्ञा नव्हती. मायकेलॲन्जेलोला चित्र तसेच टाकून निघावेच लागले. लिओनार्दोने चित्र खराब झाल्यामुळे कधीच काम थांबवले होते.

१५०५ ते १५१२ एवढा काळ दोन्ही अर्धवट चित्रे कौन्सिल हॉलमध्ये होती. पुढे कुणीतरी असूयेने

**Copy of 'Battle of Cascina' by Michelangelo**



मायकेलअॅन्जेलोचे चित्र फाडून टाकले आणि कौन्सिल हॉलच्या नूतनीकरणाच्या वेळेस लिओनार्दोचे चित्रही नष्ट झाले. दोन जागतिक दर्जाच्या कलाकारांच्या स्पर्धेत नुकसान मात्र रसिकांचे झाले.

आज दोन्ही मास्टर कलाकृती उपलब्ध नाहीत. त्यांच्या इतर कलाकारांनी केलेल्या प्रतिकृती मात्र उपलब्ध आहेत. त्यावरून चित्रांच्या दर्जाची आपण कल्पना करू शकतो.

Battle of Cascina जरी अर्धवट राहिले तरी आपले चित्रकलेतील कसब नंतर काही वर्षांनी मायकेलअॅन्जेलोने सिस्टिन चॅपेलच्या छतावर निर्विवाद सिद्ध केले. त्याचे जवळजवळ १२००० चौरस फुटांचे ६० फूट उंचीवर एकहाती केलेलं असामान्य काम बघायला आज ५०० वर्षांनंतरही जगाच्या कानाकोपऱ्यातून लोकांची रीघ लागते.

मायकेलअॅन्जेलोच्या सिस्टिन चॅपेलवर केलेल्या अप्रतिम कामाविषयी लिओनार्दोच्या दोन प्रकारच्या प्रतिक्रिया सांगितल्या गेल्या आहेत. एक म्हणजे– 'मायकेलअॅन्जेलोने या कामात अचूकतेची परिसीमा एवढी गाठली आहे, की त्याच्यानंतरच्या कलाकारांना याच्यापुढे जाऊन काही काम या विषयावर करायचे असेल तर विरूपीकरणाखेरीज पर्याय नाही.'

दुसरी म्हणजे, 'स्नायू व हाडांना यात एवढे महत्त्व दिले गेले आहे की निर्माण झालेली कला निर्जीव व यांत्रिक व्हायचा धोका संभवतो.'

मायकेलअॅन्जेलो व लिओनार्दो या दोघांनाही आदर्शवादाचा, पूर्णत्वाचा, अचूकतेचा पराकोटीचा ध्यास होता. दोघेही स्वत:समोर एवढे उच्च उद्दिष्ट ठेवायचे की त्यांना ते गाठणे शक्य व्हायचे नाही. दोघेही त्यामुळे स्वत:विषयी असमाधानी असायचे. लिओनार्दोची रोममध्ये काहीशी उपेक्षा झाली. मृत्युसमयी तो फ्रान्समध्ये होता. त्याच्या वैयक्तिक भावभावना, नाती यासंबंधी एक गूढ कायम राहिले.

मायकेलअॅन्जेलो त्याच्या अंतिम काळात म्हणाला होता– 'I regret that I have not done enough for the salvation of my soul and that I am dying just as I am beginning to learn the alphabet of my profession.'

नव्वद वर्षे भरभरून, अत्युच्च दर्जाचे काम केलेले कलाकार असे म्हणतो! केवढा हा विरोधाभास.

स्वत:विषयी असमाधानी असले तरी मायकेलअॅन्जेलो व लिओनार्दो या दोघांनीही जगाला मात्र भरभरून दिले.

**डॉ. माधवी मेहेंदळे**
प्रकाश डोळ्यांचे हॉस्पिटल
डेक्कन जिमखाना, पुणे-४
दूरध्वनी : (०२०) २५६७७७५५
भ्रमणध्वनी : ९८९०९०४१२३
madhavimehendale@gmail.com




जर्मनी
आणि
सौदी अरेबियातील
सांस्कृतिक जीवन
सांगणारी पुस्तके




**आठवणींच्या जगात**
जर्मनीतील तीन तपांचा अनुभव
**निरुपमा प्रधान-सोनाळकर**
**मूल्य ३०० रुपये • सवलतीत १८० रुपये**

**सोन्याच्या धुराचे ठसके**
पावशतकी सौदी अनुभव
**डॉ. उज्ज्वला दळवी**
**मूल्य २७५ रुपये, सवलतीत १६० रुपये**

# दुर्भागी देशप्रेमी

**उमेश कदम**

''...अंगुझा, माझी चूक मला उमगली आहे. मी तुझी माफी मागत आहे. माझी काही लोकांनी दिशाभूल केली होती. ती आता स्पष्ट झाल्यामुळे मी तुझ्याकडे क्षमेची याचना करण्यासाठी स्वतः इथे आलो आहे,'' असे म्हणून अध्यक्ष मोबुटू यांनी दूरवर उभ्या असलेल्या जेलरला बोलावून घेतले व त्याला अंगुझांच्या कोठडीचे कुलूप काढायला लावले. अंगुझांचा या साऱ्या प्रकारावर विश्वासच बसत नव्हता. अंगुझा कोठडीतून बाहेर आल्यावर अध्यक्षांनी त्यांना कडकडून मिठी मारली.

मोईस शोम्बे आपल्या प्रशस्त बंगल्याच्या हिरवळीवर सकाळचा चहा घेता घेता त्या दिवशीचे वर्तमानपत्र वाचत होते. तारीख होती १ नोव्हेंबर १९४५. दुसरे महायुद्ध संपून ५–६ महिने झाले होते, तर संयुक्त राष्ट्रसंघ अस्तित्वात येऊन जेमतेम एक आठवडा झाला होता. वर्तमानपत्रात बऱ्याचशा बातम्या त्या आंतरराष्ट्रीय घडामोडींविषयी छापून आल्या होत्या. शोम्बे यांचा बंगला मध्य आफ्रिकेतील काँगोच्या कटान्गा प्रांतातील एलिझाबेथव्हील या शहरात होता. शोम्बे काँगोतील एक आघाडीचे व यशस्वी खनिज व्यावसायिक होते. काँगोमध्ये कोबाल्ट, हिरे, सोने व तांबे यांचे प्रचंड साठे होते. शोम्बे वर्तमानपत्र वाचत असताना त्यांचा सात वर्षांचा चुणचुणीत पुतण्या अंगुझा त्यांच्याजवळ आला. शोम्बेना तो खूप आवडायचा. त्यांना स्वतःस मूलबाळ नसल्यामुळे ते त्याच्यावर आपल्या मुलाप्रमाणे प्रेम करायचे. त्याला पाहताच शोम्बेनी त्याला जवळ घेऊन त्याच्या गालाचे चुंबन घेऊन विचारले,

''तुला काकींनी चॉकलेट दिले ना?''

''हो, काका. कालच दिले. फार छान होते.''

अलीकडेच शोम्बे आपल्या काही कामाच्या संदर्भात बेल्जियमला गेले होते. तिकडून येताना त्यांनी अंगुझासाठी आठवणीने महागडी बेल्जियन चॉकलेट्स आणली होती. शोम्बेंच्या मांडीवर बसलेल्या अंगुझाचे लक्ष त्यांच्या हातातील वर्तमानपत्राकडे गेले. त्याकडे पाहत अंगुझाने विचारले,

''काका, हा फोटो कोणाच्या घराचा आहे?''

''घराचा नाही, तो आहे स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा या शहरातील 'राष्ट्रांचा राजवाडा' या इमारतीचा. ती दहा वर्षांपूर्वी बांधली आहे. आता लवकरच तेथे संयुक्त राष्ट्रसंघाचे विभागीय कार्यालय उघडण्यात येणार आहे. ते काय असते हे तुला मोठा झाल्यानंतर कळेल. पण अंगुझा, मी तुला एवढे शिकवीन की एक दिवस तुला या राजवाड्याच्या सभागृहात भाषण करायचे आमंत्रण येईल!''

छोट्या अंगुझाला त्याचे काका काय म्हणताहेत हे

समजणे अशक्य होते. त्याला एवढेच समजले की त्याने शिकून खूप मोठे व्हावे अशी त्याच्या काकांची इच्छा आहे.

त्यावेळी काँगो ही बेल्जियमची वसाहत होती. मोईस शोम्बेनी १९५०च्या सुमारास राजकारणात व स्वातंत्र्यलढ्यात रस घ्यायला सुरुवात केली. स्वातंत्र्यलढा जून १९६० मध्ये यशस्वी झाला. त्यावेळी बेल्जियन राज्यकर्त्यांनी आपली सत्ता संपवली व आपण काँगोस स्वातंत्र्य देत आहोत असे घोषित केले आणि देशाचा कारभार सांभाळावा असे आवाहन स्थानिक नेत्यांना केले. पण स्थानिक नेत्यांत एकमत नव्हते. शिवाय काँगोचा कटान्गा हा प्रदेश पहिल्यापासून स्वतःला वेगळा समजत होता. शोम्बे मूळचे कटान्गाचेच. ऑगस्ट १९६० मध्ये त्यांनी कटान्गा प्रदेशात स्वतंत्र राष्ट्र स्थापल्याची घोषणा केली. शोम्बेनी स्वतः आपण कटान्गाचे अध्यक्ष आहोत असेही जाहीर केले. त्यांना बऱ्यापैकी पाठिंबा मिळत होता. त्याच वेळी स्वतंत्र काँगोत साम्यवादी विचारसरणीचे पॅट्रीस लुमुम्बा पंतप्रधान झाले. त्यांना सोविएत युनियनचा भरभक्कम पाठिंबा होता. त्यांना शह देण्यासाठी बेल्जियमसह अन्य पाश्चात्त्य राष्ट्रांनी शोम्बेना पाठिंबा जाहीर केला. १९६१ मध्ये काँगोच्या सैन्याचा जनरल जोसेफ मोबुटू याने पॅट्रीस लुमुम्बांना सत्तेवरून हटवले व पुढे त्यांची हत्या केली. त्यात अमेरिकेच्या सी.आय.ए.चा हात होता. तो कालावधी शीतयुद्धाच्या कळसाचा होता. काँगोमध्ये राजकीय अराजक, हिंसाचार व वांशिक दंगलींना त्या सुमारास ऊत आला. यादवी युद्धसदृश परिस्थिती निर्माण झाली. ते पाहून संयुक्त राष्ट्रसंघाचे शांतिदल काँगोस पाठवण्यात आले. आता पाश्चात्त्य राष्ट्रे, विशेषतः अमेरिका मोबुटूच्या पाठीशी उभे ठाकले. त्यांनी शोम्बेंचा पाठिंबा मागे घेतला. शांतिदालाने कटान्गा आपल्या ताब्यात घेऊन तेथे मोबुटूस आपल्या सरकारचा ताबा बळकट करण्यास मदत केली. मोबुटूने शोम्बेंवर राजद्रोहाचा गुन्हा दाखल केला. पण त्यांना अटक होण्यापूर्वी त्यांनी कटान्गातून पलायन केले व स्पेनमध्ये राजकीय आश्रय घेतला.

बेल्जियमच्या लुव्हेन कॅथॉलिक विद्यापीठाचा पदवीदान समारंभ २५ ऑगस्ट १९६५ या दिवशी विद्यापीठाच्या प्रशस्त प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. मोईस शोम्बे त्यास हजर राहण्यासाठी माद्रिदहून लुव्हेनला पोहोचले होते. त्यांचा लाडका पुतण्या अंगुझा यास त्या कार्यक्रमात 'आंतरराष्ट्रीय संबंध' या विषयातील एम.ए. ही पदवी व 'आंतरराष्ट्रीय राजकारण' या विषयात विद्यापीठात सर्वाधिक गुण मिळवल्याबद्दल सुवर्णपदक बहाल करण्यात येणार होते. आता तो चांगला उंच व भारदस्त व्यक्तिमत्त्वाचा आत्मविश्वासू तरुण झाला होता. त्याचे डोळे तीक्ष्ण व पाणीदार होते. कार्यक्रम मोठ्या शानदार वातावरणात पार पडला. अंगुझाचे यश व जाहीर सन्मान पाहून शोम्बेंचा ऊर भरून आला व डोळ्यांत आनंदाश्रू तरळले. कार्यक्रम झाल्यावर शोम्बे, त्यांच्या पत्नी एमिली व अंगुझा एका बेल्जियन उपाहारगृहात जेवायला गेले. एक वेट्रेस त्यांची ऑर्डर घ्यायला आली. तिला अजिबात इंग्रजी समजत नव्हते. अंगुझाने अस्खलित फ्लेमिश भाषेत तिला जेवणाची ऑर्डर दिली.

''तू इथली भाषाही अवगत केलेली दिसतेय,'' काकी कौतुकाने म्हणाल्या.

''काकी, मी येथे आल्यानंतर रोज संध्याकाळी भाषा शिकण्यासाठी एका संस्थेत जायचो. फ्लेमिश तर शिकलोच, शिवाय फ्रेंच व स्पॅनिश या भाषादेखील शिकलो. आंतरराष्ट्रीय स्तरावर काम करायचे असेल तर विविध भाषा बोलता येणे खूप महत्त्वाचे आहे.''

''तू विषय काढलाच आहेस, तेव्हा विचारतो, तू पुढे काय करायचे ठरवले आहेस, अंगुझा?'' शोम्बेनी विचारले.

''काका, द हेग येथील प्रसिद्ध सामाजिक अभ्यास-संस्थेत मला साहाय्यक प्राध्यापकाची नोकरी मिळाली आहे. गेल्याच महिन्यात परीक्षेचा निकाल लागल्यावर मी गंमत म्हणून अर्ज केला. आणि आश्चर्य म्हणजे संस्थेने मला नोकरी देऊ केली. अर्थात त्यावेळी मी त्याचा गंभीरपणे विचार केला नव्हता. पण नंतर विचार करता असे वाटले, की काही वर्षे अध्यापनाचा अनुभव घेऊन नंतर एखाद्या आंतरराष्ट्रीय संघटनेत अथवा सेवाभावी संस्थेत काम करावे.''

''छान, बाहेरच नोकरी पाहा. आपल्या मातृभूमीत काय गोंधळ चालला आहे हे तू जाणतोसच!'' शोम्बे म्हणाले. इतक्यात मघाची वेट्रेस रेड वाईनची बाटली घेऊन आली. ती तिने अंगुझाला दाखवली व ती उघडून तिची चव त्याला देण्यासाठी थोडीशी त्याच्या ग्लासात ओतली. अंगुझाने ती चाखून संमती दाखल होकारार्थी मान हलवल्यावर तिने ती त्या तिघांच्या ग्लासात ओतली.

''घे, चिअर्स, तुझ्या नेत्रदीपक यशाबद्दल व तुझी सर्व स्वप्ने साकार व्हावीत या शुभेच्छेसाठी,'' असे म्हणून शोम्बे व एमिली यांनी आपले ग्लास अंगुझाच्या ग्लासला भिडवले.

ऑक्टोबर १९६९मध्ये, जेव्हा शोम्बेंचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाल्याची बातमी अंगुझाला समजली तेव्हा तो खूप अस्वस्थ झाला. त्यांच्या अंत्यसंस्कारासाठी तो तातडीने माद्रिदला गेला. त्यावेळी तो 'ऑक्सफॅम' या सुप्रसिद्ध

आंतरराष्ट्रीय सेवाभावी संस्थेत वरिष्ठ प्रकल्पाधिकारी पदावर त्यांच्या ऑक्सफर्ड येथील मुख्य कार्यालयात काम करत होता. अंगुझाचे आई-वडील व इतर काही नातेवाईक कॉंगोहून त्यासाठी आले होते. अंत्यसंस्कार पार पडल्यावर शोम्बेंच्या कायदा सल्लागारांनी जवळच्या नातेवाईकांच्या उपस्थितीत त्यांचे मृत्युपत्र उघडले व ते वाचले. त्यात त्यांनी आपली सर्व मालमत्ता पत्नी एमिली हिला दिली होती, पण खनिजाचा व्यवसाय मात्र अंगुझाला दिला होता. त्यांनी त्या व्यवसायात औद्योगिक उपकरणे व इतर यंत्रसामग्रीमध्ये लाखो डॉलर्सची गुंतवणूक केली होती. शोम्बे जरी गेली आठ वर्षे स्पेनमध्ये राहायचे, तरी त्यांचा अत्यंत विश्वासू व्यवस्थापक शितामू हा त्या व्यवसायाचा व उद्योगाचा सर्व कारभार उत्तम रीतीने चालवायचा. अंगुझाचे वडीलदेखील त्या व्यवसायावर लक्ष ठेवायचे, पण त्यांना त्यात रस नव्हता. ते आपली शेती व त्यांच्या आवडीचे बागकाम यामध्येच खूप वेळ घालवायचे. कोणालाही आर्थिक विवंचना नव्हत्या. अंगुझा वर्षातून एक-दोन वेळेस आई-वडिलांना भेटायला जायचा.

मृत्युपत्र वाचून झाल्यावर कायदा सल्लागार निघून गेले. सर्व कुटुंबीय बोलत बसले. एमिलीला शोम्बेंनी आपला व्यवसाय अंगुझाला दिल्यामुळे दु:ख होण्याचा प्रश्नच नव्हता. उलट तिला त्यामुळे आनंद झाला होता. ती अंगुझाला म्हणाली,

''अंगुझा, यांच्यामुळे मीदेखील कॉंगोला जाऊ शकत नव्हते. आता हे गेल्यामुळे मला येथे या परक्या भूमीत राहण्याची अजिबात इच्छा नाही. मी एक सुचवू?''

''काय, काकी?'' अंगुझाने त्या काय प्रस्ताव मांडणार आहेत याचा जो अंदाज केला, तो तंतोतंत खरा ठरला.

''अंगुझा, माझे ऐक. नोकरी सोडून दे. आपण सारे कॉंगोत राहू. तू उद्योग व व्यवसायाचा कारभार पाहा, मी आपली कशात तरी गुंतवून घेईन स्वत:ला.''

हे ऐकल्यावर अंगुझाच्या आई-वडिलांनीदेखील तो प्रस्ताव उचलून धरला. अंगुझाने विचार केला, एवढा मोठा व्यवसाय आयता चालून आला आहे, तो धुडकावायला नको. पण त्यासाठी आपल्या करिअरवर पाणी सोडायला हवे. आई-बाबादेखील आता थकल्यासारखे दिसतात. माझ्या तिकडे जाण्याने त्यांना व काकींना आनंद होणार असेल तर मला काहीतरी त्याग करणे आवश्यक आहे.

''ठीक आहे, काकी. मला तुमचा सल्ला मान्य आहे.''

त्या दु:खद समयीदेखील त्या तिघांना अंगुझाच्या निर्णयामुळे समाधान झाले.

एक महिन्यानंतर अंगुझाने कॉंगोकडे प्रयाण केले. तिकडे गेल्यानंतर त्याने हळूहळू व्यवसायावर लक्ष केंद्रित केले. जानेवारी १९७०मध्ये त्याचा व कॉंगोमधील एक उद्योगपती ख्रिस्तोफर माकुनी यांची कन्या सेरा यांचा विवाह झाला. अंगुझा व्यवसायात लक्ष घालायचा खरा, पण त्याला त्याची गोडी काही केल्या लागेना. तसे पाहिले तर शितामू त्याचा कारभार चोखपणे पाहायचा. अंगुझा आपल्या कार्यालयात बऱ्याच वेळा आंतरराष्ट्रीय संबंध, अर्थकारण, राजकारण व इतर संलग्न विषयांची पुस्तके वाचत बसायचा. हल्ली हल्ली त्याला कार्यालयात न जाता ग्रंथालयात वाचत बसायची इच्छा होऊ लागली. शेवटी त्याने सेराला विश्वासात घेतले व तो तिला म्हणाला,

''सेरा, माझे व्यवसायात लक्ष लागत नाही. मी माझ्या आवडीच्या विषयाच्या क्षेत्रात एखादी नोकरी करावी म्हणतो. आपल्याला आर्थिक विवंचना नाहीत. व्यवसायाचे उत्पन्न येतच राहील. तू काय म्हणतेस?''

''अंगुझा, तुम्हाला ज्यात आनंद मिळेल ते काम तुम्ही जरूर करा. माझा त्याला पाठिंबाच असेल.''

अंगुझांच्या शैक्षणिक पार्श्वभूमीवर व त्यांच्या परदेशातील कामाच्या अनुभवामुळे त्यांची कॉंगोच्या विदेश मंत्रालयात अतिरिक्त सचिवपदी सहज निवड झाली. त्यांचा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा गाढा अभ्यास व विविध भाषांवरील प्रभुत्व यामुळे अल्पावधीतच त्यांच्या नावाचा सरकारी वर्तुळात गाजावाजा होऊ लागला. ते कॉंगोचे आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये प्रतिनिधित्व करू लागले. त्यांच्या कर्तृत्वाची ख्याती अध्यक्ष मोबुटू यांच्या कानावर वेळोवेळी जात होती. दोन वर्षे गेल्यानंतर अध्यक्षांनी त्यांची 'विदेश सचिव' या पदी निवड केली. विदेशनीतीबाबत अध्यक्ष मोबुटू अंगुझांचा सल्ला घेतल्याशिवाय निर्णय घेत नसत. त्यांच्या सल्ल्यानेच १९७१मध्ये कॉंगो हे नाव बदलून ते पारंपरिक 'झायेर' असे करण्यात आले. दरम्यान अंगुझांनी आपला खनिजाचा व्यवसाय एका उद्योगपतीला विकून त्यातून आलेले पैसे काही ठेवींमध्ये गुंतवले होते.

मार्च १९७२मध्ये 'अध्यक्षांनी तातडीने भेटावयास बोलावले आहे' असा निरोप मिळाल्यावर अंगुझांना आश्चर्य वाटले. एक दिवसापूर्वीच त्यांची व अध्यक्षांची प्रदीर्घ भेट झाली होती. तसे पाहिले तर ते दोघे आठवड्यातून एकदाच दोन ते तीन तासांसाठी भेटत असत. एरवी काही गरज भासली तर अध्यक्ष त्यांना फोन करीत. आजची भेट अध्यक्षांच्या राजवाडासदृश निवासस्थानी संध्याकाळी ७ वाजता होणार



होती. ठरल्याप्रमाणे अंगुझा तेथे सात वाजता पोहोचले.

''अंगुझा, ये, बस. तुझीच वाट पाहत होतो,'' असे म्हणून अध्यक्षांनी एका नोकरास हाक मारली. त्याला स्कॉच, सोडा, बर्फ व फ्राय फिश आणायला सांगितले. अध्यक्ष त्यांच्या अभ्यासिकेतच होते. त्यांनी भडक रंगांच्या फुलांचे डिझाईन असलेल्या कापडाचा पारंपरिक 'धन्शिकी' हा वेश परिधान केला होता. त्यात ते नेहमीपेक्षा जास्तच जाड दिसत होते. अंगुझांनी मात्र त्यांचा आवडीचा फिकट पिवळसर शर्ट व गडद तपकिरी रंगाची पॅन्ट घातली होती. थोडावेळ ते दोघे इकडचे-तिकडचे बोलत बसले. नोकराने सारे साहित्य टेबलावर आणून ठेवल्यावर तो निघून गेला. अध्यक्षांनी स्वतः उठून खोलीचे दर बंद केले. त्यांनी स्वतः दोघांच्या ग्लासमध्ये स्कॉच ओतली व बर्फ आणि सोडा घालून ग्लास तयार केले.

''घे, अंगुझा, चिअर्स. आज खूप दिवसांनी तुझ्याबरोबर निवांतपणे बोलायची संधी आली. तुझा जगप्रवास आणि माझा कामाचा व्याप, यातून वेळ कोठे मिळतो?''

त्यांच्या गप्पा पुढे सुरू झाल्या.

''अंगुझा, तुझी कर्तबगारी मला कधी कधी थक्क करून टाकते. मला तुझी आपल्या देशाच्या उत्कर्षासाठी अधिक मदत हवी आहे.''

''आपण फक्त आज्ञा करावी, एक्सेलन्सी.''

''हे पाहा, तू विदेशमंत्री पदाची धुरा सांभाळावी अशी माझी इच्छा आहे.''

''पण सध्याच्या मंत्रिमहोदयांचे कामकाज तसे ठीक चालले आहे. ते त्या पदावर असताना मी...''

अंगुझांना मध्येच थांबवत अध्यक्ष म्हणाले,

''त्याचे मी पाहून घेईन. तू त्याची चिंता नको करूस. तू फक्त हो म्हण.''

अंगुझा अध्यक्षांच्या काही धोरणांशी सहमत नव्हते. पण व्यावहारिक दृष्टिकोनातून पाहता, सद्यपरिस्थितीत मोबुटूंना पर्याय नव्हता. त्यांची सत्तेवरील पकड भरभक्कम होती. अंगुझांनी थोडा वेळ विचार केला व ते म्हणाले,

''ठीक आहे, एक्सेलन्सी. ही नवी जबाबदारी मी समर्थपणे पेलण्यास तयार आहे.''

४ मार्च १९७२ या दिवशी चौतीस वर्षांचे अंगुझा कार्ल-ई-बॉंड यांना झायेरचे 'विदेशमंत्री' या पदाची शपथ अध्यक्ष मोबुटूंनी देवविली. आंतरराष्ट्रीय संबंध नि राजकारण यांचा गाढा अभ्यास असलेल्या एका तरुण तज्ज्ञाची आफ्रिकेतील सर्वांत मोठ्या, जवळजवळ पश्चिम युरोप एवढी भूमी असलेल्या व खनिजसंपत्तीने समृद्ध असलेल्या झायेरचे विदेशमंत्री म्हणून झालेल्या निवडीस केवळ आफ्रिकेतीलच नाही, तर युरोप-अमेरिकेतील सर्व प्रमुख वर्तमानपत्रांनी ठळक प्रसिद्धी दिली. अंगुझांनी मंत्रालयाची सूत्रे हाती घेतल्यानंतर लगेचच झायेरच्या विदेशनीतीवर आपली पकड बळकट केली. मोबुटूंना अमेरिकेचा पाठिंबा होता, तर सोविएत युनियन झायेरला पाण्यात पाहत होते. त्या दोन महासत्तांचे त्यावेळी कट्टर वैर होते. कॉंगो-झायेरमध्ये एके काळी मूळ रोवलेल्या साम्यवादी चळवळीच्या भूमिगत नेत्यांना साहाय्य करून त्या चळवळीचे पुनरुत्थान करण्यास सोविएत युनियन प्रयत्नशील होते, तर त्यांना शह देण्यासाठी अमेरिका मोबुटूंना मदत करत होती. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या या खेळीमुळे अमेरिकेने त्यांचा मनमानी कारभार, हुकूमशाही प्रवृत्ती, राजकीय विरोधकांचा छळ करून त्यांची हत्या करणे या व अशा अनेक धोरणांकडे काणाडोळा केला होता. अशा कठीण समयी अंगुझांनी झायेरची विदेशनीती अतिशय धूर्तपणे आखली. सोविएत युनियनशी बिघडलेले संबंध काही अंशी सुधारले. अमेरिकेच्या मनमानी हस्तक्षेपास शह देण्यासाठी ते आवश्यक

आहे असे त्यांनी अध्यक्षांना पटवून दिले. अध्यक्ष अंगुझांच्या कारभारावर बेहद्द खुश होते. त्याचे आणखी एक कारण म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत झायेरच्या खनिजांना मागणी वाढली होती. अर्थात ओघाने देशाची अर्थव्यवस्था बळकट झाली होती.

असे असले तरी मोबुटूंच्या मंत्रिमंडळातील काही सदस्य अंगुझांचा मत्सर करत. त्यांच्या नावाचा उदो-उदो, मोबुटूंनी त्यांच्यावर जाहीर कार्यक्रमात स्तुतिसुमने उधळणे व त्यांना वृत्तपत्रातून मिळणारी प्रसिद्धी यामुळे ते त्यांचा मत्सर करायचे. त्यांच्यापैकी एक होता कर्नल गीबोना. तो होता सांस्कृतिक खात्याचा मंत्री. त्याचे खाते तसे पाहिले तर दुय्यम दर्जाचे होते. जेव्हा ऑक्टोबर १९७६मध्ये अंगुझांवर एम.पी.आर. या झायेरच्या एकमेव मान्यताप्राप्त सत्ताधारी पक्षाच्या राजकीय संचालकपदाची धुरा मोबुटूंनी सोपवली, त्यावेळी गीबोनाच्या तळपायाची आग मस्तकाला भिडली. त्यावेळी अंगुझांशिवाय अध्यक्षांचे पान हलत नव्हते. त्यांच्या कार्यालयाची व घराची दारे अंगुझांसाठी सदैव उघडी असत. त्यांना व त्यांच्या पत्नी सेरा यांना मोबुटू वारंवार घरी भोजनासाठी बोलावत. कोणतीही खास मेजवानी अंगुझांच्या उपस्थितीशिवाय आयोजित केली जायची नाही.

एके दिवशी गीबोना अध्यक्षांना भेटायला गेला. थोडे इतर गोष्टींवर बोलून झाल्यावर तो म्हणाला,

''एक्सेलन्सी, आपण अंगुझांना एवढी मोकळीक दिली आहे की, ते त्याचा गैरफायदा तर घेणार नाहीत ना याचा विचार...''

''गीबोना, तुला काय सुचवायचे आहे?''

''तसे काही नाही, ते आपल्या निवासस्थानी वारंवार जात-येत असतात. आपण तेथे असला तर त्यात काहीही वावगे नाही, पण...''

''पण काय, गीबोना?''

''आपल्या अपरोक्ष त्यांनी वारंवार आपल्या निवासस्थानी जाऊन तेथे तासन् तास घालवले तर त्यातून वेगळा अर्थ निघू शकतो!''

''खरेच? माझ्या अपरोक्ष तो माझ्या निवासस्थानी वारंवार जातो?''

''माझ्या कानावर आले, म्हणून मी सहज आपल्याला सांगितले. आपल्या निवासस्थानाच्या सुरक्षा अधिकाऱ्याकडून आपल्याला शहानिशा करून घेता येईल!''

हे समजल्यावर अध्यक्ष अस्वस्थ झाले. आपली पत्नी व अंगुझांचे गैरसंबंध असतील तर ती एक गंभीर बाब होती. ती कल्पना त्यांना सहन होईना. गीबोना सैन्यात असताना त्याच्या हाताखाली काम केलेला मेजर रांगेती हा अध्यक्षांच्या निवासस्थानाचा सुरक्षा अधिकारी होता. त्याला गीबोनाने आधीच पढवून ठेवले होते. त्याच्याजवळ अध्यक्षांनी विचारणा केल्यावर तो म्हणाला, की 'आपण परदेश प्रवासवर गेले असताना कधी-कधी अंगुझा आपल्या निवासस्थानी तास-तास दोन-दोन तास असतात!'

अध्यक्षांना काय करावे समजेना. त्यांना गीबोनाच्या कारस्थानाची शंका आली. त्या साऱ्या प्रकाराकडे एक अफवा म्हणून त्यांनी दुर्लक्ष करायचे ठरवले. अंगुझाचे काम अतिशय वाखाणण्यासारखे होते. त्यांचा आपली पत्नी रेमीवर विश्वास होता. अंगुझा व सेरा यांचे एकमेकावर खूप प्रेम होते, त्यांना दोन लहान मुलेही होती. या साऱ्या पार्श्वभूमीवर त्यांनी गीबोनाच्या त्या शंकेकडे काणाडोळा करायचे ठरवले. आपल्या कारस्थानाचा काहीच परिणाम झाला नाही यामुळे गीबोना चरफडत होता. एके दिवशी तो पुन्हा अध्यक्षांना भेटायला गेला.

''एक्सेलन्सी, गेली सतरा वर्षे आपण राष्ट्राची धुरा समर्थपणे सांभाळत आहात. आपण राष्ट्राला प्रगतिपथावर आणले आहे. आपल्या सत्तास्थानाला आपल्याच एखाद्या सहकाऱ्याकडून धक्का पोहोचू नये, अशी मंत्रिमंडळातल्या काही सदस्यांची इच्छा आहे.''

''मला कोणापासूनही धोका नाही. तुमची कोणावर शंका आहे?''

''ते आपणच ओळखावे. 'झायेरच्या राजकीय क्षितिजावरील एक उगवता तारा' असा उल्लेख अनेक राजदूत अंगुझांच्या बाबतीत बोलताना करतात.''

''करू देत. अंगुझा माझ्या शब्दाबाहेर नाही. त्याच्यापासून मला काही धोका आहे असे मला वाटत नाही. तो त्याचे कामही अतिशय चोखपणे करत आहे. विदेश मंत्रालय साऱ्या सरकारमध्ये सर्वांत कार्यक्षम मंत्रालय आहे. तू उगाच त्याचा मत्सर करू नकोस.''

''मी मुळीच त्यांचा मत्सर करत नाही. फक्त आपल्या सुरक्षेविषयी चिंता वाटली, म्हणून मी माझी शंका आपल्याजवळ व्यक्त केली. तिच्यात तथ्य नसेल तर आपण कृपया ते विसरून जावे.''

अध्यक्ष गीबोनाला दाद देत नव्हते. असेच साधारण एक वर्ष गेले असावे. १९७९ सालच्या मार्चची ८ तारीख होती. त्या दिवशी दुपारी गीबोना अध्यक्षांना भेटायला गेला. त्याच्या हातात पाच-सहा वर्तमानपत्रे होती. अध्यक्षांच्या




The volume covers Raja Shivaji's life and times along with the strategic and administrative intelligence and excellence. It also highlights his statesmanship and able generalship in 1000 odd pages. Highlight of the volume is Mehendale's hitherto unpublished coverage of these aspects from 1660 to 1680 for which elite Marathi and Indian readers have been waiting for a long. Such an authentic, researched biography in English has not been available for a long time after Sir Jadunath Sarkar's volume in 1919 (6 reprints) and Balkrishna's volume in 1932. The volume has essential maps drawn with the most state-of-the-art methods, footnotes and bibliography.

**About the Author**

Gajanan Bhaskar Mehendale earned his Masters in Defence Studies from the University of Pune. During the 1971 Bangladesh War, he worked as a war correspondent. Thereafter, he engaged himself in studying history with an emphasis on the life of Shivaji. His Marathi volumes of Shivaji's biography have been widely acclaimed. Living in Pune, he is an active member of the Bharat Itihas Samshodhak Mandal. The present volume is an outcome of his 30 years of research, based on primary sources, and will provide the readers new insights about the King's Life and Times.

Facts are stubborn things; and whatever may be our wishes, our inclinations, or the dictates of our passion, they cannot alter the state of facts and evidence."

— John Adams

*(Argument in Defense of the Soldiers in the Boston Massacre Trials, December 1770)*

Price ₹ **2500/-**
**$ 98/-**
Publication No. 40
ISBN : 978-93-80875-17-0

**PARAM MITRA PUBLICATIONS**
6 Rajdurga C.H.S., 2nd Floor, B-Cabin Road,
Naupada, Thane (W) 400 602. INDIA
Tel.: 022 - 2544 7948, Mob.: 9969496634
param_mitra@yahoo.com
www. parammitra.com

कक्षात गेल्यावर तो म्हणाला,

''आज मला एक्सेलन्सीना काहीही सांगायचे नाही. आपण फक्त या वर्तमानपत्रांतील खुणा केलेल्या बातम्या वाचाव्यात.''

''कसल्या बातम्या आहेत या?''

''वाचल्यावर आपल्या लक्षात येईल.''

अध्यक्षांनी आपला चष्मा डोळ्यांवर चढवला. त्यांच्यासमोर अमेरिकेहून प्रसिद्ध झालेला 'इंटरनॅशनल हेराल्ड ट्रिब्युन', इंग्लंडचा 'द गार्डियन', फ्रेंच 'ल माँ', पश्चिम जर्मनीचा 'फँकफुर्टर झैतुंग' व बेल्जियमचा 'डी मॉर्गेन' यांचे अंक होते. सारे गेल्या तीन-चार दिवसांत प्रसिद्ध झाले होते. त्यात अंगुझांनी एक आठवड्यापूर्वी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत केलेल्या भाषणाचे कौतुक करणारा वृत्तांत होता.

''जर्मन दुभाष्याला पाठव. तोपर्यंत मी इतर भाषांतल्या बातम्या वाचतो.'' अध्यक्ष काहीसे गंभीर होत म्हणाले.

अध्यक्षांनी एकामागून एक साऱ्या बातम्या वाचल्या. तेव्हापासून ते काहीसे अस्वस्थ झाले व त्यांचे इतर कामावर लक्ष केंद्रित होईना. संध्याकाळी घरी पोहोचले तेव्हा रेमींच्या लक्षात आले की त्यांच्या मनात काहीतरी खळबळ चालू असावी. त्यांनी विचारले,

''आज खूप थकल्यासारखे वाटता आहात. खूप काम होते का? जरा आराम करा. थोड्या वेळाने स्कॉच व सोडा पाठवून देते.''

''आम्ही मागवू आम्हाला काय हवं-नको ते नोकराकरवी. तुम्ही नका आम्हाला काही सुचवू. नाहीतरी आम्ही घरी नसताना तुम्ही काय करावे नि न-करावे हे आम्ही तुम्हाला कधी सुचवले आहे?'' असे म्हणून अध्यक्ष त्यांच्या अभ्यासिकेकडे जाते झाले. रेमींना त्यांच्या बोलण्याचा रोख कळेना. आज स्वारीचे काहीतरी बिनसले असावे. त्यांचा रागरंग पाहून त्या गप्प बसल्या. अध्यक्षांनी स्नान उरकल्यानंतर नोकराकरवी स्कॉच व सोडा मागवला. स्कॉच घेता घेता त्या परदेशी वर्तमानपत्रांतील त्यांनी दुपारी वाचलेल्या बातम्या वारंवार त्यांच्या डोळ्यासमोर येत होत्या. त्यांचा सूर एकच होता. त्यातल्या त्यात 'द गार्डियन'मधील बातमी तर फारच अस्वस्थ करणारी होती. ती पुनःपुन्हा त्यांच्या डोळ्यांसमोर येऊ लागली...

'झायेरच्या राजकीय क्षितिजावरील तेजस्वी तारा : अंगुझा कार्ल-ई-बाँड.

'झायेर या मध्य आफ्रिकेतील अमर्याद खनिज संपत्ती असलेल्या प्रचंड देशात १९६१ पासून अमेरिकेच्या पाठबळाने सत्तेवर आलेल्या जनरल जोसेफ मोबुटू यांच्या हुकूमशाही सरकारमधील स्वच्छ प्रतिमेचे, सचोटीने काम करणारे नि विदेशनीतीचे सखोल ज्ञान असलेले एकमेव मंत्री आहेत अंगुझा! अध्यक्ष मोबुटूंनी आपल्या राजकीय विरोधकांचा बीमोड कसा केला हे सर्वश्रुत आहेच. या पार्श्वभूमीवर अंगुझा यांचे योगदान अधिकच उजळून निघते. त्यांनी झायेरच्या खनिज व्यापारास चालना दिली. राष्ट्राची विदेशनीती अत्यंत कुशलतेने आखली. अलीकडेच त्यांचे संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत झालेले भाषण सध्याच्या आंतरराष्ट्रीय समस्यांचा अत्यंत वस्तुनिष्ठ ऊहापोह करणारे होते, अशी राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. यापूर्वीची त्यांची निःशस्त्रीकरण समिती, मानवाधिकार समिती, आंतरराष्ट्रीय कामगार महासभा व अनेक तत्सम व्यासपीठांवरून झालेली अभ्यासपूर्ण भाषणे अत्यंत प्रभावी होती. अंगुझा झायेरचे विदेशमंत्री होण्यापूर्वी झायेरचा आंतरराष्ट्रीय राजकारणातील सहभाग नाममात्र होता. पण अंगुझा यांनी विदेशमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून झायेर आंतरराष्ट्रीय पातळीवर अधिक कार्यशील झाला आहे. याचे सारे श्रेय अंगुझांना द्यायला हवे. त्यांच्या विदेशनीतीचे एक उत्तम उदाहरण येथे देता येईल. त्यांनी केवळ झायेरच्या हिताचा विचार न करता आफ्रिकेतील युद्धे, हिंसाचार, रोगराई, दुष्काळ, परकीय हस्तक्षेप यांनी हैराण झालेल्या इतर देशांतील त्रस्त जनतेचा आवाज आंतरराष्ट्रीय स्तरावर उठवला, त्यांच्या हालअपेष्टा कमी करण्यासाठी, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी व त्यांच्या उद्धारासाठी सर्व राष्ट्रांना आवाहन केले. केवळ त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे यथावकाश साऱ्या जगाचे लक्ष त्या दुर्लक्षित खंडाकडे वेधले गेले. त्यामुळेच तेथील जनतेच्या उद्धारासाठी मदतीचा ओघ सुरू झाला. हे केवळ अंगुझांच्या दूरदृष्टीमुळे घडले. अजूनपर्यंत नोबेल पुरस्कार समितीने शांतता पुरस्कारासाठी त्यांची निवड कशी केली नाही हे एक गूढ आहे. खरे म्हणजे झायेरची सत्ता हुकूमशाही व दडपशाही वृत्तीचे अध्यक्ष मोबुटू यांच्याऐवजी मंत्री अंगुझांकडे असती तर आज झायेर कुठल्या कुठे पोचला असता! अजूनही वेळ गेलेली नाही. उद्या जर अंगुझा झायेरचे अध्यक्ष झाले तर झायेरच्या इतिहासातील तो सुवर्णदिन ठरेल. अध्यक्ष मोबुटू यांच्या पश्चात (ती वेळ झायेरच्या जनतेच्या भाग्याने लवकर यावी!) झायेरच्या अध्यक्षपदाची धुरा समर्थपणे सांभाळण्याची क्षमता अंगुझा यांच्याशिवाय अन्य कोणत्याही झायेरी राजकीय वर्तुळातील व्यक्तीत नाही असे म्हटले तर वावगे ठरणार नाही!'

दुसऱ्या दिवशी अध्यक्ष उठले तेव्हा त्यांचे डोके ठणकत होते. सकाळचे दहा वाजले होते. ते रात्री किती वाजता झोपी

गेले हे त्यांना आठवत नव्हते. काल संध्याकाळी किती स्कॉच घेतली हेही त्यांच्या स्मरणात नव्हते. त्यांनी टेबलवरील डिम्पल स्कॉचच्या बाटलीकडे पहिले. ती त्यांनी कालच उघडली होती. त्यातील जवळजवळ सात-आठ पेग संपले होते. त्यांनी बेडजवळच्या स्टुलावरील बेल दाबली. समोरच्या टेबलवरील प्लेटमध्ये अर्धवट खाल्लेले बीफ स्टेक दिसत होते. नोकर आल्यावर ते म्हणाले,

''ती समोरची प्लेट घेऊन जा आणि माझ्यासाठी एका मोठ्या ग्लासातून टोमॅटो ज्युस, त्यात दोन फेटलेली कच्ची अंडी आणि एक चमचा टॅबॅस्को सॉस टाकून आण. आणि येताना दोन ॲस्पिरिनच्या गोळ्यादेखील आण.''

जी, सर, असे म्हणून तो नोकर निघून गेला. अध्यक्षांना ठणकणारे डोके, पोटातील मळमळ नि जबरदस्त हँगओव्हर यावर काय करू नि काय नको असे झाले. त्यांनी टेबलवरील फोन उचलला व एक नंबर फिरवला. दुसरीकडून 'हॅलो' ऐकल्यावर ते म्हणाले,

''गीबोना, तू अकरा वाजता माझ्या कार्यालयात ये. येताना बाकुंगालाही घेऊन ये.''

ठीक आहे, एक्सेलन्सी, असे म्हणून गीबोनाने फोन खाली ठेवला व थोड्याच वेळात झायेरचे गृहमंत्री बाकुंगांना फोन लावला. ठरल्याप्रमाणे ते दोघे अकरा वाजता अध्यक्षांच्या कार्यालयात हजर झाले. त्यांच्या कक्षात गेल्या-गेल्या अध्यक्षांनी त्यांना विचारले,

''अंगुझा सध्या कोठे आहे?'' अंगुझा तीन दिवसांपूर्वी न्यू यॉर्कहून राजधानी किन्शासास परतल्याचे अध्यक्षांना ठाऊक होते.

''ते किन्शासा विद्यापीठाच्या नव्याने उघडण्यात आलेल्या 'विदेशनीती अभ्यास व संशोधन केंद्रा'चे उद्‌घाटन करायला गेले आहेत,'' गृहमंत्री बाकुंगा म्हणाले.

''तो असेल तेथे त्याला अटक करा. देशद्रोह, सत्तापालट करण्याचा कट करणे व झायेरच्या जनतेस हिंसाचारास उद्युक्त करणे असे आरोप त्याच्यावर लावा.''

अंगुझांच्या अटकेची बातमी झायेरमध्ये, इतर आफ्रिकन देशांत व जगभर वाऱ्यासारखी पसरली. तिने सर्वत्र एकच खळबळ माजवली. झायेरी जनता आपली नापसंती व्यक्त करायला धजावत नव्हती. पण पाश्चात्त्य राष्ट्रांमधून निषेधाचे सूर उमटू लागले. त्याचा मोबुटू यांच्यावर यत्किंचितही परिणाम होत नव्हता. अंगुझांना अटक झाल्यानंतर 'चौकशी'साठी किन्शासातील बारांबू पोलीस स्टेशनच्या कोठडीत ठेवले होते. त्यांच्या अटकेनंतर दोनच दिवसांनी अध्यक्षांची काळी मर्सिडिस गाडी कसलीही पूर्वसूचना न देता पोलीस स्टेशनवर पोहोचली. ती पाहताच सर्वांची एकच धांदल उडाली. पोलीस स्टेशनचे प्रमुख इन्स्पेक्टर पुढे सरसावले. त्यांनी काही बोलायच्या आत मोबुटू म्हणाले,

''मला एकांतात अंगुझाशी बोलायचे आहे.''

''एक्सेलन्सी...जरूर...जरूर...या आपण आत या...आपल्यासाठी कॉफी किंवा ...'' चाचरत बोलणाऱ्या इन्स्पेक्टरला मध्येच थांबवत मोबुटू म्हणाले,

''माझा वेळ वाया घालवू नकोस! कोठे आहे तो नराधम?''

इन्स्पेक्टरने चार पोलिसांच्या मदतीने हाता-पायांत बेड्या व साखळदंड घातलेल्या अंगुझांना त्यांच्या कार्यालयात आणले. अध्यक्ष इन्स्पेक्टरच्या खुर्चीत बसले होते. अंगुझांना त्यांच्या समोर उभे करून इन्स्पेक्टर तेथून निघून गेले. जाण्यापूर्वी त्यांनी खिडकी बंद केली व खोलीचे दार लावून घेतले. खोलीच्या बाहेर साऱ्या बाजूंना सशस्त्र पहारा ठेवला.

''मला हटवून सत्ता काबीज करायची होती काय? भोग आता आपल्या दुष्कृत्यांची फळे.''

''आपली कोणीतरी दिशाभूल केलेली आहे. मला अध्यक्षपदाचा केव्हाही हव्यास नव्हता. मी माझ्या खात्याचे काम सचोटीने करत होतो नि करत राह्यलो असतो, पण...''

''पण काय? मला हटवणे सोपे नाही, बरोबर?''

''आता तुमचे मत इतके कलुषित झाले असल्यास मी तुमचे मतपरिवर्तन तरी कसे करू?''

अध्यक्षांनी आपल्या कोटाच्या खिशातून ०.२२ वेबले स्कॉट पिस्तूल काढले व ते अंगुझांच्या डोक्यावर रोखले. अंगुझांना हे अपेक्षित नव्हते. मोबुटूंनी आपल्या राजकीय विरोधकांचा काटा किती क्रूरपणे काढला होता हे जगजाहीर होते. त्यांची साऱ्या आफ्रिकेत 'मवाली सत्तापिपासू' अशी ख्याती होती. अटक झाल्यानंतर आपले भवितव्य काय आहे याची अंगुझांना पुरेपूर कल्पना होती. पण मोबुटू असे अचानक स्वतः डोक्यात गोळी घालून आपल्याला ठार मारेल, असे मात्र त्यांना वाटले नव्हते.

''तुला आता या क्षणी ठार मारायला माझे हात शिवशिवत आहेत. पण मी तुला असे सहजासहजी मारणार नाही.चांगला छळ करून तुला संपवले पाहिजे!''

अंगुझांची रवानगी एका अज्ञात कोठडीकडे करण्यात आली. त्यांच्या चौकशीसाठी पोलीस खात्यातील एक क्रूर अधिकारी साहाय्यक कमांडर गीबो याची नेमणूक करण्यात आली. मोबुटूचा असा संशय होता की एखाद्या युरोपीय

राष्ट्राच्या चिथावणीने बाहेरचेच भाडोत्री सैनिक (मर्सिनरीज्) मदतीस घेऊन आपल्याला सत्ताभ्रष्ट करायचा अंगुझाचा कट असावा. त्याकरता वातावरण निर्मितीसाठी त्याच्या परदेशातील हस्तकांनी वर्तमानपत्रांतून आपल्या बदनामीचे प्रयत्न सुरू केले असणार. त्याबाबतीत अधिक माहिती मिळवण्यासाठी त्यांनी गीबोस सर्वाधिकार दिले व त्यासाठी हवे ते तंत्र वापरायची मुभा दिली. गीबोने अंगुझांचे छळ करायला वेगवेगळे मार्ग अवलंबले. सत्तापालट करण्याच्या कटात कोण-कोण सामील आहे, कोणते राष्ट्र त्यांच्या मागे आहे, झायेरमध्ये त्यांचे कोण-कोण समर्थक आहेत, अशा प्रश्नांचा त्यांच्यावर भडिमार सुरू केला. पण कसल्याही कटात सामील नसलेल्या अंगुझांजवळ त्याच्या एकाही प्रश्नाचे उत्तर नव्हते. शेवटी गीबोने अंगुझांच्या मूत्रनलिकेत धातूची एक बारीक नळी घालून आत गरम हवेचे झोत सोडले. नंतर त्याच नळीतून हलका विद्युतप्रवाह सोडला. अंगुझा पराकोटीच्या वेदनांनी तडफडत होते नि असा छळ करण्यापेक्षा ठार मारायची विनवणी करत होते. या शेवटच्या छळाच्या प्रकाराने त्यांच्या इंद्रियातील रक्तवाहिन्या फुटल्या व त्यांना कायमचे नपुंसकत्व आले.

अध्यक्षांच्या हुकुमावरून एका तथाकथित 'खास न्यायालया'ने अंगुझांवरील सर्व आरोप शाबीत झाले आहेत असा निकाल दिला व त्यांना फाशीची शिक्षा ठोठावली. ही बातमी जगभर पसरल्यावर साऱ्या जगातून मोबुटूंवर टीकास्त्र झोडण्यात आले. अमेरिकेनेदेखील त्यांच्यावर दबाव आणला. शेवटी अध्यक्षांनी आपले विशेषाधिकार वापरून फाशीची शिक्षा रद्द करून ती जन्मठेपेवर आणली. अंगुझांची रवानगी अत्यंत कडक सुरक्षा असलेल्या मध्य झायेरमधील इकेला येथील तुरुंगात केली. अंगुझांचे कुटुंबीय, विशेषतः सेरा, या साऱ्या प्रकाराने पार उद्ध्वस्त झाली होती. पण मोबुटूंच्या मनमानी कारभारापुढे कोणाचे काही चालत नव्हते. दुसरीकडे अंगुझांविरोधी गोटात मात्र गीबोना आणि कंपनी आनंदोत्सव साजरा करत होती!

अंगुझांना तुरुंगात डांबून जवळजवळ एक वर्ष झाले होते. सकाळी दहाच्या सुमारास तुरुंगाच्या आवारात एकच धावपळ उडाली. कसलीही पूर्वसूचना न देता अध्यक्ष मोबुटू तेथे अवतरले. त्यांनी मुख्य जेलरला अंगुझांची स्वतंत्र कोठडी दाखवायला सांगितले. पहिल्या दिवसापासून त्यांना स्वतंत्र कोठडीत ठेवले होते. अंगुझांच्या कोठडीजवळ जाताच अध्यक्षांनी इतरांना दूर व्हायचा इशारा केला. सारे अधिकारी लगबगीने दूर गेले. अध्यक्षांना पाहून अंगुझांना आश्चर्य वाटले. ते एव्हाना खूप खंगले होते. अध्यक्ष कोठडीच्या गजांतून अंगुझांकडे पाहत होते. काही क्षण अस्वस्थ शांततेत गेले. काही वेळाने अंगुझा आपल्या क्षीण आवाजात म्हणाले,

''पिस्तूल आणलं असेल तर एकदाचं मारून टाका मला!''



''आज येताना पिस्तूल नाही आणलं, त्याऐवजी तुझ्या कोठडीची किल्ली आणली आहे!''

''किल्ली? आणि ती कशासाठी?''

''तुझी मुक्तता करण्यासाठी!अंगुझा, माझी चूक मला उमगली आहे. मी तुझी माफी मागत आहे. माझी काही लोकांनी दिशाभूल केली होती. ते आता स्पष्ट झाल्यामुळे मी तुझ्याकडून क्षमेची याचना करण्यासाठी स्वतः इथे आलो आहे,'' असे म्हणून त्यांनी दूरवर उभ्या असलेल्या जेलरला बोलावून घेतले व त्याला अंगुझांच्या कोठडीचे कुलूप काढायला लावले. अंगुझांचा या साऱ्या प्रकारावर विश्वासच बसत नव्हता. अंगुझा कोठडीतून बाहेर आल्यावर अध्यक्षांनी त्यांना कडकडून मिठी मारली.

जेलरच्या कार्यालयात गरम गरम कॉफी व बिस्किटे झाल्यावर अध्यक्ष व अंगुझा त्यांच्या मर्सिडिसमधून किन्शासाकडे जाताना अध्यक्ष म्हणाले,

''अंगुझा, माझ्याकडून प्रशासकीय कारभार आता सांभाळला जात नाही. तू प्रशासनाची जबाबदारी स्वीकार. त्यासाठी 'राष्ट्रायुक्त' हे नवे पद मी निर्माण करणार आहे!''

'माजी विदेशमंत्री अंगुझा कार्ल-ई-बाँड यांची झायेरचे पहिले राष्ट्रायुक्त म्हणून नियुक्ती' ही बातमी २७ ऑगस्ट १९८०च्या वर्तमानपत्रात वाचणाऱ्यांना आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. कित्येक राष्ट्रांतून त्याबद्दल आनंद व आश्चर्य प्रकट करण्यात आले. ती नियुक्ती झालेल्या दिवशी सायंकाळी अंगुझांच्या अभिनंदनाप्रीत्यर्थ अध्यक्षांच्या निवासस्थानी किन्शासामधील सर्व राजदूत, आंतरराष्ट्रीय संघटनांचे प्रतिनिधी, सर्व मंत्री, खास सरकारी गोटातील उच्च अधिकारी, सैन्याचे वरिष्ठ अधिकारी अशा जवळजवळ अडीचशे निमंत्रितांना एका खास मेजवानीचे आमंत्रण होते. मेजवानी मोठ्या धामधुमीत पार पडली. सैनिकी बँड, उंची मद्याचे प्रकार व भरगच्च मेन्यु असलेली ती मेजवानी कित्येकांच्या स्मरणात दीर्घकाळ राहणार यात शंकाच नव्हती!

त्या रात्री मोबुटू बेडरूममध्ये आल्यावर रेमींनी अध्यक्षांना सहज विचारले,

''अंगुझांकडून तुम्हाला कसला धोका होणार नाही याची खात्री आहे ना? एवढं मोठं पद तुम्ही त्यांना देऊ केलं!''

''रेमी, राजकीय विरोधकांना कसं खरेदी करायचे हे इतरांनी माझ्यापासून शिकावे! माझे वडील मला नेहमी म्हणायचे, राजकारणात आपल्या मित्रांना जवळ करणे आवश्यक आहे, पण त्यांच्यापेक्षा आपल्या शत्रूंना अधिक जवळ करणे अत्यावश्यक आहे!''

अंगुझानी आपल्या नव्या जबाबदारीची सूत्रे हाती घेतली. त्यांच्या नेहमीच्या हातोटीनुसार ते प्रशासकीय कारभार उत्तम तऱ्हेने हाताळू लागले. अल्पावधीतच त्यांच्या नेतृत्वाचे चांगले परिणाम दिसू लागले. हे नवे सन्मानाचे पद त्यांना देण्यात व त्या आधी त्यांची तुरुंगातून सुटका करण्यात अध्यक्षांची कसली खेळी असावी हे कोडे त्यांना काही केल्या उलगडेना. मोबुटू काल मला ठार मारायला निघाला होता, पण आज मात्र तो गोड बोलतोय. उद्या तो काय करेल याची शाश्वती नाही. आता जर मी त्याच्या मर्जीतून उतरलो तर मात्र माझी काही धडगत नाही. त्यापूर्वीच मला काहीतरी हालचाल करायला हवी...

एप्रिल १९८१मध्ये अंगुझांना बेल्जियमची राजधानी ब्रुसेल्स येथे एका बैठकीसाठी जायचे होते. त्यापूर्वी एके संध्याकाळी ते सेराला म्हणाले,

''सेरा, तू व मुलांनी माझ्याबरोबर ब्रुसेल्सला चलावे. मुलांना त्यावेळी सुट्टी आहे. माझे तेथील काम आटोपले की आपण एक आठवडाभर स्वित्झर्लंडला जाऊ. आपण सर्वांनी मिळून सुट्टीला पूर्वी केव्हा गेलो होतो, हे आठवतही नाही.''

''छान, बरे होईल. तुम्हालादेखील कामातून काही दिवस सुटका हवी असे मलाही वाटायचे. तुम्ही कामास इतके वाहून घेता की स्वतःकडे लक्ष द्यायला तुमच्याकडे वेळ नसतो.''

मुलगा स्टेफान आता दहा वर्षांचा तर मुलगी व्हॅलेरी आठ वर्षांची झाली होती. स्वित्झर्लंडला जायचे हे कळल्यावर ते दोघेही रोमांचित झाले.

१६ एप्रिलला ब्रुसेल्समधील बैठका संपल्यावर १७ तारखेस दुपारी ते जिनिव्हास जाणार होते. पण १७ तारखेस सकाळी ९च्या सुमारास ते अचानक बेल्जियमच्या विदेश मंत्रालयात गेले व त्यांनी राजशिष्टाचार अधिकाऱ्यास सांगितले की त्यांना तातडीने विदेशमंत्र्यांची भेट घ्यायची आहे. तो अधिकारी अचंबित झाला.अंगुझा व विदेशमंत्र्यांची दीर्घ बैठक दोन दिवसांपूर्वीच झाली होती. आता त्यांच्या बैठकीचे प्रयोजन नव्हते नि वेळ ही ठरलेली नव्हती. पण त्याला अंगुझांची ख्याती ठाऊक होती. त्याने तातडीने ती गोष्ट विदेशमंत्र्यांच्या कानावर घातली. ती ऐकून ते देखील चकित झाले.

''घेऊन ये अंगुझांना.''

राजशिष्टाचार अधिकारी अंगुझांना मंत्रिमहोदयांच्या कार्यालयात सोडून निघून गेला.

''मंत्रिमहोदय, माझ्या बाबतीत तीन वर्षांपूर्वी काय झाले होते, हे आपल्याला ठाऊक आहेच. त्या प्रकारची पुनरावृत्ती

होईल अशी मला दाट शंका आहे. या कारणास्तव मला व माझ्या कुटुंबीयांना बेल्जियममध्ये राजकीय आश्रय मिळावा अशी माझी आपल्या सरकारला विनंती आहे!''

अंगुझा व त्यांच्या कुटुंबाला बेल्जियन सरकारने विनाशर्त आश्रय देणे क्रमप्राप्तच होते. साऱ्या जगाने त्या बातमीचे स्वागत केले. आता अंगुझांनी मोबुटू विरुद्ध उघड उघड मोहीम हाती घेतली. त्याच्या कृष्णकृत्यांची अंगुझा यांच्याजवळ इत्थंभूत माहिती होती. त्यांनी मोबुटूचा मनमानी कारभार, राजकीय विरोधकांचा छळ व तो करण्याचे तंत्र, आर्थिक भ्रष्टाचार, स्वीस बँकांतील खाती व इतर अनेक दुष्कृत्यांचे सखोल वर्णन असलेली 'झायेरी जनतेचा कर्दनकाळ – मोबुटू' ही पुस्तिका फ्रेंचमधून प्रकाशित केली. अल्पावधीतच तिचे इतर भाषांत अनुवाद झाले. त्या पुस्तिकेने साऱ्या जगात एकच खळबळ माजवली. अमेरिकेतील त्यावेळच्या 'डेमोक्रॅटिक' या विरोधी पक्षाने तो मुद्दा उचलून धरला. त्यांच्या सिनेटर्स व काँग्रेस सदस्यांनी मोबुटूच्या राजवटीचा मुद्दा सिनेट व काँग्रेसमध्ये उपस्थित केला व मोबुटूस पाठीशी घालणाऱ्या तत्कालीन रिपब्लिकन सरकारला धारेवर धरले. या मुद्यावर सखोल अहवाल तयार करावा व त्या अनुषंगाने काँग्रेसच्या एका विशेष समितीत सुनावणी व्हावी असा निर्णय घेण्यात आला. अध्यक्ष रोनाल्ड रिगन विरोधकांचा आवाज बंद करू शकत नव्हते. काँग्रेसच्या समितीच्या सुनावणीदरम्यान साक्ष देण्यासाठी अंगुझांना वॉशिंग्टन डी. सी.ला पाचारण करण्यात आले. अमेरिकेत व पाश्चात्त्य जगतात मोबुटू यांच्याबाबतीत कोणकोणत्या घडामोडी होत आहेत यावर त्यांचे हस्तक बारकाईने लक्ष ठेवून होते. त्या सर्व बातम्या तातडीने मोबुटूंकडे पोचत होत्या.

अंगुझांना ब्रुसेल्समध्ये राहायला येऊन पाच वर्षे उलटली. त्यांना तेथील 'नाटो' या पाश्चात्त्य राष्ट्रांच्या विभागीय सुरक्षा संघटनेत वरिष्ठ सुरक्षा धोरण सल्लागार ही नोकरी मिळाली होती. एके दिवशी झायेरच्या ब्रुसेल्समधील दूतावासातून अंगुझांना एक फोन आला. फोनवर बोलणाऱ्या जनसंपर्क अधिकाऱ्याने झायेरचे राजदूत अंगुझांना भेटण्यास येऊ इच्छितात असे सांगितले. भेटीची वेळ ठरली. दुसऱ्या दिवशी सकाळी नऊ वाजता राजदूत अंगुझांच्या घरी आले. त्यांच्या भेटीचे प्रयोजन काय असावे याचा अंगुझा कालपासून विचार करत होते, पण त्यांना काही उकल होत नव्हती. औपचारिक संभाषण झाल्यावर राजदूत म्हणाले,

''आपल्याला माननीय अध्यक्षांचा वैयक्तिक संदेश आहे. हा घ्या त्या संदेशाचा लिफाफा,'' असे म्हणून राजदूतांनी आपल्या ब्रीफकेसमधून एक सीलबंद लिफाफा काढला व तो अंगुझांना देऊन ते पुढे म्हणाले,

''अध्यक्षांना काही कळवायचे असेल तर, कृपया माझ्याशी संपर्क साधावा. आपला संदेश मी तातडीने एखाद्या अधिकाऱ्यामार्फत अध्यक्षांना अत्यंत गुप्ततेत पोहचवायची सोय करेन. ठीक आहे, मी निघतो,'' असे म्हणून राजदूत उठले. त्यांना निरोप देण्यासाठी अंगुझा त्यांच्या घराच्या फाटकापर्यंत गेले. राजदूत निघून गेल्यावर त्यांनी तो संदेशाचा लिफाफा उघडला. तो संदेश अध्यक्षांनी स्वतःच्या हस्ताक्षरात लिहिला होता–

'प्रिय अंगुझा,

तुला माझे पत्र पाहून आश्चर्य वाटले असेल. गेल्या पाच वर्षात जे काही झाले, ते मी विसरून गेलो आहे. चुका सर्वांकडून होतात. माझ्या हातूनही एकेकाळी तुझ्याबाबतीत चुका झाल्या होत्या. तूदेखील काही वर्षे खूप मानसिक तणावाखाली होतास. त्यामुळे तू रागावून माझ्याविरोधी काही गोष्टी केल्यास. मी ते समजू शकतो. आता आपण दोघेही भूतकाळ विसरून जाऊ. मला तुझी गरज आहे. तू परत किन्शासास ये. मला तुझी अमेरिकेच्या राजदूतपदी नियुक्ती करायची आहे.

तुझ्या होकारार्थी उत्तराची वाट पाहत आहे.

तुझा विश्वासू,

जोसेफ.'

ते पत्र वाचून अंगुझा विचारात पडले. अलीकडे त्यांच्या कानावर आले होते की मोबुटूंची सरकारवरील पकड ढिली होत चालली आहे. अमेरिकेच्या दबावामुळे राजकीय विरोधकांना नवे पक्ष निर्माण करण्यास अनुमती देण्यात येणार आहे. निवडणुकाही व्हायची शक्यता आहे. आपली प्रतिमा झायेरमध्ये अजूनही उजळ आहे. पुन्हा राष्ट्रीय राजकारणात उतरायला ही सुवर्णसंधीच आहे की काय? की मोबुटूला आपली दिशाभूल करून झायेरला गेल्यावर कायमचा काटा काढायचा आहे? पण तसे केले तर त्याला ते जड जाईल. अंगुझांची मनःस्थिती द्विधा झाली. शेवटी त्यांनी एक धाडसी निर्णय घेतला! 'नाटो'च्या संचालकांना आपण काय करू इच्छितो हे सांगितले व त्यांनी झायेरकडे प्रयाण केले. त्यांना काही दगा–फटका झाला असता तर 'नाटो'मार्फत आवाज उठवला गेला असता. पण सुदैवाने तसे अनुचित काही घडले नाही.

जून १९८६ मध्ये अंगुझांची अमेरिकेच्या राजदूतपदी नियुक्ती करण्यात आली. ते पद स्वीकारताना त्यांनी असा

विचार केला, की मला बहुतेक वेळ मोबुटूंपासून दूर, अमेरिकेत राहावे लागेल. त्यांना माझ्याबाबतीत काही घातपात करायला फारशी संधी मिळणार नाही. अंगुझा चार वर्षे त्या पदावर राहिले. पण १९९०मध्ये त्यांनी राजीनामा दिला व ते झायेरला परतले. त्यांनी स्वतःचा नवा राजकीय पक्ष काढायचे ठरवले. पण त्याचबरोबर मोबुटूंना आश्वासन दिले की त्यांचा पक्ष सरकारशी सहकार्य करेल. १९९० नंतर झायेरमध्ये अनेक राजकीय, सामाजिक व आर्थिक उलथापालथी झाल्या. मोबुटू यांची सत्तेवरील पकड खिळखिळी झाली. नव्या दमाचे तरुण राजकारणात उतरले. शेजारच्या रुवान्डात १९९४ मध्ये झालेल्या वंशविच्छेद व संहाराचे पडसाद झायेरमध्ये उमटले. लाखो निर्वासित रुवान्डातून झायेरमध्ये आश्रयास आले. झायेरमध्येही वांशिक दंगली व हिंसाचार सुरू झाला. सर्वत्र अंदाधुंदीचे वातावरण दिसू लागले. अर्थव्यवस्था कोलमडली. अशातच किवू प्रांतातील बंडखोर नेता लॉराँ कबिला याचा प्रभाव वाढत होता. त्याला पाठिंबाही मिळत होता. त्याच्या बंडखोर कारवायांना ऊत आला. तरीही अंगुझा मोबुटू यांच्याबरोबरच होते, त्यांना सत्तेवर राहण्यासाठी मदत करत होते. १९९० साली संमत करण्यात आलेल्या घटनादुरुस्तीने 'पंतप्रधान' हे नवे पद निर्माण केले होते. मोबुटूंनी अंगुझा यांची त्या पदावर नियुक्ती केली. पण राजकीय अस्थैर्य वाढतच होते. कबिलाचा पाठिंबा वाढत चालला होता. रोज त्याला नवे गट जाऊन मिळत होते. शेवटी मे १९९७ मध्ये कबिलाने आपल्या बंडखोर योद्ध्यांच्या मदतीने सत्ता काबीज केली. मोबुटूंना पकडण्यापूर्वी त्यांनी झायेरमधून पलायन केले. त्यावेळी ते सदुसष्ट वर्षांचे होते. नंतर त्यांना मोरोक्कोच्या सरकारने राजकीय आश्रय दिला. त्यानंतर केवळ तीन महिन्यांनी, ७ सप्टेंबर १९९७ या दिवशी त्यांचे कर्करोगाने निधन झाले. त्याच दिवशी कबिलाने आपण आता झायेरचे राष्ट्राध्यक्ष झालो आहोत अशी घोषणा केली. पुढे त्याने देशाचे नाव पुन्हा बदलून 'लोकशाहीवादी प्रजासत्ताक काँगो' असे ठेवले. कबिला मे महिन्यात सत्तेवर आल्यानंतर अंगुझांचे काय झाले हे कोणालाही ठाऊक नव्हते. ते देखील झायेरमधून गायब झाले असावेत असा बऱ्याच जणांनी अंदाज वर्तवला.

कबिला खऱ्या अर्थाने मोबुटू यांचा वारस होता. त्यानेही मोबुटू यांच्याप्रमाणे हुकूमशाही वृत्तीने राजकीय विरोधकांना निकालात काढायचे तंत्र वापरायला सुरू केले. सत्तेवरील आपला ताबा बळकट केला. त्याचा अंगुझांवर खूप रोष होता. त्यांनी राजकीय मतभेद विसरून मोबुटूंना शेवटपर्यंत साथ दिली याचा कबिलास बदला घ्यायचा होता. त्याने आपल्या हस्तकांना अंगुझांचा शोध घ्यायचे आदेश दिले. पण अंगुझांनी कोणत्या देशाला पलायन केले आहे, हे कोणालाही ठाऊक नव्हते.

दक्षिण आफ्रिकेची राजधानी प्रिटोरियामधील पार्क स्ट्रीटवरील मेडीक्लिनिक हार्ट हॉस्पिटलमध्ये हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अब्राहम गार्थ त्यांच्यासमोरील एका पेशंटच्या चाचण्यांचे अहवाल बारकाईने न्याहाळत होते. त्यावर लिहिलेले पेशंटचे नाव होते मि. लॉरेन्स ओरोवे, वय ६०, पत्ता - ५५१, चर्च स्ट्रीट, प्रिटोरिया. डॉ. गार्थना हे ठाऊक नव्हते की त्या पेशंटचे खरे नाव अंगुझा कार्ल-ई-बाँड असे असून त्या व्यक्तीने आपल्या सुरक्षिततेखातर आपले नामांतर केले आहे. अहवाल पाहून झाल्यावर डॉ. गार्थ त्यांच्यासमोर बसलेल्या मि. ओरोवे व त्यांच्या पत्नीला उद्देशून म्हणाले,

दोन रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेजेस आहेत. व ते अशा ठिकाणी आहेत की अँजिओप्लास्टी करता येणे शक्य नाही. बायपास शस्त्रक्रिया करावी लागेल.

गेल्या दोन आठवड्यांपासून अंगुझांना होणाऱ्या त्रासाच्या पार्श्वभूमीवर व त्यांच्या नेहमीच्या डॉक्टरांनी थोडीफार कल्पना दिल्यामुळे त्या दोघांना धक्का बसला नाही. काहीतरी गुंतागुंत आहे अशी त्यांना शंका होतीच. काळजीत पडलेल्या मिसेस ओरोवेनी डॉक्टरांना विचारले,

''कशामुळे यांना हृदयरोग झाला असावा?''

डॉक्टर मिस्टर ओरोवेंकडे पाहत म्हणाले,

''तुम्ही धूम्रपान करता?''

''नाही.''

''तुम्हाला रक्तदाबाचा विकार होता?''

''नाही.''

''खाण्यात तेलकट, तुपकट पदार्थ वारंवार येतात?''

''मुळीच नाही.''

''तुमच्या आई-वडिलांपैकी कोणाला हृदयरोग होता किंवा आहे?''

''नाही.''

''तुमची जीवनशैली बैठी आहे? नियमित काही व्यायाम वगैरे करता?''

''मी रोज सकाळी युनियन बिल्डिंगसमोरील पार्कला दहा वेळा चकरा मारतो व नंतर युनियन बिल्डिंगची टेकडी चढतो. यासाठी बरोबर एक तास लागतो.''

''तुम्हाला हृदयरोग का व्हावा हे एक कोडेच आहे. पण मला एक सांगा, तुमचे काम खूप तणावपूर्ण असते किंवा पूर्वी होते? तुम्ही वेळोवेळी खूप मानसिक तणावाखाली असता

किंवा पूर्वी असायचा?''

''हे बाकी मान्य करायला हवे. सध्या मी काम करत नाही, पण आजही मी तणावाखाली आहे आणि पूर्वीदेखील होतो.''

''मग बरोबर आहे, तुमच्या हृदयविकाराचे तेच एकमेव कारण म्हणता येईल.''

५ मे २००१ या दिवशी अंगुझांवर शस्त्रक्रिया करण्यात आली. ती यशस्वी झाली. आता त्यांना खूप सांभाळून राहावे लागणार होते. दर सहा महिन्यांनी ते डॉ. गार्थ यांच्याकडे तपासणीसाठी जाऊ लागले. सेरा नेहमी त्यांच्या सोबत असायची. स्टेफान व व्हॅलेरी केपटाऊन विद्यापीठात शिकत होते. ते दोघेही विद्यापीठाच्या वसतिगृहात राहायचे.

मार्च २००३ मध्ये तपासणी झाल्यावर डॉ. गार्थ म्हणाले,

''मिस्टर ओरोवे, अलीकडे बऱ्याच गुंतागुंती झालेल्या आहेत. नवे ब्लॉकेजेस दिसतात. आता बायपासही शक्य नाही. केव्हाही हृदयविकाराचा तीव्र झटका येऊ शकतो. मी नवी औषधे सुरू करतो व शक्यतो तो टाळता येईल का याचा प्रयत्न करतो.''

''ठीक आहे. तुमचा सल्ला मी पाळेन. तसे करूनदेखील जे काही व्हायचे आहे ते होऊ दे. माझ्या मनाची तयारी आहे.'' अंगुझा म्हणाले. सेराच्या डोळ्यांमधून अश्रूंच्या धारा सुरू झाल्या होत्या. विमनस्क मनःस्थितीत ते दोघे घरी परतले. दुसऱ्या दिवशी सकाळी अंगुझा सेराला म्हणाले,

''सेरा, तुला ठाऊक आहे की मी माझ्या साऱ्या जबाबदाऱ्या मन लावून पार पाडल्या. त्याचे चीज झाले. माझे माझ्या देशावर नि देशबांधवांवर अमर्याद प्रेम आहे. केवळ त्या प्रेमाखातर मी स्वतःला कामात झोकून द्यायचो. आपल्या देशाच्या जनतेने खूप सोसले आहे. मी मोबुटूसारख्या हुकूमशाही प्रवृत्तीच्या, धोकादायक व भ्रष्ट नेत्याबरोबर राहिलो कारण तसे केले नसते तर मला माझ्या देशाची सेवा करायची संधी मिळाली नसती.''

''मला पटतेय तुमचे म्हणणे. पण आज सकाळी-सकाळीच हा विषय का काढलात?''

''त्याला एक कारण आहे. मला माझे शेवटचे दिवस माझ्या देशबांधवांच्या सहवासात घालवायचे आहेत. माझे प्राणोत्क्रमण माझ्या मातृभूमीत व्हावे व त्या भूमीनेच मला आपल्यात सामावून घ्यावे अशी माझी तीव्र इच्छा आहे.''

''अहो, पण तो कबिला तुम्हाला सहजासहजी मोकळा सोडेल का? मोबुटूंनी तुमच्यावरील रोष विसरून तुम्हाला परत जवळ केले. तो कबिलादेखील तसे करणार आहे थोडेच? तुम्ही तेथे पाय ठेवल्याठेवल्या कोठडीत टाकेल नाहीतर गोळ्या घालून मारेल. तिकडे जायचा विचारदेखील मनात आणू नका.''

''सेरा, त्याला काय करायचे आहे ते करू दे. नाहीतरी मृत्यू माझ्या आसपास वावरत आहेच...''

''असे नका बोलू, कदाचित ठीक पण व्हाल.''

''ते पाहायचं. मुलांचे शिक्षण होत आलेय. ती आता लवकरच आपल्या पायावर उभी राहतील. सुदैवाने आपल्याला आर्थिक विवंचना नाहीत. आपण आता किन्शासाला जायची तयारी करू.''

सेराने त्यांचे मन वळवायचा खूप प्रयत्न केला, पण अंगुझा आपल्या निर्णयाशी ठाम होते.

कबिलास जेव्हा अंगुझा किन्शासाला परत येणार आहेत हे समजले, तेव्हा तो खूप उत्तेजित झाला. पण जेव्हा त्याला समजले की अंगुझा आता राजकारणात मुळीच भाग घेणार नाहीत, त्यांना हृदयविकार जडला असून तो बळावला आहे, तेव्हा त्याने अंगुझाना अटक करायची नाही व त्यांचे त्यांना शांतपणे जगू द्यायचे असे ठरवले.

२८ जुलै २००३च्या 'द गार्डियन' या लंडनहून प्रसिद्ध होणाऱ्या वृत्तपत्राच्या त्या दिवशीच्या अग्रलेखात शेवटी म्हटले होते :

'अंगुझा कार्ल-ई-बाँड यांच्या निधनाने काँगोच्या राजकीय क्षेत्रात पोकळी निर्माण झाली नसली तरी, एकेकाळचे हुकूमशाही अध्यक्ष मोबुटू व त्यांच्या जागी आलेले तितकेच हुकूमशाही वृत्तीचे अध्यक्ष कबिला या दोघांऐवजी अंगुझा जर अध्यक्ष झाले असते तर आज त्या देशाने नेत्रदीपक प्रगती तर केली असतीच, पण हिंसाचार, वांशिक दंगली, बंडाळी, यादवी युद्ध, टंचाई, रोगराई, यांचा फटका त्या देशाच्या निरपराध व गोरगरीब जनतेला बसला नसता हे कोणीही नाकारू शकत नाही. देशबांधवांचा उत्कर्ष साधण्याचा विडा उचललेल्या अंगुझांचे 'दुर्भागी देशप्रेमी' असे वर्णन केले तर ते अनुचित ठरणार नाही!'

**(सत्यघटनेवर आधारित)**

**उमेश कदम**
'आनंद', २५-ई, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३
दूरध्वनी : (०२३१) २६५३४६०
kadamumesh@hotmail.com

''गेली ९६ वर्षे सतत ग्राहकांची सेवा करीत पूर्णपणे संगणकीकृत बारा शाखांसह आधुनिक प्रगतीची वाटचाल''

॥ असमर्थास समर्थ करणे ॥

# दि डेक्कन मर्चन्टस् को-ऑप. बँक लि. मुंबई

Cooperatives

मुख्य कार्यालय : २१७, राजा राममोहन रॉय रोड, गिरगांव, मुंबई ४०० ००४. दू. क्र. २३८५४९४५, २३८६८१३४, २३८५४९९४
फॅक्स क्र. – २३८९ ६८५३

मध्यवर्ती कार्यालय : १३-१४, गणानाथ को-ऑपरेटिव्ह हौ. सोसा. लि., दादर (पश्चिम) स्टेशनसमोर, मुंबई-४०० ०२८.
दू. क्र. २४२२५७१८, २४२२३११६. फॅक्स क्र. – २४३१ ५० ५०

## ❃ शाखा ❃

१) गिरगांव, २) दादर, ३) भायखळा, ४) घाटकोपर (प.), ५) गोरेगांव, ६) बोरीवली, ७) दहिसर, ८) घाटकोपर (पू.), ९) वाशी, १०) ठाणे, ११) खारघर, १२) हडपसर, पुणे. नियोजित शाखा – सासवड, पुणे.

वरील सर्व शाखांमधून आरटीजीएस द्वारे फंड्स ट्रान्सफरची सुविधा उपलब्ध. कोअर बँकिंगद्वारे कुठल्याही शाखेतून व्यवहार करण्याची तसेच मोबाईल, एस.एम.एस. बँकिंगची सेवा उपलब्ध. दादर, भायखळा, ठाणे या शाखांमधून फ्रॅकींग सेवा उपलब्ध.
अल्पावधीत इंटरनेट बँकिंगची सेवा उपलब्ध होईल.

★★★ मुदत ठेवीवर दिनांक ११ सप्टेंबर २०१२ पासून खालीलप्रमाणे व्याजदर लागू ★★★

| मुदत | व्याजदर | मुदत | व्याजदर |
|---|---|---|---|
| १५ दिवस ते ९० दिवस | ६.००% | १३ महिने ते २४ महिने | १०.२५% |
| ९१ दिवस ते १८० दिवस | ७.००% | २५ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| १८१ दिवस ते १२ महिने | ८.००% | ३ वर्षावरील ते ५ वर्ष | १०.००% |
| | | ५ वर्षापेक्षा अधिक | ९.५०% |

**१. डेक्कन शताब्दी ठेव योजना**
२४ महिने–११% व्याज दर
(व्याजाची रक्कम दर तिमाही ठेवीदारांच्या खाती जमा)

**२. डेक्कन दामदुप्पट ठेव योजना**
(७ वर्ष म्हणजे ८४ महिन्यांत रक्कम दुप्पट)

**३. डेक्कन लखपती योजना**
(दरमहा रु. ५०५/– १२० महिन्यांनंतर रु. १,००,९०३/–)

**४. डेक्कन करोडपती योजना**
(दरमहा रु. ५०,०५५/– १२० महिन्यांनंतर रु. १,००,०१,३५१/–)

**०.५०% अधिक व्याजदर (१ वर्ष व त्यावरील कालावधी), ज्येष्ठ नागरिक, रजिस्टर्ड हौसिंग सोसायटी व धर्मादाय संस्था यांच्याकरिता**

**वसुल भाग भांडवल ९.५५ कोटी** **ठेवी ३५९.७० कोटी** **कर्ज २३१.७३ कोटी**

**श्री. विजय श्रीकृष्ण भोळे**
उपाध्यक्ष

**श्री. काशिनाथ दिनकर मोरे**
अध्यक्ष

**संचालक मंडळ**

| | | |
|---|---|---|
| श्री. रघुनाथ कृष्णाजी मसुरकर | श्री. गजानन शंकर पानवलकर | श्री. चंद्रकांत शिवराम शेवाळे |
| श्री. शांतिलाल ताराचंद जैन | श्री. विनोदकुमार तख्तमल कच्छारा | श्री. महेश माणिक भालिंगे |
| श्री. चंद्रकांत मायाप्पा मासाळ | सौ. सुरेखा काशिनाथ राऊत | डॉ. गुरुनाथ पंडित |
| श्री. रामदास गोविंदराव हुले | श्री. रमेश देवू मेढेकर | श्री. अभिजित बाबाजी नागवडे |
| श्री. ज्ञानेश्वर नारायण दाभोळे | श्री. दिपक कल्याणराव सावंत | – |
| श्री. रविंद्रनाथ रामचंद्र पोटफोडे | श्री. दिलीप साहेबराव नागवडे | श्री. शिवराम ल. वायाळ |
| (तज्ञ संचालक) | (कर्मचारी प्रतिनिधी) | (कर्मचारी प्रतिनिधी) |

**श्री. शशिकांत ल. अभंग** सरव्यवस्थापक

ho@deccanbank.com website-www.deccanbank.com co@deccanbank.com

# चिनी प्रवासी फा-हियान

भावानुवाद **सुहासिनी देशपांडे**
मूळ लेख : **भगिनी निवेदिता**

फा–हियान ज्या काळात भारतात आला होता तो काळ होता उज्जैनचा राजा विक्रमादित्याचा. त्याचा हा प्रवास म्हणजे बौद्ध धर्माच्या संकल्पनांशी संबंधित असा आहे. फा–हियानच्या अभ्यासाच्या अनेक उद्दिष्टांपैकी शिल्पकला हे एक त्याने निवडलेले उद्दिष्ट होते. बौद्ध मंदिरांत बुद्धाच्या मूर्ती असणारच आणि स्वतः फा–हियान सुद्धा बौद्ध शिल्पकलेच्या ऐतिहासिक पैलूंविषयी जिज्ञासूपणे आपल्याला सांगतो,– 'बुद्धाच्या मूर्तींपैकी सर्वात प्रथम निर्माण झालेली मूर्ती म्हणजे चंदनात कोरलेली गोशीर्ष रूपातील मूर्ती होय.

भगिनी निवेदितांच्या 'फूट्फॉल्स ऑफ इन्डियन हिस्ट्री' या ऐतिहासिक लेखसंग्रहातील लेखांपैकी सर्वात भावणारा हा लेख आहे. बुद्ध, बौद्ध मत, बौद्ध नगरे या सर्वांविषयी निवेदितांना एक विशेष आकर्षण वाटते. तसेच चिनी यात्रेकरू फा–हियान विषयीसुद्धा वाटते. इसवी सनाच्या चौथ्या शतकात(चंद्रगुप्त विक्रमदित्याच्या काळात) आलेला फा–हियान व सातव्या शतकात (हर्षवर्धनाच्या काळात) आलेला युआन श्वांग हे दोन चिनी बौद्ध यात्रेकरू. निवेदितांनी फा–हियानविषयी, त्याच्या प्रवासवर्णनाविषयी लिहिलेला हा लेख माहितीपूर्ण तर आहेच, शिवाय हृद्यही आहे. भारताच्या ऐतिहासिक दस्तावेजांपैकी सर्वात भावणारी म्हणजे प्राचीन कालात भारतात आलेल्या चिनी यात्रेकरूंची वर्णने. त्यापैकी सर्वात परिचित असलेली म्हणजे फा–हियान व युआन–श्वांग यांची प्रवासवर्णने. यापैकी फा–हियानच्या प्रवासवर्णनाचे मर्म निवेदिता या लेखात उलगडून सांगतात. स्वतःविषयी फारसे काही न बोलणाऱ्या फा–हियानचे व्यक्तित्व त्यांनी अत्यंत सहृदयतेने आपल्या समोर उभे केले आहे.

या दोहोंमधला फरक सुरुवातीसच त्या स्पष्ट करतात–

...पैकी युआनविषयी सांगायचे तर त्याचे चरित्र त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या शिष्यांनी लिहिले आहे. त्यामुळे युआन आपल्याला परिचित होतो तो एक महान व्यक्ती म्हणून. एका मोठ्या धार्मिक गटाचा धार्मिक नेता म्हणून. गुरू म्हणून. तसेच एक संत, एक विद्वान पंडित म्हणून आणि एक प्रवासी–यात्रेकरू म्हणूनही.

फा–हियान मात्र एकाकी आहे. एक व्यक्तित्व म्हणून तो आपल्यासमोर येत आही. तो बौद्ध भिक्खू आणि यात्रेकरू होता हे आपल्याला माहीत आहे. तथापि, त्याच्यातील भूगोलवेत्ता[१] आपल्याला जास्त प्रभावित करतो. फा–हियान काहीसा गंभीर प्रकृतीचा आणि मितभाषी आहे, त्यामुळेच तो स्वतःविषयी फार कमी बोलतो; किंबहुना काहीच बोलत नाही.

कदाचित बौद्ध तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासाठी भारतात

आलेला तो पहिलाच यात्रेकरू असेल. कारण तो जिथे जाई तिथे लोक त्याच्याविषयी गौरवोद्‌गार काढत असत, याची नोंद फा-हियानने केलेली आहे, त्यावरून असे वाटते, ते खरेच असावे. दुसरीकडे असेही दिसते की तो फारसा गाजावाजा न करता आला आणि तसाच फारसा गाजावाजा न होता परत गेला. शिवाय, राजदरबारी काही मानसन्मान झाले असल्यास त्याविषयी तो फारसे सांगत नाही. त्याची सदसद्‌विवेकबुद्धी त्याला तसे करू देत नसेल. पण एकंदरीत असे दिसते की त्या काळात चिनी प्रवाशांचे जाणे-येणे हे तत्कालीन भारतीयांच्या दृष्टीने फार अप्रूपाचे नसावे. ती नित्याचीच बाब असावी. अर्थात, ज्याकाही एका विशिष्ट हेतूने म्हणजे बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी- तो प्रवास करून आला होता त्यामुळे येथील लोकांच्या नजरेत त्याचे येणे काहीसे वेगळे आणि आदरास पात्र तसेच कुतूहलाचे वाटत असावे.

[१] फा-हियानला निवेदिता भूगोलवेत्ता म्हणतात कारण फा-हियानने आपल्या प्रवासवर्णनात आपला संपूर्ण मार्ग गावांच्या नावाबरोबरच अंतरांच्या तपशिलासह दिला आहे. त्यामुळे त्याचे भूगोलाचे ज्ञान तर लक्षात येतच परंतु, चीनपासून भारतापर्यंतच्या मार्गाचा नकाशाही उपलब्ध होतो.

'या विद्वान पंडिताचा भक्तिभाव किती थोर आहे पाहा! तेवढ्यासाठी जगाच्या दुसऱ्या टोकापासून येथवर ही मंडळी बुद्धाचं तत्त्वज्ञान अभ्यासण्यासाठी आली आहेत!' - असे उद्‌गार पंजाबमधील लोकांनी काढले. एकीकडे असे उद्‌गार तर दुसरीकडे कोशल देशात आणि दक्षिणेकडील प्रदेशांत त्याचा उल्लेख केला जातो तो - 'बुद्धिवादी विद्वान' असा. आणि बुद्धिवादी विद्वान म्हणजे ताओवादी विद्वान- हे अगदी स्पष्ट आहे. अशा उद्‌गारांमध्ये एक गमतीशीर विरोधाभास दिसतो. एकीकडे भक्तिभाव असलेले भिक्खू म्हटले आहे तर दुसरीकडे बुद्धिवादी विद्वान पंडित म्हटले आहे.

युआनचे लेखन हे वास्तविक आत्मकथनच आहे. परंतु, फा-हियानचे लेखन हे बहुधा एखाद्या उच्चशिक्षित गटापुढे सादर केलेले निवेदन आहे. कदाचित दक्षिण चीनमधील एखाद्या विद्यापीठातील उच्चशिक्षित विद्वानांपुढे सादर केलेले इतिवृत्त आहे आणि त्याखाली त्याची स्वाक्षरी आहे.

एका वर्षी आपल्या काही सोबत्यांसह फा-हियान भारतामध्ये बौद्ध धर्माची तत्त्वे व उपदेश यांचा अभ्यास करण्यासाठी बाहेर पडला. - त्याविषयी तो लिहितो, - 'कारण शेन्त्सी प्रांतातील त्याच्या मूळ गावी असताना धर्मशास्त्राचे व तत्त्वज्ञानाचे ग्रंथ नष्टप्राय होण्याच्या मार्गावर होते. काही ठिकाणी भेगा पडल्यामुळे वा वाळवीने खाल्ल्यामुळे मजकूर वाचता येईनासा झाला होता.' अशा साध्या शब्दात त्याच्या इतिवृत्ताची सुरुवात होते. जीवनभराचा ध्यास व्यक्त करण्यासाठी योजलेले शब्द इतके रंगहीन असावेत ना! ज्या क्षणी फा-हियान 'प्रवासासाठी निघाला' येथपासून 'दुसऱ्या दिवशी ग्रीष्म ऋतूच्या अखेरीस काही विश्रांती घेतल्यानंतर ते फा-हियान या यात्रेकरूस भेटण्यासाठी गेले.' यातील पहिल्या क्षणापासून ते 'दुसऱ्या दिवशी भेटण्यास गेले'- या दोनमध्ये पंधरा वर्षांचा कालावधी लोटलेला होता!

फा-हियानच्या पुस्तकात छोटी छोटी परिच्छेदवजा ४० प्रकरणे आहेत. प्रत्येक परिच्छेद किंवा प्रकरण म्हणजे एकेका प्रांताविषयी वा देशासंबंधी आहे.[२] त्याविषयी तो स्वतःच सांगतो-

[२] फा-हियानचा मार्ग पाहा- खोतान-चाकुका- आग्झी-पामीरचे पठार ओलांडून जंबद्वीपाकडे प्रयाण-हिंतू नदी (सिंधू)-उद्यान-नागरहारा देश- सुवस्तू-गांधार-तक्षशिला-पुरुषपूर-लोई (लक्की)-मथुरा-(मध्यदेशात पोहोचलो असे फा-हियान सांगतो-तांवतिंसम (मथुरेपासून दक्षिणेस चार योजने)- जैतवन विहार- कपिलवस्तू- ही यादी अशीच पुढे आहे. प्रत्येक ठिकाणचे आधीच्या ठिकाणापासूनचे अंतर आणि ते कोणत्या दिशेला आहे याचा तपशील फा-हियान देतो. शिवाय प्रत्येक ठिकाणाचे बुद्धाच्या संदर्भात असलेले महत्त्व व वैशिष्ट्यही तो विषद करतो.

'हे सध्याचे निवेदन केवळ संक्षिप्त सारांश आहे. फा-हियान मागे वळून त्या प्रवासातील तपशिलाकडे पाहत नाही. तो समुद्र उल्लंघून गेला आणि अनेक प्रकारे शीणशिणवटा घेऊनच परतला. त्याचबरोबर अनेक मोठे उच्च मानसन्मान मिळवण्याचा आनंदही त्याने लुटला. अनेकदा तो अत्यंत संकटात सापडला आणि त्यातून निभावूनही गेला. परंतु, त्याच्यावर काय प्रसंग गुदरले यावर पडदा टाकून त्याने तेथे काय पाहिले किंवा काय ऐकले याचा वृत्तांत सादर करण्यास तो आता अधिक उत्सुक आहे.'

फा-हियानच्या प्रवासवर्णनाचे स्वरूप म्हणजे कोणाला तरी उद्देशून सादर केलेले निवेदन याविषयी आता शंका उरत नाही.

या प्रवासाने त्याची पंधरा वर्षे व्यापलेली आहेत. शेन्त्सी प्रांतातील सिएन हे गाव सोडल्यापासून ते पश्चिमेकडील सिंधु नदी ओलांडेपर्यंतचा प्रवास सहा वर्षांचा आहे. खुद्द भारतात

तो सहा वर्षेच राहिला. त्यापैकी दोन वर्षे ओरिसात राहिला. आणि अखेरचा हिशोब लावायचा तर दोन वर्षे तो सिलोनमध्ये रहिला होता हे उघडच आहे. तीन वर्षे मायभूमीकडे परतीच्या प्रवासात गेली. सिएन सोडल्यापासून प्रत्येक टप्प्याचे वर्णन फा-हियान करतो. तो अखेरीस सांगतो की जी राज्ये त्याने पार केली त्यांची संख्या किमान ३० होती. खोतानच्या दक्षिणेपलीकडील आणि पश्‍चिमेकडील प्रांतांना तो 'उत्तरेकडील भारत' (इंडिया ऑफ द नॉर्थ) असे संबोधतोय. असे असले तरी, मथुरेपर्यंत पोहोचेपर्यंत आपण भारतात पोहोचलो आहोत असे तो क्वचितच समजतोय. मथुरा त्याच्या दृष्टीने भारताची जणू काही राजधानीच आहे.[३] या ठिकाणी तो जेव्हा पोहोचला तो क्षण तो पकडून ठेवू बघतोय. आणि इथूनच तो या देशाचे आणि या संस्कृतीचे जे वर्णन करतो ते म्हणजे त्याच्या रत्नखचित चित्रांपैकी एक आहे. इथल्या प्रदेशाचे तो वर्णन करतो, लोकांना असलेले संचाराचे मुक्त स्वातंत्र्य तो वर्णन करतो, इथे कुठेही पारपत्राचे निर्बंध व त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांना होणारा त्रास नसल्याचे सांगतो. न्यायदानाच्या बाबतीत, तसेच गुन्हेगारांना शिक्षा देण्याबाबत संयम, समतोल दाखवला जातो.

या ठिकाणी आपण हे लक्षात घेतले पाहिजे की फा-हियान ज्या काळात भारतात आला होता तो काळ होता उज्जैनचा राजा विक्रमादित्याचा. (चंद्रगुप्त- विक्रमादित्याने शकांचा पराभव करून त्यांची राजधानी उज्जैन जिंकून घेतली होती. मोठ्या दिमाखाने नगरात प्रवेश करून त्याने उज्जैन हीच आपली राजधानी बनविली होती.) कदाचित, पश्‍चिम भारतालाच उज्जैन हे नाव नव्हते ना? आणि मथुरा ही महानगरी. मथुरेच्या तुलनेत पाटलीपुत्रचे महत्त्व या काळात कमी झालेले दिसते. पाटलीपुत्र नगरी जुनी, काहीशी उदास वाटणारी तरीही भव्य-उदात्त होती. ती सम्राट अशोकाची राजधानी होती. तेथील राजभवने अद्यापही मनाला भुरळ पाडणारी होती. धार्मिक दृष्टीने सुद्धा ती कणखर आणि लक्षणीय नगरी होती. प्रत्येक प्रांतातून या ठिकाणी राजप्रतिनिधी नियुक्त केलेले होते. असे असले तरी व्यापारउदीमाच्या तसेच राजकीय दृष्टिकोनातून सुद्धा आपल्या लक्षात येते की फा-हियानच्या काळात भारताचे सत्ताकेंद्र हे मथुरेतच असले पाहिजे. मथुरेहून मार्गस्थ होऊन फा-हियान[४] संकाश्य आणि कनोजमार्गे बुद्धाच्या प्रदेशात अगदी थेट गाभाऱ्यात प्रवेश करतो.- ते म्हणजे- श्रावस्ती, कपिलवास्तू, कुशिनगर वगैरे ते थेट खाली गंगेपर्यंत. आता या भागात अनेक पुराणवस्तू संशोधकांनी अतोनात परिश्रम घेऊन उत्खननित स्थलांची शृंखलाच शोधून काढली आहे. गंगेपासून फा-हियान पाटलीपुत्रला परतला आहे. तेथून तो बनारस, कौशंबीकडे प्रयाण करता झाला आहे. आता पाटलीपुत्र हेच आपले मुक्कामाचे केंद्र करून तो तीन वर्षे बुद्धाच्या देशात राहिला. या ठिकाणी तो संस्कृतचे अध्ययन करतो आहे आणि हस्तलिखितांच्या नकला बनवतो आहे. अखेरीस गंगेमधून खाली चंपा राज्यातून प्रवास करीत ताम्लुक अथवा ताम्रलिप्तीला आला. इथे तो दोन वर्षे राहिला. ताम्रलिप्तीहून एका मोठ्या जहाजातून तो नैर्ऋत्येकडे निघतो तेव्हाच त्याचा

[३] मथुरेचे वर्णन करताना फा-हियान लिहितो- भारतात आतापर्यंत भेटलेले सर्वच राजे बुद्ध धम्माला श्रद्धापूर्वक मानणारे होते. भिक्खूंना मान देताना ते आपला राजमुकुट काढत असत. मंत्र्यांच्या आणि राजघराण्यातील व्यक्तींच्या समवेत ते स्वत:च्या हाताने बौद्ध भिक्खूंना जेवण वाढत असत आणि मुख्य भिक्खूच्या शेजारी खाली गालिचावर बसत असत. भिक्खूंच्या समोर ते आसनावर बसत नसत. तथागतांच्या काळापासून ही प्रथा चालत आलेली आहे.
मध्यदेशचे वर्णन करताना तो लिहितो- दक्षिणेकडील देशाला मध्यदेश म्हणतात. येथील हवामान सम आहे... लोक समाधानी व सुखी आहेत. त्यांना दरडोई कर द्यावा लागत नाही. तसेच राज्यकर्त्यांकडून त्याच्यावर कसलेच बंधन घातले जात नाही... लोकांना वाटेल त्या प्रदेशात जाण्याचे किंवा राहण्याचे स्वातंत्र्य आहे. राज्यात फाशीची शिक्षा दिली जात नाही. गुन्हेगाराला गुन्ह्याप्रमाणे शिक्षा दिली जाते... या देशातील लोक हिंसा करत नाहीत. दारू पीत नाहीत, त्याचप्रमाणे कांदा-लसूणही खात नाहीत. बाजारात दारू विकणारे लोक नाहीत.

[४] संकाश्य - मथुरेपासून दक्षिणेकडे अठरा योजने अंतरावर हा प्रदेश लागतो. आपल्या आईला तुसिता (तांवतिसं) स्वर्गात ९० दिवस धम्म शिकवून भगवान बुद्ध ज्या ठिकाणी उतरले तो प्रदेश म्हणजे संकाश्य. या ठिकाणी सम्राट अशोकाने एक चैत्यगृह बांधले असनू त्यात १६ फूट उंचीचे बुद्धरूप ठेवले आहे. त्याच चैत्यगृहाजवळ ३० हात उंचीचा अशोकस्तंभ आहे. त्यावर सिंहाकृती आहे. काचेसारख्या चकचकीत अशा या स्तंभाच्या चारही बाजूंस बुद्धाच्या आकृती कोरलेल्या आहेत. संकाश्यच्या उत्तरेकडे ५० योजने अग्निदग्ध चैत्यगृह आहे.

परतीचा प्रवास सुरू होतो. असे असले तरी, त्याने सिलोनमध्ये दोन वर्षे घालवली आहेत.

त्याचा हा प्रवास म्हणजे बौद्ध धर्माच्या संकल्पनांशी संबंधित असा आहे. त्यामुळे तो शांतपणे या देशातील सर्व गोष्टींकडे दुर्लक्ष करतो आहे. त्याविषयी बहुव्यापक संज्ञा म्हणून वापरतो. त्याच्या लेखनातून आपल्याला या देशाच्या तत्कालीन परिस्थितीविषयी बरीच माहिती मिळू शकते. पहिल्या प्रथम म्हणजे- आपल्या लक्षात येते की- ज्याने गांधारमध्ये तसेच वायव्य सरहद्दीवरील राज्यांमध्ये, तसेच खुद्द भारतात (किंवा फा-हियानच्या शब्दात मध्यवर्ती भारतामध्ये राहून India of the Middle) राहून त्याने बौद्ध धर्माचा सखोल अभ्यास केला होता, अशा एका विद्वान चिनी पंडिताच्या दृष्टीने ही भूमी म्हणजे अद्यापही ज्या ठिकाणी बुद्धाच्या मूळ व अस्सल मूर्तींचा शोध घ्यायला पाहिजे अशीच होती. अर्थात पुढे सातव्या शतकात आलेला युआन श्वांगदेखील आपल्याला हेच पण अधिक ठासून सांगतो. गांधार, स्वात, दरडा, उद्यान, तक्षशिला, पुरुषपूर आणि नागरा (बहधा काबूल) हा सारा प्रदेश पायाखाली तुडवूनही आपला प्रवासी इथे कुठेही नाही तर ताम्रलिप्तीमध्ये दोन वर्षे ग्रंथांच्या नकला करीत, बुद्धाच्या प्रतिमांची चित्रे रेखाटत घालवतो आहे. शिवाय, फा-हियानने ज्यावेळी भेट दिली त्यावेळी, तो आपल्याला सांगतो त्यानुसार - राजगीर हे पूर्णपणे उजाड झालेले असून त्या ठिकाणी लोकवस्तीही फारशी उरलेली नव्हती. याचा अर्थ असा दिसतो की जे स्थळ आजही कोरीव कामासाठी आणि मूर्तीकलेसाठी संपन्न आहे, आणि शिल्पकला आणि वास्तुकलेच्या शिक्षणाचे केंद्रच आहे, ते स्थळ इ.स.च्या ४०० वर्षांपूर्वीच विकसित झालेले होते, भरभराटीला आलेले होते; आणि त्याचा ऱ्हास सुद्धा झालेला होता. ही बाब अत्यंत महत्त्वाची अशी आहे. फा-हियानच्या प्रवासवृत्तात आपल्याला पवित्र तीर्थक्षेत्रे सतत भेटत राहतात. त्या स्थळांमधील मंदिरं, मठ आणि स्तूप यामुळे ही स्थळे लक्षात राहतात.

फा-हियानच्या अभ्यासाच्या अनेक उद्दिष्टांपैकी शिल्पकला हे एक त्याने निवडलेले उद्दिष्ट होते. बौद्ध मंदिरांत बुद्धाच्या मूर्ती असणारच आणि स्वतः फा-हियान सुद्धा बौद्ध शिल्पकलेच्या ऐतिहासिक पैलूंविषयी जिज्ञासूपणे आपल्याला सांगतो,- 'बुद्धाच्या मूर्तींपैकी सर्वात प्रथम निर्माण झालेली मूर्ती म्हणजे चंदनात कोरलेली गोशीर्ष रूपातील मूर्ती होय. पुढील काळात याच मूर्तीचे अनुकरण करून कलाकारांनी मूर्ती घडविल्या आहेत. ज्यावेळेस भगवान बुद्ध आपल्या आईला तुषिता स्वर्गात[५] बौद्ध धर्माचा उपदेश देण्यासाठी नव्वद दिवसांसाठी गेले होते त्यावेळी त्यांच्या दर्शनासाठी आसुसलेल्या राजा प्रसेनजीत याने चंदनामध्ये कोरलेली गोशीर्षरूप बुद्ध मूर्ती बनवून घेतली अशी कहाणी आहे. या ठिकाणी फा-हियानने मूर्ती आणि बोधचिन्ह यातील फरक लक्षात घेतलेला दिसत नाहीय. तथापि, फा-हियानचे वरील विधान हेच दर्शविते की चौथ्या व पाचव्या शतकातील लोक पूर्वेकडील प्रांताकडे आणि बुद्धाच्या स्वतःच्या कर्मभूमीकडे बौद्ध मूर्तिकलेचा ऐतिहासिक स्रोत म्हणूनच बघत होते आणि

[५] तृषित स्वर्ग – हा काल्पनिक नसून भौगोलिक सत्य आहे असे आपल्याला अनेक पुराव्यांवरून म्हणता येते. उदा. दशरथ राजा इंद्राच्या मदतीसाठी स्वर्गात गेला व परत आला, असा उल्लेख रामायणात आहे. अर्जुन नृत्य शिकण्यासाठी स्वर्गात जाऊन परत आल्याचे महाभारतात म्हटले आहे. तेव्हा ही भौगोलिक कल्पना असली पाहिजे.

तिबेटला स्वर्गभूमी असेही नाव आहे. 'आर्यविद्यासुधाकर' या ग्रंथात 'त्रिविष्प' असे म्हटले आहे. तिबेट हा त्रिविष्पचाच अपभ्रंश आहे. तिबेटला किन्नर खंड, किंपुरुष खंड अशीही नावे आहेत. अर्जुन नृत्य शिकण्यासाठी म्हणूनच तेथे गेला होता? तुषिता हा चौथा स्वर्गलोक असल्याचे म्हटले आहे. (पाली कोष) हिमालयाच्या अनेक रांगा आहेत. त्या पार करत एकेक प्रदेशात जाता येते. त्या अर्थाने तुषिता हा चौथा स्वर्गलोक असावा का? शिवगण ही संकल्पना ही अशीच पौराणिक नसून वास्तव भौगोलिक कल्पना आहे. हिमालय म्हणजे शिव. यक्ष, गंधर्व, किन्नर, नाग या त्या भागातील जनजाती आहेत. भूतिया लोकांचा भूतान. तिबेटातही भूतियांची वस्ती. महाभारतातील स्वर्गारोहणाचे वर्णन म्हणजे हिमालयातून कशा कशा पद्धतीने मार्गक्रमण केले, ती सारी नावे भौगोलिक नावे आहेत. स्वर्ग त्यामुळे वर कुठेतरी आकाशात नसून तो इथेच उत्तरेकडे या अर्थानं वर आहे.

बुद्धाचा जन्म नेपाळात (तराईच्या जंगलात), तेथून तिबेटात म्हणजे स्वर्गात जाणे-येणे चालत असले पाहिजे. तिबेट हा बौद्ध प्रदेशच आहे. राजा राममोहन राय हेही बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी तिबेटमध्ये गेले होते. हिमालयातील एव्हरेस्ट शिखर केंद्रबिंदू मानला तर त्याच्या चारही दिशांना गेलेल्या हिमालयाच्या रांगा वळ्या-वळ्यांसारख्या दिसतात. त्या रांगांनाच 'सटा' (म्हणजेच जटा) असे नाव आहे. शंकराच्या जटा, त्याचा हिमधवल वर्ण, गजचर्म परिधान केलेला. तराईच्या जंगलात हत्ती सापडतात, वर नाही. म्हणून कमरेखाली गजचर्म परिधान केले आहे. लोहिया म्हणतात तसे हे एक अतिभव्य रमणीय रूपक आहे. शिवसंकल्पना अशी व्यावहारिक व भौगोलिक कल्पना आहे.

पुन्हा सिंधू नदीच्या ईशान्येकडे, अफगाणिस्तानच्या पूर्वेला आणि हिंदुकुशाच्या दक्षिणेकडे असलेल्या थो-ली प्रदेशातून प्रवास करताना (किंवा फा-हियानने सूचित केल्याप्रमाणे दर्द जमातीच्या दरडा प्रांतातून प्रवास करताना) फा-हियान सांगतो की या राज्यातील कुणा विशिष्ट शिल्पकाराला मैत्रेय बोधिसत्त्वाची अंगकाठी-चेहरेपट्टी, नाकी-डोळी यांचा अभ्यास करण्यासाठी तुषिता स्वर्गात पाठविण्यात आले होते. तीन वेळा तो शिल्पी तेथे गेला व जेव्हा परत आला तेव्हा त्याने अतिभव्य अशी आठ फूट उंचीची मूर्ती बनविली. खास उत्सव वा समारंभाच्या प्रसंगी ही मूर्ती उजळून निघत असे, आसपासचे राजे तिची नियमाने पूजाअर्चा करीत असत. तशी प्रथाच पडून गेली. फा-हियान आपल्याला सांगतो ही मूर्ती आजही त्या ठिकाणी अस्तित्वात आहे. फा-हियान आपल्याला पुढे सांगतो – 'ही मूर्ती बनविल्यानंतरच पुढे बौद्ध धर्मप्रचारक सिंधूच्या पलीकडील दूरदूरच्या प्रदेशातून इकडे येऊ लागले. त्यांच्याबरोबर त्यांचे ग्रंथसंग्रहही आले नि त्यांची पवित्र धर्मबंधने-नियमही येऊ लागले. ही मूर्ती भगवानांच्या निर्वाणानंतर ३०० वर्षांनी उभारण्यात आली होती.'

या ठिकाणी अनेक गोष्टी आपल्याला कळतात. एक तर भगवान बुद्धाच्या महानिर्वाणानंतर तीनशे वर्षांनी ज्यावेळी बौद्ध धर्माने सिंधू नदी ओलांडली होती त्यावेळी तो बोधिसत्त्वांचा धर्म बनलेला होता. अर्थातच त्याही पूर्वी एकेकटे फिरणारे संत असले पाहिजेत. आणि कदाचित मठवासी भिक्षूंचे संघही असले पाहिजेत, ज्यांच्याकडे अद्याप ग्रंथ नव्हते. अन्यथा ग्रंथांशिवाय कोणा अर्हताने कुणा शिल्पीला तीन वेळा तुषिता स्वर्गाकडे पाठविणे कसे शक्य होते? तेसुद्धा भगवानांच्या निर्वाणानंतर ३०० वर्षांनी? परंतु त्या ठिकाणी अचानकच बौद्ध संस्कृती उदयाला आली, भगवानांच्या निर्वाणानंतर ३०० वर्षांनी आणि ती संस्कृती होती महायान बौद्ध संस्कृती!

अशा प्रकारे महायान सिद्धांत बौद्ध धर्मातील साऱ्या महापुरुषांच्या मंदिरांनी, मूर्तींनी आणि ग्रंथसंग्रहांनी – जे ग्रंथ कनिष्काच्या काळात धर्मग्रंथ म्हणून मान्यता पावले– सुसज्ज होऊन अभिव्यक्त होताना दिसतो. आणि पुढे कनिष्काच्या काळात औपचारिकरीत्या स्वतंत्र पंथ म्हणून उद्घोषित झालेला दिसतो. मात्र हा महायान पंथ हीनयान पंथाप्रमाणेच खुद्द भारतातून (मध्य देशातून) आलेला आहे. मगध, कौसल आणि वैशाली या राज्यांना हा सन्मान मग प्राप्त होण्यास प्रत्यवाय नाही. कारण बौद्ध धर्ममताप्रमाणेच परिपूर्ण स्वरूपातील बौद्धकलेचा उगम त्यांच्या राज्यातच झाला.

याशिवाय खुद्द मगधामध्येच शिल्पकलेचे महान युग होऊन गेले हे स्पष्ट होते. अशोकाची राजधानी असलेल्या पाटलीपुत्राविषयी हा चिनी प्रवासी आपल्याला सांगतो, – 'नगरातील राजमहालांच्या भिंती पाषाणाच्या असून हे पाषाण म्हणजे अतिमानवी शक्तीनेच रचले असावेत. गवाक्षांना सुशोभित करणारी शिल्पे नि कोरीव काम तर असे आहे की या काळात कशाचीच त्याची तुलना होऊ शकत नाही. आजही हे काम अस्तित्वात आहे.'

मुघल बादशाहांनी बांधलेल्या संगमरवरातील भव्य वास्तू अथवा आधुनिक काळातील बनारसमधील बेसॉल्टच्या पाषाणातील खोदकाम ज्यांनी पाहिले आहे त्यांना फा-हियानचे म्हणणे फारसे पटणार नाही. तरी सुद्धा ही वस्तुस्थिती आपण नाकारू शकत नाही की फा-हियानसारख्या एका निःसंशय प्रामाणिक साक्षीदाराने आपल्याला पाचव्या शतकाच्या प्रारंभी मगध राज्यात एक अत्यंत प्राचीन आणि कलात्मकतेच्या दृष्टीने महान कलाकृती अस्तित्वात असल्याचे खात्रीलायकपणे सांगितले आहे.

फा-हियानच्या मार्गातील सर्वात मोठी अडचण हीच होती की लिखित दस्तावेज फारसे उपलब्ध नव्हते. प्रत्येक ठिकाणी त्याने ग्रंथांची चौकशी केली असता त्याला समजले की बौद्ध धर्माचे तत्त्वज्ञान आणि उपदेश मौखिक मार्गाने गुरूकडून शिष्याकडे दिले जात होते, आणि अशा प्रकारे स्मरणानेच जतन करण्याची परंपरा होती. प्रत्येक ग्रंथासाठी स्वतंत्र गुरू अथवा आचार्य असे.

अखेरीस, बुद्धाच्या देशातील महान 'विजय मंदिरात' त्याला जे हवे होते ते प्राप्त झाले. आणि त्या ठिकाणीच त्या हस्तलिखितांच्या नकला करण्यासाठी तो तीन वर्षे थांबला. ते दस्तावेज कशासंबंधी होते हे तर महत्त्वाचे होतेच, त्याहीपेक्षा अनेक प्रश्नांवर त्यामुळे महत्त्वाचा प्रकाश पडतो, हे आपल्या लक्षात येते. अन्यथा हे आपल्याला कसे कळते की शेकडो वर्षे बौद्ध सिद्धांताची शुद्धता टिकवून धरण्यासाठी आवश्यक असलेली चिकाटी त्यामागे आहे, इतके प्रचंड वाङ्मय पठण करून जतन करण्यासाठी आवश्यक असलेली ऊर्जेची एकाग्रता यामागे आहे? त्यावरूनच बौद्ध धर्मातील अत्यंत नीतीमान व्यवस्थेची आणि परिपक्वतेची कल्पना येऊ शकते.

फा-हियान अनेकदा आपल्याला सांगतो– 'बौद्ध भिक्षूंचा प्रामाणिकपणा, नीतिमत्ता, प्रगल्भता आणि पावित्र्य यांची प्रशंसा केली पाहिजे. त्याचे शब्दात वर्णन करणे अशक्य आहे.' – आणि या गुणांमुळेच, या वृत्तीमुळेच बौद्ध मठांची पुढे विश्वविद्यालये बनली. फा-हियान जे सांगतो त्यावरून

बौद्धमताचे सर्वसमावेशकत्व स्पष्ट होते. कनिष्काच्या काळात बौद्धमतात अठरा विविध दर्शन शाखा समाविष्ट झाल्या होत्या, हे सारे परस्परांशी सुसंगत असून त्यात परस्पर विरोधाचा भाव नाही. हे कनिष्काच्या काळात म्हणूनच औपचारिकरीत्या प्रस्थापित होऊ शकले. पूर्णतः वेगळ्याच विषयाकडे निर्देश करीत असे म्हणावेसे वाटते की त्यामुळे हेही स्पष्ट होते, की प्राचीन पुराणांची पहिली लिखित संहिता ही अत्यंत स्पष्टपणे प्राचीन मूळ पुराणाची अस्सल संपादित आवृत्ती असते. त्यावरून आपल्याला पालीपासून संस्कृतकडे[६] बदल कसा झाला असावा तेही दृष्टोत्पत्तीस येते आणि भारतीय

[६] पाली ते संस्कृत की संस्कृत ते पाली? याविषयी दोन मते/सिद्धांत दिसतात. संस्कृत–प्राकृत–आधुनिक प्रचलित भाषा हा सर्वसाधारणपणे स्वीकारलेला सिद्धांत. तथापि, अलीकडे खैरे विश्वनाथ यांनी मांडलेला विचार सांगतो की प्राकृत भाषांवर संस्करण होऊन संस्कृत भाषा निर्माण झाली. काही उदाहरणे पाली शब्दांची घेतली तर हे लक्षात येईल. चम्म–चर्म, धम्म–धर्म, भिक्खू–भिक्षू, तमिळचा अभ्यास करून खैरे यांनी हा सिद्धांत मांडला. निवेदिता या ठिकाणी पालीकडून संस्कृत असा उल्लेख कशाच्या आधारावर करतात हे शोधले पाहिजे.

इतिहासाच्या लिखित दफ्तराची कमतरता का आहे यामागील कारणही लक्षात येते. हे सारे ग्रंथ पठण करून जतन करण्यात आले आहेत. या ठिकाणी फा–हियान आपल्याला सतत सांगतो की बौद्ध मठांना जमिनी दान देताना राजे त्यांच्या कर्तृत्वाचे अभिलेख लोहस्तंभांवर मुद्रित करून ठेवत असत. आज हे सर्व उपलब्ध का नाही याचे आश्चर्य वाटायला नको. तुलनेने नंतरच्या काळात तांबे, पितळ यांचा उपयोग असे अभिलेख कोरण्यासाठी करण्यात येऊ लागला असावा, ज्यायोगे, कर्तृत्वाचे इतिहास चिरकाल मुद्रांकित केलेले राहतील. ताम्रलिप्तीमध्ये हस्तलिखितांसंबंधी काही अडचण आल्याचा उल्लेख फा–हियान करीत नाही, ही बाब कुतूहल जागविते. तसेच सिलोनमध्ये पण. सिलोनमध्ये फा–हियानच्या भेटीपूर्वी दोन ते तीन शतके संहितीकरण होण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे त्याचा फायदाही झालेला दिसतो. त्यावरून आपल्या लक्षात येते की मगध आणि कोसल बौद्धमताच्या विविध टप्प्यांत बौद्ध तत्त्वज्ञानाचा मूलस्रोत होते, एकापाठोपाठ एक येणारे बौद्ध संकेतांचेही मूलस्रोत होते; तसेच धर्मविषयक ज्ञान हे मौखिकऐवजी लिखित स्वरूपात जतन केले जावे व पुढील पिढ्यांकडे सुपूर्द करावे अशी अंतःप्रेरणा निर्माण झालेले पहिले राज्य होते.

फा–हियानच्या लिखाणातून उत्तरेकडील भारत किंवा सिंधू नदीपलीकडचा गंधार प्रदेश आणि खुद्द भारत (मध्यदेश) हा फरक मग तो ज्ञानाच्या बाबतीत असेल वा धर्मश्रद्धेच्या बाबतीत असेल – अतिशय लक्षणीयरीत्या स्पष्ट होतो. आणि काहींचा जो समज आहे की गांधारमध्येच बौद्ध संस्कृती तिच्या प्रारंभीच्या नि प्रेरक स्वरूपात उदयाला आली, तो समजही फा–हियान समाधानकारकरीत्या खोडून काढतो. गांधार बौद्ध संस्कृतीचे प्रेरणास्थान नव्हते. उलट गांधार याबाबत केवळ ग्रहण करणारा नि साध्य करणारा देश होता, देणारा– प्रेरक अथवा निर्मितीचा मूलस्रोत नव्हता.

जणू काही फा–हियाननं भविष्यकाळात आपल्याला अभ्यासाच्या दृष्टीने आवश्यकता पडेल हे जाणून या ठिकाणी नोंदविले आहे की – खुद्द भारतात परतल्यावर (म्हणजे उघडच कोसल राज्यातील चि–होनान अर्थात 'महान विजय मंदिरात', परत आल्यानंतर) त्याचा अखेरपर्यंत सोबत राहिलेला साथी ताओ चिंग याने जेव्हा शनीनचा कायदा आणि सर्व भारदस्त वर्तन करणारे सदभिरूचीसंपन्न आणि अत्यंत गौरवास्पद वर्तन असलेले बौद्ध भिक्षु पाहिले तेव्हा तो उसासा टाकत म्हणतो की चीनच्या सीमावर्ती प्रदेशातील रहिवासी तत्त्वबोधाच्या बाबतीत अधुरेच होते. किंबहुना नीतीनियमांचे उल्लंघन करणारे पापीच होते. तो पुढे असेही म्हणतो जर कधी तो बुद्ध बनू शकलाच तर चीनच्या सीमावर्ती प्रदेशात तो कदापि जन्म घेऊ इच्छिणार नाही. एवढेच लिहून तो थांबला आणि तो कधीही परतून आला नाही. फा–हियानची मात्र सर्वात पहिली आकांक्षा हीच होती की या तत्त्वज्ञानाचा प्रसार दूर दूरच्या देशात व्हावा आणि हान प्रदेशात तर ते अंतर्यामी पसरावे. त्यामुळे 'ताओ चिंग' येथेच राहिला तरी फा–हियान मात्र एकटाच आपल्या मायदेशी परतला.

या उत्तरेकडील भारताविषयी आपल्याला आणखी काही तपशील मिळतो. बुद्धपूर्व बौद्ध धर्म निःसंशयपणे अस्तित्वात होता. खुद्द बुद्धाच्या काळात हा बुद्धपूर्व धर्म बुद्धाचा चुलतभाऊ देवव्रत याच्या रूपात आपल्याला दिसतो. आणि हा बौद्ध धर्म फा–हियानच्या काळात गांधार प्रदेशात मोठ्या प्रमाणात प्रचलित होता. मध्यदेशात मात्र नव्हता. बुद्धाच्या पूर्वजन्मांच्या कथा–जातककथा – याही या प्रदेशातील प्रतिभेच्या आविष्कारातून निर्माण झालेल्या होत्या. आणि त्या ठिकाणी स्तूप होते. बोधिसत्त्वाने विविध जन्मांत आपले डोळे दान केले, आपले मस्तक दान केले, तसेच कबुतराला वाचविण्यासाठी त्याच्या वजनाचे आपले मांस देऊ केले (शिबी जातक), आणि भुकेल्या

वाघिणीला स्वतःचा देह भक्ष्य म्हणून देऊ केला, अशा कथांची स्मृती जतन करणारे ते स्तूप होते. ज्या देशामध्ये हीनयान बौद्ध धर्म होता आणि ज्या देशात महायान बौद्ध धर्म होता त्या दोहोंत फरक केल्यावाचून आपल्याला राहवत नाही. कारण फार प्राचीन कालापासून बौद्ध भिक्खू ते व्रत चालवत होते आणि आपल्या लक्षात येते, उद्यान हे पूर्णपणे महायानपंथी होते. उद्यान म्हणजे राजाचे निवासस्थान, हे नावावरूनच स्पष्ट होते. उद्यान हे कदाचित कुषाणांची मायभूमी असावी. उद्यानचा उल्लेख उज्जैन असाही झाला आहे. उज्जैन हे महाभारतकालीन उत्तरेकडील तीर्थांपैकी एक असल्याचा उल्लेख येतो. आणि खरोखर असे दिसते की ज्यावेळी उत्तर गुप्तकालीन राजांच्या काळात हिमवंताचे विभाजन होत महाभारतातील स्थाने निर्माण होत होती. त्यावेळी पश्चिमेकडील प्रदेशांचा जातककथांची स्थाने म्हणून थेट आणि जाणीवपूर्वक स्वीकार केला गेला.

फा-हियानने अशा प्रकारे इतिहासाचे असंख्य धागे मोठ्या उदारपणे सोडले आहेत. पण त्यांचा पाठपुरावा करण्याच्या नादात तो स्वतःविषयी काही सांगतो त्याकडे दुर्लक्ष होता कामा नये. उदा. जुन्या राजगीरमधील 'गृध्रकूट' टेकडीवरील गुंफेला फा-हियानने भेट दिली तो प्रसंग. या गुंफेत भगवान बुद्ध ध्यान करीत असत म्हणून या स्थानाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. फा-हियानच्या या गुंफेच्या भेटीविषयी ज्याने वाचले आहे तो हा प्रसंग कदापि विसरणार नाही.

तो प्रसंग असा आहे,- फा-हियानने नव्या नगरीत अत्तर, फळे आणि दिव्याचे तेल विकत घेतले. दोघा वृद्ध भिक्खूंना बरोबर घेऊन तो 'खी-चे' टेकडीकडे, तेथील अद्‌भुत गुंफेकडे गेला. अत्तर नि फळे देवाला अर्पण केल्यानंतर त्याने दिवे लावले. दिवे अधिकच तेजाळले. भावातिरेकाने त्याच्या डोळ्यांत पाणी उभे राहिले. तो म्हणाला- 'कधीतरी याच ठिकाणी भगवान बुद्ध अवतरले होते. याच ठिकाणी बुद्धांनी 'शेओन- लेंग- यान'[७]- या पाठावर प्रवचन केले होते. बुद्धांना प्रत्यक्ष पाहण्याचे भाग्य फा-हियानला लाभले नव्हते. मात्र फा-हियान त्या गुंफेत बुद्धांच्या वास्तव्याच्या खुणा याचि देही याचि डोळां पाहत होता. या ठिकाणी सुरंगमसूत्रांचे पठण करणे काही अद्‌भुत अनुभव होता. आणि या ठिकाणी एक रात्र वास्तव्य करणे हाही काही वेगळाच अनुभव होता. काही खास!

निवेदिता म्हणतात- अत्यंत उत्साही आणि आपल्या श्रद्धेखातर व देशाखातर वाटेल ते परिश्रम करायला तयार असलेला फा-हियान याहीपेक्षा काही अधिक होता.

त्याच्या त्या गंभीर नि विनम्र व्यक्तिमत्त्वामध्ये अत्यंत संवेदनशीलतेने झंकारणारी एक तार होती. घराच्या आठवणीने... घराच्या ओढीने छेडलेली तार...! फा-हियान जेव्हा दक्षिण चीनमध्ये पोहोचला त्यावेळी स्वत:विषयी तो म्हणतो, ''अत्यंत कळवळून तो पुनश्च चँगचे दर्शन घेण्यास उतावळा झाला होता. परंतु, दक्षिण चीनमध्ये तो थांबला. हृदयाशी जपून बरेच काही आणले होते. ते ओझे उतरावयास हवे होते. दक्षिण चीनमध्ये त्याच्या वरिष्ठांनी त्याचे पवित्र ग्रंथ नि बौद्ध तत्त्वज्ञानाचे ग्रंथ प्रकाशित केले. तोपर्यंत त्याला दक्षिणेत थांबणे भाग पडले.''

थोडक्यात फा-हियान आपल्या गावाकडे परतण्यास होणाऱ्या विलंबाबद्दल स्वतःला अशा प्रकारे माफ करतो. परंतु, चीनच्या किनाऱ्यावर पाऊल ठेवल्यानंतरही आपल्या जन्मगावाविषयी त्याला ही ओढ वाटत असेल तर मग तो परदेशात असताना १५वर्षांच्या प्रदीर्घ वास्तव्यात त्याची मायभूमीविषयीची भावना काय असेल? आपण कल्पना करू शकतो.

सिलोनमध्ये बहुधा अनुराधापूरम् येथे नीलमच्या बुद्धमूर्तीपुढे बसलेला असताना फा-हियान आपल्याला काही सांगण्यासाठी सवड काढतो आणि लिहितो, ''फा-हियानने हान भूमी सोडल्याला आता बरीच वर्षे लोटली आहेत. या काळात ज्या लोकांबरोबर तो मिळून मिसळून राहिला ते परदेशातील लोक होते. डोंगरदऱ्या, झाडेझुडपे जे जे काही डोळ्याला दिसत होते ते ते त्याला पूर्णतया अनोळखी होते आणि त्याहीपेक्षा ज्यांनी त्याच्याबरोबर प्रवास सुरू केला होता ते त्याच्यापासून विलग झालेले होते, काही मागे राहिले होते, तर काही मृत्यू पावले होते. भूतकाळाचा विचार करीत असताना त्याचे हृदय विवेकशील आहे, पण त्याच वेळी उदास झाले आहे. आणि अचानक नीलकांती बुद्धमूर्तीसमोर उभा असताना त्याचे लक्ष वेधले गेले ते एका व्यापाऱ्याकडे! त्याच्या हातात त्सिन देशातला (चीन) पांढरा ल्युटसच्या तारांचा पंखा होता. तो व्यापारी भगवानांच्या चरणी तो पंखा अर्पण करीत होता. दुसरे कोणी त्याच्याकडे पाहत नाहीये हे पाहून फा-हियान भावनातिशयाने उचंबळून आला आणि त्याच्या डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहू लागले.''

फा-हियानने ज्या उच्चशिक्षित वरिष्ठांच्या सभेला आपल्या यात्रेचे इतिवृत्त सादर केले, त्यांच्यातर्फे त्यावर साधी सुधी पण सुंदर स्वाक्षरी केलेली आहे. त्यांची फा-हियानशी

[७] सुरंगम सूत्र

भेट कशी झाली, त्यांनी त्याच्याबरोबर कशाप्रकारे चर्चा केली, कशी प्रश्नोत्तरे झाली या विषयी ते आपल्याला सांगतात. फा-हियानच्या शब्दांनी त्यांना विश्वास उत्पन्न झाला. त्याची श्रद्धा, त्याने आत्मविश्वासपूर्वक केलेले पठण- या विषयी सांगून चीनच्या विद्यापीठाचा तो लेखनिक किंवा शाही भूगोल संघटनेचा चिटणीस-( जे काही असेल तो) फा-हियान त्यांचा उल्लेख 'मास्टर्स' असा करतो. तो समारोप करतो-

''ते त्याच्या शब्दांनी हेलावून गेले. आपल्याला अशी एक चांगली प्रामाणिक व्यक्ती मिळाली या भावनेने ते प्रभावित झाले होते. त्यांनी आपसात चर्चा करून असे लक्षात घेतले की फारच थोड्या व्यक्ती अशा असतात, ज्या तत्त्वज्ञानाच्या शोधार्थ स्वदेशाचा त्याग करतात. परंतु, त्या व्यक्तींना अंतिम सत्याच्या ज्ञानाच्या तृष्णेसाठी 'स्व'चा विसर पडत नाही, जसा फा-हियानला पडला होता. सत्याच्याबरोबर येणारा निर्धार, समर्पित भावना असणे आवश्यक आहे. अन्यथा आपण प्रांजळपणा निर्माण करणाऱ्या आंतरिक उत्साहाचा हिस्सा बनू शकत नाही. गुणवत्ता आणि प्रयत्न यांच्या साहाय्याने एखादी गोष्ट प्राप्त केल्यावर मग व्यक्तीला कोणी विस्मृतीत फेकून देईल, हे कसे शक्य आहे? जे अमूल्य आहे ते हरवून जाणे आणि मानवजात जे हरवून बसलेली आहे त्याचा सन्मान करणे हे खूप काही विशेष आहे.''


मूळ लेख : **भगिनी निवेदिता**
(फूटफॉल्स ऑफ इंडियन हिस्ट्री)
भावानुवाद : **सुहासिनी देशपांडे**
३, पुण्यश्री अपार्टमेंट, लेन नं. ७,
डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे-४११०३८
दूरध्वनी : (०२०) २५४३७६२१
भ्रमणध्वनी : ९८२३५७१६७८



**वामनदादा कर्डक यांचे चरित्र व बाबूराव चंदावार यांचे आत्मचरित्र**




**एका कवीचे जीवनगाणे**

**बबन लोंढे**

**मूल्य १६० रुपये**
**सवलतीत १०० रुपये**




**मनस्वी**

**बाबूराव चंदावार**

**मूल्य ५०० रु.**
**सवलतीत ३०० रु.**


शुभ दिपावली
नव्या घराचे किंवा नव्या कारचे
स्वप्न पहाताय का?
तुमच्या स्वप्नांची पूर्तता करा युनियन बँक होम लोन आणि कार लोन च्या सहाय्याने.
फेस्टिवल ऑफर
व्याजाचे दर घसरले
प्रोसेसिंग चार्जेस नाहीत*
• व्याजाचा दर 10.50% द. सा. इतका कमी
• 25 वर्षांचा प्रदीर्घ परतफेड कालावधी
• व्याजाचा दर 10.95% द. सा.
• 7 वर्षांचा प्रदीर्घ परतफेड कालावधी
कर्जासाठी ऑनलाइन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध
*ऑफ़र 26-01-2013 पर्यंत मान्य
www.unionbankofindia.co.in
टोल फ्री : 1800 22 2244
युनियन बँक ऑफ इंडिया
चांगले लोक चांगली बँक
Union Bank of India
Good people to bank with

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई आणि ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने

### यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीनिमित्त

## यशवंतराव चव्हाण जीवनदर्शन व ग्रंथयात्रा

ग्रंथाली

५ ऑक्टोबर ते ३० ऑक्टोबर २०१२

### ग्रंथयात्रेतील क्षणचित्रे

१. कल्याण





२. गोवेली





३. भिवंडी





४. टिटवाळा





## ५. वाडा





## ६. शहापूर





## ७. मुरबाड





## ८. औरंगाबाद





WISH YOU
HAPPY DIWALI
AND
A
PROSPEROUS
NEW YEAR



FROM
A WELL WISHER


सेंट्रल बँक ऑफ़ इंडिया
सेन्ट्रल बैंक ऑफ़ इंडिया
Central Bank of India
1911 पासून आपल्यासाठी "केंद्रित"
"CENTRAL" TO YOU SINCE 1911
आयएसओ २७००१:२००५ प्रमाणित
आनंदाने उत्सव साजरा करूया
परस्परांतील नाते दृढ करूया
उत्सवाची भेट
शुभ दिपावली
खालील योजनांवर
व्याज दरांमध्ये विशेष सूट • प्रक्रिया शुल्क नाही
सेंट होम लोन ❖ सेंट पर्सनल गोल्ड लोन
❖ सेंट वेहिकल ❖ पेंशन धारकांसाठी लोन
आणि
❖ सेंट कोम्बो (नवी योजना)
*अटी लागू
आम्ही पंतप्रधान राष्ट्रीय निवारण निधी (PMNRF) साठी सढळ हस्ते दान देण्याचे आवाहन करतो.
आम्ही ऑनलाईन देणग्या स्विकारतो. प्राप्तिकर कायदा १९६१ च्या कलम ८०जी च्या अंतर्गत देणग्या पूर्णपणे करमुक्त असतील.
www.centralbankofindia.co.in वर लॉग ऑन करा किंवा कस्टमर केअर नं.: १८०० २०० १९११ वर कॉल करा (टोल फ्री)
APEX/10-12/MAR

Supreme©
People who know plastics best

# दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा !

दिपावली म्हणजे
विलक्षण असा आनंदाचा सण
सुख, शांती, समृध्दी
यांचा त्रिवेणी संगम

सोबतच लाभावे आपणास
आरोग्याचे धन
पाणी व सांडपाण्याचे
करू या व्यवस्थापन

"सुप्रीम" पाईप्स् व फिटींग्ज
सदैव आपल्या सेवेत सक्षम




दि सुप्रीम इंडस्ट्रीज लि., मुंबई • जळगाव • गाडेगाव
www.supreme.co.in




| गृह कर्जे | ईएमआय ₹/लाख/महिना | |
|---|---|---|
| कर्जाचा कालावधी | ₹ 30 लाखांपर्यंत | ₹ 30 लाखांपेक्षा अधिक |
| 30 वर्षे | 878 | 889 |
| 25 वर्षे | 909 | 920 |
| 20 वर्षे | 966 | 975 |
| 15 वर्षे | 1075 | 1084 |
| व्याजाचा दर | 10.00% वार्षिक* | 10.15% वार्षिक* |

| कार कर्जे # | | |
|---|---|---|
| कर्जाचा कालावधी | ईएमआय ₹/लाख/महिना | व्याजाचा दर |
| 84 महिने | 1686 | 10.50% वार्षिक* |

अटी व शर्ती लागू.

*बँकेच्या आधार दराबरोबर जोडलेले, सध्या 9.75% वार्षिक

**ऑफर 31 डिसेंबर 2012 पर्यंत लागू.

- मुदतपूर्व कर्जफेडीवर दंड नाही
- जलद मंजुरी
- कमीतकमी ईएमआय
- व्याज दैनंदिन कमी होत जाणाऱ्या शिलकीवर
- #85% ''ऑन रोड प्राइस'' अर्थसहाय्य उपलब्ध

त्वरा करा ! अधिक माहितीसाठी तुमच्या नजीकच्या शाखेबरोबर संपर्क साधा

www.sbi.co.in वर लॉग ऑन करा किंवा 1800-11-22-11/1800-425-38-00 (टोल फ्री) वर कॉल करा

## डॉ. नरेंद्र जाधव यांनी अनुवादित आणि संपादित केलेली ग्रंथत्रिवेणी

# बोल महामानवाचे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची ५०० मर्मभेदी भाषणे










खंड एक
आत्मनिवेदन आणि मार्गदर्शन
(४२२ पाने)

खंड दोन
सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि कायदा-संविधान
(६९२ पाने)

खंड तीन
राजकीय
(५५६ पाने)

डिलक्स आवृत्ती संच मूळ किंमत २५०० रु. सवलतीत १६०० रु.
जनावृत्ती संच मूळ किंमत १२०० रु. सवलतीत ८०० रु.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रगाढ विद्वत्तेचे, त्यांच्या प्रकांडपांडित्याचे दर्शन घडते ते त्यांच्या कालानुरूप केलेल्या ओजस्वी आणि मर्मभेदी भाषणांतून. युवाशक्तीसाठी प्रेरक, कार्यकर्त्यांसाठी मार्गदर्शक, राजकारण्यांसाठी दिशादर्शक आणि सर्व समाजासाठी उद्‌बोधक ठरलेली त्यांची ही भाषणे म्हणजे आंबेडकरी विचारांचा मोलाचा ठेवा आहे.

डॉ. आंबेडकरांची भाषणे संकलित करण्याचे प्रयत्न आजवर अनेक अभ्यासकांनी केलेले आहेत. ते सारे स्तुत्य असले तरी ते मर्यादित स्वरूपाचे झाले आहेत. त्यांच्यात सर्वसमावेशकता नाही. महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केलेल्या 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग्ज अँड स्पीचेस' (BAWS) या खंडांमध्ये सर्वसमावेशकता आहे, मात्र त्यांत भाषणांची विषयवार आणि कालानुक्रमे संगतवार मांडणी करण्यात आलेली नाही.

एकूण एक, म्हणजे ५३७ मराठी, इंग्रजी, हिंदी आणि गुजराती भाषणांची समग्रसूची कालक्रमानुसार पहिल्यांदाच या ग्रंथत्रिवेणीत सादर करण्यात आली आहे. त्यापैकी केवळ इंग्रजीत आजवर उपलब्ध असलेल्या भाषणांचा अनुवाद करून, तब्बल ५०० भाषणे संपूर्णपणे मराठीत आणि तीदेखील विषयवार आणि कालानुक्रमे, संगतवार मांडणी करून या ग्रंथत्रिवेणीत सादर करण्यात आली आहेत. अशा पद्धतीचा हा पहिलाच प्रयत्न आहे.

# मौनाचे झरोके भले

**डॉ. यशवंत पाठक**

माझ्या गावाच्या आसपास सात-आठ वडगावे आणि पाच-सहा पिंपळगावे होती. वडांच्या विराट सावलीतून जाताना भर दिवसा उन्हाचे चांदणे व्हायचे आणि रात्री चंद्राचे ऊन व्हायचे... गावात वीज उशिरा आली. गाव लकाकले. विजेच्या प्रकाशात सारेच दिसले. दिव्याचे खांब रस्त्यावर आले. रात्रीही रहदारी सुरू झाली. विजेचे पंप आले. विजेची उपकरणे हळूहळू आली... दिव्यांच्या झगमगाटात दुकाने आली. बार वाढले. वेगवेगळे क्लब जन्माला आले. विविध वस्तूंच्या मार्केटिंगमधून हातात पैसा खेळू लागला. औद्योगिक वसाहतींनी नवा लुक दाखवला. शेतीपेक्षा कंपनीतली नोकरी महत्त्वाची ठरली. तो शहराचा झाला. खेड्यांपासून तुटला. मातीचे मनोगत मातीत गेले...

बालपण कंदिलाच्या प्रकाशात गेले. खेडेगावात गल्लीच्या कोपऱ्यावर ग्रामपंचायतीचा कंदील असे. संध्याकाळी कर्मचारी येई. कंदिलाची वात वाढवी. त्यात रॉकेल घाली. कंदिलाचा प्रकाश त्याच्या मर्यादेत पडे. तो स्वच्छ पडे. आसपासचे नक्की दिसे. कंदील मोक्याच्या जागेवर असत. वळणावरला त्यांचा प्रकाश उद्याचा दिवस वाचायची ताकद देई. रात्र आजच्यापेक्षा निवांत असे. दिवसाचे आवाज संध्याकाळीच थंडावत.

निर्सगातल्या पानांशी वारा खेळे. तेव्हा बऱ्यापैकी आवाज होई. कधी कधी वाऱ्याशी फांद्या खेळत. फांद्यांचे डोलणे फिरायला जाण्यासारखे वाटे. नदी तब्येतीत वाही. लाकडी फळ्यांनी तयार केलेला पूल शांत होई. पुलावर फारशी वर्दळ नसे. बैलगाड्या, ट्रक नदीतून जात. पुलावरून फक्त माणसे जात. नदीला पूर आला की, वाहतूक बंद होई. इतर वेळी नदी शांत असे. रात्री निरोप द्यायचा असेल किंवा कुठे जायचे असेल तर कंदिलाला सोबत घेऊन जावे लागत असे. सरपटणाऱ्या प्राण्यांची जास्त भीती वाटे. म्हणून कंदिलासोबत काठी ठेवावी लागे. माणसाला बघायला कंदिलाचा प्रकाश पुरेसा होता. वस्ती विरळ होती. माणसे फारशी दिसायची नाहीत. आठवडे बाजारात आसपासच्या गावांची माणसे आली तरच बऱ्यापैकी गर्दी होई. आठवडे बाजार म्हणजे लोकांच्या खुशाली कळण्याचे ठिकाण होते. भांड्याचे दुकान लावणाऱ्यांबरोबर त्यागावचे काही निरोपही असत. कापडाचे दुकानदार सुख-दु:खाच्या बातम्या घेऊन येत. भाजीविके घरपोच निरोप सांगत. त्यावेळी माणसे विरळ होती. पण ओळखी घट्ट होत्या. आपण कोणाच्यातरी उपयोगी पडतो आहोत ही भावना पक्की रुजलेली होती. माणसे माणसांना सांभाळून घेत होती. अडीअडचणींना धावून जायची. शांतता आनंदात नांदे.

माणसांच्या गरजा मोजक्या होत्या. साधेपणात स्वाभाविकता होती. वाड्यावाड्यात सायीसारखी मैत्री होती. गल्लीत काही खुट्ट वाजले, तर सगळी गल्ली धावून येई. कोणावरही आलेला प्रसंग हा आपल्यावर आला आहे असे

साऱ्यांना वाटे. सुख-दु:ख वाटून घेतले की सह्य होते. एकट्यावर पडले की माणूस वाकून जातो. तो उठतच नाही. आधाराशिवाय जगणे कठीण होते. आधार शोधायची गरज माणसे पडूच देत नसत. वेळप्रसंगी तीच एकमेकांचा आधार होत. त्यामुळे जगण्याला प्रसन्न शांतता होती. फिरायला निर्भय आकाश होते. बसायला अश्वासक माती होती. बोलायला अरण्य होते. गावागावात वृक्षांची रेलचेल होती.

माझ्या गावाच्या आसपास सात-आठ वडगावे आणि पाच-सहा पिंपळगावे होती. वडांच्या विराट सावलीतून जाताना भर दिवसा उन्हाचे चांदणे व्हायचे आणि रात्री चंद्राचे ऊन व्हायचे. हवा हवीहवीशी वाटे. गावात उन्हाळा जाणवत नसे. माझा गाव 'खानदेशाचे महाबळेश्वर'म्हणून ओळखला जाई. ख्यातकीर्त विनोदी लेखक चिं. वि.जोशींनी माझ्या पिंपळनेरला 'खानदेशाचे महाबळेश्वर' ही उपाधी दिली. नदीच्या वाळवंटात पायाला गोड चटके बसत. नदीत बुडी मारली की थंड वाटे. उन्हालाही नदीत पोहावेसे वाटे. झाडांना मुळातच ओलावा होता. मुळे मातीशी एकरूप झालेली होती. रस्त्यांचे डांबरीकरण थोडेथोडे होऊ घातले होते. शेताच्या मातीशी खेळताना तर मजा वाटे. कधीही सर्दी झाली नाही. छाती भरून येणे, अचानक धाप लागणे हे माहीतच नव्हते. गावातल्या वाटांना चढ होता. वळणांना उतरण होती. काही वाटा अनवट होत्या. काही काट्यांनी व्यापल्या होत्या. साबरी होत्या. कोरफडी होत्या. गुंजेची झाडे खूप होती. अशा वाटांवरून चालायला मजा वाटे. काट्यांना कौशल्याने ओलांडणे हे जीवनातले फार महत्त्वाचे शिक्षण आहे हे कळले. वाटांवरले चढ-उतार जगताना खूप उपयोगी पडले. या साऱ्यातून उगवतीचे रंग सहज झेलता आले. मावळतीच्या रंगातून संधिप्रकाशाची अक्षरे वाचता आली. निसर्ग आणि 'मी' चा भावसंवाद नव्या सृजनाची कळी फुलवणारा ठरला. यामुळे जगणे स्वाभाविक झाले. ही सहजता विद्या आणि कलांच्या अभिव्यक्तीला उपयोगी पडते. पक्षुपक्ष्यांच्या स्वरातून वेगळे भान आले. याने जगण्यात रसत्व निर्माण केले. या साऱ्यातून बालपण सहज तरुणपणात कधी लीन झाले ते उमजले नाही.

असे सहज वाढणे गावागावाचे वैभव होते. माणसे प्रेमळ होती. वाढता वाढता निसर्ग सखा झाला. खेळता खेळता बरेच काही कळू लागले. पारंब्यांना धरून झोके घेताना हात घट्ट झाले. विठ्ठलमंदिरात पखवाज वाजवताना मनगट लयबद्ध झाले. श्वासाला समंजसपण आले. निसर्ग वाचीत होतो. नदीशी बोलत होतो. वाळवंटात लिंगोरच्या खेळताना तळव्यातली खोली उघडली. पाय घट्ट झाले. खेळामध्ये खोटारडेपणा आला नाही. राज्य एकमेकांवर ढकलायचे असते, ही जाणीव कधी झालीच नाही. निसर्गामध्ये असे काहीच नव्हते. तशी पोरांमध्ये बारीक धुसपूस होती. बऱ्यापैकी तुझे-माझे होते. वाड्या-वाड्यातले हेवे-दावे कधी अंधारात चालत. क्वचित उजेडात चालत. शेताच्या बांधावर झालेली भांडणे तेवढ्यापुरती असत. शेतात चिखल झाला, की दोघेही प्रेमाने शेतात उतरत. भांडणाचे कारण किरकोळ असे. ते तेवढ्यापुरते असे. मनात फारसे वाईट कुजत नसे.

वृद्धांना गावात खूप मान असे. त्यांच्यापुढे बोलण्याची कोणातही हिंमत नव्हती. त्यांनी नुसती हाक दिली तरी नवीन पिढी घाबरे. ती त्यांचा शब्द झेलत. कारण त्यांचे सांगणे हितकर होते. त्यात स्वार्थापेक्षा एकोप्याची शिदोरी होती. कोणालाही न दुखावता सर्वांना सामावून घेण्याचे कसब होते. वृद्ध घरातले अलंकार होते. नमस्काराला आजी-आजोबा असणे हे आमच्या लहानपणी भाग्याचे लक्षण मानले जाई. असे आजी-आजोबा बहुतेक घरांत असत. ओसरीपुढल्या ओट्यावर ते न्यायनिवाडे करत. चावडीवर त्यांच्या शब्दाला मान असे. वेळ आल्यास ते सरपंचाला सुनावीत. एखाद्याचे पाऊल वाकडे पडायला लागले तर त्याला समजावीत. त्याने नाहीच ऐकले तर त्याचा यथायोग्य बंदोबस्त करीत. सगळ्यांचे संसार फुललेले असावे हा त्या मागचा उद्देश होता. सासूसुनांचे काहीवेळा खटके उडत. ते फटाक्याच्या लडीसारखे असत. पुन्हा जेवायच्या वेळी दोघे एकत्र येत. गावात सासुरवासाच्या केसेस फारशा नव्हत्या, हे विशेष होते.

घराघरात विधवा होत्या. बालपणात वैधव्य यायचे. जगण्याची समज बेताची असायची. त्यामुळे त्यांना उभा जन्म कष्टात काढावा लागे. त्यांच्या कष्टाला कुटुंबाच्या गोडव्याची किनार होती. सगळ्याच विधवा आक्रस्ताळ्या नव्हत्या. घराघरात थोडेतरी इकडचे तिकडचे व्हायचे. यापेक्षा त्यांचे करपलेले तारुण्य, त्या आम्हा मुलांना, जीव लावून हलके करत. त्या सतत कामात असत. त्यांची खोली ठरलेली असे. दिवेलागण झाली की त्या आपल्या खोलीत जात. अंधाऱ्या खोलीत चिमणीच्या मिणमिणत्या प्रकाशात हरिपाठ म्हणत. धान्यफराळ करत नि झोपी जात. उजाडले की त्या उठत आणि कामाला लागत. जात्यावर बसत. पिठातून त्यांच्या मनातल्या ओव्या गळत. दळणाच्या लयीत त्या संसाराच्या प्रतिमा होत. गळा सुरेल बने.

या सगळ्यात जगण्याची एक समान लय होती. त्यात एक सूत्र होते ते म्हणजे, सगळ्यांना बरोबर घेऊन जगणे. सगळ्यात सगळे होणे. त्यात 'मी'पणा सामावे. 'मी'चे

कोडकौतुक कमी असे. कुटुंबाचा प्रमुख कर्ता म्हणून जरी त्याला अधिकार असले तरी तो आपल्या वागण्यात सगळ्यांना सामावून घेई. जगण्यासाठी मला म्हणून जे जे काही हवे आहे, तसेच ते दुसऱ्यालाही हवे असते हे भान कंदिलाच्या प्रकाशातून आले. यामध्ये कुटुंबापेक्षाही वृत्तीची व्यापकता वाढीस लागली. मी माझ्यापुरते बघण्याचे कारण नाही. सख्ख्या भावाबरोबर चुलत भावालाही सारखेच कपडे शिवायचे. प्रत्येकाच्या वाटीत समान खाऊ असायचा. माझ्या मुलाला अधिक खाऊ द्यायचा असे आमच्या घरात कधी घडलेच नाही. कितीदा तरी सख्खे आणि चुलत हा फरक बाहेरच्यांना समजत नसे. ते सख्ख्याला चुलत मानीत आणि चुलत्यांना सख्खे मानीत. ज्याचे काम असे ते काम तो बिनबोभाटपणे करी. पुन्हा मी हे केले असे त्याने कधीही म्हटले नाही. माझे वडील घरात सगळ्यात मोठे होते. त्यांनी सगळ्यांचे केले हे मला कधीही सांगावे लागले नाही. माझे चुलतभाऊ, मावसभाऊ, मामेबहिणी हे सारे आपापसांत बोलत तेव्हा मला ते कळे. वडिलकी इतक्या मोठ्या मनाची होती, की त्या मनाने इतर मने आपल्यात सामावून घेतली होती.

मनाला निरोगी ठेवण्यात घरातले सारेच तरबेज होते. मनामनांच्या वागण्यातील सहजता हा निसर्ग होता. त्यातून स्वाभाविकपणाचे वाढणे मन मोठे करणारे होते. बाकीच्यांना उपाशी ठेवून मी बकाबका खात सुटणे हे पाप आहे, असे आमच्या मनावर कोरले जात होते. या साऱ्यातून वृत्ती स्वच्छ होत राहिली. वाचनाचा छंद यातून जडला. शब्दांची ओळख झाली. त्यांच्या घरातला झालो. वडील पहाटे उठून गायचे. आजोबा-आजी पहाटे भजन म्हणत. याचा संस्कार नकळत गळ्यात उतरला. त्यातून सुरांशी दोस्ती झाली. सुरांबरोबर भजनातला ठेका वडिलांनी टाळेतून दाखवला. त्यात गोडी निर्माण झाली. यातून जगण्यातली सम कळली.

आकाश वाचावे, आकाशातल्या रंगांना बघून मन मोहून जावे, ताज्या पानातल्या गंधाने ते तृप्त व्हावे, नदीच्या वाहत्या प्रवाहाने ते कसदार व्हावे, हे सारे अनुभवीत होतो. त्या गोष्टी आत्मसात करत होतो. नवीनवी पुस्तके आणीत होतो. आई-वडिलांचा आग्रह असे, नवा वाढदिवस साजरा करायचा तो नव्या पुस्तकासह. वडिलांची नव्या पुस्तकाची व्याख्या मला खूप भावली. वडील सांगत, 'नवे म्हणजे नवेकोरे नव्हे. जे



आपल्याला नवे करते, ते नवे पुस्तक.' वडिलांना जुनी दुर्मिळ पुस्तके गोळा करण्याचे वेड होते. यातून अनेक उत्कृष्ट पुस्तके मला मिळाली. त्यांच्या वाचनाने मन विकसित झाले. काही पुस्तकांनी विचार करण्याची सवय लावली. विनोबांच्या 'मधुकर'मधील लेखांनी प्रसन्नता दिली. सोनोपंत दांडेकरांच्या निरुपणाने संवाद कसा करावा ते समजले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या पुस्तकाने चिंतनाला वेगळे भान दिले. वि.स. खांडेकर, वि.वा. शिरवाडकर, विंदा करंदीकर यांच्या साहित्यातून वाङ्‌मयीन दृष्टी आली.

कालांतराने खेड्यातून नाशिक शहरात आलो!

आम्हाला आठवीत इंग्रजी हा विषय आला. इंग्रजी म्हणजे घोकंपट्टी. हे समीकरण सरांनी आमच्या डोक्यात बसवले. सर सांगायचे, आम्ही गुरांच्या आवाजात म्हणायचो. 'I am, we are .....' यातून पाया घडण्याऐवजी सारे काही वरवर होत गेले. इंग्रजीचे शिक्षक आमच्यावरच इंग्रजीबाबत विविध प्रयोग करत राहिले. त्यांना आम्ही बरे सापडलो.

महाविद्यालयात इंग्रजीच्या प्राध्यापकांनी इंग्रजी वाचनाची गोडी लावली. भाषेची समज दिली. प्रत्येक भाषेला तिची एक स्वतंत्र प्रकृती असते. प्रकृती जाणून घेतली तरच भाषा येते. आपल्याला जन्मजात पान्ह्यातून भाषा येते. म्हणून ती भाषा आपली मातृभाषा असते. भाषेतला प्रवाह आणि अभिव्यक्ती बारकाव्याने लक्षात घ्यावी लागते. तर भाषा येते. भाषा नुसती येऊन चालत नाही. भाषेला संस्कृतीची किनार असते. संस्कृती कळली तर भाषा येते. भाषा व्यक्त होते ती सामाजिकतेतून आणि संस्कृतीतून. याचे यथायोग्य आकलन व्हावे लागते. कधीकधी असेही होते की, एखादी भाषा कळते पण ती बोलता येत नाही. माझ्या दोन बंगाली मित्रांना मराठी बऱ्यापैकी समजते, पण ते मराठीत व्यक्त करू शकत नाहीत. माझे दोन पंजाबी कीर्तनकार मित्र आहेत. त्यांना मराठी निरूपण उमजत नाही. पण निरुपणातला भाव त्यांच्या बरोबर लक्षात येतो. गुजराती भाषेतील संत नरसी मेहतांचे आख्यान मराठीतून अनेक कीर्तनकार सांगतात. ते लोकप्रिय आहे. हेच आख्यान मी गुजराती कीर्तनातून ऐकले. मला ते अधिक सरस वाटले. का वाटले? नाही सांगता येत. पण वाटले. ती आसपासच्या गुजराती, बंगाली, पंजाबी मित्रांच्या संगतीत अशी अभिव्यक्ती घडत गेली.

गावात वीज उशिरा आली. गाव लकाकले. विजेच्या प्रकाशात सारेच दिसले. दिव्याचे खांब रस्त्यावर आले. रात्रीही रहदारी सुरू झाली. विजेचे पंप आले. विजेची उपकरणे हळूहळू आली. काही आडांना विजेचे पंप बसले. नळातून पाणी घराघरात आले. तांब्याची घंगाळे गेली. प्लॅस्टिकच्या बादल्या आल्या. तांबे गेले. मग 'मग' आले. नंतर गिझर आले. मोकळे स्नान उडाले. बंद दरवाज्यातून साबणाचे आणि शॅम्पूचे वास आले. शिकेकाई, रिठे, डाळीचे पीठ हे हळूहळू बदलले. विजेने गावे जोडली. रस्त्यांनी अंतरे कापली. गाड्या धावू लागल्या. खाजगी वाहने धावू लागली. या साऱ्या चांगल्या बाबी घडल्या. परंतु त्याबरोबर हव्यासापायी गुन्हेगारी वाढली. थोड्या श्रमात झटपट खूप मिळाले पाहिजे ही सवय लागली. वैज्ञानिक उपकरणांतून धारदार शस्त्रेही निर्माण झाली. नखांचा उपयोग ब्लेडची पाती ठेवण्यासाठी झाला. माणूस माणसालाच खायला उठला. दिव्यांच्या झगमगाटात दुकाने आली. बार वाढले. वेगवेगळे क्लब जन्माला आले. विविध वस्तूंच्या मार्केटिंगमधून हातात पैसा खेळू लागला. औद्योगिक वसाहतींनी नवा लुक दाखवला. शेतीपेक्षा कंपनीतली नोकरी महत्त्वाची ठरली. तो शहराचा झाला. खेड्यांपासून तुटला. मातीचे मनोगत मातीत गेले.

नकळत-कळत संगणकाने प्रवेश केला. त्याने सर्व क्षेत्रे आपली केली. व्यवस्थापनाचे विश्व बदलले. यातून इव्हेंट जन्माला आले. अधिकाधिक जग जिंकण्याच्या इर्ष्येने गुगल संस्कृती आली. इंटरनेटने घरात जग आणले.

नव्या शहरी प्रवाहामुळे माणसे एकलकोंडी झाली. आपल्यापुरते पाहू लागली. श्रीमंतांची स्पर्धा वाढली. आधुनिकतेच्या नावाखाली आपल्या सामाजिक प्रवृत्तीला काय हवे, याचे भान संपले. भरपूर संपत्ती मिळवून यथेच्छ उपभोग घेणे हा या युगाचा मंत्र बनला. उपभोग घ्यायला मुळीच हरकत नाही, पण उपभोगात संयम असावा. संयमाला स्वच्छतेचे कोंदण हवे. यासंदर्भात येशू ख्रिस्ताचे एक महत्त्वाचे वचन आहे, 'To whom much is given of him shall much be require.' ज्याच्यापाशी विपुल आहे ते त्याने औदार्याने दिले पाहिजे. स्वत:साठी जगण्यात फरसा अर्थ नसतो.पण जो दुसऱ्यासाठी जगतो त्याचे जगणे सत्कारणी लागते. येथे अलबर्ट श्वाइट्झरची आठवण येते, 'आपल्याला लाभलेली विद्या आणि कला केवळ आपल्या सुखासाठी नाही. त्या दु:खितांचे जीवन सुखी करण्यासाठी आहे,' असे तो सांगे नि तसे वागे. संत तुकाराम म्हणतात, 'जे का रंगले-गांजले त्यासी म्हणे जो आपले। तोचि साधू ओळखावा, देव तेथेची जाणावा।।' बिल गेट्सने आपल्या संपत्तीतला काही भाग गरजूंना दिला. टाटांनी विविध सेवाभावी प्रकल्पांना साहाय्य केले.

या वृत्तीतून संगणक सुसंस्कृत होतो. आधुनिक 'मी'

सर्वात्मकाचे प्रतीक बनतो. आपल्या वाट्याला आलेले विहित कर्म प्रमाणिक निष्ठने करणे हे आज महत्त्वाचे ठरते. यामुळे व्यक्तिगत जीवनात ओलावा राहतो. मानवतावादाला संजीवनी मिळते. सर्व प्रकारचे भेदभाव संपतात. सद्भाव निर्माण होतो. आंतरिक ध्यास माणसाची वेगळी उन्नती घडवतो.

खेड्यातून शहरात आल्यानंतर हे भान आले. एक आगळी विमुक्तता लाभली. कतृत्वाला वेगळे क्षितीज मिळाले. कामाला व्यापक अवकाश लाभले. यातून वाचन गरजेचे वाटले. वाचनाने स्वतंत्र विचाराची मूस घडते. इंटरनेटमधून होणाऱ्या माहितीच्या माऱ्याचे व्यवस्थापन जर नीट झाले नाही, तर गोंधळ होतो. आजकाल तर माहितीची शहानिशा करावी लागते. माहिती ही जिज्ञासेची प्राथमिक घडी आहे. माहितीचे मननात जेव्हा रूपांतर होते तेव्हा विचार निर्माण होतात. विचार हा नेहमी शहाणपण देतो. बुद्धीला स्वतंत्र चालना देतो. विचारांना झापडे लागली की त्याची एक निर्जीव व्यवस्था तयार होते. त्यात माणूस घुटमळत राहतो.

यासाठी वाचनाच्या अनुसंधानातून जर संगणकाशी मैत्री झाली, तर ती वेगळी जाणीव निर्माण करते. स्टीव जॉब्सच्या ॲपलने हे करून दाखवले. वाचनातून माणूस सहज होतो. संगणकातून माणूस तांत्रिक होतो. वाचनातून निवड करता येते. संगणकात निवड गौण ठरते. विविध प्रकारच्या ज्ञानशाखा वाचनातून उलगडतात. संगणकातून विविध प्रकारच्या डिस्क उपलब्ध होतात. वाचनात विशिष्ट मुद्दा समजावून घेताना त्याचे अवांतर संदर्भ वेचता येतात. संगणकात जे आहे तेच घ्यावे लागते. वाचनात 'तीन चोक तेरा' किंवा 'सात सकं त्रेचाळीस' हे आले तरी ते लक्षात येते, 'तीन चोक तेरा' ही श्याम फडक्यांची नाट्यकृती आहे, 'सात सकं त्रेचाळीस' ही किरण नगरकरांची कादंबरी आहे. वाचनात मंथनाला महत्त्व आहे. संगणकात निकालाला महत्त्व आहे. वाचनात लगेच कधीही रिझल्ट मिळत नाही. संगणकात लगेच रिझल्ट मिळतात. रिझल्टच्या हव्यासापायी बुद्धीची चिंतनशीलता नाहीशी होण्याची शक्यता असते. माझी दैनंदिनी मीपणाभोवती निगडीत असावी. संगणक जेव्हा आपली दैनंदिनी दाखवतो तेव्हा 'मी'मधल्या आत्मविश्वासाला थोडाफार तडा जातो. मी अवलंबून असतो. विचार स्वतंत्र मांडणीला उद्युक्त करतात. ही तुलना नाही. किंवा चूकबरोबरचा प्रश्न नाही. उगाच दोष काढायचे म्हणूनही नाही. मनापासून वाटते, जे आपल्या प्रकृतीला पूरक आहे, इथल्या व्यवस्थेला पोषक आहे किंवा सामाजिक अभिसरणाला उपयुक्त आहे ते आपण स्वीकारावे.

आजही कितीतरी शाळांमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी नाही, स्वच्छतागृहे नाहीत.अशा शाळांना संगणक भेट देऊन काय होणार आहे. आधी आपल्या ज्ञानावर विश्वास हवा. मग तंत्राला आत्मसात करावे. संवेदना फेसबुकवर येऊ शकत नाहीत. फेसबुकवर येतात ती संवेदनांची कोरडी विधाने. संवेदना कळायला सखोल वाचन आणि सहृदय मनन लागते. संगणकाने प्रतिक्रियांचा महापूर निर्माण केला परंतु विचारांचे स्वतंत्र वैभव वाचनातून आणि संशोधनातून आजही यथावकाश जन्मते आहे. आयपॅड आणि आयफोन निर्माण झाले ते काही विशिष्ट प्रकारच्या संदर्भव्यवस्थेसाठी. यातून सैध्दांतिक विवेचन आले काय? नव्या विचारविश्वाला गवसणी घालायला बुद्धीनिष्ठाच हवी. तंत्रज्ञानातली कुशलता ही एका विशिष्ट सीमेपर्यंतच जाऊ शकते. माणसाच्या जगण्याला अर्थपूर्णता येते, ती सार्थ चिंतनातून. उत्कृष्ट पुस्तक हे आजही विचारशील बनवते. तंत्रज्ञानातून हवे-नको ते कळते. या साऱ्याची सांगड घालण्यासाठी हे समजावून घेतले पाहिजे.

संगणकाने स्वतंत्र परिभाषा तयार केली आहे. विविध भाषा त्याने आत्मसात केल्या आहेत. अजूनही त्याच्यात बदल होत आहेत. एक गोष्ट निश्चित. अभ्यास हा करावाच लागतो. बोटातल्या पेनमधून उमटलेली अक्षरे जिवंत असतात. त्यात स्वानुभूतिनिष्ठ ओलावा असतो. ज्ञानदेव आपल्याला सांगतात,

अभ्यासाहूनि गहन । पार्था मग ज्ञान ।
ज्ञानापासूनि ध्यान । विशेषिजे ।। १२.१४१
मग कर्मफलत्यागु । तो ध्यानापासोनि चांगु ।
त्यागाहुनि भोगु । शांतिसुखाचा ।। १२.१४२

या ओव्यांत ज्ञानदेवांनी अभ्यास, ज्ञान, ध्यान, फलत्याग, शांती असा क्रम लावलेला आहे. यातून दिव्य अनुभूतीची उत्क्रांती निर्देशिलेली आहे. प्रवृत्ती-निवृत्तीच्या 'सॅक' मनावरून उतरल्यावर स्वाभाविक विकासातून सहज कर्मफलत्याग घडतो. या सहजतेतून परमशांती मिळते. हा श्रेष्ठ कर्मयोग आहे. यातून माणसातला 'स्व' विशाल होतो. हे आज नीट ओळखले तरच परमसंगणकात ज्ञानेश्वरी बसवता येते. परंतु साक्षात आचरणातून ती जर सक्रिय झाली तर आजची अस्वस्थता नक्कीच स्वस्थ होईल. स्वस्थता निपजणे ही नैष्कर्म्यसिद्धी आहे. हीच जगण्याची श्रेष्ठ अवस्था. याला 'सुंदर ते ध्यान' किंवा 'रूप पाहता लोचनी' असे म्हणतात.

**यशवंत पाठक**
'राम जानकी', ए-२०१ चैतन्य नगर,
गंगापुर रोड, जि. नाशिक-४२२ ०१३

# लवकरच प्रकाशित होत आहे...

**एक यशस्वी अभिनेता, लेखक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ता अशा विविध भूमिका प्रत्यक्ष जगलेल्या एका चतुरस्त्र व्यक्तित्वाचा वेध घेणारे पुस्तक**



## रूपवेध

### डॉ. श्रीराम लागू

विविध विषयांना स्पर्श करणारे लेख आणि मुलाखती यांतून डॉक्टरांच्या वैज्ञानिक दृष्टिकोन असणाऱ्या समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडते.

**पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.**
३०१, महालक्ष्मी चेंबर्स, २२, भुलाभाई देसाई रोड, मुंबई ४०० ०२६ ☎ २३५३०३०३
Email : info@popularprakashan.com Website: www.popularprakashan.com

# कृष्णसखा कदंब

**प्रा. नीला कोर्डे**

खेड्यापाड्यात भूतबाधा झालेल्या व्यक्तीला ‘झाड’ म्हणण्याचा प्रघात आहे. कदंबाच्या बाबतीत म्हणायचे झाले तर स्वत:ला ‘मोहनबाधा’ झालेले हे झाडच दुसऱ्यांना झपाटून टाकणारे आहे. स्वत:च्या गोलाकार फुलांप्रमाणे स्वत:भोवती ‘गूढतेचे वलय’ निर्माण करून हा वृक्ष मनात मुळे घट्ट रोवून उभा राहतो!
ऋतुचक्र फिरत राहते... दाहक ग्रीष्मानंतर वर्षाऋतू येतो...आकाशात मेघ दाटून येतात आणि ‘घनश्यामसुंदरा’च्या आठवणीने कदंब पुलकित होतो... फुलकित होतो... अजूनही... अजूनही...!

वर्षाऋतूत दाटलेल्या मेघांना– ‘मेघमाले’ला एक सुंदर संस्कृत नाव आहे– ‘कादंबिनी’! आकाशातील मेघमालेच्या या नावाचा संबंध आहे धरतीवर फुलणाऱ्या कदंबाशी! वर्षाऋतूतल्या पहिल्यावहिल्या जलधारांनी कदंब फुलतो! तो जणू स्वत:च ‘वर्षाऋतू’ होतो. घनांचा म्हणजे मेघांचा ‘घनदाट’ अंधकार त्याच्या पानोपानी दाटून येतो. विजेची झळाळी घेऊन त्याची फुले फुलतात. या फुलांतून आलेले पांढुरके केसर म्हणजे जणू रिमझिमणाऱ्या जलधाराच!

श्रावणात म्हणजेच वर्षाऋतूत जन्माला आलेल्या कृष्णाला– ‘घनश्यामा’ला प्रिय असणारा हा यमुनातीरावरचा ‘घनश्याम’ वृक्ष! सावळा वर्षाऋतू, सावळा कृष्ण आणि सावळ्या यमुनेच्या तिरी फुललेला सावळा कदंब ही जणू एक सुंदर सावळी साखळीच आहे!

बालपणी ‘कंदूकक्रीडा’ प्रिय असणाऱ्या कृष्णाला कदंबाची चेंडूसारखी गरगरीत वाटोळी फुले प्रिय असणे स्वाभाविकच आहे. हा ‘वनमाळी’ गळ्यातही कदंबफुलांच्या माळा घालत असे. ह्याच्या कानांतही कदंबाच्या फुलांची कुंडले असत. आदिशंकराचार्यांनी आपल्या ‘कृष्णाष्टक स्तोत्रा’त त्याला ‘कदम्बसूनकुण्डलम्’ (श्लोक क्र. ५) म्हटले आहे.

कदंबाचे एक वैशिष्ट्य असे आहे, की त्याच्या कळ्या एकाच वेळी फुलतात. त्यांच्या या एकाच वेळी फुलण्यावरून ‘एकसमयावच्छेदे’ म्हणजे एकाच वेळी घडणाऱ्या घटनांसाठी ‘कदम्बकोरकन्याय’ म्हणजे कदंब कळ्यांचा न्याय आहे. शिवाय प्रत्येक फुलोऱ्यामध्ये नारिंगी रंगाचा, पाच पाकळ्यांचा पेला असलेली असंख्य सूक्ष्म फुले असून त्यातून तरारून आलेले पांढुरके केसर असे गोल सुवासिक फुलोरे असतात. एका फुलोऱ्यात अनेक फुले अगदी दाटीवाटीने असण्याच्या या वैशिष्ट्यामुळेच संस्कृतमध्ये समुदायालाही ‘कदम्ब’ हे नाव आहे. आपल्या सर्व सवंगड्यांना एकत्र घेऊन खेळणाऱ्या, इतकेच नव्हे तर, ‘गोपाळकाला’ करून सहभोजन करणाऱ्या कृष्णाच्या ‘समूहवृत्ती’चे प्रतीक म्हणजे कदंब!

तारुण्यात गोपींची वस्त्रे हरण करणाऱ्या कृष्णाने कदंबाचाच आश्रय घेतला होता. भागवतपुराणाच्या दहाव्या स्कंधातील बाराव्या अध्यायात, कृष्णासारखा पती मिळावा म्हणून 'कात्यायनी' देवीचे व्रत करणाऱ्या गोपींच्या वस्त्रहरणाची कथा आली आहे. स्वत:च्या श्यामल वर्णाशी मिळत्याजुळत्या कदंबाचा कृष्णाने आश्रय घेणे हे जणू 'रंगगोपना'चे (Camouflage) सुंदर उदाहरण आहे.

राधा-कृष्णाचा प्रणय रंगला तोही कदंबाच्याच साक्षीने! 'कदंब' हे राधा-कृष्णांचे 'संकेतस्थळ'! जयदेवाच्या 'गीतगोविन्दम्' या काव्याच्या दुसऱ्या सर्गात राधा म्हणते-

*विशदकदम्बतले मिलितं कलिकलुषभयं शमयन्तम्।*
*मामपि किमपि तरङ्गदनङ्गदृशा मनसा रमयन्तम्।।*

(गीतगोविन्दम् सर्ग-२ प्रबंध-५ अष्टपदी क्र. ५)

अर्थ - आमच्या नेहमीच्या ठरलेल्या याच सुंदर कदंबाच्या छायेत तो मला भेटला होता. आधी मी त्याच्याशी प्रेमकलह केला होता. त्यामुळे त्याची माझ्याविषयीची ओढ कलुषित झाली असेल अशी मला भीती वाटत होती. आपल्या चतुर, मधुर अनुनयाने तो ती भीती नाहीशी करत होता. ज्यांचे वर्णनही करता येणार नाही अशा प्रीतिभरल्या नयनांनी तो तेव्हा अगदी मनापासून माझ्याशी संवाद जुळवत होता. (अजून मला त्याची आठवण होत आहे.)

कृष्ण-कदंब नात्यातील आणखी एक विशेष गोष्ट म्हणजे यमुनेच्या डोहात राहून तिचे पाणी विषारी करणाऱ्या कालियाचे मर्दन करतानाही, कृष्णाने विषहारक कदंबाचाच आश्रय घेतला होता. राधेशी प्रणय करणाऱ्या कृष्णाचे हृदय जणू कदंबाच्या फुलाप्रमाणे कोमल आहे, तर कालियाचे मर्दन करताना तेच हृदय जणू कदंबाच्या खोडाप्रमाणे कठोर झाले आहे. तसे पाहिले तर 'भोगी' आणि 'योगी' असणाऱ्या कृष्णाचे संपूर्ण चरित्रच विरोधाने भरलेले आहे!

कृष्णाशी नाते जोडले गेलेल्या या कदंबाचा त्याच्या मोठ्या भावाशी, बलरामाशी काही संबंध आहे याची आपल्याला कल्पनाही नाही. पण 'अमरकोशा'त कदंबाला जी नावे दिली आहेत, त्यांपैकी एक आहे 'हलिप्रिय'! 'हलि' म्हणजे 'हल' - म्हणजेच नांगर धारण करणारा 'बलराम'! कदंब जसा 'हरिप्रिय' आहे तसाच 'हलिप्रिय'ही आहे. बलरामाला हा वृक्ष एका वेगळ्याच कारणासाठी प्रिय आहे. कदंबाच्या फुलांवर पावसाचे पाणी पडल्यावर फुलांतील मध त्या पाण्याबरोबर झाडाच्या कोटरात (ढोलीत) ठिबकतो आणि त्यापासून मदिरा तयार होते. बलरामाला ही मदिरा प्रिय असल्यामुळे या मदिरेलाही 'हलिप्रिया' हे नाव मिळाले आहे.

महाभारताचे 'खिल' (supplement) मानल्या गेलेल्या 'हरिवंशा'त बलरामाच्या मदिराप्रियतेचा उल्लेख आहे. बलराम कदंबाच्या सावलीत बसला असता, कदंबाच्या फुलांच्या मादक गंधाने मदिरेची आठवण होऊन त्याला तहान लागली. त्यावेळी त्या झाडाच्या ढोलीत मनोहर मदिरा उत्पन्न झाली. कदंबाच्या कोटरात उत्पन्न झाल्यामुळे तिला 'कादंबरी' असे नाव पडले-

*तत्कोटरस्था मदिरा सम जायत मनोहरा।*
*कदम्बकोटरे जाता नाम्ना कादम्बरीति सा।।*

कृष्ण आणि बलराम यांनाच कंदब प्रिय होता असे नव्हे, तर कृष्णाचे वंशजसुद्धा या वृक्षाला अत्यंत पवित्र मानत असत. 'वराहपुराणा'त अध्याय क्र. १४७ मधील श्लोक क्र. ५९ ते ६४ मध्ये द्वारकेजवळील 'कदंब' नावाच्या तीर्थक्षेत्राचा उल्लेख आहे. हे तीर्थक्षेत्र म्हणजे कदंब वृक्षापासून पूर्वेकडे निर्माण झालेले कुंड आहे. कृष्णाचे वंशज आपला अंतकाल जवळ आला असता तिथे जाऊन शुचिर्भूत होऊन प्राणत्याग करत असत.

कृष्णाशी नाते सोडल्यास कदंब काहीसा अपरिचितच राहिला आहे. पण वसंतातल्या आम्रमंजरीवर, शरदातल्या कमळांवर प्रेम करणाऱ्या संस्कृत कवींना मात्र वर्षाऋतूतील कदंबाचेही तितकेच आकर्षण आहे. म्हणूनच कदंबाचे अगदी अनोखे आणि मनोज्ञ दर्शन आपल्याला संस्कृत साहित्यात घडते.

आदिकवी वाल्मीकींच्या 'रामायणा'त या वृक्षाचा उल्लेख आला आहे. 'अरण्यकाण्डा'त रामाच्या पंचवटीतील पर्णकुटीभोवती असणाऱ्या वृक्षांचे वर्णन आहे. त्यामध्ये कदंबही आहे. नंतरच्या 'किष्किन्धाकाण्डा'तील वर्षा-वर्णनातही कदंब आला आहे-

*व्यामिश्रितं सर्जकदम्बपुष्पै*
*र्नवं जलं पर्वतधातुताम्रम।*
*मयूरकेकाभिरनुप्रयातम्*
*शैलापगा: शीघ्रतरं वहन्ति।।*

(किष्किन्धाकाण्ड, सर्ग-२८ श्लोक क्र. १८)

अर्थ - सर्ज आणि कदंब यांची फुले मिसळलेले, पर्वतातील धातूमुळे तांबडे झालेले आणि मयूरांच्या केकारवाची साथ मिळालेले नवजल म्हणजे पावसाचे पाणी, डोंगरातल्या नद्या जलद वाहून नेत आहेत.

दुसऱ्या एका श्लोकात जलधारांनी भिजलेल्या, कदंबशाखांवर रेंगाळणाऱ्या आणि कदंबपुष्पातील मध चाखणाऱ्या षट्पदांचे म्हणजे भ्रमरांचे वर्णन आहे. भ्रमरांना प्रिय असल्यामुळे कदंबाला 'भ्रमरप्रिय' असेही नाव आहे.

महाभारतातील 'वनपर्वात' द्वैतवनाचे वर्णन आहे. त्यामध्ये शाल, ताल, आम्र इत्यादी वृक्षांबरोबरच कदंबाचाही उल्लेख आहे.

महाभारताचाच उत्तर भाग असणाऱ्या 'हरिवंशा'मध्ये कदंब आला नाही तरच नवल! हरिवंशातील कालियामर्दनाच्या कथेत कृष्णाने आपल्या पायाच्या तळव्याचा स्पर्श झालेल्या कदंबाला दीर्घायुषी, फुलाफळांनी भरलेला होण्याचा तसेच आपल्यावर प्रेम करणाऱ्यांना पूजनीय होण्याचा आशीर्वाद दिला आहे.

रामायण आणि महाभारत या 'आर्ष' म्हणजे वाल्मीकी आणि व्यास महर्षींनी रचलेल्या महाकाव्यांप्रमाणेच पुराणामध्ये कदंब आला आहे. 'वामनपुराणा'त कोणत्या देवापासून कोणता वृक्ष निर्माण झाला हे सांगताना कदंबाविषयी म्हटले आहे-

*कन्दर्पस्य कराग्रे तु कदम्बश्चारुदर्शन: ।*
*तेन तस्य परा प्रीति: कदम्बेन विवर्धते ।।*

(वामनपुराण, अध्याय १७, श्लोक क्र. २१)

अर्थ - कंदर्पाच्या म्हणजे मदनाच्या कराग्रापासून सुंदर कदंब निर्माण झाला म्हणून मदनाला कदंबाविषयी प्रेम आहे.

'भागवतपुराणा'तील विष्णू वर्णनात विष्णूचे वस्त्र कदंबाप्रमाणे पिंगट असल्याचे म्हटले आहे-

*'कदम्बकिञ्जल्कपिशङ्गवासम्'*

(भागवतपुराण स्कंध ३, अध्याय ८, श्लोक क्र. १०)

भागवतपुराणातच स्कंध ३ अध्याय २ मध्ये आग्नीध्र राजा ज्या अप्सरेवर भाळतो तिच्या गोल आणि सुडौल नितंब बिंबाची कांती कदंबासारखी तांबुस पिवळी असल्याचे म्हटले आहे. कदंबाविषयी इतका शृंगारिक उल्लेख बहुधा हा एकमेवच असावा. विष्णुपुराण, लिङ्गपुराण, ब्रह्माण्डपुराण यांसारख्या पुराणांमध्येही कदंब आला आहे.

वसिष्ठ ऋषींच्या 'योगवासिष्ठम्' या आध्यात्मिक ग्रंथात तर कदंब वृक्षाचे विस्तृत आणि अत्यंत काव्यमय वर्णन आले आहे. ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे.

रामायण आणि महाभारत ही आर्ष महाकाव्ये, भागवतपुराण, विष्णुपुराण यांसारखी पुराणे यांच्यानंतर कदंब खऱ्या अर्थाने फुलला आहे तो 'विदग्ध' (polished, refined) महाकाव्यांमध्ये!

इ.स.च्या पहिल्या शतकातील 'अश्वघोष' हा कालिदासाच्याही पूर्वी होऊन गेलेला महाकवी! बौद्ध धर्म स्वीकारलेल्या या कवीने 'बुद्धचरितम्' आणि 'सौन्दरनन्दम्' ही दोन महाकाव्ये रचली.

कालिदासाच्या साहित्यकृतींवरही या महाकाव्यांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. अश्वघोषाच्या 'सौन्दरनन्द'च्या १०व्या सर्गात हिमालयाचे वर्णन आले आहे. त्यामध्ये हिमालयाच्या नितंबावरील म्हणजे पृष्ठभागावरील कदंब वृक्षाचे वर्णन आहे. वायुलहरींनी कंपित होणाऱ्या या वृक्षांपैकी एका वृक्षाच्या फांदीत चमराची शेपटी अडकल्याचा व त्यामुळे तो फांदीला लोंबकळत असल्याचा उल्लेख आहे-

*चलत्कदम्बे हिमवन्नितम्बे तरौ प्रलम्बे चमरो ललम्बे ।*

(सौन्दरनन्दम्- सर्ग-१०, श्लोक क्र. ११)

विशेष म्हणजे हिमालयावरील हे दृश्य गौतम बुद्ध आपल्या धाकट्या भावाला- नंदाला स्वर्गात नेत असताना दिसलेले 'विहंगम दृश्य' आहे. हा श्लोकच कालिदासाच्या 'नीचै: (नीचय) पर्वतावरील कदंब वर्णनाचे प्रेरणास्थान असावा.

निसर्गातील स्पंदने हळुवारपणे टिपणाऱ्या कालिदासाच्या काव्यांतील 'वर्षावर्णन' कदंबाशिवाय पूर्णच होऊ शकत नाही. त्याच्या 'ऋतुसंहारम्' आणि 'मेघदूतम' या गीतिकाव्यांमध्ये तर कदंब 'बी' कवींच्या चाफ्याप्रमाणे 'फुलीं फुलला' आहे. त्याच्या 'कुमारसम्भवम्' या महाकाव्यात आणि 'विक्रमोर्वशीयम्' या नाटकातही कदंब आला आहे.

वर्षाऋतूत फुललेला कदंब आपल्या सुवासाने वायुलहरींनाही सुवासिक करत असल्याचा उल्लेख ऋतुसंहारात आहे. यामुळेच कदंबाला 'सुरभिन्' हे नावही आहे आणि सुगंधी वायूलाही 'कदंबानिल' असे वैशिष्ट्यपूर्ण नाव आहे.

स्त्रिया नवकेसर म्हणजे ताजे बकुळ आणि केतकी यांच्याबरोबरीनेच कदंबही मालांमध्ये गुंफून त्या मस्तकावर धारण करतात-

*माला: कदम्बनवकेसरकेतकीभि-*
*रायोजिता: शिरसि बिभ्रति योषितोऽद्य ।*

(ऋतुसंहारम् सर्ग-२, श्लोक क्र. २०)

स्त्रिया कदंबकुसुमे केवळ मस्तकावरच धारण करतात असे नाही, तर 'कर्णपूर' म्हणजे कर्णभूषण म्हणूनसुद्धा त्यांचा वापर करतात. स्त्रियांना प्रिय असल्यामुळे 'ललनाप्रिय' आणि कर्णभूषण म्हणून वापर केला गेल्यामुळे 'कर्णपूरक' अशी सार्थ नावे कदंबाला मिळाली आहेत.

ऋतुसंहारात विकासोन्मुख असणारी कालिदासाची प्रतिभा मेघदूतात परिणत झाली आहे. यामुळेच मेघदूतातील कदंब अधिक मोहक झाला आहे. मेघदूतातील यक्ष मेघाला आपल्या अलकानगरीचा मार्ग सांगत असताना, मेघाच्या आगमनाने फुलणाऱ्या कदंबाचे वर्णन करावयास विसरत नाही.

# रौप्यमहोत्सवी

## 'पुनर्भेट' दिवाळी अंक

# पद्मगंधा

दीपावली २०१२ । ₹ १५०

बालगंधर्वांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या अमृतमहोत्सवी वर्षात १९६१ साली घेतलेली दुर्मिळ व अप्रकाशित मुलाखत प्रथमच प्रकाशित होत आहे.

**पद्मगंधा दिवाळी अंकाच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त गेल्या पंचवीस वर्षांतील निवडक लेखांचा संग्रह.**

श्री. पु. भागवत, व्यंकटेश माडगूळकर, शान्ता शेळके, ग. प्र. प्रधान, श्रीनिवास कुलकर्णी, अरुण साधू, व. दि. कुलकर्णी, गंगाधर गाडगीळ, वसंत कानेटकर, रा. चिं. ढेरे, प्रभाकर पेंढारकर, के. रं. शिरवाडकर, द. भि. कुलकर्णी, रा. ग. जाधव ह्या व अनेक मान्यवरांचे ७५ लेख.

**पृष्ठसंख्या - ३७५ अंदाजे । मूल्य - ₹ १५०**

---

## उत्तम विक्री असलेला अभिजात दिवाळी अंक

# उत्तम अनुवाद

**भारतीय व वैश्विक पातळीवर सिद्ध झालेले मौलिक साहित्य**

आल्बेर काम्यू, विल्यम येट्स, हाईनरिश ब्योल, झेडी स्मिथ, योगेंद्र आहुजा यांचे लेख.

चंदन सेन यांची एकांकिका

पवन करण, इमरोज, एमिली डिकिन्सन यांच्या कविता.

लिन युतांग, सआदत हसन मंटो, हिमांशी शेलत, गॅब्रिएल गार्सिया मार्क्वेझ, डी.एच.लॉरेन्स, सुचित्रा भट्टाचार्य, अर्नेस्ट हेमिंग्वे, मार्गारिट युसेनार, सीमा शर्मा, वीनेश अंताणी, ममता कालीया, एन्द्रे तॉथ, ओ हेन्री, अन्तोन चेखव्ह, मोहन परमार, रवी किरण शास्त्री, हसन हाफिझुर रहमान, एडना बुकानन यांच्या कथा व इतर साहित्य.

**पृष्ठसंख्या - २०८ । मूल्य - ₹ १३०**

---

**पद्मगंधा प्रकाशन**

१९६६, तारा-भुवन, माडीवाले कॉलनी, सदाशिव पेठ, पुणे-४११०३०
फोन : (०२०) २४४५०२६० Website : www.padmagandha.com
E-mail : arunjakhade@padmagandha.com



विशेष म्हणजे इथे कालिदासाने बऱ्याच वेळा कदंबासाठी 'नीप' हे नाव वापरले आहे.

*मेघदूतातील पूर्वमेघात कालिदास म्हणतो–*

*''नीपं दृष्ट्वा हरितकपिशं केसरैरर्धरूढै: ।''*

(मेघदूतम्–पूर्वमेघ, श्लोक क्र. २१)

या श्लोकात नवमेघाच्या आगमनाने नुकत्याच बहरू लागलेल्या नीपाचा म्हणजे कदंबाचा उल्लेख आहे. या कदंबावरील फुले अर्धोन्मीलित असल्यामुळे हिरवट तांबूस रंगाची आहेत.

यानंतर पूर्ण फुलून आलेल्या कदंब वृक्षांचे वर्णन आले आहे. या वर्णनात कदंबाविषयी संस्कृत साहित्यात असलेल्या एका सुंदर संकेताचा संदर्भ आला आहे– मुदित इव कदम्बैर्जात पुष्पै... (सर्ग–२, श्लोक क्र. २३) मध्ये तो सूचित झाला आहे, पण इथे मात्र अगदी स्पष्ट आहे. शरीर आनंदाने रोमांचित होण्याला, संस्कृत कवींनी 'फुलणाऱ्या कदंबाची' उपमा दिली आहे. रोमांचांना कदंबाच्या नाजूक केसरयुक्त फुलांची इतकी 'रोमांचित करणारी' उपमा देणाऱ्या या कवींच्या रसिकतेचे कौतुक करावे तेवढे थोडेच! रोमांचाशी संबंधित असल्यामुळे कदंबाला 'पुलकिन्' (पुलक=रोमांच) हे नाव मिळाले आहे.

कालिदास आपल्या 'कुमारसम्भवम्' या महाकाव्यात, मदनाच्या बाणाने विचलित झालेल्या योगी शिवाची दृष्टी पार्वतीवर पडली असता पार्वती कशी रोमांचित झाली हे सांगताना म्हणतो–

*विवृण्वती शैलसुतापिभावमङ्गै: स्फुरद्बालकदम्बकल्पै: ।*

(कुमारसम्भवम्–सर्ग–३, श्लोक क्र. ६८)

अर्थ – फुललेल्या बालकदंबाप्रमाणे पुलकित झालेल्या गात्रांनी, पार्वतीची शिवाविषयीची प्रेमभावना व्यक्त झाली.

मेघदूतात तर कालिदासाने रोमांच हे उपमेय आणि कदंब हे उपमान यांची उलटापालट (trans position) करून फुललेल्या कदंबांनाच रोमांचाची उपमा दिली आहे.

मेघदूतातील यक्ष अलकानगरीकडे मार्गक्रमण करणाऱ्या मेघाला, विदिशा नगरीजवळील नावाप्रमाणेच कमी उंची असणाऱ्या 'नीचै: (नीचय)' पर्वतावर विश्रांती घेण्यास सांगतो. तो म्हणतो–

*नीचैराख्यं गिरिमधिवसेस्तत्र विश्रामहेतो: ।*

*त्वत्संपर्कात्पुलकितमिव प्रौढपुष्पै: कदम्बै: ।।*

(मेघदूतम् – पूर्वमेघ, श्लोक क्र. २६)

अर्थ – मेघ नीचै: पर्वतावर विश्रांतीसाठी थांबला असता या पर्वतावरील कदंब वृक्ष मेघाच्या आगमनाने फुले आल्याने जणू आनंदाने पुलकित होतील. या फुललेल्या कदंबांमुळे जणू

नीचै: पर्वतही मेघाच्या आगमनाने पुलकित होईल.

या श्लोकांतील 'प्रौढपुष्पै:' ही शब्दयोजना अर्थपूर्ण आहे; या पूर्वीच्या श्लोकातील कदंब 'अर्धोन्मीलित' आहे तर इथले कदंब 'पूर्णोन्मीलित' आहेत. कालिदासाचे हे अवलोकन त्याचे या वृक्षावरील प्रेम व्यक्त करणारे आहे.

मेघदूतामधील अलकानगरीतील स्त्रिया कदंबाचा अलंकार म्हणून वेगळ्याच प्रकारे वापर करतात. त्या नीप म्हणजे कदंब भांगात घालतात. मेघदूतातील यक्ष म्हणतो–

*सीमन्ते च त्वदुपागमजं यत्र नीपं वधूनाम् ।*

(मेघदूतम् – उत्तरमेघ, श्लोक क्र. २)

या भाग्यवती स्त्रियांना सर्व ऋतूंतील फुले एकाच वेळी उपलब्ध होतात. वर्षाऋतूतील नीपाविषयी मेघाला सांगताना 'तुझ्या आगमनाने फुलणारा' (त्वदुपागमजम्) हे सांगायला कालिदास विसरत नाही.

कालिदासाच्या 'विक्रमोर्वशीयम्' या नाटकात उर्वशीने 'रक्तकदम्ब' म्हणजे लाल कदंबाचे फूल शिरोभूषण म्हणून धारण केल्याचा उल्लेख आहे. पुरुरवा राजा म्हणतो–

*रक्तकदम्ब सोऽयं प्रियया घर्मान्तशंसि यस्यैकम् ।।*
*कुसुमसमग्रकेसरविषममपि कृतं शिखाभरणम् ।।*

(विक्रमोर्वशीयम् – अंक ४, श्लोक क्र. ६१)

अर्थ – हा तोच कदंब वृक्ष होय की, ज्याच्यावर ग्रीष्म ऋतू सरल्यानंतर नुकत्याच कठीण कळ्या आल्या आहेत. पूर्ण केसर नसूनही प्रियेने एक फूल शिरोभूषण म्हणून धारण केले होते.

कदंबाच्या कळ्या, अर्धविकसित आणि पूर्ण विकसित फुले या सर्व अवस्थांचे मनोज्ञ दर्शन आपल्याला कालिदासाच्या काव्यातून घडते.

कालिदासानंतर होऊन गेलेल्या 'भारवि' कवीने 'किरातार्जुनीयम्' या महाकाव्यात, पावसाळ्यात वनात फुललेल्या कदंबांचे वर्णन करताना 'कदम्बक' हा समूहवाचक शब्दही योजला आहे–

*पृथुकदम्बकदम्बकराजितम् ।*

(किरातार्जुनीयम् – सर्ग ५, श्लोक क्र. ९)

माघ कवीच्या 'शिशुपालवधम्' या महाकाव्यात रानवाऱ्यांनी उडणाऱ्या नवकदंबांच्या रेणूंमुळे आकाश आणि वस्त्रेही ('अम्बर' शब्दावर श्लेष) लाल झाल्याचा उल्लेख आहे–

*नवकदम्बरजोऽरुणिताम्बरै:*

(शिशुपालवधम् – सर्ग ४, श्लोक क्र. ३२)

श्रीहर्ष पंडिताच्या 'नैषधीयचरितम्' या महाकाव्यात नलाच्या प्रत्यक्ष दर्शनाने रोमांचित झालेल्या दमयंतीचे सुंदर वर्णन आले आहे. त्यात म्हटले आहे–

*प्रसूनमित्येव तदङ्ग वर्णनात्*
*न सा विशेषात्कतमत्तदित्यभूत् ।*
*तदा कदम्बं निरवर्णि लोमभि:*
*मुदस्त्रुणा प्रावृषि हर्षमागते: ।।*

(नैषधीयचरितम् सर्ग–९, श्लोक क्र. १३७)

अर्थ – दमयंतीच्या शरीराचे वर्णन फूल म्हणूनच केले जात असे. पण ते कोणते याचा उल्लेख होत नसे. नलदर्शनाने तिचे लोम (अंगावरील केस) पावसाळ्यातील कदंबपुष्पा-प्रमाणे फुलून उठले. (म्हणजेच त्यावेळी ती कदंबपुष्पाप्रमाणे शोभत होती.)

संस्कृत साहित्यात पद्यकाव्यांप्रमाणेच गद्यकाव्यांमध्येही कदंबाला स्थान आहे. सम्राट हर्षवर्धनाच्या राजदरबारी असणाऱ्या बाणभट्टाच्या 'कादम्बरी' आणि 'हर्षचरितम्' या दोन्ही गद्यकाव्यांमध्ये कदंब विविध रूपांत फुलला आहे. बाणभट्टाने आपल्या 'कथा' प्रकारातील 'कादम्बरी' या गद्यकाव्याला, नायिकेच्या नावावरून 'कादम्बरी' हे नाव दिले आहे. नायिका कादंबरी ही गंधर्वकन्या असून 'कादंबरी' या कदंबापासून बनलेल्या मदिरेप्रमाणेच ती 'आरक्तवर्ण' आणि 'मादक' होती. कादंबरी ही मदिरा आणि बाणभट्टाचे कादंबरी नामक गद्यकाव्य या दोहोंवर सुंदर श्लेष साधून बाणपुत्र भूषणभट्टाने म्हटले आहे–

*कादम्बरी रसभरेण समस्त एव ।*
*मत्तो न किञ्चिदपि चेतयते जनोऽयम् ।।*

अर्थ – कादंबरीच्या रसाने सर्व जन मत्त झाले. कोणामध्येही चेतना उरली नाही. म्हणजेच कादंबरी नावाच्या मदिरेच्या सेवनाने मत्त व्हावे त्याप्रमाणे बाणाच्या 'कादंबरी'तील नवरसांच्या सेवनाने सर्व जन मत्त झाले.

बाणाच्या 'हर्षचरितम्' या 'आख्यायिका' प्रकारातील गद्यकाव्यातही, मदिरेच्या सुवासाचे फुललेल्या कदंबाच्या मादक सौरभाशी साम्य असल्याचे म्हटले आहे– ''विकच-कदम्बसंवादि मदसुरासौरभ''.

आपल्या पूर्वायुष्यात केवळ अरण्यभ्रमणच नव्हे, तर 'अरण्यवाचन'ही करणाऱ्या बाणभट्टाच्या साहित्यात, कदंबाचे धाराकदंब, धूलिकदंब, रक्तकदंब असे विविध प्रकार पाहावयास मिळतात. कादंबरीमध्ये शीतल हिमगृहात, कारंजी असलेल्या धारागृहांच्या छपरांवर 'धाराकदंबा'च्या फुलांच्या रेणूंमुळे कबऱ्या झालेल्या मोरांच्या थव्याचा उल्लेख आहे. धूलिकदंबाचा उल्लेख हर्षचरितात आला आहे.

रोमांचांना देण्यात येणारी कदंबपुष्पांची उपमा कादंबरीतही आली आहे. चंद्रापीडाला पाहून कादंबरीची जी स्थिती झाली तिचे वर्णन करताना बाणाने म्हटले आहे– *''घनजलधारासीकरपुलकितकाया कदम्बकलिकेव कम्पमाना''* – पावसाच्या धारांचे तुषार पडल्यामुळे जिची काया पुलकित झाली आहे अशा कदंबकलिकेप्रमाणे ती थरथरू लागली.

रोमांचांचा संबंध गालांशीही जोडला गेला आहे. लज्जेने गाल केवळ लाल होत नाहीत तर ते रोमांचितही होतात. कादंबरीची सखी महाश्वेता, चंद्रापीडाला आपल्या आणि पुंडरीकाच्या पहिल्या भेटीच्या वेळी पुंडरीकाच्या स्पर्शाने आपला गाल रोमांचित होऊन तो जणू 'कदंबकलिके'चे कर्णभूषण धारण केल्याप्रमाणे भासत असल्याचे सांगते. ती म्हणते– कदम्बमुकुलकर्णपूरायमाणेन रोमाञ्चजालेन कण्टकितैकपोलफलका

हर्षचरितात सरस्वतीचा प्रियकर दधीच याच्या वर्णनात त्याच्या 'त्रिकण्टक' नावाच्या दोन बाजूंना टपोरे मोती आणि मध्ये पाचू असणाऱ्या कर्णभूषणातील मोत्यांना कदंबकळ्यांची उपमा दिली आहे. मोत्यांचा रंग हिरवा नसूनही त्यांच्या–जवळील पाचूंचा रंग त्यांच्यावर प्रतिबिंबित झाल्यामुळे ते कदंबकळ्यांप्रमाणे दिसत होते. यामुळेच ही उपमा समर्पक आहे.

आभूषणप्रिय बाणभट्टाला केवळ सुंदरतेचेच नाही, तर भीषणतेचेही आकर्षण आहे. कादंबरीतील चंडिकावर्णनात हर्ष आणि लज्जा सूचित करणाऱ्या, रोमांचांशी साम्य असणाऱ्या कदंबपुष्पांचे भीषण, भयावह रूपही आपल्याला पाहावयास मिळते. चंडिकेला पूजेच्या वेळी अर्पण केलेली, रक्ताप्रमाणे लाल दिसणारी ताम्र–कदंबाची म्हणजेच रक्त–कदंबाची फुले जणू 'पशूंचे बलिदान करताना वाजवण्यात येणाऱ्या नगाऱ्यांचा आवाज ऐकून, देवीच्या अंगावर आनंदाने आलेले रोमांच अशी भयावह कल्पना बाणाने केली आहे

*''शोणितताम्रकदम्बस्तबककृतार्चनैश्च*
*पशूपहारपटहपटुरटितरसोल्लसितरोमाञ्चैरिवाङ्गैः।''*

संदर्भ बदलला, की एकाच वस्तूकडे बाण किती 'वेगळ्या दृष्टीने' पाहतो!

बाणाच्या कदंब वर्णनात एक गोष्ट विशेष नमूद करावीशी वाटते आणि ती म्हणजे आनंदाने, प्रेमाने अंगावर फुलणारे 'रोमांच' आणि भीतीने, थंडीने अंगावर येणारा 'काटा' यांच्यातील भेदाची बाणाला पुरेपूर जाणीव आहे. म्हणूनच कादंबरीतील हिमगृह वर्णनात 'अरूप' वाऱ्यांना 'रूप' देऊन कदंबाचे केसर म्हणजे जणू हिमगृहातील थंडगार स्पर्शाच्या भीतीने वाऱ्यांच्या अंगावर आलेला काटा–'अनिलैरपि कदम्बाकेसरोत्कटवाहिभिः कण्टकितैरिवानुगतम्' अशी एक वेगळीच कल्पना बाणाने केली आहे.

आपल्या पूर्वायुष्यात, भ्रमंती करणारा बाणभट्ट हा खरोखरच 'वेगळ्या वाटेने' जाणारा आहे.

कादंबरीत ज्याप्रमाणे चंडिकेला कदंबपुष्पे वाहण्याचा उल्लेख आला आहे, त्याचप्रमाणे 'महानिर्वाणतन्त्र' या ग्रंथात कालिकेला कदंब प्रिय असल्याचा उल्लेख आहे. कालिकेचे वर्णन करताना म्हटले आहे–

*कदम्बवनसंचारा कदम्बवनवासिनी*
*कदम्बपुष्पसंतोषा कदम्बपुष्पमालिनी।*
*किशोरी कलकण्ठाच कलनादनिनादिता*
*कादम्बरीपानरता तथा कादम्बरी प्रिया।।*

अर्थ – कालिका कदंबवनात संचार करते. कदंबवनात राहते. कदंबाच्या फुलांनी संतुष्ट होते. कदंबपुष्पांची माला धारण करते. तिचा आवाज मधुर आहे. ती कादंबरी मदिरा प्राशन करते. कादंबरी तिला प्रिय आहे.

जगन्मातेला ती चंडिका आणि कालिका या उग्र रूपांमध्ये असताना कदंब जसा प्रिय आहे तसाच तो तिला 'त्रिपुरसुन्दरी'च्या सौम्य रूपात असतानाही प्रिय आहे. आदि शंकराचार्यांच्या 'त्रिपुरसुन्दरीस्तोत्रा'त याविषयीचा उल्लेख आहे. त्रिपुरसुंदरीच्या कदंबवनातील वास्तव्यामुळे तिला 'कदम्बवनवासिनी', 'कदम्बवनचारिणी', 'कदम्बवनमध्यगा' यांसारखी विशेषणे लावण्यात आली आहेत. शंकराचार्यांच्या 'मन्त्रमातृका–पुष्पमाला स्तोत्रात'ही कदंब वृक्षांच्या वाटिकांनी म्हणजे बागांनी उज्ज्वल दिसणाऱ्या 'मणिद्वीपा'मध्ये त्रिपुरसुंदरीचा निवास असल्याचा उल्लेख आहे.

विशेष म्हणजे आजही भाद्रपदात म्हणजेच वर्षाऋतूत येणाऱ्या गौरीला आणि 'हिरवा देव' मानला गेलेल्या गौरीपुत्र गणेशाला, पूजेत वर्षाऋतूचे प्रतीक असणाऱ्या कदंबाची पत्री वाहण्यात येते.

सातव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेलेल्या बाणभट्टानंतर, याच शतकाच्या उत्तरार्धात होऊन गेलेल्या आणि बाणभट्टाच्या शैलीने प्रभावित झालेल्या 'भवभूति'च्या नाटकांमध्येही कदंब आला आहे. त्याच्या 'मालतीमाधवम्' या नाटकात मालतीचे पहिले वचन ऐकल्यावर रोमांचित झालेल्या माधवाच्या अवस्थेचे वर्णन करताना म्हटले आहे–

*प्रथमप्रियासंश्रवस्फुर–*
*त्पुलकेन संप्रति मयावलम्बते।*



*घनराजिनूतनपय: समुक्षण।*
*क्षणबद्धकुड्मल कदम्बडम्बर: ।।*
(मालतीमाधवम् - अंक ३, श्लोक क्र. ७)

अर्थ - माधव म्हणतो, ''प्रियेचे पहिले वचन ऐकताच माझ्या अंगावर रोमांच फुलले. मेघमालेने पहिल्या पावसाच्या थेंबांचे सिंचन केले असता कदंब जसा क्षणात कळ्यांनी डवरून यावा तशी माझी अवस्था झाली.''

भवभूतीच्या 'उत्तररामचरितम्' या नाटकाच्या तिसऱ्या अंकातील वनवर्णनात, कदंबावर वास्तव्य करणाऱ्या मयूराचा निर्देश केला आहे. (श्लोक क्र. २०) कदंब आणि मयूर या दोघांनाही वर्षाऋतू प्रिय असल्याने त्यांचे हे साहचर्य अगदी स्वाभाविक आहे.

याच तिसऱ्या अंकात रामाचे स्पर्शसुख अनुभवणाऱ्या सीतेचे वर्णन आले आहे.

*सस्वेदरोमाञ्चितकम्पिताङ्गी जाता प्रियस्पर्शसुखेन वत्सा।*
*मरून्नवाम्भ: प्रविधूतसिक्ता कदम्बयष्टि: स्फुटकोरकेव।।*
(उत्तररामचरितम् अंक ३, श्लोक क्र. ४२)

अर्थ-रामाच्या स्पर्शसुखाने ती बाला (सीता) रोमांचित होऊन कंपित झाली. तिला घाम फुटला. जणू काही नवमेघामुळे भिजलेल्या, वाऱ्यामुळे हलणाऱ्या आणि एकदम कळ्या आलेल्या 'कदंबयष्टि'प्रमाणे म्हणजे कदंबाच्या डहाळीप्रमाणे तिची अवस्था झाली.

कदंब आणि रोमांच यांच्यातील साधर्म्य इथे अगदी वेगळ्या प्रकारे आले आहे. भवभूतीच्या 'नवनवोन्मेषशालिनी' प्रतिभेचे ते द्योतक आहे. येथे सीतेचा संदर्भ असल्याने 'कदंबवृक्षा'ऐवजी 'कदंबयष्टि' आहे. या कदंबयष्टीचे वाऱ्याने कंपित होणे, नूतन जलाने सिंचित होणे आणि तिच्यावरील कळ्या फुलणे या सर्वांचे सीतेच्या रामस्पर्शाने कंपित होणे, स्वेद येणे आणि रोमांचित होणे या अवस्थांशी असणारे साम्य; भवभूतीने अगदी हळुवारपणे दाखवले आहे. अष्टसात्त्विक भावांपैकी कदंबाशी साहचर्य असणारा केवळ 'रोमांच'च नव्हे, तर वेपथु (कंप) आणि स्वेद हे भावही इथे आले आहेत. हे या श्लोकाचे वेगळेपण आहे. सीतेला स्पर्श करणारा राम कदंबयष्टीला नवजलवर्षावाने स्पर्श करणाऱ्या मेघाप्रमाणेच श्यामल आहे. सूर्याने जलाशयांमधून शोषून घेतलेल्या जलसंचयापासून बनलेला मेघ जसा 'सूर्यप्रभव' आहे, तसाच रामही 'सूर्यप्रभव' वंशातील आहे. राम आणि सीता यांना 'आकाशा'तील मेघ आणि 'धरणी'वरील कदंबयष्टी यांची उपमा दिलेली असल्याने त्यातून ग.दि. माडगूळकरांच्या 'गीत रामायणा'तील 'आकाशाशी जडलेले धरित्रीचे नाते'ही सूचित झाले आहे. शिवाय राम आणि कदंबप्रिय कृष्ण हे दोघेही विष्णूचेच अवतार! गोलाकार फुलत जाणाऱ्या कदंबफुलाप्रमाणेच ही अर्थवलये फुलत जातात.

प्रेमिकांना दर्शन, वचन आणि स्पर्श यांमुळे अधिकाधिक होणारा आनंद, 'अष्टसात्त्विक भावां'पैकी एक असणाऱ्या 'रोमांचा'तून व्यक्त होतो. अशा रोमांचांना देण्यात आलेली फुललेल्या कदंबाची काव्यमय उपमा संस्कृत कवींनी जणू कदंबाच्या फुलाप्रमाणेच 'शिरोधार्य' मानली!

शूद्रकाच्या 'मृच्छकटिकम्' या नाटकात मात्र कदंबाचे 'वेगळे रूप' आपल्याला पाहावयास मिळते. या नाटकाच्या पाचव्या अंकात वर्षाऋतूच्या पार्श्वभूमीवर, 'अंगे भिजली जलधारांनी' अशा अवस्थेतील 'वसंतसेना' आणि तिला आलिंगन देणारा 'चारुदत्त' यांचा उत्कट प्रणय शूद्रकाने रंगवला आहे. या अंकात कदंबाचे वर्णन करताना शूद्रकाने 'नीप: प्रक्षेपायते।' (श्लोक क्र. १४) असे म्हटले आहे. खरोखरच

वर्षाऋतूत एकाच वेळी सर्वांगी फुललेला कदंब प्रदीपाप्रमाणेच झळाळतो! कदंबाच्या तेजस्वी रूपाबरोबरच त्याच्या कामोत्तेजक मादक सुवासाचेही वर्णन करावयास शूद्रक विसरलेला नाही.

संस्कृतप्रमाणेच प्राकृत साहित्यातही कदंबाला स्थान आहे. अर्धमागधी भाषेतील जैन धर्मग्रंथांमध्ये 'नायाधम्मकहाओ' (ज्ञाताधर्मकथा) या धर्मग्रंथाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जैन तत्त्वज्ञानाशी संबंधित असूनही या ग्रंथात काव्यात्म वर्णने आपल्याला पाहावयास मिळतात. या ग्रंथातील 'उक्खित्तनाय' (उत्क्षिप्तन्याय) मधील धारिणी राणी स्वप्नातील शुभसूचक हत्ती पाहून हर्षाने रोमांचित होते. तिचे वर्णन करताना ग्रंथकर्त्याने म्हटले आहे– 'धाराहयकलंबपुप्फगं पिव समूसियरोमक्वा' (अर्थ – जलधारांच्या वर्षावाने फुललेल्या कदंबपुष्पाप्रमाणे धारिणी राणी रोमांचित झाली होती.) विशेष म्हणजे ज्या त्वचारन्ध्रांतून रोम बाहेर येतात त्यांचाही 'रोमकूव' (संस्कृत–रोमकूप) या शब्दाने उल्लेख केला आहे. याच कथेत आणखी एका ठिकाणी कदंबाला असलेल्या 'नीप' या नावाबद्दल 'नीव' हा शब्द आला आहे. आजही कोकण प्रदेशात 'नीप'ला 'नीव' हे नाव रूढ आहे.

'नायाधम्मकहाओ'मधील माकंदी नावाच्या व्यापाऱ्याच्या मुलांच्या कथेत वर्षाऋतूवर गजराजाचे रूपक केले आहे– (पाऊस उड गयवरो – प्रावृट्ऋतुगजवर:) या रूपकामध्ये अत्यंत सुवासिक आणि उन्मादक असणाऱ्या कदंबाला हत्तीचा 'दान' म्हणजे मद म्हटले आहे. (नीव सुरभि दाणो)

याशिवाय 'भगवतीवियाहपन्नति' (भगवती व्याख्याप्रज्ञप्ति) सारख्या अन्य प्राकृत ग्रंथांतील वनवर्णनां–मध्येही कदंब आला आहे.

प्राकृत ग्रंथांमध्ये 'हाल सातवाहन' राजाच्या 'गाहासत्तसई' (गाथासप्तशती) या शतक काव्यात कदंबाला रोमांच आभूषणे यांसारख्या सांकेतिक संदर्भापेक्षा अगदी वेगळा संदर्भ आहे. कामदेव मदनाजवळ प्रेमिकांची हृदये विद्ध करण्यासाठी अरविंद (लाल कमळ), अशोक, आम्रमंजरी, नवमल्लिका (ताजी जुई) आणि नीलोत्पल (निळे कमळ) असे पाच पुष्पबाण आहेत. गाथासप्तशतीतील विरहिणी, 'मदनसखा' असणारा वसंतऋतू कसाबसा व्यतीत करते. पण वर्षाऋतूत मात्र तिची विरहव्यथा अधिकच तीव्र होते. ती आपल्या सखीला म्हणते–

*सहि दुम्मेन्ति कलम्बाइं जहमं तह ण सेसकुसुमाइं।*
*णूणं इमेसु दिअहेसु वहइ गुडिआधणुं कामो।।*

संस्कृत छाया–
*नान्यकुसुमानि सखि मां व्यथयन्ति तथा यथा कदम्बानि।*
*वहति हि कामो नूनं गुटिकाधनुरेषु दिवसेषु।।*
(गाथासप्तशती शतक क्र. २, गाथा क्र. ७७)

अर्थ – सखी दुसरी कोणतीही फुले मला व्यथित करत नाहीत. कदंबाची फुले मात्र मला या दिवसांत व्याकूळ करतात. ती कामदेवाच्या गलोलातील गोट्यांसारखी दिसतात.

येथे वर्षाऋतूत विरहिणीला विद्ध करण्यासाठी मदनाजवळ एक वेगळेच अस्त्र आहे, ते म्हणजे गलोल! या गलोलीतून वर्षाऋतूत फुलणारी गुटिकाकार म्हणजे गोट्यांच्या आकाराची कदंब फुले विरहिणीला मारून मदन तिला घायाळ करतो. म्हणूनच येथे मदनासाठी 'गुडिआधणु' (गुटिकाधनु:) हा शब्द वापरला आहे. कदंब फुलांचा हा उल्लेख जितका अभिनव आहे तितकाच काव्यमयही आहे.

असा हा कदंब! प्राचीन काळात केवळ संस्कृत साहित्यातच नव्हे तर प्राकृत साहित्यातही फुललेला! या फुललेल्या कदंबाने अर्वाचीन काळात हिंदी, मराठी, बंगाली यांसारख्या अन्य भाषिक कवींच्या प्रतिभेलाही फुलवले.

'ज्ञानतपस्विनी' दुर्गा भागवत यांनी तर 'कदंब' नावाचा अत्यंत अभ्यासपूर्ण आणि 'कदंबा'प्रमाणेच अनेक 'शाखां'चा 'पानोपानी' फुललेला ग्रंथ लिहिला आहे. असा हा 'अम्लान' कदंब!

खेड्यापाड्यात भूतबाधा झालेल्या व्यक्तीला 'झाड' म्हणण्याचा प्रघात आहे. कदंबाच्या बाबतीत म्हणायचे झाले तर स्वत:ला 'मोहनबाधा' झालेले हे झाडच दुसऱ्यांना झपाटून टाकणारे आहे. स्वत:च्या गोलाकार फुलांप्रमाणे स्वत:भोवती 'गूढतेचे वलय' निर्माण करून हा वृक्ष मनात मुळे घट्ट रोवून उभा राहतो!

ऋतुचक्र फिरत राहते... दाहक ग्रीष्मानंतर वर्षाऋतू येतो...आकाशात मेघ दाटून येतात आणि 'घनश्यामसुंदरा'च्या आठवणीने कदंब पुलकित होतो... फुलकित होतो... अजूनही... अजूनही...!

**प्रा. नीला कोर्डे**
'वरदान', अग्यारी लेन,
एदलजी रोड, ठाणे (प.) ४०० ६०१
दूरध्वनी : २५३९७९१२



"माझं भविष्य, सुरक्षित"
एलआयसी ची
जीवन अंकुर
नॉन-लिंक्ड जीवन विमा प्लॅन
• मुदतपूर्तीला 'सम ॲश्युअर्ड' आणि लॉयल्टी ॲडिशन* देय
• ज्याच्या जीवनाचा विमा उतरवला त्याचे अकाली निधन झाल्यास पुढील रकमा मिळतील:
क) एक सम ॲश्युअर्ड तात्काळ
ख) मुदतपूर्तीपर्यंत सम ॲश्युअर्डच्या 10% प्रति वर्ष
ग) मुदतीच्या अखेरीस 'मॅच्युरिटी बेनिफिट्स' (सम ॲश्युअर्ड आणि लॉयल्टी ॲडिशन्स*)
• ॲक्सिडेंट बेनिफिट आणि क्रिटिकल इलनेस रायडर पर्याय उपलब्ध
• पालकांच्या जीवनावर, मुलाला लाभार्थी करून जोखमीसाठी विमाछत्र
• एकदाच, एक रकमी हप्त्याचा पर्याय देखील उपलब्ध
तुमच्या मुलाच्या भवितव्याची खात्री बाळगा, पूर्णपणे.
LIC
भारतीय आयुर्विमा महामंडळ
566773 ला 'CITY' एसएमएस करा, उदा. 'Mumbai', आताच!
www.licindia.in
विमा आग्रहाची विषयवस्तू आहे. विक्री व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी कृपया सेल्स ब्रोशर काळजीपूर्वक वाचा.
*कॉर्पोरेशनच्या अनुभवावर अवलंबून

# पन्नाशीतला भावुक जेम्स बाँड

**अपर्णा पाटील**

अमेरिकन नाव, चेहरामोहरा घेऊन आलेला ब्रिटिश इंटेलिजन्स ऑफिसर जेम्स बाँड आज जगभरातला लाडका पुरुष आहे. हेरकथांचा काल्पनिक नायक केवळ पुस्तकापुरता उरलेला नाही. पुरुषत्वाच्या कल्पनेला आक्रमतेनं मांडणारा हा नायक मानवी भावभावनांही प्रभावित करणारा ठरला आहे. त्याच्या असण्यानं आपलं मानसशास्त्र बदलतं आणि आपल्यातल्या बदलानं बाँडची मानसिकताही...

तो सहा फूट उंचीचा असावा. त्याचं वजन ७६ किलो असावं. डोळे निळे, गालावर आणि खांद्यावर जखमेचा व्रण हवा. त्यानं असभ्य भाषा वापरू नये. तो पिस्तूल चालवण्यात वाकबगार आणि सुरा फेकण्यात पटाईत असला पाहिजे. त्याला जर्मन आणि फ्रेंच भाषा अवगत असाव्यात. मर्यादेत धूम्रपान आणि सुंदर स्त्रिया ही खास आवड, या अटी आहेत जेम्स बाँड असण्याच्या.

"The scent and smoke and sweat of a casino are nauseating at three in the morning. Then the soul-erosion produced by high gambling - a compost of greed and fear and nervous tension - becomes unbearable and the senses awake and revolt from it."

इयान फ्लेमिंग यांच्या पहिल्या बाँड कादंबरीची ही सुरुवात, जेम्स बाँड ००७ नावाच्या इंटेलिजन्स ऑफिसरच्या रहस्यमयी जगात घेऊन जाणारी. कादंबरीचं नाव होतं 'कसिनो रोयाल.' फ्लेमिंग यांनी, जेम्स बाँडला जन्माला घातलं, तेव्हा तो कसा दिसावा आणि कसा असावा हे लिहून ठेवलं होतं. त्यावेळी विसाव्या शतकातल्या एका काल्पनिक मानवाला आपण जन्माला घालतो आहेत हे तर त्यांना ठाऊक होतं, पण पन्नास वर्षांनंतरही बाँडविषयी वाटणाऱ्या आकर्षणानं ते चकित झाले असते. कारण १९५३ मध्ये आलेल्या आपल्या कादंबरीचा नायक हा अतिशय डल हवा होता. अगदी त्याच्या नावापासून सगळंच कंटाळवाणं असावं, ज्याचं आयुष्यही नीरस असावं, असं फ्लेमिंग यांना वाटत होतं. त्यांनी त्याचं नाव ठेवताना तशी काळजी घेतली होती. त्यांच्या मते जगातलं अजिबात आकर्षक नसलेलं नाव होतं ते, जेम्स बाँड. आज जेम्स बाँड उच्चारताना आपल्या शब्दोच्चारावरचा जोर आपल्याला ठरवूनही कमी करणं शक्य होतं नाही, ते नाव फ्लेमिंग यांच्या लेखी अतिशय एकसुरी होतं.

ब्रिटिश असलेल्या फ्लेमिंग यांना पक्षीनिरीक्षणाची आवड होती. कॅरेबियन पक्ष्यांविषयीचे जाणकार आणि 'द



बर्ड ऑफ वेस्ट इंडिज'मुळे प्रसिद्ध पावलेल्या लेखकाचे फ्लेमिंग चाहते होते. त्यांचं नाव होतं, जेम्स बाँड. अमेरिकन पक्षीतज्ज्ञाचं हे नाव, फ्लेमिंग यांना आपल्या कादंबरीच्या नायकासाठी वापरायचं होतं. त्यावेळी निकष एकच होता, की त्या नावात खळबळ माजवणारं अजिबात काही असायला नको. पण त्याच नावानं पुढची पन्नास वर्षं खळबळ माजवण्याची एकही संधी सोडलेली नाही.

जसं बाँडचं नाव हे अमेरिकन होतं, तसं त्याचं दिसणंही. अमेरिकन गायक होगी कारमायकल याच्यासारखा आपल्या कादंबरीचा नायक दिसावा, असं फ्लेमिंग यांनी ठरवून टाकलं होतं. तेव्हाही त्याचं दिसणं हेच फक्त अपेक्षित होतं. होगीप्रमाणेच बाँड देखणा असावा, त्याच्याप्रमाणेच बाँडनं आपले केस मागे वळवलेले असावेत, त्याच्या उजव्या भुवयीवर केसाची झुलपं आलेली असावीत, याबाबत ते ठाम होते. त्याचवेळी बाँडच्या डोळ्यांत थंडपणा आणि जीभ तिखट असायला हवी, असाही त्यांचा कटाक्ष होता.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात फ्लेमिंग यांना गुप्तहेर, कमांडो म्हणून काम करणाऱ्या अनेकांचा सहवास घडला. त्यातूनच बाँड नावाचं व्यक्तिमत्त्व फ्लेमिंग यांनी घडवलं. महायुद्धाच्या काळात ग्रीस आणि नॉर्वेमध्ये कामगिरी करणाऱ्या पीटर नावाच्या अधिकाऱ्यावरून बाँड बेतल्याचं अनेकजण सांगतात. पण बाँडच्या अनेक आवडीनिवडी किंवा स्वभावाचे बारकावे लक्षात घेतले, तर त्यात खुद्द फ्लेमिंग यांची झलक पाहायला मिळते.

फ्लेमिंग बाँडमध्ये स्वतःला पाहत होते. त्यामुळेच त्याचं दिसणं, वागणं आणि त्याचं आयुष्य त्यांनी बारकाव्यांसह स्पष्ट केलं. म्हणूनच कल्पनेनं रंगवलेलं हे व्यक्तिमत्त्व सजीव झालं. इतकंच नाही, तर 'डॉ. नो' हा पहिला बाँडपट प्रदर्शित झाला, तेव्हा त्यात बाँडची भूमिका करणारा अभिनेता शॉन कॉनरी हा स्कॉटिश वंशाचा असल्याचं लक्षात घेऊन त्यांनी 'यू ओन्ली लिव्ह ट्वाइस' कादंबरीत बाँड नेमका कोणत्या घराण्यातून आलाय, याची नोंद वाढवली. आपल्या नायकाला जिवंत माणसांच्या यादीत बसवण्याचा त्यांचा हा प्रयत्न होता. नंतर तर द टाइम्समध्ये प्रसिद्ध झालेल्या लेखात बाँडचं नाव, गावं, आईवडील, वंशपरंपरा यांची जंत्री छापण्यात आली. त्याही पुढे जाऊन या कल्पित मानवाचं अधिकृत चरित्रही प्रसिद्ध झालं. जॉन पिअरसन यांच्या 'जेम्स बाँड – ऑथराइज्ड बायोग्राफी ऑफ ००७' या पुस्तकातून बाँडच्या जन्मतारखेचा दाखला मिळाला, तो पृथ्वीवरचा अधिकृत रहिवासी झाला. बाँडला ११ नोव्हेंबर १९२१ ही जन्मतारीख मिळाली. म्हणजे

त्या चरित्रानुसार त्याचं वय सांगायचं झालं तर आज जेम्स बाँडनं नव्वदी पार केलीय.

फ्लेमिंग यांनी या नायकाला जन्माला घालण्याची काही महत्त्वाची कारणं होती आणि त्यातच त्याच्या जिवंत होण्याची कारणं दडली आहेत. ब्रिटिशांनी अख्ख्या जगावर राज्य केलं. पण पहिल्या महायुद्धानंतर इंग्लडचं नंबर वन स्थान डळमळीत झालं. जगाच्या नकाशावरचे देश आणि स्थिती बदलली. रशियात कम्युनिस्ट चळवळीचे वारे वाहायला लागले तर अमेरिकेत मुक्त स्वातंत्र्याचे. जगभरात आपल्या बुद्धीचा आणि सामर्थ्याचा झेंडा मिरवणाऱ्या ब्रिटिशांना प्रथमच आपण कोणाच्या तरी समोर झुकतो आहोत, याची जाणीव होऊ लागली. आपल्या परंपरा, साहित्य आणि देशाचा अभिमान असलेली ब्रिटिश जनता अस्वस्थ होऊ लागली. या अस्वस्थतेतून बाँड जन्माला आला.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात परस्परअविश्वासाचा काळ वाढला. प्रत्येक देशामध्ये गुप्तचर संघटना अस्तित्वात आल्या. त्यांचं काम काय, तर त्यांच्या लेखी शत्रू असलेल्या राष्ट्रावर नजर ठेवणं, राजकीय हालचाली ओळखून आपल्या नेत्यांना सावध करणं. असल्या कामात कमालीची जोखीम असे. देशाच्या सुरक्षेसाठी स्वतःचा जीव धोक्यात घालणारी ही माणसं नेमकी कोण असतात, ती कशाप्रकारे काम करतात, याविषयीचं सुप्त आकर्षण सर्वसामान्यांमध्ये जागृत होऊ लागलं होतं. त्यामुळेच महायुद्धाच्या काळात अनेक गुप्तहेरांच्या सुरस आणि चमत्कारिक कथा चवीनं ऐकल्या-वाचल्या गेल्या. लोकांच्या नजरेस फारशी न पडणारी आणि गुप्तपणे आपल्या कारवाया करत राहणारी मंडळी सिनेमा, साहित्य आणि वर्तमानपत्रातल्या बातम्यांचा विषय झाली. त्यामुळेच बाँड हा काल्पनिक असूनही खराखुरा वाटला. जणू काही बाँड हा ब्रिटिश इंटेलिजन्समधला खराखुरा अधिकारी आहे की काय, असं वाटणं घट्टपणे रुजलं.

दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा काळ होता तो. युद्धाचे पडसाद मानवी भावभावनांवर होतात याची चाहूल लागली होती. अशातच युद्धात खचून न जाता प्रत्येक मोहीम ही यशस्वी करण्यासाठी अन्य कशाचीही पर्वा करता कामा नये, ही भावना लोकांमध्ये, विशेषतः सैनिकांमध्ये पेरणं गरजेचं होतं. त्यामुळेच लष्कराचा भाग असलेल्या फ्लेमिंग यांना बाँडला जन्माला घालावंसं वाटलं असावं. बाँडचा उदय होण्याची नेमकी कारण काय असतील याविषयी मतभेद असतील, आहेतच. पण पौरुषत्व नावाची जी काही गोष्ट असते, ती बाँडच्या रूपात अधिक आक्रमकपणे फ्लेमिंग यांनी मांडली, यात शंकाच नाही.



अत्याधुनिक शस्त्रं, सौंदर्यवतींचा गराडा आणि उच्चभ्रू गोष्टींची आवड असलेला पुरुष, अशा फँटसीला फ्लेमिंग यांनी जन्माला घातलं. आपल्या शत्रूला तो अत्यंत निदर्यपणे आणि सफाईदारपणे संपवतो. ते काम करताना या कानाचं त्या कानाला कळू न देण्याची हातोटी त्याच्याकडे आहे. प्रत्येक पुरुषामध्ये आपण जे काही करतो, ते दडवून ठेवण्याची उपजत वृत्ती असते. त्याच वृत्तीचं बाँड हा प्रतीक होता. स्त्रियांशी शारीरिक जवळीक ठेवणारा, पण त्यांच्यात अजिबात न गुरफटणारा, हे पुरुषी मानसिकतेला अधिक सामर्थ्यवान बनवणारं होतं. आधुनिक पुरुषानं कसं असावं याविषयीची संकल्पना तेव्हा कुठे विकसित व्हायला लागल्या होत्या. त्यामुळेच बाँडशी आपलं मानसशास्त्र जुळवून पाहण्याच्या वृत्तीचा ताबा

सर्वसामान्यांच्या मनानं घेतला.

फ्लेमिंग यांनी बारा कांदबऱ्या, दोन लघुकथासंग्रह बाँडसाठी लिहिले. आज आपण जगातील प्रभावशील लोकांच्या यादीत दरवर्षी नवनवी नावं पाहतो. पण केवळ पुस्तकातलं काल्पनिक पात्र असलेल्या बाँडचा गेल्या पाच दशकांपासूनचा प्रभाव निश्चित आश्चर्यचकित करायला लावणारा आहे. हा प्रभाव इतका, की फ्लेमिंग यांच्या जाण्यानं बाँड संपला नाही तर अनेक लेखकांनी बाँडला पुन्हा लोकांसमोर आणलं. हेच मात्र त्याच्या लोकप्रिय असण्याचं कारण नाही. तर बाँड नावाचा करिश्मा जन्मला आणि सतत लोकांना भुलवत राहिला तो बाँडपटांमुळेच. पुस्तकातल्यापेक्षा हा बाँड खूपच वेगळा आहे. बाँड नावाच्या व्यक्तिमत्त्वाला परिपूर्ण पुरुषाचं प्रतीक मानला जाण्यासाठी हे चित्रपटच अधिक कारणीभूत ठरले.

खरं तर आजच्या काळाच्या कसोटीवर पुस्तकातला बाँड कदाचित कंटाळवाणा ठरला असता, पण सिनेमांनी त्याला काळाबरोबर बदलायला लावलं. पडद्यावरचा उंच, सावळा आणि कमालीचा धाडसी अभिनेता तुमच्या नजरेला नजर देत एंट्री करतो, तेव्हा तुमचा श्वास रोखला जातो. त्याच्या नजरेतली बेफिकिरी तुमचा ताबा घेते. थेट बारमध्ये शिरत तो, आपली ऑर्डर सोडतो, 'मार्टिनी.. शेकन अँड नॉट स्टर्रड'. त्यानंतर समोरचा माणूस कोण आहे, हे जाणून घेण्याची तसदीही न घेता, स्वतःची ओळख करून देतो, 'माय नेम इज बाँड... जेम्स बाँड' आणि बस्स, पुढचा तास-दीड तास तुम्ही बाँडमध्ये गुंतून पडता. १९६२ मध्ये 'डॉ. नो'मध्ये पहिल्यांदा शॉन कॉनरीच्या रूपानं बाँड पडद्यावर आला. त्यानंतर पुन्हा पुन्हा तो आपला कब्जा घेत राहिला. अभिनेते बदलले, कथा बदलल्या, शत्रू, मित्र आणि बॉसही बदलले, इतकंच नाही तर बाँडचा स्वभावही. तरीही आकर्षण कायम तेवढंच राहिलं.

पहिल्या बाँडपटाला पडद्यावर आणताना, काही गोष्टी खुबीनं केल्या गेल्या तर काही काळानुरूप येत गेल्या. पहिल्या कादंबरीतला बाँड एकदम ह्युमरलेस होता. तो प्रेमात पडलेला आहे, त्यामुळेच तो रोमँटिक आहे, असंही म्हणायला वाव आहे. तेव्हाचा बाँड ही निव्वळ आणि निव्वळ फ्लेमिंग यांच्या लेखणीची कमाल होती. तेव्हाचा बाँड हा फक्त आणि फक्त गंभीर प्रवृत्तीचा होता. पडद्यावर येताना तो चक्क बदलला, तेही फ्लेमिंग यांनी उभ्या केलेल्या बाँडच्या व्यक्तिमत्त्वाला धक्का न लावता.

आजवर २३ बाँडपट आले. सहा अभिनेत्यांनी बाँडची भूमिका साकारली. जगातल्या बहुसंख्य जनतेनं किमान एक तरी बाँडपट पाहिलेला आहे. काही चित्रपट पडले, तरीही बाँडपटाची उत्सुकता कधीच कमी झाली नाही, ती बाँडचं व्यक्तिमत्त्व काळाप्रमाणे बदलत गेल्यानंच. मुळात पन्नाशीच्या दशकात जेव्हा बाँड प्रथम पडद्यावर आला तेव्हा त्याचं शांत, संयमी पण शत्रूला चारीमुंड्या चीत करण्याचं कसब प्रेक्षकांना प्रेरणादायी वाटलं. तेव्हा प्रत्येक पुरुषानं आपलं प्रतिबिंब बाँडमध्ये पाहिलं. तर अर्थार्जनासाठी घराबाहेर पडलेल्या, मुक्त होऊ पाहणाऱ्या स्त्रीला अशा पुरुषाशी संग करावा, असं वाटू लागलं.

*अभिनेत्याला संपवणारी भूमिका*

पिअर्स ब्रॉसननं, बाँडनं आपली अभिनयाची कारकीर्द संपवली, अशी तक्रार करत बाँडपटांतून संन्यास घेतला, तेव्हा आता नवा बाँड कोण असा प्रश्न निर्माण झाला. पिअर्सचं म्हणणं योग्यच होतं, त्यातल्या त्यात शॉन कॉनरी अभिनेता म्हणून नशीबवान म्हणायला हवा. कारण पहिला बाँड होण्याचा मान जरी मिळाला, त्यानंतरही अनेक चांगल्या भूमिका असलेले चित्रपट त्याच्या वाट्याला आले. याउलट झालं ते रॉजर मूरच्या बाबतीत. आपल्या आवडीचा बाँड म्हणून नव्वद टक्के लोक रॉजर मूरचं नावं घेतील. पण त्याखेरीज त्यानं कोणत्या सिनेमात काम केलंय का, याचा सर्चही कोणी करत नाही. बाँड म्हणून जे काही व्यक्तिमत्त्व आपल्या डोक्यात बसलंय त्याचं श्रेय मात्र निःसंशय मूरकडे जातं.



बाँडला फ्लेमिंग यांनी व्यक्तिमत्त्व तर दिलंच, पण ते अधिक प्रभावी व्हावं, यासाठी गाडी, कपडे, गॅजेट्सची जोड दिली. पुढे याच गोष्टी पुरुषी व्यक्तिमत्त्वाशी आपसूक जोडल्या गेल्या. त्याशिवाय त्याचं धाडसी असणं हेदेखील. सगळ्यात लक्ष वेधून घेणारी गोष्ट ठरली ती म्हणजे त्याचे वन लायनर्स. 'आय ॲम बाँड... जेम्स बाँड', या एका ओळीतून स्वतःची ओळख करून देणाऱ्या बाँडचा आत्मविश्वास कमालीचा आकर्षक ठरला. पडद्यावरची ती ओळख प्रत्येक स्त्री आणि पुरुषाची सायकॉलॉजी ढवळून काढणारी ठरली.

जेम्स बाँड लाडका होण्याचं पहिलं आणि सगळ्यात महत्त्वाचं कारण होतं ते त्याची आयुष्यातल्या थरारक प्रसंगांना सामोरं जाण्याची धाडसी वृत्ती. आपल्या जीवाची पर्वा न करता तो अनेक प्रसंग हाताळतो. अगदी अशक्य वाटणाऱ्या परिस्थितीतही तो आपली विनोदबुद्धी कायम राहू देतो. त्याचबरोबर शत्रूचा खातमा अगदी थंड डोक्यानं करतो. सर्वसामान्याला हवंहवंसं वाटणारं जगणं, बाँड खरंच जगत असल्याचा आभास मानवी इगोला अधिक कुरवाळायला लागला.

स्त्रीनं कसं असावं आणि पुरुषानं कसं वागावं, याचे ठोकताळे एकविसाव्या शतकाच्या उदयाबरोबर चुकीचे ठरू लागले. बाँडपटांनी त्याची झलक दाखवून दिलीय. एकविसाव्या शतकातल्या स्त्रीला पुरुषाचा सगळ्यात जास्त कोणता गुण आवडत असेल, तर त्याचं हजरजबाबी असणं किंवा त्याचा सेन्स ऑफ ह्युमर. बाँडमध्ये गुण आला तो, इंग्लड आणि अमेरिका अशा प्रतिस्पर्धी मानसिकतेतून. अनेकदा तो बिलऐवजी चेक असा शब्द वापरतो, टॅक्सीऐवजी कॅब. खरं तर ब्रिटिशांचा ह्युमर हा वेगळा आहे, तर अमेरिकनांचा वेगळा पण ब्रिटिश बाँड सहजपणे अमेरिकन ह्युमरसह पचवला गेला.

पुरुषांना वेगाचं आकर्षण असतं. त्यामुळेच गाड्यांची आवड असणं त्यांच्या प्रवृत्तीचा भाग असू शकतो. बाँडलाही कारचं त्यातही वेगवान अशा गाड्यांचं वेड आहे. बाँडच्या हातातली बंदूक हाही पुरुषी मानसिकतेचा आविष्कार मानला जातो. स्त्रिया ज्याच्याकडे पाहून 'शस्त्रं!' असं म्हणत सुस्कारा सोडतील, अशा वस्तूविषयी पुरुषाला असणारं आकर्षण हे विसाव्या शतकातील बदलत्या पौरुषत्वाचं लक्षण म्हणता येईल.

बाँडला आकर्षक असण्याचं आकर्षण आहे. खरं तर वैद्यकशास्त्रात होत असलेल्या नव्या नव्या शोधांत प्लास्टिक सर्जरीने तेव्हा मूळ धरलं होतं. बाँडला एका मोहिमेवर




असताना झालेल्या दुखापतीनं झालेल्या व्रणाचा उल्लेख जसा कादंबरीत येतो, तसा तो लपवण्यासाठी तो प्लास्टिक सर्जरी करून घेतो, हाही. एकविसाव्या शतकात पुरुषांनाही सुंदर आणि आकर्षक दिसण्याची ओढ वाटू लागली. बाँड त्याच वृत्तीचा प्रतीक ठरला. फक्त फ्लेमिंग यांना त्याची तीव्रपणे जाणीव झाली नसणार.

बाँडच्या व्यक्तिमत्त्वात भर पडत गेली ती त्याची भूमिका साकारणाऱ्या अभिनेत्यांमुळे. बाँड साकारलेल्या प्रत्येक कलाकारानं त्याच्या व्यक्तित्त्वाला नवं वळण दिलं. तेही आपला बाँड हा आधी साकारलेल्या कलाकारांच्या बाँडपेक्षा वेगळा असावा, या मानसिकतेतून. रॉजर मूर, शॉन कॉनरी आणि पिअर्स ब्रॉसनन यांनी बाँड साकारताना त्याला दंतकथा बनवून टाकलं.

पहिला बाँड साकारणारा शॉन कॉनरी देखणेपणात फिका होता, पण त्याची देहबोली बाँडच्या व्यक्तिमत्त्वातील

कणखरपणा ठासून दाखवणारी होती. रॉजर मूर हा जिगरबाज आणि देखण्या व्यक्तिमत्त्वाचा नट. त्यामुळेच आजवरचा सगळ्यात जास्त आवडता बाँड तोच. रॉजर मूर हा देखणेपणात कॉनरीपेक्षा उजवा होता, मग हीच गोष्ट बाँड हा देखणाच असला पाहिजे, या आग्रहात नंतरच्या काळात रूपांतरित झाली.

रॉजर मूर यानं पडद्यावरचं बाँडचं अस्तित्व जिवंत केलं. त्यानं बाँड असण्याच्या ज्या काही संकल्पना फ्लेमिंग यांच्या डोक्यात असतील, त्याहीपेक्षा अधिक चांगल्या पद्धतीनं लोकांमध्ये पोहोचवल्या. त्यामुळे मूर यांच्यानंतर बाँड कोणी करायचा, अशी चर्चा सुरू झाली तेव्हा दिग्दर्शक–निर्माते एका गोष्टीवर ठाम होते, ते म्हणजे बाँडचं देखणेपण. याच गरजेनुसार टीमोथी डॉल्टनची निवड झाली. खरं तर, समीक्षक, सिनेतज्ज्ञांच्या मते डॉल्टनचं व्यक्तिमत्त्व खऱ्या अर्थानं बाँडच्या जवळपास जाणारं होतं, पण प्रेक्षकांना मात्र तो पसंत पडला नाही. त्यानंतर बाँड पडद्यावर यायला बराच काळ जावा लागला. कारण एकच, बाँड नावाचं जे व्यक्तिमत्त्व लोकांच्या डोक्यात फिट्ट बसलंय, त्याला न्याय देणारा नट येण्याची वाट पाहणं.

तो काळ सामाजिक स्थित्यंतराचा होता. इंग्लडचं जागतिक नकाशावरच्या दबदब्याचं स्थान घटलं. अमेरिका आणि रशिया यांच्या दुश्मनीत अमेरिका वरचढ ठरली. अमेरिकेत हॉलिवूडमध्ये ॲक्शन, थ्रीलर आणि रहस्यकथांचा सुकाळ माजला. तर ब्रिटनमध्ये बाँडच्या वाट्याला उपेक्षा आणि दुर्लक्ष आलं. मार्केटिंग आणि ब्रँडिंगच्या जमान्यात ब्रिटिशांनी बाँडला पुन्हा एकदा लोकांसमोर आणलं, त्याच्या जुन्या व्यक्तिमत्त्वाला नव्या कोंदणासह सादर केलं.

बाँडचा यूएसपी असलेलं सेक्स अपील प्रेक्षकांना पुन्हा बाँडपटाकडे खेचून आणण्यासाठी वापरलं गेलं. त्याची चाल, त्याच्या हालचाली, समोरच्या व्यक्तीच्या नजरेला नजर भिडवत त्याच्याशी बोलण्याची लकब, हे बाँडला एक कमालीचा आत्मविश्वास असलेलं व्यक्तिमत्त्व देतात. एरवी शत्रूशी तो कितीही कठोरपणे वागो, एखाद्या स्त्रीबरोबरचं त्याचं वागणं नेमकं उलट असतं. अनेक स्त्रियांना तो आपल्या बाहुपाशात ओढून घेत असला तरी त्याची प्रिय व्यक्ती एकच आहे, नेमकी हीच गोष्ट पुरुष आणि स्त्री या दोघांना फँटसाइज करायला लागली. तशी पटकथा–बाँडकथा – तयार झाली.

बाँडचे कपडे हे स्टाइलिश असतात. त्याच्या



कपड्याच्या आत दडलेल्या कमावलेल्या शरीराला उठाव देणारे कपडे तो वापरतो. त्यामुळे पुरुषांमध्ये फॅशन नावाची गोष्ट जेव्हा महत्त्वाची ठरायला लागली तेव्हा हीच गोष्ट सगळ्यात प्रमुख मानली गेली. पुरुषांची फॅशन जशी बदलत गेली तसा बाँडचा स्टाइल कोशंटही बदलला. म्हणूनच ब्लॅक टेक्सिडोसह सुटाबुटात वावरणाऱ्या बाँडचं आकर्षण एकेकाळी होतं तर हवाईयन शर्ट किंवा निळ्या अंडरवेअरमधला बाँड आता लोकप्रिय झाला आहे.

बाँडगर्ल हे बाँडपट गाजण्याचं आणखी एक कारण. या बाँडगर्ल्स कमालीच्या सुंदर असण्याबरोबरच सौंदर्याच्या मोजमापात बसणाऱ्या असाव्यात. किंबहुना बाँडचं लक्ष आपल्याकडे वेधून घेण्याच्या नादात प्रेक्षकांमध्ये बसलेल्या पुरुषांमध्ये खळबळ उडवून द्यावी, हाच बाँडगर्ल सिनेमात असण्याचा हेतू असतो. युनिस गेसन या पहिल्या बाँडगर्लपासून अलीकडच्या कॅमिलीपर्यंतची बाँडगर्ल्सची यादी मोठी आहे.

पडद्यावर अभिनय करण्यापेक्षाही त्यांना ग्लॅमराइज करण्याची संधी दिली गेली. त्यामुळे बिकीनी या जगातल्या सगळ्यात जास्त आकर्षण असलेल्या पेहरावात त्यांना सादर करण्यात आलं. त्या एक तर बाँडच्या प्रेमिका म्हणून, नाहीतर त्याच्या शत्रू म्हणून बाँडपटात असतात, पण त्या सुंदर असल्या पाहिजे, ही अट कायम राहिली. जेन सेमूर, टेरी हॅचर, डायना रिग आणि हॅल बेरीसारख्या बाँडगर्ल पडद्यावर आणल्या गेल्या. त्यामुळेच बाँडगर्ल हे प्रत्येक पुरुषाचं स्वप्न आणि प्रत्येक स्त्रीसाठी आकर्षक असण्यामागची प्रेरणा ठरलं. अर्थात स्त्री-सौंदर्याच्या मोजमापाच्या कल्पनेप्रमाणे बाँडगर्लही बदलत गेल्या. कमनीय उर्सुला अँड्रेस ते इव्हा ग्रीनपर्यंतच्या बाँडगर्ल पाहून हा बदल नेमका कसा झाला ते सहज लक्षात येतं. या कल्पना केवळ बाँडगर्लच्या बाबतीच आहे, असं नाही तर बाँडसाठी अभिनेता निवडताना असंख्य निकषांची प्रमाणकं लावली गेली.

बाँड हा ब्रिटिशांनी आपला ब्रँड म्हणून वाढवलाय. त्यामुळे त्याचे दिग्दर्शक, तंत्रज्ञ, निर्माते हे ब्रिटिश किंवा त्यांचे हितसंबंध सांभाळणारे असावेत, असा कल कायम राहिला. त्यामुळेच बाँडची भूमिका आजवर कधीही अमेरिकन किंवा हॉलिवूडस्टारला दिली गेली नाही. शॉन कॉनरी (स्कॉटिश), जॉर्ज लाझेनबाय (ऑस्टेलियन), रॉजर मूर (ब्रिटिश), टिमोथी डॉल्टन (वेल्श), पिअर्स ब्रासनन (आयरिश) आणि डॅनियल क्रेग (ब्रिटिश) यांनी पडद्यावर बाँड साकारला.

निवडीचे आणखीही निकष लक्षात घ्यायला हवेत. कसिनो रोयालसाठी डॅनियल क्रेगची निवड होणं सगळ्यात धक्कादायक मानलं गेलं. दोनशे कलावंतांची ऑडिशन घेतली तेव्हा त्यात अनेक नामांकित कलाकार होते. त्यात एरिक बानाला नाकारताना चक्क, तो हवा तितका देखणा नाही असं कारण दिलं गेलं. इवान मॅकग्रोरला 'बुटका' म्हणून पिटाळलं तर ह्यू हॅकमनला 'टू फे' आणि कोलिन फॅरेलला 'टू स्लिझी' अशी विशेषणं लावत निवडकर्त्यांनी नाकारलं होतं. त्यामुळे डॅनियल क्रेगची निवड धक्कादायक आणि अनपेक्षित होती.

बाँडसाठी त्याच्या नावाची निवड झाली तोवर तो 'द पॉवर ऑफ द वन' आणि 'लॉरा क्रॉफ्ट - टूम्ब रेडर'मधला कलाकार एवढी कमाई करू शकला होता. बाँड म्हणून त्याच्या नावावर शिक्कामोर्तब होताच तो रातोरात सुपरस्टार झाला. तेव्हा खडबडीत चेहऱ्यामुळे आपण बाँड होण्यास लायक नाही, असं खुद्द डॅनियलाही वाटत होतं. सदतीस वर्षांच्या आणि विरळ केसांच्या डॅनियलनं बाँड साकारणं ही कल्पनाच अनेकांना अवास्तव वाटत होती. कारण रॉजर मूरपासून पिअर्स ब्रॉसननपर्यंत बाँडचं व्यक्तिमत्त्व देखणं असावं, ही संकल्पना रुजली होती. त्यातून लोकांना बाहेर काढणं, म्हणजे लोकांना कोमात ढकलण्याइतकं भयंकर होतं.

क्रेगची निवड करताना तीन सिनेमांचे करार घेऊन निर्माते त्याच्याकडे धावले. तेव्हा निर्मात्यांनी त्याची आधीची पाच-सहा प्रेमप्रकरणं झाली आहेत, बाँड साकारण्यासाठी एवढी गुंतागुंत पुरेशी आहे, अशी पावती डॅनिअलला देऊ केली होती!

जेम्स बाँड हे पडद्यावर साकारलं गेलेलं लार्जर दॅन लाइफ व्यक्तिमत्त्व आहे. तो हुशार, हाय-टेक, गूढ पण शक्तिशाली, कोणत्याही अडचणीवर सहज मात करणारा आणि कोणत्याही प्रसंगातून सहीसलामत बाहेर पडू शकणारा आहे. स्त्रीकडे मात्र एक उपभोग्य वस्तू म्हणून पाहतो आणि तो शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळे

*स्वप्नांचा अर्थ...*

तुम्ही स्वतःला जेम्स बाँड असल्याचं स्वप्नात पाहता, त्याचा अर्थ तुम्हाला त्याच्यासारख्या कथा किंवा त्याच्यासारख्या व्यक्तिमत्त्वाचं आकर्षण आहे. समजा, तुमच्या स्वप्नात जेम्स बाँड आला तर तुम्हाला ज्यात धोके आहेत, असं आयुष्य जगण्याचं आकर्षण आहे, असा त्याचा अर्थ होतो. जेम्स बाँडसारख्या कल्पित मानवानं सजीवांची मानसिकता बदलावी, हे सगळं मानसशास्त्राच्या अभ्यासाचा विषय ठरावं, हे बाँडचं योगदान लक्षात घ्यायला हवं.

तिला वाचवणं आणि तिची मदत करणं हे आपलं काम समजतो. ही मानसकिता हळूहळू बदलत गेली.

निर्माता आणि दिग्दर्शक दोघांनाही बाँड पडद्यावर कसा दिसावा, याचा अचूक अंदाज आहे. दिग्दर्शक आणि निर्माते जरी बदलले तरी बाँडचं ब्रँडिंग कसं व्हायला हवं, हे ते जाणून आहेत. त्यामुळेच आताच्या बाँडकडे शत्रूचा खातमा करण्यासाठी निव्वळ बंदुका असून भागत नाहीत, तर अत्याधुनिक गॅजेट्स द्यावे लागत आहेत. त्याचं स्टाइलिंग हे जगभरातल्या नामवंत डिझायनरकडे सोपवलं गेलं आहे. तर आता त्याचं देखणेपणही पुरेसं राहिलेलं नाही, तर त्याचे सिक्स ॲब्ज दिसले पाहिजेत, ही नवी अट निश्चित झाली आहे.

बाँड आणि त्याचा बॉस मिस्टर एम यांच्यातले संबंध कसे आहेत, हे लक्षात येण्यासाठी बाँडच्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या त्या क्रमानं वाचाव्या लागतील. गुप्तहेर असलेला एक व्यक्ती आणि त्याच्याकडे धाडसी मोहिमा सोपवणारा बॉस हा उत्सुकतेचा विषय होता. पिअर्स ब्रॉसननच्या सिनेमाच्या निमित्तानं पहिल्यांदा बॉस एमच्या ऐवजी मॅडम एम झाली. काळानुरूप स्वीकारलेल्या गेलेल्या अनेक बदलांपैकी एक, असं कोणी म्हणेल, पण ज्याला पुरुषी व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार मानला गेला आहे, अशा बाँडचा बॉस महिला असणं यात अनेक गोष्टी दडलेल्या आहेत. विशेष म्हणजे बाँडच्या भावूक होण्याची सुरुवात होताना, पुरुषी मानसिकतेची महिला बॉस त्याच्यावर कामगिरी सोपवू लागली आहे! ज्याला मेट्रोसेक्शुॲलिटी म्हणतात, अशा व्यक्तिमत्त्वाकडे बाँडचं झुकणं तिथूनच सुरू झालं. आताच्या स्कायफॉलमध्ये बाँड पूर्णपणे मेट्रोसेक्शुअल झालाय.

एरवी स्त्रियांकडे एक उपयोग्य वस्तू म्हणून पाहणारा बाँड बदलत गेला. पुरुषानं हळवं होण्यामुळे त्याच्या पुरुषी व्यक्तिमत्त्वाला तडा जाण्याचे दिवस संपले. बाँड म्हटला, की तो अजिबात हळवा असता कामा नये हे जे मिथक होतं, ते डॅनिअल क्रेगच्या कसिनो रोयालनं तोडलं. त्यामुळे ‘कसिनो रोयाल’ या पहिल्या कांदबरीवरचा दुसरा सिनेमा आणताना बाँड कमालीचा हळवा झालेला पाहायला मिळाला. अखेरच्या दृश्यात तो चक्क अश्रू ढाळतो. तर क्वांटम ऑफ सोलास पडण्याचं कारणही जेम्स बाँडनं आपल्या कामगिरीपेक्षा दोन स्त्रियांकडे अधिक लक्ष देत राहिलाय. मर्दानी बाँडला या रूपात पाहताना तो कुठेही बाँड नाही, असं वाटलं नाही. तो आणि मॅडम एम यांच्यातलं नातं तर आई आणि मुलाचं वाटावं, अशा काळजीयुक्त आदराचं झालं आहे. बाँड आता केवळ पुरुषाईचं प्रतीक राहिलेला नाही. स्त्री त्याच्यासाठी उपभोग्य नाही तर वीक पॉइंट बनली आहे.

खरं तर बाँडचं अस्तित्व हे ब्रिटिश मानसिकतेला धरून होतं. आपलं साहित्य, आपल्या परंपरांचा अभिमान असलेल्या मंडळींना बाँड आमचा आहे, याचा अभिमान आहे. ब्रिटिशांना त्याची गरज होती, तशी आजही आहे. ब्रिटनचा ब्रँड म्हणून जेम्स बाँडचं स्थान नंबर वन झालं आहे. तसं नसतं तर नुकत्याच झालेल्या ऑलिम्पिक्सच्या उद्घाटन सोहळ्यात ब्रिटनच्या महाराणीला समारंभस्थळापर्यंत आणण्याचं काम बाँडची भूमिका करणाऱ्या डॅनियल क्रेगवर सोपवलं नसतं. बाँड आता ग्लोबल रहिवासी झालाय. त्याचं बदलतं रूप आपल्या जीवनाचा भाग झालंय. बाँडच्या रूपात आपल्याला पाहणारे तरुण पन्नासच्या दशकात होते, तसे आजही आहेत आणि त्याच्या बाहुपाशात स्वतःला झोकून देण्याच्या इच्छा बाळगणाऱ्या तरुणीही. कदाचित नव्वदीच्या बाँडच्या चिरतारुण्याचं हेच रहस्य असावं.

**अपर्णा पाटील**
प्लॉट नं. ६०० (१०१),
गिरिजा अपार्टमेंट, खेर सेक्शन,
अंबरनाथ (पूर्व) ४२१ ५०१
aparna.patil1@gmail.com

**ग्रंथालीचे नवे प्रकाशन**



**‘उंबरठ्यावरचे दिवस’**
**भाऊ गावंडे**
**मूल्य ५०० रु. सवलतीत ३०० रु.**

# ब्रेकथ्रू

दिलीप पांढरपट्टे

मात्र पुढच्या चार दिवसांचं टेन्शन त्याच्या नशिबात होतंच. मेसेज काही थांबेनात. शेवटी त्यानं रिप्लाय केला, 'मला तुला भेटायचंय. कुठं भेटूया?' उत्तर म्हणून एका हॉटेलचा पत्ता आणि 'कधी?' असा प्रश्न आला. आता काय करावं? पुढे पाऊल टाकल्याशिवाय ही बाई कोण हे कळणार नाही हे राकेशच्या लक्षात आलं आणि त्यानं मेसेज टाकला, 'उद्या सहा वाजता!' एक दिवस असाच गेला. मग उत्तर आलं, 'अचानक आजारी पडलेय. आठवड्यानंतर भेटू.' च्यायला! म्हणजे आठवडाभर उगाच टांगती तलवार!...

राजधानी एक्स्प्रेस सुटायला अजून बराच वेळ होता. मागच्या वेळेला ते अगदी शेवटच्या क्षणाला, गाडी सुटता सुटता पोचले म्हणूनच गाडी मिळाली होती. त्यामुळे या वेळेस तब्बल अर्धा-पाऊण तास आधीच ते मुंबई सेंट्रलला दाखल झाले होते. इतका वेळ गप्पा मारायला मिळणार म्हणून राकेश आणि राधिका दोघंही खूष होते, पण त्यातही राकेशची गेल्या दोन-तीन दिवसांची नाराजी त्याच्या चेहऱ्यावर दिसत होतीच.

''राधिका, टेक केअर. दिल्लीत सध्या खूपच थंडी आहे.''

''हो रे. थंडी म्हणजे माझं मरणच. एवढे गरम कपडे घेतलेत पण काय होणार ही काळजीच रे बाबा!''

संभाषण थांबलं. राकेशच्या मनात दडी मारून बसलेला वैताग पुन्हा वर आला. तो एकदमच गप्प झाला.

''तू अजून रागावलायस, राकेश?''

''नाही. पण अपसेट मात्र आहे. राधिका, मला वाटतं की आपण एकमेकांना जास्त स्पेस द्यायला पाहिजे. एकमेकांवर जास्त विश्वास ठेवायला पाहिजे. शेवटी अशी एकमेकांवर दादागिरी करून रिलेशनशिप कशी टिकणार?''

''पण मला तुझ्याबाबतीत पझेसिव्ह वाटतं त्याला काय करू रे? आय कान्ट हेल्प इट. एकदा आयुष्यात मोठा फटका बसल्यामुळे मला असं सतत असुरक्षित वाटत असेल का रे, राकेश?''

''पण राधिका, उलट त्यामुळे आपण जास्त समंजस व्हायला पाहिजे. किती त्रास झाला डिव्होर्स मिळवायला आपल्याला? माझ्या बायकोनं मला त्यासाठी छळ छळ छळलं. तुझा नवरा तरी त्या मानानं बराच बरा निघाला. आता कुठं आपण लग्न नावाच्या त्या यातनाकांडातून बाहेर आलोय. तुला...''

''खरंय तुझं. पटतंही मला ते. पण तुझ्या मोबाइलमधले मेसेज वाचले की मला उगाचच घाबरल्यासारखं होतं. तुझ्या मैत्रिणींच्या त्या मेसेजेसची मला सतत भीती वाटते. फेसबुकवरच्या तुझ्या मैत्रिणी, त्यांचे इ-मेल... त्यात खरं काही आक्षेपार्ह नसतं पण मला कुठंतरी त्यात काहीतरी छुपा धोका

दिसत राहतो. त्याला काय इलाज?''

''आहे ना! आपण एकमेकांचे मोबाइल, इ-मेल, फेसबुक यांच्यात डोकवायचंच नाही. तुला काय वाटतं?''

''पटतं मला! कळतं, पण वळत नाही त्याचं काय?''

तो पटकन उठला. त्याच्या लक्षात आलं, दिल्लीला पोचेपर्यंत राधिकाला भरपूर वर्तमानपत्रं वाचून काढायची असतात. तो तरातरा बुकस्टॉलवर गेला आणि पाच-सहा इंग्रजी-मराठी पेपर घेऊन परतला. वरच्या मुंबई मिररच्या पहिल्या पानावर ठळक बातमी होती- 'Heart broken engineer kills himself'. त्यानं मुंबई मिरर पटकन इतर पेपरांमध्ये लपवला. ते राधिकाच्या लक्षात आलं. तिनं राकेशकडे प्रश्नार्थक नजरेनं पाहिलं. राकेश अवघडल्यासारखं हसला आणि बाहेर पाहू लागला.

गाडी सुटायची वेळ जवळ येऊ लागली तशी राकेशच्या मनात चलबिचल सुरू झाली. आपल्याला दोन-तीन दिवस मोबाइलवर एका नंबरवरून सतत मेसेज येताहेत. मेसेज पाठवणारी व्यक्ती स्त्री आहे. ती आपल्याला रोमँटिक मेसेज पाठवतेय, पण आपण कॉल केला तर उत्तर देत नाही. हे सगळं राधिकाला सांगावं का? पण मग ती नक्कीच डोक्यात राख घालून घेणार. आपल्यावरच संशय घेणार. आपल्या सगळ्या मैत्रिणींबद्दल आगपाखड करणार. दिल्लीला जाता-जाता हा वितंडवाद नकोच. तिला तिकडे दिल्लीत आणि आपल्याला इकडे मुंबईत फालतूचं टेन्शन. त्यापेक्षा ती चार दिवसांनी परतल्यावर तिच्याशी बोलू. आजचं मरण उद्यावर...

गाडी हलू लागली. तो झटकन उठला आणि 'टेक केअर डिअर. लव्ह यू' असं पुटपुटत लगबगीनं खाली उतरला. राधिका दरवाजात आली आणि राकेश दिसेनासा होईपर्यंत हात हलवत राहिली.



मात्र पुढच्या चार दिवसांचं टेन्शन त्याच्या नशिबात होतंच. मेसेज काही थांबेनात. शेवटी त्यानं रिप्लाय केला, 'मला तुला भेटायचंय. कुठं भेटूया?' उत्तर म्हणून एका हॉटेलचा पत्ता आणि 'कधी?' असा प्रश्न आला. आता काय करावं? पुढे पाऊल टाकल्याशिवाय ही बाई कोण हे कळणार नाही हे राकेशच्या लक्षात आलं आणि त्यानं मेसेज टाकला, 'उद्या सहा वाजता!' एक दिवस असाच गेला. मग उत्तर आलं, 'अचानक आजारी पडलेय. आठवड्यानंतर भेटू.' च्यायला! म्हणजे आठवडाभर उगाच टांगती तलवार!...

चार दिवसांनी राधिका आली तेव्हा तिला घ्यायला राकेश मुंबई सेंट्रलला पोचला. राधिकाचा चेहरा उतरला होता. तो प्रवासामुळे, थंडीमुळे की जागरणामुळे ते त्याला कळेना. त्यानं काळजीनं विचारलं, ''दिल्लीत गारठा फार होता का, राधिका?'' राधिकानं यावर काहीच उत्तर दिलं नाही. तिचं काहीतरी बिनसल्याची ही खूण आहे हे राकेशनं ओळखलं. तिच्याशी आता जास्त बोलण्यात काही अर्थ नाही हेही त्यानं ताडलं. ऑफिसमध्ये जायची घाईही असल्यानं फार काही न बोलता आणि फार काही न विचारता त्यानं तिचा निरोप घेऊन ऑफिस गाठलं.

ऑफिसमध्ये पोचल्यावर मात्र त्याला खूप बेचैन वाटू

लागलं. त्याला खरं तर मेसेजची ती भानगड तिला स्टेशनवरच सांगायची होती. पण तिचा मूड अगदीच खराब होता म्हणून तो गप्प बसला होता. पण तरीही आपण तिला सांगून मोकळं व्हायला हवं होतं. तिला दुखावू नये म्हणून आपण काही गोष्टी तिला सांगायचं टाळतो आणि तिला ते कळल्यावर ती जास्त दुखावली जाते; हे नेहमीचंच झालंय. आपण गाढवपणा केला या हुरहुरीतच त्याचा लंचब्रेक संपला. त्याला जेवायची इच्छाच नव्हती; म्हणून केवळ कॉफी पिऊन तो परतला. आल्या-आल्या सवयीप्रमाणं त्यानं इ-मेल चेक करायला घेतला आणि इनबॉक्स उघडताच तो मुळापासून हादरून गेला. राधिकाचा मेल होता तो. तिनं आतापर्यंत कधीच त्याला त्याच्या ऑफिसच्या इ-मेलवर कॉन्टॅक्ट केलं नव्हतं. मग आजच असं का? कदाचित ती खूप डिस्टर्ब असेल म्हणून आपल्याला ताबडतोब तिला काहीतरी सांगायचं असेल. म्हणूनच तिनं असं केलं असणार, असं त्याला वाटलं.

धास्तावलेल्या मनानं पण तरीही उत्सुकतेनं त्यानं राधिकाचा मेल वाचायला सुरुवात केली...

डिअर राकेश,

मला खूप अस्वस्थ वाटतंय, म्हणून तुला मुद्दाम या अकाउंटवर मेल पाठवतेय. कारण तू तो लगेच वाचणार हे मला माहीत आहे.

तुझ्या वागण्यानं मी पुन्हा एकदा फ्रस्ट्रेट झालेय. आपल्या नात्यात अजून एकमेकांबद्दलचा विश्वास का वाढत नाही कळत नाही. तुला रोमँटिक मेसेज पाठवणारी बाई दुसरी-तिसरी कुणी नसून मीच होते. मी नवीन मोबाइल घेतला होता आणि फक्त गंमत म्हणून मी तुला तसे मेसेज पाठवत होते. तुला माझा नवीन नंबर माहीत नसल्यानं तुला एक सरप्राइज द्यावं एवढंच माझ्या मनात होतं. पण ही गंमत पुढे वाढतच गेली. तू देखील का मेसेजना रिस्पाँड करत राहिलास? इतकंच नाही तर त्या नंबरवर कॉलही केलेस आणि मुख्य म्हणजे हे सगळं तू माझ्यापासून लपवून ठेवलंस. अजूनही मला तुझ्या आयुष्यातली प्रत्येक महत्त्वाची गोष्ट सांगण्याइतपत तुला माझ्याबद्दल जवळीक वाटत नाही हा आपल्या रिलेशनशिपचा पराभव समजायचा का?

तुझी (?)
राधिका

मेल वाचून राकेश सैरभैर झाला. आता मात्र आपण अजिबात न थांबता राधिकाला मनातलं सगळं सांगायलाच हवं असं त्याला वाटलं आणि त्यानं मेल टाइप करायला सुरुवात केली...

डिअर राधिका,

तुझा मेल म्हणजे माझ्या जखमेवर मीठ चोळणं होतं. तू नवीन मोबाइल घेतलास हे तू मला अत्यंत स्वीट पद्धतीनं सरप्राइज देऊनही सांगू शकली असतीस, पण तू तुझ्या तिरप्या स्वभावाप्रमाणं अक्षरश: कारस्थान रचून मला त्यात अडकवण्याचा प्रयत्न केलास. हे कसलं सरप्राइज? तुला मी त्या मेसेजबद्दल तू दिल्लीला निघाली असतानाच सांगणार होतो, पण तू अपसेट होशील म्हणून मी ते पुढे ढकललं. ही माझी घोडचूक झाली. आधी मी त्या मेसेजना उत्तर देत नव्हतो, पण पुढे पुढे हा खेळ माझ्याशी कोण खेळतंय हे कळण्यासाठी मी उत्तरं पाठवायला सुरुवात केली. त्यात त्या सो-कॉल्ड बाईशी रिलेशन सुरू करायचा माझा कसलाच बेत नव्हता. मी तिला पॉझिटिव्ह उत्तरं दिली नसती तर तिच्याबद्दल तिनं मला काहीच क्ल्यू दिला नसता आणि मी चाचपडत राहिलो असतो. म्हणून मीपण तिच्या या खेळात तिचीच गंमत करायचं ठरवलं. पण तू केलीस ती गंमत आणि मी केला तो मात्र गुन्हा, असं तुझं अजब तर्कट आहे. मेसेज पाठवणाऱ्या त्या बाईत मला काडीचाही रस नव्हता म्हणून तर मी पोलिसांत डीसीपी असणाऱ्या माझ्या मित्राला तो नंबर देऊन नंबर कुणाचा आहे हे शोधायची गळ घातली होती. तो मला ते शोधूनही देणार होता, पण त्याआधीच तुझा हा मेल आला. त्या अज्ञात बाईत मला इंटरेस्ट असता तर मी पोलिसांची मदत का घेतली असती? तुझं माझ्यावर जिवापाड प्रेम आहे हे कळतं. (तू विश्वास ठेवणार असशील तर) माझंही तुझ्यावर खूप प्रेम आहे. पण नातं जिवंत राहण्यासाठी नुसतं प्रेम असून भागत नाही. एकमेकांवरचा विश्वास, समजूतदारपणा, एकमेकांना स्पेस देणं, गुणदोषांसकट स्वीकारणं हे सगळं नात्याला घट्ट बनवण्यासाठी आवश्यक असतं. एकमेकांना गुदमरवून टाकण्यापेक्षा खुली हवा निर्भयपणे घेण्याचं स्वातंत्र्य देणं यातच प्रेमाची खरी ताकद असते असं मला वाटतं. आणखी एक- प्रेम म्हणजे नियम पाळणं नाही तर नियम तोडणं असतं. तुला हे पटतं का?

- राकेश

आता राधिका निदान दोन-तीन दिवस तरी आपलं तोंड बघणार नाही असं राकेशला वाटलं. पण त्याचा अंदाज साफ चुकला. दहा मिनिटांतच तिचं उत्तर आलं..

डिअर राकेश,

तुझ्या मेलचं हे उत्तर नाही. तसं सविस्तर उत्तर द्यायला मला खूप विचार करावा लागेल. तूर्त एकच सांगायचंय की मी शुक्रवारपासून 'ट्रान्स्फॉर्मेशन फाउंडेशन' या संस्थेच्या तीन

दिवसांच्या फोरमला जातेय. ज्यांना रिलेशनशिपचे, करिअरचे, ॲटिट्युडचे प्रॉब्लेम आहेत त्यांच्यासाठी हा कोर्स चांगला आहे असं मला अनेकांनी सांगितलंय. माझ्या काही मैत्रिणींनी, सहकाऱ्यांनी हा फोरम केलाय. मी आतापर्यंत तो टाळत आले, पण आता तुझ्या-माझ्या रिलेशनशिपसाठी मी हा फोरम करणार आहे.

असल्या कोर्समुळे माणसं बदलतात यावर तुझ्याप्रमाणेच माझाही विश्वास नाही, तरीही माणसानं आशा करायला काय हरकत आहे?

– राधिका

पी.एस. – या फोरमला जाण्याआधी कुणाशीतरी कडाक्याचं भांडण झालेलं बरं असतं असं मला कुणीतरी गमतीनं सांगितलं होतं. त्यामुळे आपली आज जी काही मेलामेली झाली ती माझ्या फोरमसाठी फायदेशीर ठरेल अशी अपेक्षा आहे.

– राधिका

त्यानंतर दोनच दिवसांनी शुक्रवार होता. शुक्रवारी सकाळीच राधिका फोरमला गेली. तिथं मोबाइलला परवानगी नव्हती. त्यामुळं राकेशचा आणि तिचा संपर्क तुटला. राकेशला अस्वस्थ वाटत राहिलं. शनिवारही असाच गेला. 'या फोरममुळं आपली रिलेशनशिप सुधारली तर ठीक, पण तिनं रिलेशनशिपचा फेरविचारच केला तर काय करायचं?' राकेश आणखीच बेचैन झाला.

रविवारी संध्याकाळी दर आठवड्याप्रमाणे ब्रिस्क वॉकिंग करायला राकेश शेजारच्या ग्राउंडवर पोचला. विचारांच्या तंद्रीतच त्यानं चालायला सुरुवात केली.

चालण्याचा पहिला राउंड संपतानाच त्याचा फोन वाजला. चालण्यात हा काय व्यत्यय या विचारानं तो वैतागला पण फोनवर 'स्वीटहार्ट राधिका' ही अक्षरं दिसताच, त्यानं बाजूच्या कठड्यावर ताबडतोब बसकण मारली आणि फोन घेतला.

''हॅलो डार्लिंग, हाऊ आर यू?''

''आय एम फाइन, स्वीटहार्ट, तू काय करतोयस?''

''हवा खायला बाहेर पडलोय.''

''ग्रेट! मला तुझ्याशी आताच्या आता खूप महत्त्वाचं आणि पर्सनल बोलायचंय. चालेल?''

''हो, हो. काहीच प्रॉब्लेम नाही. बोल तू.''

''अरे, फोरममध्ये त्यांनी आम्हाला पहिल्यांदा फोन वापरायची परवानगी दिलीय. ती अशासाठी, की ज्या जवळच्या माणसांशी आपलं पटत नाही, त्यांच्याशी आम्ही बोलावं आणि मन मोकळं करावं. याला ते ब्रेकथ्रू म्हणतात. तसं माझं अनेकांशी पटत नाही हे खरं आहे; पण ज्याच्याशी बोलून मन मोकळं करावं आणि ज्याच्याशी आपलं पटावं असं नेहमी वाटतं असा तू एकटाच आहेस माझ्या आयुष्यात. म्हणून तुझ्याशी बोलायचंय मला.'' बोलताना राधिकाच्या आवाजाला कंप सुटला.

राकेशच्या डोळ्यांत टचकन पाणी आलं. त्याला शब्द फुटेना. मग राधिकाच पलीकडून म्हणाली, ''तुझं मला आता बरंचसं पटू लागलंय, बरं का, राकेश! मी आतापर्यंत तुझ्यावर खूप अन्याय केलाय असं मला वाटतंय. याआधी प्रत्येक गोष्टीकडे मी माझ्याच दृष्टिकोनातून पाहिलं. हा माझा स्वार्थ होता. प्रत्येक बाबतीत तुझीही काही बाजू असू शकते हे स्वकेंद्रित वृत्तीमुळं माझ्या कधी लक्षातच आलं नाही. केवळ खूप प्रेम असणं नात्यासाठी पुरेसं नाही असं तू म्हणतोस ते खरं आहे. मला माफ कर. तू माझा आहेस, राजा आणि हे बघ, तू सुद्धा हा फोरम लवकरात लवकर करावा असं मला वाटतंय!''

यावर क्षणभरच विचार करून राकेश म्हणाला, ''त्याची मला गरज वाटत नाही, स्वीटहार्ट. कारण या क्षणाला आताच मी तुझ्या बाबतीत ब्रेकथ्रू करतोय आणि तुला गंमत सांगू का? केवळ नातं सुधारण्यासाठी या फोरमचा उपयोग होत नाही तर नको असलेल्या नात्यातून बाहेर पडायलाही हा फोरम उपयोगी पडतो.''

''म्हणजे काय?'' थरथरत्या आवाजात राधिकानं विचारलं. तिच्या काळजाचा ठोकाच चुकला. तिची छाती धडधडू लागली.

हे ऐकताच कित्येक दिवसांत पहिल्यांदाच खळखळून हसत राकेश म्हणाला, ''डोन्ट वरी डिअर. हे मी आपल्या नात्याबद्दल बोलत नाही. तुझ्याशिवाय तर मला जगायचंच नाही. मी तुला माझा आधीचा अनुभव सांगतोय. दोन वर्षांपूर्वी मी हाच फोरम ॲटेंड केला होता आणि फोरमच्या शेवटच्या दिवशी मी घटस्फोट घ्यायचा माझा निर्णय पक्का केला होता.''

बोलणं संपता संपताच फोनची बॅटरी पूर्ण उतरल्यानं फोन एकदम बंद पडला. त्यानं एकवार फोनकडं रोखून पाहिलं आणि मग ताडकन उठून नेहमीपेक्षा थोड्या जास्तच वेगात पुन्हा ब्रिस्क वॉकिंग करायला सुरुवात केली.

**दिलीप पांढरपट्टे**
८, दुसरा मजला, बालाजी,
पायोनियर सोसायटीजवळ, पनवेल,
जिल्हा-रायगड ४१०२०६
भ्रमणध्वनी : ९८२१०७५५४२/९४२२११६९८६
dilip.pandharpatte@gmail.com

# विधानसभेतील भाषण (काल्पनिक)

सु.गो. तपस्वी

स्वतःचं जीवन सुलभ होण्याकरता इतर समाजसदस्यांचा विकास होऊ देणं गरजेचं असतं, कधी कधी त्यागातूनही इतरांच्या विकासाला हातभार लावणं महत्त्वाचं असतं, थोडक्यात – 'परमार्थातून स्वार्थ' म्हणजेच 'एनलाईटन्ड सेल्फ इंटरेस्ट'. समाजशास्त्राच्या ह्या तत्त्वाचं आकलन व त्या आकलनातून निर्माण होणारी सहिष्णुता हाच विषमतेला सातत्यानं काबूत ठेवण्याचा उत्तम पर्याय होय.

एकदा मला एक स्वप्न पडलं होतं. स्वप्नात मी एका राजकीय पक्षाचा सदस्य होतो व महाराष्ट्रात आमच्या पक्षाचं शासन होतं. विधानसभेत विरोधी पक्षातील आमदारांनी माझ्यावर खूप टीका केली होती. माझ्या धोरणांच्या विरोधात बरेच लोक होते व एका प्रक्षुब्ध जमावानं माझ्यावर हल्ला केला होता. मी जागा झालो तोच दरदरून आलेला घाम पुसायला. स्थिरस्थावर झाल्यावर मी विचार करू लागलो, की आमदार झालो असतो तर?

ती घटना होती मे २०१० मधली आणि त्या काल्पनिक 'आमदारकी'च्या आवेशात मी एक भाषण लिहिलं. ते वाचकांसाठी सादर करतो, अभिवादनाशिवाय.

शासकीय शाळांतून देण्यात येणाऱ्या प्राथमिक शालेयशिक्षणाची परिस्थिती जरी विशेष समाधानकारक नसली तरीही मानवविकासाच्या दृष्टिकोनातून ह्या वर्षी १ एप्रिलला देशाच्या शासनानं एक अडसर दूर केला आहे; पहिली ते आठवीपर्यंतचं शिक्षण सक्तीचं व मोफत केलं आहे. महात्मा जोतिबा फुले यांनी अशीच मागणी इंग्रज शासनाकडे केली होती. महात्मा फुले व बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या अध्वर्यूंचा शिक्षणावर गाढा विश्वास होता; मानवविकासातूनच समाजसुधार साधता येईल असं ते मानायचे. गेल्या महिन्यात इतिहासातील ह्या दोन थोर व्यक्तींच्या जयंत्या आपण साजऱ्या केल्या. देशातील खूप गरीब जनतेला प्राथमिक शिक्षणच परवडत नाही. ते बालशिक्षण सक्तीचं व मोफत करून बालशिक्षणाचा कायदा अंमलात आणला आहे, तो कायदा म्हणजे देशानं ह्या दोन युगपुरुषांना वाहिलेली श्रद्धांजलीच मानली पाहिजे.

बाबासाहेबांच्या घटनासमितीतील कामाचे महत्त्व आपण सारे जाणतोच. अशातच पुण्याच्या 'सकाळ'च्या सप्तरंग पुरवणीत बाबासाहेबांचे विचार मांडणारा डॉ. भालचंद्र मुणगेकरांचा ११ एप्रिल २०१० रोजीचा लेख वाचनात आला. लोकशाही उत्तम तऱ्हेनं राबवण्यासाठी बाबासाहेबांच्या

मते पाच गोष्टी गरजेच्या आहेत. राज्यशास्त्र ह्या विषयाच्या संदर्भात भारतीय लोकशाहीसाठी महत्त्वाच्या अशा त्या पाच मुद्यांचा ऊहापोह साधून देशातील परिस्थितीची जाणीव तो लेख करून देतो.

बाबासाहेबांना महत्त्वाचे वाटलेले ते पाच मुद्दे आहेत–

(१) समाज एकसंध असावा आणि समाजातील असमानतेचं (विषमतेचं) प्रमाण मर्यादित असावं,
(२) राजकीय पक्षांमध्ये सामंजस्य असावं,
(३) सार्वजनिक जीवनात नैतिकतेला मानाचं स्थान असावं,
(४) समाजात समता व कायद्यात समानता असावी, आणि
(५) अल्पसंख्याकांना संरक्षणाची हमी असावी.

त्या पाच मुद्यांवर समाजशास्त्राच्या संदर्भातही कारणमीमांसा करणं आवश्यक आहे. अनुषंगानं, उपाययोजनेबाबत विचार सादर करण्याचा माझा उद्देश आहे. लोकशाहीबाबतच्या विचारांची अशीही मांडणी केली जाते, की लोकशाहीचं स्वरूप व परिणामकारकता, लोकांवर, समाजावरच अवलंबून असणार; नेते समाजाचंच प्रतिबिंब असतं! समाजसुधाराचा आग्रह स्वातंत्र्यापूर्वी धरणाऱ्या आगरकरांना कदाचित हाच दृष्टिकोन अभिप्रेत असावा.

उपाययोजना सादर करण्यापूर्वी लोकशाहीसाठी गरजेच्या असणाऱ्या मुद्यांवर भारतीय संदर्भातून विवेचन साधुयात.

● भारतीय समाज

पहिला मुद्दा होता एकसंध समाजाचा. भारतीय समाज एकसंध नाही.

वंश, जात, धर्म, भाषा व तत्सम गोष्टी एकसंधतेबाबत सतत नवे नवे प्रश्न उपस्थित करत असतात. भारतात विषमता अस्तित्वात आहे, आर्थिक विषमता तर पराकोटीची आहे. एकसंधता व विषमता ह्या दोन्ही गोष्टींचा जसा विचार झाला पाहिजे त्याचप्रमाणे समानता व समता ह्या दोन्हीतील फरकसुद्धा आपण लक्षात घेतला पाहिजे. समाजात काही प्रमाणात असमानता, म्हणजेच विषमता असणं स्वाभाविक आहे; ते मान्य केलं तरी त्यामुळे समतेला बाधा येऊ शकत नाही ह्या गोष्टीचं आकलन महत्त्वाचं. लोकशाहीच्या परिणामकारकते-बाबत अडचणीचा मुद्दा आहे तो प्रमाणाबाहेरच्या, पराकोटीच्या विषमतेचा.

विषमता काबूत ठेवण्यासाठी प्रयत्न करताना दोन शक्यता जमेस धरता येतील. 'आहे रे' गटानं आपलं धन, मान व कतृत्वाचा त्याग करून किंवा त्या गोष्टी इतर बांधवांत वाटून सामान्यांच्या पंक्तीत येऊन बसावं, हा एक मार्ग. हा मार्ग अशक्य, अस्वाभाविक व अयोग्य आहे, ह्यात वाद नसावा. दुसरा पर्याय म्हणजे सामान्यांनी, मागे पडलेल्यांनी, पददलितांनी स्वत:च्या सध्याच्या परिस्थितीवर मात करून, उत्कर्ष साधून विषमतेवर मात करण्याचा. जोडीला, 'आहे रे' व इतर उच्च गटांतील व्यक्तींनी सामान्यांच्या तशा प्रयत्नांना हातभार लावण्याचा, देशात सुयोग्य वातावरण निर्माण करण्याचा आणि सामान्यांच्या उत्कर्षाच्या दिशेनं सुरू झालेल्या वाटचालीत आडकाठ्या न आणण्याचा.

प्रस्तुत दुसरा पर्याय अमलात आणण्यासाठी दोन्ही गटांची मनोवृत्ती बदलली पाहिजे. सामान्यांना स्वत:चा उत्कर्ष साधण्याची गरज भासली पाहिजे, ती आस त्यांच्यात निर्माण झाली पाहिजे आणि त्यासाठी कराव्या लागणाऱ्या त्यागाचं भान त्यांना आणून दिलं पाहिजे.

पददलितांचा आत्मविश्वास जागृत करून गरजेच्या परिश्रमांसाठी त्यांची मानसिक तयारी करावी लागेल. ते होण्यासाठी, होऊ देण्यासाठी, पोषक वातावरण निर्माण करण्याची जबाबदारी, अर्थातच, 'आहे रे' व इतर उच्च गटांची असणार. या जबाबदारीची जाणीव त्या गटांत निर्माण करून त्यांच्या मनोवृत्तीत बदल साधणं, हेही तेवढंच, किंबहुना जास्त महत्त्वाचं काम आहे.

या संदर्भातील दूरगामी उपाययोजना म्हणजे सामान्य जनतेत स्व-विकासाच्या हक्काची जाणीव निर्माण करणं व स्व-विकास साधताना इतरांच्या त्याच हक्काचा मान राखण्याची, त्यांच्या त्या हक्कांची पायमल्ली न करण्याची मनोवृत्ती संपूर्ण समाजात जोपासणं.

स्वत:चं जीवन सुलभ होण्याकरता इतर समाजसदस्यांचा विकास होऊ देणं गरजेचं असतं, कधी कधी त्यागातूनही इतरांच्या विकासाला हातभार लावणं महत्त्वाचं असतं, थोडक्यात – 'परमार्थातून स्वार्थ' म्हणजेच 'एनलाईटन्ड सेल्फ इंटरेस्ट'. समाजशास्त्राच्या ह्या तत्त्वाचं आकलन व त्या आकलनातून निर्माण होणारी सहिष्णुता हाच विषमतेला सातत्यानं काबूत ठेवण्याचा उत्तम पर्याय होय.

राजकीय अर्थानं, स्वातंत्र्यानंतरच भारत हा एकसूत्री अंमल असलेला स्वतंत्र देश म्हणून अस्तित्वात आला. १९५० मध्ये संविधानानं भारतीयत्व प्रस्थापित केलं आणि एक स्वतंत्र व सार्वभौम देश म्हणून जगानं भारताला मान्यता दिली. विविध राजकीय पक्षांच्या शासनांकडून गेल्या साठ-पासष्ट वर्षांत झालेल्या सकारात्मक कारवायांमुळे भारताला प्रांतिकता, धर्म, जात, वगैरे विभाजनवादी प्रवृत्तींवर मात करण्यात थोडंफार यश लाभलं आहे. एकसंधता साधण्यात

आजवर झालेल्या प्रगतीच्या दिशेनं संपूर्ण देशबांधवांची वाटचाल यापुढेही होत राहणं महत्त्वाचं.

● राजकीय पक्षांतील सामंजस्य

आता भारतातील राजकीय पक्षांमधील सामंजस्यावर विचार मांडतो.

सत्तेसाठी राजकीय पक्षांमध्ये चढओढ असणं वेगळं आणि त्या रस्सीखेचीचं रूपांतर इतर पक्षांना नेस्तनाबूद करण्यात होणं निराळं. ह्या दृष्टिकोनातून, इतिहासातील अडचणीच्या अनेक परिस्थितींत देशातील प्रमुख पक्षांनी गरजेचं सामंजस्य दाखवलं होतं ही निश्चितच जमेची बाजू आहे.

१९७५ सालच्या आणीबाणीनंतर झालेल्या निवडणुकीत दारुण पराभव पत्करलेल्या इंदिरा गांधी निवडणूक प्रक्रियेतूनच पुनश्च भारताच्या पंतप्रधान बनू शकल्या ह्यातच प्रस्तुत मुद्याचं सारं सार आलं. हे मात्र लक्षात घेतलं पाहिजे, की हे सारं घडलं, घडत आहे ते देशातील राजकीय सामंजस्यामुळे; इतरत्र, अनेक देशांत तसं घडू शकलेलं नाही, ह्या जमेच्या बाबीचा आपणास विसर पडता कामा नये.



जसजसा भारतीय समाज विकसित होत जाईल तसतसे राजकीय पक्षांना व पक्षांच्या नेतृत्वाला निवडणुकांतून विजयी होण्यासाठी राजकीय सामंजस्याची अधिक कदर करणं नितांत गरजेचं भासेल. समाजविकासाबाबतचे प्रबोधन, म्हणूनच, ह्या राजकीय सामंजस्याच्या मुद्याबाबत देशात सातत्य राखण्याकरतासुद्धा उपयुक्त ठरावं.

● नैतिकता

आपल्या आजच्या राजकीय पुढाऱ्यांच्या नैतिकतेबद्दल जेव्हा भाष्य केलं जातं तेव्हा त्या पुढाऱ्यांची तुलना आपण 'कल्पनेतील साधू'पुरुषांशी करतो; आपल्याला देवत्व अभिप्रेत असतं! मात्र, लोकशाहीला पर्याय असू शकतो तो विविध प्रकारच्या हुकूमशाहींचा. त्या पार्श्वभूमीवर आजच्या नेतृत्वाची तुलना जर पूर्वीच्या राजे-रजवाड्यांशी आपण केली तर आजचे बहुतेक राजकीय पुढारी सरस ठरावेत.

ही पुढारी मंडळी म्हणजे माणसंच आहेत हे भान जनतेनं ठेवलं पाहिजे. ज्या प्रमाणात समाजात नैतिकता अनुभवास येते, तेवढीच नैतिकता आपण पुढारी मंडळींकडून अपेक्षित करू शकतो, ते ओघानंच येतं. म्हणूनच, सार्वजनिक नैतिकतेच्या सर्व स्तरांवरसुद्धा समाजसुधार महत्त्वाचा ठरतो.

● समता आणि समान कायदा

समता हे अर्वाचीन सामाजिक मूल्य आहे. एकोणिसाव्या शतकात पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाच्या अभ्यासातून भारतीय सामाजिक नेतृत्वाला त्या मूल्याचं महत्त्व पटलं. भारतीय संविधान समतेचं मूल्य मानतं. आपलं संविधान समतेच्या मूल्यावरच आधारित आहे आणि त्या अनुषंगानं केलेल्या कायद्याच्या तरतुदींमध्ये निश्चितच समता आहे; कायदा सर्वांना समान लेखतो. मात्र, ही समता जेव्हा धोक्यात आल्याचं जाणवतं, तेव्हा ती विकृती कायद्यांच्या अंमलबजावणीतून निर्माण झालेली असते; आणि त्याला कारण असतं भ्रष्टाचार!

भ्रष्टाचार हा समाजाच्या परिपक्वतेवर, जनतेच्या वृत्तीवर, उपरोक्त चर्चिलेल्या नैतिकतेवर अवलंबून असतो. जेवढा समाज परिपक्व तेवढा भ्रष्टाचार कमी प्रमाणात अनुभवास येतो. भारतीय समाजाची आजची वृत्ती सरंजामशाहीतून निर्माण झालेली आहे आणि म्हणूनच ती भ्रष्टाचाराला पोषक अशीच आहे; त्याला कोणाचा दोष असेल तर तो इतिहासाचा आहे.

देशापुढे खरं आव्हान आहे ते जनतेच्या 'सरंजामशाही' मनोवृत्तीत बदल साधून समाजात लोकशाही, सामाजिक बांधिलकी व नागरिकत्वाची मूल्यं जोपासण्याचं; सततचं प्रबोधन हाच त्यावर उपाय आहे.

सक्षम समाज म्हणजे पर्यायानं 'समृद्ध' समाज. समृद्धतेत जशी मानसिक मूल्यांची समृद्धी गरजेची आहे, त्याचप्रमाणे आर्थिक समृद्धी व व्यवहारातील सुलभताही अभिप्रेत आहे.

म्हणूनच, देशाची आर्थिक प्रगती व पायाभूत सुविधांमधील सुधारणा आणि रोजच्या जीवनातील सुलभतेकडेसुद्धा आपल्याला दुर्लक्ष करून चालणार नाही. भ्रष्टाचारावर टीका करण्यापेक्षा, भौतिक गोष्टी राजकारण्यांवर सोपवून समाजधुरीणांनी समाजाच्या मानसिक समृद्धीवर लक्ष केंद्रित केलं तरच भ्रष्टाचाराचं प्रमाण कमी करण्यात आपल्याला यश लाभू शकेल व कायद्याच्या अंमलबजावणीतील समतेचं प्रमाण वाढू शकेल.

● अल्पसंख्याकांचं संरक्षण

मुणगेकरांनी दोन प्रकारचे अल्पसंख्याक नजरेस आणून दिले आहेत. एक गट आह तो राज्यशास्त्रानुसार लोकशाहीतील अल्पसंख्यांकांचा व दुसरा आहे पारंपरिक.

निवडणुकांतून मतसंख्येमुळे अल्पसंख्याक ठरणारा गट तत्कालीन असतो; आजचा 'बहुसंख्य' पक्ष उद्याचा 'अल्पसंख्याक' ठरू शकतो! अशा अल्पसंख्याकांना राजकीय सामंजस्यातून आपोआपच संरक्षण मिळालेलं आहे, त्याला इतिहास साक्ष आहे. एकूणच, अशा 'राजकीय' अल्पसंख्याकांना संरक्षणाची हमी पुरवण्याचा प्रश्न आज तरी देशाला भंडावणारा नाही.

कोणत्याही समाजात छोटे-मोठे संघर्ष सतत चालू असतात. काही धार्मिक असतात, काही मूलभूत सुविधांच्या अग्रक्रमांबाबत असतात तर काही गटागटांच्या हक्कांसंबंधातील आग्रहातून निर्माण होतात. तसे संघर्ष जिवंत, संवेदनशील समाजाचं लक्षण आहे. ते संघर्ष तत्कालीन असतात, त्यांची व्यापकता मर्यादित असते. असे संघर्ष समाजातील गटागटांतील दूरगामी सामंजस्याला बाधक ठरत नाहीत. संबंधातील मुद्दे व प्रसंग म्हणजे देशापुढील ज्वलंत प्रश्न वा समस्या नव्हेत; तसं मानणं चूक आहे.

भारताच्या संदर्भातील पारंपरिक गट आहे तो धार्मिक अल्पसंख्याकांचा. 'गुजरात'चा अपवाद वगळला तर धार्मिक अल्पसंख्याकांच्या संरक्षणाचा प्रश्न देशाला भेडसावतो आहे अशी परिस्थिती जाणवत नाही. जोडीला, भारतीय राजकारण पुरेसं जागरूक असल्यामुळे 'गुजरात' प्रकरणाबाबतही एवढं काहूर उठवलं गेलं आहे, की त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या ससेमिऱ्याला संबंधितांना तोंड द्यावं लागत आहे. देशात परत एखादं नवीन 'गुजरात' घडणं असंभव आहे, असं मला वाटतं.

आर्थिक प्रगतीतून जनतेचा स्थैर्याकडे होणारा प्रवाससुद्धा धार्मिक तंटेबखेड्यांच्या संदर्भात महत्त्वाचा ठरतो; स्थिरता प्राप्त झालेल्या जनतेच्या भावना भडकावणं कठीण जातं. चिथावणीतून एका गटाला दुसऱ्या गटाविरुद्ध उभं करून धार्मिक अल्पसंख्याकांत दहशत निर्माण करून त्या गटाच्या संरक्षणासाठी हमीची गरज भासण्याची शक्यता येत्या पंधरा-वीस वर्षांत, देशाच्या आर्थिक प्रगतीमुळे, इतिहासजमा होईल असं वाटतं. ही खात्री वाटण्याचं कारण म्हणजे आजसुद्धा मुसलमानांखेरीज इतर धर्मीयांना संरक्षणाची भीती भारतात वाटत नाही.

प्रश्न उरतो तो पारंपरिक हिंदू-मुस्लीम सामंजस्याचा. ह्याच कारणास्तव ह्या दोन्ही गटांचं सकारात्मक प्रबोधन उपयुक्त ठरावं. ह्या प्रबोधनासाठी सामाजिक नेतृत्वानं सर्वेक्षण करून इलाखे निवडावेत. कोणा एका धर्माच्या लोकांवरच अन्याय होतो आहे वा कोणत्याही एका गटालाच वृत्तीबदलाची गरज आहे, अशा भावना न जोपासता सामाजिक नेतृत्वानं 'भिवंडी फॉर्म्युला'सारख्या कल्पक योजना अमलात आणाव्यात.

इथे एक मुद्दा मांडावसा वाटतो तो हा, की हळूहळू सर्व जाती-जमातींच्या आरक्षणाचा फेरविचार करून त्याऐवजी 'आर्थिक दौर्बल्य' हाच निकष देशभरासाठी लावला तर धार्मिक व जातीय विभाजनाचा पायाच नष्ट होईल. ह्या वस्तुस्थितीवर सर्व प्रकारच्या राष्ट्रीय नेतृत्वाकडून सकारात्मक पुनर्विचार व्हावा.

शिक्षणाच्या व ज्ञानाच्या कक्षा जसजशा रुंदावत जातील तसतसा धर्माचा (रिलिजन ह्याच अर्थानं) समाजावरील प्रभाव कमी कमी होत जाईल. देशाचं संविधान तर धर्मनिरपेक्षतेवरच (सेक्युलॅरिझम) आधारलेलं आहे आणि देशात झालेल्या व होणाऱ्या सर्व न्यायालयांतील निवाड्यांत धर्मनिरपेक्षता अधोरेखित केली जाते, ही बाबसुद्धा या संदर्भात अत्यंत महत्त्वाची ठरावी.

समग्र पार्श्वभूमीवर पारंपरिक, धार्मिक अल्पसंख्याकांच्या संदर्भातही देशातील परिस्थिती समाधानकारकच मानली पाहिजे. उपरोक्त मीमांसेनुसार येणाऱ्या काळात धार्मिक अल्पसंख्याकांचं संरक्षण हा विषय भारतीय लोकशाहीच्या संदर्भात महत्त्वाचा ठरू नये.

मात्र, त्याकरता सामाजिक प्रबोधनातून जनमानसात धर्मनिरपेक्षता व संविधान ह्यांबाबत सातत्यानं आत्मीयता जागृत ठेवत राहिलं पाहिजे.

**समारोप**

लोकशाही उत्तम तऱ्हेनं राबवण्यासाठी बाबासाहेबांना जाणवलेल्या पाचही मुद्द्यांवर 'सुदृढ समाज निर्माण करणं' हाच एकमेव उपाय आहे. स्वातंत्र्यापूर्वी आगरकर-टिळक वादात

स्वातंत्र्याला प्राधान्य दिलं गेलं, त्या वादात राजकारणानं अग्रक्रम साधला. आता मात्र आगरकरांना अभिप्रेत असलेल्या समाजसुधारासाठी कसून प्रयत्न होणं आवश्यक आहे.

कडक नियम व सुलभ पद्धती ह्या गोष्टी रोजच्या वैयक्तिक व सामाजिक जीवनात गरजेच्या असतात; त्यांना कमी लेखून चालणार नाही. उदाहरणार्थ, अर्थकारणातील करआकारणी व वसुली, चलन (करन्सी) किंवा वाहतूक, सार्वजनिक आरोग्य वगैरे. जिथेजिथे असे 'सिस्टेमिक' बदल, कायदा, नियम वा पद्धतीतील सुधारणांची गरज जाणवेल तिथे ते बदल साधण्याचे प्रयत्न झालेच पाहिजेत. परंतु हेसुद्धा लक्षात घेतलं पाहिजे की जिथे हितसंबंध गोवलेले असतात तिथे अंमलबजावणीतील भ्रष्टाचार एक तर तसे बदल घडवून आणण्यात आडकाठ्या निर्माण करतो किंवा त्या बदलातून लाभणाऱ्या फायद्याचं सातत्य टिकू देत नाही. पोषक सामाजिक वृत्ती साधून परिपक्व समाज निर्माण करणं म्हणूनच नितांत गरजेचं आहे. ते परिवर्तन कितीही अशक्य कोटीतील भासलं आणि अत्यंत धीमं असलं, तरी दूरगामी दृष्टिकोनातून ते साधणं आवश्यक आहे. त्या स्थायी स्वरूपाच्या लाभाकरता समाजाच्या वृत्तीबदलासाठीच्या प्रबोधनाला पर्याय नाही.

सुदृढ समाजनिर्मितीसाठी आजवर प्रयत्न झाले ते प्रौढांच्या प्रबोधनाचे. त्या प्रयत्नांचं यश मर्यादित असतं, कारण प्रौढांचा वृत्तीबदल साधणं कठीण असतं. मात्र, वृत्तीबदलापेक्षा वृत्ती घडवणं, त्या मानानं, सोपं ठरावं. युवा पिढ्या सातत्यानं संस्कारित करायच्या असतील तर शालेयशिक्षणातील त्यांची वर्षं महत्त्वाची ठरावीत. म्हणूनच, लोकशाही, सामाजिक बांधिलकी व नागरिकत्व ह्या मूल्यांचा समावेश असलेल्या अभ्यासक्रमावर सांगोपांग विचार व्हावा, तसा अभ्यासक्रम तयार करण्याच्या प्रकल्पाला चालना मिळावी. मानव्यशास्त्राचा शास्त्रोक्त अभ्यासक्रम तयार करून देशभरातील शाळा–कॉलेजांत तो योग्य पद्धतीनं (पेडगॉगी) बारावीपर्यंत औपचारिकपणे शिकवून उद्याचा सुदृढ व सक्षम समाज घडवावा हे माझं स्वप्न आहे.

परिस्थितीवर निव्वळ टीका करणं हे लोकशाही तत्त्वाच्या विरोधात आहे. जबाबदारी स्वीकारून लोकांनीच शासनाकरवी समस्यांवर मात करणं लोकशाहीला अभिप्रेत आहे.

**सु.गो. तपस्वी**
भ्रमणध्वनी : ९७६६१ ५२२५३
suhas@fandsindia.com

*With Best Complimenst From*

# Mayur Paper Corporation

**STATIONERS & PAPER MERCHANTS**

***We are paper suppliers of reputed publishers like Granthali***

23-B, Podar Chambers, S.A. Brelvi Road, Fort, Mumbai-400 001.
e-mail : mayurpapercorp@gmail.com

# हितवर्धिनी सभेचे स्वा. सावरकर वाचनालय व

## ॥ग्रंथाली॥ ठाणे केंद्र आयोजित

## वाचकदिन : 'असे होते स्वामीजी'

विद्यार्थी मित्रांनो,

स्वामी विवेकानंदाचे हे १५० वे जन्मवर्ष! शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष. रामकृष्ण मिशनने प्रसिद्ध केलेली स्वामी विवेकानंदाची पुस्तके आपण दिवाळीच्या सुट्टीत आवडीने वाचली आहेत. आता प्रत्येक शाळा, त्यावर आधारित एक कार्यक्रम करणार आहे. तेव्हा कार्यक्रमस्थळी वेळेवर या.

**लक्षात ठेवा :** १) प्रत्येक शाळेची इ. ७ व ८ मधील, शक्यतो ५ मुले भाग घेतील.

२) पुस्तकातील कोणता प्रसंग सादर करायचा आहे; हे आपल्या शिक्षकांनी आपणास सांगितलेच आहे.

३) ८ ते १० मिनिटांत तो प्रसंग सादर करायचा आहे.

४) शाळेच्या युनिफॉर्ममध्ये यायचे आहे.

५) येताना स्वत:ची पाण्याची बाटली आणण्यास विसरू नका.

६) प्रत्येक भाग घेणाऱ्यास एक पुस्तक व खाऊ दिला जाईल.

७) दोनही दिवशी प्रत्येकाने हजर राहायचे आहे.

विशेष सूचना : १) **कार्यक्रमस्थळी 'ग्रंथाली'ची उपलब्ध पुस्तके ४०% सवलतीचे मिळतील. त्याचा लाभ घ्यावा.**

२) कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे. तेव्हा आपले पालक, मित्रमैणिंना मुद्दाम बरोबर आणा.

**शनिवार, दि. १५ व रविवार, दि. १६ डिसेंबर २०१२**
**वेळ : दोनही दिवशी दुपारी ३ ते ६.३० पर्यंत**
**स्थळ : स्वा. सावरकर वाचनालय, उमा नीळकंठ व्यायामशाळा मैदान, ब्राह्मण सोसायटी, नौपाडा, ठाणे (प.)–२**

**विद्याधर दामले**
अध्यक्ष

**प्रशांत नवरंगे**
कार्याध्यक्ष

**समीर काळे**
कार्यवाह

स्वा. सावरकर वाचनालय, ठाणे

सौ. नंदिनी बर्वे – अविनाश बर्वे
बी–१०६, सुचेता, सिद्धेश्वर तलावाजवळ, पाटीलवाडी, ठाणे–१. फोन : २५३३७२५०

श्रीधर गांगल
डी–९०६, सुमेर कॅसल, मीनाताई ठाकरे चौक, लालबहादूर शास्त्री मार्ग, ठाणे–१. फोन : २५४७१७९५

# कलंदर कलाकार

**स्मिता भागवत**

अरविंदजी अष्टपैलू बहुआयामी व्यक्तिमत्त्व! नाणावलेले आर्किटेक्ट! चित्रकलेत प्रवीण! जीवनात चौफेर मुशाफिरी करणाऱ्या या कलंदर कलाकाराची प्रयोगशीलता दाद मागणारी! सामान्य लोकही निसर्गचित्र, पोर्ट्रेट वगैरे शब्दांशी परिचित असतात. पण अरविंदजींनी यशस्वी केलेला प्रयोग पासष्टावी कला ठरावी असा! चित्र काढल्यावर ते उलट करून अर्थपूर्ण करण्याची तारेवरची कसरत जमवण्याची क्षमता विरळा! अशक्यप्राय! अरविंदजींव्यतिरिक्त अशी चित्रे काढणारा चित्रकार भारतात वा विदेशात मी पाहिला नाही.

बालपणी बहुतेकांनी चार आंधळे व हत्ती ही रूपककथा वाचलेली असते. काही कथा-आख्यायिकांचे मथितार्थ आयुष्यात हळूहळू उलगडतात. अशा कथांत अग्रभागी असणारी ही कथा! फॅमिली काउन्सेलिंग क्षेत्रात सत्य शोधताना मला खूपदा ती आठवते आणि जाणवते, की डोळस माणसालाही एका ठिकाणी उभे राहून पूर्ण हत्ती दिसत नाही. सर्व बाजूंनी बघितल्यास हत्ती कळतो; पण प्रयत्नांची पराकाष्ठा केली तरी सत्य चार अंगुळे दूर राहते. सत्याचे समग्र दर्शन क्वचित कुणाला घडते. आगळी चित्रे बघताना हत्ती-चार आंधळ्यांची कथा आठवेल असे कधी वाटले नव्हते. पण एका कलंदर चित्रकाराची मुलाखत घेण्याचा योग, सत्यकल्पनेहून सुरस असल्याचा पुन:प्रत्यय देणारा ठरला. या कलाकाराचे नाव आहे अरविंद नारळे!

अरविंदजी अष्टपैलू बहुआयामी व्यक्तिमत्त्व! नाणावलेले आर्किटेक्ट! चित्रकलेत प्रवीण! पण त्यातच ते गुंतले नाहीत. जीवनात चौफेर मुशाफिरी करणाऱ्या या कलंदर कलाकाराची प्रयोगशीलता दाद मागणारी! चित्र रेखणारा त्यांचा हात त्याच ताकदीने लेखणी पेलतो. मी माझे मला हे डबके फोडून खळाळणाऱ्या जीवनप्रवाहात स्वत:स झोकून देतो. अत्यंत वेगळ्या कलेच्या संदर्भात ते चित्रपटनिर्मिती करतात. कधी समस्यापूर्तीच्या खेळातील आनंद लुटतात तर कधी काव्यरचनेत रमतात.

चित्रकला पेन, पॅड आणि पेंट्स या तीन 'पं'वर आधारलेली! पॅडजागी कॅनव्हास, वा पेनऐवजी खडू, कोळसा यांचा वापर वा पेंटमध्ये जलरंग, तेलरंग असणे समजू शकते. सामान्य लोकही निसर्गचित्र, पोर्ट्रेट वगैरे शब्दांशी परिचित असतात. पण अरविंदजींनी यशस्वी केलेला प्रयोग पासष्टावी कला ठरावी असा! ते यास 'विलोमचित्रे' Up side down म्हणतात. दोन्ही बाजूंनी चित्रे अर्थपूर्ण असल्याने इथे उलट-सुलट शब्द अस्थानी! ही चित्रे व चित्रकार दोन्हीविषयी मला अपार कुतूहल! कारण हुबेहूब चित्र काढणे अवघड असले तरी ते आव्हान नसते, मात्र चित्र काढल्यावर ते उलट करून

अर्थपूर्ण करण्याची तारेवरची कसरत जमवण्याची क्षमता विरळा! अशक्यप्राय! अरविंदजींव्यतिरिक्त अशी चित्रे काढणारा चित्रकार भारतात वा विदेशात मी पाहिला नाही. हा भन्नाट कलाकार मराठी आहे, यात माझे वा मराठी समाजाचे कर्तृत्व नाही हे कळत असूनही मी कॉलर टाईट केली. झाले असे की...


अरविंद नारळे

महाराष्ट्राच्या भ्रष्ट राजकारणाची शिकार ठरून आम्ही कॅनडात फेकले गेलो! 'जाऊ तिथे खाऊ' म्हणायला आम्ही राजकारणी नव्हतो. आडनिड वयातही रक्तात 'जाऊ तिथे ताठ राहू' मंत्र जपणारे वेगळेपण! भ्रष्टाचाराची दलदल नसलेल्या भूमीत संघर्ष पेलून पाय रोवताच नजर वेगळेपण शोधत भिरभिरली आणि जमली आगळ्या मातीने घडलेल्या वेगळ्या लोकांची मांदियाळी! त्यात विनायक-प्रतिभा गोखले, दुर्गा पाच्छापूरकर, निशा-गंगाधर देशपांडे, इथे राहून महाराष्ट्रातील अनेक खेड्यांत 'नचिकेत बालवाचनालये' निर्माण करणाऱ्या आशा आणि भास्कर पावगी, स्वत:च्या मुलांना मराठी शिकवून न थांबता परक्या भूमीवर मराठी शाळेचा ध्यास घेणाऱ्या सुनंदा टुमणे, लीना देवधरे, नानादातार, प्रविणा काळे, ज्योत्स्ना ओगले आणि कितीतरी!

मांदियाळीत अग्रभागी होते साहित्यप्रेमी गोखले दांपत्य! विनायक गोखल्यांचे अक्षर देखणे! मराठी छपाई शक्य नसलेल्या देशात त्यांनी ३०-३५ वर्षांपूर्वी एकता त्रैमासिक-हस्तलिखित प्रकाशित केले.बहुधा हस्तलिखित चूल-बोळक्याच्या लुटुपुटू संसारागत असते. स्तुती कमी नि कौतुक अधिक व्हावे असे! या विघ्नहर्त्या विनायकाने मात्र राजहंसाच्या कौशल्याने वेगळ्या कामाचा ध्यास घेणारे हेरले. त्यांच्या मदतीने एकता हस्तलिखिताच्या अशक्यप्राय खेळाचा डोलारा पेलला. पुढे तंत्रज्ञान विकसित झाले. इथे मराठी छपाई होऊ लागली. खुद्द महाराष्ट्रात नामवंत अंक बंद पडले पण एकता आजही चालू आहे. वैचारिक लेख, कथा, कविता, याव्यातिरिक्त या अंकात समस्यापूर्ती, शब्दकोडे अशी भाषेचे संवर्धन करणारी मळलेल्या वाटेवरची सदरे असतात. कालानुक्रमे त्यात चित्रगुप्ताची कोडी आणि विलोमचित्रे या अनोख्या सदरांची भर पडली.

कॅनडाच्या वृत्तपत्रात मनोरंजक नि बुद्धीस आव्हान देणारी सदरे असतात. एका सदराचे नाव 'जंबल'! यात एकाखाली एक चार शब्द असतात. प्रत्येकात अक्षरक्रम वेगळा! काही अक्षरांभोवती वर्तुळ! खरा शब्द शोधायला डोके खाजवावे लागते. अक्षरांची जागा बदलून अर्थहीन शब्दातून अर्थपूर्ण शब्द शोधायचा. 'जरासंधिका' anagram! शब्द सापडला की चौकट्यांचा उपयोग करून तो लिहायचा. शब्दांखाली सूचक प्रश्न असतो. वर्तुळातील अक्षरे वापरून प्रश्नाचे उत्तर ठरणारे एक वा अधिक शब्द बनवायचे. तसे सदर 'एकता'त करावे असे एकताच्या संपादकमंडळातील डॉ. अरुण जतकर यांना वाटले. सदरास यक्षप्रश्न, चित्रगुप्त, चित्रोत्तरी अशी नावे सुचवून त्यांनी हा विचार संपादक मंडळासमक्ष मांडला. संपादक मंडळातील डॉ. विद्युल्लेखा अकलूजकर यांना चित्रगुप्त हे नाव आवडले. पण अरविंद नारळे यांनी, इंग्रजीप्रमाणे बेतायचे तर मराठीत anagram सोपे बनतील, म्हणून बुद्धीस आकर्षक खाद्य पुरवू शकेल असे काही आपल्या भाषेत करावे, असा विचार मांडला. चित्रगुप्तवाणी ठरण्याजोगे वाक्य वा कवितासादृश ओळी देऊन त्यातून गरजेची अक्षरे शोधण्यास वाचकांना सांगावे, असे त्यांनी सुचवले.

जुलै २००१च्या अंकात या अनोख्या प्रकल्पाचा शुभारंभ झाला. कोडे कसे सोडवावे, याची वाचकांना कल्पना देण्यास एक सोडवलेले कोडे आणि वाचकांनी सोडवण्यासाठी एक कोडे देण्यात आले. तेव्हापासून 'एकता'च्या प्रत्येक अंकात चित्रगुप्त या सदराचा समावेश असतो. प्रत्येक संकल्पनेची डॉ. जतकर आणि नारळे यांच्यात चर्चा होते. संकल्पना उभयपक्षी मान्य झाल्यावर अरविंदजी त्यास चित्ररूप देतात. नमनाच्या चित्रापासून आजपावेतो सर्व चित्रांचे रेखाटन अरविंदजींनी केले. वाचकांना कल्पना यावी यासाठी नमुन्याचे कोडे सोबत दिले आहे.

एकतात प्रकाशित होणारी विलोमचित्रे व चित्रगुप्ताची कोडी दोन्ही सदरे अनोखी! तरी प्रमाणात चित्रगुप्ताची कोडी सोपी. विलोमचित्रे डोक्याला कसरत करायला लावणारी. जगातील आठवे आश्चर्य वाटावीत अशी. विलोमचित्रात एक चित्र आणि दोन कविता असतात. कधी चित्रकाराच्या स्वरचित तर कधी विद्युल्लेखा अकलूजकर वा अरुण जतकर यांच्या. चित्र समजून घेताना मार्गदर्शक ठरतील अशा. प्रत्येक बाजूसाठी एक कविता. दोन्ही बाजूंनी चित्र बघण्याचा आनंद उपभोगून, कलेस दाद देत मी पान उलटत असे. पण....

समज अपूर्ण असल्याचा संशय अस्वस्थ करी. 'कधीतरी या कलाकारास भेटायला हवं' असे वाटे. कामाच्या



न्यूटनने गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत तातडीने का शोधला?

चित्रगुप्तवाणी - "हत्यारबंद पोलिसांनी निदर्शकांवर गोळीबार केल्याचे विज्ञापन कानांवर पडताच आचार्य अत्र्यांचा जळफळाट होऊन त्यांनी निषेधाची सभा भरवली."

उत्तर

| प | ड | त्या | | फ | ळा | ची | | आ | ज्ञा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|



राधाबाईचे अनारसे कां हसले?

चित्रगुप्तवाणी - "मोजून चार दिडक्या झाडे खरीदलेली फाडून काळजाला हरएक बाग गेली!"

उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

धबडग्यात विचार दूर सरके. एकताचा नवा अंक हाती येईतो! वस्तुत: कलाकारास भेटणे अवघड नव्हते. आम्ही एका शहरात राहतो. विविध कार्यक्रमांत भेटतो. तरी कलाकार भेटणे घडत नव्हते. अचानक नेटधारकांसाठी रुचीचा कॅनडा विशेषांक काढण्याचा नि त्याचे संपादन मी करावे असा प्रस्ताव आला. त्यासाठी मी अरविंदजींकडून विलोमचित्रे समजवणारा लेख घेतला. तरी माझे समाधान झाले नाही. म्हणून रुचीच्या समग्र वाचकवर्गास हा अनोखा प्रयोग उलगडून दाखवण्यासाठी अनौपचारिक गप्पा-कम-मुलाखतीचा बेत आखला.

मला चित्रे नीट कळली नसावीत, हा संशय का छळत होता, ते मुलाखतीत स्पष्ट झाले. चित्राची संकल्पना आणि त्यापाठचा प्रगल्भ विचार सांगोपांग कळला आणि मनाच्या डोहात आनंदतरंग उठले. इथे 'यू मेड माय डे' म्हणण्याचा रिवाज आहे' तसे म्हणावेसे वाटले. मुलाखतीची सुरुवात व्यक्तिगत माहितीपासूनच झाली. कलाकाराचा कलापट उलगडत गेला तसतशी शब्दात सामावणे अशक्य व्हावे अशी जगड्व्याळ जाण मनाच्या डोहात हिंदकळत राहिली.

अरविंद नारळे नागपूरजवळच्या कटोलगावात मॅट्रिकपर्यंत शिकले. बालपणापासून त्यांना चित्रे रेखाटण्याचा नाद, शाळेत वाढीस लागलेला. ज्ञान-विज्ञानाची माहिती सहज उपलब्ध नसण्याचा तो काळ! स्थापत्यशास्त्र फाईन आर्ट्सची शाखा आहे, असे समजून अरविंदजींनी आर्किटेक्ट व्हायचे ठरवले. त्यांनी १९५८ साली आय.आय.टी. खडकपूरला अभ्यास सुरू केल्यावर भ्रमनिरास झाला; पण हे क्षेत्र खूप आवडल्याने ते खट्टू झाले नाहीत.

आर्किटेक्चर इन्स्टिट्यूटच्या अभ्यासक्रमात तिसऱ्या वर्षात एखाद्या फर्ममध्ये कार्यानुभव घ्यावा लागे. त्यांनी अमदावादला बी. व्ही. दोषी या विख्यात स्थापत्यशास्त्रज्ञाकडे काम केले. श्री. दोषी यांना त्यांचे काम खूप आवडले. पदवी प्राप्त केल्यावर अरविंदजींनी याच फर्ममध्ये यावे असे त्यांनी सुचवले. म्हणून १९६३ साली त्यांनी पुन्हा अमदावाद गाठले. गुणग्राहक दोषी यांनी अरविंदजींना विख्यात National Institute of Design (NID), Louis Kahn, यांच्या मार्गदर्शनाखाली Indian Institute Of Management चे काम करण्याची संधी दिली. विश्वविख्यात व्यक्तीच्या प्रोजेक्टमध्ये सुरुवातीपासून सहभागी होण्याची संधी मिळणे फार भाग्याचे! अरविंदजींनी या संधीचे सोने केले.

पुढे कॅनडाच्या टोरांटो विश्वविद्यालयातून पदव्युत्तर (मास्टर्स) करण्यासाठी 'कनेडियन कॉमनवेल्थ स्कॉलरशिप' मिळाली. शिक्षणाच्या निमित्तानेते कॅनडास गेले. साल सरताना

कन्सर्ट – उलट-सुलट सारखे चित्र



वॉर अ‍ॅन्ड पीस – उलट-सुलट वेगळे चित्र



त्यांना M Arch (Urban Designe) पदवी मिळाली. उन्हाळ्याच्या सुट्टीत त्यांना विशेष सन्मानाच्या (Award) रूपात आल्बर्टाच्या Banff येथील स्कूल ऑफ फाईन आर्ट्स या संस्थेत ऑइलपेंटिंग व कलर फोटोग्राफी शिकता आली. शिक्षण संपवून ते भारतात गेले. त्यांना कॅनडातील वास्तव्य फार आवडले होते, म्हणून लगेच स्थलांतराची कार्यवाही करून त्यांनी कॅनडात स्थलांतर केले. या शांत, सुसंस्कृत भूमीत विविध मूल्ये व दृष्टिकोनाच्या जाणिवा वेगाने जागृत झाल्या. कलेस नवोन्मेषाचे धुमारे फुटले. या भूमीत जीव रुजला; हे खरे असले तरी कुठेही असतो तरी आपण नवतर प्रयोग केले असते, असा विश्वास ते व्यक्त करतात.

विचारले नि त्यांनी सांगितले अशी मुलाखत मला लटकी वाटते. त्यापेक्षा अनौपचारिक गप्पांत व्यक्तिमत्त्व उलगडणे अधिक भावते. पण विषय कुणी न हाताळलेला! रूढ चित्रकला ही माझे क्षेत्र नसल्याने मी प्रश्नावली तयार करू शकले नाही. जात्यावर बसले की ओवी सुचते तसे संवादाच्या प्रवाहात प्रश्न गवसतील, अशी श्रद्धा होती. अरविंदजींनी मी या क्षेत्रात अनभिज्ञ असल्याची जाणीव ठेवून इतकी सविस्तर उत्तरे दिली की मनात आपसूक प्रश्न उमटले. बालपणापासून चित्रे काढण्याचा छंद असणाऱ्या अरविंदजींचे पाय पाळण्यात दिसले का, विचित्र वाटणारा कलाप्रकार का हाताळावासा वाटला, वगैरे जाणून घेण्यात मला रस! अरविंदजी सामान्य माणसास कळतील अशी सुलभ उत्तरे सादर करत होते.

चित्रकलेच्या रूढ प्रवाहाचा अभ्यास किशोरवयात सुरू केला होताच. शालेय जीवनात त्यांना प्रेरणा आणि प्रोत्साहन देणारे गुरुजन लाभले. गुरुजनांनी संस्कारक्षम वयात त्यांना एकाग्रता आणि संयमाचे महत्त्व पटवले; हे ते कृतज्ञतेने सांगतात. शाळेत घेतलेला वसा त्यांनी परिपक्व वयात जपला आहे.

हुबेहूब चित्र काढणे अवघड असले तरी बरेच कलाकार ते करतात. पण अरविंदजींनी कलेच्या रूढ प्रवाहापलीकडे खूप काही साधले आहे. 'इल्युशन' (illusion Brad Honeycutt & Terry Sticles Publishing) या विश्वविख्यात प्रकाशनात त्यांच्या दोन चित्रांचा समावेश असणे, ही अत्यंत सन्मानाची बाब! एका चित्राचे नाव 'पिकॉक अँड पॅरट/वूमन लुकिंगअप!' दुसऱ्याचे 'टू इंडियन बफेलोज/ए काऊ ग्रेझिंग!' एका चित्रात दोन चित्रे दिसतात; म्हणून ते illusion! संवाद साधताना, कलेच्या रूढ प्रवाहात नसलेले 'हटके' प्रयोग करावेसे का आणि कसे वाटले, हा प्रश्न मनात रुंजी घालतो. अर्थात ते मुलाखतीचे प्रयोजनच असते.

ते पहिल्यापासून या क्षेत्रात वेगळे प्रयोग करू लागलेले नाहीत. आधी त्यांनी रूढ चित्रकलेत प्रावीण्य मिळवले. व्यवसायात जीव ओतला. बरीच वर्षे पेन, इंक, जलरंग, तेलरंग यांच्या माध्यमातून मनापासून काम केले. सामान्य माणसास चित्रकला अवगत करता यावी असे पुस्तक लिहिले. 'फॉर द लव्ह ऑफ सिंपल लाइनवर्क' हे पुस्तक इथल्या 'कनेडियन स्टेज अँड आर्ट पब्लिकेशन' या संस्थेने प्रकाशित केले. याच प्रकाशन संस्थेने पुढे जलरंगास प्राधान्य देणारे 'फॉर द लव्ह ऑफ वॉटरकलर' पुस्तकही प्रकाशित केले. अरविंदजींच्या पुस्तकास पाठ्यपुस्तकाचा बहुमान मिळाला.

गुरुजनांनी रुजवलेले चित्तएकाग्रता आणि हवे तसे उमटेतो धीराने घेण्याचा संयम, आत्मसात झाला होता. कदाचित जन्मभर illusion सारखे छोटे-मोठे हटके प्रयोग ते करत राहिले असते, पण १९९६ साली अनायसे एक पुस्तक हाती आले. 'श्रीरामकृष्ण काव्यं' या संस्कृत पुस्तकाने त्यांचे जीवन ढवळून काढले. त्यानिमित्ताने आयुष्यात परिवर्तन वेगळे वळण देणारा क्षण – Turning point प्रकटला.

या पुस्तकात उलटसुलट वाचता येणारे काव्य होते.



**मॅन वर्सेस टू मॅजिशियन्स**

गुजरातेत 'लीमडीगामेगाडीमली' हे वाक्य किंवा मराठीत 'चीमाकायकामाची' हे वाक्य उलटसुलट कसेही वाचले तरी तसेच वाचले जाते याची मजा आम्ही मुले अनुभवत असू. पण संपूर्ण काव्य निर्माण व्हावे, याचे नवल वाटले. नित्य वाचतात तसे वाचल्यास ते रामायण तर उर्दू वाचतात तसे वाचल्यास कृष्णायन!

हा अशक्यप्राय प्रयोग त्यांना चक्करभेंड करून थांबला नाही. त्याने अरविंदजींच्या मनात वैचारिक वादळ उठवले. ते चित्रकार! ही संकल्पना चित्रात आणता येईल का, या प्रश्नाच्या उत्तरात 'प्रयत्न करून प्रश्न धसास लावायला हवा', हा आग्रह दाटला. प्रयत्न सहज वा सोपा नव्हता. प्रयोगात सातत्य व धीर यांची कसोटी लागत होती. एक चित्र आव्हान नव्हते; पण ते दुसऱ्या बाजूने अर्थपूर्ण करताना पहिल्या बाजूच्या चित्रातील अर्थ हरवत होता. पहिल्या बाजूस न्याय दिला की दुसरी बाजू विपरीत दिसू लागे. चित्र उलट-सुलट करताना मनात तरंग उठत. अध्यात्माशी नाते सांगणारे! मानसिक तोल ढासळण्यास कारण ठरतील असे. तोल सांभाळणे हे तारेवरच्या कसरतीहून अधिक अवघड आव्हान. यास चित्र म्हणावे की चित्रे, इथपासून प्रश्न सुरू होत. रूढ पद्धतीने पाहिल्यास चित्र एक, तर उलट-सुलट बघितल्यास दोन चित्रे! हे 'चक्षुर्वैसत्य, सत्याची अंतिम कसोटी नसते' याचा पुरावा ठरणारे! नैराश्य नि वैफल्य निर्माण करणारे! प्रयत्न थांबवण्यास भरीस घालणारेही!

पण बालपणी ते 'पेशन्स अँड पर्सिवीअरन्स कॅन ओव्हरकम माउंटन' ही म्हण शिकले होते. गुरुजनांनी संयम आणि धीराचे बीज पेरले होते. पुढे समर्थांचे 'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे' नि 'तुकोबांचे 'निश्चयाचे ऐसे बळ तुका म्हणे तेची फळ' हे विचार रुजले होते. म्हणून एका चित्रातून दोन समान वा भिन्न दृश्ये रेखाटण्यात ते यशस्वी झाले.कलंदर कलाकार नैराश्यास जुमानत नाही. साध्य सिद्ध केल्याविना त्यास चैन पडत नाही; याचे ते आणि त्यांची विलोमचित्रे मूर्तिमंत उदाहरण!

रामकृष्ण काव्यं पाहून १९९६ मध्ये उमटलेले संदिग्ध तरंगांचे रूपांतर नि:संदिग्ध विचारात होणे, मग विलोमचित्र रेखाटण्याचा अथक प्रयत्न करणे, प्रयत्न वारंवार सफळ होणे, सातत्याने प्रकाशित करता यावे इतकी चित्रे जमा होणे, मग संकल्पना एकताच्या संपादक मंडळासमोर ठेवणे, ती मंजूर होणे हे सव्यापसव्य पूर्ण होण्यात २००९ साल उजाडले. बघणाऱ्यास अनोख्या चित्राची किमया दिसते; पण किमयागाराची तपस्या, संयम, कौशल्य आणि धीराचे अपार भांडार दिसत नाही, हे विदारक सत्य! एकताच्या एप्रिलच्या अंकात या प्रकल्पाचा श्रीगणेशा झाला.

चित्रांसाठी 'विलोमचित्रे' हे नाव समर्पक वाटत असताना अरविंदजींनी हा प्रयत्न करताना मनात उठलेले तरंग ओठी आणले. ते विलोमचित्राइतकेच अनोखे! आशयघन! ही चित्रे त्यांना 'जीवनाच्या भिन्न पैलूंचे रेखांकन' वाटतात. त्यांची तुलना ते जन्म-मरण-जन्म या वर्तुळाशी करतात. एक जन्म पूर्ण होतो म्हणजे एक रेखांकन पूर्ण होते. एका जन्मात पुनर्जन्माचे भवितव्य तयार होते, असे त्यांना वाटते. चित्र उलट करताना रेषा विस्कळीत होऊन गडबड-घोटाळा वाटतो. चित्र उलट झाले आणि रेषांचे गंभीरपणे निरीक्षण केले तर विचूक वाटणाऱ्या रेषातील संदिग्धता हळूहळू अर्थवाही बनते. कलाकाराच्या नजाकतीने त्यात काही रेषांची भर घातली तर मूळ चित्राच्या गाभ्यास धक्का न लावता नवे चित्र तयार होते. याची तुलना जन्म-पुनर्जन्माशी करताना त्यांना दोन जन्मांमध्ये मरण नावाचा थांबा दिसतो. ही सुलट चित्र उलट करण्याची प्रक्रिया असते, असे त्यांना वाटते.

संकल्पना स्पष्ट करत ते पुढे म्हणतात, ''पहिल्या चित्राच्या रेषा वापरून दुसरे चित्र रेखाटणे, हे पुढचा जन्म आदल्या जन्मीच्या कर्मांवर अवलंबून असण्यासारखे! आदल्या चित्राच्या रेषा आदल्या जन्मीच्या कर्माचे प्रतीक! त्या रेषा- कर्माच्या अनुषंगाने नवा जन्म (चित्र) साकार होणार!'' विलोमचित्रकला 'पुनर्जन्मतत्त्वाचा चित्ररूपी आविष्कार आहे' हे ते पटवून देतात. पण आदल्या जन्मीचा या जन्मात संदर्भ नसतो. इथे आदल्या चित्राच्या रेषा समजून घेत नवे चित्र रेखायचे असते. म्हणजे आधीच्या चित्राच्या रेषाभांडवलावर नवे रेखांकन! ते धीर व

संयमाची कसोटी घेते. एकदा या कसोटीत उत्तीर्ण झाले की सारे सहज जमते वा विलोमचित्र काढण्यात हातोटी निर्माण होऊन भराभर चित्रे काढली जातात, असे नव्हे. प्रत्येक विलोमचित्र कसोटी असते.

विलोमचित्रातील रेषा त्यांना देहाचे अवयव वाटतात. ते म्हणतात, ''अवयवांनी योग्य जागा घेतली की नाकी-डोळी नीटस शरीर तयार होते. तद्वत चित्रकाराने रेषांना योग्य स्थान दिल्यावर चित्र अर्थपूर्ण होते. आपल्या धर्मात मृत्यूनंतर निर्जीव देह भंगून पंचमहाभूतांत विलीन होतो. पंचमहाभूते एकत्र येऊन नवीन देहरूपाने प्रकटतात. तसे विलोमचित्र उलटताना या जडरूपी रेषा क्षणभर विस्कळीत-अर्थहीन बनतात. पण चित्र पूर्ण उलट होताच नवीन चित्रास आकार देऊ शकतात. विलोमचित्रात रेषांचा एकच संच उलट-सुलट बाजूतील रचनांना वेगवेगळा आकार देतो. यास अर्थ पुरवणारी अदृश्य शक्ती उलट बाजूतून सुलट बाजूत शिरते. तो प्राण! अदृश्य चेतना! चित्रकाराची किमया! जादू वा अक्षरश: हातचलाखी! विलोमचित्राच्या निर्मितीची जाण सामान्य माणसाच्या आकलनाबाहेर असली तरी या कलेचा आस्वाद लहान-थोर सारे घेऊ शकतात! जादूच्या प्रयोगांचा आनंद सारे लुटतात, तसे!

एकताच्या २००९ सालच्या एप्रिलच्या अंकापासून दर अंकात विलोमचित्रे असतात. हे शब्दात समजून घेतले तरी चित्रे बघूनच या आनंदाचे रसपान होणार. इथे वानगीदाखल दोन चित्रे दिली आहेत. पहिले चित्र दोन्ही बाजूंनी तंतोतंत सारखे आहे. अरविंदजी यातून 'जीवन सगळीकडे सारखे' हा आशय व्यक्त करतात. पण जीवन सदासर्वदा सारखे असत नाही. त्यात हेलकाव्याप्रमाणे चढ-उतार येतात. म्हणून संवेदनात राग-लोभ, प्रेम-द्वेष, गरिबी-श्रीमंती अशा विरोधी जोड्या तयार होतात. दुसऱ्या चित्रात शांतता-युद्ध अशी विरोधी जोडी व्यक्त होत आहे. सुलट चित्र शांत कौटुंबिक जीवन व्यक्त करते तर उलट चित्रात युद्धास सज्ज सैनिक दिसतात. हे नीट पाहिले की अरविंदजी म्हणतात तशी ही चित्रकाराची किमया वा हातचलाखीची जादू वाटते.

ही कला शिकण्यास कुणी आले का, कुणाला त्यांनी ती शिकवली का, हे प्रश्न निर्माण होणे स्वाभाविकच! ते म्हणाले, ''थियरी शिकवावी तशी ही कला पायरीपायरीने समजावता येत नाही. प्रत्येक विलोमचित्र खरोखर कसोटी! एका बैठकीत पूर्ण न होणारे! उलट, चित्रास अर्थ प्रदान करण्यात खूप वेळ जातो; तेव्हा प्रचंड धीराचे भांडवल आवश्यक नव्हे अपरिहार्य ठरते. हे प्रथम जमले तेव्हा मला प्रकर्षाने धीराचे महत्व पटले. धीराने घेण्याची सवय जडली वा आत्मविश्वास निर्माण झाला असे म्हणू. पण अपार धीराने येणारा आत्मविश्वास सहजसाध्य नाही. कदाचित म्हणून, कुतूहल दाखवले तरी शिकायला कुणी आले नाही. शिकवण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही. प्रत्येक यशात पाच टक्के इन्स्पिरेशन (ऊर्मी) आणि पंचाण्णव टक्के पर्स्पिरेशन म्हणजे घाम गाळणे वा मेहनत असते. जमत नाही तोवर प्रयत्न करणे सांगता आले तरी शिकवता येत नाही. त्यात 'आत्मभान', कौशल्य आणि धीर या त्रिवेणी संगमाची नितांत गरज! ते जमेल त्यास ही कला आत्मसात होईल. न शिकवता!''

काही वर्षांपूर्वी पुण्याच्या राजहंस प्रकाशनाने 'द्वैचित्र्य'नामक साठ उलट-सुलट चित्रकवितांचे संकलन प्रकाशित केले. त्या धर्तीवर 'चित्रवैचित्र्य' नावाचे दुसरे संकलन प्रकाशनासाठी तयार होत आहे. विलोमचित्रकला निर्मितीचा पाया तयार आहे. इच्छुक रसिकांसाठी तो या संकलनाद्वारे उपलब्ध आहे. युवा पिढीने कल्पकतेस भरीस घालून या पायावर आकर्षक आणि उत्तुंग इमारती बांधाव्यात, अशी इच्छा अरविंदजी व्यक्त करतात.

गेली तीन वर्षे अरविंदजी या कलेच्या संदर्भात हटके फिल्म तयार करण्यात मग्न आहेत. शूटिंगसाठी त्यांनी थेट काश्मीर गाठले. चित्रपटाचे शूटिंग आणि ध्वनिमुद्रण झाले असून पार्श्वसंगीतच बाकी आहे. त्यांना हा चित्रपट जीवनातील अत्युच्च महत्त्वाकांक्षा वाटते. या नवतर कल्पनेस वाहिलेला चित्रपट पूर्ण करण्याचा त्यांनी ध्यास घेतला आहे. त्यांची 'काल, आज आणि उद्या' जाणून घेण्याच्या प्रयत्नात मला मात्र वाटले, हा चित्रपट झाला की त्यांनी त्यास जीवनाची इतिकर्तव्यता समजू नये. त्यांना नवनव्या कल्पना सुचत राहाव्या आणि कलेची सामान्य जाण असलेल्या माझ्या सारख्यांची कलाजाण अधिकाधिक विकसित व्हावी.

कलंदर कलाकारांचे शिष्य त्यांच्या तोडीचे होतील अशी खात्री देता येत नाही. कलाकार वा महानुभावांच्या पिढ्या निर्माण होत नाहीत, हे कळते. शिवाजीमहाराजांचा पुत्र प्रतिशिवाजी नसणेही पटते. तरी मुलाखत संपताना अरविंदजी अविवाहित नसते तर कदाचित समाजास अजून अनोखा कलाकार लाभला असता, असे वाटते..

**स्मिता भागवत**
53 Townley Cres. Brampton
ON L6Z 4S9 Canada
1 289 752 8885
smitacap@gmail.com


ठाणे
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा

# इंडिया प्रिंटिंग वर्क्स

संकल्पना ते पूर्तता

40
1932-2012

"जलात् रक्षेत, तैलात् रक्षेत, रक्षेत शिथिल बंधनात।
मूर्खहस्ते न दातव्यं", इति कथितम् पुस्तकाम् ॥

- डिझायनिंग
- टाइपसेटिंग
- प्रिंटिंग (कृष्ण-धवल व चार रंगी)
- बाइंडिंग
- तत्पर सेवा
- माफक दर
- वेळेची खात्री




एक दिवसात, अत्यल्प किंमतीत १ ते २०० प्रती छापून देण्याची सुविधा

## ८० वर्षांची हीच आमची परंपरा

दर्जेदार ग्रंथ छपाईसाठी अवश्य भेटावं असं नाव

**आमचे नावाजलेले प्रकाशक**

श्रीविद्या प्रकाशन, पुणे • ग्रंथाली, मुंबई • पॉप्युलर प्रकाशन • मैत्रेय प्रकाशन • अनघा प्रकाशन • नवता प्रकाशन • राजेंद्र प्रकाशन • रोहन प्रकाशन

इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, गं. द. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ फोन : + 91 22 66624969 फॅक्स :+ 91 22 66624970
इ-मेल : ipw@vsnl.net • वेबसाइट : www.ipworks.in



रोहन
प्रकाशन

स्वातंत्र्योत्तर भारताचा गेल्या ६५ वर्षांचा
पट उलगडून दाखवणारा

# एक अभूतपूर्व ग्रंथ




## १९४७ पासूनच्या घटना-घडामोडींतून
## उलगडलेला स्वतंत्र भारत

**ठळक वैशिष्ट्ये**

• राजकारणापासून विज्ञान-तंत्रज्ञानापर्यंत • अर्थकारणापासून कलाक्षेत्रापर्यंत
• एकूण २८ क्षेत्रांतील घडलेल्या महत्त्वपूर्ण घटनांचा वस्तुनिष्ठपणे घेतलेला मागोवा
• मोठ्या आकाराची ९०० पानं, उत्कृष्ट निर्मितीमूल्य, हार्डबाऊंड
• सोयीस्कर वाचनासाठी ३ प्रकारची सूची / अनुक्रम

** १५ डिसेंबर २०१२ पर्यंत प्रसिद्ध होणार*

अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्या : **www.rohanprakashan.com**

रोहन प्रकाशन

धवलगिरी, शनिवार पेठ पोलीस चौकीसमोर, पुणे ४११०३०
✆ पुणे २४४८०६८६, २४४८९१०९ मो. ८१४९१२०२१०
✆ मुंबई २३८९२३७८ मो. ९८६९११८७६२

# यशवंतराव गडाख यांची अभिजात पुस्तके




## अर्धविराम

आत्मचरित्र यशवंतराव गडाख या एका व्यक्तीचे नसून, अंगी दुर्दम्य उत्साह व सर्जनशील जोष असलेल्या, परिवर्तनाच्या प्रक्रियेची प्रगल्भ जाण असलेल्या आणि मातीतून आलेल्या शहाणपणाची जोड असलेल्या त्या काळातील टिपिकल अशा तरुण काँग्रेस कार्यकर्त्याच्या/ पुढाऱ्याच्या प्रवासाचा हा सहृदय आलेख आहे.

**– अरुण साधू**

किंमत : २८० रु.
पृष्ठे : २०८




## सहवास

'सहवास' या पुस्तकात त्यांनी आपलं गाव, निसर्ग आयुष्यात भेटलेली माणसं, यांच्या नातेसंबंधाचा नितळ मनानं शोध घेतला आहे. यातून त्यांच्या सुसंस्कृत व्यक्तिमत्त्वाचा प्रत्यय येतो. आपणही त्या काळात हरवून जातो.

किंमत : १६० रु.
पृष्ठे : १७६




## अंतर्वेध

आमचे मित्र यशवंतराव गडाख पाटील हे सात्विक माणुसकीची शांतपणे आराधना करणारे, शुचितेचे वारकरी आहेत. हा वारकरी पंथ त्यांनी साहित्यलेखनातून धरलेला दिसतो! 'अंतर्वेध' हे त्यांचे नवे पुस्तक, त्यांच्यातील साहित्यिकाचा पुन:प्रत्यय आणून देणारे आहेच, शिवाय भवतालाकडे, तेथील भल्याबुऱ्या, साध्यासुध्या माणसांकडे, आपल्या रक्ताच्या गणगोताकडे ते कोणत्या विशाल नजरेने पाहतात, ते पुन्हा एकवार जाणवून देणारे आहे.

**– मधु मंगेश कर्णिक**

किंमत : १८० रु.
पृष्ठे : १८८

ऋतुरंग
**प्रकाशन**

**अरुण शेवते**
लिंक पॅलेस, बी–१०२, साईबाबा कॉम्प्लेस, गोरेगाव (पूर्व),
मुंबई– ४०० ०६३.भ्रमणध्वनी : ९८९२४३८५७४

# ‘मनोविकास प्रकाशन’ची २०१२ मधील दिमाखदार पुस्तकं







## मुसाफिर

### अच्युत गोडबोले

अवघ्या ८ दिवसात
५,००० हजार
पुस्तकांची विक्रमी विक्री

समृद्ध जीवनाचा हा निव्वळ आत्मचरित्रात्मक लेखाजोखा नसून ज्या प्रवाहात वाहतो आहोत त्या कालौघाचाही अत्यंत तन्मयतेने घेतलेला रोचक आढावा आहे. –अरुण साधू

**सकारात्मक जगायला शिकविणारे वाचकाला श्रीमंत करणारे एका अफाट मुसाफिराचे आत्मकथन**

पृष्ठे : ४६४, मूल्य : ₹ २५०

## मनात

मानसशास्त्राची उत्कंठावर्धक रम्य सफर

### अच्युत गोडबोले

२०१२ सालचे
सर्वाधिक खपाचे ‘मनात’

**अवघ्या ९ महिन्यात १० आवृत्त्या**

व्यापक अर्थानं मानसशास्त्राची माहिती देणारं हे पुस्तक म्हणजे कुतूहल असणाऱ्या प्रत्येकासाठी मोठा खजिना आहे. –डॉ. रवी बापट

या पुस्तकातला प्रत्येक शब्द विषयाचं मर्म उलगडून सांगत वाचकांशी सहज दोस्ती करणारा आहे. –डॉ. राजेंद्र बर्वे

पृष्ठे : ६३२, मूल्य : ₹ ३७५

मनोविकास प्रकाशन

पुणे : फ्लॅट नं. ३ ए, चौथा मजला, शक्ती टॉवर, ६७२ नारायण पेठ, लोखंडे तालीमजवळ, पुणे ४११०३०
फोन : ०२०–६५२६२९५०/६५२१३२०३ । मुंबई : शॉप नं. ६, डॉ. कंपाऊंड, चिंचपोकळी स्टेशनजवळ, मुंबई.
संपर्क : ९९६७०८९५२७ www.manovikasprakashan.com | E-mail : manovikaspublication@gmail.com




## चाहूल तारुण्याची

डॉ. नीना संजीव सावंत

**मूल्य १५० रु.**
**सवलती ९० रु.**

पौंगडावस्था ही मुलांच्या जीवनातील नाजूक अवस्था असते. मुलांमध्ये या काळात शारीरिक बदल आणि मानसिक स्थित्यंतर होत असते. त्याचा मुलांवर व पालकांवरही परिणाम होत राहतो. पालकांवर दडपण येते आणि मुलेही वेगळ्या दडपणाखाली वावरत असतात.

पौगंडावस्थेतील मुलाला वाढवताना पालकांना संपर्कशास्त्र, माहिती, समजूतदारपणा आणि मुलांशी कसे वागावे ह्याचे चांगले ज्ञान असेल तर त्यांना जबाबदारी पेलवणे अवघड वाटणार नाही.

## एका तळ्यात होती

डॉ. नीना संजीव सावंत

**मूल्य १२० रु.**
**सवलती ७० रु.**




कुटुंबं लहान होत चालली आहेत. राहणीमान सुधारतंय, पण मुलं वाढणं आणि वाढवणं हे पालकांना जिकिरीचं होत चाललंय. आजच्या स्पर्धात्मक युगात वाढलेल्या तणावांचा हा परिपाक आहे. लहानपणापासून मुलांवरील अपेक्षांच्या ओझ्यामुळे त्यांच्या बालसुलभ क्रिया-प्रतिक्रिया दबल्या जात आहेत.

या साऱ्यातून मुलांची मानसिकता घडते. काही वेळा ती त्यांच्या विचित्र वागण्यातून व्यक्त होते. तो मानसिक विकार असू शकतो हे लक्षातही येत नाही.

आज सर्वत्र दिसणाऱ्या बालक-पालक विवंचनांचा मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून घेतलेला हा आढावा.




**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

## ताठ कणा – डॉ. पी.एस. रामाणी

जगातील दहा न्यूरोस्पायनल सर्जनची नावे घेतली तर त्यामध्ये डॉ. पी. एस. रामाणी यांचा समावेश होतो. असे मोझे कर्तृत्व गेल्या तीस वर्षांत त्यांनी बजावले आहे. पाठीच्या कण्यावरील शस्त्रक्रियांच्या संदर्भात त्यांनी जी नवी तंत्रे संशोधिली त्यामुळे तर त्यांचे नाव या क्षेत्रात अजरामर झाले आहे. त्यांचा जगभर मोठा शिष्यपरिवार आहे. ते न्यूरोसर्जनच्या आंतरराष्ट्रीय महासंघाचे अध्यक्ष आहेत.

अशा या जागतिक ख्यातीच्या डॉक्टरचे हे आत्मकथन. गोव्याच्या सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेल्या डॉ. रामाणी यांनी ध्येयनिष्ठेने शिक्षण घेतले. कौशल्य कमावले आणि कण्यावरील शस्त्रक्रियेस या देशात मान्यता मिळवून दिली. त्यांची ही असाधारण कहाणी रोचक आणि प्रेरक आहे...

# महाराष्ट्र आघाडीचा कालखंड प्रगतीचा...

महाराष्ट्र शासन



**लोककल्याणाचा वसा घेतलेल्या महाराष्ट्र शासनाने सातत्याने जनसामान्यांच्या हिताचे अनेक निर्णय घेऊन प्रगतीचा वेग वाढविण्यात यश मिळविले आहे.**

- कृषी विकासासाठी २८४ कोटी, तर कोरडवाहू शेती विकासासाठी २०० कोटींचा अतिरिक्त निधी वितरित
- सिंचनक्षमता वाढविण्यासाठी केंद्राकडे २२०० कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर
- ऊर्जानिर्मिती क्षमतेत वाढ, सुयोग्य वीज व्यवस्थापनामुळे भारनियमनमुक्तीकडे वाटचाल
- आरोग्य यंत्रणेचा बृहद्‌आराखडा मंजूर, नवीन १२५७ आरोग्य संस्था स्थापन होणार
- राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरू, विविध आजारांवरील ९७५ उपचारांचा समावेश, आतापर्यंत ११ हजार रुग्णांवर उपचार
- गुटखा व पानमसाल्यावर बंदी
- युवकांच्या आणि क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी स्वतंत्र युवा आणि क्रीडा धोरण
- वस्त्रोद्योग धोरण जाहीर, ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आणि ११ लाख रोजगार अपेक्षित
- प्रस्तावित मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्पांतर्गत शिवडी आणि न्हावा-शेवा बंदराला जोडणाऱ्या सहापदरी द्रुतगती मार्गाच्या उभारणीला केंद्राची मंजुरी
- महाराष्ट्र गृहनिर्माण (नियमन व विकास) अधिनियम २०१२ विधेयकास मंजुरी, गृहनिर्माण नियामक आयोगाची स्थापना
- गृहनिर्माण प्रकल्पांमध्ये अल्प उत्पन्न गटांसाठी २० टक्के सदनिका राखीव ठेवणे बंधनकारक
- नागपूर व अमरावती विभागातील सुमारे ४० हजार नझूल मिळकतीबाबतचे धोरण मंजुर
- 'आधार' योजनेंतर्गत ४ कोटी रहिवाशांची नोंदणी, महाराष्ट्र देशात प्रथम
- १३ मार्च २०१२ ते १२ मार्च २०१३ हे वर्ष पहिले मुख्यमंत्री स्व. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करणार
- १ जुलै २०१२ ते ३० जून २०१३ हे वर्ष माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांचे जन्मशताब्दी वर्ष म्हणून साजरे करणार



**पृथ्वीराज चव्हाण**
मुख्यमंत्री

## दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय - महाराष्ट्र शासन

# अस्मितादर्श'मधील निवडक वैचारिक लेखन, कथा, कविता

## यांचे बबन लोंढे आणि सुधाकर गायकवाड यांनी केलेले संकलन-संपादन




प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे संपादन करत असलेल्या 'अस्मितादर्श' या त्रैमासिकामधील गेल्या चाळीस वर्षांतील निवडक लेखांचा 'आंबेडकरी विचारधारा' हा अनमोल दस्तावेज आहे.या ग्रंथात सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन, लोककला, राजकीय, संशोधनात्मक आणि पुरातत्त्व अशा विविध विषयांवरील लेखांतून तथाकथित पूर्वास्पृश्यांचा, दलितांचा इतिहास; तसेच, १९५६ नंतरच्या धर्मांतरित बौद्धांच्या विविध चळवळी यांचे प्रतिबिंब पाहावयास मिळते.
हा सामाजिक परिवर्तनाच्या संघर्षमय चळवळीचा सृजनशील असा वाङ्मयीन, वैचारिक आविष्कार आहे.

### आंबेडकरी विचारधारा

**बबन लोंढे / सुधाकर गायकवाड**

**मूल्य ६०० रुपये • सवलतीत ३६० रुपये**




'काळोखगर्भ' या प्रातिनिधिक कथासंग्रहातून गेल्या तीन पिढ्यांच्या कथाकारांनी मानवी आयुष्यातील भीषण अनुभव आणि जगण्यातला नेहमीचा संघर्ष उद्घोषित केला आहे. हा सामाजिक परिवर्तनाच्या संघर्षमय चळवळीचा सर्जनशील आविष्कार आहे.

### काळोखगर्भ

**बबन लोंढे / सुधाकर गायकवाड**

**मूल्य २५० रुपये • सवलतीत १५० रुपये**




'अस्मितादर्श'च्या गेल्या पस्तीस वर्षांच्या वाङ्मयीन प्रवासातल्या निवडक कवितांचे बबन लोंढे व सुधाकर गायकवाड यांनी केलेले हे संकलन/संपादन. हा आंबेडकरी चळवळीचा अनमोल दस्तावेज आहे. दलित साहित्याच्या संशोधकांना, अभ्यासकांना, वाचकांना व पुरोगामी चळवळीतल्या कार्यकर्त्यांना 'निर्णायक युद्धानंतर' विचारप्रवृत्त करील!

### निर्णायक युद्धानंतर...

**बबन लोंढे / सुधाकर गायकवाड**

**मूल्य १२५ रुपये • सवलतीत ७५ रुपये**

# फ्रान्स, मी आणि 'आलम'गिरी

**प्रभाकर वाईरकर**

माझ्या काळजात धस्स झाले. मला कळेना, परदेशात अनोळखी माणूस कसा काय आपल्या घरी बोलावू शकतो. माझ्या मनात नानातऱ्हेचे वाईट विचार येऊ लागले. मी नाही म्हटले तरीही तो पटवून देऊ लागला, त्याच्याकडे मी का जावे ते...तो माणूसही बांगलादेशी मुस्लिम होता. स्टॉलवाला मला तो चांगला माणूस आहे म्हणून सांगू लागला, पण मी तयार होत नव्हतो...

सकाळीच बोचऱ्या थंडीशी गुजगोष्टी करत मी फ्रान्सच्या 'द गॉल' एअरपोर्टवर पाय ठेवला. यावेळी मागील अनुभव व प्रवासाची थोडीशी जास्त तयारी केल्यामुळे तिथून मी व्यवस्थितपणे 'ऑस्ट्रलझीट' या रेल्वेस्टेशनवर रेल्वेने पोचलो, त्या ठिकाणी सलोन इंटरनॅशनल या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना भेटलो. पुन्हा ट्रेनने लोमेझीला या शहराकडे जाण्यासाठी ट्रेन पकडली. आपली लांबलचक पावले टाकत पळू लागली. ट्रेनमध्ये फळे आणि वाईन देऊन स्वागत करण्यात आले. युरोपीयन व्यंगचित्रकार आणि त्यांत भारतीय मी म्हणजेच पांढऱ्या रंगाच्या अनेक ठिपक्यांमध्ये काळ्या रंगाचा ठिपका. अगदी उठून दिसत होतो. गप्पा-हसणे-खिदळणे असे त्या सर्वांचे जोरात चालू होते व मी मला काहीतरी समजल्याचा भाव चेहऱ्यावर आणून उगाचच त्यांना साथ देत होतो.

लोमेझीनमध्ये पाय ठेवला व पुढचा प्रवास कारने करून प्रदर्शनाच्या ठिकाणी दाखल झालो.

दरवाजावर सुंदर, गुबगुबीत, लाल सफरचंदासारखे गाल, बोलके डोळे, ओठ लुसलुशीत असलेल्या तरुणी स्वागत करत होत्या. फ्रेंच कीसने. मला यावेळीही धाडस झाले नाही. हस्तांदोलन करतच मी प्रवेश करता झालो इतरांबरोबर.

भव्य तंबूमध्ये व्यंगचित्रांचे प्रदर्शन लावण्यात आले होते. नेहमीप्रमाणे आकर्षक गाईचे शिल्प स्वागत करत होते. पुढे गेल्यावर बॉम्बधमाका झाल्यासारखा परिणाम साधणाऱ्या वस्तू, काळ्या धुराने माखलेल्या भिंती, जमिनीवरही स्फोटाच्या खुणा, आगीने होरपळलेल्या विटा, जमीन वगैरे इतस्तत: पडलेले दगड, लाकडे...

त्याच्या पुढच्या दालनामध्ये व्यंगचित्रे प्रदर्शित केली होती. नेहमीप्रमाणे छान पण फ्रेंच भाषेतील. इंग्रजी भाषेतील फारच कमी व्यंगचित्रे प्रदर्शित केली होती.

यावेळी माझी राहण्याची सोय एका शेतकऱ्याच्या घरी करण्यात आली होती. पण शेतकरी होता हे मला त्याने सांगितल्यावर कळले. कारण त्याचे कपडेही तसेच होते- जीन्स-टी शर्ट, बूट, कमरेला फॅन्सी पट्टा. म्हणजे आपली

शेतकऱ्याची जी प्रतिमा असते तिला छेद देणारी प्रतिमा.

त्यांचे घरही टुमदार. आजुबाजूला भाज्या व फळे लावलेली होती. मला त्या सर्वांची माहिती त्याच्या बायकोने दिली. शेतीचेही काम ते वेळेप्रमाणेच करतात. सहा वाजता काम बंद असे तो म्हणत होता.

फ्रेंच लोक आदरातिथ्य चांगले करतात. इंग्रजी थोडेफार या दोघांनाही येत होते.

दुसऱ्या दिवशी प्रदर्शनाच्या ठिकाणी गेल्यावर मनोरंजनाचे इतर कार्यक्रम सुरू होते. त्याच वेळी मी माझ्या दुसऱ्या पुस्तकाचे प्रकाशन सलोन इंटरनॅशनलच्या अध्यक्षांचे हस्ते झाले. पुस्तकाचे नाव 'बॉडीलाइन.'

प्रकाशन झाल्यानंतर ते पुस्तक मी त्या ठिकाणी जमलेल्या लोकांना भेट म्हणून देत होतो. पण एक व्यक्ती मला पैसे किती म्हणून फ्रेंचमध्ये विचारत होती, मला समजत नव्हते. माझ्याबरोबर असलेल्या इस्रायली व्यंगचित्रकाराने त्याला ते फुकट आहे हे सांगितल्यावर ती व्यक्ती आश्चर्यचकित झाली. कारण त्या ठिकाणी अशा गोष्टी फुकट दिल्या जात नाहीत.

रात्री मोठ्या पंगतीमध्ये सर्वजण जेवायला बसले होते. वाइनचा बांध फुटलेला होता. मनसोक्त सेवन चालले होते. फक्त मी सोडून. यावेळी मी त्यांना पूर्वसूचना दिली होती. जेवणात बीफ माझ्या पुढ्यात आले नाही. एक भाजी व ब्रेड-भात मी खाल्ला. अशी धमाल पंगत सुरू असताना एक जादूगार आपली कलाकुसर-स्टंट करत होता, सर्वांच्या मध्ये उभा राहून, तलवार घेऊन ती तोंडामध्ये संपूर्ण घुसवत होता. अशा त्याने चार मोठ्या तलवारी तोंडामध्ये घुसवल्या आणि पुन्हा त्या सहजपणे बाहेर काढल्या. टाळ्यांच्या कडकडाटात व मस्त वाइन.

तिसऱ्या दिवशी कॅरिकेचर वा कार्टून चितारण्याचा कार्यक्रम. मी इतरांबरोबर कॅरिकेचर्स चितारू लागलो. बऱ्याच व्यंगचित्रकारांनी मला आश्चर्याचा धक्का दिला. त्या सर्वांनी माझे कॅरिकेचर काढले. ती सर्व मी जपून ठेवलीत. एकाने तर मला 'टायगर' बनवला. दुसऱ्याने माझी त्या ठिकाणची अवस्था दाखवली आहे.

इस्रायली व्यंगचित्रकाराने, कार्ल मार्क्ससारखी दाढी, लांब केस, टक्कल थोडेसे, जॅकेट व पॅन्ट घातलेली व्यक्ती. त्याला नेहमीच्या पद्धतीने कॅरिकेचर्स काढलेली आवडत नाहीत. गिरबटून (doodling) एकदा पेन पेपरला लावले, की ते कॅरिकेचर पूर्ण होईपर्यंत पेन न उचलता कॅरिकेचर कसे काढावे हे दाखवले.

शेवटच्या दिवशी व्यंगचित्रांसाठी कायमस्वरूपी असलेली गॅलरी पाहून घेतली. भव्य इमारत आहे. दिग्गजांची व्यंगचित्रे प्रदर्शित केली आहेत. बक्षीस समारंभ झाल्यावर सर्व परतीच्या वाटेला लागलो. माझ्या दोन बॅगा होत्या. सर्व घेऊन त्या फ्रेंच दांपत्याला धन्यवाद देत मी सर्वांबरोबर पॅरिसच्या वाटेला लागलो.

रात्री ट्रेन पॅरिसच्या रेल्वेस्टेशनवर पोचली. एक दिवस थांबून मी रोमला जाणार होतो. यूथ हॉस्टेलवर जाण्यासाठी मेट्रो रेल्वेच्या जिन्यावरून जाणे मला महाकठीण होत होते. कारण हातात दोन बॅगा. धावपळ चालू होती. रिपब्लिक स्टेशनासाठी कोणत्या प्लॅटफॉर्मवर जायचे हे समजत नव्हते. आजुबाजूला माणसांची धावपळ चालू होती. कोणाला विचारावे... हा विचार सतत डोक्यात होता. धीर करून एका माणसाला विचारले. भाषेची समस्या आली. त्याला मी काय बोलतो ते कळत नव्हते. पुन्हा पुन्हा मी ते शब्द त्याला सांगत राहिलो त्यावेळी त्याची ट्यूब पेटली. त्याने मला खुणेनेच आपल्याबरोबर चालायची आज्ञा केली आणि अचानक माझ्या हातातील दुसरी बॅग आपल्या हातात घेऊन तो भरभर चालायला लागला! मला काही कळायच्या आधीच ह्या गोष्टी भराभर होत गेल्या.

तीन-चार जिने आम्ही चढउतार केले. शेवटी एका प्लॅटफॉर्मवर पोचलो. त्याने हातातील बॅग खाली ठेवली व खुणेनेच मला पलीकडच्या प्लॅटफॉर्मवर जाऊन समोरच्या दिशेने नं. ५च्या ट्रेनने जायला सांगितले आणि बाय करून तो पाठमोरा होऊन गर्दीत दिसेनासा झाला. काही मिनिटांत हे सर्व घडले. मी विचार करत राहिलो. कोण कोणाचा, ओळखदेख नाही, हातातून बॅग घेतो काय आणि... सर्वच अचंबित करणारे.

मी समोरच्या प्लॅटफॉर्मवर गेलो. ट्रेन आली आणि ईप्सित स्थळी पोचलो. सकाळी नाश्ता वगैरे झाल्यावर थोडासा फेरफटका मारावयास बाहेर पडलो. थोडेसे अंतर चालल्यावर एक छोटेसे ग्राउंड होते. आतमध्ये सफेद रेती होती आणि त्यामध्ये काही मोठे ज्येष्ठ लोक गोट्यांसारखे मोठे बॉल घेऊन खेळत होते. मला आश्चर्य वाटले. आपण गोट्यांनी खेळतो तसेच काहीतरी खेळत होते. मी उत्सुकतेने पाहत राहिलो. त्याला म्हणतात 'बॉल्स' वा 'पॅटेन्क' गेम म्हणतात. ते बॉल्स स्टीलचे असतात. हा खेळ अतिशय प्रसिद्ध आहे. फ्रान्समध्येही व जगातही सर्वसाधारणपणे हा खेळ बागेत खेळला जातो वा इतर मोकळ्या जागेत खेळता येतो. बॉल्स टेनिस बॉल्सएवढे मोठे असतात.




संध्याकाळी मला इटलीला ट्रेनने जायचे होते. रोम पाहायचे होते. वातानुकूलित ट्रेनने प्रवास सुरू झाला. कंपार्टमेंटमध्ये माणसे तुरळकच. माझ्या कंपार्टमेंटमध्ये एक म्हातारे जोडपे व तीस-पस्तीशीचा तरुण होता. मी नवखाच. काहीही कळत नव्हते. माझ्यासमोर ती दोघे बसलेली. पुरुष कोट-पँट-हॅट व बाईने स्कर्ट, स्कार्फ, लांब हाताचे शर्टसारखा टॉप. जाडजूड बाई होती. दोघेही सत्तरच्या आसपास होती.

काही वेळाने ती त्या तरुणाला माझ्याकडे पाहून काहीतरी सांगत होती. ते इटालियन होते हे त्यांच्या भाषेवरून कळले. माझ्याशी कसा संवाद करावा हे त्यांना कळत नव्हते हे त्यांच्या हावभावांवरून समजत होते. रात्र होत होती. शेवटी त्या तरुणाने मला काही सांगण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला काहीही कळत नव्हते. शेवटी माझी ट्यूब पेटली. तो सांगत होता, तुझा खालचा बर्थ आहे तो त्या बाईला झोपण्यासाठी दे व तिचा जो वरचा बर्थ आहे त्या ठिकाणी तू झोप. पण मला ती कल्पना रुचत नव्हती. मी त्याला समजावण्याचा प्रयत्न करत होतो पण बाई तयार होत नव्हती. हे त्यांच्या एकंदर हावभावावरून दिसत होते. त्या तरुणाला सर, येस नो, अप-डाऊन असे काही मोजके इंग्रजी शब्द येत होते. परंतु त्या दोघांना अजिबात इंग्रजी येत नव्हते.

शेवटी मी तयार झालो. त्या तरुणाला आनंद झाला. तो वरच्या बर्थवर चढला. त्याने काही कपड्यांचा गुंडाळा होता तो सोडला आणि त्यामधून एक छानशी पांढरीशुभ्र उशी व पांघरण्यास पांढरीशुभ्र चादर बाहेर काढून माझ्यासाठी छानशी लावून दिली व मला वर जाण्यास सांगितले. खरे म्हणजे अशा प्रकारे उशी-चादर ठेवलेली असते हे मला माहीतच नव्हते. मनात त्याला मी धन्यवाद देत होतो व ती तिघेही माझ्यावर खूप खूष झाले.

ती दोघेही झोपले पण मी व तो तरुण काही गप्पा मारत होतो. मी त्याला भारताच्या गोष्टी सांगत होतो. तो काहीतरी सांगत असायचा, पण हा 'संवाद' खूप वेळ चालायचा. एकच शब्द तो मला अनेक वेळा सांगत असे. मग त्याला त्याचा अर्थ समजायचा. तो रोमचाच होता. माझ्याकडे रोममध्ये राहण्याची सोय नव्हती. म्हणून मी त्याला सांगितले. तो म्हणाला, तुला काही समस्या येणार नाही कारण स्टेशनच्या बाजूला बऱ्याच राहायच्या जागा (पेन्शॉयन) मिळतील. काही घाबरू नकोस. आम्ही सर्व झोपलो. रोमला ट्रेन सकाळी दहाला पोचणार होती. सकाळ झाल्यावर पुन्हा आम्ही गप्पांना सुरुवात केली. कारण मला सतत वाटायचे, की राहण्याची जागा मिळेल की नाही. पुन्हा त्याला मी आठवण करून दिली. तो म्हणाला, मी तुला जागा शोधून दिली असती पण मला ताबडतोब फॅक्टरीमध्ये जायचे आहे. पण तू घाबरू नकोस असा धीर देत होता. हा सर्व संवाद करताना अक्षरश: दमछाक होत होती. अर्धी भाषा व बराचसा खाणाखुणांनी संवाद आम्ही

केला. बरोबर दहाला ट्रेन रोमला पोचली. त्याने मला हाताने टाटा केला आणि तो मार्गस्थ झाला.

रोम रेल्वेस्टेशनच्या डाव्या बाजूला जुने रोम व उजव्या बाजूला नवे रोम शहर. मी माझा बाडबिस्तरा घेऊन टूरिस्ट स्टॉलवर राहण्याच्या जागेसाठी चौकशी करू लागलो. परंतु जागा मिळत नव्हती. यूथ हॉस्टेलसंबंधी चौकशी केली तर ते खूपच दूर होते. मला एकाने नवीन रोममध्ये जायला सांगितले. मी चालायला लागलो. कोणी सांगेल तसे मी त्या लॉजवर जायचो व चौकशी करायचो, पण सगळीकडे 'जागा नाही' हेच शब्द ऐकायला यायचे.

असाच एका काउंटरवर उभा होतो. त्या बाई मला सांगत होत्या, दुसरी जागा मी पाहते. त्याच ठिकाणी एक म्हातारे गृहस्थ. तरतरीत लांब नाक, गोरापान चेहरा, पी कॅप, गुडघ्याच्या खालपर्यंत लांब असलेला कोट, पँट आणि बूट, हातात काठी – त्यांनी माझी अवस्था पाहिली आणि म्हणाले, माझ्याबरोबर चल. मी तुला जागा दाखवतो. आम्ही त्या हॉटेलच्या खाली उतरलो आणि चालतच दोन हॉटेल्स पाहिली, पण तिथेही 'नन्ना'चाच पाढा!

खरेच त्या गृहस्थाचे मला खूप कौतुक वाटले. एवढे वय असूनही परक्याला मदत करायची त्यांची जाणीव बघून मनातल्या मनात मी त्यांना सलाम केला. मी पुढच्या हॉटेलमध्ये गेलो. त्या ठिकाणी काउंटरवर एक स्त्री होती. मला म्हणाली, जागा आहे. थोडी महाग आहे. आताच बुक करशील तर देते. पण माझ्या बजेटच्या बाहेर होता मामला. मी तिला यूथ हॉस्टेलबद्दल विचारले कारण ते स्वस्त असते. तिने मला कसे जायचे ते सांगितले. मी तिला म्हणालो, तिकडे नाही मिळाले तर तुझ्याकडे मी येईन.

यूथ हॉस्टेलकडे जाण्यासाठी ट्रेन व नंतर बसचा प्रवास करावा लागणार होता. तरी मी ट्रेनच्या स्टेशनवर गेलो. वर-खाली जिने चढताना दोन्ही हातांमध्ये जड बॅगा घेऊन मी घायकुतीस आलो. वाटले एक बॅग फेकून द्यावी! ट्रेन आली. गच्च भरलेली. आतमध्ये शिरायलाही जागा नाही. मुंबईची विरार ट्रेन वाटली. तसाच उभा राहिलो. दुसऱ्या ट्रेनच्या आगमनाची वाट पाहत. पुन्हा तोच प्रकार. बॅगा घेऊन चढणार कसा?



त्या बाईची आठवण झाली. दोन्ही बॅगा उचलल्या आणि पुन्हा त्या हॉटेलवर हजर झालो. बाई म्हणाल्या, आता जागा बुक झाली. जागा नाही. मी एकदम थंड झालो. मी तिची गयावया करू लागलो. काहीही कर पण मला जागा मिळवून दे.. पण नाही.. फक्त रडायचा बाकी होतो.. हताशपणे बॅगा घेतल्या आणि चालू लागलो.. पुन्हा पॅरिसला जायचे या विचाराने.. स्टेशनवर पुन्हा गेलो. पुन्हा एका काउंटरवर गेलो. त्याला सर्व कथन केले. तो म्हणाला, समोर लॉकर्स आहेत त्या ठिकाणी तुझे सामान ठेव व पलीकडे जुन्या रोममध्ये चौकशी कर. तिकडे नक्की जागा मिळेल.

लॉकरमध्ये बॅगा ठेवल्या व जुन्या रोममध्ये प्रवेश केला. हातात पाण्याची बाटली होती, पण पाणी संपलेले! दोन वाजले होते. असाच चालत पुढे गेलो. एक रस्त्यावर स्टॉल होता. सगळ्या वस्तू होत्या. आपल्या फूटपाथवर जसे स्टॉल असतात त्याप्रमाणेच. मला पाणी पाहिजे होते.

मी त्या स्टॉलवाल्याकडून पाण्याची बाटली घेतली आणि मला जागा शोधण्यासाठी मदत करण्याची विनंती केली. बोलण्यावरून तो आशियाई वाटला. इंग्रजी बोलत होता. मी त्याला सर्व कथन केले. तो बांगलादेशी होता. आम्ही जागेसंदर्भात चर्चा करत होतो. समोर एक व्यक्ती उभी येऊन राहिली. काळा तोकडा कोट, दाढी, पँट, बूट व बारीक काळे केस.

आमची चर्चा तो ऐकत होता. अरे भाई आप डॉलर फुकटमें क्यो डाल रहे हो. ये डॉलर खर्चा करना अपना काम नहीं है. अरे भाई, आप इनको बोलो मेरे साथ चलने और मेरे साथ रहने को. हम चार-पांच है, और ये एक...

हे ऐकल्यावर माझ्या काळजात धस्स झाले. मला कळेना, परदेशात अनोळखी माणूस कसा काय आपल्या घरी बोलावू शकतो. माझ्या मनात नानातऱ्हेचे वाईट विचार येऊ लागले. मी नाही म्हटले तरीही तो पटवून देऊ लागला, त्याच्याकडे मी का जावे ते...तो माणूसही बांगलादेशी मुस्लिम होता.



स्टॉलवाला मला तो चांगला माणूस आहे म्हणून सांगू लागला, पण मी तयार होत नव्हतो.

एवढ्यात सुटातला एक दुसरा तरुण तिथे आला व स्टॉलवाल्याने माझी समस्या त्याला सांगून त्याच्या हॉटेलमध्ये जागा असल्यास देण्यास सांगितली. नाहीतर दुसरी जागा पाहायला सांगितली.

आम्हा चारजणांची चर्चा चालू होती. पण तो गृहस्थ आपल्याकडेच बोलावू लागला. मी त्याला म्हटले, मी तुझ्याकडे येईन. जर कुठेही जागा नाही मिळाली तरच.. पण तू किती पैसे घेणार ते सांग. तो म्हणाला, आप जितने डॉलर हॉटेलमें देनेवाले हो, उतने मुझे दे दो.

मी त्याला दर दिवशी तीस डॉलर सांगितले. तो तयार होईना. म्हणाला, आप चार दिन रहनेवाले है तो मुझे सिर्फ ३० डॉलरही देना. पक्का....

मी त्या स्टॉलवाल्याचा सल्ला घेऊन त्या दोघांबरोबर जागा शोधण्यास सुरुवात केली. तीन ठिकाणी गेलो पण जागा मिळत नव्हती. शेवटी हॉटेलचा वेटर असलेली व्यक्ती म्हणाली, तू ये आदमी के साथ जाना, अच्छा है, घबराना नही. दो दिनमें मेरे हॉटेलमें जगा मिली तो मैं आपको मेरे हॉटेलमें बुलाउंगा... तरीही मी तयार नव्हतो. त्याला म्हटले, आणखी एक जागा पाहूया व तिथेही नाही मिळाली तर मी या व्यक्तीबरोबर जातो.

शेवटी तसेच झाले. तिकडेही जागा मिळाली नाही. माझ्यापाशी पर्याय नव्हता. त्या व्यक्तीबद्दल मला भरवसा वाटत नव्हता. मी साशंक होतो. नाइलाजाने मी त्याला 'येतो' म्हटले. वेटर बाय करून निघून गेला. मी आणि ती व्यक्ती त्याच्या घरी जायला चालू लागलो. त्याला आनंद झाला. त्याने माझी एक बॅग स्वत: घेतली व जवळच असलेल्या आपल्या बिल्डिंगच्या दरवाजासमोर येत म्हणाला, ये हमारा बिल्डिंग है... त्या व्यक्तीचे नाव 'आलम'.

जुने बांधकाम, उंच अशी तीन मजल्यांची इमारत. पिवळसर रंग, सर्वच इमारतींना मोठाल्या खिडक्या, छप्पर ४५ अशांची उतरण असलेले. छत्रीच्या उलट्या दांड्यासारखी छपरावर धुरांडी. दोघेही जिने चढून वर तिसऱ्या मजल्यावर गेलो. जिने जुनाट होते, खूप पायऱ्या असलेले. दमायला झाले आणि दरवाजाच्या समोर उभा राहून अभिमानाने आलम म्हणाला, ही माझी रूम!

दरवाजा उघडताच न सहन होणारा वास सर्वत्र दरवळत होता. कसेसेच होत होते, पण मी त्याला सांगू शकत नव्हतो. जुनाट असा बिछाना कॉटवर पसरलेला. तसे जास्त सामान नव्हते. खोलीमध्ये छोटासे किचन, त्यावर मोठे टोप ठेवलेले होते. ठरावीक भांडी. म्हणजे ज्या घरात पुरुषच राहतात अशा प्रकारच्या 'सुखसोयी' असलेले घर!

अगदी आपुलकीने घरात पाहुणा आल्यावर जे



आलमचे रेखाचित्र

आदरातिथ्य करतात त्याप्रमाणे आलम वागत होता. त्यांच्या चेहऱ्यावर एक वेगळेच समाधान दिसत होते. मी मात्र साशंकच!

हातपाय धुऊन घे. नंतर थोडे जेवण कर. थोडा वेळ आराम कर व नंतर पाचच्या दरम्यान आपण बाहेर फिरायला जाऊया - इति आलम.

एका मोठ्या टोपातून भरपूर भात व दुसऱ्या मोठ्या टोपात असलेले मटण वाढत म्हणाला, मटण खाते हो ना? मी म्हटले, कशाचे आहे? ते कारण मोठे तुकडे होते त्यात. नहीं. मेंढी का है. बकरी का... मी मान डोलावली. मोठे तुकडे बघून मला दुसराच संशय आला. बड्याचं तर नसेल ना? तो नाही म्हणाला. चार माणसे जेवतील एवढा भात व त्याच्याच बाजूला मटण वाढले. मासे पण होते. ते पाहून मला ते खावेसे वाटले नाही. हम बंगाली लोक भात और मच्छी हरदीन खाते है - आलम.

ती भरलेली थाळी पाहून मी कोड्यात पडलो. तो म्हणाला, जेवढे जमते तेवढे खा. मी थोडा वेळ बाहेर जाऊन येतो, तोपर्यंत तू आराम कर असे म्हणून आलम बाहेर गेला. पासपोर्ट, पैसे कसे व्यवस्थित ठेवूया या विवंचनेत मी त्या कॉटवर निद्रिस्त झालो. पाचच्या दरम्यान सूट घातलेला, सेंट मारून स्वच्छ अशा आलमने मला उठवले बाहेर जाण्यासाठी. मी त्याला पाहून आश्चर्यचकित झालो. एवढे त्याचे रूप बदलले होते. एक मोठा भाऊ गावाहून आलेल्या लहान भावाला जसे मुंबई दाखवण्यासाठी उत्साही असतो तशीच लगबग व एक प्रकारचे औत्सुक्य त्याच्या चेहऱ्यावर दिसत होते. मी कपडे करून सुटबुटातल्या आलमबरोबर 'कोलोझियम' पाहायला निघालो.

रोमच्या नंतरचे ते स्टेशन होते. त्याने दोन तिकिटे काढली. माझे मला दिले आणि म्हणाला, मी जसे सांगेन तसे वागायचे. माझ्या पाठोपाठ चालायचे.

स्टेशनच्या आतमध्ये जाण्यासाठी ते तिकीट दरवाजावर लावलेल्या मशीनमध्ये पंच करावयाचे. नाहीतर दरवाजा उघडत नाही. स्टीलच्या रॉडने सदर दरवाजा बंदिस्त केला होता. परंतु भिंत व त्याच्या अगदी बाजूला तो रॉड लावलेला होता. त्यामध्ये अर्ध्या-एक फुटाची गॅप होती. मला तो गुपचूप म्हणाला, 'ए, टिकट पंच करने का नही. उधर जो गॅप दिख रहा है उसमें से प्लॅटफॉर्मपर जाने का.'' मी घाबरलो. मी म्हटले जमणार नाही. तो त्याच्या भूमिकेवर (ठकाची भूमिका) ठाम होता. म्हणाला, मैं सात साल रोममें रहता हूं. ऐसाही करता हूं. घबरना नहीं. मेरे पीछे आना.

त्याला म्हणालो, अरे, मी पकडला गेलो तर माझी अब्रू जाईल. इथेच तुरुंगात राहावे लागेल. पण त्याने असा काही माझ्यावर कटाक्ष टाकला, की खाटीकखान्यात नेत असलेल्या बकरीप्रमाणे त्याच्यामागून चालू लागलो. त्याने इकडेतिकडे बघून कोणाची नजर आपल्याकडे नाही ना याची खात्री करून तो त्या 'गॅप'मधून माझ्यासहित आत प्लॅटफॉर्मवर एखाद्या सराईत माणसाप्रमाणे घुसला व ट्रेनची वाट पाहत प्लॅटफॉर्मवर उभा राहिला. ट्रेन तशी भरलेलीच होती. आम्ही ईप्सित स्टेशनवर उतरलो. आलमच्या चेहऱ्यावर आनंद व एक सहीसलामत सुटल्याचे समाधान एखाद्या लहान मुलाच्या तोंडावर दिसते तसेच त्याच्या तोंडावर दिसू लागले. एखादी लढाई जिंकल्यासारखे...

मैं बोला ना कुछ नहीं होता. अभी ये टिकट कल आप व्हॅटिकन सिटी देखने जाओगे तो बस के लिये यूज करना, मोठ्या भावाचा सल्ला! मी अजूनही या धक्क्यातून सावरलो नव्हतो. मी चिंचपोकळी ते व्हीटीचा प्रवासही कधी तिकिटाशिवाय केला नव्हता. पण परदेशात मी काय करत होतो याचा विचार करून माझा मलाच विश्वास वाटत नव्हता.

स्टेशनच्या काही अंतरावरच कोलोझियम वसलेले होते. छोट्या भावाप्रमाणे मी त्याच्याबरोबर चालत होतो. तो जेवढी माहिती देत होता तेवढी ऐकणे माझे काम.

त्याने मला अगोदरच सांगून टाकले होते. ये सब,

पेंटिंग्ज, व्हॅटिकन सिटी, बडे बडे आर्टिस्ट लोगों के आप जो नाम ले रहे हो वो हमें कुछ पता नहीं. आप बोलते है इसलिए समझमें आ रहा है. क्योंकि हमारा यहां जाना कभी हुआही नहीं. अपना काम भाजी बेचना. त्यामुळे कोलोझियमही त्याने आतमध्ये जाऊन कधी पाहिले नव्हते, हे समजून आले. 'कोलोझियम' ही गोलाकार उंच इमारत. रोमन पद्धतीचे बांधकाम, असंख्य खिडक्या, त्याच्यावर सुंदर अशा कमानी बांधलेल्या. अर्धवट तुटलेले हे नाट्यगृह, मध्ये गोलाकार मोकळी जागा. समोर भव्य रंगमंच, त्याच्यासमोर हजारो लोकांना बसण्यासाठी जमिनीपासून वर उंच होत गेलेला स्टेडियम, दगडी बांधकाम, राजा-राणी व त्यांचे सरदार वगैरेंना बसण्यासाठी स्पेशल अशी बाल्कनी. रंगमंचाच्या बाजूला मेकअप रूम्स. अतिशय कलात्मकतेने बांधलेले, पण सर्व मोडकळीस आलेले.

कोलोझियमचा अगदी अत्यानंदाने आलमने माझ्यासोबत फोटो काढून घेतले. पण दुर्दैवाने ते सर्व फोटो एक्स्पोज झाले नाहीत. माझ्या कॅमेऱ्यातून हे भारतात परत आल्यावर कळले. कारण अतिशय थंडीचा परिणाम कॅमेऱ्यावर झाला होता.

आलम एखाद्या झपाटलेल्या माणसासारखा माझ्याबरोबर चालत होता. 'फोन्टाना द ट्रेव्ही' हे रोममधले सुंदर कारंजे पाहण्यासाठी एका बारीकशा रस्त्याने आम्ही चालत होतो. नवीन इमारती होत्या. हे जे शिल्प- कारंजे आहे त्या ठिकाणी तीन रस्ते येऊन मिळतात. अतिभव्य असे हे शिल्प तीन-चार मजली इमारतीएवढे. अतिशय कलात्मकतेने तयार केलेल्या भव्य कमानी व त्यामध्ये नेपच्यून व समुद्रदेवता भव्य रथामध्ये. रथाला दोन घोडे, एक उधळलेला एक त्यामानाने शांत. बाजूला दोन अप्सरा, त्यांच्या हातामध्ये कलश व त्यामधून येणारे पाणी समोर बांधलेल्या जलाशयात पडत होते.

जलाशयात पाणी अगदी स्फटिकासारखे. त्याच्या तळाला असंख्य नाणी पडलेली दिसत होती. त्या जलाशयात नाणे टाकले, की पुन्हा तेथे यायची संधी मिळते असे मानले जाते. मी पण एक नाणे त्या पाण्यात टाकले. पुन्हा रोमला येण्याची संधी मिळेल या विचाराने. रात्र होत होती. शिल्प लख्ख प्रकाशाने न्हाऊन निघू लागले. समोर मी बसलो त्या पाण्याचे तुषार अंगावर झेलत.

खोलीवर आलो. पाच व्यक्ती होत्या. आमची नजरानजर झाली. ते माझ्याकडे आश्चर्याने पाहू लागले. तसे ते चौथ्या श्रेणीतील लोकांप्रमाणे वाटत होते. कारण सर्वजण फेरीवाले होते. आलमने सर्वांची ओळख करून दिली. मी किती मोठा चित्रकार आहे, फ्रान्सवरून कसा रोमला आलो हे त्यांना समजावले. त्यातील एक माणूस बुटका, शांत, जाडसर असा होता. तो त्यांचा आचारी होता. सर्व जेवण त्याने करायचे व बाकीच्यांनी धंदा करायचा. हे सर्व बांगलादेशी मुसलमान. एकजण कोथिंबीर, आले, लसूण विकायचा, तर दुसरा खोटे दागिने काठीच्या स्टँडवर लावून विकायचा. एक कपडे विकायचा तर एकजण नुसतीच लसूण घरोघरी नेऊन पोचवायचा.

रोममध्ये एक असे ठिकाण आहे, की सकाळी सहा ते दुपारी दोन या दरम्यान तिथे रस्त्यावर बाजार भरतो. आपल्याकडे जसा भेंडीबाजार भरतो तसा. दोनच्या नंतर तिथे काहीही मिळणार नाही. त्या ठिकाणी हे लोक विक्री करतात. पण हा बाजार आपल्याकडे जसे फेरीवाले बेकायदेशीरपणे माल विकतात तसाच प्रकार इथे असतो. पोलिसांची धाड पडली तर सगळ्यांची पळापळ होते.

आलम म्हणाला, काही वर्षांपूर्वी आम्हाला खूप मागणी



होती. आता बरेच फेरीवाले श्रीलंकेतून आलेत. त्यामुळे विक्री कमी होते व फायदाही कमी होतो. पुढे म्हणाला, घरोघरी पुदिना, लसूण यांची पॅकेट करून घेऊन जायचो. त्यावेळी रोमन बायका यांना त्यांच्या किमतीच्या डबल पैसे द्यायच्या. कारण हे गरीब म्हणून. पण आता ते कमी झाले. आलमचा चेहरा पडला.

भिंतीवर एक छोटेसे पेंटिंग होते. थोडे चांगले वाटले म्हणून मी विचारले, हे कोणी काढले? आलमने त्या आचाऱ्याकडे बोट दाखवले. मला खूप बरे वाटले. मी त्याची विचारपूस केली. तो म्हणाला, बांगलादेशमध्ये असताना मी पेंटिंग्ज करायचो पण तिथल्या कडव्या, धर्मांध, बुजुर्ग लोकांनी इस्लाममध्ये चित्र काढणे पाप आहे हे सांगितले. त्यावेळेपासून मी चित्र काढणे बंद केले. हे ऐकून मी अचंबित झालो. असाच अनुभव मला ज्यावेळी बिस्मिल्ला खान यांची सही त्यांच्या कॅरिकेचरवर घेण्यासाठी मी माझे पॅड त्यांच्यासमोर नेले तेव्हा आला होता. त्यावेळी, ''आमच्या धर्मामध्ये चित्रावर सही करणे वा स्वत:चे चित्र करणे अधार्मिक आहे. मी सही करणार नाही'' असे त्यांनी विनम्रपणे सांगितले होते.

माझ्याकडे असलेले काजूगर त्यांना दिले. सर्व एवढे खूष झाले, की काहीतरी अलौकिक मिळाले. थोड्या वेळाने आलमला त्याच्या बायकोचा फोन आला. आलम फोनवर बोलताना त्याच्या चेहऱ्यावर आनंदाच्या उकळ्या फुटू लागल्या आणि जोरात ओरडला, ''अरे, भाई हमको लडका हो गया.'' सर्व वातावरणात आनंदही आनंद. सर्व एकदम खूष.

थोड्या वेळाने मला म्हणाला, ''परभाकर आप मेरे लिये 'लकी' हो. मेरी तीन बेटीयाँ है. अभी लडका हो गया. चलो पार्टी करेंगे.'' अनेक वर्षे ज्याची तो आतुरतेने वाट पाहत होता ते मिळाल्याचे समाधान त्याच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. थोडे मासे आणि भात खाऊन सर्व झोपी गेले कारण पहाटे चार वाजल्यापासून ते धंद्याला निघत. चहा पिण्यासाठी म्हणून आलम सकाळीच एका कॉफी सेंटरवर घेऊन गेला. अगदी पॉश पण फूटपाथवरच होते. कॉफी मस्त होती. माझ्याकडील पैसे न घेताच त्याने स्वत: दिले. मला आवडले नाही. त्याने माझी समजूत घातली. ठरल्याप्रमाणे व्हॅटिकन सिटी पाहायला जायचे होते. आलमने मला कसे जायचे हे समजावले. काल आपण जे तिकीट वापरले नाही (पंच न करता ट्रेनने प्रवास केला) ते तिकीट आज तू बसमध्ये वापर. 'देखा पैसा कैसा बचाया!' हे सांगायला तो विसरला नाही. माझ्यासाठी जेवण तयार करून तो सकाळीच त्याच्या धंद्यासाठी निघून गेला. त्याने सांगितल्याप्रमाणे मी बसने व्हॅटिकन सिटीला पोचलो. समोरच 'सेंट पीटर्स बॅसिलिका'ची भव्य इमारत. एक अवाढव्य चौक. लाखभर माणसे मावतील एवढा. चारही बाजूंना दगडी खांबावर एकेक उत्कृष्ट डोळे दीपवून टाकणारी शिल्पे. आत चर्चमध्ये गेलो तिथेही मेरीची उत्कृष्ट मूर्ती. याच बॅसिलिकाच्या खिडकीतून पोप जनतेला संदेश देतो ठरावीक दिवशी आणि लाखो लोक कान टवकारून ते बोलणे ऐकत असतात.

याच व्हॅटिकन सिटीमध्ये बर्निनी व मायकेलअँन्जेलोची जगप्रसिद्ध पेंटिंग्ज व शिल्पे डोळ्यांची पारणे फेडतात. सदर बॅसिलिकाच्या उजव्या बाजूला एका काचेच्या बॉक्समध्ये उत्कृष्ट शिल्प ठेवले होते. ते पाहताच ते उघडे राहिले. पाय त्याच ठिकाणी थिजले. ते शिल्प म्हणजे मायकेलअँन्जेलोचे 'पीएता'. काही क्षणांपूर्वी प्राण गेलेल्या ख्रिस्ताचा देह मांडीवर घेऊन मेरी बसलेली आहे. ख्रिस्ताच्या चेहऱ्यावरील भाव आणि त्याची शरीरयष्टी पाहून वाटले ते जिवंतच आहे. खराखुरा मानवी देह समोर आहे असा भास झाला. मेरीची भावमुद्रा तर वर्णन करण्यापलीकडची. कसेतरी स्वत:ला सावरत 'सेंट पीटर्स चर्च' पाहायला गेलो. पाय वळले. मायकेलअँन्जेलोने आपले नाव कोणत्याही कलाकृतीवर लिहिले नाही. परंतु 'पीएता'वर स्वत:ची सही त्याने कोरली आहे.

'सेंट पीटर्स चर्च' म्हणजे संपूर्ण मायकेलअँन्जेलो. खूप मोठा हॉल. जगप्रसिद्ध चित्रे या ठिकाणी पाहायला मिळतात. धार्मिक विषयावर अनेक चित्रे मायकेलअँन्जेलोने येथे साकारली आहेत. चर्चच्या खांबावर, कमानीवर व छतावर असंख्य चित्रे पाहताना रोमांच व आश्चर्य - दोन्ही भाव सहज उमटतात. छतावरील चित्रे पाहताना श्वास थांबवून चित्रे पाहावी लागतात व सहज शब्द बाहेर पडतात- वाह!!

खूप इच्छा होती, ही सर्व ओरिजिनल चित्रे पाहण्याची. ती पूर्ण झाली. चर्चचा हॉल प्रवाशांनी भरलेला परंतु शांतता पसरलेली. कारण तोंड उघडायला शब्दच नसतात. प्रत्येक जण 'आ' करून सर्व अप्रतिम चित्रे डोळ्यांत साठवून घेत असतो. काहीजण फोटो काढण्यात गर्क, मोठे फ्लॅश वापरायला बंदी कारण त्यामुळे चित्रांच्या रंगावर परिणाम होतो. सर्व पेंटिंग्ज थ्री डायमेन्शनला वाटतात. त्यांचे हावभाव, सुडौल शरीर, मादक, सुंदर तरीही सात्त्विक अशी चित्रे, भरीव शरीरयष्टी, सर्वकाही प्रमाणबद्ध! कपड्यांची ठेवण, त्यावर पडलेल्या घड्या, चेहऱ्यावरचे भाव, रंगसंगती हे सर्व पाहताना मनामध्ये तरल भाव उमटतात. असे वाटते हे पाहणे थांबवूच नये. पण वेळ महत्त्वाचा... पुढे मला आणखी काही पाहायचे होते.

चर्चबाहेर पडलो. मन तृप्त झाले. आणखी काही पाहू नयेच असे वाटले पण कोणीतरी म्हणाले, चर्चच्या मागच्या बाजूला पोपची राहण्याची जागा आहे.

संपूर्ण चर्चला वळसा घालून त्या जागेचा शोध घेण्यासाठी एका बारीक बोळातून आत गेलो. बंदिस्त जागा. नीरव शांतता, फक्त गार्ड होते. मी पुढे जाण्याचा प्रयत्न करत होतो पण गार्डने खुणेनेच पुढे प्रवेश नाही याची जाणीव करून दिली. तो परिसर न्याहाळत परत मागे फिरलो, घरी येण्यासाठी. घरी आलम माझी वाट पाहत होता. त्याचे मित्रही घरी आले होते.

का कुणास ठाऊक, आलम थोडा धार्मिक विषयावर अचानक बोलायला लागला. तो इस्लाम म्हणजे काय, चालीरीती, धार्मिक गोष्टी, इस्लामची तत्त्वे, धर्मगुरू यांची मला माहिती देऊ लागला. माझ्या ते डोक्यावरून जात होते पण मी ऐकल्याचे ढोंग करत होतो. तो सहज म्हणाला, इस्लाममध्ये असे आहे, की जन्माला आल्यावर एकातरी माणसाचा धर्म बदलवून त्याला मुस्लिम करावे. त्याने अल्ला आपल्याला खूप आशीर्वाद देतो. हे खरे की खोटे आलमलाच माहीत!

थोड्या वेळाने तो मला म्हणाला, 'तुला तुझ्या बायकोशी (भारतामध्ये) बोलायचे आहे. अगदी कमी पैशांत तर तू दोन तासही बोलू शकतोस.' 'कसे शक्य आहे?' मी म्हटले. तो मला घेऊन खाली आला. रोम रेल्वेस्टेशनच्या बाजूला अनेक इमारती (जुन्या) आहेत. त्या ठिकाणी मला घेऊन गेला. अनेक बांगलादेशी त्या ठिकाणी जमलेले होते. संध्याकाळ झाली होती. काहीजणांच्या हातात कॉर्डलेस फोन होते व ते संभाषण करत होते. आलमने मला ते सर्व दाखवले व म्हणाला, साधारण दोनशे रुपये दिले की तू कितीही वेळ बोलू शकतोस तुझ्या पत्नीशी. मला ते सर्व अचंबित करणारे वाटले. तो म्हणाला, तो जो माणूस आहे ना तो इथला एजंट आहे. त्याने टेलिफोन एक्स्चेंजमधील माणसाला पटवलेले असते व त्याला त्याचा वाटा देतो. कारण हा सर्व चोरीचा मामला आहे. त्यामुळे हा व्यवहार गुपचूप होतो. त्याने मला माझ्या पत्नीशी बोलण्यासाठी फोन लावून दिला पण माझ्या दुर्दैवाने माझा फोन लागला नाही. त्यानंतर आलम मात्र आपल्या पत्नीशी भरपूर वेळ बोलत होता. मला मुंबईच्या टेलिफोनवाल्यांची आठवण झाली. म्हणजे रोममध्ये भारतही आहे!

मुलगा झाला म्हणून आलमला दुसऱ्या दिवशी मित्रांना पार्टी द्यायची होती. म्हणून खरेदीसाठी मलाही सोबत घेऊन गेला. पार्टीसाठी लागणाऱ्या वस्तू त्याने खरेदी केल्या. अचानक म्हणाला, मला थोडे उसने पैसे दे. मी नंतर तुला देतो. माझ्या मनात शंकेची पाल चुकचुकली. कारण अजूनही मी त्याच्यावर शंभर टक्के विश्वास ठेवला नव्हता... पण तरीही मी त्याला पैसे दिले. मी मटणबिर्याणी बनवणार आहे व तुझ्यासाठी ठेवून देतो. मला दुसऱ्या दिवशी फ्लोरेन्सला जाण्यासाठी म्हणून त्याने माझ्यासाठी मोठे व छोटेसे पाव खरेदी केले.

घरी आल्यावर फ्लोरेन्सला व त्यानंतर पीसाचा 'लिनिंग टॉवर'ला पाहायला कसे जायचे ते सांगितले. सकाळीच साधारण पाचच्या दरम्यान त्याने मला उठवले. ''ही दोन बैदा सॅन्डविच आहेत. एक दुपारी खायचे व दुसरे संध्याकाळी.'' एखाद्या लहान मुलाला आई जसे सहलीसाठी डबा करून देते त्याप्रमाणे त्याने मला सॅन्डविचेस करून दिली. ते सॅन्डविच नसून तो जेवणाचा डबा असल्याचा भास मला झाला. कारण अवाढव्य पाव, त्यामध्ये मोठे आम्लेट व टोमॅटो. शिवाय उकडलेल्या अंड्याचे तुकडे. एवढे त्याने सकाळीच उठून माझ्यासाठी बनवून ठेवले. मी अचंबितच झालो आणि त्याला काय बोलावे ते मला कळत नव्हते. आता मात्र मी त्याच्यावर शंभर टक्के विश्वास ठेवला. कारण तो फसवणारा नव्हताच.

मी ट्रेनने फ्लोरेन्सला पोचलो. त्या ठिकाणची म्युझियम्स मला पाहायची होती. 'मायकेलअॅन्जलो' व लिओनार्दो दा विंची' या दोन महान कलाकारांचे गाव. त्यांच्या मूळ कलाकृती इथे प्रदर्शित केल्या आहेत.

इटलीमध्ये ही सर्व पेंटिंग्ज व शिल्पे पाहताना एक लक्षात आले. या सर्व अजरामर कलाकृती धार्मिक विषयावर आधारित व धर्मप्रसारासाठी तयार केल्या गेल्या. फ्लोरेन्समध्ये अनेक महत्त्वाच्या शिल्पापैकी 'डेव्हिड' हे मायकेलअॅन्जेलोचे शिल्प. ते 'अॅकेडेमिया' गॅलरीत आहे. गॅलरीच्या चिंचोळ्या पॅसेजमध्ये प्रवेश करताच क्षणी मायकेलअॅन्जेलोच्या कलाविष्काराने मन न्हाऊन निघायला लागतं. अर्धवट तयार केलेली संगमरवरी दगडातून साकारलेली गुलामांची शिल्पे पाहावयास मिळतात. ती अर्धवट असली तरी त्यांची कमनीयता, चेहऱ्यावरील भाव, जणू ते गुलाम जिवंत आहेत असा भास होतो.

पुढे गेल्यावर गोलाकार उंच असे घुमट व त्यातून येणारा नैसर्गिक प्रकाश, घुमटाच्या अगदी मध्यावर छानशा चबुतऱ्यावर सतरा फूट उंच असलेले संगमरवरी 'डेव्हिड'चे शिल्प लक्ष वेधून घेते. ते पाहून आपण स्तब्धच होतो. त्याचे कुरळे केस, उंच उडणाऱ्या भुवया, चेहऱ्यावरील भाव,

कपाळावरील आठ्या, हातापायांचे स्नायू व शिरा, त्याची उभे राहण्याची ढब, नग्न असूनही अश्लील न वाटणारे शिल्प पाहून आपण संमोहित होतो. पुरुषदेहाचे संपूर्ण सर्वांगसुंदर रूप. तो जिवंत असल्याचा भास होतो. तो आपल्याबरोबर संवाद करतो आहे असे वाटते. कृत्रिम असूनही कुठेही कृत्रिमतेचा भासही होत नाही. केवळ अप्रतिम! पुढे गेल्यावर एक मोठा चौक पीएता देल्ला सिग्नोरिया कोबल स्टोन्सनी तयार केलेला. नाहीतर आपल्याकडील पेवर ब्लॉक्सनी तयार केलेले रस्ते!!

पोचलो. छोटेसे एक स्टॉलसारखे 'घरकुल' होते. बाहेरच्या बाजूला मोठ्या बोर्डवर इटालियन भाषेत तिकिटासंदर्भात माहिती दिलेली होती. अगदी तुरळकच माणसे – एखाद दुसरे. मला त्या बोर्डवर काय लिहिले आहे ते समजत नव्हते. म्हणून त्या तिकीट खिडकीवर बसलेल्या माणसाला ते काय लिहिले आहे व तिकीट कसे काढावे हे इंग्रजीमधून विचारले. बारीकसा, हॅट घातलेला, गाल खोलगट असलेला माणूस माझ्यावर जोरात खेकसला, 'नो इंग्लिश.'



या चौकाचा आकार गोलाकृती असून सभोवताली इमारती व चारही बाजूला रस्ते बाहेर जाताना आपापली वाट शोधायला. या चौकात वेगवेगळ्या शिल्पकारांची अनेक शिल्पे कलारसिकांची वाट पाहत उभी असल्यासारखे वाटत होते, तर काही शिल्पे भिंतीवर. अनेक लोक शिल्पे न्याहाळत, कोणी त्याच्या पायाशी बसलेले तर कोणी फोटो काढण्यात मग्न असलेले. सर्व काही निःशब्द. कुठेही गोंगाट, गडबड काहीही नाही. प्रत्येक जण आपल्याच जगात..

आर्नो नदीच्या काठावर फ्लोरेन्सचे आकर्षण असलेले कॅथेड्रल आणि घंटा टॉवर उभे आहेत तेरा-चौदा शतकापासून. पिसाचा 'लिनिंग टॉवर' पाहण्यासाठी बसने जाणे गरजेचे होते. म्हणून मी स्टेशनच्या बाजूला असलेल्या बस तिकीट खिडकीवर

मला काही कळत नव्हते. मी पार नर्व्हस झालो. परंतु काही मिनिटातच एक तरुण गृहस्थ तिथे आला. मी त्याला तिकिटासंदर्भात विचारले. पण तोही मला डावलून तडक निघून गेला. असाच मी संभ्रमित अवस्थेत असताना एक स्त्री छोट्या मुलाला घेऊन तिथे आली. मी घाबरतच तिकीट कसे काढावे हे विचारले. अगोदर निघून गेलेल्या बेजबाबदार माणसाप्रमाणे ती स्त्री नव्हती. तिने मला सर्व प्रक्रिया समजावून सांगितली व निघून गेली.

काउंटरवरच्या माणसाकडून मी तिकीट खरेदी केले व तो सुरुवातीस माझ्यावर का खेकसला याचा मी त्याला जाब विचारला आणि बसने 'पिसा टॉवर' पाहावयास निघालो. टॉवरच्या बाजूला उभे राहून फोटो काढून घेतले. पंचेचाळीस

अंशाचा कोन करून वाकलेला तो टॉवर. बाजूला हिरवळ व बागा. सफेद रंगाचा टॉवर पाहून धन्य झालो. डागडुजीचे काम चालू असल्याने मला टॉवरवर चढता आले नाही. परतीच्या प्रवासाला निघालो. पुन्हा फ्लोरेन्सच्या रेल्वेस्टेशनवर आलो. आलमने दिलेले सॅन्डविच मी थोडेसे खाल्ले. रात्री अकराच्या दरम्यान घरी आल्यावर आलमने, एखादी आई वा मोठी माणसे विचारतात त्याप्रमाणे माझ्या प्रवासाची व त्याने दिलेले सॅन्डविच खाल्ले की नाही, की उपाशी राहिलास या काळजीयुक्त भावनेने चौकशी केली. मीही सॅन्डविच खाल्ले असे सांगितले. तो खूष झाला आणि म्हणाला, पार्टी झाली. सर्वजण निघून गेले. तुझ्यासाठी बिर्याणी ठेवली आहे. भांड्यामध्ये बिर्याणी होती पण त्यामध्ये मटणाचा तुकडा अजिबात नव्हता. ''सर्व तुकडे मित्रांनी खाऊन टाकले.'' इति आलम!

जेवण झाल्यावर थोड्याशा गप्पा झाल्या. मला पण वाटले आपल्याकडून त्याला काहीतरी भेटवस्तू दिली पाहिजे. त्याच्याकडे कपडे खूप कमी होते, हे जाणवले. माझा नवीनच घेतलेला जीन-शर्ट होता. मला त्याला तो द्यावासा वाटला पण घेणार नाही असे वाटले म्हणून त्याला म्हणालो, ''आलम, हा शर्ट कोणाला तरी देऊन टाक. मला मोठा होतो.'' तो नको म्हणत होता पण मी त्याला तो घेण्यासाठी जबरदस्ती केली आणि काही खाण्याचे पदार्थ दिले.

दुसऱ्या दिवशी मला स्वित्झर्लंडला जायचे होते. मी त्याप्रमाणे तयारीला लागलो. सर्व मित्रांना त्याने ही बातमी दिली. रात्रीच सर्वांचा मी निरोप घेतला कारण मी उठायच्या अगोदर ते सर्वजण आपल्या धंद्यासाठी जात होते. फक्त एक माणूस सोडून.

सकाळीच मला आलम कॉफी शॉपमध्ये घेऊन गेला. जाण्यापूर्वी त्याला मी अट घातली, की आज मी कॉफीचे पैसे देणार तरच मी तुझ्याबरोबर कॉफी प्यायला येईन. तो तयार झाला. आम्ही कॉफी प्यायला बसलो. तो खूपच भावुक झाला. चार दिवस कसे गेले त्या व इतर आठवणींमध्ये रमून गेला. संध्याकाळ झाली. मी ट्रेनने 'झुरीच'ला निघणार होतो. सर्व आवराआवर झाली. त्याचे दोन सहकारीही लवकर आले. आलमच्या मनाची चलबिचल सुरू झाली तशीच माझीही. स्वत:चा भाऊ परदेशाला निघाला असे समजून आलम माझ्या वस्तूंची काळजी घेत होता. सर्व घेतले की नाही वगैरे वगैरे.

माझ्या दोन बॅगांपैकी एक बॅग स्वत: त्याने घेतली व उरलेले सामान मी घेतले. जड पावलांनी त्या तीन मजली इमारतीचे जिने आम्ही उतरू लागलो.

त्या रात्री पहिल्या दिवशी रेल्वेस्टेशनच्या बाजूला 'त्या' स्टॉलवाल्यासमक्ष झालेल्या ठरावाप्रमाणे मी त्याला चार दिवसांचे ३० डॉलर द्यावयास हात पुढे केला. आलमने ते डॉलर घ्यायला नकार दिला. मी घेण्यासाठी जबरदस्ती केली तरीही त्याने विनम्रपणे ते नाकारले आणि मला मिठी मारली.

आम्ही दोघेही बॅग घेऊन भावंडांप्रमाणे रेल्वेस्टेशनकडे चालू लागलो. एक हिंदू व दुसरा मुस्लिम. रात्री नऊची ट्रेन होती. अवधी होता ट्रेन सुटायला. युरोपमधील ट्रेन ऑन टाइम सुटतात. एकही मिनिट उशीर करत नाहीत. त्याच्या डोळ्यांत अश्रू येऊ लागले आणि माझ्याही. त्याने माझे कंपार्टमेंट दाखवले. कुठे बसायचे. बॅग स्वत: नीट सीटखाली लावली. बसायचे कसे हे सर्व स्वत: सूचना देऊन सांगत होता. इतर कोणी नव्हते त्या बर्थमध्ये. मी एकटाच होतो. काही वेळाने तीन-चार तरुण मुलांचा ग्रुप आला. अगदी मॉड मुलं-मुली. तो त्यांच्याजवळ गेला. त्याला इटालियन भाषा येत होती. त्याने माझ्याबद्दल त्यांना माहिती दिली आणि त्यांच्याशी माझी ओळख करून देऊन माझी काळजी घेण्यास सांगितले.

ट्रेन सुटायची वेळ झाली. आलम प्लॅटफॉर्मवर जड अंत:करणाने उभा होता. ट्रेनची चाकं फिरू लागली. आलम हात उंचावून साश्रू नयनांनी माझा शेवटचा निरोप घेत होता. त्या आलिशान ट्रेनच्या खिडकीतून मीही त्याला बाय-बाय करत होतो, हृदयातील हुंदका आवरून!

पैशाची देवाणघेवाण न करता, भावनांची-प्रेमाची देवाणघेवाण करत आम्ही दोघांनी एकमेकांचा निरोप घेतला.

स्वित्झर्लंडच्या दोन दिवसांच्या मुक्कामानंतर मी झुरीचमार्गे पॅरिस व पॅरिस-मुंबई अशा परतीच्या प्रवासाला निघालो.

मुंबईला आल्यावर मी प्रथम एक साडी-चोळी-लहान मुलाला कपडे असे पॅक करून आलमच्या गावी ढाक्याला त्याच्या बायकोला पाठवून दिले, एक कृतज्ञता म्हणून.

सदर पार्सल मिळाल्याचे व आभार मानून मला ढाक्याला यायचे निमंत्रण आलमच्या पत्नीने आदरपूर्वक बंगालीमधून पत्र लिहून दिले.

**प्रभाकर वाईरकर**
कावेरी, बी-४०५, वाकोला ब्रीज,
सांताक्रुझ (पूर्व), मुंबई-४०० ०५५
भ्रमणध्वनी : ९८२०५४३०८९

# राजकारणाच्या पलीकडचे

प्रवीण बर्दापूरकर

राजकारण्यांतील राजकारणापलीकडे असणाऱ्या माणसाबद्दल खूप काही सांगता येईल. त्यांच्यातला माणूस समजून घ्यायचा असेल तर मैत्रीच्या पातळीवर एकत्र यायला हवे. राजकारण्यांविषयीचे अनेक गैरसमज आपोआप दूर होतील.

**रा**जकारणी म्हटले की ते भ्रष्टाचारी, ऐश्वर्यसंपन्न जीवनशैली जगणारे, कायम राजकीय कपट आणि कारस्थानात आकंठ बुडालेले, खुनशी वृत्तीचे आणि महत्त्वाचे म्हणजे पूर्णपणे असंवेदनशील अशी प्रतिमा सध्या सार्वत्रिक आहे. त्यांची अशी प्रतिमा निर्माण होण्यात त्या राजकारण्यांचे वर्तन आणि व्यवहार जितके कारणीभूत आहेत त्याहीपेक्षा त्यातला मोठा वाटा मीडिया आणि हिंदीसह सर्वभाषक चित्रपटांचा आहे. वस्तुस्थिती पूर्णपणे अशी पूर्वीही नव्हती आणि आताही नाही. राजकारणापलीकडे जाऊन नीट जर ओळख करून घेतली तर माणुसकीचे झरे राजकारण्यांत मोठ्या प्रमाणात सापडतात, अनेक राजकारणी अतिशय उत्तम वाचक असतात, अनेकांना संगीताचा केवळ कानच असतो असे नाही, तर किमान सुश्राव्य गाता गळा असतो, अनेकजण मैत्रीच्या पातळीवर उमदे आणि दिलदार असतात, एक पती, वडील-काका-मामा-सासरे अशा विविध भूमिकांत अगदी आपल्यासारखीच ती हाडामांसाची माणसे असतात. त्यांना भावना असतात, त्यांचे डोळे आनंदाने आणि दु:खाने आपल्यासारखेच पाणावतात, मुला-मुलींसाठी त्यांचा जीव आपल्यासारखाच तुटतो... त्यातही महत्त्वाचे म्हणजे अनेक राजकारणी समाजाच्या सुखदु:खाविषयी, हालअपेष्टांविषयी अतिशय संवेदनशील असतात. राजकारण्यांचे हे असे राजकारणापलीकडचे असणारे माणूसपण नेहमीच दुर्लक्षित राहते.

लोकसत्ताची नागपूर आवृत्ती सुरू झाली तेव्हा मी शहरवृत्त विभागाचा प्रमुख होतो. तेव्हा दहावी आणि बारावीचे निकाल प्रकाशित करण्याची अहमहमिका वृत्तपत्रात असे. निकाल प्रकाशित करणे हे मोठे जिकिरीचे आणि वेळखाऊपणाचे काम असे. यापेक्षा काहीतरी वेगळे करायचे मी ठरवले. त्याप्रमाणे विशेष गुणवत्ता यादीत आलेल्या पहिल्या केवळ पाच विद्यार्थ्यांच्या, इतरांना मार्गदर्शनपर ठरतील अशा सविस्तर मुलाखती घेतानाच, चांगल्यापैकी मार्क मिळवूनही त्या गुणांच्या आधारे; हव्या त्या अभ्यासक्रमाला प्रवेश न मिळू शकणाऱ्या आणि खाजगी शिक्षणसंस्थेत प्रवेश घेण्याची आर्थिक क्षमता नसणाऱ्या

विद्यार्थ्यांच्या कोंडीला आम्ही प्रसिद्धी दिली. या मुलांच्या मुलाखती वाचल्यावर राज्यात दीर्घकाळ मंत्रीपद भूषवलेल्या, तेव्हा खासदार असणाऱ्या आणि महत्त्वाचे म्हणजे वैद्यक-अभियांत्रिकी-खाजगी शिक्षणसंस्थांचे सर्वेसर्वा असलेल्या दत्ता मेघे यांचा फोन आला. केवळ पैशांअभावी कुणाचे शिक्षण रेंगाळणे योग्य नाही, त्यांच्या शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी मी घेतो, असे दत्ता मेघे म्हणाले.

आम्ही अशा बारा-तेरा मुलांची कैफियत प्रकाशित केली होती. नागपूरला तेव्हा विशेष आणि गुन्हे शोध शाखेचे उपायुक्त सतीश माथुर होते. त्यांच्या सहकार्याने 'जेन्युईन' गरज असलेल्या विद्यार्थ्यांचा शोध आम्ही घेतला. त्यापैकी तिघे खरोखरच गरजवंत या निकषावर बसणारे होते. त्यापैकी एका विद्यार्थिनीला औषधशास्त्र विभागात तर उर्वरित दोघांपैकी एकाला पॉलिटेक्निक तर दुसऱ्याला इंजिनीअरिंगला प्रवेश हवा होता. एक दिवस ही सर्व माहिती दत्ता मेघे यांना देऊन त्या तिघांनाही मेघेंसमोर हजर केले. त्यांच्याशी बोलल्यावर मेघे स्वत: त्यांच्या शिक्षणसंस्थेच्या कार्यालयात आले. त्या तिघांकडूनही त्यांनी प्रवेशअर्ज भरून घेतले आणि माहितीपत्रक आणि प्रवेशअर्जाचेही शुल्क न घेता मॅनेजमेंट कोट्यात त्या तसेच तिघांचेही प्रवेश स्वत: समक्ष करून घेतले. त्या तिघांचेही शिक्षण पूर्ण होईपर्यंत दत्ता मेघे यांनी त्यांच्या शिक्षणाचा खर्च उचलण्याचा दिलेला शब्द अगदी बिनबोभाट पाळला. मेघेंचा उमदेपणा असा, की या दातृत्वाची बातमीही त्यांनी करू न देण्याचा आग्रह धरला, स्वप्रसिद्धी करून राजकारणासाठीही त्याचा कधीच उपयोग करून घेतला नाही.

दत्ता मेघे काय किंवा नितीन गडकरी काय माझ्या अनुभवातले हे दोन राजकीय नेते असे आहेत, की जे अडल्या-नाडल्याला मदत करण्यासाठी नेहमीच खिशात हात घालत असतात. दिवसभरातून अशा दोन-चार गरजूंना मदत केल्याशिवाय या दोघांच्याही घशाखाली घासच उतरत नाही जणू! इतका हा त्यांचा दैनंदिन शिरस्ता आहे.

अशी मदत करायला कोणाही मित्राने केलेला एखादा फोनही दत्ता मेघे आणि नितीन गडकरी यांना पुरेसा असतो. अशा या मदतीचे रूपांतर या दोघांनीही संस्थात्मक स्वरूपातून करावे असे मला नेहमीच वाटते आणि ते मी त्यांना वारंवार सुचवत असतो. ते दोघेही माझ्या या म्हणण्याकडे दुर्लक्ष करून एका हाताने केलेले दातृत्व दुसऱ्या हाताला न कळू देण्याचा शिरस्ता पाळत आहेत.

लोकसंग्रह, प्रशासनावरील पकड, या मातीचे प्रश्न माहीत असलेला असा शरद पवारांचा एक चेहरा तर, बेभरवशाचा राजकीय नेता असा त्यांचा दुसरा राजकीय चेहरा. प्रमोद महाजनांबद्दलही अशीच दुहेरी चेहऱ्याची प्रतिमा निर्माण झालेली होती. या दोघांमधला माणूस किती सहृदयी आहे याचा अनुभव एका पत्रकारमित्राच्या असाध्य आजाराच्या प्रसंगी आला. तसा हा पत्रकार मला वयाने बऱ्यापैकी धाकटा, पण लाघवी स्वभावाने त्याने केवळ मलाच नाही तर अनेकांना वयाचे अंतर मिटवून मित्र केलेले. ९६-९७ मधली ही घटना आहे. असाध्य आजाराने त्याला ग्रासले. पहिल्या काही महिन्यांतच साचलेली पुंजी औषधोपचारात केव्हा उडाली ते कळलेच नाही. त्याच्या मित्रांचेही आर्थिक स्रोत मर्यादित होते. काही पत्रकारांनी ही बाब शरद पवार आणि प्रमोद महाजन यांच्या कानावर घातली. या दोघांनीही पुढचे आठ-दहा महिने त्या पत्रकारमित्राच्या औषधोपचारासाठी सारी जबाबदारी एखाद्या व्रतासारखी पाळली. पवार यांनी आजअखेर तर प्रमोद महाजनांनी शेवटचा श्वास घेईपर्यंत या माणुसकीचा उच्चार केला नाही. माणूस म्हणून हे दोघेही अशा कितीतरी जणांच्या मदतीला, त्यांनी हाक न मारताही, धावून गेल्याचे अनेक प्रसंग मला माहीत आहेत.

आमची पिढी राजकीय-मंत्रालय रिपोर्टिंगच्या मुख्य प्रवाहातून बाहेर पडण्याच्या वयाची झाली त्या काळात अजित पवार, आर.आर. पाटील, जयंत पाटील अशा अनेकांचा उदय सुरू झालेला होता. सध्या उपमुख्यमंत्री असलेले अजित पवार यांच्या 'दादा' आणि 'टगे'गिरीचे अनेक किस्से चांगलेच गाजत आहेत. अजित पवारांमधल्या माणसाचा एक अनुभव गेल्याच वर्षी आला. अठराविश्वे दारिद्र्य आणि अत्यंत प्रतिकूल वातावरणात राहणाऱ्या चंद्रपूरजवळच्या दादाजी खोब्रागडे या शेतकऱ्याने तांदळाची एक नवी जात तयार केली. दादाजी खोब्रागडे अल्पशिक्षित आणि स्वभावाने भाबडा माणूस. हातातले एच.एम.टी. ब्रॅण्डचे घड्याळ बघून 'एचएमटी' हेच नाव तांदळाच्या नव्या जातीला देण्याइतका भाबडा! खोब्रागडेंच्या या शोधाची जगाने दखल घेतली. अपवाद फक्त महाराष्ट्र सरकारचा आणि महाराष्ट्रातल्या नतद्रष्ट कृषीविद्यापीठांचा... जगाने दखल घेतली तरी दादाजी खोब्रागडेच्या रोजीरोटीची भ्रांत कायमच राहिली. या संदर्भात पूर्वी अनेक वृत्तपत्रांनी भरभरून लिहिले, पण मायबाप सरकारला काही माणुसकीचा पाझर फुटला नाही. दादाजी खोब्रागडेंना दीडेक वर्षापूर्वी या संशोधनाबद्दल आणखी एक पुरस्कार मिळाला तेव्हा लोकसत्तात दादाजी खोब्रागडेची तीच 'दर्दभरी दास्तान्' प्रकाशित झाली. ती नेमकी अजित पवारांनी वाचली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गिरीश गांधी यांच्याकडे अजित पवारांनी चौकशी केली. गिरीश गांधी यांनी उपेक्षेचा तोच राग पुन्हा आळवला... यावेळी मात्र हा राग ऐकणारे

अजित पवार होते. त्यांनी चक्क लाखभर रुपयांनी दादाजी खोब्रागडेंची झोळी भरली. एवढेच नाही तर, उपजीविकेचा कायमचा स्रोत म्हणून राज्यसरकारच्या वतीने विशेष बाब म्हणून पाच एकर शेतजमीनही दादाजी खोब्रागडेंच्या नावे करून दिली. लाखभर रुपये आणि शेतीच्या मालकीची कागदपत्रे अजित पवार यांनी दादाजी खोब्रागडेंना त्यांच्या घरी जाऊन सुपूर्द केली! उल्लेखनीय म्हणजे या दातृत्वाच्या प्रयोगापासून अजित पवारांनी पत्रकारांना दूर ठेवले, त्यामुळे त्याचा फार गाजावाजा झाला नाही.

राज्याचे विद्यमान गृहमंत्री आर. आर. उपाख्य आबा पाटील यांचाही एक अनुभव असाच माणुसकीची अनुभूती देणारा आहे. लोकसत्ताच्या नागपूर आवृत्तीत आम्ही 'संडे स्पेशल' हे जरा हटके काम करणाऱ्या महिलांचा परिचय करून देणारे सदर चालवलं. ज्योती तिरपुडे, राखी चव्हाण आणि भक्ती सोमण या तीन सहकारी हे सदर चालवत. (अगदी महिलांपुरते नव्हे, मोहन अटाळकर, देवेन्द्र गावंडे आणि प्रशांत देशमुख या पुरुष सहकाऱ्यांनीही जरा हटके काम करणाऱ्या आणि प्रसिद्धीपासून वंचित असणाऱ्या काही पुरुषांविषयी या सदरासाठी लेखन केलं!) सण्डे स्पेशल कॉलम तुफान लोकप्रिय ठरला. कारण वेगळे काम करणारे हे सर्वजण प्रथमच प्रसिद्धीच्या झोतात आले. शिवाय, लेखनात ताजेपणा होता. साहजिकच वेगळे काम करणाऱ्या या काहीजणींना संवेदनशील वाचकांनी यथाशक्ती मदत केली. ज्योती घरडे अशांपैकीच एक. विपन्नावस्थेत आयुष्य जगणारी ही महिला निराधार आणि निराश्रित असलेल्या वृद्धांचा सांभाळ करते. त्यांना न्हाऊ-माखू घालण्यापासून राहण्या-खाण्यापर्यंत सर्व काही ज्योती घरडेच करते. त्यासाठी मिळेल त्या मार्गाने पैसे, वस्तू, धान्य जमा करते. कुणी अगदी पाच-पंचवीस रुपये दिले तरी कृतज्ञतेनी घेते आणि देणाऱ्याला दुवा देते. या निराधार, निराश्रित वृद्धांसाठी एका नाल्याच्या काठावर एक चंद्रमौळी शेड ज्योतीने उभारली आहे. तिचे काम स्तंभित करणारे आणि माणुसकीवरचा विश्वास वाढवणारे आहे. ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. श्रीकांत चोरघडे (ज्येष्ठ दिवंगत साहित्यिक वा. कृ. चोरघडे यांचे चिरंजीव) यांच्यामुळे ज्योती घरडेच्या कामाची माहिती आम्हाला मिळाली. ज्योती तिरपुडेनी ज्योती घरडेवर लिहिलेला मजकूर अनेकांप्रमाणेच गिरीश गांधी यांनी वाचला आणि आर. आर. पाटील यांना वाचायला दिला. आर. आर. खूपच प्रभावित झाले आणि त्यांनी चक्क त्यांच्या वैयक्तिक खात्यातून पन्नास हजार रुपयांचा धनादेश ज्योती घरडेला पाठवला. सगळे काही ठसठशीतपणे करणाऱ्या, पण कागदोपत्री काहीच अस्तित्व नसलेल्या ज्योती घरडेला तो धनादेश वटवून देण्यासाठी मग डॉ. चोरघडे आणि ज्योती तिरपुडेला बरीच धावाधाव करावी लागली. आबांची ही माणुसकी अर्थातच प्रसिद्धीविना राहिली. मंत्रालयाच्या प्रेसरूममध्ये 'प्रवचनकार' असा आबांचा उल्लेख करणाऱ्यांनी आबांनी उक्तीशिवाय केलेली माणुसकीची ही कृती लक्षात घेण्यासारखी आहे.

सध्या राजकारण्यांना 'अनपढ' आणि 'गवार' म्हणण्याचे दिवस आले आहेत. म्हणणारे जाहीररीत्या असे म्हणून असंस्कृतपणाचे प्रदर्शन करतात आणि लोकही त्या म्हणण्याला टाळ्या वाजवतात... प्रत्यक्षात काय स्थिती आहे? गेली ३६ वर्षे मी पत्रकारितेत आहे आणि दिवसेंदिवस राजकारणातील शिक्षणाचे प्रमाण वाढत चालले आहे; त्यांची सुसंस्कृतपणाची पातळी वाढते आहे, असा माझा अनुभव आहे.

आपल्या राज्याच्या विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांत आता अशिक्षित जवळजवळ कोणीच नाही. सदस्यांचे वाचन चांगले आहे. काँग्रेसचे शरद पवार, सुशीलकुमार शिंदे हे वाचनाची यशवंतराव चव्हाण यांची परंपरा पुढे चालवत आहेत असे आमच्या पिढीला, आम्ही जेव्हा पत्रकारितेत आलो तेव्हा आमचे सिनिअर्स सांगत असत. मधू दंडवते यांचेही मराठी-इंग्रजी वाचन खूप होते. मधू लिमये तर ग्रंथलुब्ध आणि अफाट सदरात मोडणारे व्यासंगी होते. तरुण वयात कशासाठी तरी एकदा बॅरिस्टर शेषराव वानखेडेंच्या केबिनमध्ये गेलो तर ते चक्क मृत्युंजय वाचत बसले होते. नानासाहेब कुंटे यांचा वैयक्तिक ग्रंथसंग्रह बघून तर छातीच दडपली होती. आदिवासींचा राजा अशी महाराष्ट्राने विश्वेश्वरराव यांची उपेक्षा केली पण या राजाचा ग्रंथसंग्रह आपल्या मनात असूया निर्माण करणारा होता. खासदार-आमदार राहिलेला हा राजकारणी एखाद्या सर्वसामान्य माणसासारखे साधेसुधे जगला. विश्वेश्वरराव यांच्यातला राजकारणापलीकडचा माणूस गारूड करणारा होता. साहित्यिक कलावंतांशी असणारी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची घसट मी व्यक्तिश: अनुभवली. मृणालताई गोरे, बबनराव ढाकणे, दत्ता पाटील, जॉर्ज फर्नांडिस, ग. प्र. प्रधान, सदानंद वर्दे, एन. डी. पाटील, प्रभाकर संझगिरी, मधू देवळेकर, अहिल्याताई रांगणेकर या राजकीय नेत्यांचेही वाचन अतिशय समृद्ध आणि सर्वभाषक होते. प्रमोद महाजन कॉलेजमध्ये असतानाही वेळ मिळाला की कथा, कादंबऱ्या वाचत बसल्याचे मी अनेकदा पाहिले आहे. तेव्हा मनोहर जोशी आणि सुधीर जोशी या मामा-

भाच्यांशी पुस्तकांवर चर्चा करताना बहर येत असे. सुधीर जोशींना अनेक कविता मुखोद्‌गत आहेत.

माझ्या ‘डायरी’ या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी केंद्रीय मंत्री असलेले सुशीलकुमार शिंदे आलेले होते. सुरुवातीच्या गप्पात डायरीच्या मनोगताचा उल्लेख करून सुशीलकुमार म्हणाले, ‘तुम्हालाही इतकं भोगावं लागलं हे माहीत नव्हतं.’ त्यावर ‘भोगण्याला जात-धर्म नसतो’, असे मी म्हणालो. का कोण जाणे सुशीलकुमार केवळ माझे मनोगत असलेल्या मजकुरावरच बोलणार असे वाटले. प्रत्यक्षात घडले वेगळेच. सुशीलकुमार पुस्तकावर अतिशय सुसंगत बोलले. त्यांची वाचनाची बिटविन द लाइन्स समज अनुभवताना मी थक्कच झालो. नंतर ‘क्लोजअप’ या माझ्या व्यक्तिचित्रसंग्रहावर सुशीलकुमार शिंदे यांनी पाच पानांचे पाठविलेले पत्र एक ऐवज आहे. राजकारण्यांविषयी आपल्या धारणा केवळ चुकीच्याच नाही तर बटबटीतही आहेत, याची साक्ष देणारे ते पत्र आहे. सुशीलकुमार शिंदे यांचे प्रत्येक वाचन असंच सखोल आहे आणि त्यांनी अशी सविस्तर पत्रे अनेक लेखकांना पाठवलेली आहेत.

‘क्लोज-अप’चा प्रकाशनसमारंभ औरंगाबादला झाला तेव्हा छगन भुजबळ आणि नितीन गडकरी यांची झालेली भाषणे म्हणजे एखाद्या दर्दी वाचनाचा अप्रतिम नमुना होती. दोघांच्याही भाषणात एकही बोजड शब्द नव्हता. समीक्षकी थाट नव्हता. एखादे वाचन कसे केले गेले आहे याची उत्तम साक्ष त्या दोघांच्या भाषणातून पटली. छगन भुजबळ यांचे पाठांतर पक्के आणि मोठा आवाका असणारे. अभिनय हाही त्यांच्यातला आणखी एक अराजकीय पैलू. ‘नटसम्राट’ सादर करताना भुजबळ अनुभवावे! ते ‘घर देता घर...’ सादर करताना डोळ्यांत टच्कन पाणी येतं आणि भुजबळांतला माणूस मनात दरवळत राहतो. नितीन गडकरींच्या वाचनाचा शौक तसा जुनाजाणता. त्यातही गडकरींचे प्रेम कवितांवर जास्त. अनेक कविता नितीन गडकरींना मुखोद्‌गत आहेत. काव्यगायन ऐकायला जायचा नितीन गडकरींचा सोस आपल्याला मत्सर वाटावा इतका मोठा आहे. भाजपचा राष्ट्रीय अध्यक्ष होण्यापूर्वी ‘राजकारण गेलं उडत’, असं म्हणत नितीन गडकरी काव्यशास्त्रविनोदात आकंठ बुडाल्याचे अनेकांनी अनेकदा अनेक ठिकाणी बघितलेले आहे. माझ्या पाहण्यातल्या सध्याच्या राजकारण्यांमध्ये शिवसेनेचे उद्धव ठाकरे आणि दिवाकर रावते यांचाही समावेश चांगल्या वाचकांत व्हायला हवा. छायाचित्रणाच्या छंदाव्यतिरिक्त मराठी साहित्य विश्वात काय घडते आहे, नवीन काय आले आहे, येणार आहे याचे ‘अपडेट’ उद्धव ठाकरेंकडे असतात. त्या-त्या शहरात गेल्यावर तिथल्या साहित्यिक-कलावंतांना त्यांच्या घरी जाऊन भेटण्याची उद्धव ठाकरेंची धडपड असते. दिवाकर रावतेंच्या बोलण्यातही येणारे संदर्भ त्यांच्या वाचनाचा आवाका स्पष्ट करणारे असतात. क्वचित एखाद्या शब्दाच्या अभिधेवर समोरच्या लेखक-पत्रकाराशी वाद घालण्यापर्यंत मजल गाठण्याइतका रावतेंचा वाचनाचा व्यासंग दांडगा आहे! प्रकाश जावडेकर, माधव भंडारी, विनोद तावडे या मंडळींचेही वाचन चौफेर आहे, कौतुक करावे असे आहे. राजकारणापलीकडे या सर्व राजकारण्यांचा असणारा वाचन-सुसंस्कृतपणा खरे तर कौतुकाचाच विषय ठरायला हवा.

राजकारणात संगीताचा कान असणारेही अनेकजण बघायला मिळाले. बॅरिस्टर शेषराव वानखेडे, राम मेघे, सुशीलकुमार शिंदे, नितीन गडकरी, निशिकांत जोशी प्रभृती राजकीय नेते केवळ कानसेनच नाहीत तर दर्दी म्हणण्याइतके तयारीचे. रणजित देशमुख तर चांगल्या गात्या गळ्याचे आहेत. केवळ खाजगी गप्पांच्या मैफलीतच नव्हे तर जाहीर व्यासपीठावरून सुश्राव्य गाण्याइतका रणजित देशमुखांचा गळा गाता आहे आणि ते मुक्तकंठाने हिंदी चित्रपटाची गाणी तल्लीन होऊन म्हणत असतात. खासदार विलास मुत्तेमवारही राजकारण संपले की गाता गळा मोकळा करतात.

दिग्विजय खानविलकर आणि रणजित देशमुख यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे हे दोघेही अतिशय तरबेज ड्रायव्हर आहेत. हे दोघेही कोणतीही कार इतक्या सफाईने रात्रीबेरात्रीही चालवतात की आपल्या पोटातले पाणीही हलत नाही. ड्रायव्हिंग करता करता हिंदी गाणी गुणगुणण्याची रणजित देशमुखांना सवय आहे. तर दिग्विजय खानविलकरांचे कार्सविषयक तांत्रिक ज्ञान तोंडात बोट घालायला लावणारे होतं.

राजकारण्यांतील राजकारणापलीकडे असणाऱ्या माणसाबद्दल खूप काही सांगता येईल. त्यांच्यातला माणूस समजून घ्यायचा असेल तर मैत्रीच्या पातळीवर एकत्र यायला हवे. राजकारण्यांविषयीचे अनेक गैरसमज आपोआप दूर होतील.

**प्रवीण बर्दापूरकर**
भ्रमणध्वनी : +९१ ९८२२०५५७९९
praveen_bardapurkar@hotmail.com
www.praveenbardapurkar.com

# जीना इसी का नाम है

**अरुण पुराणिक**

मायावी मोहनगरी, मुंबई!
प्राचीन ऐतिहासिक वैभव नसतानाही एकाच वेळी भिन्न प्रकृती, संस्कृतीच्या अठरापगड जातीधर्मांच्या लोकांना बरोबर घेऊन सुखनैव नांदणारे, व्यापार-उद्योगधंद्याचे धाडसी नेतृत्व करणारे, शेजारधर्म जोपासणारे, कलापारखी, सुसंस्कृत कष्टकऱ्यांचे, बुद्धिमंतांचे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मागाल ते देणारे, जागेपणी स्वप्नपूर्ती करणारे जगाच्या पाठीवरील एकमेव शहर!

कोणत्याही नैसर्गिक, मानवनिर्मित आपत्तींना धैर्याने, निधड्या छातीने तोंड देत, 'गाए चला जा, गाए चला जा, किसी दिन तेरा भी जमाना आएगा' अशा दुर्दम्य इच्छाशक्तीवर, 'वो सुबह कभी तो आएगी' या आशेवर आपले नीरस, बेचव, कष्टप्रद जीवन हसतमुखाने जगणारे येथील लोक!

काही वर्षांपूर्वी, शुक्रवारी पहाटेच्या अंधारात, चोरबाजारातील गल्ल्यांत जुनेपुराणे फोटो चाळताना मिळालेले, मुंबईतील वास्तववादी जीवनाचे यथार्थ दर्शन घडवणारे कुण्या अज्ञात फोटोग्राफरने काढलेले हे काही फोटो. मुंबईतील कष्टकरी जनतेची जीवनशैली, त्यामागे दडलेले तत्त्वज्ञान सहजपणे सांगून जातात. त्याची ही एक झलक...



मैं हू भारत की नार, लडने मरने को तैय्यार
मुझे समझो ना कमजोर लोगो समझो ना कमजोर...



न हंसो हम पे, जमाने के हैं ठुकराए हुए
दरबदर फिरते हैं तकदीर के बहकाए हुए...



बाजू, समझो इशारे, हॉर्न पुकारे
पम..पम..



कभी खुद पे कभी हालात पे रोना आया
किसलिए जीते है हम,
हम किसके लिए जीते है बार बार
ऐसे सवालात पे रोना आया...



साथी हाथ बढाना
एक अकेला थक जाएगा,
मिलकर बोज उठाना...



मुन्ना बडा प्यारा, अम्मी का दुलारा
कोई कहे चांद, कोई आँख का तारा...




तुझको पुकारे घर तेरा
आ अब लौट चले...



साथी न कोई मंझिल,
दीया है न कोई महफिल
चला मुझे लेके ऐ दिल,
अकेला कहां...



दुनिया में हम आए हैं तो जीना ही पडेगा
जीवन है अगर जहर ते पिना ही पडेगा...


मैत्रेय
प्रकाशन
आमची वैशिष्ट्यपूर्ण निर्मिती
वाचनसंस्कृतीला देते दर्जेदार मिती
www.maitreyaprakashan.com
पारथी हाऊस, ३ रा मजला, एम.जी. रोड, जैनमंदिरासमोर, बँक ऑफ इंडियाच्या वर, विलेपार्ले (पू.), मुंबई- ५७.
फोन- (०२२) २६१०१०१६, २६१५०३५८. Website : www.maitreyaprakashan.com



बचपन के दिन भी क्या दिन थे
उडते-फिरते तितली बन...



दुनियावालों से दूर, जलनेवालो से दूर
आ जा आ जा चले कही दूर कही दूर...



ए भाय, जरा देख  के चलो
आगे भी नही, पीछे भी और उपर भी...

**अरुण पुराणिक**
इ-१०३, महेश्वरीनगर,
एमआयडीसी, अंधेरी (पूर्व)
मुंबई-९३
vgpuranik@gmail.com

# शिवाजी पार्कच्या कट्ट्यावरून

**जयंत विठ्ठल कुळकर्णी**

हल्ली ज्याला कट्टा नाही असे कट्ट्याशिवाय असलेले सांस्कृतिक कट्टे सध्या मुंबई-पुण्यात अनेक झाले आहेत. शिवाजी पार्कला मात्र अशा कट्ट्याची अजिबातच जरुरी नाही. कारण, साऱ्या मुंबईचे हृदय व दादरचे भूषण असलेले खुद्द शिवाजी पार्क हेच सांस्कृतिक केंद्र समजले जाते. थोडक्यात, शिवाजी पार्क हा मुंबईचा आत्मा होता. त्या आठवणींची ही स्मरणमाला...

माझ्या ग्रामोफोनवर लावलेल्या काननदेवीच्या 'दुनिया, ये दुनिया, तूफान मेल...' या गाण्याचा वेग एव्हाना कमी झाला होता. ही जीवनरेल धकधक करत शिटी वाजवून अखेरच्या टप्प्यात येत होती. दुनियाभरचा प्रदीर्घ प्रवास करून दमून-थकून आलेली ही तूफान मेल म्हणजे, सुखदुःखांची एक अखंड यात्राच होय. आयुष्याच्या वाटेवर यात अनेक प्रवासी चढले, उतरले, भेटले, विखुरले व काही विसावले. अखेर शिल्लक राहिल्या त्या संस्मरणीय आठवणी. हे मंतरलेले क्षण होते. या रेकॉर्डची मागची बाजू 'ऐ चांद छुप न जाना....' लावण्यापूर्वीच, वीणाने (माझी पत्नी) आतून जोरात हाक मारली, 'म्हटलं, आज आपल्याला सेंट्रल पार्कमध्ये जायचंय ते लक्षात आहे ना...?' हा इशारा मला काफी होता. मी ती रेकॉर्ड अलगद बाजूला केली व तयारीला लागलो. हातात काठी घेऊन (हो, तब्येतीचा व वयाचा परिणाम) वेळ न दवडता काही क्षणांतच आम्ही भुयारी मार्गाने (सबवे) सेंट्रल पार्कचा रस्ता गाठला...

अमेरिकेतील सर्वात पहिले व भव्य असे न्यू यॉर्क येथील हे सेंट्रल पार्क अतिशय प्रेक्षणीय असून वर्षातील सर्व ऋतू येथे पाहणे व अनुभवणे भूषण समजले जाते. वसंतऋतूतील निरनिराळ्या पक्ष्यांचे आवाज, विविधरंगी फुलझाडे, तळ्यातील बदके, प्राणीसंग्रहालयातील प्राणी, स्वच्छ रस्ते, हिरवळ व विश्वातील सर्व जातीय प्रवासी-रहिवासींनी सदैव गजबजलेले, नेत्रसुख देणारे हे सेंट्रल पार्क. मला नेहमी वसंतऋतूचा बहर पाहिला, की महमद रफीच्या 'हर नया मौसम पुरानी याद लेकर आयेगा, जिंदगी भर गम जुदाई का मुझे तडपायेगा...' या दर्दभरी गाण्याची आठवण करून देतो. वीणाला ही आठवण सांगताच तिने पटकन तार छेडली, 'पुरे झाली ती पुरानी गाणी व त्या रडक्या आठवणी....' माझा आवाज बंद झाला होता. गुपचूप काठीचा आधार घेत, पायाखालची वाट मागे सारत पुढे सरसावलो. थोड्याच वेळात माझी दमछाक झाली. मी शिवाजी पार्कचा कट्टा शोधत होतो. हे वीणाने ओळखले व 'बसा इथं या बाकड्यावर विश्रांती

घेत, मी माझे पाय मोकळे करून येते...' असे म्हणत तिने काही काळापुरता तेथून पाय काढला. मी त्वरित जवळच्या बाकड्यावर विसावलो व त्वरित आठवणीतला शिवाजी पार्कचा कट्टा गाठला....

हल्ली ज्याला कट्टा नाही असे कट्ट्याशिवाय असलेले सांस्कृतिक कट्टे सध्या मुंबई-पुण्यात अनेक झाले आहेत. शिवाजी पार्कला मात्र अशा कट्ट्याची अजिबातच जरुरी नाही. कारण, साऱ्या मुंबईचे हृदय व दादरचे भूषण असलेले खुद्द शिवाजी पार्क हेच सांस्कृतिक केंद्र समजले जाते. शिवाजी पार्कचा इतिहासच जर थोडक्यात सांगायचा झाला तर, १९२५ साली सर्वसाधारण लोकांसाठी खुले केलेले हे सार्वजनिक क्रीडा मैदान अगदी सुरुवातीला माहीम पार्क म्हणून ओळखले जात असे. १९२७ मध्ये शिवाजी महाराजांच्या त्रिशतसांवत्सरिक स्मृतिदिनानिमित्ताने मुंबईच्या महानगरपालिकेने या मैदानाचे 'शिवाजी पार्क' असे जाहीरपणे नामकरण केले. या घटनेचा साक्षीदार संगमरवरी दगडावरचा शिलालेख, उद्यान गणेशमंदिरामागे कॅडेल रोडला लागून असलेल्या फूटपाथवर आहे. पुढे काँग्रेसच्या राज्यात म्हणून की काय, शिल्पकार पानसरे यांनी तयार केलेल्या नि:शस्त्र अशा शिवाजी महाराजांच्या भव्य, सुंदर पुतळ्याची स्थापना ६ नोव्हेंबर १९६६ रोजी झाली. हा पुतळा चित्रपती व्ही. शांताराम यांच्या कल्पनेनुसार बनवला गेला होता. खऱ्या अर्थाने त्यानंतर शिवाजी पार्कला ऐतिहासिक स्वरूप प्राप्त झाले.

१ मैलाचा परीघ व सुमारे २८ एकर क्षेत्रफळ असलेल्या या गोलाकार मैदानाला खरी शोभा सभोवतालच्या कट्ट्याने व आतून चालण्यासाठी असलेल्या पदपथामुळे आली. तसेच, मोडक इंजिनीयर यांच्या उत्कृष्ट शहररचनेमुळे शिवाजी पार्कच्या रेखीव परिसराला देखणे स्वरूप प्राप्त झाले. ह्या हिरव्यागार मैदानाला बाजूच्या वृक्षांनी सौंदर्य आले. 'यहाँ कदम कदमपर, भूली हुईसी याद आती है......' हे म्हणणे अगदी खरे आहे. सर्वप्रथम येथे जवाहरलाल नेहरूंचे भाषण झाले होते. प्रचंड जनसमुदाय जमला होता. याचवेळी प्रकाशभाई मोहाडीकरांनी सानेगुरुजी कथामालेचा शुभमुहूर्त केला व सामुदायिक प्रार्थना त्याचे प्रथम कार्यवाह राजा पाटील यांनी खणखणीत आवाजात म्हटली. या राजा पाटील यांनी पुढे राजा ट्रॅव्हलचा यशस्वी व्यवसाय सुरू केला.

याच पार्कमध्ये यानंतर लक्षात राहण्यासारखी भाषणे झालीत ती, यशवंतराव चव्हाण, लालबहादूर शास्त्री व आचार्य अत्रे यांची. तसेच, पांडुरंगशास्त्री आठवले यांची गीतास्वाध्याये व वाखाणण्यासारखी पाळली गेलेली स्वच्छता कुणीच विसरू शकणार नाही. त्याचप्रमाणे, शिवसेनेच्या सिंहगर्जना, राजकीय चळवळी, मिरवणुका, विविध कार्यक्रम, जलसे, बंगाल्यांचा नवरात्रोत्सव, शिखांच्या गुरुनानक जयंतीच्या जेवणावळी, आंबेडकर जन्मदिनाचे स्मरण, प्रजासत्ताक व महाराष्ट्र दिनाचे संस्मरणीय कार्यक्रम, मानवंदना यांनी शिवाजी पार्क गजबजून जायचे. शिवाय, युद्धाच्या वेळी लाखो मुलांकडून एकाच आवाजात समरगीते गाऊन घेणारे उत्साहमूर्ती, संगीतकार वसंत देसाई यांचे सामूहिक देशप्रेम अभिमानास्पद होते. त्याचप्रमाणे, शिवाजी पार्कातील गाजलेले प्रेक्षणीय क्रिकेटचे सामने म्हणजे सर्वांना मेजवानीच असायची. थोडक्यात, शिवाजी पार्क हा मुंबईचा आत्मा होता.

आठवणींची ही स्मरणमाला गुंफताना मला, 'फिर तुम्हारी याद आई ऐ सनम, ऐ सनम, हम न भुलेंगे तुम्हे अल्लाह कसम....' या रफी, मन्ना डे व सादत खानने गायलेल्या गाण्याची खास आठवण झाली. सुरुवात करायचीच झाली तर मी, समुद्राच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतच्या केळुस्कर रस्त्यावरील सर्व घरांची हजेरी घेईन. माझ्या स्मरणशक्तीची ही एक परीक्षाच होय. शेवटी प्रयत्नांती परमेश्वर...!

पार्क क्लबसमोरचे, समुद्रालगत केळुस्कर रोडवरचे सर्वप्रथम घर होते, समुद्र तरंग. येथे केरमानी नावाचे इराणी राहत. त्यांचा कन्स्ट्रक्शनचा धंदा होता. दादरच्या व्हिन्सेंट रोडचे बांधकाम त्यांनी केले होते. शिवाय, नानाचौक येथील प्रसिद्ध जयहिंद कोल्ड ड्रिंक हाउसशेजारी त्यांचे रेस्टॉरंटही होते. मला वाटते, सिनेनट प्रेमनाथ व नटी बीना रॉयही येथे राहत. त्यावेळी प्रेमनाथ पांढराशुभ्र पोषाख घालून शिवाजी पार्क जिमखान्यात क्रिकेटची प्रॅक्टिस करायला येत असे. याशिवाय केशवराव दाते, जयराज व सिनेसृष्टीतले इतरही प्रसिद्ध कलाकार जिमखान्यात पत्ते खेळायला येत असत.

या 'समुद्र तरंग'नंतरचे घर होते कांजी भवन व त्यापुढच्या घराचे नाव होते, सुंदर. मग होते केरमान. आता हे केरमान श्रॉफ हाउस झाले आहे. याच केरमानमध्ये आचार्य अत्रे व सिनेनिर्माते सदाशिव जे. रावकवी राहत. अत्रे नेहमी गॅलरीतल्या आरामखुर्चीत बसलेले दिसायचे. अत्रे म्हटले, की त्यांची धिप्पाड देहयष्टी, मराठा वृत्तपत्र, त्यातील वाचनीय अग्रलेख, शिवाजी पार्कवरील भाषणे, हंशा-टाळ्या, संयुक्त महाराष्ट्राच्या वेळी झालेल्या चळवळी-सभा व श्यामची आई कधीही विसरणे शक्य नाही. असे कुठलेही क्षेत्र नाही ज्याला अत्र्यांनी स्पर्श केला आणि त्याचे सोने झाले नाही. ते अष्टपैलूच होते. सध्या तेथे अत्र्यांची कन्या व कवयित्री शिरीष पै राहतात.

रावकवींना बघण्याचा कधी योग आला नाही. मात्र, एक आठवण येथे सांगण्यासारखी आहे. रावकवींच्या मुलांना वीणाचे वडील (माझे सासरे) इंग्रजी, गणित व सायन्स हे विषय शिकवायला त्यांच्या घरी जात असत. रावकवी म्हटले, की 'भाभी की चुडियाँ' व गानसम्राज्ञीच्या स्वरातील 'ज्योती कलश छलके' हे अजरामर गीत त्वरित ध्यानात आल्यावाचून राहत नाही. या चित्रपटाचे पटकथाकार असलेल्या रावकवींचे सामाजिक चित्रपटही उत्कृष्ट दर्जाचे होते. त्यानंतर भक्ती नावाचे घर होते. भक्तीनंतर होते, सुप्रसिद्ध संगीतकार, 'संडे के संडे'वाले म्हणजे सी. रामचंद्र यांचे साईसाऊली. अण्णा हे साईभक्त. हिंदी चित्रपटसृष्टीतला सुवर्णकाळ अण्णांच्या सर्वश्रेष्ठ संगीताने गाजला होता. योगायोगाने माझा अण्णांशी परिचय होता. काही वेळा मी अण्णांच्या घरी त्यांना भेटायला जात असे. शेवटच्या मजल्यावर ते राहत. टेबलावर व्हिस्कीची बाटली असायची. सर्व व्यवहार आनंदी व मोकळा असायचा. कुठेही भेदभाव नसे. शिवाजी पार्कला फिरताना अण्णांचा रुबाब बघण्यासारखा असायचा. पांढराशुभ्र अथवा थोडासा पिवळसर रंगाचा शार्क स्कीनचा सूट, हातात सिगारेट व सिगारेटचा डबा, काळ्या केसांतली थोडीशी पांढरी झालेली ती बट अण्णांच्या व्यक्तिमत्त्वात आणि सौंदर्यात अधिकच भर टाकत असे. पुढे माझा जेव्हा अधिक परिचय झाला तेव्हा अण्णा दर रविवारी आमच्या घरी त्यांच्या गाण्यातील कामानिमित्ताने अनेक वेळा येत असत हे मी माझे भाग्य समजतो. याच साईसाऊलीत तळमजल्यावर उज्ज्वला पिंपळखरे या लेखिका राहत. नंतर कॅडेल रोड होता.

कॅडेलरोडनंतर कोपऱ्यावरच्या घराचे नाव जिलकर हाउस होते. तेथे खाली बँक होती. आता एक उपाहारगृह आहे. येथे आमचे नातेवाईक कळके राहत. सुप्रसिद्ध हार्ट स्पेशालिस्ट व सायन हॉस्पिटलचे डीन डॉ. बी. आर. कळके हे या कुटुंबातले. आम्ही त्यांना बाळ म्हणायचो.

जिलकर हाऊसनंतर होते हरी कुंज. येथेही खाली एक उपाहारगृह आहे. थोडक्यात, खाण्याच्या धंद्याला कुठेही तोटा नाही. पुढे होते द्वारका कुंज. या घराचा रंग हिरवा होता. येथे ठाकरे नावाचे कुटुंब राहत असे. 'त्या' ठाकऱ्यांशी यांचा संबंध नसावा किंवा नव्हता. ह्या ठाकऱ्यांची पत्नी अभिनेत्री संध्याची बहीण होती. गच्चीवरून सकाळ-संध्याकाळ पतंग उडवण्याचा यांना शौक होता. मलाही तो होता म्हणून त्याचे विशेष. या द्वारका कुंजमध्ये तळमजल्यावर विनोदी लेखक व इंग्रजी कविता लिहिणारे वसंतराव देशमुख राहत. त्यापूर्वी ते आमच्या मोठ्या काकांच्या शेजारी रानडे रोडवरील कमला सदनमध्ये राहत असत. त्यांच्या राजगुरू ह्या अत्यंत हुशार मुलाने खूप नाव कमावले होते. तो कायदेपंडित होता व वयाच्या फारच लवकर वारला. मला आठवते, हा राजगुरू अगदी बालवयात, ग्रामोफोनवर रेकॉर्ड्स लावण्यापूर्वीच त्यातील गाणे कुठले आहे ते ओळखायचा. त्याच्याबद्दल माहितीसह फोटोही वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाला होता, असो. सर्व देशमुखमंडळी दिसायलाही सुंदर व रुबाबदार होती.

द्वारका सदननंतरचे घर होते दौलत विहार. या घरच्या प्रवेशाजवळ गणपतीची मूर्ती होती. यानंतर होते गोपिका कुंज. हेच गोपिका कुंज प्रथम सुमन निवास होते. सूरश्री केसरबाई केरकर यांचे हे शिवाजी पार्कातील दुसरे घर . त्यांच्या मुलीच्या नावाचे हे सुमन निवास. ह्या सुमन निवासमध्ये सिनेनिर्माते व विनोदी नट मास्टर विनायक कोल्हापूरहून राहायला आले होते. त्यावेळी त्यांच्यासह सर्व मंगेशकर भावंडेही तेथे काही काळ राहत होती. मला एक मजेशीर गोष्ट आठवली ती अशी.... आमच्या घरी त्यावेळी सुप्रसिद्ध साहित्यिक वि. स. खांडेकर राहायला आले होते. मा. विनायकांनी नुकताच 'छाया' नावाचा चित्रपट खांडेकरांच्या कादंबरीवर काढला होता. त्यासंबंधाने भाऊंचे (आम्ही खांडेकरांना भाऊ म्हणत) काही खाजगी काम मा. विनायकांकडे होते. म्हणून भाऊंनी एक चिठ्ठीवजा पत्र मा. विनायक यांच्या घरी देण्यासाठी माझ्या थोरल्या बहिणीला, इरावतीला जायला सांगितले. इरावती आनंदाने तेथे गेली व दार उघडताच एका अर्धी चड्डी-गंजीफ्रॉक घातलेल्या माणसाने ती चिठी घेतली. ती बघून त्यांनी इरावतीला बरे, तू जा म्हणून दारातच सांगितले. मात्र, इरावतीने त्या गृहस्थांना सांगितले, की भाऊंनी ते पत्र मा. विनायक यांनाच द्यायला खास विनंती केली आहे. त्यावर ते गृहस्थ म्हणाले, हो का? मीच तो मास्टर विनायक! आमची इरावती खजील होऊन घरी परतली. याच सुमन निवासचे पुढे शहा बिल्डिंग झाले व आता त्याचे नाव गोपिका कुंज आहे.

यानंतर लागोपाठ सारखी बांधलेली वागळ्यांची तीन घरे होती. गोपिका कुंजनंतर होते दीनानाथ गुरू भवन. येथे गच्चीवरच्या जागेत सूरश्री केसरबाई केरकर यांचा नातू व माझा मित्र, डॉ. अतुल काजी राहतो. अतुलचे उंच-धिप्पाड अष्टपैलू व्यक्तिमत्त्व वाखाणण्यासारखे होते. त्याला जुन्या हिंदी गाण्यांची आवड म्हणून माझा तो खास दोस्त. शिवाय, अतुलला पेंटिंग्ज जमवण्याचाही शौक होता. यामुळे त्याच्या घरी जणू एका प्रदर्शनीय दालनातच गेल्याचे सुख मिळायचे. मला त्याच्या स्मरणशक्तीचेही खुप कौतुक होते.

अतुलच्या घरानंतर होते, सदासुंदर नावाचे घर. या



न्यू यॉर्कच्या मॅनहॅटनमधील निसर्गरम्य असे अतिभव्य सेंट्रल पार्क



मैदानातील दुलक्षित होणाऱ्या महत्वाच्या सूचना



१५ जानेवारी १९६२ रोजी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या उपस्थितीत शिवाजी पार्कवर भव्य जनसमुदायासमोर महाराष्ट्र गीत गाताना लता मंगेशकर आणि संगीतकार वसंत देसाई

सदासुंदरमध्ये बेहरामजी नावाचे गृहस्थ राहत. त्यांच्याकडे कॉली जातीचा अतिशय सुंदर कुत्रा होता. त्याचे नाव प्रिन्स होते. नावाप्रमाणे तो राजकुमारच होता. सदैव त्याला गच्चीत मोकळा सोडलेला असायचा. त्यामुळे तो रस्त्यावरून जाणाऱ्यांना दिसायचा. हा कुत्रा एक आकर्षण होते. ह्या सदासुंदर पुढचे घर होते सावित्री सदन. मला वाटते, विद्या दामले येथे राहत असे. विल्सन कॉलेजमध्ये असताना अभिनेत्री शुभा खोटेबरोबर विद्याने सायकलच्या स्पर्धेत नाव कमावले होते. हीच विद्या पुढे विद्या लोखंडे झाली व आमच्या शेजारी राहायला आली. शिवाजी पार्कला जुने घर जमीनदोस्त करून त्यावर नव्याने घर बांधण्याची प्रथम सुरुवात, ह्या अत्यंत धडाडीच्या व कर्तबगार विद्या लोखंडेने केली, हे अभिमानास्पद होते.

पुढे होता सुंदर छोटेखानी बंगला, दादाजी निशांत नावाचा. रावत हे त्याचे मालक होते. सध्या माझा मित्र अशोक रावत तेथे राहतो. अशोक सध्या शिवाजी पार्कला, 'शांतता' व योग्य 'वळण' पुन्हा कसे आणता येईल या कार्यात मग्न असून इतरही उल्लेखनीय कार्यांत उमेदवारी करत आहे.

दादाजी निशांतच्या पुढचे, कोपऱ्यावरचे घर गायत्री नीलयम होते. येथे तळमजल्यावर रुईया कॉलेजचे प्रोफेसर, डॉ. जैन राहायचे. गांधीहत्येनंतर या प्रोफेसर जैन यांचे नाव तत्संबंधी माहीतगार म्हणून वर्तमानपत्रातून वाचायला मिळत असे. जैन यांच्याच जागी पुढे माझा मावसभाऊ राहायला आला. गायत्री नीलयम नंतर लगेच लेफ्टनंट दिलीप गुप्ते पथ होता. हा गुप्ते पथ थेट माहीमला सारस्वत कॉलनीकडे जाऊन मिळत असे.

गुप्ते पथानंतरचे कोपऱ्यावरचे घर होते लक्ष्मी निवास. हे घर मोठे असून या घरानंतर लगेचच असलेला दुसरा रस्ता हरी निवासकडे लेडी जेमशेटजी रस्त्याला मिळायचा. या लक्ष्मी निवासमध्ये माझे धाकटे काका राहत. त्यांच्या शेजारी सुप्रसिद्ध गायिका कांचनमाला बढे राहत. बकुळ बढे हे त्यांचे पती व कवी राजा बढे हे दीर होते. मुंबई आकाशवाणीवरचे 'हे फूल कधी वाहीन मी....' व 'शांत सागरी लहरी उठल्या...' ही कांचनमाला यांची अत्यंत श्रवणीय भावगीते त्यावेळी खूप गाजली होती. त्यांच्याकडे असलेला लायका नावाचा कॅमेरा व फेरोग्राफच्या टेपरेकॉर्डरचे मला आकर्षण होते.

ही यादोंकी तस्वीर रंगवताना, 'वो भूली दास्तां, लो फिर याद आ गयी....' अशी माझी अवस्था होत होती. आठवणींना उजाळा मिळणारे ब्रेन टॉनिकच ते! केळुस्कर रोडवर पुढे कोपऱ्यावरचे घर होते, सी व्ह्यू नावाचे. येथे खाली

ख्रिश्चन कुटुंब राहत असे. त्यांचा प्रेमी नावाचा मुलगा अतिशय प्रेमळ होता. शिवाजी पार्कचा हिरोच. नंतरचे घर प्रभात नावाचे होते. वर्दे हे मालक होते. खाली बाबुराव पां. इस्नगर हे वकील राहत. वर्दे यांचा अरुण हा उत्तम क्रिकेट खेळत असे. मी रुईयाला असताना अरुण आमच्या क्रिकेट टीमचा कप्तान होता. पुढे, अरुणही अमेरिकेत वास्तव्य करून होता. शिवाजी पार्क व क्रिकेटमुळे आमचा सदैव संपर्क होता. अरुणच्या अकाली निधनाची वार्ता धक्कादायक होती. वर्दे यांच्याकडे पांढऱ्यावर काळे ठिपके असलेला डॉलमेशन जातीचा सुंदर कुत्रा होता. अरुणची काकी ही सुप्रसिद्ध लेखिका डॉ. मोहिनी मोहन वर्दे. त्याही प्रभातमध्ये राहतात. शिवाय, अरुणचा मेव्हणा व क्रिकेटर विनोद करंडे हे दोघे उत्तम ओपनिंग बॉलर होते. ते एकमेकांचे खास दोस्तही होते. विनोद हाही प्रभातमध्ये राहतो.

'प्रभात'च्यासमोरच्या कट्ट्यावर त्यावेळी संध्याकाळी तेल मॉलिश करणारे बसायचे. बरेच खेळाडू त्यांचा कट्ट्यावरच विसावून उपयोग करत असत.

प्रभातनंतरचे घर होते पार्क व्ह्यू. येथे सावकार व देशमुख राहत. देशुखांची विद्या ही माझी मैत्रीण. तीही योगायोगाने न्यू यॉर्कला असते. मी प्रथम जेव्हा अमेरिकेत प्रवेश केला तेव्हा, विद्या व तिच्या पतीने– शशी गाडगीळने – माझे स्वागत केले होते. चार दिवस मी त्यांचेकडे न्यू यॉर्कला राहिलो होतो. माझा उत्तम पाहुणचार त्यांनी केला होता. दुनिया गोल आहे अथवा जग किती छोटे आहे याचे अजूनही प्रत्यय व अनुभव मला येताहेत. पार्क व्ह्यूनंतरच्या घराला नाव नव्हते. असण्याचे कारणही नव्हते. ते घर होते शिक्षणमहर्षी ती. दादासाहेब रेगे यांच्या प्राथमिक शाळेचे, बालमोहन विद्यामंदिर! ही पुण्यवान वास्तू, ४२ केळुस्कर रोड या पत्त्यावर आहे. या शाळेतच माझ्या शिक्षणाचा श्रीगणेशा झाला. दादांची सर्व फॅमिली येथे राहत होती. आता तेथे त्यांचा धाकटा मुलगा व माझा मित्र, महेश रेगे राहतो. रेगे यांच्याशिवाय येथे परांजपे व दाणीही राहत. मला आठवतेय, या परांजपे यांनी त्यावेळी शिवाजी पार्कात एक छोटासा शास्त्रीय प्रयोग म्हणून बॉम्बस्फोट केला होता. कदाचित, ही आठवण शिवाजी पार्क रहिवासीयांच्या अजूनही स्मरणात असावी.

या शाळेनंतरचा प्लॉट अनेक वर्षे रिकामा होता. तेथे फक्त झाडीझुडपे होती. मी लहानपणी माझ्या मित्रांसह तेथे देवपूजेसाठी लागणारी फुले वेचायला जात असे. तेथे जी लाजाळूची झाडे होती त्याचे मला खूप आकर्षण असायचे. पुढे त्या जागेत सत्करतार नावाचे नवे घर झाले.



**शिवाजी पार्क व मुंबईतील सर्वोत्तम क्रिकेट कोच अंकुश ऊर्फ अण्णा वैद्य आणि मी**



**शिवाजी पार्कच्या समुद्राजवळील रोमँटिक नारळीबाग**

**उद्यान गणेश मंदिरामागील फूटपाथवरचा, शिवाजी पार्कच्या घटनेचा शिलालेख**



त्यानंतर होते कमलाभुवन व पुढे कुसुम निवास. तेथे खाली गेहानी नावाचे सिंधी व्यापारी राहत. या गेहानींची सर्व मुले आमच्या बालमोहन शाळेत शिकायला होती. हे अतिशय परोपकारी व दानशूर होते. गेहानी यांनी आमच्या शाळेला प्रत्येक वर्गात धातूच्या शेकाडो बादल्या भेट म्हणून दिल्या होत्या. शिवाय, वेळोवेळी शाळेला आर्थिक मदतही केली होती. यांचा माणिक नावाचा मुलगा माझा वर्गमित्र होता. आश्चर्य म्हणजे, माणिक मला न्यू यॉर्कला अचानक रस्त्यात भेटला होता. तो माझ्यापूर्वीपासून न्यू यॉर्कला रहायला आला होता.

शांतिनिकेतननंतरचे घर, राधा कुंज. ह्याचे कुंटे हे मालक होते. कुंटे यांची मुलगी कल्याणी पुढे लग्नानंतर न्यू यॉर्कला आली व आमच्या अधिक परिचयाची झाली. याच राधाकुंजमध्ये सुप्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा यांचे नातू डॉ. त्रिविक्रम राहत. त्यांना भली मोठी पांढरीशुभ्र दाढी होती. शिवाय, त्यांच्याकडे विटकरी रंगाचा अतिशय मोठा परंतु विनम्र व शिस्त असलेला सुंदर कुत्रा होता. तो कधीही घराबाहेर दिसत नसे! तसेच, तेथे पुरंदरे व शेणई राहत. पुरंदरे यांचे अरुण व प्रकाश पोहण्यात नाव कमावून होते. शेणई यांचा अनिल हा माझा मित्र होता. आम्ही समवयस्क मित्रमंडळी त्याच्याकडे नॉट ॲट होम, बदाम सत्ती व गड्डा झब्बू हे पत्त्याचे खेळ खेळायला जात असू.

या राधा कुंजनंतरचे घर दीक्षित निवास होते. या दीक्षितांची दोन घरे होती. त्यांच्या पाठीमागच्या घराचे नाव दीक्षित ब्लॉक्स होते. राधा कुंज व दीक्षित निवास या दोन घरांची रचना एकसारखी होती. त्याचे आर्किटेक्ट मराठे–कुलकर्णी होते. मराठे हे दीक्षित ब्लॉक्समध्ये राहत. ह्या दीक्षितांचा स्वत:चा व्यवसाय होता. सुप्रसिद्ध अभिनेत्री माधुरी दीक्षित ही ह्या दीक्षितांची नात! माधुरीचे वडील शंकर हे ह्या दीक्षितांचा सर्वात थोरला मुलगा. माधुरीचा धाकटा काका शरद हा माझा मित्र. आम्ही त्याला शऱ्या म्हणायचो. तो सध्या तेथे राहतो. ह्या शरदसह आम्ही काही ठरावीक मित्र दीक्षितांच्या वाडीत दर रविवारी टेनिस बॉलने अंडरआर्म क्रिकेट खेळत असू. ते खेळण्याइतपत तेथे मोठी जागा होती. आम्ही खेळत असताना शेजारच्या राधा कुंजमधून मानसिक विकृतीचा एक गृहस्थ सोडा वॉटरच्या रिकाम्या बाटल्या आमच्या अंगावर फेकत असे. त्यामुळे त्या चुकवण्यासाठी आमच्यापैकी एकाचे लक्ष सतत त्या व्यक्तीकडे आलटूनपालटून असायचे. काही वर्षांनी तो त्रास थांबला. याच दीक्षित निवासमध्ये खाली सुप्रसिद्ध बॅडमिंटन खेळाडू प्रभाकर बोपर्डीकर व त्याची पत्नी वासंती एडेरी राहत. वासंतीसुद्धा उत्तम बॅडमिंटन खेळत. शिवाय, पटवर्धन, आठल्ये व विमानाच्या शिड्या बनवणारे, मॅस्वी कंपनीचे व्यावसायिक भागीदार कान्हेरेही तेथे राहत. लहानपणी मी याच दीक्षित निवासमध्ये रोज सकाळी प्राजक्ताची, सोन व कवठी चाफ्यांची फुले वेचायला जात असे. प्राजक्ताच्या पहाटे पडलेल्या सड्यांनी मन प्रसन्न होत असे.

या दीक्षित निवासनंतर कोपऱ्यावरचे घर होते मोहन निवास. येथे भारतातर्फे पूर्वी क्रिकेट खेळलेले ओपनिंग बॉलर, एस. आर. गोडांबे राहत. तसेच, क्रिकेटर राजा मनोहरही राहत असे. गोरे या घराचे मालक होते. नेहमी काँग्रेसतर्फे उमेदवारी करणारे निष्ठावंत कांतिलाल पारीखही येथे राहत. उमेदवारीच्या घोषणा व त्याच्या जाहिराती कायम त्यांच्या गॅलरीत लावलेल्या असायच्या. हे मोहन निवास आता सुप्रसिद्ध भक्तिगीत गायक अनुप जलोटा यांनी घेतले असून ते तेथे राहतात.

याच मोहन निवास व दीक्षित निवाससमोरील कट्ट्यावर आमचा मित्रमंडळींचा ग्रुप नेहमी संध्याकाळी बसत असे. एकमेकांना भेटणे व गप्पा ठोकणे हा मुख्य हेतू असे. जशा शाळेतील विद्यार्थ्यांच्या बसण्याच्या जागा निश्चित असायच्या, तशाच शिवाजी पार्कच्या कट्ट्यावर बसण्याचा प्रत्येक ग्रुपच्या जागा ठरावीक असायच्या. या मोहन निवासनंतर रस्ता होता. त्या रस्त्यावरच शिवाजी पार्कचे मुख्य प्रवेशद्वार होते. हा रस्ता सेनाभवनकडे न. चिं. केळकर रोडवरील राम गणेश गडकरी चौकाला मिळणारा होता. खांद्याला खांदा लावून असावीत अशी ही कट्ट्यासमोरची शानदार घरे होती. नंतर कोपऱ्यावरचे घर होते, डहाणूकरांचे शांती सदन. पुढे वालावलकर त्याचे मालक झाले. येथे तळ मजल्यावर व्ही. शांताराम यांचे बंधू, कॅमेरामन व्ही. अवधूत राहत. ते नेहमी पांढराशुभ्र पोशाख व डोक्यावर पनामा हॅट घालून असत. पुढे त्यांच्या साधना नावाच्या मुलीने तेथे स्वरूपा नावाचे ब्युटीपार्लर उघडले व शिवाजी पार्कच्या सौंदर्यात भर पडत गेली. या घरानंतर लागूनच एक गॅरेज होते. तेथे आता एक ज्योतिषी आपला व्यवसाय करतो म्हणे. या ज्योतिषाच्या जाहिराती दूरदर्शनवर असतात. यावरून शिवाजी पार्कचे भविष्य कुठल्या मार्गाने जात आहे त्याची कल्पना करणेच बरे.

शांतिनिकेतननंतर होते, इंदिरा को. ऑप. सोसायटीचे घर. येथे सुप्रसिद्ध कलाकार व अभिनेत्री कुसुम कुलकर्णी राहत. डॉ. पालकर व फोटोग्राफर वारीकही तेथे राहत. पुढे प्रभा विजय नावाचे घर होते. या प्रभा विजयमध्ये संगीतकार एस. के. पाल राहत. त्यांचा व तिमीर बारन यांनी स्वरबद्ध

केलेला, 'बादबान' हा सिनेमा खूप गाजला होता. त्यातील हेमंतकुमारचे, 'आया तूफान.....' व गीता दत्तचे, 'कैसे कोई जिये, जहर है जिंदगी, उठा तूफान वो....' ही श्रवणीय गाणी अजूनही कानात गुंजताहेत. त्या पाल यांनी इतर सिनेमांनाही अनेक उत्तम संगीतरचना केल्या होत्या. त्यांना जुळ्या मुली होत्या. येथे पहिल्या मजल्यावर पवार कुटुंब राहत होते. तेथे आता दादरचे प्रसिद्ध दंतवैद्य रमांकात राऊत यांचे चिरंजीव, डॉ. प्रताप राऊत राहायला आले आहेत. तोही निष्णात दंतवैद्य असून माझा मित्र आहे. शिवाजी पार्कची दाढदुखी त्यामुळे कमी होण्यास प्रताप बऱ्याच प्रमाणात कारणीभूत आहे. ह्या प्रतापचे काकाही प्रसिद्ध होते. त्यांचेच नाव मागच्या गल्लीला दिले आहे. डॉ. मधुकर ब. राऊत रोड. तेही समाजसेवक म्हणून नावाजलेले होते.

प्रभा विजयनंतर सरोज निवास नावाचे घर होते. येथे सुप्रसिद्ध क्रिकेटर मनोहर हर्डीकर राहत असे. त्याचप्रमाणे, क्रिकेटर गोरक्षही राहत होते. मनोहर हा माझा दूरचा नातेवाईक होता व बी. सी. ए. ला असताना माझा क्रिकेटचा कोचही होता. पुढे हे सरोज निवास रावते यांनी घेतले व त्याचे त्रिमूर्ती नामकरण केले. यानंतर साईप्रसाद नावाचे घर होते. हे, संगीतकार सी. रामचंद्र यांचे शिवाजी पार्कमधले दुसरे घर. येथे अण्णांची गच्चीवरच्या मजल्यावर, गाण्यांच्या रंगीत तालमी होत असत. या तालमी बहुतेक संध्याकाळी होत. त्यामुळे सर्व रसिकांचे कान तृप्त होत असत. खाली कट्ट्यावर बसून आम्हीही त्याचा आस्वाद घेत असू. असे म्हणतात की पूर्वी खालून ज्या वाजतगाजत शवयात्रा जायच्या, त्यातील काहींच्या तालावर अण्णांनी गाणीही स्वरबद्ध केली होती. अण्णांनी सर्व प्रकारचे संगीत देऊन रसिकांची मने जिंकली होती यात वाद नव्हता. पुढे अण्णांच्या त्या साईप्रसादाच्या जागी माझा शाळकरी मित्र महेश काळण अभ्यास करायला जात असे.

महेशची मावशी ही अण्णांची सौभाग्यवती बेन. मी सहज एकदा महेशला म्हटले, की मला त्या जागेत घेऊन जाशील का? मला जुनी गाणी जमवण्याचा छंद होता. त्याची त्याला माहिती होती. त्यामुळे महेशने मला आनंदाने तेथे नेले होते. आश्चर्य म्हणजे, त्या जागेत काहीही नव्हते. फक्त रेकॉर्ड्सच्या शेकडोंनी चळती कानाकोपऱ्यात ठेवलेल्या होत्या. मी त्या बघूनच सुखावलो होतो. निदान ती एकच दुर्मिळ आठवण त्या सुवर्णकाळातील वातावरण निर्माण करणारी होती. महेशला त्यात राम नव्हता. मी मात्र हात धुऊन घेतले. मला तो सर्व खजिनाच होता. त्यातील अनेक रत्ने माझ्या हाती लागली होती. अनेक वर्षे चोरबाजारात खेपा घालूनही मला काही गाणी ज्यांच्या रेकॉर्ड्स मिळाल्या नव्हत्या त्या मला साईप्रसादमध्ये मिळाल्या. ही साईंचीच कृपा होती म्हणायचे..!

यापुढे कोपऱ्यावर होते, प्रभात नावाचे घर. त्यानंतर लगेचच रस्ता होता. हा रस्ता सरळ रानडे रोड पश्चिमेला सेनापती बापट यांच्या पुतळ्याजवळ मिळत होता. 'हमको है प्यारी हमारी गलियां...' हे पारुल घोषचे 'बसंत'मधील गाणे खऱ्या अर्थाने शिवाजी पार्कच्या रहिवासीयांच्या रोमारोमात होते. पुढचे कोपऱ्यावरचे घर होते, दत्तस्मरण. येथे आमच्या शाळेत हिंदी शिकवणाऱ्या दांडेकरबाई राहत. त्यांचा प्रमोद हा माझा वर्गमित्र व माझ्याबरोबर क्रिकेटही खेळायचा. वानखेडे स्टेडियमचे शिल्पकार, आर्किटेक्ट शशी प्रभूही याच दत्तस्मरणमध्ये राहत. प्रभू-खानोलकर हे त्यांचे नाव. शशीचे थोरले बंधू सुधाकर हे नामांकित इंजिनीअर होते व त्यांचा मुक्काम लंडनला होता. 'माझं लंडन'च्या लेखिका डॉ. मीना प्रभू ह्या सुधाकरच्या पत्नी. या दत्तस्मरणनंतरचे घर होते दत्तप्रसाद. पुढे ते अनंत निवास झाले. अनंत निवासनंतर सीता सदन होते व त्यापुढे होते कृष्ण कुंज. येथे मार्मिकचे व्यंगचित्रकार व संगीतकार श्रीकांत ठाकरे राहत. आता तेथे त्यांचे पुत्र, मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे राहतात. यापुढे माखानवाल्याचा पांढराशुभ्र असा सुंदर बैठा बंगला होता. शिवाजी पार्कला जे तीन बैठे बंगले होते त्यातील हा एक बंगला.

या बंगल्यानंतर होते हायड्रॉलिक इंजिनीयर भिसे यांचे चंपक नावाचे घर. तेथे सावकार राहत होते. चंपकनंतर होते मधुबन. मधुबनमध्ये नागीन या सिनेमात काम केलेले एस. एल. पुरी हे नट राहत. त्यांनी अनेक चित्रपटांत कामे केली होती. तसेच, पद्मजा फेणाणी-जोगळेकर ह्या गायिकाही तेथे राहत होत्या. मधुबनच्या नंतर परिमल होते. या परिमलमध्ये सानेगुरुजीभक्त, नवबालोद्यान शाळेचे संस्थापक, समाजसेवक, सानेगुरुजी कथामालेचे प्रणेते, शिवाजी पार्कचे ज्येष्ठ नागरिक व सदा चिरतरुण, प्रकाशभाई मोहाडीकर राहत. अखेरपर्यंत ते 'खरा तो एकची धर्म, जगाला प्रेम अर्पावे...' ही भावना जपून होते. हे कौतुकास्पद व भूषणावह आहे...! न्यूयॉर्कला प्रकाशभाई व उषाताई आमच्या घरी येऊन गेले होते. त्याचा आम्हाला अभिमान वाटतो. आमच्या आई-अण्णांचे ते मानसपुत्र होते. त्यांचे खरे नाव लक्ष्मण होते. भूमिगत चळवळीत त्यांनी प्रकाश हे टोपण नाव धारण केले व अनुषंगाने ते पुढे प्रकाशभाईच राहिले.

काही वर्षांपूर्वी आमच्या अण्णांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आम्ही भावंडांनी, आमच्या शिवाजी पार्कच्या घराखाली अण्णांच्या स्मरणार्थ स्मृतिचिन्हाची स्थापना प्रकाशभाईंच्या हस्ते समारंभापूर्वक केली होती. 'सुप्रसिद्ध साहित्यिक व प्राध्यापक वि. ह. कुळकर्णी येथे राहत होते' अशी मराठी व इंग्रजीत फोटोसहीत ती पाटी अथवा तो blue plaque होता. या कार्यक्रमाला आमच्या शाळेचे माजी मुख्याध्यापक व आमचे मास्तर नाईकगुरुजी उपस्थित होते. शिवाय, कथाकथनसम्राज्ञी व लेखिका गिरीजा कीर, डॉ. विठ्ठल प्रभू, भाऊ मराठे, आप्पा जोशी व माझी थोरली बहीण लीला जावडेकर प्रामुख्याने उपस्थित होते. आमच्या अण्णांना मान देऊन शिवाजी पार्कचे अनेक शेजारी व इतर रहिवासीही तेथे प्रेमाने हजर होते. प्रकाशभाईंच्या शेजारी त्यांचे पुतणे व सचिन ट्रॅव्हल्सचे जकातदार राहतात. याच परिमलमध्ये वर सुप्रसिद्ध संगीतकार वसंत देसाई राहत. शिवाय, सिनेनिर्माते पी. एन. अरोराही राहत. अरोरा यांनी 'मेरा नाम चिन चिन चू....' म्हणणारी मादक सौंदर्याची हेलन हिला सर्वप्रथम सिनेमात आणली होती. ही हेलनही अरोरांबरोबर तेथे राहत असे. अरोरा यांचा मुलगा नेहमी परदेशी गाड्या जोरात फिरवून शिवाजी पार्कला तो वासुगिरी करायचा. दुर्दैवाने तो मोटार अपघातात निधन पावला. या परिमलनंतर होते देव कुंज. येथे खाली एक बँक होती व हे कोपऱ्यावरचे घर होते. आता ते घर सुप्रसिद्ध गायिका माणिक वर्मा यांच्या कन्या, अभिनेत्री वंदना गुप्ते यांनी घेतले असून त्या तेथे राहतात.

देव कुंजनंतर कॅडल रोड होता. कॅडल रोडनंतर कोपऱ्यावर पुढे पेट्रोल पंप होता. त्यानंतर केळुस्कर रोड वरचे शेवटचे व समुद्रालगतचे घर होते, ओशियाना अपार्टमेंट्स, येथे शिवसेनेचे मनोहर जोशी, सर्वात वरच्या मजल्यावर म्हणजे, पेटंहाउसमध्ये राहतात. तसेच, क्रिकेट अजित वाडेकरही येथे राहत. शिवाजी पार्कमधली ही ओशियाना बिल्डिंग त्यावेळी एकमेव सर्वात उंच वास्तू होती. शिवाजी पार्कच्या प्रदूषणाला या उंच घरापासूनच सुरुवात झाली असे म्हणणे वावगे ठरणार नाही. या ओशियाना अपार्टमेंट्ससमोरच समुद्राला लागून हिरवीगार व रम्य अशी नारळांच्या झाडांनी भरलेली सुंदर नारळीबाग होती. संध्याकाळी येथे प्रेमीयुगुले बसत. येथील एकांत, सौंदर्य व शांतता हे त्याला प्रमुख कारण होते. नारळी-बागेला लागून कॅडेल रोडवर बीएमसीचा क्लब होता. या क्लबचे कॅन्टिन पाठीमागे नारळीबागेला जोडून होते. त्यामुळे बहुतेककरून या नारळीबागेतील बसणारेच त्या कॅन्टिनचे गिऱ्हाईक असत. यानंतर वनिता समाज होता. शिवाजी पार्कच्या महिलांचे ते श्रद्धास्थानच! येथे होणारे विविध कार्यक्रम व बॅडमिंटनच्या स्पर्धा बघण्यासारख्या असायच्या. शिवाय, सर्व सणासुदीचे चविष्ट पदार्थ तेथील महिला उद्योगातर्फे मिळत असल्याने हा समाज सर्वांना प्रिय होता. माझी आई त्याची लाइफ मेंबर होती व हा समाज तिचा अत्यंत प्रिय होता. तेथील अनेक कार्यक्रमांत ती उत्साहाने व आनंदाने भाग घेत असे. दर शुक्रवारी तेथील बटाटेवडे न चुकता आमच्यासाठी खाऊ म्हणून घेऊन येत असे. शिवाय, या समाजाच्या उघड्या पटांगणांवरची शुभमंगल कार्ये व त्यांच्या रोषणाई संध्याकाळी शिवाजी पार्कात नेत्रसुख देणाऱ्या होत्या.

त्यापुढे महात्मा गांधी मेमोरियल ऑलिंपिक स्विमिंग पूल होता. येथेच मी पोहायला शिकलो होतो. पेंडसे नावाचे माझे मास्तर होते. सारंग बंधू त्यावेळी पोहण्यात तरबेज होते. त्या स्विमिंग पूलवर एक रेस्टॉरंट होते. पोहून झाल्यावर मी तेथे बैदा सँडविच व समोसा खायला न चुकता जात असे. त्याचे कारण, त्या रेस्टॉरंटचा मालक हा जुन्या गाण्यांचा शौकीन होता. विशेषत: तलत महमूदच्या सर्व रेकॉर्ड्स त्याच्याकडे होत्या व तो तलतचा अधिक फॅन होता. त्यामुळे तेथे गाणी ऐकणारीच रसिक मंडळी अधिक प्रमाणात बसलेली असायची. 'है ये वोही आसमां, और है वोही जमीं, पर मेरी तकदीर का अब वो जमाना नहीं....' हे तलतचे 'चार चांद'मधले गाणे, त्या समुद्राजवळच्या निसर्गमय वातावरणात भूतकाळात नेणारे होते.

या स्विमिंगपूलनंतर जो भाग होता तो रिकामा होता. काही वर्षे तेथे नुसती झाडी होती. येथेच आता स्वातंत्र्यवीर सावरकरांचे भव्य स्मारक झाले आहे. त्यामुळे, कॅडल रोडचे



**शिवाजी पार्क परिसराचे बदलले रूप**

नाव बदलून वीर सावरकर मार्ग ठेवण्यात आले. या सावरकर स्मारकानंतर एक छोटीशी गल्ली होती ती थेट कॅडल रोडपासून समुद्राला मिळणारी होती. त्यावेळी तेथे त्या गल्लीत अजिबात रहदारी नसायची म्हणून तिला भूतगल्ली म्हणून संबोधले जायचे. या भूतगल्लीनंतर एक आलिशान बंगला होता. तोही काही वर्षे निर्जन अवस्थेत होता. कुणीही तेथे राहत नसे. त्यामुळे त्या बंगल्याला भूतबंगला म्हणत. याच भूतबंगल्यातील बदामांच्या झाडाचे बदाम आम्ही अनेकदा खात असू. हा भूतबंगला आता, मुंबईच्या महापौरांचा-मेयरचा बंगला झाला आहे. हा मेयरचा बंगला मुंबईचा लँडमार्क म्हणून ओळखला जातो.

या बंगल्यानंतर केळुस्कर रोड जो थेट समुद्राला मिळतो त्यामागे समुद्राला लागूनच एक क्लब आहे. त्याचे नाव पार्क क्लब. हा पार्क क्लब शिवाजी पार्कच्या मध्यमवर्गीयांना परवडणारा नव्हता. म्हणून त्याला श्रीमंतांचा क्लब म्हणायचे. पत्ते व इतर खेळ खेळणे, हिरवळीवर मद्यपान करत बसणे व गप्पा मारणे हा बहुधा तेथील सभासदांचा नियमित कार्यक्रम असायचा. मात्र, या पार्क क्लबची जागा समुद्राला लागूनच असल्याने निसर्गाचा आस्वाद घेणारी मंडळीही तेथे बसलेली दिसत. माझे थोरले काका त्या क्लबमध्ये निवृत्तीनंतर अर्धवेळ काम करत असत. मला जुन्या गाण्यांसह इतर अनेक छंद होते. त्यात निरनिराळी रंगीबेरंगी चित्रे असलेले पत्तेही मी जमावत होतो. तेव्हा या पार्क क्लबमध्ये पत्ते खेळणारे, बऱ्याचदा खेळ खेळून झाल्यावर पत्त्याचे नवे जोड खेळायला घेत असत. ते सर्व पत्ते परदेशी व उत्तम दर्जाचे असत. टाकून दिलेल्या जुन्या पत्त्यांतील फक्त जोकर मला माझे काका घेऊन येत. त्यामुळे हा माझा पत्तेसंग्रह वाढत होता. तो माझा आनंदच होता. 'बचपन के दिन भूला न देना.....' असेच ते संस्मरणीय दिवस होते.

ही आठवणींची स्मरणमाला शिवाजी पार्कमधील म्हणजे पार्काच्या आत असलेल्या वास्तूंची दखल घेतल्याशिवाय पूर्ण होणार नाही. शिवाजी पार्कात कॅडेल रोडच्या कोपऱ्यावरच संगीतकार सी. रामचंद्र यांचे स्मारक आहे. अण्णा तेथेच समोर साईसाऊलीत राहत. त्यानंतर पांढराशुभ्र I.N.R.I. अक्षरातील ख्रिस्तावांचा मोठा क्रॉस आहे. तेथे मेणबत्ती अथवा दिवा सदैव तेवत असे. त्यावेळी शिवाजी पार्कच्या त्या भागात ख्रिश्चनांची मोठ्या प्रमाणात वस्ती होती. यामुळे शिवाजी पार्कमध्ये राहणाऱ्या काही सधन कुटुंबांत या ख्रिस्तावांच्या आया घरकामाला असत.

या क्रॉसनंतर लगेच पांढऱ्या रंगाचा भारतीय स्काऊट हॉल आहे. तेथे अनेक चांगले कार्यक्रम होत असत. स्काऊट हॉलनंतर बंगल्यांचा क्लब होता. तेथे पत्ते व क्रिकेट हे खेळ खेळले जात. विशेषकरून नवरात्रातील दुर्गामातेचा महोत्सव बघण्यासारखा असायचा. या क्लबनंतर कालिमातामंदिर व त्यानंतर उद्यान गणेशमंदिर आहे. भाविकांना तोटा नसल्याने याचे मोठे प्रस्थ आहे. याच उद्यान गणेशामागे फूटपाथवर शिवाजी पार्कच्या घटनेचा शिलालेख पाठ करून उभा आहे. कदाचित या मंदिरामुळे त्याकडे दुर्लक्ष होत असेल. श्रीगणेशच त्याचा पाठीराखा आहे म्हणून बरे. या शिलालेखावर, तीन महत्त्वाचे कार्यक्रम शिवाजी पार्कमध्ये करण्याचे किंवा परवानगीचे मुद्दे नमूद केले आहेत. एक- प्रजासत्ताक दिन, दुसरा- महाराष्ट्र दिन व तिसरा- आंबेडकर जयंती. त्यातच शिवाजी पार्क हे क्रीडास्थान म्हणून घोषित केले गेले आहे.

माहीम ज्युविनियल्स क्लबमध्ये होणारे क्रिकेटचे सामने व त्याच्या स्पर्धा प्रेक्षणीय असायच्या. अनेक नामवंत खेळाडू त्यात भाग घेत. यानंतर केरळीय समाजाचा क्लब होता. तो कधीही कार्यान्वित असलेला पाहण्यात नव्हता. मात्र, या समाजाला लागून असलेल्या वडापावच्या स्टॉलची ख्याती व त्याचा खमंग वास तेथे सर्वांना माहीत होता. केरळीय समाजानंतर प्रसिद्ध समर्थ व्यायामशाळा आहे. येथे क्रिकेट सोडून सर्व भारतीय खेळ उत्तम प्रकारे खेळले जातात. त्यांच्या होणाऱ्या स्पर्धा दर्जेदार असायच्या. बाहेर मल्लखांब करणारे पिळदार शरीराचे ते नौजवान पाहिल्यावर अंगावर शहारे येत. या व्यायामशाळेनंतर कोपऱ्यावरच संगीतकार वसंत देसाई यांचे हातात वीणा घेतलेले स्मारक आहे. वसंतराव समोरच्या 'परिमल'मध्ये राहत. या सर्व वास्तू पार्कमध्ये कॅडेल रोडच्या बाजूला आहेत. पुढे काही अंतर गेल्यावर शिवाजी पार्कची शान असलेला प्रसिद्ध शिवाजी पार्क जिमखाना आहे. याची जागा मोठी असून क्रिकेटशिवाय टेनिस, बिलियर्ड्स, पत्ते व इतर खेळ प्रामुख्याने येथे खेळले जातात. भारतीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे अनेक उत्तम खेळाडू या जिमखान्याने देशाला मिळवून दिले आहेत. विशेषकरून क्रिकेटपटू. या जिमखान्यानंतर शिवाजी पार्कचे मुख्य प्रवेशद्वार होते. त्यानंतर लगेचच लहान मुलांना खेळण्यासाठी सुसज्ज अशी सुंदर बाग आहे. लहानपणी मी तेथे झोपाळ्यावर झोके घेत असे. या बागेनंतर ज्येष्ठ नागरिकांसाठी आता आजी-आजोबा उद्यान झाले आहे. शिवाजी पार्कचे वृद्ध नागरिक याचा पूर्ण उपभोग घेताना दिसतात. शिवाय, लाफिंग क्लबही यामागे आहे. या आजी-आजोबा उद्यानानंतर, सर्वात जुना असा व्यायाम करण्यासाठी एक पॅरलल बार होता आणि यामागे यंग महाराष्ट्र क्रिकेट क्लब होता. त्यांचा खेळ असला की तंबू असायचा.

आमचे क्रिकेटचे शिक्षक अथवा मार्गदर्शक अंकुश ऊर्फ अण्णा वैद्य हे त्याचे मुख्य कार्यकारी होते. माझ्या मते अण्णा वैद्यांसारखे क्रिकेटमधील उत्तम शिक्षक साऱ्या मुंबईत त्यावेळी नव्हते. त्यांच्या हाताखालून शिकलेले अनेक क्रिकेटर पुढे नावरूपाला आले. त्यांचा मुलगा अमर हा आमच्या शाळेच्या क्रिकेट टीमचा कप्तान होता. आता अमर हा अण्णांची परंपरा चालवतो.

या यंग महाराष्ट्र क्रिकेट क्लबनंतर टेनिस बॉलने क्रिकेट खेळण्याची जागा होती. तेथे दर्जेदार व प्रेक्षणीय टेनिस बॉलच्या क्रिकेट स्पर्धा होत असत. या भागातच पुढे रमाकांत आचरेकर क्रिकेटचे शिक्षण देत असे. सचिन तेंडुलकरला योग्य वयात क्रिकेटचे उत्तम धडे देणारा हा रमाकांतही त्यामुळे पुढे नावरूपाला आला. रमाकांतबरोबर मी अनेक क्रिकेटचे सामने खेळलो होतो. मला आठवतेय 'अनपढ' या सिनेमातील शास्त्रीय पाया असलेले 'जिया ले गयो जी मोरा सांवरियां...' हे लताचे गाणे रेकॉर्डवर ऐकायला तो अनेकदा आमच्याकडे येत असे. 'है इसीमें प्यारकी आबरू......' असेच काहीसे ते होते!

पार्कातील पदपथावरून फिरणे अथवा शिवाजी पार्कला (अनेकदा) संपूर्ण फेरी मारणे हाही एक आनंदाचा भाग होता. त्यामुळे वाटेत अनेकांच्या भेटीगाठी होत. नेत्रसुख व संवाद यांचा उत्तम मिलाफ तेथे होत असे. स्काऊट हॉलच्या आधी पारंबीच्या झाडावरचा तांबड्या फुलांचा खाली पडलेला सडा तुडवताना मन प्रसन्न व्हायचे. त्याच्या त्या भल्या मोठ्या शेंगाही त्याला स्वरांची साथ देत असत. मंदिरात जाऊन देवदर्शन घेत पवित्र होऊन पुढचा मार्ग कापला जात होता. पुढे समुद्रावर जाऊन थोडी विश्रांती घेऊन वाळूत फि रणे होत असे व मागे घरी परतताना रुकमैयाच्या भेळ व शेवपुरीवर ताव मारताना मजा यायची. तसेच, चंदूची पाणीपुरी व रगडा पॅटीस तोंडाला पाणी आणत असे. हे सर्व खाऊन झाल्यावर मोहनच्या लिंबू सरबत व गोळा-आइस्क्रीमने जीव तृप्त व्हायचा. मला आठवतेय, नेहमी तेथे जाणाऱ्यांची ओळख त्या सर्वांना असल्याने काहीजण उधारीचाही सौदा करत. इतकी दोस्ती होती. आश्चर्य म्हणजे, माझा मित्र अतुल काजी काही मित्रांसह त्या चंदूच्या लग्नालाही गेला होता. ही सर्व त्याची नेहमीच न चुकणारी गिऱ्हाईके होती. आता ते सारे इतिहासजमा झाले आहे व चौपाटी भुईसपाट झाली आहे.

'जमी भी वोही, है वही आसमां, मगर हाये वो दिल्लीकी गलियां कहां....' ह्या 'चांदनी चौक'मधील रफीच्या गाण्याची मला खास आठवण झाली. आज ती शिवाजी पार्कची शान व वैभव तेथे नाही. सर्व प्रदूषणांनी शिवाजी पार्क ग्रासलेलेआहे. मूळचे ते शिवाजी पार्कवाले तेथून दृष्टिआड होताहेत व बाहेरची उपरी माणसे तेथे कब्जा घेताहेत. जुने ते नामशेष करून आकाशाला भिडण्याचा प्रयत्न उंच इमारती करत आहेत. ज्यांची स्मारके अभिमानाने तेथे असायला हवीत ती दिसत नाहीत. इतिहास, संस्कृती व सौंदर्य पार धुळीला मिळून जात आहे. कदाचित एक दिवस शिवाजी महाराजही तिथून घोड्यासह पळून गेलेलेही कुणाच्या ध्यानात येणार नाही. निसर्गावर मात करायला निघालेल्या मनुष्यप्राण्यावर आता निसर्गच त्याचा खऱ्या अर्थाने कोप दाखवायला लागला आहे यात वाद नाही. श्रीमंतीची चढाओढ व त्याचा (कृत्रिम) देखावा ह्यांनी वातावरणातील सर्व प्राणवायू निघून गेला आहे. हे सर्व वाईट आहे. ते पूर्वीचे अविस्मरणीय क्षण काही अंशी परत आणण्याची तेथे अनेकजण धडपड करत असतील व त्यासाठी मेहनत घेत असतील. या सामाजिक कार्यात अशोक रावत, शरद दीक्षित, मोहन वर्दे व त्यांचे इतर सहकारी परिश्रमपूर्वक काम करताहेत. त्यांना माझा सलाम व सदिच्छा...!

'याद आनेवाले, फिर याद आ रहे है......' हे लता-तलतचे 'अनमोल रतन' या सिनेमातील गाणे मला नेहमी अंधारातून प्रकाशाकडे आणते. वाटते, की मी पुन्हा कधी शिवाजी पार्कला फिरायला गेलो तर....

मी पुण्य घेऊनच तेथून परतीन यात शंका नाही. निघताना, 'हमारे बाद अब मेहफिलमें अफसाने बयां होंगे, बहारें हमको ढूंढेगी न जाने हम कहां होंगे...' हे 'बागी'मधल्या लताचे सूर कानावर पडतील. तेवढ्यात, शिवाजी पार्कमधून शेवटचे दर्शन घेताना, 'चनाचोर गरम बाबू मैं लाया मजेदार चनाचोर गरम...' विकणारा बनारसी बाबूचा शेर ऐकायला येईल. मी पटकन खिशातले पैसे काढायला जाईन...

तोच...

माझ्या कानावर 'चला ऊठा, पुरे झाली ती झोप....' असे झंकारून वीणाने मला आठवणींच्या धुंदीतून पूर्ण जागे केले. शिवाजी पार्कच्या कट्ट्यावरून म्हणजे, सेंट्रल पार्कच्या बाकड्यावरून उठून आम्ही पुन्हा भुयारीमार्गाने घरी परतलो. घरी आल्यावर वेळ न दवडता, न विसरता मी ग्रामोफोनवर काननदेवीची, 'ऐ चाँद छुप न जाना...' ही रेकॉर्ड लावली व पुन्हा सुखावलो....

**जयंत विठ्ठल कुळकर्णी**
jvkny1@gmail.com

# अशाही एक छंद

**प्रभा पुरोहित**

मी शाळेत शिकताना वाचलं होतं फुलपाखरांविषयी. अंडी–सुरवटे–कोष–फुलपाखरू अशा पायऱ्यांनी फुलपाखरं तयार होतात. हे माझ्या डोक्यात जाऊन बसलं अन् मग माझ्या मनानं घेतलं की आपण हे करून बघायचंच. एकदा माझ्या मनानं काही घेतलं की मग मला थांबवत नाही.

मला लहानपणी एक छंद, नाद होता. एक अनोखा छंद होता. त्याला मी 'अनोखा' म्हणते कारण अशा छंदाविषयी ऐकलेलं किंवा वाचलेलं नाही, नव्हतं. माझा छंद होता फुलपाखरं तयार करण्याचा. 'तयार करणं' म्हणजे निरनिराळ्या रंगाच्या कागदांची किंवा कापडाची फुलपाखरं बनवणं नव्हे. ह्या छंदाला अनोखा छंद म्हणता येणार नाही. पुष्कळ लोकांना हा छंद असतो. ते छान छान फुलपाखरं बनवतात. मला फुलपाखरं पकडण्याचाही छंद नव्हता. खूप जण, विशेषत: मुलं फुलपाखरं पकडतात, त्यांना दोरे बांधून उडवतात अन् फुलपाखरू मेलं की फेकून देतात, असा आसुरी छंदही मला नव्हता.

काही लोक निरनिराळ्या प्रकारची फुलपाखरं पकडतात, त्यांच्यावर रासायनिक क्रिया करतात. त्यांची फोटोफ्रेम तयार करून, घराच्या भिंतीवर लावून, भिंती सजवतात, पण असाही छंद मला नव्हता.

माझा छंद मग होता तरी काय? मला खरीखुरी जिवंत फुलपाखरं जन्माला घालण्याचा छंद होता. हा छंद माझ्या जिज्ञासेतून निर्माण झाला होता. दरवर्षी पावसाळा सुरू झाला की मला माझ्या बालपणीच्या छंदाची आठवण होते.

पावसाळा हा सृजनाचा ऋतू; नवनिर्मितीचा मोसम. ह्याच ऋतूपासून फुलपाखरांच्या निर्मितीलाही सुरुवात होते. मी शाळेत शिकताना वाचलं होतं फुलपाखरांविषयी. अंडी–सुरवटे–कोष–फुलपाखरू अशा पायऱ्यांनी फुलपाखरं तयार होतात. हे माझ्या डोक्यात जाऊन बसलं अन् मग माझ्या मनानं घेतलं की आपण हे करून बघायचंच. एकदा माझ्या मनानं काही घेतलं की मग मला थांबवत नाही.

ह्या छंदासाठी मला बरीच पूर्वतयारी करावी लागली. सुरवंट ठेवण्यासाठी छोटे खोके हवे होते. ते झाकून ठेवायलाही काचा हव्या होत्या. मुख्य म्हणजे हे खोके कोणाच्या नजरेस पडू नयेत ह्याची काळजी घ्यायला हवी होती. हा छंद माझा एकटीचा होता. सर्व मीच करायला हवं होतं. अगदी चुपचाप. कोणाला कळलं असतं, म्हणजे माझ्या भावना कळल्या असत्या तर त्यांनी मला मूर्खात काढलं असतं.

मी विचार करत गेले आणि एकेक सुचत गेलं. आधी जागा निवडली, आमच्या घराच्या तिसऱ्या मजल्यावरील

गच्ची. आमचं 'मोठं घर' तीन मजल्यांचं होतं. तिसऱ्या मजल्यावर एक मोठी खोली आणि त्या खोलीसमोर तेवढीच मोठी गच्ची. ह्या मजल्यावरची ही खोली माझ्या भावजयीची झोपायची खोली होती. तिथे फारशी वर्दळ नसायची. ह्या खोलीच्या समोरच्या गच्चीचा एक कोपरा मी माझ्या छंदासाठी निवडला. ह्या कोपऱ्यात एक कमान होती आणि त्या कमानीत एक खिडकी होती. ह्या खिडकीच्या पलीकडे खालच्या माडीचे कौलारू छप्पर होते. ह्या छपरावर खिडकीच्याजवळ माझ्या फुलपाखरांचे डबे ठेवायचे, मी ठरवलं. डबे मिळवणं मला सोपं होतं. माझे वडील 'कालीमूर' वगैरे औषधं मागवायचे. त्याचे लाकडी खोके येत, तीन बाय तीन बाय सहा अशा आकाराचे ते माझ्या अगदी छान उपयोगाचे होते. ते डबे स्वच्छ करून वापरायचे असं मी ठरवलं. नाहीतर ते एका फळीवर पडलेलेच होते. ते डबे मी स्वच्छ केले आणि सुरवंटांसाठी वापरायला घेतले. डबे झाकले तरी हवा आत खेळती राहील ही काळजी घेणंही आवश्यकच होतं. तेही मी करत असे.



ही सर्व तयारी झाल्यावर मी झाडावरून किंवा वेलीवरून सुरवंट पकडायची माझी लगबग सुरू होई. कुठल्या झाडावरून किंवा कुठल्या वेलीवरून कोणता सुरवंट पकडला आहे हे लक्षात ठेवावं लागे. कारण त्याच झाडाची किंवा वेलीची पानं मी त्यांच्यासाठी आणत असे. अशी सुरवंटांची जोपासना चालू असायची, काही दिवस.

मला बहुतेक तीन प्रकारचे सुरवंट मिळायची. एक हिरवट पोपटी रंगाचा, जाडसर, थोडासा लांबट, तोंडल्यासारखा. त्याचं नाव मी 'तोंडल्या' ठेवलं होतं. दुसरा काळा, केसाळ अस्वलासारखा. त्याला मी 'अस्वल्या' म्हणायची. अन् तिसरा बारका, छोट्याशा अळीसारखा, हिरवा. ह्या सुरवंटाला पुढे आणि मागे पाय असायचे. चालताना त्याच्या पोटाचा मधला भाग उंच व्हायचा. मग तो बारक्या म्हणजे अगदीच छोट्या खेळण्यातल्या उंटासारखा दिसायचा. त्याचं नाव मी 'उंट्या' ठेवलं होतं. ह्या तीन प्रकारच्या सुरवंटांपासून कशी फुलपाखरं तयार होतात ह्याची मला खूपच उत्सुकता असायची. पहिल्या वर्षी ही उत्सुकता अगदी शिगेला पोचली होती. नंतर मात्र मला दरवर्षी फुलपाखरं बनवायचा नादच लागला.

सुरवंट पकडायची, ती वेगवेगळ्या डब्यांत ठेवायची, त्यांना खाण्यासाठी ताजी पानं आणायची. सुरवंट ज्या झाडावरून किंवा वेलीवरून पकडला असेल ते लक्षात ठेवून त्याच वेलीची किंवा झाडाची पानं मी आणत असे. सुरवंटाचे डबे रोज स्वच्छ करावे लागत. कुरतडलेली, सुकलेली पानं मी फेकून द्यायची आणि त्यांच्यासाठी ताजी पानं आणायची. ज्या झाडांवरून, वेलींवरून ते सुरवंट पकडते ते मला लक्षात ठेवावं लागे. त्याच झाडावेलीची पानं त्यांच्यासाठी आणावी लागत. तत्पूर्वी त्यांचे डबे स्वच्छ करावे लागत. सुरवंट तर डब्यात घाण करून ठेवतच. ही सर्व कामं तर करायचीच, पण कोणालाही कळू न देता. नाहीतर माझे डबे फेकले गेले असते अन् बोलणी खावी लागली असती आईची, 'त्या मुक्या जीवांना का छळतेस' अशी. पण हे सर्व गुप्तपणे करताना मला मजा वाटायची हे मात्र खरं.

ही कामं काही दिवस केल्यावर, किती दिवस हे मला नक्की आठवत नाही – सुरवंट कोषात गेल्यावर – ही कामं बंद व्हायची. मग एकच काम असायचं. रोज डबे बघायचे – त्यातले कोष निरखायचे. तोंडल्याचा मोठा पांढरा, रूपेरी, चकाकणारा. अस्वल्याची काळा कुळकुळीत, तर उंट्याचा पाचूसारखा हिरवा कोष. एकच उत्सुकता उरलेली, कोष कधी, केव्हा फुटणार! फुलपाखरू कधी बाहेर पडणार! फुलपाखरू बाहेर पडलं की मी ते आमच्या बागेतल्या फुलझाडावर – बहुधा मोगऱ्यावर नेऊन सोडून द्यायची. ते उडू लागलं, ह्या फुलावरून त्या फुलावर बसू लागलं की मला आनंद व्हायचा, त्यांच्या बागडण्याचा. आपल्या श्रमाचं सार्थक झाल्यासारखं वाटायचं.

मग एका वर्षासाठी माझा छंद थांबायचा. मी फुलपाखरं बघायची. त्यात माझी फुलपाखरं शोधण्याचा प्रयत्न करायची. सगळीच माझी वाटायची!

आता पावसाळा सुरू झाला, की मला माझ्या ह्या बालपणीच्या छंदाची आठवण येते, माझ्या ह्या अनोख्या 'बाल छंदाची.'

**प्रभा पुरोहित**
५ अभंग, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१

# सृष्टी-संगोपन आणि घरगुती कचरा व्यवस्थापन

**वसुमती धुरू**

फुटक्या कपबश्या पण आमच्याकडे फुकट जात नसत. आई वर्षभर त्या कुठे लपवून ठेवत असे कोण जाणे! पण एकदा का त्या बाहेर निघाल्या आणि मागील ओटीवर लोखंडी खलबत्त्यावर स्थानापन्न झाल्या, की समजावे दिवाळी जवळ आलीय. शाळेतून घरी आल्यावर कपडे बदलले, खाणेपिणे आटपले की खलबत्ता एका गोणपाटावर ठेवायचा, त्यात थोडे थोडे कपबश्यांचे तुकडे घालायचे आणि बत्त्याने कुटायला सुरुवात करायची, ती त्या कपबश्यांची वस्त्रगाळ रांगोळी होईपर्यंत!

पाऊणशे वर्षांपूर्वीची मुंबई. ती पाहिल्याचे भाग्य मला लाभले आहे. आज माझे वय ८४ वर्षे पूर्ण आहे. तेव्हाची मुंबई बहुतांश छोट्यामोठ्या वाड्यांची (वाडी, वाडा नव्हे) मिळून बनली होती. आमची पण शिवाजी पार्कच्या उत्तरेला लहानशी पाटीलवाडी होती. छोटे टुमदार घर, पुढे छोटीशी फुलबाग. मागे प्रशस्त परसबाग. परसबागेला आम्ही मागील वाडी म्हणत असू. तिथे एका लहानशा खोलीएवढ्या जागेत पाण्याचा नळ होता. त्याला चोवीस तास पाणी असे. वाडीत बरीचशी फळझाडे होती. प्रामुख्याने दोन रायवळ आंब्यांची, पाच-सात माड, एक पपनस, एक पेरू वगैरे दीर्घायुषी झाडे. त्याशिवाय केळी, पपई, शेवगा, बोरे वगैरे अल्पायुषीपण होती. दीर्घायुषी झाडांना खत घालण्याची एक विशेष पद्धत होती. ती हल्ली कुठेच दिसत नाही. किंबहुना, परसबागेतल्या झाडांना हल्ली खत घालतात की नाही, मुळात परसबाग आता नावापुरती तरी अस्तित्वात आहे की नाही, हेच मला माहीत नाही.

पावसाळा तोंडावर आला की आमचे मोठे काका, बाजारातून वंजडी आणायचे. वंजडी म्हणजे बकऱ्याची आतडी (Tripe). पूर्ण साफ करून माणसे पण ती खातात. अगदी अमेरिकेतदेखील. मटणाच्या इतर भागांच्या मानाने ती स्वस्त असते. नोकराकरवी आंब्याच्या दोन्ही झाडांभोवती जरा खोल आळे खणायचे आणि वंजडीचे तुकडे करून नोकराकडून भरून घ्यायचे. त्याला मांजर, कुत्री, उंदीर, घुशी लागू नयेत म्हणून वर भरपूर खडे मीठ घालायचे आणि मग वर परत माती लोटायची. मात्र आमच्या लहानपणीसुद्धा ती आंब्याची झाडे वयोवृद्ध झालेली होती वाटते. एवढी खटपट केल्यानंतर त्यांना आंबे लागत; पण तुरळक. अगदी फलभाराने वाकलेले आम्रवृक्ष पुढे वलसाडला पाहिले तसे आम्ही कधी आमच्या मागील वाडीत पाहिले नाहीत. माड, पपनस वगैरे झाडांना अशाच रीतीने 'आतूस'चे (मोठ्या माशांची आतडी) खत घातले जाई. ती मात्र भरभरून परतफेड करत. शेवगा हे तर अती बहुप्रसव झाड. वर्षभर त्याला खत रोजच्या रोज घातले जाई. हे खत म्हणजे चुलीतली राख. आमच्याकडे तीन चुलींमधून राख मिळत असे,

भरपूर. स्वयंपाकासाठी कोळशांची डबल शेगडी. आंघोळीच्या पाण्यासाठी लाकडांची चूल किंवा बंब. केरोसीनचा स्टोव्ह फक्त चहासाठी किंवा घाईच्या कामासाठीच वापरला जाई. तर ही राख स्वयंपाकाची भांडी घासायला उपयोगी पडे. उरलेली शेवग्याला. शेवग्याची दोन-चार झाडे होती. त्यातले एक शेंगांसाठी राखून ठेवून बाकीचांचा पाला विकायचा. बकरी पाळणारे लोक तो बकऱ्यांचे खाद्य म्हणून विकत घेत. त्या झाडांना मग शेंगा, फुलं वगैरे धरत नसत. शेवग्याची सर्व झाडे भरपूर डिंक स्रवतात. त्याचा आम्ही गोंद बनवत असू. शेवग्याचे खोड फार नाजूक. वाऱ्यापावसाने उन्मळून पडणारं. ते मग चुलीत जाळायचं. पण त्या एका खास राखलेल्या झाडाला इतक्या भरपूर शेंगा लागत! आम्ही अगदी आवडीने खास असू. भाजी, आमटीत, पिठल्यात, माशांच्या कालवणात, इतकेच काय पण त्यांचे लोणचेसुद्धा गोड आणि तिखट, दोन्ही तऱ्हेची. कधीमधी सुक्या बोंबलाच्या तुकड्यांसहित घालत. तरी त्या आमच्या मोठ्या १५-२० जणांच्या विस्तारीत कुटुंबाला पुरून उरत. कोणाला भेट देऊ म्हटले, तर ''नको. आमच्याकडे आहे शेवगा'' असे उत्तर मिळे. शेवग्याची फुले पण फार चवदार. कधी जोराच्या वाऱ्याने झाडापासून सुटून जमिनीवर सडा पडला, तर धुऊन त्या फुलांचा झुणका छान होतो. भजी तर उत्तमच. कोवळ्या पाल्यात मूगडाळ घालून भाजी करतात. संधिवातावर ती उत्तम गुणकारी समजतात. तिच्यात 'क' जीवनसत्त्व इतके ओतप्रोत आहे की शिजवल्यावरसुद्धा पुरेसे शिल्लक राहावे. 'अ' जीवनसत्त्व पण प्रचंड प्रमाणात आहे. कॅल्शियम आहे, लोह आणि चोथासुद्धा आहे. पण हे काय? मी येथे आहारशास्त्राचा पाठ घ्यायला बसले नाही. तर चुलीतल्या राखेविषयी सांगत होते. उरलीसुरली राख बाकीच्या झाडांना होई.

वाडीत डाव्या अंगाला काळ्या अळूचे बेट होते. अळूच्या बेटाला काही खतपाणी घालत होतो असे वाटत नाही. तरी श्रावणात ते तरारून उठायचे. आई सारखी आपली अळूची पातळ भाजी, अळूवडी, अळूदेठीचे रायते बनवत राहायची. पण सर्वांत उत्तम म्हणजे अळूगाठीचे कोलंबीचे कालवण. त्याच्याशिवाय भाद्रपदातील माहेरवाशीण गौरीमाय संतुष्ट व्हायचीच नाही. प्रॉन करी विथ कलोकेशिया म्हणजे जगातल्या कुठल्याही प्रॉन करीच्या तोंडात मारील अशी चीज! शिवाय अळूमुळे कोलंबीतला कोलेस्टरॉल कमी होतो हा फायदा वेगळाच. (पुन्हा आहारशास्त्र आठवलं!) 'कचरा निर्माण होईल तेथेच त्याची विल्हेवाट लावावी' हे आजचे नवीन मानले जाणारे सूत्र तेव्हाची मंडळी मुंबईतसुद्धा सहजगत्या अवलंबत होती. भाजीपाल्याची डेखे, फळांच्या साली गोळा करून शाळेच्या वाटेवर, शेजारच्या वाडीतल्या भैय्याच्या गायींना घालायच्या. मात्र त्यातही ते म्हशींना न घालता, गायींना घालून पुण्य संपादन करायचे! त्या बदल्यात काशीबाईकरवी शेण गोळा करून कोळशाच्या पोत्यातली खालची भुकटी त्यात मिसळायची. त्याचे मोठेमोठे गोळे करून, उन्हात सुकवून बंबात इंधन म्हणून वापरत. तेवढीच जळाऊ लाकडाची बचत.

जेवणातले उष्टखरकटे वाडीतल्या कुत्र्यांना घालायचे. त्या कुत्र्यांना पाळीव म्हणायचे की 'स्ट्रे', असा प्रश्न आम्हाला कधीच आला नाही. गृहिणी मासे साफ करायला घराच्या मागच्या ओटीवर बसत. लगेच भोवती मांजरांची सभा भरे. माशांचा नको असलेला भाग काढून टाकला की तो जमिनीवर पडायच्या आत मांजरे वरच्यावर मटकावत. वाडी आपोआप स्वच्छ आणि ती कुत्र्यांची फौज म्हणजे आम्हाला बिनपगारी पहारेकरी!

याशिवाय नारळ. नारळाला तर कल्पवृक्ष म्हणून सर्व जगानेच मान्यता दिली आहे. माड घरचेच असल्यामुळे आमच्याकडे स्वयंपाकात नारळाचा भरपूर वापर. भाजी, आमटी, कोशिंबीर, चटणी सर्वांत नारळ हवाच आणि नारळाची पक्वान्ने तरी किती? ओल्या नारळाच्या करंज्या, मोदक, शेवया, रवा लाडू (त्यात रव्यापेक्षा ओले खोबरेच जास्त असे. रवा फक्त एकत्र मिळून येण्यापुरता.) नारळीपाक रवळी, नारळाच्या रसातली हातभाकरी वगैरे वगैरे. आई आम्हाला भातुकलीत सुद्धा नारळ-साखर द्यायची, नारळीपाक करायला. अती परिचयात अवज्ञा, दुसरे काय! ताजा नारळ फोडल्याबरोबर आतले पाणी प्यायला आणि ओले खोबरे खायला आम्हा पोरासोरांची हीऽऽ घाई. ओले खोबरे हे लहान मुलांना होणाऱ्या जंतांवर (कृमी) वस्ताद औषध आहे असे मी T.O.I. च्या शंभर वर्षांपूर्वीच्या एका अंकात वाचलेय. तसेच, कापल्यामुळे कुणाला लहानमोठी जखम झाली, तर ताबडतोब रघू भंडाऱ्याला माडावर चढवून ताजे शहाळे काढायचे आणि ते पाणी त्याला प्यायला द्यायचे. जखम भरून आलीच पाहिजे. आजीच्या निर्जळी उपवासाला साधे पाणी चालत नसे, पण शहाळ्यातले मान्य होते. हे झाले माडाचे खाद्यउपयोग. इतरही काही कमी नव्हते. जून झालेल्या झावळ्या (माडांची पाने) वाऱ्याने पडल्या की घराबाहेर पत्र्याच्या न्हाणीघरात रचून ठेवायच्या. मग बेताच्या स्थितीतल्या पांढरपेशा बायका त्या घेऊन जायच्या आणि हाताने विणून त्यांनी घराचे (खोपटाचे) छत शाकारायचे. या झावळ्या विणण्याचे कौशल्य अप्रतिम होते. त्या सुरेख दिसायच्या आणि विठाबाईला थोडे पैसे पण मिळायचे. कधी त्यामधल्या जाड शिरा कापून त्यांचे खराटे बनवायचे, वाडी स्वच्छ ठेवायला. देठ काढून उरलेली पाने सुकवून, जुड्या बांधून पाणी तापवायच्या चुलीत जाळायची

किंवा वेळप्रसंगी रात्रीच्या वेळी पेटवून 'टॉर्च' म्हणून वापरायची.

नारळ घरचेच असल्यामुळे ते 'असोले' म्हणजे वरच्या खूप जाड तंतूयुक्त सालींचे असत. ते सोलून घेण्याचे कष्टाचे काम दादा मोठ्या आवडीने करत. वरच्या जाड सालीसह आतला काथ्या (तंतू) यांना चोड म्हणतात. ती चोडे पाणी तापवायच्या बंबांत जाळून तेवढीच लाकडाची बचत केली जाई. गावाकडचे लोक काथ्या पाण्यात दोन-तीन दिवस भिजत घालून, मग पिंजून पिंजून, हाताने वळून जाड मजबूत दोरखंड बनवत. तो इतका मजबूत की मोठ्या बांधकामांना, जहाजांना सुद्धा वापरत. आम्हा मुंबईकरांकडे तेवढा वेळ, कौशल्य, कच्चा माल, पुरेसा नसल्याने आम्ही तो जाळून लाकडाची बचत करून खूष होत असू. त्यापैकी निवडक चोडे, विशिष्ट तऱ्हेने व्यापून आजी त्याचे घरगुती ब्रश बनवत असे. दळण दळून झाल्यावर जाते साफ करायला एक, वाटण वाटून झाल्यावर पाटा स्वच्छ धुवायला एक. चपाती भाजायच्या कोळशाच्या शेगडीत कोळसे थोडे कमी करून एखादे चोडे टाकले, की तवा उत्तम तापत असे आणि चपात्या पुरीसारख्या फुगून येत. मात्र झटपट भाजाव्या लागत. ते काम मी आवडीने करत असे.

सोललेल्या नारळाच्या तीन डोळ्यांकडील शेंडी मात्र हेतूत: तशीच ठेवावी लागे. त्यामुळे तो नारळ फोडेपर्यंत नीट टिकत असे. या शेंडीचा पण आयुर्वेदिक वैद्यांनी एक मोठाच उपयोग सांगितलेला आहे. (मी स्वत: अनुभव घेतलेला नाही.) ही शेंडी काळजीपूर्वक जाळून तिची पांढरी राख बनवायची आणि ती वस्त्रगाळ करून मधात खलून, वांती होत असलेल्या रुग्णाला थोड्या थोड्या वेळाने थोडी थोडी चाटवायची. वांती हमखास थांबते असे ते म्हणतात.

मराठीत एक वाक्प्रचार आहे- हाती करवंटी आली म्हणजे दारिद्र्य आले. खरे पाहता, करवंटीचे कितीतरी उपयोग आहेत. अगदी साधा आणि आळशीपणाचा म्हणजे चुलीत जाळण्याचा. आमची आई करवंटीचा एक स्वच्छ तुकडा तिच्या डब्यात ठेवून देई. वरणासाठी तुरीची डाळ शिजवताना किंवा मटण शिजवताना त्यात तो तुकडा घालायचा म्हणजे डाळ/मटण मऊ शिजते असे तिचे म्हणणे असायचे. आजी एका मोठ्याशा नारळाची - फोडतानाच - दादांकडून एक करवंटी, तीन डोळ्यांकडील नव्हे, जरा मोठी येईल अशी फोडून घेत असे. नारळ खवून झाल्यावर त्याला एका बाजूने गिरमिटने गोल भोक पाडायचे. त्यात एक लाकडाचा स्वच्छ दांडा पक्का बसवायचा. मग उन्हात वाळवून आणि तासून तासून पॉलिश केल्यासारखा स्वच्छ करायचा. या उपकरणाला 'भोंडा' म्हणत. आंघोळीच्या तपेलीतले कढत पाणी काढून घ्यायला हा फार उपयोगी. लाकडाचा असल्यामुळे व लांब दांड्यामुळे पाणी कितीही गरम असले तरी तो तापत नसे. हाताला चटका बसण्याची शक्यता अजिबात नाही. मला तर आठवतेय की पावसाळा तोंडावर आला, की आजी तिच्या सुंभाच्या खाटेला, मागल्या वाडीत घेऊन भोंड्याच्या साहाय्याने उकळते पाणी घालून आंघोळ घडवी. चुकून काही जीवजंतू असतील तर ते मरून जावेत म्हणून! करवंटीच्या तीन डोळ्यांपैकी एकाला छिद्र पाडून आई ती जिलब्या पाडण्यासाठी वापरत असे.

या करवंटीच्या शोभनीय व उपयुक्त अशा छोट्या छोट्या वस्तूही बनवता येतात. बरण्या, फ्लॉवरपॉट्स, पेन स्टँड वगैरे तर नेहमीचेच. पण एका मैत्रिणीला तिच्या भावाने सुंदर ब्रेसलेट बनवून दिले होते व स्वत:साठी चष्म्याची सुरेख फ्रेम बनवली



होती. ते ब्रेसलेट पाहून आम्हाला तिचा हेवा वाटायचा.

संध्याकाळच्या शांत, रम्य वेळी आम्ही बहिणी, सख्ख्या व चुलत, आळीपाळीने आमच्या आवडत्या झाडांना पाणी घालत असू. माड, केळी वगैरे. आंबा, पपनस नळाच्या बाजूलाच होते. त्यांना जमिनीतून पाणी आपोआप जातच असणार. शेवग्याला जास्त पाणी झेपत नाही. अळू तर पावसाळ्यातच उगवते, त्याला पाण्याची गरजच नाही. आम्ही छोटीशी कळशी कडेवर घेऊन माडांभोवतीच्या आळांना, केळीच्या बेटांना मोठ्या प्रेमाने पाणी घालत असू. पाणी मात्र संध्याकाळीच घालायचे, उन्हाने शोषले जाऊ नये म्हणून. झाडे पण आपली पाने सळसळ हलवून पोचपावती देत. केळीला लोंगर धरलेय का, एखादे केळफूल वाऱ्याने पडलेय का, वगैरे पाहत असू. केळफूल पडले असले, तर उचलून आईला नेऊन द्यायचे भाजी किंवा वड्या करायला. माडाची पोगी पडली असली तर उचलून ठेवायची. पाऊस खूप जोरात पडून पाट वाहू लागले की ती पोगी होडी बनून त्या पाण्यातून पृथ्वीप्रदक्षिणा करायला निघे. खरोखर निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी एखाद्या 'पॅसिफिक आयलंड'वर जायची गरजच नव्हती. तरी आमच्याकडे थोडेच माड होते. आमच्या काही नातेवाईकांकडे खूप मोठी वाडी आणि पुष्कळ म्हणजे पुष्कळच माड होते. त्यांना विहिरीचे पाणी मोटेने काढून (मुंबईत!) पाटाने पोचवत. प्रत्येक माडाभोवती आळे केलेले असे. ते पाण्याने भरले की पायाने तिकडच्या पाटाचे तोंड बंद करून पाणी दुसऱ्या माडाकडे वळवायचे. काय मजा यायची! संध्याकाळच्या वेळी त्यांच्याकडे गेलं, की ती मंडळी, त्यांनी दिलेला खाऊ यापेक्षा माडांच्या पाटाचेच खूप अप्रूप वाटायचे. माडांचे खरे सौंदर्य पाहायचे असेल तर ते हलकासा पाऊस, हलकासा वारा असताना. त्यांचे ते हिरवेगार शेंडे मागेपुढे डुलायचे. डौलात स्वत:भोवती गिरकी घ्यायचे. नृत्याचा रियाज करणाऱ्या नर्तकी जणू. पण एवढ्या तेवढ्या वाऱ्यापावसाने ते पडायचे नाहीत. सर्वांना भिववून आणि लुभवून पुन्हा स्तब्ध व्हायचे. कधी फार जोराचा वादळवारा सुटला तर मात्र खैर नाही. एवढा उंचच्या उंच माड तो, कोणत्या दिशेला पडेल आणि कुणाचा कपाळमोक्ष करेल ते सांगता यायचे नाही. अशा वेळी आम्ही सर्व गुपचूप घरात बसून राहत असू. वादळ पूर्ण शमले की धावत जाऊन शेंड्याकडील नारळ, शहाळी वगैरे माल काढून घ्यायचा. मग तो कोवळा हिरवा शेंडा फोडून आतील पांढराशुभ्र, करकरीत गाभा काढून घ्यायचा. आम्ही त्याला माडाची 'वाटी' म्हणत असू. ही वाटी फारच मौल्यवान कारण एका माडागणिक एकच वाटी मिळते. ती सर्वांनी कटाक्षाने सारखी वाटून घ्यायची. ती गोड, तिखट, आंबट, खारट वगैरे कोणत्याही चवीची नसते पण तिची ती कोवळी, कुरकुरीत bland चव केवळ लाजवाब! मोठमोठ्या नामांकित एअरलाइन्स त्यांच्या फर्स्ट क्लास प्रवाशांना ती सॅलड म्हणून वाढतात आणि त्या पडलेल्या माडाचे काय करायचे? थोडे दिवस तसाच तो पावसात पडू द्यायचा. त्यावर मग आपोआपच भलीमोठी अळंबी (मश्रूम्स/भूछत्र) उगवायची. तिचा मटणासारखा रस्सा बनवायचा. हुबेहूब मांसल मटणाची चव लागते. पाऊस थांबून कडकडीत ऊन पडले आणि तो माड पूर्ण सुकला, की फोडून पाण्याच्या चुलीत सरपण म्हणून वापरायचा. पूर्ण जळून उरलेली राख खत म्हणून, भांडी घासायला म्हणून उपयोगी. सृष्टीचे एक लहानसे चक्र पूर्ण व्हायचे.

हा झाला नित्याचा, आमच्या भाषेत ओला कचरा. आणि नैमित्तिक म्हणजेच सुक्या कचऱ्याचे काय? जुने डबे, बाटल्या हा कचरा तर विशेष फलदायी. 'डबा-बाटलीऽऽय' ओरडत त्या बाया रोज यायच्या आणि तो सुका कचरा, मोठ्या प्रेमाने उचलून घेऊन जायच्या. त्याची किंमत म्हणून रोख पैसेही द्यायच्या. रुपया, आठ आणे वगैरे चिल्लर. पण त्यामुळे गृहिणीचा दुपारचा वेळ किती मजेत जायचा, तिच्याबरोबर घासाघीस करण्यात. जणू काही मोठाच व्यापारी सौदा ठरत आहे.

फुटक्या कपबश्या पण आमच्याकडे फुकट जात नसत. आई वर्षभर त्या कुठे लपवून ठेवत असे कोण जाणे! पण एकदा का त्या बाहेर निघाल्या आणि मागील ओटीवर लोखंडी खलबत्त्यावर स्थानापन्न झाल्या, की समजावे दिवाळी जवळ आलीय. शाळेतून घरी आल्यावर कपडे बदलले, खाणेपिणे आटपले की खलबत्ता एका गोणपाटावर ठेवायचा, त्यात थोडे थोडे कपबश्यांचे तुकडे घालायचे आणि बत्त्याने कुटायला सुरुवात करायची, ती त्या कपबश्यांची वस्त्रगाळ रांगोळी होईपर्यंत! पण मध्यंतरी त्या तुकड्यांचे कण उडून डोळ्यांत कसे जायचे नाहीत? आई त्या खलबत्त्यावर कापडाचा किंवा कागदाचा सैल तंबू चढवायची की काय? पण मग आठवत कसे नाही? पुढे मी कॉलेजमध्ये फिजिक्स शिकायला लागल्यानंतर आणि आमच्या घरी इलेक्ट्रिसिटी आल्याबरोबर, पॉप्युलर सायन्सच्या मदतीने डायग्रॅम (सर्किट) काढून खलबत्ता इलेक्ट्रिकली ऑपरेट करण्याचा प्रयत्न केला होता, ते मला लख्ख आठवते. तर अशी आमची मागील वाडी. आमच्या चिमुकल्या विश्वाचे सहजगत्या संगोपन करणारी. आजही डोळ्यांसमोर उभी राहणारी.

**वसुमती धुरू**
धुरूवाडी,
३७२ वीर सावरकर मार्ग,
मुंबई -४०००२८
दूरध्वनी : २४२२२१२४

# प्राचीन स्त्री-शिक्षण

डॉ. माया पाटील (शहापूरकर)

प्राचीन भारतातील 'स्त्री-शिक्षणाचा वारसा' आजची स्त्री चालवीत आहे. भ्रष्टाचार, अत्याचार, स्त्री-भ्रूणाची हत्या, दडपशाही, अन्याय या सर्वांवर मात करत तिला विज्ञानयुगात उज्ज्वल भवितव्याकडे जायचे आहे.

विश्वनिर्मितीचा इतिहास शोधण्याचे काम जिनेव्हाजवळ सुरू आहे. 'लार्ज हायड्रॉन कोलरायडर'वर काम करणाऱ्या शास्त्रज्ञात जेव्हा अनेक स्त्री शास्त्रज्ञांची नावं वाचली तेव्हा मेंदूमध्ये एक अनामिक लहर दौडत गेली. सुनीता विल्यमचा 'स्पेस वॉक' आठवला की मन अलगद अंतराळात तरंगायला लागते. अनंत अवकाशाचा शोध घ्यायला गेलेली 'कल्पना चावला' त्या अंतराळाचाच भाग बनली गेली, हे आठवले की मन उदास होते. तसेच दूर गावाकडच्या आश्रमशाळेत नुकतीच डी.एड. झालेल्या शिक्षिकेचे लहानग्यांना शिकविणे कौतुकाचे वाटते.

या पृथ्वीतलावर स्त्री आणि पुरुष या दोनच जाती आहेत. त्यांच्यात नैसर्गिक भेद असला तरी 'मानव-प्राणी', 'व्यक्ती' हे नामाभिधान दोघांनाही एकच आहे.

'स्त्री' एक सृजनशीलतेचे प्रतीक, करुणेची मूर्ती, वात्सल्याची प्रतिकृती! तिचा अश्मयुगापासून आधुनिक कालखंडापर्यंतचा इतिहास खाचखळग्यांनी भरलेला आहे. प्रगतीचा आलेख चढ-उताराचा आहे. 'स्त्री-सुशिक्षित' असली की पूर्ण घर सुशिक्षित होते असे म्हणतात. परंतु स्त्रियांना शिक्षणासाठी अतिशय संघर्ष करावा लागला, त्याचा इतिहास खूप मोठा आहे. एकोणिसाव्या शतकात आदरणीय सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, महर्षी कर्वे, न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, राजा राममोहन रॉय यांच्या प्रयत्नांमुळे स्त्रियांना शिक्षणाची द्वारे खुली झाली.

त्या पूर्वीच्या लाखो वर्षांच्या मानवी इतिहासातील स्त्रियांचे स्थान शोधणे खूप महत्त्वाचे ठरते. मानवी इतिहास तीन भागांत विभागला जातो. अश्मयुग, ताम्रपाषाणयुग आणि लोहयुग!

अश्मयुगातील मानवाची अवस्था अतिशय आदिम आहे. लाखो वर्षांपासूनचा हा इतिहास आहे. या युगातील पुरावे म्हणजे अश्महत्यारे आणि शैलचित्रे होय. या शैलचित्रांवरून त्या कालखंडातील मानवी जीवन कसे असावे याची साधारण कल्पना येते. उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, काश्मीर,


**लेखिका कोरावली, सोलापूर**

कर्नाटक इत्यादी राज्यांमधील काही पहाडांत अशी चित्रे आढळतात. स्त्रिया शेती करतानाची काही चित्रे आढळतात. याच कालखंडात स्त्रियांनी शेतीचा शोध लावला. त्याबरोबर लहानलहान शिकारीची कामे, गृहकृत्ये, मुलांचे संगोपन इत्यादी कामे स्त्रीच करीत होती. उत्तर पुराश्मयुगातील मातृदेवतेची हाडाने बनविलेली एक प्रतिमा बेलनव्हॅली या ठिकाणी मिळाली आहे. त्यानंतर मध्यअश्मयुग आणि नवाश्मयुगातील मातृदेवतेच्या प्रतिमा सापडल्या आहेत. या कालखंडात प्रजोत्पादन महत्त्वपूर्ण होते, कारण हा मानव टोळीत राहत होता आणि टोळीची संख्या वाढणे महत्त्वाचे होते. प्रजोत्पादन, मुलांचे संगोपन करणे, अन्न उत्पादन अशी अनेक 'सृजनशील कामे' स्त्री करीत असे. त्यामुळे तिचे स्थान महत्त्वपूर्ण असावे.

अश्मयुगानंतर ताम्रपाषाणयुगाचे पुरावे आपणास मिळतात. या कालखंडात सिंधू संस्कृती (हरप्पन कल्चर) हा कालखंड भारतातच नव्हे तर जगाच्या संस्कृतीत महत्त्वाचा ठरतो. या संस्कृतीची १५०० गावे भारतात सापडली आहेत तर ५०० गावे पाकिस्तानात सापडली आहेत. या प्रगत संस्कृतीत भाजलेल्या मातीच्या मातृदेवतेच्या अनेक प्रतिमा मिळाल्या आहेत. काही मातृदेवतांच्या प्रतिमांच्या डोक्याच्या दोन्ही बाजूंना लहान लहान दिवे आढळले आहेत. वेळप्रसंगी ते प्रज्वलित केले जायचे हे त्या ठिकाणी आढळलेल्या काजळीवरून लक्षात येते. सप्तमातृका असलेली मुद्राही या ठिकाणी सापडली आहे. नर्तिकेची ब्राँझची मूर्ती या ठिकाणी मिळाली आहे. या कालखंडातील स्त्रियांची स्थिती कशी असावी याचा अंदाज करायचा झाला तर फक्त मातृदेवतेच्या प्रतिमांवरून करता येईल. ताम्रपाषाणयुगीन स्थळांच्या उत्खननातून मातृदेवतेच्या अनेक प्रतिमा मिळाल्या आहेत. यात अहमदनगर जिल्ह्यातील इनामगावचाही समावेश आहे. 'सिंधू लिपी'चे वाचन अद्याप समाधानकारक झाले नसल्याने 'स्त्री-शिक्षण' हा विषय उलगडत नाही. नवीन संशोधनानुसार काही विद्वानांच्या मते सिंधू संस्कृती आणि वैदिक संस्कृती एकच होत्या. असे असेल तर स्त्री-शिक्षणाची पाळेमुळे नक्कीच आपणास येथे सापडतील.

ऋग्वेद कालखंडात खऱ्या अर्थाने स्त्रियांना प्रतिष्ठा होती. धर्मकारण, राजकारण, समाजकारण, ललितकला या क्षेत्रांत तिचा सहज वावर होता. उपनयन संस्कारानंतर तिच्या शिक्षणाची सुरुवात होत असे. स्त्रियांसाठी अथवा मुलीसाठी स्वतंत्र आश्रम असत, यांना 'छात्रीशाळा' असे संबोधण्यात येई. काही कुमारिका संपूर्ण शिक्षण घेत. त्यांना 'ब्रह्मवादिनी' म्हणत. त्यातील काही स्त्रिया शैक्षणिकदृष्टीने त्यांच्या तोलामोलाचा 'वर' निवडीत आणि विवाह करीत, तर काही आयुष्यभर अध्ययन, अध्यापन करीत राहत. या काळात पुरुषांच्या बरोबरीने त्यांना ज्ञान प्राप्त होत असे. ऋषीपदाला पोहोचलेल्या अनेक स्त्रिया या कालखंडात होत्या. त्यांना 'ऋषिका' म्हणत. त्यांची नावे रोमशा, लोपामुद्रा, अपला, काद्रू, विश्ववारा इत्यादी आहेत. ऋग्वेदातील अनेक सूक्तांच्या रचना स्त्रियांनी केल्या आहेत. त्या म्हणजे घोषा, जुहू, वागम्बरीनी, पौलोमी, जरिता, श्रद्धा-कामयानी, उर्वशी, सारंगा, यमी, इंद्राणी, सावित्री इत्यादी. तत्त्वज्ञान, धर्म आणि आध्यात्म या विषयातील चांगले ज्ञान त्यांना होते. वैदिक कालखंडातील परंपरेत यज्ञास महत्त्व होते आणि गृहाग्नीस एकटी स्त्री मंत्रोच्चारासह आहुती देत. एवढेच नव्हे तर स्त्रिया यज्ञकर्मात पौरोहित्यही करीत.

या काळातील स्त्रियांना शिक्षणाची आवड होती. 'घोषा' या स्त्रीने आपणास शिक्षण मिळावे म्हणून ऋग्वेदाच्या एका ऋचेत प्रार्थना केली होती. ऋग्वेदातील ३९ व ४० ही मोठी सूक्ते घोषाने रचली आहेत. लोपामुद्रा हिने पहिल्या मंडलातील १७९ व्या सूक्तांची रचना केली आहे. गृहस्थधर्मात स्त्री व पुरुषांचे अधिकार समान सांगितले आहेत. 'अपाला' हिने आठव्या मंडलातील ९१व्या सूक्ताची रचना केली आहे तर रोमशा हिने प्रथम मंडलातील १२६व्या सूक्ताची

रचना केली आहे. 'इंद्राणी' ही तर स्त्रियांच्या जाणिवेची जागृती करणारी प्रथम स्त्री ठरते. ऋग्वेदाच्या दहाव्या मंडलात ती म्हणते, ''मला पीडा देणाऱ्या आणि उद्ध्वस्त करणाऱ्यांना जिंकून मी माझ्या पतीलाही माझी कर्तबगारी दाखवून देईन.'' 'स्त्री-पुरुष समानता', 'स्त्री-मुक्ती' इत्यादीचा विषय निघाला की, 'इंद्राणी'चे नाव आद्य ठरते. 'सरस्वती' ही सुद्धा ऋग्वेद काळातील ज्ञानी स्त्री होती. ऋग्वेदात असे सांगितले आहे, की शरीर, वाणी, मन, बुद्धीने सरस्वतीने अज्ञानांना शहाणे केले.

काव्यशास्त्रातसुद्धा स्त्रियांचे काम अतुलनीय आहे. तत्त्वज्ञान क्षेत्रातही त्या मागे नव्हत्या. विविध कलांचा त्यांच्या अभ्यासक्रमात समावेश होता. 'यम-यमी संवाद', 'उर्वशी-पुरुखा संवाद' हे नाटक कलेचे प्रतीक मानता येतील, तर 'सामवेदातील' 'संगीतज्ञान' बऱ्याच स्त्रिया आत्मसात करीत होत्या. ऋग्वेदकाळात नृत्याचेही प्रशिक्षण दिले जाई.

या कालखंडातील बऱ्याच स्त्रियांनी युद्धात सहभाग घेतल्याची उदाहरणे मिळतात. शस्त्रास्त्रांचे ज्ञान, युद्धकौशल्याचे शिक्षण या काळात देण्यात येई. 'विश्पला' या स्त्रीने पराभूत पतीला पुन्हा विजय प्राप्त करून दिला. या युद्धात तिचा पाय तुटल्यानंतर तिला धातूचा पाय बसविला असे उल्लेख आहेत. तसेच इंद्रसेना या पराक्रमी स्त्रीमुळे तिच्या पतीला युद्धात विजय मिळाला असा उल्लेख सापडतो.



**शत्रूमर्दिनी आणि पुत्रवल्लभा कोरावली**

ऋग्वेदकाळ हा स्त्री-शिक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतो. बऱ्याच स्त्रिया सर्व विद्या आणि कलेने परिपूर्ण होत्या. शिक्षण घेतलेल्या स्त्रियांना विवाहोत्तर जीवनात मानाचे स्थान मिळत असे. नंतरच्या काळात स्त्री-पुरुष सहशिक्षणाचे उल्लेख आढळतात. कोमदकी, अत्रेयी या स्त्रिया पुरुषांबरोबर शिक्षण घेत होत्या. सर्वसामान्य शिक्षणाबरोबर राज्यकारभार व शस्त्रविद्याही स्त्रियांना देण्यात येत असे. उत्तरवैदिक कालखंडातसुद्धा बऱ्याच स्त्रिया शिक्षण घेत होत्या. उपनिषदामध्ये अध्यापक म्हणून बऱ्याच स्त्रियांचा उल्लेख येतो. एवढेच नव्हे तर सध्या स्त्री-भ्रूण हत्येचे वाढते प्रमाण किंवा मुलगी नको असे म्हणणाऱ्यांनी या कालखंडातील आणि वैदिक कालखंडातील स्त्रियांचा आणि स्त्री शिक्षणाचा जरूर अभ्यास करावा म्हणजे त्यांना स्वतःच्या विचारातील फोलपणा लक्षात येईल. 'बृहदअरण्यक' या उपनिषदात एक लक्षणीय उपचार सांगितला आहे, 'दांपत्याने 'मुलगी' जन्माला यावी आणि ती 'पंडिता' व्हावी म्हणून प्रार्थना करावी.' यावरून 'मुलगी' जन्माला यावी असे नक्कीच आई-वडिलांना वाटत होते. 'सूत्र' कालखंडातील स्त्रियांची शैक्षणिक प्रगती पाहता काही मुद्दे समोर येतात. गृहसूत्रामध्ये असा उल्लेख आहे की, स्वतःच्या पतीसमवेत स्त्री वैदिक मंत्राचा उच्चार करू शकत असे. जैमिनीने, 'पूर्वमीमांसा'त यज्ञामध्ये, धर्मकार्यात बरोबरीचा हक्क द्यावा असे सांगितले आहे. कुमारिकांना विद्या, धर्ममंत्र शिकविले जात असत. विदुषीमुळे तिच्या माहेर व सासरचा उद्धार होई.

पाणिनीच्या कालखंडात स्त्रियांना शिक्षण नाकारले जात नव्हते. स्वतंत्र स्त्री अध्यापक या काळात होत्या. स्त्रियांना लष्कराचे प्रशिक्षण दिले जायचे. पतंजलीने याचे उदाहरण दिले आहे. महाकाव्य कालखंडात, रामायण कालखंडामध्ये स्त्रियांचे शिक्षण समूहात न होता कुटुंबात होत होते. या काळात स्त्रियांवर निर्बंध होते. राजघराण्यातील स्त्रिया शिक्षण घेत. त्यात धार्मिक, नैतिक आणि व्यावहारिक शिक्षणाचा समावेश होता. काही धाडसी मुलींना युद्धाचे शिक्षण दिले जाई. परंतु 'पती व कुटुंबीयांची सेवा करावी' अशी समजाची धारणा होती.

महाभारत कालखंडात स्त्री-शिक्षण अनौपचारिक स्वरूपाचे असे. घरामध्येच तिचे शिक्षण होई. द्रौपदीचे वर्णन 'पंडिता' असे केले जाते. ललित कलांचेही शिक्षण या काळात दिले जायचे. परंतु सर्वच स्त्रियांना अशी संधी मिळत नसावी. त्यामुळे स्त्रिया हळूहळू शिक्षणापासून वंचित राहू लागल्या.

बौद्ध कालखंडातील स्त्री-शिक्षणाचा विचार करताना खालील गोष्टी समोर येतात. सुरुवातीला बौद्ध संघात स्त्रियांना प्रवेश नव्हता. परंतु गौतम बुद्धांच्या पालकमाता 'महाप्रजापती' आणि शिष्य 'आनंद' यांच्या आग्रहामुळे स्त्रियांना संघात प्रवेश मिळाला. नंतर त्यांनी महत्त्वाच्या जागांवर स्त्रियांची नेमणूक केली. तेरा महत्त्वाच्या 'थेरी'चा उल्लेख 'अंगुतराय निकाय' या बुद्धाघोष यांच्या ग्रंथात मिळतो. तसेच 'थेरी – गाथा'मध्ये या स्त्रियांची माहिती मिळते. या स्त्रिया फक्त धार्मिक कार्येच करत नसत तर सामाजिक कार्यांतही त्यांचा वावर असे. अनाथ मुले, विधवा, वृद्ध व आजारी यांचा सांभाळ या थेरी करीत असत. यांची प्रमुख, 'पट्टचारा' ही स्त्री होती. संघाव्यतिरिक्त इतर स्त्रिया ललित कलांचे शिक्षण घेत. यात नृत्य, गायन, वादन यांचा समावेश होता.

गुप्त, वाकाटक, चालुक्य, सातवाहन इत्यादी राजघराण्यांतील ७ स्त्रियांनी स्वतंत्र व समर्थ राज्यकारभार केल्याची उदाहरणे आहेत. चंद्रगुप्ताची कन्या व वाकाटक स्नुषा 'प्रभावती गुप्त' हिने विदर्भावर राज्य केले. तसेच सातवाहन राणी 'नयनिका', धुवदेवीया स्त्रिया 'विजय भट्टारिका' ही एका प्रांताची सुभेदार होती. नंतरच्या काळात मंडन मिश्रा यांच्या पत्नीने शंकराचार्यांबरोबर वादविवाद केला. तसेच प्रसिद्ध संस्कृत कवी राजशेखर यांची पत्नी 'अवंतिसुंदरी' ही कवयित्री होती. 'गाथ सप्तशती'मध्ये 'माधवी', 'शशिप्रभा', अनुलक्षी या कवयित्रींचा उल्लेख आहे. 'कौमुदी महोत्सव' हे नाटक विज्जी, किशोरिका यांनी लिहिले. चालुक्य घराण्यातील 'केटलादेवी' ही तिच्या पांडित्यामुळे 'अभिनव सरस्वती' म्हणून ओळखली जायची. इतकेच नव्हे तर विज्ञानशास्त्रातही स्त्रिया पारंगत होत्या. 'रुसा' नावाच्या स्त्रीने स्त्री-रोगांवर ग्रंथ लिहिला होता.

सातवाहन सम्राज्ञी नागनिका ही महाराष्ट्राचीच नव्हे तर अखिल हिंदुस्थानच्या इतिहासातील आद्य स्त्री-राज्यकर्ती ठरावी. नागनिका ही 'अंगिककुल वर्धन' वंशातील महारथीची कन्या होती. तिचा विवाह सातवाहन राजा 'श्री सातकर्णी' (सिरिसातकर्णी) याच्याबरोबर झाला. तिला स्कंदश्री, वेदिश्री, शक्तीश्री, अथवा हकुश्री ही मुले होती. पती श्री सातकर्णी याच्या निधनानंतर न डगमगता तिने यशस्वीपणे राज्याची धुरा सांभाळली. राणी नागनिका ही अतिशय पराक्रमी, खंबीर वृत्तीची व दानशूर होती. पतीच्या निधनानंतर संन्यस्त वृत्तीने तपस्विनीप्रमाणे ती प्रासादात राहत असे. ती अनेक व्रत-वैकल्ये करीत असे. हत्ती, घोडे, रथ, कार्षापण, सोने, चांदी इत्यादींचे अनेकदा दान तिने दिले होते. राणी नागनिकेने अनेक यज्ञ केले होते. त्यात श्रौतयाग, दोन अश्वमेध व एक राजसूय यज्ञ केल्याचा उल्लेख तिच्या नाणेघाटाच्या शिलालेखात आढळतो.

श्री सातकर्णी व नागनिका यांचे चांदीचे संयुक्त नाणे सापडले आहे. तसेच नाणेघाटातील लेखात सातकर्णी आणि नागनिकेची प्रतिमा कोरली आहे. यावरून त्या वेळच्या राज्यकारभारात राणी नागनिकेचे महत्त्व स्पष्ट होते. नाणेघाट येथील गुहा लेखावरून राणी नागनिकेची माहिती इतिहासास झाली. हा लेख जुन्नरच्या वायव्येस जवळजवळ २७ कि.मी. अंतरावर एका गुहेत आहे. कल्याण ते प्रतिष्ठान (पैठण) या प्राचीन मार्गावर नाणेघाटात डोंगर फोडून रस्ता तयार केला होता. या गुहेत सातवाहन सम्राज्ञी नागनिका, सम्राट सातकर्णी, श्री सातकर्णी व युवराज स्कंदश्री यांचे पुतळे उभारले आहेत. पुतळ्यांच्या खाली पट्टीवर नाव कोरले होते. दुर्दैवाने आज हे पुतळे अस्तित्वात नाहीत. या मार्गावर पिण्याच्या पाण्यासाठी टाकी बांधली होती. तसेच मार्गाच्या तोंडाशी जकातीसाठी दगडी रांजण होता. नाणेघाटातील शिलालेख हा गुहेच्या



**शत्रूमर्दिनी**

भिंतीवर लिहिला असून त्याची लिपी ब्राह्मी आहे. हा लेख नागनिकेच्या काळातील आहे. या लेखात तिने केलेले कार्य वर्णिले आहे. तिने केलेले यज्ञ, दान यांचा उल्लेख लेखात आहे. तिचे महान कार्य जनतेसमोर राहावे म्हणून व्यापारीमार्गावर हा लेख कोरला आहे.

राणी नागनिकेस 'नाग-वरदायिनी' 'गृहतापसी', 'मासोपवासिनी', 'चरितब्रह्मचर्या' अशी विशेषणे लावली आहेत. यावरून ती किती तापसीवृत्तीची व वैराग्यपूर्ण होती हे दिसते. राजवाड्यात राहून राज्यकारभार सांभाळत सन्यस्तवृत्तीने राहण्याचे कठीण काम ती करत होती. पतीच्या मृत्यूनंतर यशस्वीपणे राज्यकारभाराची धुरा तिने वाहिली. तिचा कालखंड साधारणपणे इ.स.पू. पहिल्या शतकाचा द्वितीयार्ध मानला जातो. नागनिका विद्या, युद्धशास्त्र, राजकारण यात परिपूर्ण होती.

प्राचीन भारतात अशा अनेक शूर स्त्रिया होऊन गेल्या. त्यापैकी आणखी एक म्हणजे वाकाटक सम्राज्ञी 'प्रभावती गुप्ता'! प्रभावती गुप्त ही गुप्त सम्राट चंद्रगुप्त द्वितीय व महाराणी कुबेर नागा यांची कन्या होय. विदर्भावर वाकाटक व उत्तरेवर गुप्त एकाच वेळी राज्य करीत होते. बलाढ्य गुप्त साम्राज्यासमोर वाकाटक हे कधीच नमले नाहीत. या सुमारास मावळ व सौराष्ट्रावर शक क्षत्रप राज्य करीत होते. या परकीय सत्तेविरुद्ध चंद्रगुप्त द्वितीय याने युद्ध पुकारले. या युद्धात वाकाटक राजा पहिला पृथिवीषेण याने गुप्तांना मोलाची मदत केली आणि त्यामुळेच शक क्षत्रपांचा पराभव झाला. यानंतर गुप्त घराणे व वाकाटक घराणे यांचे सहकार्य वाढतच गेले. नंतर या मैत्रीचे रूपांतर त्यांनी नात्यात करून घेतले. प्रथम पृथिविषेणाचा मुलगा द्वितीय रुद्रसेन याचा विवाह चंद्रगुप्ताची कन्या प्रभावती गुप्त हिच्याबरोबर झाला. त्यामुळे राजकीय ऐक्य निर्माण झाले.

या विवाहाच्या कथेवरच महाकवी कालिदास यांचे 'मालविकाग्निमित्र' हे नाटक आधारित आहे. द्वितीय रुद्रसेनाचे राज्यारोहणानंतर लवकरच निधन झाले. प्रभावतीने पतीच्या निधनानंतर मोठ्या धैर्याने आणि हिमतीने अज्ञान मुलगा दिवाकरसेन याच्या नावावर राज्यकारभार पाहिला. दिवाकरसेन हा अल्पायुषी ठरला. नंतर आपला दुसरा मुलगा दामोदरसेन अथवा द्वितीय प्रवरसेन याला तिने गादीवर बसविले. कविकुलगुरू कालिदास याच काळात विदर्भात होता. पतीच्या मृत्यूनंतर लगेच मुलाचा मृत्यू, दुःखाचे डोंगरावर डोंगर पचवीत तिने राज्यकारभार केला. तिच्या कर्तृत्वास तोड नाही. वाकाटक घराण्याच्या काळाबद्दल इतिहासकारांत मतभेद आहेत. प्रभावती गुप्ता हिचा कालखंड सर्वसाधारणपणे इसवी सन ४०५ ते ४२०-४२५ असावा असे इतिहासकार मानतात. 'पुणे ताम्रपटा'वरून प्रभावती हिची जास्त माहिती इतिहासास मिळाली. हा ताम्रपट पुणे येथे मिळाल्याने त्याला पुणे ताम्रपट म्हटले जाते. या ताम्रपटात प्रभावती हिने गावे दान केल्याचा उल्लेख आहे. ताम्रपटावरील मुद्रा ही तिची स्वतःची व मुलाची अशी होती. तिने स्वतंत्रपणे ताम्रपट दिला, यावरून राजकारणातील तिचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. या ताम्रपटात तिने माहेरच्या घराण्याची वंशावळ दिली आहे आणि स्वतःचे नावही पहिले म्हणजे माहेरचे 'प्रभावती गुप्त' हे कायम ठेवले आहे. प्राचीन भारतातील स्त्री-पुरुष समानतेचे हे एक चांगले उदाहरण आहे. प्रभावतीसुद्धा राजकारण, युद्धनीती, समाजकारण आणि विद्याभ्यासात पारंगत होती.

९व्या ते १३व्या शतकामध्ये निर्माण झालेल्या मंदिरांच्या बाह्यांगावर 'लेखीका' नावाची सुरसुंदरी असते. स्त्रियांना लिहिता-वाचता येत होते याचा धडधडीत पुरावा आपल्यासमोर आहे. या सुरसुंदरीस 'क्षीरार्णव', 'शिल्पप्रकाश' या ग्रंथात पत्रलेखिका म्हटले आहे. परंतु याही पुढे जाऊन असे म्हणायला काहीच हरकत नाही की त्या स्त्रिया ज्ञानी होत्या आणि ग्रंथ निर्मितीही त्यांच्याकडून झाली असावी. स्त्री शिक्षणाचा उत्कृष्ट पुरावा आपल्याला पाहावयास मिळतो. तसेच सौंदर्यवती बुद्धिमान असू शकते याचा नमुना या शिल्पात पाहावयास मिळतो. या सुरसुंदरी लातूर, कोरवली (सोलापूर), धर्मपुरी, खिद्रापूर आणि महाराष्ट्राच्या इतर अनेक ठिकाणी पाहावयास मिळतात.

पूर्व मध्ययुग भारतीय इतिहासाच्या दृष्टीने अंध:कारयुगच होते. मुसलमान राजवटीतील एक तारा म्हणजे 'रझिया सुलतान' होय. ही अल्तमशची मुलगी होती. ती अत्यंत कर्तबगार स्त्री होती. अल्तमशने आपल्या हयातीमध्येच रझियाला आपला वारस नेमले होते. अल्तमशचा मोठा मुलगा मृत्यू पावला होता आणि धाकटा अत्यंत विलासी होता. म्हणूनच रझियाने आपल्यानंतर राज्यकारभाराची धुरा सांभाळावी अशी अल्तमशची इच्छा होती. परंतु अल्तमशच्या मृत्यूनंतर अमिरांनी फिरोजशहा याला गादीवर बसविले. त्याने सहा महिने कसेबसे राज्य केले. त्याच्या राज्यात सर्वत्र बंडाळ्या होऊ लागल्या. राज्याची स्थिती अत्यंत खिळखिळी झाली म्हणून शेवटी रझियाला गादीवर बसविण्यात आले. रझियाने इ.स. १२३६ ते १२४० राज्यकारभार पाहिला.

रझिया अत्यंत पराक्रमी होती. तिने सर्व बंडाळ्या मोडून काढल्या आणि परिस्थितीवर नियंत्रण मिळविले. एका स्त्रीने राज्य करण्याची मुसलमान जगतात ही पहिलीच घटना

असल्याने सनातनी मुस्लिमवर्ग दुखावला गेला. पुरुषी अहंकाराने रझियाला पदच्युत करण्यासाठी अनेक कटकारस्थाने रचली. शेवटी सर्व परंपरावाद्यांनी एका कर्तबगार स्त्रीस पदच्युत करण्यात धन्यता मानली. रझियाने प्रतिकूल परिस्थितीत राज्यारोहण केले आणि राज्यघडी अतिशय व्यवस्थितपणे बसविली. अत्यंत सुरळीतपणे चार वर्षे तिने राज्य पाहिले. मध्ययुगात एका सनातनी वर्गात राहून यशस्वीपणे राज्य करणारी रझिया ही वेगळी स्त्री होऊन गेली. त्याचप्रमाणे चाँदबिबीला लहानपणापासूनच वडिलांकडून राजकारणांचे धडे मिळाले होते. ती युद्धक्षेत्र, कला यातही प्रवीण होती. तिचे विविध भाषांवर प्रभुत्व होते. विजापूरचा अली अदिलशहाबरोबर तिचा विवाह झाला होता. अली अदिलशहा प्रत्येक महत्त्वाच्या घटनेमध्ये चाँदबिबीचा सल्ला घेत असत. पतीच्या निधनानंतर, स्वतःला मुलगा नसल्याने, पुतण्यास गादीवर बसवून तिने निर्धाराने राज्यकारभार चालविला होता.

'थोर पुरुष हे इतिहास घडवितात परंतु त्यांच्या माता या त्यांना घडवितात!' राजमाता जिजाबाई यांनी शिवाजी महाराजांच्या अंगी पराक्रम, स्वराज्य निर्माण करण्याची जिद्द, सहिष्णुता हे सर्व गुण जडविले. जिजाऊ या संस्कृतमध्ये पारंगत होत्या. आग्र्याला जाताना शिवाजी महाराजांनी संपूर्ण राज्यकारभार जिजामातांवर सोपविला होता. शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करावयास लावून 'स्वराज्याचा राज' बनविले व नंतर अवघ्या १४ दिवसांनी जिजाऊंनी आपला देह ठेवला. न्यायी, दानशूर, उत्तम प्रशासक या गुणांमुळे अहिल्याबाई होळकर ओळखल्या जातात. सासरे मल्हारराव यांनी सुनेची हुशारी ओळखली व सासऱ्यांच्या निगराणीत अहिल्याबाई पत्रव्यवहार, सैन्याच्या व्यवस्थेचे काम, सारा वसुली इत्यादी कामे जबाबदारीने पार पाडत. वयाच्या अवघ्या २०व्या वर्षी वैधव्याची कुऱ्हाड त्यांच्यावर कोसळली. परंतु त्या डगमगल्या नाहीत. त्यांनी राज्यकारभाराची सूत्रे स्वतःच्या हाती घेऊन प्रशासन व्यवस्था उत्कृष्टपणे हाताळली होती. कोलकता ते बनारस हा रस्ता त्यांनी करविला होता. पती व पुत्राच्या निधनानंतरही त्यांनी उत्तम प्रशासक, न्यायी, पराक्रमी, धार्मिक वृत्ती जोपासली होती. याशिवाय येसूबाई, ताराबाई आणि नंतर गोपिकाबाई या शिक्षित आणि उत्तम प्रशासक होत्या.

भारतीय स्वातंत्र्यचळवळीत अनेक स्त्रियांनी भाग घेतला होता आणि त्या यशस्वी ठरल्या होत्या. राणी लक्ष्मीबाईंचे कार्य न विसरता येण्यासारखेच आहे. राणी लक्ष्मीबाई व कित्तुरची चेन्नम्मा राणी या दोघीही युद्धकलेमध्ये निपुण होत्या. ब्रिटिशांच्या विरुद्ध कॅप्टन लक्ष्मी, राजलक्ष्मी पंडित, ॲनी बेझन्ट यांचे कार्य अतुलनीयच होते. भारतीय राजकारणात इंदिरा गांधी यांनी आपल्या धाडसी व धडाडीच्या निर्णयांमुळे वेगळा ठसा उमटविला आहे. सुशिक्षित, सुसंस्कृत अशा इंदिरा गांधींनी मुत्सद्दीपणाने राजकारणावर तसेच संपूर्ण देशावर नियंत्रण मिळविले होते. अर्वाचीन कालखंडातील कर्तृत्ववान स्त्रियांचा परिचय सर्वांनाच असल्याने इथे सर्वांचाच आढावा घेणे शक्य होणार नाही.

भारतावर ग्रीक, शक, कुशाण, हुण आणि नंतर मुस्लिम यांची सतत आक्रमणे होत गेली. विशेषतः मुस्लिम काळात स्त्रीवरील अत्याचाराचे प्रमाण पुष्कळ वाढले. यामुळे स्त्रियांना संरक्षण देण्याची गरज भासली असावी आणि तिला चार भिंतीचे क्षेत्र आखून देण्यात आले आणि ते शतकानुशतके तसेच राहिले. ही परिस्थिती बदलण्याची गरज कुणाला वाटली नाही हे नवल आहे. उलट, नंतरच्या काळात स्त्रियांवरील बंधने अधिकच दृढ झाली. अंधश्रद्धा, कालबाह्य रूढी, परंपरा यांची ती कायम शिकार होऊन बसली. 'चूल आणि मूल' इतकेच तिचे विश्व बनविले गेले. शिक्षणाचे दरवाजे तिच्यासाठी कायम बंद झाले. 'सती', 'केशवपन', 'बालविवाह' इत्यादी जाचक चाली तिच्यावर लादण्यात आल्या. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रज राजवटीमध्ये राजा राममोहन रॉय यांनी प्रयत्नपूर्वक सतीची अनिष्ट चाल कायद्याने बंद करावयास लावली. 'स्त्री-शिक्षण', महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, न्यायमूर्ती रानडे यांच्या अथक प्रयत्नानंतर सुरू झाले. डॉ. आनंदीबाई जोशी पहिल्या महिला डॉक्टर ठरल्या. स्त्रिया परदेशी जाऊन शिक्षण घेऊ लागल्या. राज्यकारभार, शासकीय सेवा, कला, सामाजिकशास्त्रे, लष्कर, विज्ञान, अवकाश, पुरातत्त्वशास्त्र यांसारख्या क्षेत्रांत आज महिला कार्यरत आहेत.

प्राचीन भारतातील 'स्त्री-शिक्षणाचा वारसा' आजची स्त्री चालवीत आहे. भ्रष्टाचार, अत्याचार, स्त्री-भ्रूणाची हत्या, दडपशाही, अन्याय या सर्वांवर मात करत तिला विज्ञानयुगात उज्ज्वल भवितव्याकडे जायचे आहे.

**डॉ. माया पाटील (शहापूरकर)**
७०१, नेचर पॅराडाईज अपार्टमेंट,
जिल्हा उद्योग केंद्राच्या पाठीमागे,
होटगी रोड, सोलापूर - ४१३ ००४
दूरध्वनी : ०२१७-२६०१९६४
mayajagdish@hotmail.com

प्रत्येक अर्जुनाला कृष्ण लागतो, तसा प्रत्येक कृष्णालाही एक अर्जुन लागतो...




आंतरराष्ट्रीय रहस्याचा सनसनाटी
भेद करणारी कादंबरी

# लॉक ग्रिफिन

वसंत वसंत लिमये

मूल्य ५०० रु. ● सवलतीत ३०० रुपये

आउशवित्झ छळछावणी

# नाझी नरसंहार

कुमार नवाथे

नव्या स्वरूपातील तिसरी आवृत्ती




मन गोठावून टाकणारी नाझी क्रौर्याची
भयानकता प्रकट करणारे, वेगळे
संदर्भमूल्य असलेले पुस्तक

मूल्य १५० रुपये
सवलतीत १०० रुपये

# कवितेचं व्यासपीठ

**गालिब आम्हाला माफ कर!**

पंधरा मिनिटांत शिकलो आम्ही
लघु-गुरू मोजायला,
बहर-काफिया-रदीफ, अर्ध्या दिवसात.
एका दिवसात आम्ही गझल आत्मसात केली.
अशीच राहिली चढती कमान,
वर्षभरात काढला 'दीवान!'

तुला आमची गझल उथळ वाटली तर-
गालिब आम्हाला माफ कर!

एकेका खयालासाठी
तू किती थांबायचास
एकेका शब्दासाठी किती झुंज द्यायचास
कोंदणात हिरा बसवावा, तसा तुझा काफिया!
तुझ्याकडे वेळ होता, आमच्याकडे वेग आहे
गझल लिहिण्याआधीच, आमची पिढी
काफियाचे शब्द काढून तयार आहे
कारागिरीला असा कितीसा वेळ लागतो?

शेरामागून शेर आम्ही लिहीत जातो भरभर-
गालिब आम्हाला माफ कर!

'कौन जीता है तेरी जुल्फ के सर होनेतक'
असं तू म्हणालास आणि चिरंजीव झालास!
तुझे कित्येक शेर अमर
आम्ही म्हणजे एका मोसमातला बहर!
गालिब तुझी जन्मतिथी आम्ही नेहमीच विसरतो
तुझी पुण्यतिथी मात्र, रोजच साजरी करतो!
तुला समजून घ्यायला लोकांना वेळच नसतो
आता गावोगावी मुशायऱ्यातून आम्हीच गाजत असतो!

दाद येते, वाहवा होते, आमच्यासाठीच होत राहतो टाळ्यांचा गजर
गालिब आम्हाला माफ कर!!

**सदानंद डबीर**
१ बी/२०६ विमान-दर्शन, जीवा महाले मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००६९
भ्रमणध्वनी : ९८१९१७८४२०



**डोलारा वैश्विकतेचा**

नाही बसत कावळा छतावर
बांधीत नाहीत चिमण्या घरटे,
आता माणसांच्या घरात

दिसत नाहीत त्यांना
आलोखीनं ओथंबलेले डोळे
टीव्हीतून तरंगणाऱ्या स्वप्नांवर
पेंगत असतात
संवादांना पारखी झालेली मुले

हेतूंशी हितगुज करणारी माणसं
झालीत उसंतीला मोताज
फुटकळींनी व्यापले कोपरे
राहिला ना घराला आपला आवाज

कुणी केली चिन भिन मातीच्या वैभवाची?
उभारला डोलारा वैश्विकतेचा
जुळल्या न तारा मनाशी मनाच्या

**अशोक कोतवाल**
'संदर्भ', ४८/१/५४, ब्लॉक क्र. ६,
शिवा अपार्टमेंटजवळ, शिव कॉलनी, जळगाव-४२५००२
भ्रमणध्वनी : ९८५०११७५३९



## ब्रेक अप

खूप जपलं
सावरलं सतत
शेवटी तुटलंच...
आले आवंढे अनावर
अश्रू डबडबले
पण
मानावंच लागलं, की
झालं हेच खूप झालं
खूप खूप सोसून झालं
समजावलं स्वत:ला
जे झालं, ते बरंच झालं
सुरुवात होते ना,
तर शेवटही ठरलेलाच
निरंतर असं काय असतं...
आठवणींखेरीज?

आता, वाट पाहणं संपलं,
'किती बोलू... काय बोलू...' संपलं
आठवणीत झुरत राहणं... संपलं
आता,
मनातले हिंदोळे...
हळूहळू, तेही... थांबून जातील

**उषा मेहता**
१६-२७ शिवाजी पार्क,
मुंबई-४०० ०२८
दूरध्वनी : २४४६१९९१

## अशी झुंज माझी

किती भांडलो मी
माझ्या घरात
खुपसुनी आहे
मला मी उरात

खुज्या-ठेंगण्यांची
सावली ही नसावी
दुर्दम्य अपुली
इच्छा असावी

नको त्या ठिकाणी
झुकून वाकलेली
ताटात त्यांच्या
प्रतिमा नसावी

अशी झुंज माझी
मज बळ देत आहे
उंचावरी ती मज
नेत आहे

अशी साथ माझी
मला ही असो
किती तापलेली
मग माती असो

**श्रीपाद भालचंद्र जोशी**
१०५, संकल्प सहनिवास,
४०, खरे टाऊन, धरमपेठ,
नागपूर-४४०१०
दूरध्वनी : (०७१२) २५२५३१५
भ्रमणध्वनी : ९९६०४९३६२२





## गाथा सप्तमी

माझ्या मायची कहाणी
साऱ्या दु:खाच्या डागण्या
रात सरेल काळाची
विझू जातील चांदण्या

माझ्या मायची कहाणी
गुराढोराचं जगणं
तळहातीपायी फोड
पाठी आसुडाचे व्रण

माझ्या मायची कहाणी
दऱ्या-डोंगराशी झुंज
चिलीपिली पाठंगुळी
तिनं रांधलं काळीज

माझ्या मायची कहाणी
रातझडीचा पाऊस
अशी बसून राह्याची
पुन्हा उगेतो दिवस

माझ्या मायची कहाणी
गाथा सप्तमीच्या शत
तिच्यापुढे आदरानं
व्हावं पुन्हा पुन्हा नत

**शशिकांत शिंदे**
आरण्यक, पाटीलबानगर, मु.पो. कोळघर,
ता. राहाता, जि. अहमदनगर-४१३७१०



## ...आणि कस्तुरबा हसल्या!

साबरमतीच्या किनारी, महात्मा दाखवीत होते संगणक कस्तुरबांना!
म्हणाले, 'चल, आज आपण गुगलवर जाऊ'
या २०१२ साली पोरबंदर, मुंबई, लंडन, डरबन, वर्धा, नौखाली, पुणे
सगळीकडे काय चालले आहे ते पाहू!

सारे पाहून, वाचून गांधीजी स्तब्ध झाले
त्यांचेच अहिंसेचे तत्त्वज्ञान परत कस्तुरबांना ऐकवले
म्हणाले, 'बा, अहिंसेने नाही मिळणार मोक्ष, हवे भावरूप प्रेम!
अहिंसा म्हणजे शेळी-वाघाच्या एका ताटातला सर्कशीतला खेळ नाही!
चराचरावर प्रेम म्हणजे अहिंसा, दैवी वृत्ती, द्वेषापेक्षा प्रेम म्हणजे अहिंसा!
कर्तव्यपराङ्मुख होऊन सत्यशोधन नको, विश्वप्रेमाला कुठली मर्यादा, बा?

हे काय दिसते आहे, धुंदी, द्वेषाची, रक्ताची, अहंकाराची?
बा, हे संगणक काय दाखवणार मला? कशाला उघडू स्वदेशी डॉट कॉम?
अस्पृश्यता डॉट कॉम, सर्वधर्मसमभाव डॉट कॉम, शरीरश्रम डॉट कॉम,
अभय डॉट कॉम?
त्यापेक्षा मी गात राहीन - 'हे राम, हे राम, हे राम'

कस्तुरबा उठल्या, महात्म्याकडे पाहून स्मितहास्य केले आणि म्हणाल्या,
'उठा बापू, उठा, परत लढा, सुरू करा परत दांडी मार्च, नौखाली यात्रा सुरू करा,
एक नाही, शंभर नथुराम येतील. बापू, विश्वधर्म आणि मानवता त्यांची पिस्तुले
आणि बॉम्ब निकामी करतील.
एकला चला रे..'!
गांधीजी उठले, परत काठी घेऊन झपाझपा चालू लागले परत नवा दांडी मार्च!
कस्तुरबांनी स्मित केले आणि पोखरणला बुद्ध हसला,
'हे राम! हे राम! हे राम!'

**संध्या जोशी**
१७, रुक्मिनी निवास,
१३५, सेनापती बापट मार्ग,
दादर, मुंबई-४०००२८
भ्रमणध्वनी : ९८३३८५२३७९
ssjmumbai@yahoo.com

## लालसा

आपण इतक्याही उंचावर
जाऊन बसू नये
की खालच्यांना आपला
चेहराही दिसणार नाही
उंचावर जावं आपण
पण खालच्यांच्या नजरेच्या
कक्षेत असावं.
खरं म्हणजे...
आपणच उतरून खाली यावं
इतरांना आपला चेहरा दिसण्यासाठी.
आपल्यातली उंच जाण्याची लालसा
दिवसेंदिवस आपल्याला
उंच-उंच नेत असते हे खरे
मात्र...
खालच्यांच्या नजरेत आपण
कितीही उंच गेलो तरी
पुसट होत असतो
हेही तेवढेच खरे!

**सुरेश पाचकवडे**
'शिवदया', राऊतवाडी,
अकोला-४४४००५
भ्रमणध्वनी : ९८२२७१६५८२



## प्रिय मुला...!



प्रिय मुला,
तुला मी लिहितो आहे
समजावतो आहे
तू वाचशील, ऐकशील : मला विश्वास आहे!

तू माझं बोट धरून चालत असताना
तेव्हापासून आपले भावबंध
आता तुझ्या तरुणाईचं भावविश्व वेगळं
आणि तू नकळत दूर होत गेलास

हे एकविसावं शतक म्हणजे कॉम्प्युटरयुग
इंटरनेट ते फेसबुक तुझ्या कीबोर्डवरून बोटांच्या एका इशाऱ्यावरून
अख्खं जग तुझ्यासमोर असतं
त्यातलं तुला काय घ्यायचं ते तू ठरव
परंतु
या जगात वावरताना वास्तवाचा सामना करताना
जाशील तिथं स्वत:च्या कार्यकर्तृत्वानं
प्रामाणिकपणाची, स्वाभिमानाची छाप उमटव

प्रिय मुला,
इथं सत्य निर्विवाद आहे : 'सत्यमेव जयते'
त्याची कास सोडू नको
आयुष्यात माणुसकी महान आहे
श्रीमंतीच्या मागे लागण्यापेक्षा मनाची श्रीमंती बाळग
सामाजिकता आणि परोपचाराची जाणीव ठेव
यात तुला आयुष्यभर मानसिक समाधान मिळेल

एक सांगायचं म्हणून सांगतोय
आजचा काळ गतिमान घोड्यासारखा आहे
जो काळाबरोबर धावेल तो जिंकेल
इथे यशस्वी होण्यासाठी प्रत्येक पावलोपावली स्पर्धेत चुरस आहे
प्रयत्न केलास तर तुला यश मिळेल
याचा मला विश्वास आहे!

प्रिय मुला,
आजच्या युगातल्या खाजगीकरण, उदारीकरण आणि
जागतिकीकरणाच्या माहोलात तू कुठे असशील
सध्या अर्थकारणाची संहिता बिघडलेली आहे; स्वत:ला सावर
तू कुठल्या इंडस्ट्रीमध्ये, मॉलमध्ये की
आणखी कुठे रमला आहेस; हे मला ठाऊक नाही
तुझी पिढी खूप पुढे वेगानं गेली आहे
आमच्या जमान्यात जे खायला, पाहायला, ऐकायला
मिळालं नाही; ते तुला विनासायास मिळालं
गरिबी आणि दारिद्र्य तुला अनुभवायला मिळालं नाही
ही आंबेडकरी विचारधारेची फलनिष्पत्ती म्हणायची
हे ऋण तू विसरू नको

प्रिय मुला,
इथल्या भंपक, पोटजाळू, दलाल राजकारण्यांच्या मागे
'झिंदाबादऽ,... मुर्दाबाद' म्हणत तू एक कार्यकर्ता म्हणून
तू उभा राहू नकोस
याशिवाय,
या देशातल्या बाबा, बुवा यांची बंडल प्रवचनं किंवा त्यांचे सत्संग
अशा फालतू भानगडीत पडू नये, अशा कर्मठ, सनातनी लोकांची
संगत धरू नकोस
तू तर शाहू, फुले, आंबेडकर यांच्या प्रगल्भ प्रणालीच्या रस्त्यावर
चालत राहा
स्वत:ला समृद्ध करून घे
बस्स... एवढंच तुला सांगायचं होतं!

**बबन लोंढे**
२५/१ सम्राट अशोकनगर को-ऑप-हौ.सो.
शेल कॉलनी रोड, चेंबूर, मुंबई-४०००७१
भ्रमणध्वनी : ९८९२९३७५०८



## अळुमाळू

नको पिऊ बाई वारा
त्याचा उनाड स्वभाव
पदरात शिरुनिया
खेळेल गं लपंडाव

गमतीच्या सलगीने
लुटू पाहील ऐवज
भुरूभुरू उडवील
केसांसंगे तुझा साज

राहू नकोस बेसावध
त्याला नाही धरबंध
चारचौघांत सरळ
हिसकेल देहगंध

भरलेला घडा तुझा
नको देऊस हिंदळू
निसरडी झाली वाट
वय तुझे अळुमाळू

वारा भारी चवचाल
नको धरूस भरवसा
ज्यास नाही बिढार तो
ठेवील तुला कुठे कसा

**गोविंद मोतलग**
श्रीकृपा, सावंतवाडी,
रणपिसेनगर, अकोला-४४४००५
भ्रमणध्वनी : ९४२०८३९५७५

## भेगा

पोतारून पोतारून
पोपडा धरलेल्या भिंती
गळक्या छताखाली
ओली झालेली चूल
धाकट्या भावाचा बाही फाटलेला सदरा
नि मायचा ठिगळ लावलेला पदर
दुष्काळात जमिनीला पडलेल्या भेगा
तशा बापाच्या पायाला
नांगरटीत रक्तबंबाळ झालेल्या
घरभर इतस्तत: विखरून पडलेलं
माझं दारिद्र्य
मी सांधत राहिलो आयुष्यभर

मी सांधत राहिलो आयुष्यभर
पोपडा झालेल्या भिंतीचा
कोपरानं कोपरा संगमरवरी दगडानं..
धाकट्या भावाचा फाटका सदरा
नि मायचा फाटका पदर
त्याला मखमली जरतारी किनार
उसवलेलं दु:ख आणि दारिद्र्य शिवून टाकलं
गुंफून टाकली एक मखमली चादर

मी सांधत आलो सारं काही
पण मला माफ कर
माझ्या जन्मदात्या बापा!
तुझ्या पायाला पडलेल्या भेगा
मला सांधता आल्या नाही

**रमेश पवार**
अमळनेर
भ्रमणध्वनी : ९७६३७८५७५१

## दर्शन

पुरे झाले आता
झारा-येरझारा
जीवाला किनारा गवसेना..

किती नश्वराचे
जपू अहंपण?
वाळूचे मचाण कलंडेल..

दु:ख तसे सुख
भ्रमाची पालखी
उगा चिंता केली वैभवाची..

खोल अंतर्यामी
नेणिवेची काच
पाहीन मलाच अंतापार..

त्याच दर्शनाशी
वेडावला प्राण
अंतरी गगन वितळले!

**बबन सराडकर**
भ्रमणध्वनी : ९९७०९०९७०९



## रक्त जळुनिया लाल...

रक्त जळुनिया लाल
रंग मातीला हिरवा
नेतो लुटुनी शेताला
सूर्यकिरणांचा थवा

सूर्यकिरणांचा थवा
कोण्या पकडू जाळ्यात
कसा ढकलावा सूर्य
काळ्याजांभळ्या ढगांत?

काळ्याजांभळ्या ढगांनी
अशी विणावी हो जाळी
तशी पिकाला पाहिजे
पाण्यासवे ऊनपाळी

पाण्यासवे ऊनपाळी
सारं रान हे खाताना
शब्द शब्द कवितेचा
माझा गल्लोर होताना

शब्द गिल्लोर तुक्याचे
किती हळवे हळवे!
तेव्हा उन्हाचीच माया
साऱ्या रानाला फळवे...!!

**प्रशांत केंदळे**
९, निधी पार्क,
गणेश व्यायामशाळेसमोर,
सैलानी बाबा, जेलरोड,
नाशिक-४२२१०१
भ्रमणध्वनी : ८०८७१७२२४१



## अश्रू भिजला आनंदोत्सव

आयुष्याच्या अंगणात बागडणारी चिमणी
चिवचिव करत घर करते हृदयात नकळत
माझे थकलेले पाय जेव्हा वाजतात अंगणात
डुचमळलेल्या पेल्यातून पाणी आणते धावतपळत

मांडीवर बसवून मोजलेले चिऊकाऊचे घास
कुशीत निजण्याआधी धरलेल्या परीकथेचा ध्यास
नाजुकसं बोट धरून शाळेच्या रस्त्यावर चालताना
मलाही आठवला माझ्या बालपणीचा वास

ऋतू येतात-जातात, थांबत नाही कधीही
मात्र अकस्मात हसतो वसंतातल्या हळदीचा रंग
अन् बघता बघता तू मोठी होऊन...
होतेस केशरगर्द फुलारलेल्या पळसात दंग

तुझ्या नितळ तळव्यावर गर्द मेहंदी रंगली
माझ्या अंगणात आंब्याची डहाळी सजली
मांडवाखाली बघ सारी वरात जमली
का गं चिमणे, तुझी-माझी पापणी भिजली?

चारा खा पाणी पी भुर्रकन उडून जा
इतका सोपा अर्थ काढू नकोस पोरी
काळजाचा तुकडा जपण्यासाठी...
ह्या बापाजवळ नाही तिजोरी...!

**किरण शिवहर डोंगरदिवे**
समतानगर, मेहकर
भ्रमणध्वनी : ७५८८५६५५७६
kdongardive@gmail.com

## सावली

मी एकटाच चाललोय
सोबतीला फक्त माझी सावली
पांगणाऱ्या सांजउन्हात
सावली मोठी मोठी होत चाललीय
आता तिचीच मला भीती वाटतेय
माझा कुणी पाठलाग करतंय की काय...
क्षितिज लालजर्द झालंय
दुःखाच्या जाळासारखं
की माझंच सरण
धडधडून पेटताना मी पाहतोय...
चालता चालता पावलं दचकतात
पायाखालची जमीन तर खचणार नाही
इतक्यात हळुवारपणे
सांजवारा गुणगुणत येतो
आपुल्या पहिल्यावहिल्या भेटीचं प्रणयगीत
क्षितिजावरचा दुःखाचा जाळ
अदृश्य होऊ लागतो
तिथं शांतपणे पेटू लागतो
आपुल्या सप्तपदीसाठी केलेला लज्जाहोम
मावळतीचं सूर्यबिंब दिसू लागतं
तुझ्या ललाटावरल्या कुंकवासारखं
आता माझ्याबरोबरची सावली
तूच असतेस जन्मजन्मांतरासाठी!

**बाळ राणे**
१३ बी/८, सेंट्रल पार्क,
छत्रपती शिवाजी मार्ग,
बोळिंज, विरार (प)-४०१३०३
भ्रमणध्वनी : ९९६०४९६५६८



## अधांतरी

कळलं होतं मला
की माझं जीवन
माझ्यासाठी नाही आहे
तरीही जगण्याची वांझोटी वासना
पिडत राहिली दररोज

पोटातल्या भुकेसाठी
दाही दिशा वणवणताना
मनातला वणवा पेटतच राहिला
आणि आभाळ गोठून डोळ्यांत उतरलं तरीही
माझी हताश आसवं साकळली नाहीत जराही

आता रस्ते गुणगुणत चालतात
माझ्या पायांच्या तालावर
आणि हातावरच्या रेषा नाचत राहतात
मनस्वी गाण्यांच्या ठेक्यावर

मात्र गहिवरल्या नजरेमधून
हरवत चाललेल्या गर्दीत
माझ्या दुखावलेल्या भावनांचं
सांत्वन करीत फिरताना
माझ्या आयुष्याची भीक मागतोय मी
जगण्याच्या वाटेवर अधांतरी लटकलेल्या
माझ्याच देहाकडे...

**रमेश सावंत**
वडाळा, मुंबई
भ्रमणध्वनी : ९८२१२६२७६७





## विघ्न

बाप गेल्यावर
कोसळलो मीच
पाहूनिया पेच
आयुष्याचा.
बाप गेल्यावर
आलं नाही कुणी
घेऊनिया वाणी
आधाराची.
बाप गेल्यावर
जवळचे दूर
वेदनेचे सूर
टाळावया.
बाप गेल्यावर
घरोघरी चर्चा
पापणीत मोर्चा
आसवांचा.
बाप गेल्यावर
उरलं ना काही
करू कुठे सही
विचारतो.
बाप गेल्यावर
वेदनेत दंग
कोणता अभंग
घेऊ ओठी.
बाप गेल्यावर
असा झालो मग्न
जागोजागी विघ्न
पाहूनिया.

**गणेश एस. भाकरे**
श्री निवास, वार्ड क्र. ८,
जटाशंकर ले-आऊट, छिंदवाडा रोड,
सावनेर, जि. नागपूर-४४११०७
भ्रमणध्वनी : ९९२३८२९७१७

## स्वप्नापल्याड जावे

जाई तरारली अन्
हलके हसे कण्हेर...
जास्वंद रक्त-वर्णी
ढवळी लिली टपोर...
ही रंग-गंध-पुष्पे
झुलती घरासभोती...
माझ्या मनोरथांची
निश्वासिते जणू ती...

हा मोगरा सुगंधी
बकुळीस गूज सांगी
भगवी 'अबोल' पुष्पे
मकरंद अंतरंगी
ही कोवळीक जैसी-
मौनामधील स्मरणे...
माझ्याच सर्जनाची
उद्गार-प्रश्न-चिन्हे...

आसक्त कर्दळी ही
कुंदासवे विभोर
हसरा अनंत, त्याचा-
उल्हास रंग गौर
संवेदना फुलोनी
स्वप्नापल्याड जावे
वेल्हाळ ह्या ऋतूचे
स्वर्गीय गीत गावे

**आश्लेषा महाजन**
'मंजिरी', २३०, चित्ररेखा सोसायटी,
सहकारनगर नं. १, पुणे-४११००९
दूरध्वनी : २४२२७१८५
भ्रमणध्वनी : ९८६०३८७१२३
ashleshamahajan@rediffmail.com
website:www.ashleshamahajan.tripod.com

# त्या चंद्राचे, या चंद्राशी

**सरोज जोशी**

खरं पाहता कवींचा आणि शास्त्रज्ञांचा चंद्र एकच आहे. दोघांनाही तो सारखाच प्रिय आहे... एकाच वेळी एखादा माणूस उच्च बुद्ध्यांक असणारा शास्त्रज्ञ आणि उच्च भावनांक असणारा कवी असू शकतो... तसेच डॉ. बाळ फोंडके एकाच वेळी उत्तम शास्त्रज्ञ आणि शैलीदार लेखक आहेत. त्यांना चंद्रबळ लाभले आहे...

सर्वसामान्य माणसाचं आयुष्य साधं, सरळमार्गी, एकसुरी असतं. कुसुमाग्रजांच्या शब्दात सांगायचं झालं तर असं म्हणावं लागेल–

इथे जन्मला अमुक साली
तिथे निवर्तला तमुक साली
या गावात शिकला, त्या गावात पिकला
अमुक साली लग्न केलं अमकीशी
पुढे प्रेम केलं तमकीशी
इथे गाजला, तिथे वाजला
इथे पांडित्याची धार, तिथे कटनारीची धार
इथे गळ्यामध्ये हार, तिथे पाय लावून माघार
इत्यादी इत्यादी.

पण काही बुद्धिमान माणसं आयुष्याच्या पटावर असा काही बुद्धिबळाचा डाव मांडतात, की परिस्थितीवर मात करून नेहमीच विजयी होतात. त्यांची बुद्धी अफाट असते, त्यांची ऊर्जा अचाट असते, त्यांचा आत्मविश्वास अमर्याद असतो, त्यांची विजिगीषा अतुलनीय असते. विज्ञानाचे फासे हातात घेऊन डॉ. बाळ फोंडके यांनी आपला डाव मांडलेला आहे. चंद्रभागेच्या तीरी वारकऱ्यांचा खेळ रंगतो. तसाच हा खेळ रंगलेला आहे. त्यांना भगवंताचं असं अधिष्ठान लाभलं आहे की खुद्द नियतीने काळ/काम/वेगाचे गणित आपल्या अनोळखी लिपीत त्यांच्यासाठी सोडवून ठेवले आहे. तल्लखपणाचा एक खणखणीत बंदा रुपया, एक विलक्षण 'हच्चा एक' त्यांना बहाल केला आहे! अश्वमेध यज्ञासाठी सोडलेला नीलकांती सुलक्षणी घोडा ज्याप्रमाणे एकेक राज्य पादाक्रांत करतो त्याप्रमाणे एकेक क्षेत्र डॉ. फोंडके काबीज करत सुटले आहेत. विज्ञानकथा लिहिण्याचा एक खुळा छंद त्यांना लागला आहे आणि आ...ता

जगावेगळा खेळ खुळा हा
असा रंगला, असा रंगला
खेळामधला रंगच आता
आयुष्याचा अर्थ जाहला



डॉ. बाळ फोंडके म्हणजे गजानन पुरुषोत्तम फोंडके. जन्म २२ एप्रिल १९३९. सोलापूर येथे बालपण आणि शिक्षण. घरात जन्माला आलेल्या पहिल्या मुलाला त्याच्या ठेवलेल्या नावाने हाक मारत नाहीत अशी प्रथा आहे म्हणे! त्यामुळे त्यांना घरात 'बाळ' म्हणू लागले. त्यांनाही ते आवडू लागले. मग शाळेत, कॉलेजात आणि पुढील आयुष्यात बाळ हेच नाव लावावयाला त्यांनी सुरुवात केली. (कदाचित मनामध्ये बाळ ह्या नावाने प्रसिद्ध असणाऱ्या लोकमान्य बाळ गंगाधर टिळक ह्या वलयांकित व्यक्तिमत्त्वाची ओढ असेल!) आपल्या तल्लख बुद्धीच्या बळावर १९६० साली आण्विक भौतिकीशास्त्रात एम.एस्सी. झाले आणि १९६७ साली जीवभौतिकीमध्ये लंडनला ते पीएच.डी. झाले. त्यांनी नवी दिल्ली इथली विज्ञानसंपर्कासाठीची राष्ट्रीय संस्था (Niscom) इथलं संचालकपद भूषवलं. व्यावसायिक शास्त्रज्ञ, वैज्ञानिक सदरे व स्तंभ, विज्ञानविषयक लेखक, विज्ञानकथा, वैज्ञानिक विषयावरील पुस्तके व वैज्ञानिक शोधनिबंधांचे नामांकित लेखक, वैज्ञानिक नियतकालिकांचे संपादक, नाटकं लिहिणारे नाटककार आणि नट असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व विकसित झाले. डॉ. बाळ फोंडके म्हणजे उमदे, रुबाबदार प्रसन्न, देखणे, हसतमुख व्यक्तिमत्त्व. वैज्ञानिक म्हणून ख्यातनाम असलेल्या, अनेक वर्षे विज्ञान तपश्चर्या करणाऱ्या ह्या तर्कनिष्ठ व्यक्तीने विज्ञानकथेच्या दालनात प्रवेश करून एक ललितलेखक म्हणून मानाचं स्थान प्राप्त करून घेतलं आहे. मी विज्ञानकथा लिहीत असल्यामुळे मला त्यांची थोरवी, त्यांचा मोठेपणा कळून चुकला होता. त्यांची जडणघडण जाणून घेण्याची तीव्र इच्छा होती. म्हणून मराठी विज्ञान परिषदेत (मविपमध्ये) आम्ही गप्पा मारायला बसलो. डॉ. फोंडके मनमोकळेपणाने सांगत होते.

''मी सोलापुरात वाढलो. घरचे वातावरण मोकळे होते. संस्कार चांगले होते. मी हरीभाई देवकरन शाळेत शिकलो. चांगले गुण मिळवून पास झाले म्हणजे झालं. वर्गात पहिलं आलंच पाहिजे असा वडिलांचा दबाव नव्हता. शाळेतले शिक्षक छडी वाजे छमछमवाले तात्या पंतोजी नव्हते. इतिहास शिकवणारे चिं.वि. वैद्य पानिपतची लढाईसारखी पुस्तकं वाचायला सांगत. भूगोल शिकवणारे माटेसर 'जगाचे प्रवासी' हे पुस्तक वाचण्याची शिफारस करत. अभ्यासाव्यतिरिक्त अनेक उपक्रम होत असत. ना.धो. ताम्हणकर, वामनराव चोरघडे, गंगाधर गाडगीळ अशा लेखकांची पुस्तके आम्ही वाचत असू. बाबूराव अर्नाळकरांच्या रहस्यकथाही मला आवडायच्या. आईचे वडील आमच्याकडे राहायचे. त्यांनाही रहस्यकथा आवडायच्या. आमच्या दोघांचे त्यामुळे चांगले जमायचे. त्यांचा मृत्यू आमच्याकडेच झाला. माझ्या बालमनावर झालेला मृत्यूचा हा पहिला आघात. आठवीनंतर अरविंद गोखले, जयवंत दळवी, द.पां. खांबेटे, शांताराम ह्या कथालेखकांच्या आणि इतर लेखकांच्या कथा वाचत असू. दिवाळी अंकांच्या हिरव्या कुरणात चरत असू. मराठेबाई मराठीच्या शिक्षिका होत्या. त्या वक्तृत्व स्पर्धा घेत असत. पेशव्यांच्या दरबारातील अण्णासाहेब खाजगीवाले ह्यांची कथा सांगून बक्षीस मिळवल्याचे स्मरते. आठवी-नववीत असताना भालचंद्र फडके ह्याच्यामुळे वाचनाची अधिक गोडी लागली. गो. रा. कामतसर आणि श्रीराम पुजारी ह्यांचेही उत्तम संस्कार झाले. त्याचबरोबर पुढील उमेदीच्या आयुष्यात जयंत नारळीकर, अनिल काकोडकर, सतीश धवन, होमी भाभा, विक्रम साराभाई असे अनेक आदर्श डोळ्यांसमोर होते.

विल्सन कॉलेजमध्ये वा.ल. कुलकर्णी मराठी शिकवत. त्यांची अभ्यासू, चिकित्सक वृत्ती आणि मराठी भाषेवरील प्रभुत्व ह्याचा सखोल परिणाम झाला. मराठी वाचन भरपूर झालं. मराठी भाषेचं प्रेम अधिकाधिक घट्ट झालं. इंग्रजीचं वाचन समांतरपणे चालूच होतं. एकंदरीत विज्ञानाचे विद्यार्थी परीक्षेपुरता भाषेचा अभ्यास करतात आणि मग मराठी भाषेचा त्यांचा संपर्क बोलण्यापुरता राहतो. पण मला माझी मराठी भाषा आवडत होती. विल्सन कॉलेजमध्ये असताना मी लिहू लागलो. कॉलेजच्या मॅगझिनसाठी मी 'हाकामारी' नावाची

कथा लिहिली. द. मा. मिरासदारांच्या स्टाइलची ती कथा होती. मराठीचे प्रोफेसर मनोहर अळतेकर ह्यांनी मी वाङ्मयचौर्य केले आहे असा आरोप माझ्यावर केला. ती कथा मी स्वीकारणं शक्यच नाही असे निक्षून सांगितले. मी पण इरेला पेटलो कारण ती कथा मी स्वत: लिहिली होती. वा.ल. कुलकर्णी विभागप्रमुख होते. मी ती कथा त्यांना दाखवली. त्यांनी माझी कथा वाखाणली. ती कथा अनंत अंतरकरांच्या मोहिनीमध्ये छापून आली. मला दहा रुपये मानधन मिळाले. त्यावेळी मोहिनीमध्ये माझ्याबरोबर सुभाष भेंडे आणि व. पु. काळे ह्या मान्यवर लेखकांच्या कथा छापून आल्या होत्या. मी लेखक झालो होतो. त्याच वेळी मी लिहिलेल्या 'युस्को' कथेबद्दल वा.ल.नी माझी पाठ थोपटली होती. ह्याच सुमारास मेरी क्युरीचे चरित्र मी वाचले. माझ्या मनात संशोधनाची आवड निर्माण झाली. योग्य वेळी वा.ल.नी माझी पाठ थोपटली. मला प्रोत्साहन दिले त्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला.'' संशोधनक्षेत्रात आता भरपूर वाव आहे. पण विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्या क्षेत्राकडे वळवण्याची जरुरी आहे.

बाळ फोंडक्यांना विज्ञानाची आवड असल्यामुळे त्यांनी कॉलेजमध्ये विज्ञान शाखेची निवड केली. वडिलांचे ह्याबाबतीत मार्गदर्शन नव्हतं आणि सक्तीही नव्हती. ते निर्णय घेत गेले आणि त्यांची घोडदौड सुरू झाली. कोणत्याही व्यक्तीचा विकास होण्यासाठी त्याला स्वत:ची 'पोच' कळावयास लागते. आपला संवेदन-स्वभाव सापडायला लागतो. बाळ फोंडक्यांना स्वत:ची पोच, स्वत:ची झेप घेण्याची कुवत कळली होती. त्यामुळे 'द्राक्षे आंबट' असं म्हणण्याची त्यांच्यावर कधीच वेळ आली नाही. तेज:पुंज बुद्धीमुळे आणि स्वयंशिस्तीमुळे ते गरुडवेगाने पुढे पुढे जात राहिले. यशाचा आलेख पुढे चढत राहिला.

आण्विक भौतिक विषयात मुंबई विद्यापीठाची स्नातकोत्तर पदवी १९६० मध्ये घेतल्यानंतर १९६० ते १९८३ अशी २३ वर्षे मुंबईच्या भाभा अणुसंशोधन केंद्र या भारत सरकारच्या आघाडीच्या प्रगत विज्ञान संस्थेच्या जीववैद्यकीय (Bio-medical) विभागात व्यावसायिक शास्त्रज्ञ म्हणून फोंडके नोकरीस होते. दरम्यान १९६७ मध्ये त्यांनी लंडन विद्यापीठाची जीवभौतिकी (Bio-physics) विषयात डॉक्टरेट (Ph.D. Degree) त्यांनी संपादन केली आणि ते डॉक्टर बाळ फोंडके झाले. रोगप्रतिबंधकशास्त्राच्या संदर्भात जीवपेशीच्या गुणधर्माचे महत्त्व, तसेच पेशींची रोगप्रतिबंधक क्षमता व विकिरण संवेदकता यांचे अन्योन्य संबंध याबाबतीत डॉ. फोंडक्यांचा विशेष अभ्यास आहे. १९६५-६७ व पुन्हा १९७४ मध्ये लंडनमधील Chester Betty Institute of Cancer Research या संस्थेत त्यांनी अभ्यागत शास्त्रज्ञ म्हणून १९७६-७७ मध्ये अमेरिकेतील कॅन्सस विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रातील पॅथॉलॉजी विभागात अभ्यागत प्राध्यापक म्हणून काम केले. १९६४-९६ दरम्यान अमेरिका, कॅनडा, ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी, इटली, फिलिपाइन्स, मलेशिया, बँकाक, झिम्बाब्वे इत्यादी परदेशात झालेल्या १५ आंतरराष्ट्रीय परिषदात डॉ. फोंडक्यांच्या सहभाग होता. एकंदरीत १२ युनिव्हर्सिटीत अभ्यागत प्राध्यापक म्हणून वावरलेला हा माणूस प्राध्यापकाचाही प्राध्यापक आहे असं म्हणायला हरकत नाही. शास्त्रज्ञांबद्दल, प्राध्यापकांबद्दल अनेक दंतकथा प्रसिद्ध असतात. पण त्यांच्याबद्दल असे काही ऐकिवात नाही! असा कसा हा हुशार माणूस सदान्कदा भान सांभाळून राहतो? अजब, अबब आहे बुवा ही व्यक्ती!

अजून काही संशोधनकार्याचे डोंगर त्यांनी पार केले आहेत. जीव-वैद्यकीय विषयाच्या विविध अंगासंबंधी त्यांनी केलेल्या संशोधन कार्याचा तपशील शंभर शास्त्रीय शोधनिबंधातून १९६३ ते १९८७ दरम्यान वेळोवेळी प्रसिद्ध झाला. जीवभौतिकी व सूक्ष्मजीवशास्त्राच्या प्रगत शाखांमधील विषयांचे प्राध्यापनही १९७१ ते १९८३ या बारा वर्षांच्या कालखंडात मुंबई, पुणे, बडोदा विद्यापीठात तसेच भाभा अणुसंशोधन केंद्राच्या प्रशिक्षण शाळेत वेळोवेळी डॉ. फोंडक्यांनी प्रभावीपणे केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जीवभौतिकी विषयात सहा विद्यार्थ्यांनी पुणे विद्यापीठाची पीएच.डी. पदवीही संपादन केली. महाराष्ट्र ॲकॅडमी ऑफ सायन्सेसने फेलोशिप देऊन आणि कॉलेज ॲण्ड अप्लाइड इम्युनॉलॉजी या संस्थेने वक्तृत्वासाठीचे सुवर्णपदक देऊन डॉ. फोंडके यांना सन्मानित केले. भारतीय विज्ञान-लेखक असोसिएशनचे ते फेलो आहेत.

संपादन- व्यावसायिक शास्त्रज्ञ म्हणून प्रगतीची आकाशचुंबी शिखरे गाठणारे अनेक महाभाग आहेत. परंतु डॉ. फोंडक्यांची पृथगात्मता अशी की विज्ञानाची गंगा त्यांनी मराठीतून मराठी माणसापर्यंत पोचवली. इंग्रजीच्या जोडीने त्यांनी मराठीतून विज्ञानविषयक लिखाण केले. म.वि.प. मध्ये सामील झाल्यापासून त्यांच्या मराठी लेखनाची झळाळी अधिक वाढली. मराठी ज्ञानभाषा होण्याची गरज त्यांना जाणवलेली होतीच. स्वभाषेवरचे त्यांचे नितांत प्रेम आणि प्रभुत्व लिखाणातून जाणवते. मुंबईतील टाइम्स ग्रुपच्या 'सायन्स टुडे' या नामांकित मासिकाच्यासाठी संपादक म्हणून काम

करण्याची संधी त्यांना १९८३ साली चालून आली. त्यावेळी त्यांच्या आयुष्यातला तो निर्णायक क्षण होता. व्यावसायिक वैज्ञानिकाची सुरक्षित रुळलेली वाट सोडून संपादनाच्या नवीन दुनियेत प्रवेश करायचा होता. संशोधनाच्या क्षेत्रात नोबेल प्राइज मिळेलच अशी खात्री नव्हती. संपादकाची जबाबदारी स्वीकारायचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला. ज्यावेळी त्यांना संपादकपदासाठी पृच्छा झाली त्यावेळी मासिकाची घडी विस्कटलेली होती. अंक वेळेवर निघत नव्हते. वाचकवर्ग कमी होत होता. डॉ. फोंडक्यांनी एक महिन्याचा अवधी मागून घेतला. मॅनेजमेंटचे लोक म्हणाले, तुम्ही जेव्हा काम सुरू कराल तेव्हाच पगार सुरू होईल. डॉ. फोंडक्यांनी ती अट मान्य केली. संपादक म्हणून ते प्रथमच काम करणार होते म्हणून मासिक संपादनाच्या सर्व अंगांचा सांगोपांग विचार केला. माहिती करून घेतली. हे मासिक वाचकानुवर्ती असायला हवं. कॉलेजातील सायन्सचे विद्यार्थी आपले वाचक व्हावेत या हेतूने (ऑथेन्टिक) अचूक माहिती देण्यास सुरुवात केली. त्या त्या विषयाचे तज्ज्ञ गाठून त्यांच्याकडून लेख लिहून घ्यायचे व मग त्यांच्या संमतीने त्यांची शैली बिघडू न देता संस्कार करायचे असे ठरवले. त्यांच्याबरोबर सुधाकर नायर काम करत होते. अनाहूत साहित्य घ्यायचे नाही असे ठरवले. अनेक विषय शोधून काढले. जुळी भावंडे, साईन्ससारखे लोकांना आकर्षित करणारे विषय निवडले. नट शत्रुघ्न सिन्हाला जुळे मुलगे झाले होते. त्याची मुद्दाम मुलाखत घेतली. भोपाळ दुर्घटनेवर तीन अंक काढले. प्रत्येक महिन्याला एक विज्ञानकथा देण्यास सुरुवात केली. मराठी विज्ञान-कथाकारांना वाव दिला. जयंत नारळीकर तर ख्यातनाम होतेच. त्याशिवाय लक्ष्मण लोंढे, निरंजन घाटे, सुबोध जावडेकर, अरुण मांडे, सुरेश मथुरे, शुभदा गोगटे इत्यादी लेखकांच्या कथा छापल्या. तीन महिन्यांचे अंक तयार असायचे. त्यामुळे घाईघाई झाली नाही. १९८६पर्यंत म्हणजे तीन वर्षे ते संपादक होते. त्यापुढची तीन वर्षे टाइम्स ऑफ इंडिया या इंग्रजी दैनिकाच्या विज्ञान विभागाचे ते संपादक होते. भारत सरकारच्या वैज्ञानिक व संशोधन परिषदेअंतर्गत, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स कम्युनिकेशनचे संचालक व प्रमुख संपादक म्हणून १९८९ पासून ते कार्यरत होते. हे राष्ट्रीय स्तरावरचे संपादन होते. वैज्ञानिक छोटेखानी पुस्तके असत आणि विषयानुसार चित्रे काढलेली. लेखकाला जो विषय द्यायचा तो त्याच्या अभ्यासाचा विषय असता कामा नये असा आमचा नियम होता. त्यामुळे सामान्य वाचकाला आकलन होईल असे लिखाण लिहिले जायचे. म.वि.प.ने जेव्हा त्यांना संपादन करण्यासाठी पृच्छा केली त्यावेळी अ. पां. देशपांडे आणि चि. मो. पंडित संपादनाचे काम करत होते. डॉ. फोंडक्यांनी प्रथम पत्रिकेच्या स्वरूपाबद्दलची संकल्पना स्पष्ट केली. ते म्हणाले, प्रथम पत्रिका म.वि.प.चे मुखपत्र या स्वरूपात चालवायची, की मासिकाच्या स्वरूपात चालवायची ते निश्चित करूया. मासिक म्हणून चालवायचे ठरवल्यावर पृष्ठसंख्या वाढवणे जरूर आहे हे निश्चित झाले. मर्यादित वृत्तान्तलेखन चालू राहिले. बालविभाग सुरू झाला. वेगवेगळी सदरे सुरू झाली. दिवाळी अंकही इतर अंकासारखा निघू लागला. वेचक, वेधक मजकुरामुळे पत्रिका लोकप्रिय होऊ लागली. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतिमंडळ आणि म.वि.प. ह्यांनी परिश्रमपूर्वक विज्ञान आणि तंत्रज्ञान कोश हा बृहत प्रकल्प सिद्ध झाला. कोशाची जबाबदारी मंडळाने परिषदेवर सोपवली. या कोशासाठी लागणारे संपूर्ण अर्थसाहाय्य संस्कृति मंडळाने केले. डॉ. बाळ फोंडके आणि अ. पां. देशपांडे ह्यांनी ह्या कोशाचे संपादन केले. डॉ. बाळ फोंडके ह्यांनी अनेक संस्थांमधून काम केले. एखाद्या संस्थेत काम करताना मिळणारे यश हे एकट्याचे नसून सामूहिक यश आहे हे भान त्यांना नेहमी असते. स्वार्थाच्या वर्तुळकक्षेतून बाहेर आलेली त्यांच्यासारखी माणसे संस्थांमधून यशस्वीपणे काम करतात. यश हा माणसामधील गुणसमुच्चयांचा परिणाम असतो. परस्परपूरक अशा अनेक चांगल्या गुणांच्या मिलाफामुळे मिळणारे यश हे टिकाऊ असते असे त्यांचे यश पाहून म्हणावेसे वाटते.

डॉ. फोंडक्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आणखी एक पैलू सांगितल्याखेरीज व्यक्तिमत्त्वाचं दर्शन पुरं होणार नाही. त्यांना नाटक लिहायला आवडतं आणि नाटकात काम करायलाही जमतं. सुरुवात शाळेपासून झाली. त्यांच्या वडिलांनी कधी हे करू नको ते करू नको म्हणून त्यांना अडवलं नाही. नाटकाचं एकदा वेड लागलं की सुटत नाही, एकदा रंग फासला की पुसता येत नाही असं म्हटलं जातं. पण ह्या स्वयंशिस्त असलेल्या धृवनिश्चयी माणसानं तसं होऊ दिलं नाही. (आपल्या बासरीने गोकुळाला मोहिनी घालणाऱ्या कृष्णाने नाही का आपली बासरी गोकुळात ठेवून मथुरेला प्रयाण केलं!) १९५७ मध्ये विल्सन कॉलेजचा शतकोत्तर रौप्यमहोत्सवाच्या वेळी छोटे मासे, मोठे मासे ह्या नाटकात काम केलं. दिग्दर्शन विजया जयवंतनी केलं होतं. अरविंद देशपांडे आणि ललिता केंकरे ही मंडळी बरोबर होती. वांद्र्याला बी.ए.आर.सी.चा उदय कला केंद्र असा हौशी नाट्यसंच त्यांनी स्थापन केला होता. रमेश चौधरी मार्गदर्शन करत असत. साहित्य संघासाठी

Desperate hours या इंग्रजी नाटकाचे रूपांतर केले. त्यांना राज्य नाट्यस्पर्धेत तिसरे बक्षीस मिळाले. 'अणूयुगातून पलीकडे' या नाटकात वसंत कामतची भूमिका केली. लंडनला पीएच.डी. करताना 'करायला गेलो एक', 'वेगळं व्हायचंय मला' अशी नाटके त्यांनी केली. त्यावेळी शीला गुप्ते त्यांच्याबरोबर काम करत होत्या. १९७८ च्या आसपास सुहासिनी मुळगावकर ह्यांनी संस्कृत नाटके दूरदर्शनवर सादर केली. प्रसिद्ध श्री. बी. वेलणकर ह्यांनी नाट्यरूपांतरे केली होती. मृच्छकटीक, स्वप्नवासवदन्ता, विक्रमोर्वशीय, शाकुंतल अशी आठ-नऊ नाटके त्यांनी निवडली होती. डॉ. बाळ फोंडके ह्यांनी दुष्यंत, चारुदत्त, विक्रम अशा नायकांच्या भूमिका केल्या. स्वत: सुहासिनीबाई नायिकेचं काम करत असत. डॉ. फोंडक्यांनी हसत हसत सांगितलं, की कुठेही कधीही भान सुटलं नाही. मोहाच्या क्षणी डोक्यात एक घंटी वाजायची आणि ते सतर्क, सावध व्हायचे. स्वीच ऑन स्वीच ऑफचे तंत्र त्यांनी आत्मसात केले होते. त्यांना त्यांचं नाट्यवेड जोपासता आलं, ह्याचं श्रेय डॉ. फोंडके त्यांच्या पत्नी 'अलका' ह्यांना देतात. कारण ते म्हणतात, ''माझ्या पत्नीचा माझ्यावर गाढ विश्वास होता. घरात संशयकल्लोळ नाटक रंगलं नाही पण तिच्या विश्वासानीच मला योग्य जागेवर ठेवलं.'' म्हणून बाळ फोंडके कधीच 'नाटक्या' झाले नाहीत. मोहाच्या कांचनमृगाचा त्यांनी पाठलाग केला नाही. त्यांच्या मताच्या भिंती कणखर आहेत त्यामुळे भरत जाधव जी भूमिका करतात तो 'सही रे सही'मधला 'गलगले' त्यांच्या आसपाससुद्धा फिरकू शकत नाही. बेहोषीच्या क्षणी होष सहीसलामत!

विविध विषयांचे व्यासंगी, सुबोध मराठी लेखक म्हणून मराठी साहित्याच्या क्षेत्रात विज्ञानलेखक आणि विज्ञानकथा-लेखक म्हणून डॉ. फोंडक्यांनी आपलं ठळक स्थान निर्माण केलं आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान यांना साथीला घेऊन मानवी संस्कृतीची वाटचाल सुरू झाली आहे आणि म्हणून आजच्या युगाला विज्ञानयुग असं म्हणतात. विज्ञान-तंत्रज्ञान यांच्यामध्ये माणसाचे भले करण्याचे जसे सामर्थ्य आहे तशीच त्याला हानी पोचवण्याची शक्तीही. खरं पाहता विज्ञान हे एखाद्या तपस्व्याप्रमाणे स्थितप्रज्ञ आहे. वापरणारा त्याला शाप किंवा वरदान ठरवतो. अशा या विज्ञानाची नानाविध सूत्रे हसतखेळत, शिळोप्याच्या गप्पा करताना संवादात्मक शैलीतून डॉ. फोंडके समजावून देतात. हे लेख वाचताना आपल्याला आकाशवाणीच्या टेकाडेभावजींच्या श्रुतिकांची आठवण होणे अपरिहार्य आहे. कधी कधी ते आकृतिबंधाचा, यथायोग्य चित्रांचा उपयोग करतात. विज्ञान-संवादिनी, विचित्र विज्ञान, विज्ञान प्रपंच अशी त्यांची अनेक पुस्तके आहेत. एकंदरीत स्वत: डॉ. फोंडके विज्ञानाच्या गावात वस्ती करून बसले आहेत आणि त्या गावी येणाऱ्यासाठी वाटाड्याचे काम करत आहेत.

डॉ. बाळ फोंडके हा एक अफाट कर्तृत्वाचा माणूस आहे. सागराला सागराची उपमा देतात, गगनाला गगनाची देतात तसंच 'ह्या सम हा' असं म्हणायची वेळ येऊन ठेपलेली आहे. मला वाटतं पाळण्यातलं गजानन हे नाव त्यांनी सार्थ ठरवलं आहे. जागतिक कीर्तीचे शास्त्रज्ञ अशी त्यांची ख्याती आहे. ही सर्व वस्तुस्थिती आहे. स्तुती नव्हे! स्तुती करावी परमेश्वराची हे मला माहीत आहे.

उपलब्ध झालेल्या माहितीनुसार मी त्यांची लेखनसंपदा सांगते.

वैज्ञानिक सदरे व स्तंभलेखन इंग्रजी - १०००
वैज्ञानिक सदरे व स्तंभलेखन मराठी - २२००
वैज्ञानिक सदरे व स्तंभलेखन हिंदी - १००
राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधनात्मक निबंध - १००च्याहून अधिक

| | | | |
|---|---|---|---|
| | विज्ञानकथा | - | २५० |
| | विज्ञान नाटके | - | १० |
| पुस्तके - | इंग्रजी | - | १२ |
| | मराठी | - | २५ |
| | हिंदी | - | २ |

'चिरंजीव' ह्या त्यांच्या विज्ञानकथासंग्रहाला महाराष्ट्र शासनाचा १९८०चा पुरस्कार. 'उद्याचे वैद्यक' व 'कॉम्प्युटरच्या करामती' ह्या पुस्तकांना महाराष्ट्र शासनाचे अनुक्रमे १९८९ व १९९२ चे पुरस्कार मिळाले. इन्साचे इंदिरा गांधी पारितोषिक १९९२मध्ये मिळाले. सार्वजनिक माध्यमांद्वारे वैज्ञानिक व तांत्रिक घटनांचे जनसामान्यांना उत्कृष्ट दर्शन घडवल्याबद्दल NCSTC चा १९९१ चा राष्ट्रीय पुरस्कार. मराठी लोकाभिमुख विज्ञानासाठीचा १९९४ चा वीर सावरकर पुरस्कार, १९९५ चा महाराष्ट्र साहित्य परिषदेचा व इंडियन सायन्स काँग्रेसचा पुरस्कार. 'जावे विज्ञानाच्या गावा' ह्या पुस्तकासाठी महाराष्ट्र स्टेट पारितोषिक International man of the year 1998, अमेरिकन बायाग्राफीकल सोसायटीकडून गौरव. १९९८ विज्ञान संमेलनाचे अध्यक्ष. २००४ मध्ये कोकण साहित्य संमेलनाचे अध्यक्ष अशी पुरस्कारांची पुष्पमाला गळ्यापासून पायापर्यंत विराजली आहे.

अशा तऱ्हेने 'बोलावे विज्ञान, पाहावे विज्ञान, करावे विज्ञान जीवभाव' असा जरी डॉ. बाळ फोंडक्यांचा विज्ञानमय

परिपाठ असला तरीही आपली भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात, ''विज्ञानाने कितीही प्रगती साधली, जीवनशैली कितीही बदलली तरी मानवी स्वभावावर त्याचा प्रभाव पडणार नाही. काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर या षड्रिपूंच्या बाह्य आविष्काराचे स्वरूप फारतर बदलेल. विज्ञानामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांना माणसं कशी सामोरी जातात हे सांगणारी कथा ती विज्ञानकथा.''

माणूस हाच विज्ञानकथेचा केंद्रबिंदू आहे. बा.भ. बोरकरांच्या 'मज लोभस हा इहलोक हवा' या कवितेत त्यांनी आपल्या आयुष्याच्या संदर्भात म्हटलं आहे- 'शास्त्राचा अभ्यास हवा परि मानव्याचा ध्यास हवा'.

पण हे विज्ञानकथेच्या संदर्भातही खरे आहे. विज्ञानामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांना माणसं कशी सामोरी जातात हे सांगणारी कथा ती विज्ञानकथा.

साहित्याला समाजजीवनाचा आरसा म्हणतात. विज्ञानसाहित्यातही समाजजीवनाचं प्रतिबिंब पडलेलं असतं. फक्त ते समाजजीवन आजचं नसतं तर भविष्यकाळातलं असतं. म्हणून विज्ञानसाहित्याला उद्याच्या माणसाचा वेध घेणारी दुर्बीण म्हणावयाला हवे. म्हणूनच 'आजच्या आणि उद्याच्या विज्ञानाच्या पर्यावरणात घेतलेला, मानवी नातेसंबंधाचा आणि अस्तित्वाचा सृजनात्मक वेध म्हणजे विज्ञानसाहित्य'. इथे एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते. विज्ञानकथा-कादंबऱ्या हा साहित्याचा भाग आहे. विज्ञानलेखकाला लिहिताना आनंद वाटतो म्हणूनच तो लिहितो. विज्ञानाचा प्रसार अनुषंगाने होऊ शकतो पण विज्ञानप्रसार करण्याच्या हेतूने तो लिहीत नसतो, नसावा. चांगल्या साहित्याचे जे जे निकष आहेत, त्या सर्व निकषावर कसाला लावून विज्ञानकथा परीक्षेत उतरली पाहिजे. वातावरणनिर्मिती, पात्ररेखाटन, भाषा व शैली आणि वाचनीयता हे महत्त्वाचे निकष आहेत. ह्याशिवाय महत्त्वाचा गुण म्हणजे कथा जीवनावरचं भाष्य असायला हवी. विज्ञानकथा तशी बहुरूपिणी आहे. भय कथा, विनोदी कथा, सामाजिक कथा, रहस्यकथा, धार्मिक कथा, प्रेमकथा, गूढकथा अशी अनेक रूपे ती घेते. विज्ञानाने आता जीवनाचा एक मोठा हिस्सा व्यापला आहे त्यामुळे ललित विज्ञानसाहित्याने साहित्यक्षेत्राचा मोठा हिस्सा व्यापणं हे अपरिहार्य आहे. बायोमेडिसीन, क्लोनिंग जेनेटिक इंजिनीअरिंग, जीन्स थेरपी, इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी, रोबॅटिक्स ह्या सगळं विज्ञानक्षेत्रांचा माणसांवर होणाऱ्या संभाव्य परिणामांनी डॉ. बाळ फोंडके ह्यांच्या कथा व्यापलेल्या आहेत. तेही अगदी साहजिक आहे कारण ह्या सर्व विज्ञानांनी त्यांचे स्वत:चे दैनंदिन जीवन व्यापलेलं आहे. त्यामुळे ते सहजपणे विज्ञानकथा लिहू लागले. नारायण सुर्वे ज्या सहजतेने आणि ताकदीने कामगारांची व्यथा-वेदना व्यक्त करतात आपल्या कवितेतून तसंच हेही घडलं कथातून.

विज्ञानकथेच्या प्रांतात डॉ. फोंडके ह्यांनी स्वत:ची अशी मोहोर उठवली आहे. डॉ. विजया राजाध्यक्ष ह्यांनी 'गर्भार्थ' ह्या कथासंग्रहाला प्रस्तावना लिहिली आहे. त्या म्हणतात, ''डॉ. फोंडके ह्यांचे सर्वच लिखाण लक्षणीय आहे. विज्ञान व मानवी जीवन ह्यांच्या परस्परांतील नात्याचा शोध घेणं हेच त्यांचे लक्ष्य आहे. वास्तव व कल्पित ह्या दोन जगांमधील संतुलन साधून कथा लिहिल्यामुळे कोणतीही कथा फँटसी वाटत नाही. वाचकाला वाटते हे घडताना मी प्रत्यक्ष पाहिलेलं नाही पण हे घडू शकेल असे घडणे अटळ आहे.'' विज्ञानकथा कधी व कशी लिहू लागले हे सांगताना ते म्हणतात. ''लंडनमध्ये डॉक्टरेटसाठी संशोधन करत असताना त्यांचा इंग्लिश-मित्र टॉनी पॉरिस्टर ह्यांनी आयझॅक ऑसिमॉव्हच्या कथांचा परिचय करून दिला व नवीन संशोधनाला विज्ञानकथेतून स्फूर्ती कशी मिळते हेही सांगितले. पण तेव्हा फक्त अल्पशी धूसर ओळख झाली पण खरी आस्था आणि ऊर्मी निर्माण झाली ती जयंत नारळीकरांमुळे. जयंत नारळीकरांच्या 'कृष्णविवर' ह्या कथेला म.वि.प.च्या विज्ञानस्पर्धेत पहिले बक्षीस मिळाले. ते नियमितपणे कथालेखन करू लागले. जयंत नारळीकरांच्या नावाभोवती विज्ञानक्षेत्रातील कर्तृत्वाचे वलय असल्यामुळे विज्ञानकथांकडे पाहण्याचा वाचकांचा आणि संपादकांचा दृष्टिकोन बदलला. त्यातच दुर्गाबाई भागवतांनी मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून नारळीकरांची व विज्ञानकथांची भलावण केली. विज्ञानकथेला प्रतिष्ठा प्राप्त झाली. माझ्या मनातील सुप्त ओढ जागी झाली. मी लिहू लागलो. माझ्या 'सदाशिवाचा तोतया' या कथेला म.वि.प.चे पहिले बक्षीस मिळाले आणि मग मी लिहीतच सुटलो. 'चिरंजीव', 'गर्भार्थ', 'कर्णपिशाच्च', 'खिडकीलाही डोळे असतात', 'दृष्टीभ्रम', 'सायबर कॅफे', 'व्हर्च्युअल रिॲलिटी', 'अघटित' असे कथासंग्रह लिहीत गेलो.''

डॉ. बाळ फोंडक्यांच्या लेखनाच्या विज्ञाननिष्ठ आणि ललित लेखन अशा दोन तऱ्हा जरी झाल्या असल्या तरी अंकुरल्या झाडाच्या वाल्ह्यादुल्ह्या पहिल्या दोन पानांसारख्या त्या आहेत. कारण त्यांचे मूळ एकच आहे. फरक फक्त प्रक्रियेत आणि अविष्कारात आहे. अभ्यासू लेखनात चेतन मन जागता

पहारा ठेवून असते आणि ललित लेखनात स्वप्नभूमी तळातून वर आल्यासारखी होते. त्यांचे सर्वच लिखाण विज्ञाननिष्ठ आहे. कथा, कादंबरी, नाटक, बालवाङ्मय सर्व सर्व एखादी घटना, एखादी व्यक्ती, एखादे विज्ञानसूत्र त्यांच्या मनात कथाबीज पेरते. मन बेचैन होते. कधी उचंबळून येते तर कधी बधीर होते आणि मग कल्पना, विचार, स्मृती व भाव साऱ्यांचे एक तयार रसायन त्यांच्या अंत:चक्षूपुढे नाचू लागते. कानात नवे नाद उमटतात, हातापायात विचित्र स्फुरण येते. साऱ्या शरीराचा ताबा ते अजब रसायन घेते. रसायन मग सांगते घे लेखणी आणि लिही आता. मग डॉ. फोंडके लिहितात. काही लेखन शाईने लिहितात, काही रक्ताने लिहितात तर काही संमोहन करणाऱ्या अजब रसायनाने.

त्या चंद्राचे या चंद्राशी
मुळीच नाही, काही नाते

असं कुसुमाग्रज 'हा चंद्र' या कवितेत म्हणतात. चंद्रमोहिमेत विजय प्राप्त झाल्यावर नील आर्मस्ट्राँगचे पाऊल चंद्रावर पडल्यावर, आता चंद्राबद्दलच्या सर्व कोमल, मखमली कल्पना नष्ट होतील की काय असा सल कविश्रेष्ठांच्या मनात सलत असावा. खरं पाहता कवींचा आणि शास्त्रज्ञांचा चंद्र एकच आहे. दोघांनाही तो सारखाच प्रिय आहे. (तसं अगदी स्वप्नाळू नजरेनं पाहायचं झालं तर चंद्र तीन आहेत- एक आकाशातील चंद्र, दुसरा चंद्र म्हणजे चंद्राचे प्रतिबिंब आणि तिसरा चंद्र म्हणजे सुंदर स्त्रीचा मुखचंद्र). पण एकाच वेळी एखादा माणूस उच्च बुद्ध्यांक असणारा शास्त्रज्ञ आणि उच्च भावनांक असणारा कवी असू शकतो. स्वत: कुसुमाग्रजांनी 'पृथ्वीचं प्रेमगीत' लिहिताना शास्त्रज्ञवृत्तीचा आणि कवीवृत्तीचा एक मेळ घातला आहे. डॉ. बाळ फोंडके एकाच वेळी उत्तम शास्त्रज्ञ आणि शैलीदार लेखक आहेत. त्यांना चंद्रबळ लाभले आहे. त्यांची कला कलेकलेने वाढत जावो आणि शास्त्रज्ञ म्हणून त्यांची कीर्ती जगभर पसरत जावो अशी शुभेच्छा मी प्रकट करते.

ज्या छोट्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव असे सारे ग्रंथ लिहिले, त्याला लोक 'ज्ञानोबाचा खांब' म्हणतात तर दुर्गा भागवत त्याला 'पैसाचा खांब' म्हणतात. त्या खांबावरचा अदृश्य भाग ज्ञानेश्वरांना त्यांच्या जीवनामधील भासमान झाला. चारी क्षितिजांना भेदून आरपार जाणारा, आकाशालाही उंच ओढून त्याच्यावर थेट चैतन्याच्या नाभीला भिडणारा भाग ज्ञानेश्वरांना त्यांच्या दोन विलक्षण डोळ्यांनी दिसला. त्याला त्यांनी पैस हे नाव दिले. असाच विज्ञानाचा पैस डॉ. बाळ फोंडक्यांना दिसत असावा असं त्यांचं विज्ञानकथा आणि विज्ञानसाहित्य वाचताना आपल्याला जाणवतं, जाणवतच राहतं, राहतं!

**सरोज जोशी**
८१/७, आझाद, पेस्तमसागर रोड नं. १,
पोस्ट-टिळकनगर, चेंबूर-४०००८९
दूरध्वनी : २५२५०३१७
भ्रमणध्वनी : ९८३३०५४१५७

## दोन वर्षांत दहावी आवृत्ती!



### पंखाविना भरारी! - शरयू घाडी

प्रसाद हा अतिविकलांग मुलगा. कोपरापुढे हातांची होणारी मंद हालचाल आणि कुशाग्र बुद्धिमत्तेची देणगी एवढीच त्याच्या शारीरिक जमेची बाजू. असा हा प्रसाद आपल्या इच्छाशक्तीने, कर्तृत्वाने केवळ एकवीस वर्षांच्या उण्यापुऱ्या आयुष्यात एक दंतकथा बनला. शिक्षण, गायन, वक्तृत्व, चित्रकला यातील त्याने केलेली कामगिरी आपल्यातील अपूर्णत्वाची जाणीव करून देते. प्रसाद म्हणजे निसर्गाचा अनाकलनीय आविष्कार. त्याच्या जीवनाची आणि त्याच्या आई-वडिलांच्या समर्पणाची ही कहाणी आहे.

**मूल्य : २०० रुपये ● सवलतीत : १२० रुपये**

# सिनेमाची भाषा

स्वप्ना पाटसकर

त्यातले पात्र, तसेच त्याचे कपडे, त्याचा मेकअप, त्याची हेअरस्टाइल, त्याचे संवाद. तो जिथे आहे त्या लोकेशनचा योग्य वापर, कलादिग्दर्शन, छायाप्रकाशाचा खेळ, कॅमेऱ्याने तो शॉट कशाप्रकारे कंपोझ केला आहे ते. कुठली लेन्स वापरली आहे. तो शॉट कुठल्या अँगलने घेतला आहे. ह्या सर्वांमधून सिनेमाची भाषा तयार होते. या भाषेमधले अर्थ प्रकट होतात. प्रेक्षक चित्रपटांमधून नव्या कल्पनांचे बीज शोधतात. चित्रपटांतील नव्या विचारांच्या वाटेवर चालतात आणि नव्या विचारांचे, विषयांचे प्रतिबिंब आपल्याला चित्रपटांमध्ये दिसते. जगातील कानाकोपऱ्यात आज सिनेमा पोचला आहे आणि अगणित प्रेक्षकांची मने ही एक जादुई भाषा समजतात.

सिनेमा ही आपल्या काळातली एक महान कला आहे. गेली शंभरहून अधिक वर्षे सिनेमा आपले मनोरंजन करत आहे आणि विविध विचारांचे, आविष्कारांचे महत्त्वाचे व्यासपीठ बनते आहे.

पूर्वी नाटकाने जे स्थान प्रेक्षकांच्या मनात निर्माण केले होते किंवा जे स्थान कथा, कादंबऱ्या व वाचनाला होते ते स्थान हळुहळू चित्रपटाने घेतले. आज सिनेमा असे माध्यम आहे ज्यामध्ये सर्व प्रकारची, विविध अर्थपूर्ण स्वप्ने पडद्यावर साकार होतात. भारतात दादासाहेब फाळके यांचा 'राजा हरिश्चंद्र' हा चित्रपट १९१३ साली प्रदर्शित झाला. मुंबईच्या 'Coronation cinema'च्या शांत, अंधारात प्रेक्षकांपुढे पडद्यावर पुराणातील एक कथा साकारली या 'हलत्या चित्रांनी' भारतातील सृजनशील कलाकारांना एक माध्यम, एक नवी दृष्टी दिली आणि लोक मनोरंजनाचे, शिक्षणाचे एक नवे प्रभावशाली, अफाट शक्यतांनी युक्त असे नवे दालन खुले केले.

दादासाहेब फाळके हे प्रतिभाशाली आणि प्रयोगशील होते. 'हरिश्चंद्र' ह्या चित्रपटनिर्मितीमध्ये त्यांना अनंत अडचणी आल्या. या सर्व उद्योगासाठी पैसे जमवणे आणि योग्य नटमंडळी शोधणे हा फक्त त्यातील एक भाग झाला. फाळक्यांच्या हरिश्चंद्राचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी प्रत्यक्ष लोकेशनवर शूटिंग केले.

दादासाहेब तोरणे यांनी १९१२ मध्येच 'श्री पुंडलिक' ह्या नाट्यप्रयोगाचे चित्रीकरण केले होते आणि ती चित्रफित कॉरोनेशन थिएटरलाच दाखवली गेली होती. नट मंचावर बोलत असताना त्यांच्यामागे जंगल, महाल असे दृश्य रंगवलेले पडदे दाखवण्याऐवजी ते सगळे नट खरोखर जंगलात आणि राजवाड्याच्या सेटवर काम करत होते. 'राजा हरिश्चंद्र'च्या उपलब्ध मूकपटात राजा त्याच्या शिपाई, सहकारी आणि प्रजेबरोबर शिकारीला निघाल्याचे दृश्य आहे. एका लाँग शॉटमध्ये हे लोक एका तळ्याच्या काठावरून डावीकडून उजवीकडे पुढे चालत जाताना दिसतात आणि त्या सर्वांचे



सिनेमाची भाषा कळली होती.

आपण अगदी लहानपणी बोलायला शिकतो. भाषेमुळे, संवादामुळे आपण अनेक गोष्टी साध्य करू शकतो. माझी आई मला सांगते, मी बोलू लागल्यावर माझे पहिले वाक्य होते, 'किला', 'कू कत्ते!', 'कोकिळा कू करते' हे सांगण्याची माझी पद्धत गमतशीर आणि तरीदेखील कळणारी! सर्व भाषांचे एक व्याकरण असते आणि काही इतर संकेत असतात. चित्रपटाची भाषा ही साधारण १८९० साली विकसित होऊ लागली. कॅमेरा ऑपरेटर आणि नटमंडळी यांची एकमेकांशी गट्टी जमली आणि अनेक

प्रतिबिंब पाण्यात दिसते. ही इमेज आपण तोपर्यंत अनेक चित्रांमध्ये पाहिलेली आहे. पण चित्रपट माध्यमाचे हे एक उत्तम वापराचे उदाहरण आहे. हे फ्रेमिंग, कंपोझिशन खासच म्हटले पाहिजे. असा दृश्यात्मक परिणाम स्टेजवर निर्माण करणे अवघडच होते. ह्याच्या पुढचा शॉटमध्ये सगळे दाट झाडीतून बाहेर येताना दिसतात. हा हेड ऑन शॉट आहे आणि त्याच्या पुढच्या शॉटमध्ये हा सगळा ताफा खडतर अशा दगडी परिसरातून उजवीकडून डावीकडे जात आहे. दगडांवरून उतरत आहे. खाली उतरून बाण मारत पुन्हा दाट झाडीतून पुढे येत आहे. सिनेमाचा अभ्यास करताना ही मुव्हमेंट, हा प्रवास कसा दाखवायचा हा फार महत्त्वाचा भाग असतो. एकामागे एक दाखवलेल्या ह्या दृश्यांमुळे ह्या पात्रांचा प्रवास पुढे पुढे होत आहे. वेगवेगळ्या टप्प्यांमधून होत आहे हे प्रेक्षकांच्या लक्षात येणे महत्त्वाचे असते. ह्याच प्रकारचा परिणाम पाठलाग दृश्यांमध्ये साधला जातो.

दादासाहेबांनी हा आणि असे अनेक परिणाम अचूक मांडले आहेत. पहिल्याच चित्रपटात ही जाण होणे, विकसित होणे हे त्यांच्या अभ्यासू-सृजनात्मक वृत्तीचे उदाहरणच आहे!

दादासाहेब फाळके यांचा राजा हरिश्चंद्र पाहिला की लक्षात येते त्यांच्यावर भारतीय चित्रकलेचा, संस्कृतीचा किती प्रभाव होता. 'राजा हरिश्चंद्र'मधली कित्येक दृश्ये, शॉट्स ही राजा रविवर्मा यांच्या चित्रांची आठवण करून देतात. कॅमेऱ्याचा आणि चित्रपटतंत्रांचा अगदी थोड्या काळात अभ्यास करूनदेखील त्यांचे शॉट्स, त्यांचे कम्पोझिशन म्हणजेच फ्रेममधली मांडणी. अत्यंत प्रभावी आहे. त्यांना

गोष्टी आता पडद्यावर दिसू लागल्या. लवकरच चित्रपट व्यवसाय हा एक मोठा उद्योग बनू लागला. अनेक दिग्दर्शक, एडिटर्स (चित्रपट संकलक), कलानिर्देशक आणि निर्मितीसाठी आवश्यक प्रत्येक गोष्टीसाठी मंडळी एकत्र येऊ लागली. आपण आजही चित्रपटांची जी भाषा पाहतो, चित्रपटाचे दृश्यात्मक परिणाम अनुभवतो ते मूकपटांच्या दोन दशकांत साकार झाले आहे. अक्षरश: Trial and Error मधून किंवा प्रयोगातून शिकत शिकत आणि पुढील चुका टाळत जगभरातील चित्रपट बनवणाऱ्या लोकांनी मिळून एका जागतिक भाषेला जन्म दिला. चित्रपटाची भाषा अशी आहे की ती खूप मोठ्या प्रमाणात, बहुभाषिक आणि बऱ्याचदा अशिक्षित वर्गासही सहज कळते. या भाषेविषयी अनेक थिअरीज आहेत पण सगळ्यात महत्त्वाची बाब म्हणजे आजही या भाषेचा विकास होत आहे. यामुळे जगभर वेगवेगळ्या गोष्टी आपल्यासमोर नव्या, आकर्षक पद्धतीने मांडल्या जात आहेत. यामध्ये मनुष्याच्या ज्ञानेंद्रियांची पुरेपूर वापर केला जातो. चित्रांची मांडणी, त्यातील नाट्य, हालचाल, आवाज म्हणजेच लिहिलेले-बोललेले संवाद, कायिक-वाचिक अभिनय, संगीत या सर्वांतून ही भाषा उलगडत जाते. चित्रपट, चित्रपटांची ही भाषा सर्व देश आणि सांस्कृतिक मर्यादा ओलांडून रसिक प्रेक्षकांपर्यंत पोचते. एक चांगली कला असल्याचे महत्त्वाचे लक्षण म्हणजे लोकांच्या मनात त्यांच्या हृदयात एक स्थान चित्रपटकला निर्माण करते.

बऱ्याचदा चित्रपटांचा विचार करताना आपण अभिनेते आणि दिग्दर्शक यांचाच विचार करतो. चित्रपट हे

दिग्दर्शकाच्या आविष्काराचे माध्यम आहे. चित्रपटनिर्मिती करताना लेखक, अभिनेते, कॉम्प्युटर ग्राफिक्स, आभासी दृश्यनिर्माते, नृत्यदिग्दर्शक, मेकअप आर्टिस्ट, कॉच्युम डिझाइनर, संगीतकार, वादक, गायक, संपादक, साउंड डिझाइनर, अगदी सुतार आणि स्वयंपाकी किंवा कॅटरर्स सगळ्यांची सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो. तरीही सिनेमाची महत्त्वाची पंचतत्त्वे म्हणजेच निर्मितीकौशल्य, अभिनयगुण, संगीतसौंदर्य, वाङ्मयीन गुण आणि सिनेमाचे तंत्र. या सर्वांच्या संगमामुळे चित्रपट विलक्षण लोकप्रिय होतो. सिनेमा ही एक सामाजिक कला आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक इंगमर बर्गम (Ingmar Bergman) यांनी असे म्हटले आहे, की पूर्वी जसे अनेक कारागीर, कलाकारांनी एकत्र येऊन इजिप्तचे पिरॅमिड उभारले. युरोपात अनेक सुंदर वास्तूंची रचना केली. भारतात, आशिया खंडात सुंदर मंदिरे बांधली. त्याप्रमाणे आजचा सिनेमा हा अशा प्रकारच्या गोळा किंवा एकत्रित प्रयत्नांचा परिणाम आहे. मानसशास्त्रज्ञ गेस्टाल्टच्या म्हणण्याप्रमाणे 'आपल्या मनाचे कार्य फक्त बाह्य संवेदनांवरून (sensations) ठरत नाही तर ते त्या संवेदनांच्या गरजेपेक्षा काहीतरी जास्त असतं.' पडद्यावर दिसणारा एखादा तपशील याला काही सांकेतिक अर्थ असतो किंवा हा एक असा घटक आहे जो संपूर्णाचे प्रतिनिधित्व करतो. युंग या मानसशास्त्रज्ञाने अशी वैश्विक चिन्हे (universal symbols) असतात हे शोधले होते. आपल्या लहानपणापासून आपली जडणघडण, आपल्या भोवतीची समाज, काळ आणि खरे तर माणसाचा संपूर्ण इतिहास महत्त्वाचा असतो. आपल्या महाराष्ट्राच्या संदर्भात किंवा भारतीय संदर्भात बघायचे तर हळदकुंकू, नथ, मंगळसूत्र ही सौभाग्याची प्रतीके आहेत. गो पद्म, स्वस्तिक ही भरभराटीची चिन्हे आहेत. कोयरी हे आंब्याचे प्रतीक आहे. आंब्याच्या डहाळ्या, फळे आपण शुभप्रसंगी वापरतो. तसेच नारळ किंवा श्रीफळ हे सन्मानाचे, सौभाग्याचे चिन्ह आहे. गुलाल हे उत्सवाचे प्रतीक आहे तर बुक्का हा वारकऱ्यांमध्ये प्रिय आहे. चंदन हे शांत, शीतल, शुद्ध अशा भावांचे प्रतीक आहे. 'माणूस' या चित्रपटात व्ही. शांताराम यांनी केलेले काही प्रतीकांचे वापर हे मराठी सिनेमाला एका उंचीवर नेतात. अगदी क्रेडिट टायटलपासून त्याची सुरुवात होते. चालत येणारी पावले आपल्याला दिसतात आणि एक खडतर वाट पार करतात. सिनेमातल्या पुढील खडतर प्रसंगांचे हे सूतोवाच आहे. श्रेयनामावली दगडांवर कोरलेली दिसते.

मुंबईतल्या वेश्या वस्तीचा आणि त्याच्या आजुबाजूच्या परिसराचा सेट आपल्याला तिथल्या समाजाची, त्या काळाची तात्काळ जाणीव करून देतो. '२५५' आणि मैना यांची अकस्मात भेट होते. पुढे त्याच्या प्रेमात व्याकुळ मैना '२५५'चे चित्र भिंतीवर रेखाटते. नंतर मेणबत्तीच्या मेणाच्या ठिपक्यांनी तेच लिहिताना दिसते; तिच्या प्रियकराचे ते प्रतीकच असते. या चित्रपटात शाहू मोडक आणि शांता हुबळीकर यांची देहबोली, त्यांचे संवाद यातून साकारलेल्या व्यक्तिरेखा यादेखील समाजातील दोन टोकांवरच्या घटकांची प्रतीके आहेत. प्रतिष्ठित समाज आणि एक वेश्या या दोन Archtypical images ह्यातून मांडलेल्या आहेत. 'क्या हम इन्सान नही?' हा मैनेचा प्रश्न हाच या चित्रपटाच्या केंद्रस्थानी आहे. रामू चहावाला हा निरागसतेचे प्रतीक आहे. आयुष्याच्या अवघड वळणांवर तो सहज चालत आहे. तो हातात कपबश्यांची चळत सांभाळतो तशीच स्वत: जगण्याची कसरत करत आहे. त्याच्या तोंडी एक भन्नाट गाणे आहे. काहीही बोल नसताना खूप काही सांगणारे ते गाणे आहे. 'आता कशाला उद्याची बात – बघ उडूनी चालली रात' हे जणू त्यांच्या जगण्याचे ब्रीदवाक्य आहे. हे गाणेही मारवाडी, पंजाबी, बंगाली, कानडी अशा भाषांमध्ये गायले आहे. प्रत्येक कडव्यात मैना एकेका गिऱ्हाईकाची टोपी घालते. ह्या टोप्या ह्यादेखील नकळतपणे आपल्या मनात त्या त्या राज्याची, भाषेची, माणसांची प्रतीके आहेत.

'लंकादहन'च्या चित्रीकरणाची आठवण सांगताना मंदाकिनी आठवले यांनी सांगितले आहे– ''बकाणा वृक्षाखाली आठ-दहा फूट उंचीचा एक लोखंडी गर्डर होता. त्यावर तीन मारुतींना पालथे पडायला सांगितले व त्यांनी हातापायाची हालचाल सुरू केली, की चित्रीकरणाला सुरुवात होत असे. मारुती उंचच उंच व दूरच दूर उडत चालला आहे असा भास व्हायचा. दूर गेल्यावर मारुतीचा आकार साहजिकच लहान होत जातो. सर्वात छोटा दिसणारा मारुती मी होते. गर्डरवर व मागे लावलेल्या काळ्या पडद्यामुळे पडद्यावर फक्त मारुतीच दिसायचे. कुठल्याही चित्रपटातील मारुती हा नाकासमोर जाताना दिसतो पण या चित्रपटात मात्र तो गरागरा फिरताना दिसतो हे बघून प्रेक्षक आश्चर्यचकित होऊन जायचे!''

शांताराम, विनायक, बाबुराव पेंढारकर, बाबुराव पेंटर यासारख्या सृजनशील, विचारी दिग्दर्शकांनी आपल्या चित्रपटांमध्ये असे अनेक प्रयोग करून प्रेक्षकांना आपल्या सांस्कृतिक पार्श्वभूमीशी जोडून त्याप्रमाणे विचार करण्याची, तर्क करण्याची दिशा दाखवली. आपल्या मनात खोलवर दडलेल्या समजुती, परंपरा, विचार हे या अशा काही

चित्रपटांमधून आपल्याला विचार करण्यास, खोलवरचे अर्थ शोधण्यास प्रवृत्त करतात. 'माणूस'मधील देवीला कौल लावणे, 'शेजारी'मधील 'दोघांच्यामधनं विस्तव नेऊ नये' – हे काही प्रसंग असे आहेत. आपण यात अर्थ शोधतो. आपल्या समजुतींचा पुन्हा एकदा विचार करतो.

मराठीतील सुरुवातीच्या अनेक चित्रपटांवर संगीत नाटकाचा, लोककलेचा प्रभाव ठळकपणे जाणवतो. चित्रपट तंत्रज्ञानामुळे काही खास परिणाम साधता येऊ लागले. स्पेशल इफेक्टस – खास आभासी तंत्राचा वापर करून 'तुकाराम'मधील विमान, 'संत ज्ञानेश्वर'मधील वेद म्हणणारा रेडा आणि उडणारी भिंत पाहून प्रेक्षकांचे भान हरपत असे.

चित्रपट ही एक आगळीच कला आहे कारण त्यात चित्रकला, शिल्पकला, संगीत (गायन, वादन, नृत्य) नाट्य, अभिनय, लेखन, या सर्वच कलांचा मिलाफ आहे आणि या सर्वांचा मिळून साधलेला परिणाम हा ह्या सगळ्यांपेक्षा वेगळाच आहे. चित्रपटाचा प्रेक्षक हा एक मुख्य घटक हादेखील ह्या कलेची परिपूर्ती करण्यात महत्त्वाचा आहे.

प्लॅटोने कवितेच्या संदर्भात असे म्हटले आहे, की ''ज्या कविता, जे कवी आपल्याला आवडतात ते त्यांनी त्या कलेचे नियम पाळले आहेत म्हणून नव्हे तर त्यांनी एका प्रेरीत अवस्थेत उच्चारलेल्या सुंदर रचना आपल्याला आवडतात म्हणून.'' मुळात Aesthetics हा 'aisthetikos' ह्या ग्रीक शब्दावर आधारलेला आहे. त्याचा अर्थ आहे– 'sensitive', आणि याचा मूळ शब्द 'aisthanomai' याचा अर्थ आहे– ''I perceive, feel, sense.''

चित्रपट माध्यमाचा विचार करताना पडद्यावरचे आणि पडद्यामागच्या सर्व कलाकारांनी मिळून बनवलेल्या कलाकृतीची परिपूर्णता ही प्रेक्षकांपर्यंत पोचल्यावरच होते. तो चित्रपट पाहताना प्रेक्षकाला जे कळते, जे जाणवते, ते त्याच्यापर्यंत पोचते ते फार महत्त्वाचे असते. ह्या चित्रपटांमधले विविध 'रस' भावभावना आणि त्याचे अर्थ प्रेक्षकांसमोर मांडणे हे चित्रपटनिर्मितीमधलं खरं आव्हान आहे. जशी दिग्दर्शकांची, लेखकांची संवेदनशीलता महत्त्वाची असते तशीच प्रेक्षकांची आनंदाची, दुःखाची जाणीव होण्याची, समजण्याची क्षमता तेवढीच महत्त्वाची. कुठल्याही कलाकृतीची समज प्रेक्षकाच्या भावनिक, बौद्धिक ग्रहणशीलतेतून आणि त्याच्या अनुभवानुसारच होते. चित्रपटातील आशय आणि त्याची निर्मिती या दोन्ही गोष्टींची मिळून या माध्यमाची अशी जादू होती, की ती जाणवते; पण ती नक्की काय आहे हे सांगता येणे अवघड आहे. टॉलस्टॉयच्या मते 'कला ही अशी



मानवीकृती आहे ज्यामध्ये एखादा मनुष्य जाणीवपूर्वक काही संकेतांच्या साहाय्याने त्याने अनुभवलेल्या भावभावना इतरांपर्यंत पोचवतो व ते पाहणाऱ्यास तशाच भावनांचा अनुभव घेता येतो.'

अशी अनुभूती आचार्य अत्रे दिग्दर्शित 'श्यामची आई' (१९५३) बघताना आजही येते. नाशिकच्या सेंट्रल जेलमध्ये अटकेत असलेले सानेगुरुजी त्यांच्या माउलीची– त्यांच्या आईची गोष्ट सांगत आहेत अशाच दृश्याने चित्रपटाची सुरुवात होते आणि आपण फ्लॅश बॅक पाहू लागतो. श्यामच्या लहानपणाच्या काळात आपण पोचतो. हा काळ आहे इंग्रज राजवटीविरुद्ध लोकमान्य टिळकांनी बंड पुकारले, स्वदेशी वापरण्याचे सर्वांना आवाहन केले तो काळ. चित्रपटांचे हे एक अत्यंत महत्त्वाचे असे वैशिष्ट्य आहे. आपल्याला त्या काळातली सामाजिक, राजकीय परिस्थिती, कथेतील पात्रांची आर्थिक स्थिती लक्षात येते. श्याम शाळेतल्या इतर मुलांना सांगतो, 'टिळकांनी सांगितलंय, विलायती साखर तुम्ही सोडा, जो सोडणार नाही त्याच्या डोक्यात घाला हातोडा' – तेवढ्यात मास्तर तिथे येतात आणि म्हणतात, 'त्यांचं नाव घेऊ नका, सध्या त्यांच्यावर खटला चालू आहे.' पुढे वडील एका वाण्याला विलायती साखर न विकण्याची शपथ घेण्यास सांगत आहेत आणि इकडे शाळेत श्यामच्या सांगण्यावरून टिळकांना अटक केली म्हणून शाळेतील सगळी मुले निघून जातात. गुरुजी श्यामला ह्या आगाऊपणाबद्दल शिक्षा करतात. ते श्यामला छड्या मारतात. लाँग शॉटमध्ये छड्या मारणारे गुरुजी आणि श्याम भोवती त्याचे काही मित्र दिसतात. त्याच्या पुढच्या शॉटमध्ये क्लोजअपमध्ये आपल्याला श्यामचा चेहरा दिसतो. तो मोजत आहे ९–१०–११. तो मार सहन करत आहे पण एकेका छडी बरोबर त्याच्या चेहऱ्यावर वेदना दिसू लागते.

कृष्णधवल चित्रपटमाध्यम काही दिग्दर्शकांनी अत्यंत



प्रभावीपणे हाताळले. त्यातील लिमिटेशन त्यांनी ॲडव्हान्टेज म्हणून वापरली. त्यांनी असे विषय आणि मांडणी निवडली की ज्यामुळे त्यांनी गुंतागुंतीचे प्रसंग, स्थळ, भोवतालचे किचकट वातावरण अशा काही गोष्टी टाळून अत्यंत सहजसुंदर गोष्टी प्रेक्षकांसमोर मांडल्या.

सिनेमा माध्यमाच्या या ज्या मर्यादा आहेत तेच त्याचे गुणधर्मही आहेत. कॅमेरा समोरचे वास्तव हुबेहूब टिपतो. नटाच्या मिशीच्या प्रत्येक केसापासून ते नटीच्या गालावरील अथवा फोडा-तिळापर्यंत. जर या तंत्राचा योग्य वापर केला तर एक बटबटीत वास्तवाचे दर्शन घडते. म्हणूनच चित्रपटाच्या भाषेचा आविष्कार झाला. रखरखीत वास्तव काव्यात्मकरीत्या मांडण्यासाठी प्रतिकात्मक दृश्यपरिणामांचा उपयोग केला गेला. चित्रपट माध्यमाच्या या त्रुटी भरून काढण्यासाठी दिग्दर्शक आणि इतर तंत्रज्ञ कठोर परिश्रम घेतात, सृजनात्मक विचार करून प्रेक्षकांच्या भावनांना आवाहन देतात. भालजी पेंढारकरांचा 'साधी माणसं'मधला लोहाराचा भाता त्याच्या आयुष्याचे प्रतीक होतो. त्या साध्याभोळ्या माणसांना आयुष्याच्या भट्टीत तावून-सुलाखून, घावावर घाव सोसून, सर्व बिकट परिस्थितीतून मार्ग काढावा लागतो. तो लोहाराच्या भट्टीचा भाता, चौरी वर-खाली ओढत बसलेली, अंगावर उडणारे निखारे, ठिणग्या सोसणारी त्याची पत्नी आणि योग्य आकार प्राप्त होईपर्यंत लोखंडावर घाव घालून वस्तू तयार करणारा लोहार ही सगळी पेंढारकरांनी वापरलेली दृश्यात्मक प्रतीके आहेत.

भालजी पेंढारकरांच्या 'मराठा तितुका मेळवावा'मध्ये 'प्रिय अमुचा एक महाराष्ट्र देश हा' या गाण्यात शिवाजी महाराजांच्या अष्टकोनी राजमुद्रेत, क्रेडिट टायटल्स दिसू लागतात.

चित्रपटाची सुरुवात होते ते महाराष्ट्राचा शिवपूर्व इतिहास सांगणाऱ्या एका शाहिराच्या आवाजाने. पुढे भारताच्या टोपोग्राफिकल मॅपचे मॉडेल दिसते आणि त्या पुण्यभूमीवर चालू असलेल्या अत्याचारांचे वर्णन होत असताना त्या नकाशावर कॅमेरा झूम इन होतो आणि अचानक त्या नकाशावरील मातीतून एक माणूस, एक मावळा उठून बसतो. तो रुबाबदार आहे पण बेड्यांमध्ये जखडलेला आहे. त्याचे नाव महाराष्ट्र. तिथल्या लोकांवर, प्रजेवर अन्याय-अत्याचार होत आहेत अशी दृश्ये पुढे आपल्याला दिसतात. ह्या चित्रपटातील तसेच भालजींच्या 'छत्रपती शिवाजी स्वराज्याचा शिलेदार' या चित्रपटांतील प्रतिमा, दृश्ये यांनी आपल्या मनात कायमचा ठसा उमटवला आहे.

चित्रपट, लघुपट, माहितीपट हे सगळे प्रकार हे गोष्टी सांगण्याचे वेगवेगळे फॉर्म्स आहेत. पूर्वी अशा गोष्टींच्या मौखिक परंपरेचा वापर हा शिक्षणासाठी, ज्ञानप्राप्तीसाठी किंवा धार्मिक कार्याच्या प्रसारासाठी व्हायचा. चित्रपटांमुळे आपण एखादी गोष्ट एखाद्याच्या नजरेतून पाहू शकतो आणि काही काळापुरते स्वत: एखाद्या पात्राच्या ठिकाणी असल्याची कल्पना करू शकतो.

राजा परांजपे यांचा 'लाखाची गोष्ट' याचे एक उत्तम उदाहरण म्हणता येईल. हा चित्रपट त्याकाळचा (१९५२) मध्यमवर्गीय लोकांचा रोमँटिसिझम दर्शवतो. नुकतेच देशाला स्वातंत्र्य प्राप्त झाले होते. कवी, गायक, चित्रकार हे आपापले एक्स्प्रेशन करण्यास आतूर होते. अत्यंत सामान्य परिस्थिती. खूप काही करायची इच्छा पण संधी नाही. कलोपासनेत पैशाची प्राप्ती नाही. पैशांअभावी रंग आणि कॅनव्हास तरी कसा आणणार अशा कोड्यात अडकलेले राम आणि श्याम म्हणजे राजा परांजपे आणि राजा गोसावी हे या चित्रपटाचे नायक. या चित्रपटात नायिकेचे वडील श्यामच्या हातात एक लाख रुपये ठेवतात आणि महिनाभरात हे सगळे खर्च करून दाखवण्याची अट घालतात. एकावर किती पूज्ये म्हणजे एक लाख हेदेखील माहीत नसलेला श्याम त्या पैशांच्या ओझ्याने, त्या विचारांनी कोसळतोच. ह्या पैशांमुळे त्यांची शांती, मनस्वास्थ्य हरवते. श्याम ह्या पैशाला वैतागला आहे याचे एक अप्रतिम स्वप्नदृश्य ह्या चित्रपटात आहे. वादळ सुटलेय आणि पैशाची पाऊस पडतोय. माठ फुटतो आणि पाण्याऐवजी नाणी पडतात. खिडक्या, पडदे जोरजोरात हलत आहेत. श्याम पाणी प्यायला जातो तर पाण्याच्या जगमधूनही नाणीच पडतात. त्याच्या गादीवरचे बेडशीटही एक मोठी हजाराची नोट बनते. तो एका नोटेवर बसून उडत जातो अन् खाली पडतो. तर फरशीही

नोटांचीच! पुढच्या शॉटमध्ये फोनही पैसेजडित आहे. त्याच्या फक्त डोळ्यांवर प्रकाश आहे– तो आश्चर्य, भीतीने या सर्वांकडे पाहत आहे. घरातले सगळे फर्निचर ही पैशांचे दिसू लागते. तो डोळ्यांवर हात धरतो तर हातही सोन्याचा झाला आहे. पुढच्या शॉटमध्ये तो अख्खा सोन्याचा झाला आहे. मिडास राजासारखा. पुढच्या शॉटमध्ये किंग जॉर्जचा छाप असलेल्या चांदीच्या रुपयाची मोठी नाणी त्याच्याभोवती फेर धरतात.

या रूपेरी पिंजऱ्यात त्याचा जीव गुदमरला आहे आणि पैसे मिळाल्यावर कलेची सेवा करता येत नाही याची त्याला भयंकर खंत आहे. या दृश्यमालिकेत राजा परांजपे यांनी प्रतिकांचा, चित्रपटाच्या भाषेचा अप्रतिम उपयोग केला आहे. ते चित्रपटांतील प्रत्येक गोष्ट तळमळीने करून घ्यायचे. त्यांच्या अभिनयातली व दिग्दर्शनातली विशेषता म्हणजे स्वाभाविकता, सहजता. त्यांच्या चित्रपटांतील सामान्य माणसे, त्यांचे रोजचे जगण्याचे प्रश्न त्यांच्या आयुष्यात घडणाऱ्या घटना इतक्या खऱ्या होत्या की असंख्य सामान्य प्रेक्षकांनी त्यांना भरभरून दादा दिली. त्यांच्या भूमिकेतील एकरूपता इतकी होती, की एकदा शाहू मोडक 'उनपाऊस' हा चित्रपट पाहत होते तेव्हा चित्रपट संपल्यावर ते म्हणाले, की 'म्हाताऱ्या मास्तरचे पैशांच्या अभावी झालेले हाल बघून असे वाटले, की म्हाताऱ्याला शंभर रुपयांची नोट नेऊन द्यावी.'

चित्रपट पाहताना आपण प्रेक्षक विविध भावना अनुभवतो, कधी अधिक शूर बनतो, गमतशीर बनतो तर अधिक सुंदर किंवा अधिक दयनीय होतो. दुःखद आणि धोकादायक प्रसंगांना सामोरे जातो. एक चांगला चित्रपट बघितला, की आपल्याला आनंद होतो, उत्साह येतो. अनेक वेगवेगळ्या अनुभवांतून, भावभावनांतून आपण स्वतः चित्रपटांच्या पात्रांच्या जगात वावरतो. त्यांची गोष्ट त्यांची सुखदुःखे त्यांच्या नजरेतून समजावून घेतो. हा catharsis जो आपण अनुभवतो. मुनष्याच्या मनाच्या भावभावनांचा हा सहवास आणि त्यात सहभागी होण्याचा त्या सगळ्या पात्रांशी होणारा आपला cathertic contact हा मनुष्याच्या अत्यंत मूलभत गरजांपैकी एक मानला गेला आहे.

पडद्यावर दिसणाऱ्या प्रत्येक फ्रेममध्ये अनेक गोष्टी योग्यरीत्या गुंफल्यामुळे ती अधिक प्रभावी होते. सगळ्यात आधी लक्षात येते ते त्यातले पात्र, तसेच त्याचे कपडे, त्याचा मेकअप, त्याची हेअरस्टाइल, त्याचे संवाद. तो जिथे आहे त्या लोकेशनचा योग्य वापर, कलादिग्दर्शन, छायाप्रकाशाचा खेळ, कॅमेऱ्याने तो शॉट कशाप्रकारे कंपोझ केला आहे ते. कुठली लेन्स वापरली आहे. तो शॉट कुठल्या अँगलने घेतला आहे. त्याच्याबरोबरच्या इतर पात्रांच्या मनाने या पात्रांची पोझिशन, त्या दोन पात्रांमधला संवाद. त्यांच्यातच प्रेम अथवा ताण दाखवण्यासाठी वापरलेले विशिष्ट पद्धतीने केलेल्या फ्रेमची किंवा शॉटसची रचना. हे सर्व शॉट्स एकामागून एक पडद्यावर कसे दिसतात. त्यांची रचना, त्यांचा पेस, त्यांचा ऱ्हिदम. त्या सर्वांमधून मूळ संहितेपेक्षा (Text) वेगळे असे सबटेक्स्ट आपल्यासमोर मांडले जाते. ह्या सर्वांमधून सिनेमाची भाषा तयार होते. या भाषेमधले अर्थ प्रकट होतात. ही सिनेमाची भाषा जर योग्यरीत्या नाही वापरली तर चित्रपटांतून जी गोष्ट प्रेक्षकांपर्यंत पोचणे अभिप्रेत आहे ती योग्यरीत्या पोचणार नाही.

सिनेमाची ही भाषा सतत विकसित होत आहे. गेल्या शंभर वर्षांत आपल्याकडे यात अनेक प्रयोग झाले आणि होत आहेत. आजही मराठी चित्रपटनिर्माते आणि दिग्दर्शक चांगल्या संहितेच्या शोधात आहेत. बजेट आणि तंत्रज्ञानाचा मेळ घालायचा प्रयत्न करत आहेत. एक चांगला चित्रपट, एका चांगल्या कलेची अनुभूती देतो. प्रेक्षकांना नवीन वेगाच्या, अनुभवांच्या, खजिन्याच्या गुहेचे दार उघडण्याचा मंत्र देतो. प्रेक्षक म्हणून, स्वतःच्या आयुष्याच्या मर्यादा ओलांडून, काही काळाकरता का होईना एक वेगळ्याच विश्वाची, दुसऱ्याच्या अनुभवांची, एक वेगळा दृष्टिकोन जाणून घ्यायची आपली अशी एक इच्छा असते . प्रेक्षक म्हणून आपण वेगवेगळ्या गोष्टींमधून जगण्याचे, आयुष्याचे नवनवीन अर्थ शोधत असतो.

चित्रपटात प्रेक्षकांना जे दिसते त्यापेक्षा ते त्यामध्ये दडलेल्या, त्यामधून अभिप्रेत होणाऱ्या गर्भित अर्थाचा शोध घेण्याचा प्रयत्न करतात. प्रेक्षक चित्रपटांमधून नव्या कल्पनांचे बीज शोधतात. चित्रपटांतील नव्या विचारांच्या वाटेवर चालतात आणि नव्या विचारांचे, विषयांचे प्रतिबिंब आपल्याला चित्रपटांमध्ये दिसते. चित्रपट हे असे माध्यम आहे का, की ज्यामुळे फक्त मनोरंजन घडते की एक असे माध्यम आहे ज्यामुळे आपल्या आयुष्यात बदल घडतात? ह्या प्रश्नांची उत्तरे गेल्या शंभर वर्षांत बदलली आहेत. बदलत राहतील. जगातील कानाकोपऱ्यात आज सिनेमा पोचला आहे आणि अगणित प्रेक्षकांची मने ही एक जादुई भाषा समजतात.

**स्वप्ना पाटसकर**
१०, रामकृष्ण अपार्टमेंट,
१६०१ सदाशिव पेठ,
पुणे–३०
swapnasmail@gmail.com


दीपावलीनिमित्त
हार्दिक शुभेच्छा!
प्रमोद हिंदुराव
अध्यक्ष, सिडको

RUCHEE Regd. MH/MR/WEST/79/2009-2011
RNI NO - 428 / 1987
POSTED AT MUMBAI PATRIKA CHANNEL STG OFFICE. MBI - 400 001

Kalyani Charitable Trust's

# Sapkal Knowledge Hub™

**Education Goes The Global Way...**



**Admission Open 2013-2014**

## Orchid International School™

ICSE / ISC    Residential / Day Boarding    Grade Nursery to XII

Top 10 Boarding School in Country & No 1 in Maharashtra by Education World -C FORE Survey 2012.

## Late G. N. Sapkal College of Engineering  EN 5182

B.E. (Civil, Mechanical, E & TC & Computers)
M.E. (Civil) Structure Engineering
M.E. (E & TC) Signal Processing
M.E. Computer Engineering



**Mr. Ravindra G. Sapkal**
Chairman & Managing Director

## K. R. Sapkal College of Management Studies  MB 5127

(MBA) Marketing / Finance / IT & Systems / Production & Materials / HR / International Business Management

## R. G. Sapkal College of Pharmacy  PH 5210

Bachelor of Pharmacy,
M. Pharma (Quality Assurance Techniques)
M. Pharma (Pharmaceutics)

All Colleges are approved by AICTE/ MSDTE/ Govt. of Maharashtra & Affiliated to University of Pune
Accredited to ISO 9001:2008, ISO 14001:2004 OHSAS 18001:2007






**CAMPUS:** Sapkal Knowledge Hub, Kalyani Hills, Anjaneri, Wahdoli, Trimbakeshwar Road, Nashik - 422213
**Tel. No: 02594 220167 to 70 Fax: 02594 220164  Mob.: 9404782787**
**info@sapkalknowledgehub.org  www.sapkalknowledgehub.org**

'रुची' हे मासिक संपादक दिनकर गांगल यांनी 'ग्रंथाली' करता इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०० ०३१ येथे छापून ग्रंथाली, द्वारा वुलन मिल म्युनि. स्कूल, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, जे.के. सावंत मार्ग, माटुंगा (प.), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.